म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ...ज्ञितरा..........
ग्रं. क्र. 3820




REFBK-0026377

लता राजे

# परिक्रमा

# २

२५।१०।९९ १०।१२।९९

2 JAN 1991

15 MAR 1991

22 APR 1992

25 APR 1992

13 MAY 1992

7 C 1992

7 OCT 1992

7 JAN 1993

JUN 1993

10 JUL 1993

1 SEP 1993

संदर्भ पुस्तक कृपया जपून वापरावे. धन्यवाद.

निबंध

२६३५५ ३७२५

२६३५५

२२।४।९७

३७२५

२६३५५

निबंध २२।४।९७

२७।९।९९

१।१०।९९

१५।११।९९

# प रि क्र मा

## (भाग २)

लता राजे

REFBK-0026377

श्रीविद्या प्रकाशन

२५०, शनिवार, पुणे ३०.

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन,
२५०, शनिवार पेठ, पुणे – ३०.

© लता राजे

मुखपृष्ठ : कमल शेडगे
प्रकाशनकाल
प्रथमावृत्ती : २९ मार्च, १९९१

मूल्य : ७५ रुपये

मुद्रक :
महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय
९१५/२ शिवाजीनगर,
पुणे - ४.

टाईप सेटर :
हेमंत हरीष भोळे
'क्षितिज'
२०३, ब्ल्यू बर्ड सोसायटी,
शिवाजीनगर, पुणे – १६.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥
हे सत्य भगवद्गीतेच्या अभ्यासापूर्वीही तिच्याच आचरणातून उमगलं.
सौख्यभोग इतरांसाठी होते.
तिच्या वाट्याला ऐन उमेदीत फक्त कष्टच आले.
आयुष्यभर कर्मयोगच आला...
फलाशा धरायची नसते, हेही तिच्याच उत्तरायुष्यातून स्पष्ट झाले...
तिला माझ्या आईला...
कै. विमलाबाई मल्हार राजे
हिच्या चरणी ...

**लता राजे**

—

# लेखिकेचे निवेदन

'परिक्रमा' चा हा दुसरा भाग वाचकांच्या हाती सोपविताना आनंद आणि आश्चर्य अशा दोन्ही भावनांच्या मिश्रणाचा अनुभव मी घेत आहे. १९८६ मध्ये 'लोकसत्ते'त 'परिक्रमा' हे सदर सुरू झाले. दर सोमवारी ह्या सदरात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांपैकी काही निवडक लेखांचा संग्रह १९८८ मध्ये 'परिक्रमा' ह्याच शीर्षकाखाली श्रीविद्या प्रकाशनाने प्रसिद्ध केला आणि वाचनात येऊन गेलेले लेखन असूनही वाचकांनी त्याचे स्वागत केले म्हणून आनंद वाटतो. सदर सुरू झाले तेव्हा ते लोकप्रिय होईल, अशी खात्री नव्हती, किंबहुना त्याची दखल घेतली जाईल, असेही वाटले नव्हते, त्याचे पुस्तकात रूपांतर होण्याची अपेक्षा तर स्वप्नातही बाळगली नव्हती. पण तसे प्रत्यक्षांत घडले, हे आश्चर्यच! दुसरा भाग निघेल, असेही कधी वाटले नव्हते, तर तोही योग आज येत आहे. हे एका सदराचे भाग्य. पहिल्या भागाच्या वेळी अनेक चुका राहून गेल्या. कारण त्याचे पुस्तक निघण्याची शक्यता कधी मनात न डोकावल्याने काटेकोरपणे कात्रणे ठेवणे, हस्तलिखित जपणे, इतकेच काय, पण लेखांवर ते प्रसिद्ध झाले तो दिनांक घालणे अशा बाबतीतही मी बेफिकीर राहिले. आताही दुसरा भाग निघण्याची अपेक्षा न बळगल्याने अनेक चुका तशाच राहिल्या. माझ्यात सुधारणा एवढीच झाली की, कात्रणे ठेवताना मी त्यांवर प्रसिद्धीची तारीख नोंदू लागले. राहून गेलेल्या चुकांचा दोष सर्वस्वी माझा आहे.

जागतीक रंगभूमीवर घडत गेलेल्या घटनांची दखल घेणे हा 'परिक्रमा' चा प्राथमिक हेतू आहे. त्यात काही संस्मरणीय घटना आहेत, तशाच काही वादळी स्मृती आहेत. (जागतिक पातळीवर महत्त्वपूर्ण व्यक्तींच्या जीवन समाप्तीबाबतचे लिखाण आहे, आणि दूरगामी परिणाम करु शकणाऱ्या घटनांचा आढावाही आहे.) 'परिक्रमा भाग-२' मधील लेख निवडताना मी देशनिहाय संगती लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे जर्मनीसंबंधीचे लेख, जपानसंबंधीचे लेख असे वर्गीकरण त्यात झाले आहे. कदाचित ते कोणाला रुचणार

नाही. दिनांकवार निवड होणे, हे एखाद्याला अधिक योग्य वाटू शकेलही, तथापि, मी आपला हा एक प्रयोग करून पाहिला.

ह्यांतील काही लेखविषयांचे संदर्भ आज बदलले आहेत. उदाहरण द्यायचे तर कुवेतवरील इराकी आक्रमणाबाबतचे लेखन घ्यावे. आज कुवेत मुक्त झाल्याने आक्रमणाबाबतचे किंवा सद्दाम हुसेनबाबतचे स्फुट एखाद्याला निरस वाटू शकेल. तथापि, माझे व्यक्तिगत मत आहे की, संदर्भ बदलले तरीही आक्रमण काय अथवा जयापजय काय, त्या ऐतिहासिक घटना असतात. इतिहासात कालबाह्य झाले म्हणून अमूक एक प्रकरण टाकाऊ ठरत नाही. कारण शेवटी तो घडलेला इतिहास असतो, त्याची दखल घेणे आवश्यक असते... पुनरावृत्ती इतिहासाची होत नसते तर माणसांच्या प्रमादांची होत असते. माणसे त्याच चुका परत करतात. मग साहजिकच इतिहासात तीच आवर्तने उठत राहातात.

'परिक्रमा' सदरामागची कल्पना आणि प्रेरणा लोकसत्तेचे संपादक श्री. माधवराव गडकरी ह्यांच्या आधीचे संपादक व त्यांच्या कारकीर्दी मी पाहिल्या आहेत. लोकसत्तेतील माणसांमधील गुण पारखणारा संपादक मात्र श्री. गडकरीच ठरले. आपल्या सहकाऱ्यांच्या आवडीचे विषय व प्रसंगी एखाद्याचा व्यासंग पारखून त्यांना लिहायला उत्तेजन देण्याची, सहकाऱ्यांच्या लेखणीचे, अभ्यासाचे बलस्थान ओळखून त्यांना सदरे देऊन, त्याबाबतचे स्वातंत्र्यही देऊन त्यांना प्रकाशात आणण्याची वृत्ती श्री. गडकरींच्या ठायी आहे. हा काही माझा एकटीचा अनुभव नव्हे. माझ्या सहकाऱ्यांचाही अनुभव समानच आहे. सदरातील निवडक लेखांचा संग्रह करून त्याचा स्वतंत्र ग्रंथ करायला लावणे ही देखिल श्री. गडकरींची कल्पना – जी 'श्रीविद्या'चे श्री. मधुकाका कुलकर्णी ह्यांनी उचलून धरली; त्याचा पाठपुरावा केला. विलंब झाला तो माझ्याकडूनच! श्री. मधुकाका कुलकर्णी वेळापत्रकाबाबत आणि कामाच्या शिस्तीबाबत तडजोड न करणारे पण त्यांना माझ्यापायी – म्हणजे माझ्या आळशी, वेळकाढूपणापायी त्रास घ्यावा लागला. श्री. कमल शेडगे ह्यांचे वेष्टनचित्र तर केव्हाच तयार झाले होते. 'परिक्रमा'साठी मी एक पद्धती तयार केली आहे. एखादी महत्त्वपूर्ण घटना अथवा व्यक्ती 'विषय' म्हणून घेतली की, माझ्या स्वतःकडील त्या 'विषया'चे संदर्भ मी तपासते आणि हे 'विषय' जर राजकीय व युद्धविषयक असले तर माझे बंधू श्री. नरायण राजे ह्यांच्याशी त्याबाबत चर्चा करून त्यांच्याकडील संदर्भही मिळवते. लेखन कितीही गडबडीत झाले तरीही माझे सहकारी आणि स्नेही श्री. प्रकाश कुलकर्णी हातातील कामे बाजूला ठेवून ते वाचतात आणि प्रतिक्रिया व्यक्त करून मोकळे होतात. ह्या सर्वांचे माझ्यावर केवढे उपकार आहेत.

– उपकार वाचकांचेही आहेत. मनापासून दाद देणारे वाचक, आपुलकीने पत्रे पाठवून एखादा विषय सुचविणारे वाचक, आंतरराष्ट्रीय घडामोडींबाबत मला एकदम 'तज्ज्ञ' बनवून टाकणारे वाचक, प्रसंगी टीका करणारे वाचक, पत्रकारितेत प्रवेश करू

उच्छिणारे विद्यार्थी ह्या सर्वांचा एवढा जिव्हाळा मला मिळत गेला ह्याचे कारण 'परिक्रमा' हेच! ह्या सदराने मला लोकप्रियता मिळवून दिली, स्नेह्यांच्या वर्तुळाचा परिघ वाढवून दिला. कित्येक वर्षे 'लोकसत्ते' मध्ये काम करूनही लता राजे हे नाव दखलपात्र झाले नव्हते; त्याची पुसटशी अशी ओळख का होईना – किमान हे नाव कोठे तरी वाचल्यासारखे वाटते असे वाटायला लावण्याची किमया 'परिक्रमा' ने केली. 'परिक्रमा' ने आणखीही खूप काही दिले. त्यातील लेखनाची दखल अमेरिकन परराष्ट्र खात्याला घ्यावीशी वाटली आणि अमेरिकेस जाऊन नवे काही शिकण्याचा योग 'परिक्रमा' मुळेच आला. प्रस्तुत संग्रहात 'गोष्ट एका आईची' ह्या शीर्षकाखाली न्यायालयाच्या बेअदबीच्या आरोपावरून कारावास भोगणाऱ्या एलीझबेथ मॉर्गन ह्या 'आई' ची कहाणी सादर केली आहे. अमेरिकेतील झुंझार बाण्याच्या काही महिलांनी १९९० च्या फेब्रुवारीत एलीझबेथ मॉर्गनशी माझी प्रत्यक्ष भेट घडवून आणली... तो कृतकृत्यतेचा क्षण 'परिक्रमा' मुळे आला. ज्यांना 'जेरीकोचा योद्धा' हे विशेषण सार्थपणे मिळाले. त्या रेव्हरंड ॲबरनॅथी ह्यांना पाहाण्याचा योग अमेरिकेत आला म्हणून झालेल्या आनंदाचे मी वर्णन करू शकत नाही. पण भारतात परतल्यानंतर थोड्याच काळात रेव्ह. ॲबरनॅथींचे निधन झाल्याने मृत्युलेख लिहिण्याची वेळ आली... हा एक दुर्दैवी योगायोग! माझं टिचभर अनुभवाचं विश्व 'परिक्रमा' मुळे विस्तारत गेलं. पूर्वी माझ्या बाबतीत 'वाचनाचं खूळ' हा शब्दप्रयोग होई तेथे 'परिक्रमा' मुळेच 'व्यासंग' हा शब्द येऊ लागला. 'व्यासंगा' पासून खरोखर मी अजून खूप दूर आहे. व्यासंग आणि विद्वत्ता हे शब्द विनाकारण योजल्यास पोकळ बनतात. योग्यता नसताना ही झूल कशाला पांघरायची? बालपणापासूनच्या वाचनवेडाला 'परिक्रमा' मुळे विशिष्ट दिशा मिळून 'परिक्रमे' साठी वाचन एवढा बदल मात्र झाला. १९८६ ते १९९१ अशी पाचवर्षे सलगपणे प्रकाशित होणाऱ्या ह्या सदराची फलश्रुती म्हणजे ही दोन पुस्तके. पहिल्या 'परिक्रमा' चे आपण स्वागत केलेत, म्हणून हा दुसरा भाग सादर करण्याचे धाडस करीत आहे. हीदेखिल एक परिक्षाच असते आणि परिक्षा म्हटली की, ईश्वरही आठवतोच. त्याला स्मरूनच तुमच्यापुढे हा नवा संग्रह ठेवते. चूकभूल द्यावी घ्यावी...

**लता राजे.**

मुंबई
११ मार्च, १९९१

नाही. दिनांकवार निवड होणे, हे एखाद्याला अधिक योग्य वाटू शकेलही, तथापि, मी आपला हा एक प्रयोग करून पाहिला.

ह्यांतील काही लेखविषयांचे संदर्भ आज बदलले आहेत. उदाहरण द्यायचे तर कुवेतवरील इराकी आक्रमणाबाबतचे लेखन घ्यावे. आज कुवेत मुका झाल्याने आक्रमणाबाबतचे किंवा सद्दाम हुसेनबाबतचे स्फुट एखाद्याला निरस वाटू शकेल. तथापि, माझे व्यक्तिगत मत आहे की, संदर्भ बदलले तरीही आक्रमण काय अथवा जयापजय काय, त्या ऐतिहासिक घटना असतात. इतिहासात कालबाह्य झाले म्हणून अमूक एक प्रकरण टाकाऊ ठरत नाही. कारण शेवटी तो घडलेला इतिहास असतो, त्याची दखल घेणे आवश्यक असते... पुनरावृत्ती इतिहासाची होत नसते तर माणसांच्या प्रमादांची होत असते. माणसे त्याच चुका परत करतात. मग साहजिकच इतिहासात तीच आवर्तने उठत राहातात.

'परिक्रमा' सदरामागची कल्पना आणि प्रेरणा लोकसत्तेचे संपादक श्री. माधवराव गडकरी ह्यांच्या आधीचे संपादक व त्यांच्या कारकीर्दी मी पाहिल्या आहेत. लोकसत्तेतील माणसांमधील गुण पारखणारा संपादक मात्र श्री. गडकरीच ठरले. आपल्या सहकाऱ्यांच्या आवडीचे विषय व प्रसंगी एखाद्याचा व्यासंग पारखून त्यांना लिहायला उत्तेजन देण्याची, सहकाऱ्यांच्या लेखणीचे, अभ्यासाचे बलस्थान ओळखून त्यांना सदरे देऊन, त्याबाबतचे स्वातंत्र्यही देऊन त्यांना प्रकाशात आणण्याची वृत्ती श्री. गडकरींच्या ठायी आहे. हा काही माझा एकटीचा अनुभव नव्हे. माझ्या सहकाऱ्यांचाही अनुभव समानच आहे. सदरातील निवडक लेखांचा संग्रह करून त्याचा स्वतंत्र ग्रंथ करायला लावणे ही देखिल श्री. गडकरींची कल्पना – जी 'श्रीविद्या'चे श्री. मधुकाका कुलकर्णी ह्यांनी उचलून धरली; त्याचा पाठपुरावा केला. विलंब झाला तो माझ्याकडूनच! श्री. मधुकाका कुलकर्णी वेळापत्रकाबाबत आणि कामाच्या शिस्तीबाबत तडजोड न करणारे पण त्यांना माझ्यापायीं – म्हणजे माझ्या आळशी, वेळकाढूपणापायी त्रास घ्यावा लागला. श्री. कमल शेडगे ह्यांचे वेष्टनचित्र तर केव्हाच तयार झाले होते. 'परिक्रमा'साठी मी एक पद्धती तयार केली आहे. एखादी महत्त्वपूर्ण घटना अथवा व्यक्ती 'विषय' म्हणून घेतली की, माझ्या स्वतःकडील त्या 'विषया'चे संदर्भ मी तपासते आणि हे 'विषय' जर राजकीय व युद्धविषयक असले तर माझे बंधू श्री. नरायण राजे ह्यांच्याशी त्याबाबत चर्चा करून त्यांच्याकडील संदर्भही मिळवते. लेखन कितीही गडबडीत झाले तरीही माझे सहकारी आणि स्नेही श्री. प्रकाश कुलकर्णी हातातील कामे बाजूला ठेवून ते वाचतात आणि प्रतिक्रिया व्यक्त करून मोकळे होतात. ह्या सर्वांचे माझ्यावर केवढे उपकार आहेत.

– उपकार वाचकांचेही आहेत. मनापासून दाद देणारे वाचक, आपुलकीने पत्रे पाठवून एखादा विषय सुचविणारे वाचक, आंतरराष्ट्रीय घडामोडींबाबत मला एकदम 'तज्ज्ञ' बनवून टाकणारे वाचक, प्रसंगी टीका करणारे वाचक, पत्रकारितेत प्रवेश करू

उच्छिणारे विद्यार्थी ह्या सर्वांचा एवढा जिव्हाळा मला मिळत गेला ह्याचे कारण 'परिक्रमा' हेच! ह्या सदराने मला लोकप्रियता मिळवून दिली, स्नेह्यांच्या वर्तुळाचा परिघ वाढवून दिला. कित्येक वर्षे 'लोकसत्ते' मध्ये काम करूनही लता राजे हे नाव दखलपात्र झाले नव्हते; त्याची पुसटशी अशी ओळख का होईना — किमान हे नाव कोठे तरी वाचल्यासारखे वाटते असे वाटायला लावण्याची किमया 'परिक्रमा' ने केली. 'परिक्रमा' ने आणखीही खूप काही दिले. त्यातील लेखनाची दखल अमेरिकन परराष्ट्र खात्याला घ्यावीशी वाटली आणि अमेरिकेस जाऊन नवे काही शिकण्याचा योग 'परिक्रमा' मुळेच आला. प्रस्तुत संग्रहात 'गोष्ट एका आईची' ह्या शीर्षकाखाली न्यायालयाच्या बेअदबीच्या आरोपावरून कारावास भोगणाऱ्या एलीझबेथ मॉर्गन ह्या 'आई'ची कहाणी सादर केली आहे. अमेरिकेतील झुंझार बाण्याच्या काही महिलांनी १९९० च्या फेब्रुवारीत एलीझबेथ मॉर्गनशी माझी प्रत्यक्ष भेट घडवून आणली... तो कृतकृत्यतेचा क्षण 'परिक्रमा' मुळे आला. ज्यांना 'जेरीकोचा योद्धा' हे विशेषण सार्थपणे मिळाले. त्या रेव्हरंड ॲबरनॅथी ह्यांना पाहाण्याचा योग अमेरिकेत आला म्हणून झालेल्या आनंदाचे मी वर्णन करू शकत नाही. पण भारतात परतल्यानंतर थोड्याच काळात रेव्ह. ॲबरनॅथींचे निधन झाल्याने मृत्युलेख लिहिण्याची वेळ आली... हा एक दुर्दैवी योगायोग! माझं टिचभर अनुभवाचं विश्व 'परिक्रमा' मुळे विस्तारत गेलं. पूर्वी माझ्या बाबतीत 'वाचनाचं खूळ' हा शब्दप्रयोग होई तेथे 'परिक्रमा' मुळेच 'व्यासंग' हा शब्द येऊ लागला. 'व्यासंगा' पासून खरोखर मी अजून खूप दूर आहे. व्यासंग आणि विद्वत्ता हे शब्द विनाकारण योजल्यास पोकळ बनतात. योग्यता नसताना ही झूल कशाला पांघरायची? बालपणापासूनच्या वाचनवेडाला 'परिक्रमा' मुळे विशिष्ट दिशा मिळून 'परिक्रमे' साठी वाचन एवढा बदल मात्र झाला. १९८६ ते १९९१ अशी पाचवर्षे सलगपणे प्रकाशित होणाऱ्या ह्या सदराची फलश्रुती म्हणजे ही दोन पुस्तके. पहिल्या 'परिक्रमा' चे आपण स्वागत केलेत, म्हणून हा दुसरा भाग सादर करण्याचे धाडस करीत आहे. हीदेखिल एक परिक्षाच असते आणि परिक्षा म्हटली की, ईश्वरही आठवतोच. त्याला स्मरूनच तुमच्यापुढे हा नवा संग्रह ठेवते. चूकभूल द्यावी घ्यावी...

**लता राजे.**

मुंबई
११ मार्च, १९९१

ठाणे
३८२८
३६३८
निबंध २२ ४९१

# १

※

# शंभर वर्षांचे कोडे

गुरुवार दि. २० एप्रिल १९८९ ही ॲडॉल्फ हिटलरची जन्मशताब्दी! ती पाळावी की मनवावी त्याच्यावरून जर्मनीत विशेषत: पश्चिम जर्मनीत वाद झाले. नवनाझी म्हणून स्वतःला अभिमानानं शिक्का लावून घेणारे जवळजवळ २५,००० उजव्या विचारसरणीचे जर्मन तरुण ही शताब्दी साजरी करतील म्हणून पश्चिम जर्मनीची पोलिस व सुरक्षा यंत्रणा डोळ्यांत तेल घालून ह्या नवनाझींवर कडी नजर ठेवून सजग राहिली आहे. जर्मनीच्या गुप्तचर यंत्रणेचा आणि जर्मन वृत्तपत्रांचा कयास आहे की, हे उजवे नवनाझी रहस्यमय रीत्या स्पेनमध्ये एकत्रित येऊन हिटलरची जन्मशताब्दी साजरी करतील. तथापि, सर्वसाधारण जर्मन नागरिकांच्या दृष्टीतून आज १९८९ साली २० एप्रिल ह्या दिनांकाला फारसे महत्त्व राहिलेले नाही. प्राचीन काळी इतिहासलेखनात ग्रीक इतिहासकार हे आदर्श मानले जात. मध्ययुगीन इतिहासात ग्रीकांकडून हा बहुमान जर्मन इतिहाससंशोधक, अभ्यासक व तत्त्वज्ञ ह्यांनी पटकावला. आज मात्र जर्मन इतिहासकार पेचात पडतात की, हिटलर ही व्यक्ती इतिहासात कशी हाताळावी? हिटलर आणि नाझीवाद ह्यांचे अस्तित्व तर नाकारून चालणार नाही. तथापि जनतेच्या कोठल्याही घटकात त्याचे उदात्तीकरण होण्याची प्रेरणा मिळता कामा नये.

काही व्यक्तींच्या महत्त्वाकांक्षेला सीमा नसते. त्यांना जग पादाक्रांत करण्याची आकांक्षा स्फूर्ती देते, प्रसंगी बेभान बनवते. जगज्जेता बनण्याची स्वप्ने बेचैन करू लागतात.

जगज्जेत्यांची उदाहरणे पाहिली तर त्यात नियतीचाही काही हिस्सा असावा, असे वाटू लागते. मॅसिडोनियावर आक्रमण करण्याची संधी पाहणाऱ्या देशांना नियतीने अलेक्झँडर द ग्रेटच्या रूपाने उत्तर दिले नि जग दिपून गेले. मंगोलियाची कुरापत काढू पाहणाऱ्यांना चंगीझ खानच्या द्वारे दैवाने कापरे भरविले तर राज्यक्रांतीनंतर खिळखिळा झालेल्या फ्रान्सचे लचके तोडायला टपलेल्या युरोपला ह्याच नियतीने नेपोलियन बोनपार्टतर्फे हादरा दिला आणि पहिल्या महायुद्धातील दारुण पराभवानंतर जर्मनीला व्हर्साय येथे एका रेल्वे डब्यात शरणागतीची नामुष्की स्वीकारायला लावून तिचेही लचके तोडून घेणाऱ्या युरोपियन राष्ट्रांपुढे नियतीनेच हिटलरच्या रूपाने प्रलय उभा केला आणि साऱ्या जगाच्याच तोंडचे पाणी पळविले. अलेक्झँडर व नेपोलियनच्या बाबतीत 'सहृदय' ही विशेषणं लागली. हिटलरच्या बाबतीत हा शब्द वापरण्याचा प्रमाद कोणी करूच शकत नाही.

ॲडॉल्फ हिटलर हे रसायनच वेगळं होतं. युद्धशास्त्राचे अभ्यासक, इतिहासाचे तज्ज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रज्ञ सर्वांनाच हिटलर हा विषय नेहमीच आव्हान बनला आहे. इतकी वर्षे हा विषय अभ्यासूनही मानसशास्त्रज्ञांना 'हिटलर असा का झाला' ह्या प्रश्नाचे निखालस उत्तर देता येत नाही, एवढे हे व्यक्तित्व कूट होते. हिटलरच्या पराकोटीच्या यहुदीद्वेषाची बीजे शास्त्रज्ञांच्या मते त्याच्या जन्मातच होती, तथापि त्यांना खतपाणी मिळण्यास पहिल्या महायुद्धानंतरची जर्मनीतील परिस्थिती कारणीभूत झाली असावी. जर्मनीचे चलन 'मार्क' युद्धोत्तर इतके घसरले होते की, नोटांच्या थप्प्या मोजून बटाटे घ्यायची वेळ आली होती. जर्मनीतील यहुदी समाज तुलनात्मक दृष्ट्या सधन होता. शिवाय अमेरिकेत स्थायिक झालेले त्यांचे नातेवाईक जर्मनीतील आपल्या यहुदी आप्तांना डॉलर्स पाठवीत. उद्योग-व्यापारात यहुदी बहुसंख्य होते. हातात पैसा आणि जीवनावश्यक चिजांचा व्यापार असलेल्या सधन यहुद्यांनी सामान्य जर्मन जनतेला पिळून काढले. पावाच्या तुकड्यासाठी गरीब जर्मन स्त्रीवर अब्रू विकायची वेळ आली. मूठभर यहुद्यांच्या ह्या प्रमादाची किंमत हिटलरने संपूर्ण यहुदी वंशाकडून वसूल केली. साठ लक्ष ज्यूंची केलेली अमानुष कत्तल आणि यातना छावण्यांतून झालेला यहुद्यांचा अनन्वित छळ.... कालिमा लावणारे हे प्रकार कशासाठी? तर पृथ्वीच्या पाठीवरून यहुदी वंश नष्ट करण्यासाठी! पृथ्वी नि:क्षत्रिय करण्याच्या एकवीस प्रयत्नांत परशुराम हरला येथे हिटलर कोण? 'आर्य' हाच वंश सर्वश्रेष्ठ असा एक एकांगी, अतिरेकी ग्रह त्यानं करून घेतला होता आणि जगात केवळ 'आर्य' वंशच टिकावा, असे एक भयानक ध्येय त्यानं बाळगलं. त्यापायी तो पिसाटला. ह्या आसुरी ध्येयानं हिटलरच्या बुद्धीचा नि मनाचा कब्जा घेतला. 'आर्य' ह्या शब्दाचं पराकोटीचं वेड, नाझी तत्त्व, स्वस्तिक (उलटे) ह्यांचे जबर आकर्षण ही चिन्हे मानसशास्त्रज्ञांना हिटलरच्या अभ्यासात महत्त्वाची वाटतात.

प्रत्यक्षात नाझी तत्त्वज्ञान ही करामत होती एका इंग्रजाची! स्टुअर्ट चेंबरलेन

(इंग्लंडचे पंतप्रधान चेंबरलेन नव्हेत) ह्या इंग्रजानं मांडलेलं हे तत्त्वज्ञान हिटलरने आपलेसे केले. मुळात स्टुअर्ट चेंबरलेनने हे विचार कॉम्ते द गॉब्लिन्को ह्या फ्रेंच माणसाकडून उचलले होते. 'आर्यन' ह्या शब्दयोजनेचे श्रेयही ह्याच गॉब्लिन्कोला दिले जाते. आपण शुद्ध आर्य रक्ताचे आहोत हा दुरभिमान आणि यहुदी रक्त पृथ्वीच्या पाठीवर शिल्लक राहताच कामा नये ह्या दुराग्रहामागे हिटलर काय साध्य करू पाहात होता? तर मनोविश्लेषकांच्या मते तो एक रहस्य झाकू पाहात होता नि ते रहस्य असे की, हिटलरच्या धमन्यांमध्ये खेळणारे रक्त शुद्ध आर्य जर्मन नव्हते. आपण यहुदी रक्ताचे आहोत. ही आशंका हिटलरचा तीव्र मानसिक छळ करीत होती. अन् ते नाकारण्याच्या विलक्षण हव्यासातून उद्‌भवले ते यहुदी नरमेधाचे भीषण तांडव!

दि. २० एप्रिल १८८९ रोजी ऑस्ट्रियामध्ये अल्वास हिटलर आणि त्याची तिसरी पत्नी क्लारा ह्यांना झालेला पुत्र अ‍ॅडॉल्फ हिटलर. म्हणजे जर्मनीचा फ्यूरर अ‍ॅडॉल्फ हिटलर. हिटलर ह्या नावाला फक्त ६९ वर्षांची परंपरा आहे. अ‍ॅडॉल्फ हिटलरचे वडील अल्वास हे अबकारी इन्स्पेक्टर होते. ह्या अल्वासचा जन्म झाला तेव्हा त्याची नोंद एका अविवाहितेला झालेले अनौरस अपत्य अशी झाली. ही अविवाहित माता म्हणजे मारीया शिकलग्रुबेर.... शुद्ध जर्मन रक्ताची (म्हणजे आर्यन) एक लावण्यवती परंतु दुर्दैवाने दरिद्री घरात जन्मलेली एक हिरकणी होती. गरिबीमुळे बुद्धी असूनही शिक्षणापासून वंचित झालेली.... असहाय.... गुलाम म्हणून राबणारी. जन्मतः अल्वासला मारीयाचे शिकलग्रुबेर हेच आडनाव द्यावे लागले. ह्या मारीयाचा जॉर्ज हेडलर ह्या गृहस्थाशी पुढे विवाह झाला तेव्हा अल्वास पाच वर्षांचा होता. तो दहा वर्षांचा असताना मारीया मृत्यू पावली. जॉर्ज हेडलर ह्या पोराकडे साफ दुर्लक्षच करीत होता, इतके की, त्याचे शिकलग्रुबेर हे आडनाव बदलावे, असेही त्याला कधी वाटले नाही. तथापि, जॉर्जचा धाकटा भाऊ - जॉन हेडलर ह्याला मात्र अल्वासचा लळा लागला व त्याने ह्या पुतण्याला जवळ केले. अल्वास शिकलग्रुबेर पुढे घर सोडून गेला. मिळवता झाला व अ‍ॅना ह्या स्त्रीशी त्याचा पहिला विवाह झाला तेव्हा ह्याच जॉनकाकाने लकडा लावून अल्वासला मूळ गाव स्पीटल येथे बोलावून घेतले.... चर्चमध्ये नेले. ह्या सहृदय काकाने तेथील धर्मगुरूंना विनविले की, 'ह्या अल्वासच्या जन्माच्या वेळी माझा भाऊ व वहिनी मारीया ह्यांचा विवाह न झाल्याने ह्या माझ्या पुतण्यावर 'अनौरस' हा कलंक चढला. त्याला आईचे आडनाव घ्यावे लागले. हे आडनाव आता तरी कृपया बदला. माझ्या भाऊ-भावजयीला मरणोत्तर पतिपत्नी जाहीर करा नि आमचे हेडलर हे आडनाव ह्याला द्या'. ही विनंती मान्य झाली आणि अल्वास शिकलग्रुबेर हा अल्वास हेडलर बनला अन् अर्धशिक्षित कारकुनाने 'हेडलर' हे आडनाव हिटलर असे लिहिले. अल्वासवरचा अनौरसपणाचा छाप त्यामुळे गेला तरी काही अभ्यासकांच्या मते 'अल्वास शिकलग्रुबेर-हिटलर हा मुळात जॉर्जचा मुलगा नव्हताच-

' मग कोणाचा हा पुत्र?

ऑस्ट्रियाचा अ‍ॅडॉल्फ हिटलर, पुढे जर्मनीला जाऊन पहिल्या महायुद्धात कॅडेट अ‍ॅडॉल्फ हिटलर नि नंतर कॉर्पोरल अ‍ॅडॉल्फ हिटलर बनला. राजकारणाच्या दृष्टीने त्याची वाटचाल सुरू झाली... युद्धातील पराक्रमाबद्दल त्याला 'आयर्न क्रॉस' मिळाला... हेर अ‍ॅडॉल्फ हिटलर आपल्या अमोघ वक्तृत्वाने सभा खिळवू लागला... नाझी पक्षाचा नेता बनला... 'हिटलर झिंदाबाद'च्या नाऱ्यांनी त्याचे स्वागत होऊ लागले तेव्हा आंतरराष्ट्रीय पातळीवर अ‍ॅडॉल्फ हिटलर ह्या नावाची दखल घेतली जाऊ लागली. वृत्तपत्रीय माध्यम अधिकच सजग झाले. १९३० मधील जर्मन लोकसभा निवडणुकीला १०७ जागा मिळवून नाझी पक्ष सर्वांत मोठा विरोधी पक्ष म्हणून लोकसभागृहात शिरला तेव्हा अ‍ॅडॉल्फ हिटलर ह्या नावाचा इतिहास शोधण्याचे काम अमेरिकेच्या रॅन्डॉल हर्स्ट ह्या वृत्तपत्रातील भीष्मांनी आणि इंग्लंडच्या हर्स्ट वृत्तपत्रसमूहाने अंगीकारले. त्यांना एक धागा मिळाला. इंग्लंडमध्येच त्यांना अ‍ॅडॉल्फ हिटलरचा सावत्र भाऊ अल्वास हिटलर ज्युनियर (अल्वास शिकलग्रुबेर-हिटलर ह्याचा दुसऱ्या पत्नीपासून झालेला मुलगा) हा गवसला. ह्या अल्वास ज्युनियरने ब्रिटिश स्त्रीशी विवाह केला होता नि त्याला विल्यम पॅट्रीक अल्वास हिटलर हा मुलगा झाला होता.म्हणजे अ‍ॅडॉल्फ हिटलरचा पुतण्या! ह्या पुतण्याला हर्स्ट गटाने हाताशी धरून जर्मनीत पाठविले. 'तुझ्या प्रसिद्ध काकाला भेट आणि तुमच्या कुटुंबाचा इतिहास मिळव', असे विल्यम पॅट्रीक हिटलरला सांगण्यात आले होते. हा पुतण्या काकाला म्युनिकमध्ये भेटला. अ‍ॅडॉल्फ हिटलरला माणसाची पारख उत्तम होती. हा आपला पुतण्या कशासाठी आलाय हे त्यानं क्षणात जाणलं... पुतण्याच्या हातावर नगद दोन हजार डॉलर्स ठेवले नि सांगितलं- 'ब्रिटनला परत जा नि हर्स्टला सांग की, जर्मनीचा हिटलर माझा काका नव्हेच... तो वेगळाच हिटलर आहे!' पुतण्या ह्या रकमेवर खूष झाला नि हर्स्ट गटाला निराश व्हावे लागले. पण पुतण्याने विचारलेल्या - 'काका, आपले पूर्वज कोण हो?' ह्या प्रश्नाला हिटलर उत्तर देऊ शकतच नव्हता. ते त्याचे शल्य होते... दुःख होते आणि जणू अश्वत्थाम्याची जखम होती... कारण...

– आपली रूपमती, सद्‌गुणी आजी मारीया शिकलग्रुबेर ही गरिबीमुळे फ्रँकनबर्गर ह्या धनंतर ज्यू जमीनदार घराण्यात मजुरी करीत होती हे हिटलरला ठाऊक होते. फ्रँकनबर्गर हे अमीर घराणे कसे होते आणि त्या घराण्यातील पुरुष आपल्या शेतीवाडीवरील राबणाऱ्या स्त्रियांना त्या आपलीच मालमत्ता आहे असे मानून आपल्या शय्येवर कसे ओढीत असत नि त्यांच्यावर काय अत्याचार करीत असत हे न जाणण्याएवढा हिटलरचा बापही खुळा नव्हता नि हिटलरही मूढ नव्हता. आपलं रक्त खरेच कोणाचं? फ्रँकनबर्गर की जॉर्ज हिटलरचं? फ्यूरर अ‍ॅडॉल्फ हिटलरला हे कधीच खात्रीशीर रीत्या कळू शकले नाही... इतिहासकारांनाही कळले नाही... मानसशास्त्रज्ञांनाही समजले नाही. ते कदाचित जॉर्ज

हिटलर, जॉनकाका, मारीया शिकलग्रुबेर आणि फ्रँकनबर्गर ह्यांनाच ठाऊक असेल! जॉनकाकानं तर केवळ मायाच दिली असे नाही तर आडनावाची प्रतिष्ठा पांघरली... औरसपण दिले! खरे-खोटे सांगणे अशक्य आहे पण हिटलरच्या अतिरेकी ज्यूद्वेषाचे मूळ, ज्यूंच्या संहारामागची भूमिका ह्यामागे हे कारण असावे हा अभ्यासकांचा कयास आहे. १९३० ते १९४५ ह्या दाहक खंडाची बीजे २० एप्रिल १८८९ मध्ये अशी रुजली. पुढचे प्रलयंकारी महाभारत आपण जाणतोच. मात्र पुतण्या विल्यम पॅट्रीक हिटलरने १९४५ मध्ये हिटलर ह्या आडनावाचा एवढा धसका घेतला की, ते टाकून त्याने 'हिलर' हे आडनाव घेतले. आणि १८७६ मध्ये सुरू झालेले हे आडनाव १९४५ मध्ये नष्ट झाले. आता कोठलाही हिटलर मागे राहिलेला नाही.

१७/४/८९

❄❄❄

२

※

# पन्नास वर्षांपूर्वी....

**दि.** १ सप्टेंबर १९८९ रोजी प्रलयंकारी, भीषण, रौद्रतेत वडवानलाला मागे टाकणाऱ्या आणि क्रौर्यात नवे विक्रम करणाऱ्या दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा पहिला शोला भडकण्याच्या घटनेस मोजून ५० वर्षे पूर्ण होत आहेत. एवढे सर्वंकष आणि सर्वनाशी युद्ध जगाने ह्यापूर्वी पाहिले नव्हते. दुसऱ्या महायुद्धाने तब्बल १९३९ ते १९४५ ह्या सहा वर्षांत जगाची झोप उडवली. जग ढवळून निघालं. ह्या युद्धानं जगाचा चेहरा बदलून टाकला. धर्म-नीती-संस्कृती आणि कायदा ह्यांची लक्तरे ह्या युद्धाने केली. मजूर-श्रमिकांचे विश्व बदलण्याचा दावा मार्क्सवाद-लेनिनवाद-साम्यवादाने केला होता तो ह्या सर्वस्पर्शी युद्धाने पोकळ ठरविला. मानवी जीवनातील सर्व बाबींवर अगदी अन्न आणि आहारापासून ते कलाविष्कारापर्यंत सर्व बाजूंवर ह्या युद्धाचा पन्नास वर्षांपूर्वी जो परिणाम झाला तो आजतागायत! युद्धाच्या सहा वर्षांत मानवी मूल्ये बदलली नि युद्धतंत्रही बदलले. गेल्या ३००० वर्षांत विज्ञानाने जी प्रगती केली होती, त्याच्या शतपट प्रगती अवघ्या सहा वर्षांत प्रचंड गतीने घडली. कारण हे युद्ध! स्त्रीस्वातंत्र्य व महिलांचे शिक्षण जे अत्यंत प्राथमिक अवस्थेत होते, ते ह्या युद्धाने कमालीचे गतिमान करून युरोपीय स्त्रीवर राष्ट्राच्या दैनंदिन समाजजीवनाची जबाबदारी टाकली तर आशियाई स्त्रीला अर्थार्जनासाठी घराबाहेर आणले. कित्येक राजमुकुट गडगडले. साम्राज्यवाद आणि वसाहतवादाला हादरे बसले. खुद्द जर्मनीसह काही देशांच्या फाळण्या झाल्या तर कित्येक बाल्टिक देशांचे स्वतंत्र अस्तित्व

एका सहीच्या फटकाऱ्यानिशी पुसले जाऊन रशियाच्या विस्तारवादात गडप झाले. कित्येक परतंत्र देशांच्या स्वातंत्र्याच्या प्रक्रियांना ह्या युद्धामुळे गती मिळाली. विद्याभ्यासात नवी शास्त्रे निर्माण झाली. लढाईच्या कल्पना बदलल्या आणि युद्ध थांबता थांबता नव्याच सर्वसंहारक ब्रह्मास्त्राची, अण्वस्त्राची देणगी जगाला मिळाली. असे युद्ध भविष्यात होणार नाही. ह्याचे कारण हीच ब्रह्मास्त्रे! युद्ध एवढे व्यापक होते की, त्याच्या स्मृती ह्या टिचभर जागेत जागविणे शक्य नाही. येथे केवळ एका दिवसाची याद करणे उचित ठरेल.

दि. १ सप्टेंबर १९३९. पहाटेच पोलंडला वेढा घालण्याचा आदेश जर्मन फौजांना कित्येक दिवस आधीच मिळाला होता. ३० ऑगस्टला एका षड्यंत्राची तयारी पूर्ण झाली. आदल्या रात्री ओरनियनबुर्ग येथील कारागृहातून जर्मन सैन्यानं १३ कैदी ताब्यात घेतले होते. त्यांच्या अंगावर पोलंडच्या लष्कराचा गणवेष चढविण्यात आला. त्यातील बाराजणांना विषारी द्रवाचे इंजेक्शन देण्यात आले नि मग बेधडक त्यांना गोळ्या घालण्यात आल्या. ही बारा प्रेते पोलंडच्या सीमेवरील हॉकलिंड ह्या खेड्यापाशी झाडीत फेकून देण्यात आली. पुढे विदेशी वार्ताहरांना ती दाखविता यावीत, ह्यासाठी हे नाटक होते. तेरावा कैदी अद्याप जीवंत होता. त्याला धरून जर्मन सैनिकांनी मग पोलंडच्या सीमानुवर्ती ग्लायवित्झ ह्या शहराकडे कूच केले नि कोठल्याही सुरक्षा नसलेल्या ग्लायवित्झच्या रेडिओ स्टेशनात ते घुसले. तेथला चालू कार्यक्रम बंद पाडून त्यांनी धडाधड पिस्तुलांचे बार काढले. ह्या जर्मन सैनिकांपैकीच उत्कृष्ट पोलीश भाषा जाणणाऱ्या एका गटाने मायक्रोफोन्सचा ताबा घेऊन आरोळ्यांचा दणदणाट केला, 'आम्ही नि आमचे साथी आता जर्मनीवर आक्रमण करीत आहोत' असे जाहीर केले. त्या तेराव्या कैद्याला त्यांनी तेथेच गोळ्या घालून एक पोलीश सैनिक मरण पावला असल्याचा उत्तम आभास निर्माण केला.

दि. ३१ ऑगस्ट १९३९ - सकाळी १० वाजता बर्लिनमध्ये चॅन्सलर ॲडॉल्फ हिटलर ह्याने अत्यंत गंभीर मुद्रेने जाहीर केले की, पोलीश सैनिकांनी जर्मनीच्या सीमेवर गोळीबार सुरू केला आहे. सकाळी पावणेसहा वाजल्यापासून आम्ही पोलंडच्या हल्ल्यास प्रत्युत्तर देत आहोत नि आता मात्र पोलंडच्या बॉम्बहल्ल्यास बॉम्बनेच उत्तर द्यावे लागेल.

हे कपटनाट्य भयानक होते. पोलंडचा खात्मा करण्याचा हा डाव १९३९ च्या मार्चमध्येच शिजला होता. 'ऑपरेशन व्हाईट' ही त्याची गुप्त संज्ञा होती. फक्त अडचण होती ती पोलंडच्या शेजाऱ्याची म्हणजे बलाढ्य रशियाची. पण तीही अडचण २३ ऑगस्ट १९३९ रोजी हिटलरने दूर केली. रशियाचा सर्वेसर्वा मार्शल जोसफ स्टॅलीन ह्याच्याशी त्या दिवशी जर्मनीने करार करून पोलंडला रशियाकडून मदत मिळू नये, असा बंदोबस्तच करून टाकला. बदल्यात पोलंडचा काही भूभाग आणि एस्टोनिया, लिथुआनिया आदी बाल्टिक राष्ट्रे रशियाने गिळून टाकावीत, असे ठरले. आज इतिहास पाहू जाता हिटलर जेवढा खलनायक होता, त्याच्या अंशभरानेही स्टॅलीन खलनायकीत कमी नव्हता.

पोलंडबाबतचा मार्ग खुला झाला. ह्या करारावर हिटलरचा परराष्ट्रमंत्री हेर जोकीम फॉन रीबेनट्रॉप आणि स्टॅलीनचा परराष्ट्रमंत्री वॅचिस्लाव मोलोतोव ह्यांच्या सह्या झाल्या. त्या वाळल्या तोच ३० व ३१ ऑगस्टच्या... नाटकाला प्रारंभ झाला... आणि १ सप्टेंबर १९३९ च्या पहाटे ४ वाजून ४५ मिनिटे ह्या घडीला पोलंड निद्रिस्त असताना पोलंडच्या १,७५० मैल सरहद्दीला जर्मनांची धडक बसली. पुढे सहा वर्षे थैमान घालणाऱ्या, पाच खंडांमध्ये लढविल्या गेलेल्या नि संपूर्ण जगाला वेठीला धरणाऱ्या ह्या विक्राळ, संहाराची सुरुवात त्या दिवशी झाली. 'कडाकडा फोड नभ,' हे रुद्राचे कवीला दिसलेले रूप! ते जणू पोलंडवर प्रत्यक्षात उतरले. जनरल वॉल्टर फॉन बाऊशिल्स ह्याने डांझिगच्या दिशेने जर्मनीची चौथी पलटण रवाना केली तर आठवी आणि दहावी पलटण विस्तुला नदीच्या पठारावरून राजधानी वॉरसॉच्या दिशेने कूच करती झाली. चौदावी पलटण सिलेसियामार्गे क्रॅकॉवकडे निघाली... हे भूदल कमी वाटले का काय. त्याच्या साथीला आकाशाला जिंकणारी जर्मनीची नवी अस्त्रे होती. ती म्हणजे सुप्रसिद्ध जंकर्स-८७ बॉम्बर विमाने. ही विमाने पोलंडचे आकाश कडकडा फोडीत निघाली. ह्या बॉम्बर्सचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ अचूक बॉम्बफेक एवढेच नव्हते तर त्यातच किंकाळ्या, आक्रोश ह्यांचे ध्वनी निर्माण करणारी यंत्रणाही होती. सकाळी ६ वाजता जंकर्स-८७ च्या जोडीने हेंकेल-१११ ही अधिक प्रभावी बॉम्बर्स म्हणजे जर्मन लुफ्तवाफ (वायुदल) चे भूषण होते. बगळ्यांची माळ निघादी तशी हेंकेल-१११ची विध्वंसक माळ वॉरसॉच्या दिशेने निघाली. युद्धाच्या पहिल्याच दिवशी जर्मनीने पोलंडचे ५०० विमानांचे वायुदल केवळ काही तासांमध्ये खत्म करून टाकले. वॉरसॉ नगरी ह्या रौद्र भीषण तांडवाने जागी झाली, तेव्हा ह्या सुंदर शहराचे रूप भयावह झाले होते. ह्याच हिटलरने १९३४ मध्ये पोलंडशी १० वर्षांचा अनाक्रमण करार केला होता... पोलीश जनता ह्या कराराचा फसवेपणा समजून चुकली. पण आशेची किरणे साफ मावळली नव्हती. आणखी एका करारान्वये पोलंडच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्लंड व फ्रान्स ह्या दोन राष्ट्रांवर पडली होती. हे दोघे निश्चित धावून येतील, हा विश्वास पोलंडला बळ देत राहिला. ही दोन राष्ट्रे अर्थातच पोलंडच्या राखणीसाठी सरसावली. पण तत्पूर्वीचा घटनाक्रमही अविस्मरणीय होता.

पोलंडच्या तथाकथित आक्रमणाचा बदला म्हणून जर्मनीने पोलंडवर केलेला हल्ला आणि डांझिग बंदरावर केलेला कब्जा ही वृत्ते समजताच इंग्लंडचे विदेशमंत्री लॉर्ड हॅलीफॅक्स ह्यांनी जर्मनीच्या शार्ज द 'फेयाकडे' स्पष्टीकरण मागितले. त्याने एकच पालुपद लावले- 'पोलंडच्या हल्ल्याला जर्मनीने प्रत्युत्तर दिले आहे.' बर्लिनमध्ये हिटलरचा विदेशमंत्री रीबेनट्रॉपच्या भेटीसाठी इंग्लंड व फ्रान्सचे राजदूत ताटकळू लागले. फ्रान्सने तर हिटलरशी चर्चा करून त्याला डांझिग बंदर देऊन टाकावे व शांत करावे असा प्रस्ताव मांडला. त्यापूर्वी पोलंडमधून जर्मन सैन्य मागे घेण्याची अट घालण्याएवढेही भान फ्रान्सला राहिले नव्हते.

दुसरा दिवस शनिवारचा दि. २ सप्टेंबर उजाडला. ब्रिटिश मंत्रिमंडळाची दुपारी तातडीची बैठक होऊन हिटलरला माघार घेण्यासाठी दि. ३ सप्टेंबरच्या सकाळच्या सहा वाजेपर्यंतची मुदत द्यावी, असा निर्णय घेतला गेला. पण त्यात फ्रान्सने कच खाल्ली, फ्रान्सचे लष्कर कार्यान्वित होण्यासाठी किमान ४८ तास हवेत, असे फ्रान्सने कळविले. इकडे इंग्लंडचे हाऊस ऑफ कॉमन्स धुमसू लागले. पोलंडच्या बाजूने युद्धात उतरायला ब्रिटिश पंतप्रधान नेव्हील चेंबर्लेन वेळकाढूपणा करीत आहेत, असा धडधडीत आरोप होऊ लागला. चेंबर्लेन मंत्रिमंडळ गडगडण्याची लक्षणे दिसू लागली, तशी चेंबर्लेननी पुनश्च फ्रान्सचे पंतप्रधान एडवर्ड दलादिए यांच्याशी बोलणी केली. ४८ तास थांबणे अशक्य असल्याचे वारंवार सांगितले. अन्यथा फ्रान्सची वाट न पाहता ब्रिटन एकटेच कृती करील असेही वजावले. बर्लिनमधील ब्रिटिश राजदूत नेव्हील टेंडर्सन ह्याने रीबेनट्रॉपकडे इंग्लंडचा निर्वाणीचा खलिता ३ सप्टेंबरच्या सकाळी ९ वाजता द्यावा असे निश्चित झाले. हा खलिता हिटलरकडे रवाना झाला नि हिटलरने त्याला काडीचीही किंमत दिली नाही आणि दि ३ सप्टेंबरच्या दुपारी इंग्लंड पोलंडच्या बाजूने, जर्मनीच्या विरोधात युद्धात उतरले. इंग्लंडच्या रेडिओवरून तशी जाहीर घोषणा पंतप्रधान चेंबर्लेननी केली. इंग्लंडला ह्या कृतीचा पहिलाच फटका दि. ३ सप्टेंबरच्या मध्यरात्री मिळाला. त्या रात्री १४०० प्रवाशांना घेऊन कॅनडाला जाणारी 'ॲथीनिया' ही प्रवासी नौका उत्तर अटलांटिक महासागरात जर्मनीच्या यू-३० ह्या पाणबुडीने टॉर्पिडो टाकून बुडविली. त्याच रात्री फ्यूरर ॲडॉल्फ हिटलर विजेता म्हणून पोलंडमध्ये प्रवेश करता झाला.

३ सप्टेंबरला ह्या युद्धाला जागतिक रूप प्राप्त झाले नि आठच दिवसांत धमाल झाली. वर्षापूर्वी १९३८ च्या सप्टेंबरात जर्मनीत म्युनिक येथे झालेल्या महत्त्वाच्या परिषदेस पंतप्रधान चेंबर्लेन हजर होते. ह्याच परिषदेत हिटलरची महत्त्वाकांक्षा थोपवण्यासाठी चेंबर्लेन व दलादिए ह्यांनी झेकोस्लोव्हाकियाचे परस्पर हिटलरला दान केले होते. ह्या परिषदेत चेंबर्लेन आपली प्यारी छत्री म्युनिकमध्येच विसरले. ही छत्री प्रत्यक्ष महायुद्ध सुरू झाल्यानंतर आठवडाभरात लंडनमध्ये १०, डाऊनिंग स्ट्रीट ह्या ब्रिटिश पंतप्रधानांच्या अधिकृत निवासस्थानावर एका जर्मन बॉम्बरमधून तिच्यावर एक खट्याळ चिठ्ठी अडकवून अलगदपणे टाकण्यात आली. ही कर्तबगारी सर्वोत्कृष्ट वैमानिक, जर्मनीचा डेप्युटी फ्यूरर हेर रूडॉल्फ हेस याची होती.

२८/८/८९

३

※

# शिकार 'बिस्मार्क'ची!

हा एक विचित्र योगायोग म्हणावा लागेल की, हिटलरच्या जन्मशताब्दी वर्षात आणि दुसऱ्या महायुद्धाच्या अर्धशताब्दीच्या वर्षातच हिटलरच्या लाडक्या युद्धनौकेचा - 'बिस्मार्क'चा शोध लागावा! सागरतळी गेलेल्या 'बिस्मार्क'ची चाहूल गेल्या आठवड्यात फ्रान्सजवळ लागली आणि शताब्दी-सुवर्णजयंती आणि बिस्मार्कचं प्रगट होणं हा चमत्कारिक योग ध्यानात आला. लवकरच 'बिस्मार्क'ला वर काढण्याचे कार्य सुरू होईल. भगीरथ प्रयत्न करून 'बिस्मार्क' बाहेर काढावीच लागेल. जर्मनीच्या दृष्टीने तिचे महत्त्व आहेच, कारण त्यांच्या इतिहासातील ते थरारक प्रकरण आहे. 'बिस्मार्क' जर्मनीचा मानबिंदू होतीच शिवाय जागतिक युद्धनौका बांधणीतील आदर्श होती नि यद्धनौकांच्या रचनाशास्त्राला ह्या नौकेने नवी कलाटणी दिली होती. केवळ जर्मनीपुरती ती सीमित राहू शकत नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या इतिहासात बिस्मार्कचे स्थान अनन्यसाधारण आहे. 'सिंक द बिस्मार्क' ह्या चित्रपटाने तिची कहाणी देशोदेशी पोचली आहे.

'बिस्मार्क' ह्या नावापासूनच या नौकेचे वेगळेपण सुरू झालं होतं. हिटलरनं जर्मनीला 'थर्ड राईश' निर्मिण्याचे आश्वासन दिले होते. जर्मनीच्या ह्या तिसऱ्या सुवर्ण युगाच्या स्वप्नाला साजेशीच ही युद्धनौका 'बिस्मार्क' होती. १९४०-४१ च्या सुमारास जेवढे आधुनिक तंत्र वापरात येईल तेवढे सर्व ह्या नौकेच्या बांधणीत एकवटले होते. तिच्यासाठी वापरलेले पोलादही असे होते की, आणखी ४०० वर्षे 'बिस्मार्क' सागराच्या उदरात राहिली

तरीही ते खराब होणार नाही. ताशी ३० नॉटस् वेगाने जाणारी ही ४०,००० टनी नौका म्हणजे सागरावर हुकमत गाजवणारी राणी असे तिचे वर्णन केले जाई. 'बिस्मार्क' हे नाव तिला विचारपूर्वक दिले गेले. जर्मनीचे ऐतिहासिक 'सेकंड राईश'- दुसरे सुवर्णयुग अवतरले ते ह्याच नावामुळे. ह्या नावाचा धनी प्रिन्स ऑटो फॉन बिस्मार्क म्हणजे गेल्या शतकातील जर्मनीचा खरा भाग्यविधाता! इ. स. १८१५ मध्ये जन्मलेल्या ह्या मुत्सद्द्याने साहित्य निर्मितीपासून कायद्यापर्यंत आणि धर्मशास्त्रापासून राजकारणापर्यंत सर्वत्र आपल्या अद्वितीय बुद्धीचा ठसा उमटविला. जर्मन साम्राज्याचा हा चॅन्सलर.... सम्राट विल्यम पहिले ह्यांचा निष्ठावंत उजवा हात. व्यापारापासून लष्करी सामर्थ्यापर्यंत ह्या धुरंधरानं जर्मनीला शिखरावर पोचविले. विल्यम पहिले वारल्यावर अर्थातच कैझर विल्यम दुसरे (पहिल्या महायुद्धातले) ह्यांच्या हाताखाली काम करताना बिस्मार्क आणि सम्राट ह्यांच्यात खटके उडाले. भांडण विकोपाला गेल्यावर प्रिन्स बिस्मार्क निवृत्त झाले व उर्वरित आयुष्यात ग्रंथरचनेला वाहून घेतले. पण हा माणूस एवढ्या ताठ कण्याचा होता की, १८९८ मध्ये जेव्हा मृत्यू समोर दिसू लागला तेव्हा अखेरच्या क्षणापर्यंत फक्त एकच गोष्ट बजावीत राहिला – 'याद राखा, माझ्या कबरीच्या स्मृतिशिलेवर 'ऑटो फॉन बिस्मार्क– विल्यम पहिले यांचा सेवक' एवढाच मजकूर कोरला पाहिजे. दुसऱ्या विल्यमचा उल्लेख करता कामा नये.' हिटलरला प्रिन्स बिस्मार्कसारख्या ऐतिहासिक पुरुषांसारखं यशस्वी होण्याचा विश्वास वाटत होता. त्याचं ऋण, त्याचं स्मरण नि त्याचा आदर्श ह्यांचं चिन्ह म्हणून या तेव्हाच्या अद्वितीय सुंदर युद्धनौकेला 'बिस्मार्क' हेच नामानिधान दिलं गेलं. पण... ही सुंदरी अल्पायुषी ठरली.

ह्या दिग्विजयी नौकेचा पराभव हे सागरी युद्धातील रोमहर्षक प्रकरण आहे. मे १९४१ मध्ये 'बिस्मार्क' ला हार पत्करावी लागली. तिने दिलेला सामना पाहता वास्तविक हे असमतोल युद्ध होते. एकाकी बिस्मार्क प्राणपणानं लढली. 'बिस्मार्क'शी सामना देईपर्यंत कधीच विमानवाहू युद्धनौकांवरील बॉम्बर्स वापरण्याची वेळ जागतिक सागरी युद्धाच्या इतिहासात आली नव्हती. 'बिस्मार्क'ने इंग्लंडवर ती वेळ आणली. अन् ह्या बॉम्बर्सनीच 'बिस्मार्क'चा शेवट घडविला.

–१९४१ चा मे महिना. जर्मनी एक असाधारण युद्धनौका बनविण्यात यशस्वी झाल्याची वार्ता इंग्लंडच्या हेरांनी आणली होतीच. युद्धाची धुमश्चक्री वाढत होती आणि देशामागून देश काबीज करणाऱ्या जर्मनीची सीमाही वाढत होती. अन् वार्ता आली की, दोन प्रचंड जर्मन युद्धनौका कॅटगट परिसरात उत्तरेच्या दिशेने सरकत आहेत. ११ मालवाहू जहाजे त्यांना सुरक्षिततेसाठी आपल्या ताफ्यातून नेत आहेत. ह्या वार्तेतून जर्मनीचा उद्देश स्पष्ट दिसत होता– ॲटलांटिक महासागरात प्रवेश करून हलकल्लोळ माजविणे... ही मुसंडी रोखायची तर उत्तर समुद्राकडून ॲटलांटिकमध्ये शिरण्याचे सर्व मार्ग रोखणे आवश्यक

होते. ब्रिटनच्या (होम फ्लीट) आरमाराचे प्रमुख सर जॉन टोव्ही ह्यांच्यापाशी तेव्हा 'किंग जॉर्ज-५' आणि 'प्रिन्स ऑफ वेल्स' ह्या दोन युद्धनौका, 'हूड' आणि 'रिपल्स' ह्या दोन क्रूझर्स, आणि 'व्हिक्टरियस' ही विमानवाहू नौका एवढा काफिला होता. ह्या पाच नौका एका 'बिस्मार्क'च्या समाचाराला निघाल्या. ही साफ विषम लढाई. पाच विरुद्ध एक! कारण 'बिस्मार्क'चा दबदबा होताच तसा! हेरांनी बातमी पुरविली होती. बिस्मार्कवर १५ इंचांच्या ८ तोफा होत्या तर ब्रिटिश नौकांवर फार तर १४ इंची तोफा होत्या. ब्रिटिश नौकांपेक्षा बिस्मार्क मोठी होतीच, शिवाय पहिल्या महायुद्धापासून जर्मन नौदलानं ब्रिटिश आरमाराला धडकी भरवली होती. नौका बांधाव्या तर जर्मनांनीच, असे खुद्द ब्रिटिश नाविक म्हणत. तेव्हा पाचजणी 'बिस्मार्क'च्या भेटीस निघाल्या ह्यात नवल नव्हे. सर जॉन टोव्हीने 'हूड' व 'प्रिन्स ऑफ वेल्स' ह्या नौका एका फळीवर तर उरलेल्या तीन दुसऱ्या फळीवर ठेवून नांगर उचलण्याची तयारी केली. 'बिस्मार्क' वर टेहळणी करण्यासाठी ब्रिटिश विमाने व इतर जहाजे होतीच.

– २१ मे १९४१. ब्रिटिश विमानांना बर्जनच्या बाजूला दोन जर्मन युद्धानौका दिसल्या. त्यांचे गुप्त छायाचित्र काढले गेले नि संशयच फिटला. त्यातील एक बिस्मार्क होती तर दुसरी 'प्रिन्स युजीन' होती. त्याच रात्री जॉन टोव्हीने 'हूड' व 'प्रिन्स ऑफ वेल्स' उत्तरेकडे हाकारली. पण बर्जनच्या परिसरातून बिस्मार्क नागिणीसारखी सटकली होती.
– दि. २३ मे... क्रूझर 'सफोक'चा कॅप्टन एलीस ह्याला चक्क १४००० यार्डावर बिस्मार्क दिसली नि हादरून जाऊन एलीसने 'सफोक' अशी वळवली की, धुक्याच्या वेष्टनात ती दृष्यमान होणार नाही. 'बिस्मार्क' दिसल्याचा संदेश एलीसने 'सफोक'वरून रवाना केला नि दुसरी क्रूझर 'नॉरफोक'ने तो अचूक टिपला. स्थळ होतं डेन्मार्कची सामुद्रधुनी. समोरचं दिसणार नाही एवढं धुकं जमलेलं... जीवघेणी थंडी... मधूनच हिमखंड तुटून सागरात येत... अशा भयानक वातावरणात मग एक शिकार सुरू झाली. पाच शिकारी कुत्री नि दोन सावजं अशी खेळी सुरू झाली. एवढा वेळ बिस्मार्क निश्चिंत होती पण एका विलक्षण क्षणी धुक्याचा पडदा बाजूला झाला नि केवळ ६ मैलांवर उभी असलेली 'नॉरफोक' बिस्मार्कच्या दृष्टीस पडली मात्र बिस्मार्कची एक १५ इंची तोफ गरजली. नॉरफोकच्या आजूबाजूस सुरुंग उसळले पण सुदैवाने नॉरफोकचा कॅप्टन फिलिप्स ह्याने किंचित माघार घेऊन पुनश्च नॉरफोकला धुक्यात दडविले. मग धुकं, हिमवृष्टी, पाऊस अशा वातावरणात चकवा सुरू झाला. दरम्यान 'हूड' व 'प्रिन्स ऑफ वेल्स'ची फळीही येऊन दाखल झाली. २५,००० यार्डावरून हूड व प्रिन्स ऑफ वेल्सने बिस्मार्कच्या रोखाने तोफा डागायला आरंभ केला. उत्तरादाखल बिस्मार्क व युजीन दोघींनी प्रत्युत्तर दिले. एक मोक्याचा क्षण युजीननं साधला नि काय होतंय हे कळायच्या आत ब्रिटनची 'हूड' 'युजीन'च्या तोफगोळ्याने धडाडून पेटली. दुसरा सुरुंग बिस्मार्कनं फेकला तो हूडच्या मास्टवर! शेकडो फूट उंचीच्या ज्वाला 'हूड'वर

उसळल्या... हूड पेटली... दुभंगली आणि श्वास घेण्याच्या आतच सागराच्या उदरात नाहीशी झाली. ब्रिटिश आरमार अवाक् झालं, पण विचार करायला त्यांना फुरसत न देता बिस्मार्कने सरळ 'प्रिन्स ऑफ वेल्स'वर सरबत्ती सुरू केली. १० ते १५ सेकंद बिस्मार्क व युजीन यांचा मारा चुकवीत प्रिन्स ऑफ वेल्स वाचविण्यासाठी कॅप्टन लीच अक्षरशः आटापिटा करू लागले. बिस्मार्कच्या एका सुरुंगानं प्रिन्स ऑफ वेल्सवरचा ब्रिजच उडविला नि हाहाकार उडाला... प्रिन्स ऑफ वेल्सचा कॅप्टन लीच व सिग्नलमन वगळता बाकी सर्वजण मरण तरी पावले किंवा जखमी झाले. प्रिन्स ऑफ वेल्स कोरी करकरीत होती. अन् हे नवेपणच तिला भोवले. एकेक मनोरा, एकेक तोफ नादुरुस्त होऊ लागली. तंत्रज्ञ होते पण ते जखमांनी विव्हळत पडलेले! शहाणपणा दाखवून कॅप्टन लीचने तोफा बंद करून माघार घेतली व धुक्याचा फायदा घेऊन नौका वळवली. बिस्मार्कने पाठलाग केला नाही पण बिस्मार्क समुद्र कापू लागताच धुराचे लोट दिसले. बहुधा बिस्मार्कही घायाळ झाली होती.

हूडची जलसमाधी नि प्रिन्स ऑफ वेल्सची दुर्दशा पाहताच ब्रिटिश नौदल चिंताग्रस्त झाले. सर जॉन टोव्ही ह्यांच्या मदतीला आता व्हाइस ॲडमिरल सर जेम्स सॉमरव्हिल हे जिब्राल्टरहून... १५०० मैलांवरून क्रूझर 'रिनाडन', विमानवाहू युद्धनौका 'आर्क रॉयल', क्रूझर 'शेफिल्ड' आणि ६ विनाशिकांचा काफिला घेऊन येऊ लागले. ॲटलांटिकमधील ब्रिटिश युद्धनौका 'रमीलीज' आणि 'रॉडनी' ह्यांनाही समुद्रधुनीकडे वळण्याचा आदेश मिळाला. आता तर लढाई आणखी विषम बनली. इंधन भरायला म्हणून बिस्मार्कची साथीदार युजीनही माघारी गेली होती. आता एकटी बिस्मार्क नि एवढे मोठे ब्रिटिश आरमार असा सामना सुरू झाला. बिस्मार्कचा वेग जबर आहे. ती रात्री गुंगारा देऊ शकते ह्या विचाराने सर जॉन टोव्हीने बिस्मार्कवर विमानवाहू नौकेवरून ९ बॉम्बफेकी विमाने पाठविली नि धमालच झाली –

– दिवस होता २६ मे. सकाळचे १०.३० वाजलेले. बिस्मार्क दृष्टिपथात आली. शांतपणे एखाद्या सम्राज्ञीच्या थाटात फ्रान्सच्या दिशेने चाललेली. कोठल्याही परिस्थितीत ती फ्रान्सच्या टप्प्यात आली तर ताबडतोब जर्मन हवाई क्षेत्रातून जर्मन विमाने गरुडासारखी ब्रिटिश आरमारावर झेपावणार हे ध्यानात येताच बिस्मार्कवर 'आर्क रॉयल' ह्या विमानवाहू नौकेवरील विमाने पाठविण्याची खेळी सुरू झाली अन् धमाल अशी की, ह्या बापड्या ब्रिटिश वैमानिकांनी 'बिस्मार्क' समजून स्वतःच्याच 'शेफिल्ड'वर बॉम्ब टाकले. इंग्रज निष्ठा इथं प्रगट झाली. 'शेफिल्ड'च्या कॅप्टननं हुकूम दिला – 'बॉम्बर्स आपले आहेत. त्यांच्यावर तोफ डागायची नाही. भले काहीही होवो. शिस्तीत उभे राहा.' आपल्या टॉर्पेडोंना उत्तर मिळत नाही, हे पाहताच बॉम्बर्सच्या ध्यानात हा घोटाळा आला. सुदैवाने 'शेफिल्ड' सुरक्षित होती मात्र काही खलाशी जखमी झाले होते.

मग प्रत्यक्ष बिस्मार्कशी युद्धा सुरू झाले. २७ मे रोजी सकाळी ८ वाजून ४७ मिनिटांनी रॉडनी, किंग जॉर्ज-५, नॉरफोक, डॉरशायर अशा सर्व नौकांनी बिस्मार्कला वेढले. तोफा दणाणू लागल्या. आकाशातून ब्रिटिश बॉम्बर्सनी बिस्मार्कवर टॉर्पेडोचा मारा सुरू केला. बिस्मार्कचे मास्ट खाली आले, फनेल दिसेनासे झाले... टॉर्पेडो तिच्या अंतर्भागात घुसला नि बिस्मार्क आतल्या आत पेटली... नि तरीही तिच्या तोफा धडाडत राहिल्या... शेकडो जर्मन खलाशी बिस्मार्क सोडून समुद्रात उड्या घेऊन जीव वाचवू लागले... पण तरीही बिस्मार्कचा ध्वज फडकत राहिला होता. शरणागतीच्या आवाहनाला बिस्मार्कच्या कॅप्टननं दाद दिली नाही. ही बुडवलीच पाहिजे असा निर्धार करून पुन्हा तोफांचा भडिमार सर जॉन टोव्हीने केला. फडकता ध्वज आणि कॅप्टनसह बिस्मार्क सागराच्या उदरात दिसेनाशी झाली. सतत ३॥ तास एक सुसज्ज आरमारी काफिला व एकटी एक बिस्मार्क अशी ही विषम लढाई इतिहासात नोंदली गेली.

जून १९८९

# ४

※

# यादगार पराभवाची

दिनांक २५ एप्रिल १९९० रोजी जागतिक पातळीवर एक हृदयस्पर्शी समारंभ झाला. स्थळ ऐतिहासिक होते. अगदी 'इलीयड' या महाकाव्याच्या काळातही गाजलेले. हेलनसाठी सहस्रावधी जहाजांच्या काफिल्यात घेरले गेलेले ट्रॉय या स्थळापासून अगदी जवळच. जगज्जेत्या अलेक्झँडरने समुद्र ओलांडला होता तो इथेच. हजारो वर्षांचा इतिहास साक्षीदाराप्रमाणे पाहणाऱ्या तुर्कस्तानच्या दार्दनेल्स किनारपट्टीवर झालेला समारंभही इतिहासाच्या स्मृती जागविण्याचाच होता. ही यादगार होती ७५ वर्षांपूर्वीची. यशाची स्मृती नेहमीच जागती ठेवली जाते, पोवाडे गायले जातात, यशाचे श्रेय घेतले जाते कारण यश सर्वांनाच हवे असते. त्याच्या उलट अपयशाची बाब आहे. ते सर्वांनाच नकोसे असते. त्याची आठवण कडवटपणा आणते नि अपयशाचा धनी व्हायलाही कोणी तयार नसते. २५ एप्रिलचा सोहळा अलौकिक होता. कारण ती अपयशाची यादगार होती, एका महत्त्वाकांक्षी; परंतु सपशेल फसलेल्या मोहिमेची ती स्मृती होती. तिच्या अपयशाचा धनी देखील मोठा तालेवार होता... ही मोहीम फसली तेव्हा या अपश्रेयाला जबाबदार असलेल्या त्या तालेवार व्यक्तीचे राजकीय भवितव्य संपलेच अशी भाकिते जाहीर झाली होती. ती भाकिते पुढे काळाने खोटी ठरविली.

बरोबर ७५ वर्षांपूर्वी कशाबशा गुंडाळून टाकलेल्या या असफल मोहिमेचा अमृतमहोत्सव मनवायला अत्यंत सन्मानपूर्वक निमंत्रित करण्यात आलेले सर्व पाहुणे

नव्वदीच्या पुढे गेलेले होते. यजमानपदी तुर्कस्तानचे अध्यक्ष तुर्गट ओझल हे होते. तर स्वागताध्यक्ष म्हणून ब्रिटिश पंतप्रधान मार्गरेट थॅचर, न्यूझीलंडचे गव्हर्नर जनरल सर पॉल रीव्हज् आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान बॉब हॉक होते. या मोहिमेतून जे बचावले नि जे आज जिवंत आहेत, अशा सर्व शूरवीरांना दार्दनेल्सला खास सोयी करून आणविले गेले. बॉब हॉक हे तर ऑस्ट्रेलियातील ४७ वृद्ध वीरांना स्वत: घेऊन गेले होते. त्यातील सर्वांत तरुण वीर ९३ वर्षे वयाचा होता तर सर्वांत वयोवृद्ध लढवय्या १०३ वर्षे वयाचा होता.

एका मोहिमेत विविध देशांतील हजारो सैनिक एकाच ठिकाणी धारातीर्थी पडण्याच्या घटना केवळ विश्वयुद्धातच होऊ शकतात. दार्दनेल्स किनाऱ्यावरील गॅलीपोली मोहीम ही अशीच होती. या मोहिमेत तुर्की भूमीवर फ्रान्स, कॅनडा, इंग्लंड, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, हिंदुस्थान (त्यातील काही आता पाकिस्तानात राहिलेले) आणि उत्तर आफ्रिकेतील अनेक देशांचे सैनिक लढले. कामी आले. ही दोस्तांची फळी होती तर त्यांच्या विरोधात लढणाऱ्यांत खुद्द तुर्कस्तानचे सैनिक, जर्मनीची फौज, ऑस्ट्रियाचे सैनिक होते. उभय फौजांची जबर प्राणहानी झाली. सरशी तुर्की-जर्मनांची झाली तरी त्यांनाही लाख मोलाचे जीव वेचावे लागले होते. म्हणूनच या समारंभाला जर्मनी-तुर्कस्तानचे वृद्ध सैनिकही आवर्जून उपस्थित होते. ७५ वर्षांपूर्वी तेथे कामी आलेल्या दोन्ही बाजूंच्या माणसांना श्रद्धांजली वाहण्यासाठी!

पहिल्या महायुद्धातील सर्वाधिक फसगत झालेली ऐतिहासिक चढाई म्हणजे दार्दनेल्स मोहीम तथा गॅलीपोलीची लढाई. त्याबाबतीतले सर्वच आडाखे प्रथमपासूनच चुकत गेले. सैन्य उतरविण्यासाठी दार्दनेल्स किनाऱ्यावर ज्या जागा मुक्रर करण्यात आल्या त्या देखील चुकीच्या होत्या. छातीभर पाण्यातच सैनिक उतरविण्यात आले. भन्नाट वाऱ्यासाठी प्रसिद्ध असलेल्या गॅलीपोलीमध्ये खांद्यापर्यंत येईल एवढ्या पाण्यात उतरलेले सैनिक गॅलीपोलीच्या सुळक्यांसारख्या अवघड चढणीच्या टेकड्यांआडून गोळीबार करणाऱ्या तुर्की सैनिकांचे सावज न ठरते तरच नवल!

दार्दनेल्स मोहीम आखण्याची कल्पना कोणा येरागबाळ्याची असती तर प्रश्न नव्हता. पण ती चक्क विन्स्टन चर्चिल ह्यांची होती. पहिले महायुद्ध भडकले तेव्हा विन्स्टन चर्चिल ब्रिटनचे फर्स्ट लॉर्ड ऑफ दि ॲडमिरल्टी होते. दार्दनेल्सची सामुद्रधुनी ही फार नाजूक जागा होती आणि त्यावर तुर्की वर्चस्व होते. हा सागरी मार्ग ताब्यात घेणे अत्यंत महत्त्वाचे होते. तुर्कांना खडे चारून दार्दनेल्सवर कब्जा करायचा अशी ही मोहीम होती. युरोपात दोस्तांच्या आधीच दोन आघाड्या उघडल्या होत्या. तेथे धुमश्चक्री चालू होती. दार्दनेल्स सागरी मार्ग ताब्यात आला तर तेथून युरोपात तिसरी आघाडी उघडण्यात दोस्तांना अडचण राहिली नसती, तसे केल्यास तुर्कांचे ऑटोमन साम्राज्य त्यांचे 'मैतर' असलेल्या जर्मनी व ऑस्ट्रियापासून तोडता येणार होते नि मग रशियाच्या झार निकलस

(द्वितीय) वर जर्मनीकडून जो रेटा पडत होता तोही शिथिल पडला असता. बाब महत्त्वाची होती नि सारी आखणी कशी साधी, स्वच्छ होती. पण चर्चिलच्या ह्या योजनेला पहिला विरोध अनपेक्षितरीत्या झाला तो दोस्तांच्या सर्व आघाड्यांचे प्रमुख फील्ड मार्शल अर्ल होरेशिओ किचनेरकडून. पण दारूगोळा व सैन्याची वाहतूक करायला दार्दनेल्सचा सागरी मार्ग उत्तम ठरेल, असा वॉर कौन्सिलचा व चर्चिलचा आग्रह पडला आणि ॲडमिरल कार्डनला भरीला पाडण्यात आले. फ्रेंच तुकडीही बरोबर होतीच. शिवाय काळ्या समुद्राकडून नौदल व लष्कर पाठविण्याचे आश्वासन झारने दिले होते. कार्डनचा दुय्यम अधिकारी म्हणून ॲडमिरल रोबेकला नेमले गेले. ग्रीक सरकारने आपले लेम्नॉस हे बेट सामुद्री तळ म्हणून दिले. तेथे ॲडमिरल वेमिसने मोर्चे बांधले आणि १९१५च्या फेब्रुवारीमध्ये कार्डनच्या नेतृत्वाखाली नौदलाचा प्रचंड काफिला निघाला. पण १५ फेब्रुवारीलाच ॲडमिरल कार्डनने कळवून टाकले की, हे एकट्या नौदलाचे काम नाही. दार्दनेल्स किनाऱ्यावर गॅलीपोलीवर मारा करायचा तर बरोबर लष्करही हवे, असा आग्रह कार्डनने धरला. पण राजकीय दबाव चांगलाच होता आणि वॉर कौन्सिल आपला हेका सोडीना. अखेर फक्त दार्दनेल्स तटबंदीवर मारा करीत रहायचे व माईन स्वीपर्स आणि सीप्लेन कॅरीअर साथीला आल्यावरच पुढील चढाई करायची, असा निर्णय कार्डनने घेतला व मोहीम सुरू झाली. वादळ, प्रतिकूल हवामान ह्यांना तोंड देत २५ फेब्रुवारीस ब्रिटिश व फ्रेंच नौदल गॅलीपोलीच्या फोर्ट आर्कन्येवर मारा करू लागले पण विपरीतच घडले. तुर्की-जर्मन तोफांचा भडीमार सुरू झाला. ह्या तोफांच्या जागाही दोस्तांच्या नौदलाला हेरता येईनात एवढा गॅलीपोलीचा प्रदेश दुर्गम होता. खडे चढ असलेल्या टेकड्यांवर जर्मन तोफा चढविलेल्या होत्या नि कार्डन-डी रोबेक या द्वयीचे सैनिक आयतेच या तोफांना मिळत होते. डी रोबेकने शेवटी ३ मार्चला कळविले की, लष्कर उतरविल्याखेरीज दार्दनेल्स सामुद्रधुनी हाती येणे कठीण आहे. किचनेरने पुन: एकवार विरोध दर्शविला नि चर्चिलने पुनश्च हेका धरला. ॲडमिरल कार्डन ह्या मोहीमेने एवढा धास्तावला होता की त्याची तब्येत साफ गळाठली आणि १६ मार्च १९१५ रोजी कार्डनने डी रोबेककडे सूत्रे देऊन इंग्लंडचा मार्ग धरला. वॉर कौन्सिलचे धोरण पाहता त्यातून आता सुटका नाही, हे जाणून निर्वाणीचा मार्ग म्हणून ॲडमिरल डी रोबेकने १८ मार्च रोजी गॅलीपोलीवर नौदल चढाई केली. सकाळी ११.३० ला कारवाई सुरू झाली नि दुपारीच मदतीला फ्रेंच काफिलाही येऊन थडकला. ११.३० ते सायं. ६ वाजेपर्यंतच्या काळात काय घडले असेल?

--इंग्लंडची 'इन्फ्लेक्झिबल' ही युद्धनौका निकामी झाली. 'गॉलवाज' आणि 'बॉव्हे' ह्या फ्रेंच यद्धनौका तोफांच्या भडिमाराने कुचकामी बनल्या. 'बॉव्हे'ने तळच गाठला. 'इर्रेझिस्टिबल' सुरुंगावर आली नि पाहता पाहता बुडाली, 'ओशन' त्याच मार्गाने गेली. 'ॲगमेम्नन' एका बाजूला कलंडायला लागली. साडेसात तासांमधील ही जबर हानी पाहून

डी रोबेक हादरलाच. तीन युद्धनौका तर त्यावरील सर्व सैनिकांनिशी सागरतळी पोचल्या होत्या.

पण वॉर कौन्सिलला ही मोहीम चालवायची होतीच. तेव्हा गॅलीपोलीवर लष्कर उतरविण्याचा डावपेच लढविला गेला. इजिप्तकडून लष्कराची वाहतूक करण्याचे ठरले, स्मर्नाच्या मार्गाची नाकेबंदी करण्यात आली. बॉस्फरसकडून रशियन नौदलही जय्यत तयार झाले, आणि एक महिन्याच्या अवधीने गॅलीपोलीकडे १८ युद्धनौका, १२ क्रुझर्स, २९ विनाशिका, ८ पाणबुड्या व असंख्य छोटी जहाजे असा दोस्तांचा काफिला आगेकूच करू लागला. २५ एप्रिलच्या पहाटे लष्कर गॅलीपालीस उतरायला लागले. कडवा प्रतिकार झाल्याने दोस्तांचे अनेक सैनिक कामी आले. आता ही मोहीम लष्कराच्या ताब्यात गेली होती. नौदल आता रसद पुरविणे व लष्कराच्या वाहतुकीचे काम करू लागले होते पण २८ एप्रिलपर्यंत ७ युद्धनौकाही कामी आल्या. आता ही मोहीम अपयशी ठरल्याचे समजून माघार घ्यावी, अशी सूचना लॉर्ड फिशर ह्यांनी करून पाहिली पण वॉर कौन्सिल हटेना. फिशरनी राजीनामा दिला आणि विन्स्टन चर्चिल ह्यांची फर्स्ट लॉर्ड ऑफ ॲडमिरल्टीच्या पदावरून उचलबांगडी झाली.

६० मैल लांबीच्या ह्या गॅलीपोली टापूत झालेल्या ह्या मोहिमेत एकूण १२०००० पुरुष धारातीर्थी पडले. त्यांतील ४०,००० सैनिक दोस्तांचे होते तर ८०,००० तुर्की होते. उभय बाजूंचे मिळून २५००० सैनिक घायाळ झाले. १९१५ च्या ऑक्टोबर महिन्यात 'आता झाले एवढे पुरे, आता ह्या सैनिकांना परत आणावे' असा एकमताने निर्णय झाला, पण त्यांना परत आणणे महाभयंकर होते. आणायला गेलेले नौदल सुखरूप परतेल ह्याचीच खात्री नव्हती पण हे आव्हान अर्ल किचनेरने स्वीकारले. 'प्राणहानी होऊ देणार नाही' एवढे आश्वासन किचनेरने दिले. दि. १८ व १९ डिसेंबर १९१५ च्या मध्यरात्री हे माघार पर्व सुरू झाले. ही माघार ही दोस्तांची सर्वाधिक यशस्वी कामगिरी म्हणायची. एकही सैनिक न गमावता अर्ध्या रात्रीत नौदल काफिल्याने दोस्तांच्या उरलेल्या सैनिकांना परत आणले. हेल्स बीचवर अडकलेल्या ऑस्ट्रेलियन सैनिकांना ८ जानेवारी १९१६ रोजी सहीसलामत आणण्यात आले.

ह्या मोहिमेने चर्चिल व सर आयन हॅमिल्टन ह्यांना त्यांच्या पदावरून खेचले आणि इंग्लंडच्या नौदलाला लंगडे बनविले. तुर्कांच्या विजयातून लेफ्टनंट कर्नल मुस्तफा कमाल पाशासारखे जबरदस्त नेतृत्व उदयास आले. एक फसलेली मोहीम म्हणून ती इतिहासात नमूद झाली. त्यात ज्यांची आहुती पडली त्या सर्वांना... मग ते दोस्तांचे असोत वा तुर्की-जर्मन असोत... एकत्रितपणे श्रद्धांजली वाहणे हा माणुसकीचा भाग आहे. या ६० मैलांच्या टापूत गॅलीपोलीमध्ये फक्त स्मशानभूमी आहेत... कबरीमागून कबरी नि तुर्कस्तान त्यांची आस्थेने निगा राखते. कनाकेल हुतात्मा स्मारक हे तुर्कांनी येथे पडलेल्या वीरांसाठी उभारले

आहे... त्यात तुर्की, जर्मन, ऑस्ट्रियन, ब्रिटिश, फ्रेंच, ऑस्ट्रेलियन, आफ्रिकी ह्यांच्या बरोबरीने काही भारतीयही आहेत.

२१/५/९०

❊❊❊

# ५

※

# खारीचा वाटा

साम्यवादी रशियाच्या वर्चस्वाची निशाणी असलेले 'सोशलिस्ट रिपब्लिक' हे शब्द हटवून हंगेरी आणि पोलंड, झेकोस्लोव्हाकिया आदी पूरबींनी जणू मोडक्या राजवटीची कात टाकली. रशियन दडपशाही झुगारण्याची ही प्रक्रिया पूर्वीच इम्रे नागी आणि अलेक्झँडर ड्युबचेक ह्यांच्या कारकीर्दीत सुरू झाली होती पण ती निर्घृणपणे चिरडली होती. गतवर्षापासून जे मन्वंतर सुरू झाले त्याचे फार मोठे श्रेय रशियाचे राष्ट्राध्यक्ष मिखाएल गोर्बाचेव्ह ह्यांच्याकडे जाते, पण ह्या प्रक्रियेत खारीचा वाटा उचलणारेही आहेत. पूर्व युरोपातील घडामोडीमध्ये आपलेही योगदान देणाऱ्यांतील एक व्यक्ती म्हणजे जॉर्ज सोरस. आज परिस्थिती अशी आहे की, हंगेरीत एखादी समस्या उद्‌भवली की, लोकच उत्स्फूर्तपणे म्हणतात- 'सोरसला विचारू या!' आतापर्यंत हंगेरीच्या जनतेला रशियाचे साम्यवादी अर्थशास्त्र शिकावे लागले होते. एखादी निरुंद गल्ली दुसऱ्या तोंडाशी बंद होऊन 'डेड एंड' व्हावा, तसा ह्या साम्यवादी अर्थशास्त्राचाही डेड एंड होऊ लागला तेव्हा पुंजीवादी जगाचे अर्थशास्त्र शिकण्याचा एकच तरणोपाय आहे हे हंगेरीने जाणले नि हे प्रशिक्षण वर्ग आता पिट्सबर्ग विद्यापीठात सुरू झाले आहेत तेदेखील सोरसच्या मदतीनेच! बुडापेस्टमध्ये 'ब्लॅक बॉक्स' नावाची सांस्कृतिक संस्था उभी राहिली आहे, तिच्या मागेही सोरसच आहे. ह्या संस्थेतर्फे चित्रपट तयार केले जातात आणि प्रदर्शितही होतात. हंगेरीचे एकेकाळचे थोर नेते इम्रे नागी ह्यांचे नाव उच्चारण्याचीही गेल्या दोन वर्षांपूर्वीपर्यंत चोरी होती, त्यांची

कबरदेखील अनामिक ठेवली होती, त्याच इम्रे नागींवर ह्या संस्थेने आज लघुपट निर्मिला आहे.

पूर्व युरोपात साम्यवादापायी समाजाभोवतीही पिंजरे पडले होते, त्या समाजाची नव्याने बांधणी करण्याची कामगिरी जगन्नाथाचा रथ ओढण्यासारखी अवघड आहे नि या पुनर्बांधणीत सोरसने स्वत:ला झोकून दिले आहे. हा नव्याने मुक्त झालेला समाजही जॉर्ज सोरसचे खुल्या बाहूंनी स्वागत करीत आहे-हा सोरस आहे तरी कोण? वय वर्षे ५९ पण चेहरामात्र पंचेचाळिशीच्या आसपास वाटणारा – डोक्यावरचा एकूण एक केस रशियाच्या बोरीस येल्तसिनसारखा पांढरा झालेला. जॉर्ज सोरस ह्याला 'मुक्त लोकशाहीचा फिरता विक्रेता' हे विशेषण चपखल बसावे. 'सोरस फाऊंडेशन' ह्या त्याच्या संस्थेस उणीपुरी सहा वर्षे झाली आहेत पण एवढ्यातच कम्युनिझमच्या अमलात वाढलेल्या पिढीला लोकशाहीचे शिक्षण देण्यासाठी ह्या संस्थेने दोन कोटी डॉलर्स खर्चले आहेत. जॉर्ज सोरस जन्माने हंगेरियन. १९३० मध्ये बुडापेस्टमध्ये एका यहुदी कुटुंबात त्याचा जन्म झाला. दुसऱ्या महायुद्धात हे सर्व कुटुंब नाझींच्या छळछावणीत गॅस चेंबरमध्ये नष्ट होणार होते, पण केवळ कागदोपत्री खोटे दाखले देऊन, आपला धर्म लपवून हा परिवार जिवंत राहिला. मात्र त्या काळात प्रत्येक क्षण सोरस कुटुंबात जिवंत मरण देण्याएवढा तणावाचा होता. युद्ध संपले आणि हंगेरीवर साम्यवादाच्या लाल ऑक्टोपसचा कबजा झाला, तेव्हा जॉर्ज सोरसला कळून चुकले की, त्याला हंगेरीत भवितव्य नव्हते. देशाबाहेर पडणे हेच मग त्याचे ध्येय बनले.

आर्थिक स्थिती पार ढेपाळलेली – पुरे राष्ट्रच आर्थिकदृष्ट्या खच्ची झालेले. तेथे सोरस परिवाराची काय कथा! त्यातही नाव बदलून, लपतछपत दिवस कंठण्याच्या काळात मिळकत काय असणार? जॉर्ज सोरसकडे सूटकेस घ्यायलाही पैसे नव्हते. अखेर एक पुठ्ठ्याचा खोका मिळाला, त्यात असेल ते भरून जॉर्ज स्वित्झर्लंडला जाणाऱ्या गाडीत चढला. स्वित्झर्लंडमध्ये भाषाविषयक परिषद भरणार होती. आपल्याला त्या विषयात रस असल्याचे सांगून त्या बहाण्याने तो निघाला. ऑस्ट्रियाच्या सरहद्दीवर त्याला लपंडाव खेळावा लागला, कारण पासपोर्ट व्यवस्थित असला तरी एक्झिट व्हिसा नसल्याने सीमेवरील रशियन सैनिक त्याचा बेत हाणून पाडू शकत होते, पण जॉर्ज सोरस सुदैवी ठरला. एकदा ही सरहद्द पार केल्यावर पुढचा प्रवास कठीण असला तरी अशक्य नव्हता. तेथून बर्न नि मग लंडन ह्या यात्रा सहज झाल्या. लंडन स्कूल ऑफ इकनॉमिक्समध्ये प्रवेश मिळविण्याचेही दिव्य पार पडले. तेथे शिकत असताना जॉर्ज सोरसने शेतमजूर, रंगारी, रेल्वे पोर्टर अशी मिळतील ती कामे केली. लंडन स्कूलचा डिप्लोमा हाती आल्यावर व्यापार क्षेत्रात जॉर्जने सहा वर्षे अनुभव घेतला, गाठीशी थोडा पैसा बांधला आणि अमेरिकेची वाट धरली. न्यूयॉर्कमध्ये जॉर्ज सोरस यशाच्या पायऱ्या चढत राहिला. आंतरराष्ट्रीय स्तरावरील शेअर्स

व रोखे व्यवहाराचा तो तज्ज्ञ बनला आणि वॉल स्ट्रीटवर जॉर्ज सोरस हे नाव गाजू लागले. या यशाने स्फुरण चढून १९६१ पासून सतत तीन वर्षे प्रत्येक सायंकाळ खर्ची घालून जॉर्जने एक तत्त्वज्ञानविषयक पुस्तक लिहिण्यास आरंभ केला - हे तत्त्वज्ञान अर्थशास्त्रासंबंधी होते, पण दुर्दैवाने स्वतः जॉर्जखेरीज कोणालाच ती हस्तलिखिते वाचना येईनात नि आजतागायत हे पुस्तक प्रकाशित झालेले नाही.

आज ज्याला क्वाँटम फंड म्हणून जगभर ओळखले जाते, त्याचे व्यवस्थापन १९६९ मध्ये जॉर्जने हाती घेतले आणि वॉल स्ट्रीटवर इतिहास घडविला. १९६९ मध्ये सोरसकडे ठेवलेल्या १०,००० डॉलर्सची आज किंमत ३.५ मिलियन डॉलर्स एवढी झाली आहे व जॉर्ज सोरसची व्यक्तिगत मालमत्ता ५०० मिलियन डॉलर्सपेक्षा अधिक आहे. न्यूयॉर्कमध्ये तो आपली पत्नी सुझन आणि दोन मुले यांच्यासह सुखाने वास्तव्य करीत होता. तथापि ऐषआरामापेक्षा तत्त्वज्ञान आणि इतिहास ह्यांचा तो रसिक आहे. पूर्व युरोपात घडणाऱ्या घडामोडी पाहून आता ह्या इतिहासाचे आपण साक्षीदार बनलेच पाहिजे, ह्या ऊर्मीने जॉर्ज सोरसने १९९० च्या जानेवारीत अमेरिकेऐवजी लंडनमध्ये आपले निवासस्थान हलविले.

अर्थशास्त्राच्या जगतातील बुद्धिमंत गणल्या जाणाऱ्या सोरसचे आपल्या मायदेशाकडे बारीक लक्ष होते. हंगेरी आर्थिक घसरगुंडीला लागलेली पाहून तो अस्वस्थही होत होता. पूर्व युरोपातील आर्थिक घडी जोवर मार्क्सवादाच्या भिंतीत बंदिस्त आहे, तोवर तेथे अर्थव्यवस्था ढेपाळतच जाणार, ह्याची त्याला खात्री होती. ह्या पूर्व युरोपासाठी काही तरी करावे, अशी तीव्र इच्छा त्याला सातत्याने टोचणी लावीत होतीच. १९८० च्या सुमारास हंगेरीत जानोस कदार ह्यांची सत्ता होती. कदार कट्टर कम्युनिस्ट होते पण तरीही थोडा बदल भीत भीत का होईना, करण्याची कृती ते करीत होते. परदेशी प्रवास करण्यास हंगेरियनांना मर्यादित मुभा मिळू लागली होती. काळ बदलत आहे, ह्याची चाहूल घेऊन जॉर्ज सोरसने हीच योग्य घडी असे ठरविले आणि मोठेच धाडस केले. सांस्कृतिक प्रकल्पासाठी हंगेरीत रोख पैसे वाटण्याचा आपला प्रस्ताव सोरसने कदारच्या कट्टर कम्युनिस्ट नोकरशाहीकडे धाडला, अर्थातच सोरस हे नाव 'संशयास्पद' ह्या यादीत न जाते तरच नवल!

'सांस्कृतिक' हा शब्द तसा निष्पाप वगैरे वाटतो. शिवाय हंगेरीला पाश्चात्त्य चलनाची फार गरज होती म्हणूनच केवळ सोरसचा प्रस्ताव हंगेरियन राजकारण्यांनी विचारात घेतला पण त्यात 'कम्युनिस्ट पक्षाच्या यंत्रणेबाहेरचे सांस्कृतिक कार्यक्रम' असे स्पष्टीकरण सोरसने दिले होते. तेथे विचाराचा खल सुरू झाला. कम्युनिस्टांच्या एकाधिकारी सत्तेला धोकादायक असेच हे विधान होते. एक वर्षभर ह्या वाटाघाटी चालू राहिल्या. ह्या अवधीत सोरसच्या दृष्टीस एक बाब स्पष्ट झाली, ती म्हणजे हंगेरीच्या कम्युनिस्ट

अधिकारशाहीस त्याचे डॉलर्स हवे होते पण त्या रकमेचा विनियोग करण्यावर नियंत्रणही त्यांचेच ठेवायचे होते. अखेरीस 'सोरस फाऊंडेशन' ही संस्था स्थापण्याच्या कागदपत्रावर हंगेरी व अमेरिकन सचिवांच्या सह्या झाल्या. सही वाळण्यापूर्वीच हंगेरियन अधिकारी हर्षाने उद्‌गारला– 'वा! फारच छान! आता आमच्या परराष्ट्रीय सांस्कृतिक खात्याकडे तुमच्या सचिवालयाने काय पाहिजे ते सांगावे, म्हणजे आम्ही ते करू!' क्षणार्धात सोरस टेबलावरून उठला नि आपण निष्कारण एवढा वेळ फुकट घालविला असा शेरा मारीत दरवाजाकडे निघाला. आपलं खरंच चुकलं नि आपण संधी गमावली हे त्या अधिकाऱ्याच्या ध्यानात आलं नि दारापाशी पोचलेल्या सोरसला त्यांनी अडविले. सचिवालयाने सांस्कृतिक संबंध खात्याला काहीच कळवायची आवश्यकता नाही ही अट मान्य झाली आणि बुडापेस्टमध्ये डॅन्यूब नदीच्या काठी एका तीन मजली इमारतीत 'सोरस फाऊंडेशन' ही संस्था जन्माला आली. बघता बघता ही संस्था हंगेरीतील सांस्कृतिक मंत्रालयाचा पर्याय बनली. स्थापनेपासून ६ वर्षांत शेकडो प्रकल्पांना ह्या संस्थेने पैसा पुरविला. त्यात मतिमंद मुलांसाठी केंद्र, अपंग मदत केंद्र आणि बालकांसाठी खेळण्याचे म्युझियम ह्यांचाही समावेश होता. आज सोरसने फक्त प्रकल्पांना पैसे देण्यावरून शिष्यवृत्त्यांची योजना मांडण्यापर्यंत मजल नेली. सोरस अनुदानावर १००० हंगेरियन विद्यार्थी-विद्यार्थिनी ऑक्सफर्ड, न्यूजर्सी, न्यूयॉर्क येथील विद्यापीठांतून शिक्षण घेऊ लागले. तेथून प्रशिक्षित झालेले हे विद्यार्थी हंगेरीलाच परतून अध्यापन करू लागले. बुडापेस्टमध्ये इंटरनॅशनल मॅनेजमेंट सेंटर निघणे हा त्यातीलच एक भाग झाला. ह्या केंद्रात शिकणारे हंगेरियन विचारपद्धतीत बदलून गेले. ह्या केंद्राकडे तरुणांची गर्दी होऊ लागली. सोरसने मग बुडापेस्टच्या कार्ल मार्क्स अर्थशास्त्र विद्यापीठाकडे नजर वळवली. आज ह्या विद्यापीठाला कार्ल मार्क्स हे नाव टाकून बुडापेस्ट विद्यापीठ हे नाव मिळाले आहे. ५००००० डॉलर्सच्या अनुदानातून ह्या विद्यापीठातील ५० तरुण प्राध्यापकांना सोरसने अमेरिका, कॅनडा, इंग्लंड व पश्चिम जर्मनीतील विद्यापीठांकडे रवाना केले. ही ५० मंडळी परतताच त्यांनी हंगेरीतील क्रमिक पुस्तके बदलण्याचा कार्यक्रम सुरू केला. त्यांनी ती आधुनिक केली, त्यातील साम्यवादी प्रचार हटविला.

जॉर्ज सोरस आता निर्भय बनला. चक्क मॉस्कोमध्ये १९८७च्या मार्चमध्ये त्याने सांस्कृतिक फाऊंडेशन स्थापले आणि पश्चिमेकडील लोकशाहीचे स्वच्छ दर्शन रशियनांना घडू लागले. रशियन नामवंत लेखक, न्याय संस्थेतील सेवक, प्राध्यापक ह्यांना अमेरिकेत आणवून आदानप्रदान करण्याचा कार्यक्रम त्याने आखला. सोरसची मजल एवढ्यावर थांबली नाही. पोलंड (स्टीफन बॅटरी फाऊंडेशन) आणि चीनमध्येही त्याने सांस्कृतिक धडक मारली. (आज चीनमधील केंद्र मात्र बंद पडले आहे.) आणि आज बल्गेरियाला ही धडक पोचली आहे. पूर्व युरोपात अभूतपूर्व क्रांती घडून साम्यवादाला गाडून लोकशाहीची स्थापना

होत आहे. त्या त्या राष्ट्रांतील नवे नेते त्यासाठी प्रयत्नशील होते व आजही झटत आहेत. ह्या क्रांतीचे श्रेय त्या नेत्यांना जरूर द्यावे पण त्यात जॉर्ज सोरस नामे अंतर्बाह्य लोकशाहीवादी उदार व सचोटीने प्रयत्नशील राहणाऱ्या सहृदय माणसाचाही खारीचा वाटा आहे, एवढे मान्य केले पाहिजे. पोलादी पडदा भेदण्यासाठी जे अनेक घण बसले, त्यात जॉर्ज सोरसचे घणही होते, हे मानले पाहिजे.

४/६/९०

❋❋❋

६

※

# इतिहास साक्षी आहे –

**दि.** ९ नोव्हेंबर १९८९... जर्मन इतिहासात ह्या तारखेची केवळ अभूतपूर्व म्हणून नोंद झाली. त्या रात्रीच्या मध्यरात्री जर्मनीत आगळी क्रांती घडली. दोनशे वर्षांपूर्वी फ्रान्समध्ये बास्तीलचा तुरुंग फोडताना जो जोश फ्रेंच जनतेत होता, त्या जोशाची झलक जर्मन जनतेत त्या रात्री दिसली. गेली २८ वर्षे डोळ्यांत कुसळासारखी होऊन राहिलेली आणि हृदयात काटा बनून सलणारी बर्लीनची 'अभेद्य' भिंत फुटली.. नव्हे... फोडली गेली. शँपेन आणि बीयरच्या बाटल्या फोडून, एकमेकांना आलिंगने देऊन, वीस-वीस ड्यूशमार्कच्या नोटा पूर्व जर्मनांच्या हाती कोंबून 'पाश्चिमात्यां'नी हा स्वातंत्र्यक्षण साजरा केला. हातोडा हे विळ्या-कोयत्याच्या जोडीने कम्युनिझमचे प्रतीक बनले आहे. ह्या हातोड्याचा अक्षरश: बर्लिन भिंतीवर पडलेला प्रहार म्हणजे साम्यवादावरचा प्रतीकात्मक प्रहार ठरावा. आधी हातोडा पडला नि मग बुलडोझरच आला. भिंतीत खिंडार पडताच पूर्व बर्लिनकरांचा लोंढा पश्चिमेकडे आला. चेकपॉइंट चार्लीपाशी अँजेलिका वॉश ही ३४ वर्षे वयाची पूर्व बर्लिनवासी स्त्री सर्वांत प्रथम पाय ठेवती झाली. पश्चिम बर्लिनवाल्यांनी सर्वांत प्रथम तिला पश्चिम जर्मनीच्या चलनी नोटा दिल्या नि सांगितलं– 'तुझं स्वातंत्र्य साजरं कर.' (पूर्व जर्मनीचे चलन बदलता येत नाही आणि पूर्व जर्मनीबाहेर त्याला कवडीचीही किंमत नाही.)

बर्लिन भिंतीच्या खिंडाराची वार्ता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश ह्यांना कळताच

ते सद्गदित झाले. भिंत तुटत जात असताना पश्चिम जर्मनीचे चॅन्सलर हेल्मट कोहल ह्यांना समजले. ते त्या वेळी पोलंडच्या दहा दिवसांच्या दौऱ्यावर होते नि ह्या ऐतिहासिक घटनेचे महत्त्व जाणून त्यांनी तो दौरा अर्ध्यावर सोडून मायदेशी धाव घेतली. पश्चिम जर्मनीचे भूतपूर्व चॅन्सलर विली ब्रँड हे वृत्त कळतांच आनंदोत्सवात जातीने सहभागी झाले.

– विली ब्रँड आणि बर्लिनची भिंत ह्यांचा फार निकटचा संबंध आहे. विली ब्रँड तेव्हा पश्चिम बर्लिनचे महापौर होते. लोकप्रियता वाढत होती नि एक दिवस हा महापौर पश्चिम जर्मनीचा नेता बनणार हे भवितव्यही दिसत होते. फार जुनी नव्हे तर फक्त २८ वर्षांपूर्वीची गोष्ट. सन १९६१. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी जॉन केनेडीसारखा उमदा नेता होता तेव्हाची घटना. रशियात तेव्हा निकिता सर्गेविच क्रुश्चेव्ह प्रमुख होते. जर्मनीची फाळणी होऊन बारा वर्षे उलटली तरीही पूर्वेच्या रहिवाशांचा पश्चिमेकडे दिसणारा ओढा पाहून क्रुश्चेव्हनी उघड धमकी दिली होती – 'बर्लिनची कटकट कायमची मिटावायला हवीच.' ही धमकी कशी प्रत्यक्षात उतरणार होती. हे केनेडींना समजत नव्हते. १९६१ च्या ऑगस्ट महिन्यात एका निवांत दुपारी केनेडी कुटुंबाने नौकाविहाराचा बेत आखला होता. 'मर्लिन' ह्या नौकेवर खाद्य पदार्थ, पुस्तके, मुलांचे खेळ चढवून जॉन केनेडी निघणार एवढ्यात वॉशिंग्टनला खबर आली – 'पूर्व व पश्चिम जर्मनीच्या मधोमध भिंत बनत आहे.' केनेडींचे लष्करी सल्लागार ब्रिगेडियर जनरल चेस्टर क्लिफ्टन हे नित्याच्या व्यायामाचा भाग म्हणून पोहोत होते. लष्करातील ज्या मेजरने ही भिंतीची बातमी आणली तो एवढा अस्वस्थ झाला होता की, अंगावरील गणवेषासह तो चक्क पाण्यात उतरला व क्लिफ्टनपाशी पोचला... 'मर्लिन' नौकेवर मग फक्त केनेडींचा परिवार गेला नि राष्ट्राध्यक्ष विचारविनिमयात गुंतले... रणगाडे घालून भिंत पाडली असती तर?... तर कोसभर आतमध्ये ती नव्याने उभारली असती. नि ही नवी भिंतही रणगाड्यांनी आडवी केली तर?... युद्धाच्या भेरीही गर्जू लागण्याची शक्यता होती.

– केनेडींनी मग आवर्जून पश्चिम जर्मनीला भेट दिली नि बर्लिनच्या भिंतीची पाहणी केली. 'चेकपॉईंट चार्ली' ह्या चौकीपाशी केनेडींनी आपल्या कुटुंबियांस आणि इतर पाहुण्यांस आपल्याबरोबर न येण्याची विनंती केली. ह्या चौकीवर उभे राहून त्यांनी पूर्व बर्लिनच्या दिशेने चेहरा वळवला. तेथे सन्नाटा होता. एकाएकी पूर्व बर्लिनच्या बाजूकडील एका खिडकीत तीन स्त्रिया दृश्यमान झाल्या. खूप मोठा धोका पत्करून त्या तिघीजणी केनेडींच्या दिशेने हातरुमाल हलवीत होत्या. अन् जॉन केनेडींनी त्यांचे ऐतिहासिक उद्‌गार त्या भिंतीपाशी काढले – 'लेट देम कम टू बर्लिन!'

– आज २८ वर्षांनी जॉन केनेडींचे उद्‌गार इतिहासाने प्रत्यक्षात उतरविले आहेत. 'वाढू दे कारागृहाच्या भिंतीची उंची कितीही! मन्मना नाही क्षीति॥' ह्या काव्यपंक्ती नेहमीच सत्य ठरल्या आहेत. भिंत ही पूर्वापार संरक्षक कवच म्हणूनच मानली गेली होती. भिंत

घरपणासाठी असते, सुरक्षेसाठी असते. इतिहास सांगतो की, भिंत राज्याच्या सुरक्षिततेसाठी अनिवार्य बनली. तिला मग तटबंदी हा शब्द अधिक चपखल ठरला. चीनची भिंत, दिल्लीतील कोट, देवगिरीकर यादवांचे सप्तकोट, जेरुसलेमची तटबंदी, रोमची तटबंदी ह्या नगरांच्या, देशांच्या रक्षणार्थ उभारल्या गेल्या. स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी ह्या भिंती खड्या झाल्या नि कालपरत्वे भिंत ही सुरक्षेतील बाब हा विचारच मागे पडला. ह्या पुढारलेल्या विसाव्या शतकात ही एकमेव भिंत जी शहराला चिरत गेली – बर्लिनची भिंत! २८ मैल लांबीचे हे कुरूप भिंताड सुरक्षेसाठी उभारले नव्हते अगर स्वातंत्र्य रक्षणासाठी तर मुळीच नव्हते, उलटपक्षी स्वातंत्र्याचा गळा घोटण्यासाठी, स्वातंत्र्याची उर्मी बाळगणारी हृदये चिरडण्यासाठी उभारले गेले नि स्टॅलीनिस्टी साम्यवादाची मनोवृत्ती प्रकट करणारे चिन्ह बनले.

– दिनांक १३ ऑगस्ट १९६१ रोजी रशियाच्या आधिपत्याखालील बर्लिनमधील नागरिक सकाळी उठले तो नजरेसमोर एक आक्रीत उभे... २८ मैलांचे काटेरी तारांचे मजबूत कुंपण उभ्या बर्लिनला कापून गेलेले... बर्लिनची पूर्व व पश्चिम अशी प्रत्यक्ष फाळणी करणारे कुंपण नि त्या कुंपणाला समांतर काँक्रीटचे पक्के बांधकामही सुरू झालेले. उभय बाजूचे बर्लिनवासी त्या क्षणापासून अस्वस्थ झाले. पूर्व जर्मनीची (जीडीआर) स्थापना होताच तेथील नागरिक मोठ्या संख्येने पश्चिम जर्मनीकडे जात राहिले. २ कोटी ७० लक्ष पूर्ववासी पश्चिमेकडे गेल्यावर पूर्व जर्मनीत मजूर-तंत्रज्ञांचा जणू दुष्काळ पडला नि देशाच्या स्थैर्याला धोका निर्माण झाला. पूर्ववासींचे हे स्थलांतर बंद करण्यासाठी हे भिंताड बांधले गेले नि त्या भिंतीला ओलांडून स्वातंत्र्याच्या दिशेने जाण्याच्या प्रयत्नात किमान ७५ नागरिकांनी प्राणांची आहुती दिली. ही भिंत बांधणारा माणूस आज विकलांग अवस्थेत आहे. 'ही भिंत १०० वर्षे अभेद्य राहील' अशी वल्गना करणारा हा माणूस आज सर्वांनाच नकोसा झाला आहे... अगदी इतकी वर्षे बोलविता धनी असलेल्या रशियालादेखील तो नकोय!

– त्याचं नाव एरीक हॉनेकर. वय वर्षे ७७ पूर्ण आणि पित्ताशयातील कर्करोगावर शस्त्रक्रिया होऊनही गलितगात्र झालेला. दिसण्यात अगदी सामान्य पण आवडीनिवडी मात्र कम्युनिझमला न शोभेशा असामान्य. भरपूर बीयर पिणारा नि वाँडलित्झ सरोवरापाशी ऐसपैस राजवाडा व इस्टेट बाळगणारा. ह्या इस्टेटीवर हॉनेकरनी आजपर्यंत आपले स्वतःचे मृगयारण्य राखले आहे. पूर्वी हे मृगयारण्य कैझरच्या मालकीचे होते. हॉनेकरनी त्यात स्वतःसाठी शिकारीची वेगळी सोय करून घेतली – ती अशी की, ससे आणि हरणे ह्यांना तेथे जीव वाचविण्यासाठी कोठलाही आसरा ठेवलेला नाही. – एकदम आमनेसामने शिकाऱ्याची गोळीच! भिंत बांधणाऱ्याचे मन येथेही स्पष्ट होते. आता पश्चिम जर्मनीत असलेल्या न्यूनकिर्शन ह्या खेड्यातील एका खाण कामगाराचा तिसरा मुलगा असलेले एरीक

हॉनेकरनी दारिद्याचा अनुभव घेतला होता. वयाच्या १४व्या वर्षी शाळा सोडून एरीकने कम्युनिस्ट पार्टीचे काम सुरू केले. १७व्या वर्षी पक्षाचा पूर्ण सदस्य, १९३५ मध्ये अटक आणि १० वर्षे बर्लिन तुरुंगातील बंदिवास हे हॉनेकरचे पूर्वायुष्य. १९४५ पासून त्यांची सत्तेच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. पूर्व जर्मनीचे पहिले नेते वॉल्टर उल्ब्रिज ह्यांची हॉनेकरवर मर्जी होती. युवक संघटनेचे प्रमुख, १९६३ मध्ये दुय्यम पातळीचे नेतृत्व अशा पायऱ्या ओलांडत १९७१ मध्ये उल्ब्रिजनंतर हॉनेकर पूर्व जर्मनीचे नेते बनले. बर्लिन भिंत ही उल्ब्रिज आणि क्रुश्चेव्ह ह्यांची कल्पना! मात्र हॉनेकरनी ती प्रत्यक्षात उतरविली.

हॉनेकरचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्व जर्मनी हेच खरे 'जर्मनी' असल्याचा आग्रह धरून आपले हे मत जगाच्या गळी उतरविण्यासाठी केलेला आटापिटा! त्यासाठी त्यांनी फ्रेडरीक द ग्रेट ह्या ऐतिहासिक सम्राटाला आणि ५०० वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या मार्टीन ल्यूथरला 'कम्युनिस्ट' ठरविण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला. बिथोवेन, वॅग्नर आणि बिस्मार्क आदी मंडळींवरही मरणोत्तर 'साम्यवादी' हा शिक्का मारला. (नशीब की, स्टॅलीनचे चेले म्हणून घोषित केले नाही.) हॉनेकर तसे रंगेल होते. त्यांचा पहिला विवाह घटस्फोटात संपला तर दुसरा विवाह 'मार्गो' या पोथीनिष्ट कम्युनिस्ट स्त्रीशी झाला. ही त्यांची पत्नी पूर्व जर्मनीच्या मंत्रिमंडळात आहे. विवाहाव्यतिरिक्त अन्य काही प्रकरणेही त्यांच्या नावे जमा झाली. दोन्ही पत्नींना मुलीच झाल्या नि हॉनेकरना बरीच नातवंडेही आहेत.

हॉनेकरची १०० वर्षे टिकणारी भिंत आज जणू हॉनेकरचे जीते जी बांधलेले स्मारक बनले आहे .... हॉनेकर रशियाला नकोसे झाल्याने प्रकृतीचे कारण देऊन त्यांनी राजीनामा दिला आहे आणि.....त्यांच्या जागी आलेले इगन क्रेंझ ह्या ५२ वर्षांच्या नेत्याला बदलत्या जगाची, नव्या विचारांची जाणीव आहे. त्यांनी हॉनेकरची भिंत पाडलीच, शिवाय मागणी केली आहे – 'हॉनेकर, त्यांची पत्नी आणि पूर्व जर्मन संसदेतील इतर २५ जण ह्या २७ व्यक्तींनी वृद्ध झाल्याने आता आपल्या संसद सदस्यत्वाचाही राजीनामा द्यावा.' भिंतीसह हॉनेकर अडगळीत जमा होण्याची ही चिन्हे!

२०/११/८९

❊❊❊

७

※

# अखंड जर्मनी

युद्धांची परिणती जबर मनुष्यहानी, कोडमलेला आर्थिक गाडा, विस्थापित जनसमूह, विधवांचा आक्रोश, काही देशांवर लादलेले पारतंत्र्य तर काही देशांची फाळणी अशा भयानक आणि दूरगामी परिणाम करणाऱ्या घटनांमध्ये होत असते, हे ऐतिहासिक सत्य आहे. फाळणी झालेल्या देशाला पुन्हा अभंग बनविणे हे नेभळट आणि स्वार्थी मंडळींना कधीच साध्य होत नाही. त्यासाठी दूरदृष्टी लाभलेल्या, अभंग देशाचे ध्येय समोर ठेवून धडपडणाऱ्या, बुद्धीत चमक असलेल्या आणि मनगटात ताकद लाभलेल्या अनेक नेत्यांची मालिका त्या देशाच्या दैवात असायला हवी... तरच तो चमत्कार घडू शकतो. केवळ स्वतःच्या देशाचाच नव्हे तर प्रसंगी संपूर्ण खंडाचा आणि नंतर त्या जगाचा इतिहास घडविणाऱ्या, त्याला धक्कादायक कलाटणी देणाऱ्या जर्मनांनी आज हा चमत्कार दृष्टीच्या टप्प्यात आणून ठेवला आहे. हिटलरच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेची शिक्षा म्हणून जर्मनीचे दोन तुकडे करून पूर्णांशाला नेण्यात आली पण ही फाळणी जर्मनांनी सातत्याने नाकारली... ह्या अन्यायाचा विसर पडू दिला नाही. पश्चिम जर्मनीचे कॉनरॅड ॲडेनॉर ते लुडविग एरहार्ड, विली ब्रँड, हेल्मट कोहल ह्या सर्वच नेत्यांनी देशाच्या अभंगत्वाचा विषय कधी नजरेआड होऊ दिला नाही आणि पूर्व जर्मनीच्या जनतेनेही हे स्वप्न पाहण्याचे कधी थांबविले नाही. अखेर गेल्या वर्षी पूर्व जर्मन प्रजा अक्षरशः रेटा द्यायलाच खडी झाली... काळ अनुकूल ठरला आणि कोहल, ब्रँड तथा पूर्वेचे लोथर डी मेझिए ह्यांनी एकत्रीकरणाच्या दिशेने पावले

टाकायला सुरुवात केली. ह्या प्रक्रियेचा पहिला टप्पा रविवार दि. १ जुलै १९९० रोजी उभय राष्ट्रांच्या आर्थिक विलीनीकरणातून साध्य होत आहे.

– त्या दिवशी ह्यापूर्वी कधी न घडलेले अर्थशास्त्रीय आश्चर्य जर्मनीत प्रत्यक्षात उतरणार आहे. पश्चिम जर्मनीचे चलन ड्यूशमार्क आणि पूर्व जर्मनीचे चलन ऑस्टमार्क ह्यांच्या मूल्यात महदंतर आहे. ड्यूशमार्क हे जागतिक बाजारपेठेतही जबर 'भावखाऊ' आहे. त्याची नि ऑस्टमार्कची बरोबरी होणे स्वप्नात शक्य नाही. दोन देशांचे मिलन घडवायचे तर आधी आर्थिक आघाडी समपातळीवर येणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या आणि अब्जावधी ड्यूशमार्कच्या कोऱ्या करकरीत नोटा खच्चून भरून ३० खास बनावटीच्या पोलादी व्हॅन्स कडेकोट लष्करी बंदोबस्तात पश्चिम जर्मनीहून पूर्व जर्मनीत गेल्या काही दिवसांपासून वाहतूक करू लागल्या. एकूण १२० बिलियन ड्यूशमार्क म्हणजे ७० बिलियन डॉलर्स ही एकत्रित जर्मनीची पहिल्या टप्प्याची किंमत आहे. दि. १ जुलै रोजी रविवार असला तरीही दोन्ही जर्मनींतील बँका जेवणाचीही सुट्टी न घेता दिवसभर उघड्या राहणार आहेत. पूर्व जर्मनीतील नागरिक आपापली पासबुके, ओळखपत्रे आणि आपले रोख ऑस्टमार्क घेऊन निर्धारित केलेल्या १०,००० बँक शाखांकडे जातील. बँकांखेरीज पोलिसठाणी, नागरी पुरवठा खाती आणि निवडक प्रशासकीय कार्यालये ह्यांनाही हा अधिकार देण्यात आला आहे. पूर्व जर्मन नागरिकांना त्यांच्याजवळील ४०००ऑस्टमार्कच्या बदल्यात चलनबदलाचा आंतरराष्ट्रीय दर न लावता ४००० ड्यूशमार्क देण्यात येतील. या खास सवलतीस ४००० ही मर्यादा ठेवण्यात आली आहे. त्याच्यापेक्षा अधिक ऑस्टमार्कसाठी एका ऑस्टमार्ककरिता अर्धा ड्यूशमार्क असा दर ठेवला आहे. त्यास मात्र रकमेची मर्यादा नाही तथापि दुर्दैवाने कम्युनिस्ट राजवटीत भरडल्या गेलेल्या पूर्व जर्मन नागरिकांकडे हजारो ऑस्टमार्कची बचत होणे कधी शक्यच नव्हते. ह्याच दिवशी चलन बदलल्यानंतर संपूर्ण पूर्व जर्मन समाज पश्चिम जर्मनीकडे सोपविला गेल्याच्या ११५ पानी अधिकृत करारावर उभय राष्ट्रांच्या मह्या होतील. गेल्या अर्ध शतकाच्या साम्यवादी राजवटीत पूर्व जर्मनीसाठी जी आर्थिक कायदेकानूंची चौकट तयार झाली होती, ती ह्या करारान्वये मोडीत काढली जाईल. त्यात विघ्ने आहेत... 'नाटो' करारावरून हरकतीचे मुद्दे आहेत... आक्षेप आहेत... पण तरीही हेल्मट कोहल आणि लोथर डी मेझिए हे दोन्ही राष्ट्रांचे चॅन्सलर अभंग जर्मनीसाठी आत्मविश्वासपूर्वक अथक प्रयत्नशील आहेत.

दोन जर्मनी एकत्र झाले तर लष्करी बलाबलात युरोपला वरचढ ठरतील... एखादा नवा फॅसिस्ट उदयाला आला तर...? ह्या शंकेनेच जगाच्या पोटात गोळा उठतो... त्या वेळी जग सोयिस्करपणे विसरते की, जर्मनी म्हणजे फक्त बुद्धिमंतांचीच नव्हे तर महाप्रज्ञांची भूमी... विज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रातले, धर्म व कलेच्या प्रत्येक प्रांगणातले, हरेक विषयातले दिग्गज ह्या देशाने दिले आहेत... जग फक्त १९३३ ते १९४५ एवढाच कालखंड

जर्मनीचा इतिहास म्हणून पाहते... वास्तविक जर्मनीच्या २५०० वर्षांच्या इतिहासातील ती फक्त १२ वर्षे होती. ही रक्तलांच्छित १२ वर्षे आणि धूमकेतूसारखा हिटलर एवढाच इतिहास जगाच्या ध्यानात राहिला. ह्याच जर्मनीला एके काळी अस्तित्वही राहिले नव्हते, नकाशात जर्मनीची निशाणी राहिली नव्हती, जुलमी रोमन सम्राटांशी लढताना उर्वरित युरोपची दमछाक झाली असताना केवळ जर्मन लढत होते, ह्या सर्व भूतकाळाचा जगाला विसर पडला नि लक्षात राहिला तो दुसऱ्या महायुद्धाचा एक तपाचा काळ! आज जर्मन जनता अभंग बनून भविष्यकाळाचा विचार करीत आहे नि जग मात्र वर्तमानही विसरून केवळ जर्मनीच्या विशिष्ट १२ वर्षांचाच भूतकाळ कवटाळून बसले आहे.

नकाशावरून साफ नाहीसे होणे हे दुर्दैव जर्मनीसारखे क्वचितच एखाद्या राष्ट्राच्या वाट्याला आले असेल. इ. सं. ४७६ मध्ये माफ खिळखिळलेले, रक्तरंजित रोमन साम्राज्य अधिकृतपणे नष्ट करण्याच्या कामगिरीत ऑडोवकार ह्या जर्मन वीराचे फार मोठे योगदान होते. त्यानंतर तीन शतकांनी इ. स. ८०० मध्ये रोमला येऊन पुनश्च रोमन साम्राज्य प्रस्थापित करण्याचा आणि पोपकडून स्वतःला सम्राट म्हणून ताजपोशी करून घेण्याचा अविश्वसनीय विक्रम करणारा शार्लमनी हा जर्मन होता.(त्याच्यावर जर्मनीच्या बरोबरीने फ्रान्सही दावा करते) जर्मनीच्याच ऑटो द ग्रेटने इ स. ९६२ मध्ये स्वतःच्या नावाने रोमन सम्राट म्हणून द्वाही फिरवली होती नि रोमन साम्राज्याचे जर्मेनिक होली रोमन एंपायरमध्ये रूपांतर केले होते. १६ वे शतक जर्मनीच्या दृष्टीने प्रचंड उलथापालथीचे ठरले. मार्टीन ल्यूथर आणि प्रॉटेस्टंट पंथाचा उदय जर्मनीत झाला तो ह्याच शतकात!... सरदारांची लढाई आणि शेतकऱ्यांची लढाई ही दोन प्रकरणेही ह्याच शतकात जर्मनीने अनुभवली. त्यांचे परिणाम १७व्या शतकातही कायम राहिले. ह्या काळात जर्मनी हा सलग देश न राहता राज्ये, डचीज, बिशप्रीज, प्रिन्सिपॅलिटी,स्वतंत्र प्रदेश अशा विविध राज्यपद्धतींच्या समूहाची एक विचित्र खिचडी बनली होती. त्यात १६१८ मध्ये प्राग येथे घडलेल्या चमत्कारिक घटनेची ठिणगी उडाली. हॅब्सबर्ग राजघराण्याच्या (ऑस्ट्रिया) दोन दूतांना काही प्रॉटेस्टंट सरदारांनी प्रागच्या किल्ल्यातून खाली नाल्यात चक्क फेकून दिले. त्यामुळे खवळून हॅब्सबर्ग सम्राट फर्डिनंड दुसरा ह्याने प्रॉटेस्टंटांनी निवडलेल्या बोहेमियाच्या राजावर स्वारी केली. शोला एवढा भडकला की, जर्मनीच्या भूमीवर अन्य युरोपीय राष्ट्रांचे रणकंदन माजले. ह्या युद्धास धार्मिक तेढीने खतपाणी घातले.

खरे तर १६३२ मध्ये हे 'धर्म' युद्ध समाप्त झाले असते पण फ्रान्सचा अत्यंत धूर्त, डावपेचात तरबेज असलेला मुत्सद्दी कार्डिनल रिचलू ह्याने वाकडी चाल खेळून आणखी १४ वर्षे हे युद्ध लढविले. जर्मन भूमीवर इतर राष्ट्रांनी केलेला हा अत्याचार होता. नकाशावरून जर्मनी नाहीसे झाले ते ह्या ३० वर्षांच्या प्रदीर्घ युद्धात! त्याचे उत्तम चित्र उभे करायचे असेल तर बर्टोल्ड ब्रेख्त ह्यांचे 'मदर करेज' हे नाटक वाचावे – 'ह्या धार्मिक

युद्धात जर्मन भूमीची अर्धी प्रजा कामी आली, युद्धात जे वाचले ते रोगराईला बळी पडले... नव्या पिढीच्या बालकांना कसला वारसा मिळाला? तर उपासमारीचा! 'ज्या सुजल, सुफल भूमीने धान्य भरभरून दिले तीच भुकेकंगाल बनली... नगरींचे जाळून कोळसे बनले आणि आज सडकांवर ऐकू येत आहेत फक्त कोल्ह्यांचे ओरडणे आणि कुत्र्यांचे भेसूर रडणे...' ब्रेख्तचे हे वर्णन अतिशयोक्ती नव्हे. पुढे १७४० मध्ये फ्रेडरिक द ग्रेटने प्रशियाच्या रूपाने पुनश्च जर्मनी नकाशात आणला. हे जर्मनीचे पहिले सुवर्णयुग (फर्स्ट राईश) जे नेपोलियनच्या पायाशी जेनाच्या कुरुक्षेत्रावर कोलमडले. जर्मनीला दुसरे सुवर्णयुग आणि खरी अस्मिता दिली १८७१ मध्ये प्रिन्स ऑटो फॉन बिस्मार्क आणि काऊंट हेल्मट फॉन माल्तके ह्या द्रष्ट्या द्वयीने! बिस्मार्क हा जर्मनीचा खरा भाग्यविधाता! राजघराण्यात न जन्मता 'प्रिन्स' बनणारा विक्रमवीर! जर्मन राजघराणी एकत्र आणवून 'अखंडत्वा'चे स्वप्न पाहणारा हा माणूस 'मॅन ऑफ डेस्टिनी' ठरला. बिस्मार्कनंतर तिसरे सुवर्णयुग आणण्याचा असफल प्रयत्न कैझर विल्यम दुसरा (पहिले महायुद्ध) व हिटलर ह्यांनी करून पहिला. बिस्मार्क भाष्यकार ठरला. 'जर्मनीचे तिसरे सुवर्णयुग रक्त न सांडता यावे आणि अवघ्या जगाला कल्याणकारी ठरावे,' अशी जणू भविष्यवाणी करून तो गेला.

आणखी सहा दिवसांनी दोन जर्मनी आर्थिक आघाडीवर अभंग होऊन संपूर्ण 'अखंडत्वा'च्या दिशेने वाटचाल करू लागतील. त्या नव्या राष्ट्राचा धसका घेण्याऐवजी जर्मनांच्या चिवट जिद्दीचे कौतुक करावे आणि विश्वकल्याणकारी सुवर्णयुगाचे बिस्मार्कचे भाष्य खरे होवो अशी सदिच्छा द्यावी!

२५/६/९०

# ८

※

# 'स्तासी' आणि 'झेर्नी'

एक कर्तबगार राजकीय व्यक्तिमत्त्व उदय होता होताच अविश्वसनीय पद्धतीने परवा अस्तास गेले. कदाचित हा अस्त तात्पुरता असू शकेल, कदाचित राजकारणात परत कधीच त्यांचा समावेश होऊ शकणार नाही, मात्र इतिहासात त्यांचे नाव निश्चित राहील. १९९० ह्या संवत्सरातील सर्वांत महत्त्वाची, धक्कादायक आणि ऐतिहासिक घटना कोठली, ह्याबाबत जागतिक पातळीवर एक कौल घेण्यात आला आणि त्याचे बहुमताने उत्तर आले – 'दोन जर्मनींचे एकीकरण ही घटना!' उत्तर पूर्णतः सार्थ आहे. दैवदुर्विलास एवढाच की, ह्या एकीकरणाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक ठरलेले लोथर डी मेझिए गेल्या सोमवारी दि. १७ डिसेंबर रोजी राजकीयदृष्ट्या अस्तंगत झाले. जर्मनीच्या एकीकरणातील प्रमुख व्यक्ती म्हणून डी मेझिए ह्यांचे नाव इतिहासात नमूद व्हावे आणि अगदी अल्प काळातच त्यांच्या नावाभोवती वादळ उठावे, हा योगायोग विचित्र आहे. माणसाच्या जीवनात त्याला खरी सोबत फक्त दोघांची असते – एक त्याची स्वतःची सावली आणि दुसरे त्याचे पूर्वायुष्य! प्रत्येकाच्या बाबतीत हे पूर्वाध्याय अभिमानास्पद असतीलच असे नाही. उलटपक्षी बऱ्याच वेळा पूर्वायुष्य नकोसे वाटते... त्याचे ओझे बनून राहते... कधी कधी तर नको त्या क्षणी भूतकाळ पिशाच्च बनून समोर येतो आणि अनर्थ घडवू शकतो. पूर्वायुष्यापासून पळून जाण्याचा, त्याला हुलकावणी देण्याचा प्रयत्न अनेकांनी करून पाहिला पण तो हमखास अपयशी ठरला. लोथर डी मेझिए ह्यांचा भूतकाळ असाच मोक्याच्या क्षणी

नागफणीसारखा उभा राहिला –

पन्नास वर्षे वयाच्या लोथर डी मेझिए ह्यांची जनमानसातील प्रतिमा अतिशय आदरणीय व्यक्ती म्हणून राहिली आहे. आता अस्तित्वात नसलेल्या पूर्व जर्मनीचे पहिलेच आणि एकमेव बिगर कम्युनिस्ट पंतप्रधान म्हणजे लोथर डी मेझिए. एके काळचे पूर्व जर्मनीचे नामवंत वकील. दोन जर्मनी एकत्र आणण्याचा ध्यास चॅन्सलर हेल्मट कोहल ह्यांनी घेतला होताच, कोहल ह्यांच्या सादाला प्रतिसाद देणारा मुत्सद्दी सुदैवाने पूर्व जर्मनीला लोथर डी मेझिए ह्यांच्या रूपाने लाभला आणि दि. ३ ऑक्टोबर १९९० रोजी अखंड जर्मनी अस्तित्वात आला. अलीकडेच नव्याने जन्मलेल्या अभंग जर्मनीत निवडणुका होऊन कोहल ह्यांचा अपेक्षित विजय झाला आणि पूर्वीच्या पूर्व जर्मनीतील सत्ताधाऱ्यांपैकी एकट्या डी मेझिए ह्यांनाच नवनिर्वाचित सरकारात मंत्रिपदाची संधी मिळण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. चॅन्सलर कोहल ह्यांच्या ख्रिश्चन डेमॉक्रॅटिक युनियनचे ते उपाध्यक्ष बनले होते तर ब्रँडनबर्गसारख्या महत्त्वपूर्ण प्रांताच्या ख्रिश्चन डेमॉक्रॅटस् संघटनेचे ते प्रमुख होते. जर्मनीच्या एकीकरणासाठी डी मेझिए ह्यांनी जी कामगिरी बजावली, त्यामुळे हा भूतपूर्व पूर्व जर्मन नेता आंतरराष्ट्रीय राजकारणातही अतिशय विश्वासार्ह मानला जाऊ लागला होता. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश, रशियाचे राष्ट्राध्यक्ष मिखाएल गोर्बाचेव्ह अशा सर्वच नेत्यांचे डी मेझिए ह्यांच्याबद्दल अनुकूल मत झाले होते. पण द्रष्टे, समन्वयी, अतिशय विचारी, समंजस अशा विशेषणांनी युक्त असलेल्या डी मेझिए ह्यांना नकळत, भूतपूर्व पश्चिम जर्मन मुत्सद्दी त्यांचे पूर्वायुष्य तपासत होते. परिकथांतून बाटलीत कोंडलेला राक्षस बाहेर पडतो, तसे ह्या तपासाचे झाले आणि गुप्त फायलींच्या चळतीतून 'मिस्टर झेर्नी' हे पात्र बाहेर पडले.

'झेर्नी' म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून खुद्द लोथर डी मेझिए होते, असे छातीठोकपणे सांगण्याएवढा पुरावा जर्मनीचे गृहमंत्री वूल्फगँग शॉबल ह्यांच्याकडे सादर होताच आग्यामोहळ उठावे तसे डी मेझिए ह्यांच्या भोवती आरोपांचे मोहळ उठू लागले. पूर्वायुष्यात वेगळ्या नावाने वावरून क्रान्तिकार्यात भाग घेणारी मंडळी सर्वत्र आहेत. इस्राएलचे पंतप्रधान यित्झॅक शमीर हे इस्राएलच्या निर्मितीपूर्वी यहुदी क्रांतिकारी संघटनेत खास कामगिरी करत असत नि राबी (यहुदी धर्मगुरू) येर्तिन्स्की ह्या बनावट नावाने वावरत होते. पण लोथर डी मेझिए ह्यांची बाब वेगळी पडली. 'मिस्टर झेर्नी' या नावाने त्यांचा संबंध ज्या संघटनेशी जोडला गेला आहे, तिचे नाव उच्चारताच पूर्वी पूर्व जर्मनीतील सामान्य जनतेला कापरे भरत असे नि आज हे नाव ऐकताच तीव्र संताप ही एकच प्रतिक्रिया होते. ह्या संघटनेचे नाव 'स्तासी', – कम्युनिस्ट पूर्व जर्मनीतील पोलिस यंत्रणा! रशियन 'केजीबी'च्या धर्तीवर उभारलेली एक जबरदस्त संघटना.... जिच्याविरुद्ध सामान्य नागरिकाला ब्र काढण्याचीही टाप नव्हती आणि एकदा 'स्तासी' चे बोलावणे आल्यावर

आता आपली सुटका परमेश्वरही करू शकणार नाही, एवढी जबर दहशत जनतेच्या मनात निर्माण करणारी ही संघटना आणि तिचा इतिहास नव्या एकत्रित जर्मनीला डोकेदुखी ठरणार आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर 'नाझी' हुडकण्याचे काम करावे लागले होते. आता नव्या जर्मनीला माजी 'स्तासी' उघड करण्याचे काम करावे लागणार आहे. त्यातला पहिला मोहरा लोथर डी मेझिएसारखा तालेवार नेता निघाला!

बर्लिन शहराचा जो भाग पूर्वीच्या पूर्व बर्लिनमध्ये होता, त्या भागात नॉर्मनेनस्ट्रास हा उपविभाग आहे. तेथे मकान नं. १ अशी पाटी लावलेली एक इमारत आहे हेच 'स्तासी'चे मुख्यालय. 'स्तासी' ह्या शब्दाचे पूर्ण रूप म्हणजे 'ईस्ट जर्मन मिनिस्ट्री फॉर स्टेट सिक्युरिटी.' आज ह्या इमारतीत चक्क एक ऐतिहासिक प्रदर्शन भरले आहे. नोव्हेंबरपासून भरलेले प्रदर्शन आणखी सहा महिने तरी तेथेच ठिय्या देऊन राहील, असे दिसते. कारण एकत्रित नव्या जर्मनीतील पश्चिमवासियांनी पूर्व जर्मनीचे खरे रूप पारखून घ्यावे आणि विचार करावा, तसेच आता वास्तव अर्थाने मुक्त झालेल्या पूर्व जर्मनांनी त्यांना भरडून काढणाऱ्या ह्या यंत्रणेची पूर्ण माहिती करवून घ्यावी व हा इतिहास विसरू नये, हे दोन हेतू ह्या प्रदर्शनामागे आहेत. नागरिकांमधील एका घटकाचे म्हणणे असे आहे की, झाल्या गोष्टी आता विसरणे योग्य नि हे प्रदर्शन बंद करून तेथील सर्व साहित्य एखाद्या गोदामात ठेवून द्यावे. पण त्याविरुद्ध मत असलेल्या नागरिकांचे संख्याबळ अधिक आहे. 'गोदाम कशाला? खुले आम राहू दे हे प्रदर्शन! 'कम्युनिस्ट यंत्रणा कशी असते, ते शिकण्याचे ऐतिहासिक साधन म्हणून हे प्रदर्शन उपयोगी पडेल', असा या घटकाचा सूर आहे नि परिणामी हे प्रदर्शन चालूच आहे. लोक श्वास रोधून ते पाहायला येतात, डोळे विस्फारून ते पाहतात आणि भावनांचा कल्लोळ घेऊन परततात. कित्येक पूर्व जर्मन महिला हे प्रदर्शन पाहिल्यानंतर कमालीच्या अस्वस्थ झाल्या - आमच्या वडिलांचा, भावांचा, पतीचा काटा ह्याच मार्गाने तर काढला गेला नाही?' असे प्रश्न ह्या पीडित महिला विचारतात. त्यांना उत्तर नाही.

ह्या प्रदर्शनात वरकरणी साधे वाटणारे साहित्य आहे. कॅमेरा– फुलदाणीत लपविलेला! आणखी एक कॅमेरा.... ब्रीफकेसमध्ये अशा तऱ्हेने बसविलेला की, ती वापरणाऱ्याला संशयही येऊ नये... टेलिफोन 'बग' करण्याची असंख्य उपकरणे... अनेक प्रकारचे मायक्रोफोन्स... संशयही वाटणार नाही असे टेपरेकॉर्डर... ही साधने गेली ४० वर्षे पूर्व जर्मन नागरिकांवर अष्टौप्रहर पाळत ठेवण्यासाठी कम्युनिस्ट सरकारने वापरलेली ही उपकरणे पाहून संताप न झाला तरच नवल! 'स्तासी' ची रचना थेट रशियाच्या 'केजीबी'वर आधारलेली होती. रशियन गुप्त पोलिस यंत्रणेचा शिल्पकार आपणाला आठवत असेल. सामान्यातल्या सामान्य नागरिकाचे जीवनही पूर्णतः खासगी राहणार नाही, इतकी हेरगिरी करता येईल, अशी ही यंत्रणा रशियाच्या फेलीक्स डिझेर्झिन्स्की ह्या बुद्धिमंताने उभारली. साहजिकच 'स्तासी'ची उभारणीही रशियन यंत्रणेबरहुकूमच झाली.

ह्या मुख्यालयात रशियन गुप्त पोलिस यंत्रणेचा पिता डिझेर्झिन्स्की ह्याचा एक छोटा पुतळा आहे. 'स्तासी'च्या १५ व्या वर्धापनदिनानिमित्त 'केजीबी'ने दिलेले लेनिनच्या प्रतिकृतीचे पदकही तेथे आहे. जनतेचा अधिक रोष डिझेर्झिन्स्कीच्या पुतळ्यावर आहे. हा पुतळा एका लांब रुंद टेबलावर पूर्वी असे नि हे टेबल एरीक माइल्के ह्या व्यक्तीचे आहे. एकेकाळी एरीक माइल्केचा नामोल्लेख झाला की, पूर्व जर्मन नागरिकांची दातखिळी बसे. आज मृतवत् झालेले 'स्तासी'चे क्रूर साम्राज्य सतत ३२ वर्षे ह्याच एरीक माइल्केने चालविले. 'स्तासी'चा हा प्रमुख आज बर्लिनमधील कारागृहात बंदी होऊन बसला आहे नि कोठच्याही क्षणी त्याच्यावरील खटल्यास आरंभ होईल. पूर्व जर्मनीचे सत्ताभ्रष्ट चॅन्सलर एरीक हॉनेकर 'गंभीर' रुग्ण म्हणून बीलित्झ येथील रशियन हॉस्पिटलमध्ये आसरा घेऊन बसले आहेत आणि हॉनेकरना आमच्या ताब्यात द्यावे, अशी मागणी अखंड जर्मनीने सातत्याने चालविली आहे. ती मागणी पूर्ण झाली तर 'स्तासी'च्या इतिहासातील अनेक कच्चे दुवे सापडतील आणि माइल्के-हॉनेकर आणि कंपनीला मग न्यायासनासमोर देशद्रोही म्हणून यावेच लागेल.

हॉनेकरने माइल्केला 'स्तासी' म्हणजे जणू चराऊ कुरणच दिले म्हणाना! 'स्तासी'मध्ये ८५००० माणसे प्रत्यक्ष काम करीत होती. तर बाहेरून १,०९००० माणसे केवळ 'खबरे' म्हणून नेमली होती. लोथर डी मेझिए तथा 'झेर्नी' हे असेच 'खबरे' होते, असा आरोप आहे. 'स्तासी'चे हे जाळे संपूर्ण पूर्व जर्ननीत समाजाच्या सर्व थरांत पसरून प्रत्येक नागरिकावर टेहळणी करीत होते. साधे टेलिफोनचे संभाषणही खासगी राहिले नव्हते. महत्त्वाच्या अगर संशयास पात्र झालेल्या व्यक्तींच्या शय्यागृहातदेखील 'स्तासी'च्या उपकरणांचा गुप्तपणे शिरकाव झाला होता. जॉर्ज ऑर्वेलच्या 'बिग ब्रदर'ची आठवण करून देणारी ही यंत्रणा अस्तित्वात असल्याची माहिती नागरिकांना चांगली होती आणि त्याबाबतच्या संतापाला गत वर्षी बर्लिन भिंत ओलांडताच पूर्व जर्मनांनी वाट करून दिली. पूर्व जर्मनीच्या विलीनीकरणासाठी प्रतिक्रांती करणाऱ्यांमधून काही धाडसी युवकांनी मग फाऊंडेशन ऑफ अँटीस्टॅलिनिस्ट ॲक्शन ऑफ नॉर्मनिनस्ट्रॉस ही संस्था स्थापली. प्रस्तुत प्रदर्शन ही ह्याच संघटनेची कामगिरी होय! 'स्तासी'च्या संबंधित मंडळींना हुडकण्याच्या कामी ही संघटना नव्या जर्मन सरकारला सहाय्य करीत आहे. 'स्तासी'च्या अत्याचारांस बळी पडलेल्या नागरिकांस हीच संघटना सहकार्य देत आहे. त्यातील कित्येकांना मानसोपचारांची गरज असल्याचे स्पष्ट झाले आहे.

'स्तासी'च्या फायलींवरची धूळ झटकायला सुरुवात झाली मात्र. जर्मनीच्या 'देर स्पायगेल' ह्या मातबर वृत्तपत्राला 'झेर्नी'चा सुगावा लागला नि लोथर डी मेझिए ह्यांच्या रोखाने तपास गेला. पूर्व जर्मनीच्या प्रॉटेस्टंट चर्चमधील हालचाली डी मेझिए 'स्तासी'ला कळवत होते, असा आरोप करताच मेझिए ह्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. भूतपूर्व

चॅन्सलर विली ब्रँड ह्यांच्या मते 'स्तासी'च्या वरिष्ठांवर खटले भरले जावेत. मात्र कनिष्ठपदी राबलेल्या हजारो मंडळींना क्षमा करावी. ब्रँड ह्यांचे म्हणणे असे की, ही कनिष्ठ मंडळी हतबल होती व जीवाच्या भीतीनेच 'स्तासी' साठी काम करीत होती. एकंदरीत 'स्तासी' हे प्रकरण वादळी ठरणार ह्यात शंका नाही. वरवरच्या फायलींवरील धूळ उडवताच एवढे मोहोळ उठले नि त्यात डी मेझिए ह्यांच्यासारखा सहृदय मोहरा पडला...? पूर्वायुष्य साथ सोडत नसते....!

२४/१२/९०

❋❋❋

९

※

# आता पाळी इर्शादची

'एक दफा, एक दाबी, इर्शाद, तू कोबे जाबी?' - ही घोषणा बरोबर तीन वर्षांपूर्वी म्हणजे १९८७ च्या नोव्हेंबर महिन्यात बांगलादेशाच्या आसमंतात घुमली होती. ह्या वंग घोषणेचा हिंदी अनुवाद असा जवळपास करता येईल - 'एक कलम, एकही माँग, इर्शाद तू कब जायेगा?' बांगलादेश म्हणजे भूगोलाच्या दृष्टीने दलदल, चिखल, पूर, अतिवृष्टी, नद्यांचे जाळे असल्याने अधिकच पूर, चक्रीवादळे आणि झंझावात असे अनंत उत्पात! त्यांच्या जोडीला पराकोटीचे दारिद्र्य, डासांची पलटणच असल्याने मलेरिया, फायलेरिया आहेतच. पण बरोबर एन्सेफॅलायटिस, काला आझार, टायफस, टायफॉइड, कॉलरा ह्या पीडा सतत चालूच! ताग व तज्जन्य उद्योगांमुळे क्षयरोगही जोरात! अधूनमधून भूकबळीही पडतातच. पण ही नैसर्गिक वादळे आणि तत्कालीन राजकीय झंझावात १९८७ साली इर्शादला सत्ताभ्रष्ट करण्यास पुरेसे ठरले नाहीत. कदाचित वेळ आली नसावी. भ्रष्ट आणि निष्क्रिय, उद्दाम आणि हिंसक, अत्याचारी आणि मातलेल्या सत्ताधीशांना उलथविण्याची लाट १९८९ मध्ये आली आणि १९९० संपेतो सुमारे १५ महिन्यांत एकामागोमाग एक धडाधड अनेक मोहरे कोसळले. 'आता तुझी पाळी' असे जणू म्हणत ही प्रचंड लाट बांगलादेशात गेली. तेथे जनक्षोभ आधीपासून होताच आणि इर्शादच्या पायाखाली जमीन कधी नव्हतीच तर ती घसरण्याचा प्रश्न येतोच कोठे? तो दलदलीवरच उभा होता नि आता त्या दलदलीतच तो सहकुटुंब फसला. 'सेना भवन' हे बांगलादेशच्या राष्ट्राध्यक्षांचे अधिकृत

निवासस्थान. तेथे आधी इर्शाद कुटुंब नजरकैदेत राहिले आणि परवा अज्ञात स्थळी कडेकोट बंदोबस्तात रवाना झाले. आता येत्या २ जानेवारी रोजी बांगलादेशमध्ये निवडणूक होणार आहे. 'आपण निश्चित निवडणूक लढविणार', अशा वल्गना करणाऱ्या इर्शादला ह्या निवडणुकीत बहुधा साधे मतही देता येणार नाही. त्यांचा, त्यांची पत्नी रोशन हिचा व त्यांच्या 'रहस्यमय' पुत्राचा राजनैतिक पासपोर्टही आता त्यांच्या हाती राहिलेला नाही. नागरिकत्वाचे त्यांचे सगळे अधिकार छिनावले जाण्याची आणि कोर्ट मार्शलला तोंड द्यावे लागण्याची, क्वचित जनशत्रू व देशद्रोही म्हणून मृत्युदंड दिला जाण्याचीही इर्शादच्या बाबतीत शक्यता आहे. थोडक्यात इर्शादचे आता काहीही होईल.

योगायोग असा की, काल दिनांक १६ डिसेंबर १९९० रोजी बांगलादेशाच्या निर्मितीला १९ वर्षे पूर्ण झाली. १६ डिसेंबर १९७१ रोजी बांगलादेश पाकिस्तानच्या जोखडातून मुक्त झाले आणि आज १९ वर्षांनंतर तेथे लोकशाहीची नव्याने स्थापना होण्याची वेळ येत आहे. आज बांगलादेशच्या अशक्त लोकशाहीची सगळी मदार शेख हसीना वाजेद आणि बेगम खलिदा झिया ह्या दोन महिलांवर आहे. इर्शादला पदभ्रष्ट करण्याकामी ह्या बंगालच्या बेगमांची कामगिरी मोठी आहे. ह्या दोघींनीही आयुष्याची होरपळ अनुभवली आहे. शेख हसीना वाजेद वंगबंधू मुजीबुर्र रहमान ह्यांची कन्या. वय वर्षे ४३. पित्यासह आपल्या माहेरच्या कुटुंबियांची निर्घृणरीत्या झालेली हत्या शेख हसीनाला राजकारणात ओढायला कारणीभूत झाली. बेगम खलिदा झिया ही बांगला देशाचे दुसरे राष्ट्राध्यक्ष जनरल झिया उर्र रहमान ह्यांची विधवा पत्नी. जनरल झिया उर्र रहमान ह्यांचा खून करून लष्करी क्रांती घडविण्यात आल्याचा बांगलादेशचा इतिहास ताजा. म्हणजे १९८२ मधला आहे. तेव्हापासून आज अखेरपर्यंत बेगम खलिदा झिया आक्रोश करीत राहिल्या की, त्यांच्या पतीचा खून करणारे राजरोसपणे सत्तेवर आलेत नि त्यांना शासन झाले पाहिजे. शेवटी गेल्या आठवड्यात बेगम खलिदाच्या तोंडून आठ वर्षांनी प्रथम आरोपीचे नाव बाहेर पडले - 'लेफ्टनंट जनरल हुसेन महंमद इर्शाद ह्यानेच हा खुनाचा कट केला.' आजमितीला परिस्थिती अशी आहे की, शेख हसीना आणि बेगम खलिदा ह्या दोघींपैकी एक लवकरच बांगलादेशची सत्तासूत्रे हाती घेईल. कोणीही जरी सत्तेवर आली तरीही इर्शादला केल्या कृत्यांची फळे भोगावी लागणार हे उघडच आहे.

१९८७ मध्ये प्रथम जेव्हा इर्शादच्या विरोधात बांगलादेशात घोषणा उठली तेव्हा जनमताच्या संतापात एका स्त्रीने तेल ओतण्याची कामगिरी केली होती. एकूणच ह्या बंगालच्या बेगमा धाडसीच! ह्या स्त्रीचे नाव मरियम मुमताज. १९८७ मध्येच 'परिक्रमा'तून 'दास्तान-ए-मरियम मुमताज' ह्या शीर्षकाखाली ह्या स्त्रीची गाथा वाचकांपुढे सादर केली होती.जनरल इर्शाद ह्यांनी बेगम मरियमला तिच्या पतीपासून कसे दूर ठेवले आणि तिच्याशी गुप्त निकाह कसा लावला, हे मरियम मुमताजने जगाला अनेक वेळा ओरडून

सांगितले. इर्शाद व त्यांची पत्नी बेगम रोशन ह्यांच्या विवाहाला रौप्यमहोत्सव होऊनही बेगम रोशनची कूस उजवली नव्हती. इर्शाद व मरियम मुमताज ह्यांच्या संदर्भातील काही वावड्या बेगम रोशनला कळल्यावर तिने भारताची वारी केली. गरोदर असल्याचा बहाणा केला आणि भारतात बाळंतपण पार पाडण्याचे नाटक केले प्रत्यक्षात ३ लक्ष रुपये देऊन भारतातून एक तान्हा मुलगा दत्तक घेऊन आपण खरेच आई बनल्याचे नाटक केले, असा मरियम मुमताज हिने उघड आरोप इर्शादवर केला होता. अशा आरोप-प्रत्यारोपामुळेच इर्शादच्या मुलाचा उल्लेख 'रहस्यमय पुत्र' असा करणे इष्ट. बेगम मरियमला इर्शादने अमेरिकेत ठेवले होते आणि तिच्यावर वर्षाकाठी लक्षावधी डॉलर्स खर्ची पडत होते. मरियमच्या मते आपले तोंड गप्प ठेवण्यासाठी इर्शाद ही किंमत मोजत होते. हे गौडबंगाल हळूहळू बाहेर पडेलच. पण मरियम मुमताजपेक्षाही बांगलादेशच्या जनतेला इर्शादची एकाधिकारशाही, तानाशाही-बाणाशाही, जुलूम, भ्रष्टाचार, रक्तपात, इर्शादने परदेशांत केलेली २० कोटी डॉलर्सची दौलत ह्या बाबी असह्य झाल्या आणि दि. १० ऑक्टोबर १९९० रोजी सर्व शक्तीनिशी बांगलादेशी जनता रस्त्यावर आली. एरवी हसीना आणि खलिदा ह्या परस्परांच्या विरोधात असतात. पण इर्शादच्या विरोधात ह्या दोघींनी एकत्र आल्यास आंदोलन अधिक प्रभावी होईल, असे बांगलादेशच्या अनेक बुद्धिमंतांनी, विचारवंतांनी आणि ज्येष्ठ कलावंतांनी सुचवून पाहिले. परिणामी आपल्या आवामी लीगसह हसीना आणि बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीसह खलिदा ह्या दोघींची युती झाली. त्यामुळे २२ राजकीय पक्ष एकत्र आले आणि इर्शादविरोधी आंदोलनाला धार चढली. सर्वांत प्रथम संप आणि हरताळ ही अस्त्रे उपसली गेली. त्यावर उतारा म्हणून इर्शादने आणीबाणी घोषित केली, पण तो उपाय व्यर्थ ठरला. डॉक्टर्स, वकील, मुलकी अधिकारी, खलाशी, पत्रकार सर्वच घटक इर्शादच्या विरोधात उभे राहिले. टी. व्ही. वरील कलावंत आणि पत्रकारांनी कामावर बहिष्कार टाकला. माध्यमेच बंद पडली. दुकानेही बंद राहिली. संचारबंदीचा आदेश मोडून नागरिक रस्त्यावर उतरले. इर्शादच्या सैनिकांशी चकमकी उडू लागल्या आणि किमान ५० माणसे ठार झाली. वातावरण अधिकच तापू लागले. इर्शादने नेहमीसारखे साम, दाम, दंड, भेदादी उपाय सफल होत नाहीत हे पाहून मग आणखी एक गाजर पुढे केले. आपण आता आणीबाणी उठवीत असून जून १९९१ मध्ये खुली निवडणूक घेऊ आणि ह्या निवडणुकीपूर्वी ४५ दिवस आपल्या पदाचा राजीनामा देऊ. तसेच ह्या निवडणुकीस निरीक्षक म्हणून अमेरिकेचे भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर ह्यांना आमंत्रित करू, अशा आश्वासनाचे हे गाजर होते. पण लोकशाहीसाठी भुकेल्या झालेल्या बांगलादेशी जनतेने ते गाजर मोडूनच फस्त केले. इर्शादची ही घोषणा होताच १ लक्ष नागरिक ढाक्यात मोर्चा काढू लागले आणि ३०० प्रमुख सरकारी अधिकाऱ्यांनी चक्क राजीनामे दिले.

न्यायमूर्ती शहाबुद्दीन अहमद ह्यांच्या काळजीवाहू सरकारकडे सूत्रे देण्याखेरीज

इर्शादला मार्ग राहिला नाही. त्यातच अमेरिकन सिनेट आणि जपानकडून आलेले निरोप अत्यंत महत्त्वाचे होते. इर्शाद आपली लोकशाहीविषयक कर्तव्ये बजावीत असल्याची खात्री करूनच इतःपर बांगलादेशला मदत द्यावी, हा अमेरिकन सिनेटचा ठराव अतिशय बोलका ठरला. भारतात अयोध्येचे प्रकरण पराकोटीला जाताच इर्शादने बांगलादेशातील हिंदू मंदिरांवर चालून जाणाऱ्या मंडळींना मदतच केली आणि शिरजोरी अशी की, बांगलादेशात अस्थिरता व्हावी म्हणून भारत प्रयत्नशील असल्याचा आरोप दि. ३ डिसेंबरच्या भाषणामध्ये करून पाहिला. हे सर्व पद टिकवून धरण्यासाठी केलेले खटाटोप होते. 'परकीय शक्ती'चा आरोप केला की स्वकीय चूप राहतात, ही खात्री येथे कामी आली नाही. कधी कसलीही सूचना न करणारे जपान – जपानकडून बांगलादेशला सातत्याने तांदूळ खरीदावा लागतो. त्या जपाननेही बांगलादेशातील 'लोकशाही स्थिर होणे आवश्यक आहे', असे प्रतिपादले. इराक-कुवेत संघर्षामुळे बांगलादेशलाही जबर फटका बसला आहे. आखातातील बांगलादेशी मजूर बेकार झाला आहे. निर्यात घटली आहे नि तेलाच्या किंमती ५० टक्क्यांनी तर तांदळाची किंमत गेल्या ३ वर्षांत दुपटीने वाढली आहे. दरडोई उत्पन्नात जागतिक आलेखात बंगलादेश एकदम तळाशी राहिला आहे. आणि इर्शाद ...?

इर्शादची शान-ए-शौकत चालूच राहिली होती. बांगलादेशात होणारी सागरी आयात, लष्करी दूरसंचार साधने, रस्तेबांधणी, विमानतळ, नैसर्गिक वायू व रासायनिक प्रकल्प ही सगळी इर्शाद व बेगम रोशन ह्यांची अवैध संपत्ती मिळवण्याची साधने बनली होती. ह्या प्रत्येक क्षेत्रातील कामात इर्शाद व रोशनचा हिस्सा असे. इर्शादच्या मंत्रिमंडळातील मौदुद अहमद, महमद-उल-हसन हे सदस्य मंत्रिपदापर्यंत कसे पोचले, त्याच्या सुरस कथा आहेत. बेगम रोशनची बहीण मोमोता वहाब व भाऊ ह्यांना पात्रता नसताना उच्चे पदे मिळाली. ही सर्व प्रकरणे इतके दिवस खासगीत चर्चिली जात. आता कदाचित ती न्यायालयापुढे येतील. उतलेला, मातलेला आणखी एक हुकूमशहा (कवीही होता म्हणे) जनक्षोभाने सत्तेवरून खाली खेचला. हा लोकशाहीचा विजय!

१७/१२/९०

❋❋❋

# १०

※

# नसलेल्या स्मारकाचा शोध

कोठल्याही व्यक्तीच्या आयुष्यात वनवास, अज्ञातवास, विजनवास येणे म्हणजे केवढा दाहक अनुभव! मग तो नेपोलियन असो अगर चार्ल्स द गॉल असो वा लेनिन असो. आयुष्यातील स्वीकृत कार्यापायी अपरिहार्य ठरलेले हे चटके त्यांच्या वाट्याला आले पण एखाद्याने उघड्या डोळ्यांनी, जाणून बुजून असा विजनवास पत्करला तर त्याला काय म्हणावे? डॉ. अल्बर्ट श्वाइत्झर हे ह्या कोटीतले होते. अन् असा विजनवास पत्करणारी व्यक्ती जर स्त्री असेल तर तिला मूर्खातच काढले जाईल. ग्लॅडीस आइलवॉर्ड ही अशीच आपल्या लेखी 'मूर्ख' ठरणारी स्त्री आहे. होती म्हणणे योग्य ठरेल कारण ती आज हयात नाही. पण तिचा उल्लेख करण्यास कारण ठरली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश ह्यांची चीन यात्रा. बुश ह्यांनी चीनला दिलेल्या धावत्या भेटीत बुश-डेंग बैठक, बुश-ली पेंग बैठक ह्यांना प्रसिद्धी मिळाली. इतकेच काय पण चिनी सत्ताधीशांच्या मनात नसूनही चीनमधील मानवी हक्कविषयक कार्यकर्ते व असंतुष्ट जनतेचे प्रतिनिधी फँग लिझी ह्यांना बुश ह्यांनी परस्परच कसे मेजवानीस बोलावून ठेवले नि मग चिनी सरकारची कशी पंचाईत झाली आणि फँग लिझीला तातडीने पोलिसांनी अटक कशी केली ह्या अप्रिय घटनेलाही जगभर प्रसिद्धी मिळाली. बुश ह्यांच्या बरोबरच्या पत्रकारांच्या ताफ्यात एक इंग्रज वार्ताहर होता नि ह्या पत्रकाराने चिनी अधिकाऱ्यांना इतर कोठलेही प्रश्न न विचारता मनाच्या कोपऱ्यात कित्येक वर्षे जपलेला प्रश्न टाकला — 'चीनमध्ये ग्लॅडीस आइलवॉर्ड आणि पर्ल बक ह्यांची

काही स्मारके आहेत का?' उत्तर नकारार्थी होतं.

कोठलाही भारतीय कधी चीनला गेलाच तर आधी डॉ. द्वारकानाथ कोटणिसांच्या स्मारकाची चौकशी करतो तशी पाश्चात्त्य माणूस ग्लॅडीस व पर्ल बकची चौकशी करतो. अमेरिकन लेखिका पर्ल बक व तिचे चीनवरील प्रेम सर्वांनाच 'गुड अर्थ' द्वारे ठाऊक झाले. पण ग्लॅडीसचे काय? ग्लॅडीस डॉ. कोटणिसांच्या किती तरी आधी चीनला गेली होती. डॉ. सॉमरसेट मॉम ह्यांच्या 'पेंटेड वेल' मधील कॉन्व्हेंटमधील एक ख्रिस्तसेविका ह्याच ग्लॅडीसच्या जीवनावरून रंगविल्याचे म्हटले जाते. कोण होती ही ग्लॅडीस?

१९०२ मध्ये उत्तर लंडनमध्ये जन्मलेल्या ग्लॅडीसला लहान वयातच मिशनरी जीवनाची ओढ लागली होती. पूर्वसंकेत असावा त्याप्रमाणे चीन ह्या देशाकडे मन खेचले जात होते. त्या ओढीपायी वयाच्या २६ व्या वर्षी ग्लॅडीसने इंग्लंडमधील चायना इनलंड मिशनकडे नाव नोंदवले व ती प्रशिक्षण घ्यायला लागली. पण 'डफ्फर' हेच विशेषण तिला लावून तिने मोलकरणीचा पेशा धरणे कसे इष्ट आहे, असे ह्या मिशनने तिला सांगितले. मिशनरी म्हणून आपल्याला चीनला जाणे शक्य नाही हे कळल्यावर आपण स्वतःच्या हिंमतीवर तेथे जायचे असे ठरवून ग्लॅडीस खरोखरच मोलकरणीची नोकरी शोधू लागली. योगायोग असा घडला की, सर फ्रॅन्सिस म्हणजे थोर पर्यटक... १९ व्या शतकात तिबेटची यात्रा करणारे संशोधक, लेखक, त्यांच्याकडे तिला काम मिळाले. १९३० च्या सुमारास इंग्लंडमध्ये सोय होती ती अशी की, पर्यटकास हप्त्या-हप्त्याने आपली तिकिटे खरीदता येत. सर फ्रॅन्सिसने दिलेल्या पहिल्या पगारातून ग्लॅडीसने आधी ट्रान्स-सैबेरियन रेल्वेच्या लंडन ऑफिसकडे जाऊन चीनच्या प्रवासासाठी पहिला हप्ता भरला. १८ ऑक्टोबर १९३० रोजी अखेरचा हप्ता भरून ग्लॅडीस चीनला जाण्यासाठी सर फ्रॅन्सिसचे शिफारसपत्र घेऊन सज्ज झाली. द हेग येथे ग्लॅडीस गाडीत चढली. युरोपखंड उभे-आडवे विंचरीत ट्रान्स-सैबेरियन ही गाडी दहा दिवसांचा प्रवास करीत असे. ग्लॅडीसची गाडी सैबेरियात शिरली आणि ग्लॅडीसला जाणवलं – 'प्रत्येक स्टेशनवर सैनिकच चढत होते,' मांचुरियाच्या सीमेवर गाडी एकाएकी थांबली नि घोषणा झाली – 'चीन आणि रशिया ह्यांच्यात युद्ध सुरू झाल्याने गाडी पुढे जाणार नाही.' ग्लॅडीस खाली उतरली नि बेधडक बर्फाळ प्रदेशातून, धोकादायक वाटचाल करीत पायी 'चिटा' ह्या ठिकाणी पोचली नि तेथून व्लाडीवोस्टॉकला जाणाऱ्या गाडीत चढली. ग्लॅडीसच्या नशिबात सुलभ व सरळ प्रवास नव्हताच. ह्याच गाडीत ग्लॅडीसला रशियन गुप्त पोलिसांनी अटक केली. तथापि एक पूर्वपरिचित रशियन आणि सर फ्रॅन्सिसचे पत्र ह्याच्यामुळे आलेली बला टळली नि ह्या पूर्वपरिचिताने तिला गुप्तपणे एका जपानी नौकेवर चढविले. चीनऐवजी ग्लॅडीस जपानला पोचली. कोबे (जपान) मधील ब्रिटिश मिशनरी मंडळींनी मग तिची चीनला जाण्याची तजवीज केली. अवघे सहा शिलिंग पर्स-मध्ये शिल्लक राहिलेले अशा स्थितीत जपान ते तिएनत्सिन, पेकिंग, युत्सा, त्सेचाऊ,

यँग-चेन असा गिरीचा प्रवास, गाडी, बस, पाय व खेचर अशी विविध साधने वापरीत ग्लॅडीसने पूर्ण केला नि यँग-चेनच्या मिसेस लॉसन हिच्या मिशनमध्ये पोचली. यँग-चेनचे वास्तव्य कसोटी पाहणारे होते. स्थानिक चिनी जनता तिच्यावर चिखलाचे बोळे भिरकावीत होती. ह्या अपमानाने ग्लॅडीस खिन्न होई पण निराश मात्र झाली नाही. मिसेस लॉसन व ग्लॅडीस दोघींनी मिळून यँग-चेनमध्ये 'इन् ऑफ एट हॅपिनेस' हा पथिकाश्रम सुरू केला नि त्याच्याद्वारे स्थानिक जनतेचा विश्वास संपादन केला. ग्लॅडीस चक्क चिनी भाषा शिकली. पथिकाश्रमात येणाऱ्यांची देखभाल करण्याव्यतिरिक्त त्यांना ख्रिस्तकथाही ऐकवू लागली. मिशनचे बस्तान बसू लागले तेवढ्यात मिसेस लॉसनला अपघात होऊन त्यात तिचे निधन झाले आणि एकट्या ग्लॅडीसवर पूर्ण निर्धन अवस्थेत पथिकाश्रम व मिशन चालविण्याची जबाबदारी पडली.

एक काळ असा होता की, चिनी स्त्रिया आपली पावले खुजी करण्यात भूषण मानीत नि त्यासाठी पाय बांधून ठेवीत. हे सौंदर्याचे लक्षण नसून अत्यंत धोकादायक आहे, हे जेव्हा उमगले तेव्हा चीनमध्ये बायकांनी पाय बांधू नयेत असा फतवा काढण्यात आला अन् विनोदाची गोष्ट म्हणजे स्त्रिया हा फतवा पाळतील हे पाहण्यासाठी एक महिला 'फूट इन्स्पेक्टर' नेमण्याची कार्यवाही झाली. ख्रिस्ताचा संदेश पोचविण्याची परवानगी मिळाली, एवढी सवलत घेऊन ग्लॅडीस आइलवॉर्ड 'फूट इन्स्पेक्टर' बनली. दऱ्याखोऱ्यातून वाट काढीत सामान्य गरीब जनतेच्या घरी पाय तपासण्याच्या निमित्ताने तिचा वावर सुरू झाला. पाय हे निमित्त तर ख्रिस्त हे ध्येय झाले. ग्लॅडीसचा प्रवास तिची निर्भय वृत्ती स्पष्ट करणारा होताच पण यँग-चेनमध्ये कारागृहातील गुन्हेगारांनी बास्तीलच्या धर्तीवर तुरुंग फोडून दंगल माजविल्यावर ग्लॅडीसने ह्या हिंसक जमावासमोर निःशस्त्र अवस्थेत जाऊन जी शांतता प्रस्थापित केली त्यात तिची खंबीर, बेडर वृत्ती दिसून आली. ग्लॅडीसचे आणखी एक कार्य चीनमध्ये महत्त्वाचे ठरले. ओला दुष्काळ अगर अवर्षण, भूकंपादी नैसर्गिक आपत्ती ओढवल्या की चीनमध्ये सर्रास मुलांची खरेदीविक्री होई. (कोरापुट-कलाहंडीची आठवण यावी.) यँग-चेनमध्ये ही प्रथा ग्लॅडीसने बंद पाडली. विकायला आणलेली मुले ग्लॅडीसने दत्तक घेऊन मिशनमध्ये ठेवली... मुलांमागून मुले आली. त्यांना अडाणी कसे ठेवणार? ग्लॅडीसने स्वतःच शाळा काढली. १९३६ मध्ये ग्लॅडीस आइलवॉर्ड पूर्णतः चिनी नागरिक बनली.

मिशन आता स्थिर होण्याची चिन्हे दिसत असताना मोठे संकट उभे ठाकले. जपानने चीनवर स्वारी केली. शॅन्सी प्रांत पडला-मांचुरिया हातून गेले... यँग-चेनवर बॉम्ब फेक झाली. त्यात ग्लॅडीसची 'इन ऑफ एट हॅपिनेस' उद्ध्वस्त झाली. जखमी अवस्थेत ग्लॅडीस मुलांना घेऊन बे चई चुआंगला पोचली तोच यँग-चेनवर जपानचा कब्जा झाला. ग्लॅडीसला एकदा तर जपान्यांनी बंदुकीच्या दस्त्याने जबर मारहाणही केली अन् तशाही

अवस्थेत बे चाई चुआंगला छोटे रुग्णालय उघडून ग्लॅडीस जखमींची शुश्रूषा करीत राहिली. येथेच चीनच्या नॅशनॅलिस्ट चळवळीतील एका अधिकाऱ्याशी ग्लॅडीसचा परिचय झाला. १९४० चा सुमार होता तो. त्या अधिकाऱ्याचे नाव होते कॅप्टन लिनन. ग्लॅडीस आणि लिनन एकमेकांकडे आकर्षित झाले. पण तो लढाईत व्यग्र नि ही सेवेत व्यग्र. लिननने लग्नाची मागणी घातली नि दोघांनीही यद्ध आटोपल्यावर स्थैर्य लाभल्यावर विवाह करण्याचे निश्चित केले.

छुप्या रीतीने बे चई चुआंगचे रुग्णालय चालविणे नि गुप्तपणे यँग-चेनच्या 'इन ऑफ एट हॅपिनेस'चेही काम पाहणे अशी दुहेरी कसरत ग्लॅडीस करू लागली. इन ऑफ एट हॅपिनेसमधील शंभर मुलांना तेथून हलविण्याचे काम अद्याप बाकी होते. तत्पूर्वी शंभर मुले सुरक्षितपणे स्थलांतरित केली होती. अन एकाएकी आदेश सुटला – 'ग्लॅडीस आईलवॉर्ड ही चिनी नागरिक असलेली इंग्रज मिशनरी हेरगिरी करीत असून तिला पकडून देणारास जपानी लष्कराकडून मोठे इनाम मिळेल.' ग्लॅडीस हताश झाली नि बायबल घेऊन असेच विमनस्क स्थितीत हाती लागेल ते पान तिने उघडले- 'पळून जा! पर्वतराजीत पळून जा! बॅबिलॉनचा राजा तुझ्या जीवावर उठलाय– गुप्तपणे लपता येईल अशा स्थळी जा' असे वचन त्या पानावर होते. जणू आदेश मिळावा अशा विश्वासाने ग्लॅडीसने मुले जमवली नि सियान प्रांताच्या दिशेने कूच केले. १२ दिवस मुष्किलीने अर्धपोटी, अनवाणी प्रवास करीत १०० मुलांना बाळगीत ही आई पीत नदीच्या काठी पोचली. नौका नव्हत्या म्हणून तीन दिवस आणखी खोळंबा झाला. अखेर कशीबशी पैलतीरी पोचल्यावर ह्या १०१ जीवांनी मालगाडीतील कोळशावर बसून सियान प्रांत गाठला. तेथील सुरक्षित मिशन्समधून ग्लॅडीसने आधी ह्या १०० मुलांची सोय केली. अतिश्रम, उपासमार व चिंता ह्यांच्या ताणाने ग्लॅडीस जबर आजारी पडली. चिनी जनतेने तिची देखभाल केली. एक दिवस कॅप्टन लिनन तिला भेटायला आला. 'तू बरी झाल्यावर लग्नाचा विचार करायचा का?' असा प्रश्न त्याने टाकला पण तिचे उत्तर त्याला माहीत होते. दोघांची जीवितध्येये आता त्यांचे आयुष्य बांधून राहिली होती, लग्नाचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्यांना राहिलेच नव्हते. युद्धाने लिननला बांधले होते तर सेवेच्या व्रताने ग्लॅडीसला बांधले होते. मुले सुरक्षितपणे स्थिरावल्यावर ग्लॅडीसने सियान प्रांत सोडायचे ठरवले. युद्ध एव्हाना जपानच्या पराभवाने थांबले होते. आता ग्लॅडीस चीन-तिबेट सीमेवरील अमेरिकन मेथडिस्ट मिशनकडे वळली. दुर्गम पहाडी भागातील चिनी कुष्ठरोग्यांची सेवा करू लागली. पण जपान्यांच्या निर्घृण मारहाणीमुळे तिची तब्येत कायमची बिघडली होती. इंग्लंडला जाऊन शस्त्रक्रिया करून घेणे हाच त्यावरील मार्ग होता. लोकांनीच वर्गणी काढून ग्लॅडीसचे इंग्लंडच्या प्रवासाचे तिकीट काढले नि तब्बल २० वर्षांनी ग्लॅडीस आइलवॉर्ड परत मायदेशी आली. इंग्लंडमध्येच तिचे निधन झाले. आपण पुन: चीनला जाऊ शकणार नाही अशी तिची खात्री झाली होतीच. ग्लॅडीस

आइलवॉर्डचे स्मारक कोठेतरी चीनमध्ये असेल, अशी वेडी आशा त्या पत्रकाराने खरे म्हणजे का धरावी? १९५० ते १९८९ एवढ्या कालावधीत पुलाखालून केवढे पाणी वाहिले आहे!

६/३/९०

❋❋❋

# ११

# काला कलकत्तेवाला

१९८९ च्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात अमेरिकेत न्यूयॉर्कमध्ये विदेशस्थ भारतीयांची जागतिक स्तरावरील परिषद झाली. भारताचे अमेरिकेतील राजदूत डॉ. करणसिंग त्यास उपस्थित होतेच. शिवाय भारतातून त्याकरिता रेल्वेमंत्री माधवराव शिंदे (सिंदिया) गेले होते. मात्र ह्या परिषदेला 'जागतिक' हे विशेषण उचित ठरले नाही, कारण अमेरिका, कॅनडा आणि अल्प प्रमाणात इंग्लंड ह्या देशातील भारतीय वगळता पृथ्वीच्या पाठीवरील अन्य देशांतील भारतीय मंडळी लक्षणीय संख्येने तेथे उपस्थित राहिली नव्हती. ह्याच सुमाराला म्हणजे – नेमकं सांगायचं तर दि. २४ ऑगस्टला कलकत्ता नगरीचा ३०० वा वाढदिवस भारतात दणक्यात साजरा झाला. तर परदेशात स्थायिक झालेले अनेक बंगाली बांधव ह्या त्रिशताब्दीच्या निमित्ताने भारतभेटीस आल्याने न्यूयॉर्कच्या विदेशस्थ भारतीयांच्या परिषदेत बंगाली नागरिकांची उपस्थितीही तशी कमीच होती.

देशांतराचे भारतीयांना पूर्वी फारसे आकर्षण वाटले नाही. परदेशी जाणे म्हणजे पाप अशी भावना निर्माण होऊन अशा प्रवासाहून परतल्यावर प्रायश्चित्त घेण्याची रूढी ज्या समाजात आणि ज्या देशात जोपासली जाते त्याबाबत काय बोलावे! तेथे जगज्जेता होणार कसा? तेथे उलट आक्रमण करीत परदेशी वीर येत राहिले तर नवल कसले?

भारतीयांचे परदेशगमन अशा परिस्थितीत अर्वाचीन काळात खऱ्या अर्थाने सुरू झाले. युरोपीयनांचे भारतात आगमन झाल्यावर ब्रिटन, फ्रान्स, जर्मन, इटली, पोर्तुगल,

स्पेन येथील अनेक तरुण नशीब काढायला भारतात आले. त्यातले काही त्यांच्या मायदेशी उनाड म्हणून टीकेचा विषय झाले होते, काहीजण कसलेले युद्धनिपुण लढवय्ये होते. डी बॉइनसारखे शूर वीर महादजी शिंद्यासारख्या रत्नपारख्यांनी निवडून आपल्या पदरी नेमले नि त्यांनी पराक्रमही गाजविला. असे लढवय्ये भारतातून परदेशी गेल्याची उदाहरणे नाहीत... पण अगदीच निराशेचा सूर लावायचे कारण नाही. अपवादात्मक म्हणून का होईना, असा एक मस्त कलंदर भारतात निपजला आणि 'धैर्यधर' म्हणून हजारो योजने दूर देशी गाजला... इतकेच नव्हे तर सरळ त्या देशाच्या इतिहासात जाऊन बसला.

— ह्या कलंदराचे स्मरण कलकत्ता नगरीच्या त्रिशताब्दी निमित्ताने कलकत्त्यात झाले आणि विदेशस्थ भारतीयांच्या परिषदेच्या निमित्ताने दक्षिण अमेरिकेत ब्राझीलमध्ये झाले.

— कलकत्त्यात एक रस्ता आहे. त्याचं नाव आहे 'सुरेश बिश्वास रोड' आणि ब्राझीलच्या इतिहासात एक रोमहर्षक प्रकरण आहे. त्याचं नाव आहे 'कर्नल सुरेश बिश्वास.' युद्धनेतृत्वाबाबत परदेशाच्या इतिहासात मानाचे स्थान मिळवणारा हा अपवादात्मक भारतीय आणि त्याचे संपूर्ण जीवन खोटे वाटावे एवढे चमत्कारिक आहे नि नाटक अगर चित्रपट-कादंबरीद्वारे अमर करण्याच्या योग्यतेचे ठरावे एवढे खरे आहे. कर्नल सुरेश बिश्वास ह्या व्यक्तीमुळे ब्राझील सरकार १८९३ मधील यादवी युद्धात विजय मिळवू शकले, हा इतिहास आहे. 'डेस्परॅडो' ह्या विशेषणाचा धनी होण्यास हा कलंदर पूर्णत: योग्य ठरावा.

— बंगालच्या नदिया जिल्ह्यात नाथपूर ह्या खेड्यात इ. स. १८६१ मध्ये गिरीशचंद्र बिश्वास ह्या धनंतर 'भद्र' ग्रहस्थाच्या ह्या मुलाचा जन्म झाला. तो निर्भय होता, असे म्हणणे फुसके ठरेल. अगदी बालवयातच एकदा त्याने चुलीच्या जाळात हात घातला होता. भाजलादेखील पण रडारड नाही. वयाच्या ११व्या वर्षी त्याने चावा घ्यायला आलेल्या सापाचं डोकं धरूनच त्याला चेचलं होतं अन् उत्तरायुष्यात युरोपमध्ये केवळ फिशिंग रॉडचा वापर करून एका मस्तवाल डुकराला ठार करून लोकांना चकित केलं होतं. खानदानी बिश्वास घराण्याला शोभणार नाही एवढी हूड वागणूक नि सतत उनाडणे ह्यामुळे सुरेश बिश्वास नाथपूरच्या शाळेत ठरेना. शाळेत जायला बाहेर पडायचं नि भलतीकडे उनाडत राहायचे, हे नित्याचे झाले. वडिलांनी त्याला शिकवण्याचे सर्व तऱ्हेने प्रयत्न केले पण ते व्यर्थ ठरले. अनेक बहाणे करून शाळा बुडविणे हे रोजचेच झाल्यावर मिशनऱ्यांच्या कडक शिस्तीत तरी हे पोरगं सुधारेल, अशा विश्वासाने वडिलांनी कलकत्त्याच्या लंडन मिशन स्कूलमध्ये त्याला घातलं नि तेथील मिशनरींना हात जोडून विनवलं – 'हा पुढे सभ्य गृहस्थ होईल, एवढे तरी पाहा.' पण तेथेही तो मार्गावर आला नाही. महिन्याकाठी किमान वीस दिवस तो शाळेत गैरहजर राही. शाळेकडून वडिलांकडे तक्रारी जात राहिल्या. इथं

कलकत्त्यात ह्या गुणी मुलाने एक पाऊल पुढेच टाकलं. चक्क गोमांस खाल्लं नि तेही चुकून नव्हे. आवडीने नंतरही खात राहिला आणि शहाजोगपणे वडिलांना आपण काय खातो तेही सांगितलं. गिरीशचंद्र बिश्वास कर्मठ वैष्णव होते. मुलाच्या 'पापकृत्याने' त्यांना धक्का बसला नि त्यांनी सुरेशला घरात न घेता सर्व संबंध तोडून टाकला. 'इतःपर आम्हाला तू मेलास', असे जाहीर रीत्या सांगून टाकले. 'सुरेश गोमांस खातो,' 'सुरेशला घरातून हाकलले' ह्या वार्ता सर्व समाजभर पसरून सुरेशसाठी सर्वांची दारे बंद झाली. एकदोघांनी त्याच्या शुद्धीकरणाचाही विषय घेऊन पाहिला पण अवघ्या तेरा वर्षांचं हे पोरगं भलतंच अभिमानी निघालं. हिंदू समाजाने वाटा बंद केल्या म्हणून ह्याने ख्रिस्ती धर्म स्वीकारला आणि रंगूनची वाट धरली. ब्रह्मदेशात नोकरी मिळवायचा प्रयत्न केला पण ते जमले नाही तेव्हा पुनः कलकत्त्याला परतला. लंडन मिशन स्कूलच्या धर्मादाय जेवणावर त्याने काही दिवस काढले. अन् एक दिवस हुगळी नदीत आलेल्या एका ब्रिटिश जहाजाच्या कॅप्टनशी त्याची ओळख झाली. उत्कृष्ट इंग्रजी बोलणाऱ्या ह्या पोराबाबत कॅप्टनचे तसे बरे मत झाले. ह्या कॅप्टनपाशी सुरेशने काम मागितले. नौकेवरील स्टुअर्डचे काम कॅप्टनने त्याला देऊ केले. ते पत्करून पुनः हिंदुस्थानचे तोंडही पाहायचे नाही, असा निर्धार करून सोळा वर्षांचा सुरेश बिश्वास बोटीवर चढला आणि इंग्लंडला पोचला. तेथे त्याने बोटीवरची नोकरी सोडली आणि लंडनमध्ये अक्षरशः उपासमार काढू लागला. लंडनच्या कुप्रसिद्ध ईस्ट एंड भागातल्या गुन्हेगारांच्या टोळ्यांशीही त्याचा संबंध आला. वृत्तपत्रे विकणे, हमाली अशी कामे तो करू लागला. हमालीत तसा जमही बसला पण नको ती भानगड झाली. शेजाऱ्याच्या तरुण पत्नीच्या प्रेमात तो गुरफटला. काला आदमी गोऱ्या तरुणीला फूस लावतो म्हणून बदनाम झाला नि त्याला लंडन सोडावे लागले. इंग्लंडच्या अंतर्गत भागात एक सर्कस चालू होती. ह्या सर्कशीत तो कलावंत म्हणून भरती झाला नि येथे त्याच्या साहसाला वाव मिळाला. ह्या सर्कशीचे तो मुख्य आकर्षण बनला. तेव्हाचा प्रसिद्ध सर्कसपटू म्हणजे 'मिस्टर झँबक' हा प्राणी खेळवणारा, प्राण्यांना सर्कशीसाठी शिक्षण देणारा म्हणून ख्यातकीर्त होता. सुरेशचे साहस पाहून झँबकने त्याला आपल्या हाताखाली घेतले नि सुरेशने अशी काही संथा गिरवली की, १८८२ मधील लंडनच्या सर्कस महोत्सवात सर्वोत्कृष्ट प्राणिशिक्षक म्हणून त्याचा बोलबाला झाला. युरोपातील अनेक प्राणिसंग्रहालयांनी सुरेशला चांगली नोकरी देऊ केली पण नको ती भानगड झाली. सर्कशीतील एका सुंदर जर्मन मुलीशी सुरेशने विवाह ठरवला. पुनश्च हा काळा माणूस आपली गोरी मुलगी चोरणार, ह्या विचाराने त्या मुलीच्या नातेवाईकांनी सुरेशचा खून करण्याचा प्रयत्न केला. तो फसला पण सुरेशने ती सर्कस व त्या मुलीचा नाद आणि युरोप सोडून दिले व मुशाफिरी करीत आधी अमेरिका व तेथून ब्राझीलला पोचला. ब्राझीलची राजधानी रिओ डी जानीरोच्या रम्य दर्शनाने आता आपण येथे राहावे, असे ह्या तरुणाने ठरविले. त्याला आणखी एक कारण झाले. रिओ डी

जानीरोमधील एका डॉक्टरची कन्या त्याच्या प्रेमात पडली – त्याचे प्राण्यांवरील कसब व साहस पाहून. प्रेम म्हटले की, तो आता बिचकू लागला होता. ह्या ब्राझीलियन मुलीचं नाव होतं 'डेस्डीमोना' तर ह्या डेस्डीमोनाने त्याला सर्कशीतून दूर केलं नि ब्राझीलच्या लष्करात भरती व्हायला लावलं. सुरेश शिपाई गडी बनल्यावर सुरेश बिश्वास व डेस्डीमोना हा मजेदार विवाह पार पडला.

ब्राझीलच्या लष्करात ह्या काळ्या माणसाला बढती मिळेना. धोकादायक कामगिरीवर त्याला पाठविले जाई पण बढतीच्या मामल्यात त्याच्यावर अन्याय होई. पण १८९३ मध्ये संपूर्ण चित्रच बदलले. ब्राझीलमध्ये यादवी युद्धाचा वणवा पेटला. सुरेश रिपब्लिकन आर्मीत होता तर ब्राझीलचे नौदल त्यांच्या विरोधात होते. निदरॉय येथे कठिण परिस्थिती उद्‌भवली. नौदलाने रिओ डी जानीरोच्या उपनगरांवर जोरदार बॉंबफेक केली होतीच. निदरॉयवर सतत सहा तास नौदलाने मारा केला. निदरॉयमध्ये सुरेश बिश्वासची तुकडी आणि रिपब्लिकन अडकून पडले होते. सुटकेची आशा राहिली नाही. अशा कठिण प्रसंगी सुरेश बिश्वासने फक्त ५० सैनिकांना तयार केले नि माघार घेतल्याचे नाटक करीत मरायचं किंवा मारायचं ह्या निर्धारानेच हा धाडसी तरुण झुंजू लागला. निदरॉयची लढाई तुंबळ झाली. पण सुरेशच्या डावपेचांमुळे नौदलास माघार घ्यावी लागली. सुरेश बिश्वास तोवर 'काला कलकत्तेवाला' म्हणून उपेक्षिला जात होता. ह्या लढाईचा तो नायक बनला आणि फर्स्ट लेफ्टनंट झाला. ब्राझीलच्या लष्करात आधी घोडदळ व नंतर इन्फंट्री अशी आठ वर्षे काढलेला हा काळा शेवटी कर्नलच्या हुद्द्यावर पोचला. निदरॉयच्या युद्धामुळे तो ब्राझीलच्या इतिहासात मानकरी होऊन बसला.

१८९८ मध्ये ब्राझील सरकारनेच कर्नल सुरेश बिश्वासबाबतची सर्व वृत्तपत्रीय कात्रणे कलकत्त्याला पाठविली तेव्हा हिंदुस्थानात ह्या साहसवीराची कथा कळली. पण तो हिंदुस्थानात कधीच परतला नाही. शिपाईगड्याची जबाबदारी पेलताना तो आपला आपणच वैद्यकशास्त्राचाही अभ्यास करीत असे. भाषा शिकणे हे त्याचे व्यसन होते. इंग्रजीखेरीज सहा युरोपीयन भाषा तो अस्खलित बोलू शकत होता. दि. २२ सप्टेंबर १९०५ रोजी वयाच्या ४४व्या वर्षी कर्नल सुरेश बिश्वास ब्राझीलमध्येच मरण पावला. त्याच्या मागे पत्नी डेस्डीमोना, तीन मुलगे व एक कन्या एवढा परिवार होता अन् त्यातील कोणीही भारतात जाण्याची आवश्यकता नाही, असे सुरेशने सांगून ठेवले होते. त्याच्या मृत्यूची वार्ता मोजून ४४ महिन्यांनी कलकत्त्यात कळली. त्याच्यावर जो अन्याय घडला त्याचे परिमार्जन करण्याच्या हेतूने कलकत्त्याने त्याच्या नावे रस्ता ठेवला. पण....

– सुरेश बिश्वासवर कर्मठ समाजाने अन्याय केला नसता तर? ब्राझीलचा धैर्यधर काळा कलकत्तेवाला निपजला असता का?

११/९/८९

# १२

※

# शोकनायिका

शुक्रवार दि. १४ जुलै १९८९ म्हणजे अर्वाचीन जागतिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाच्या पर्वाची द्विशताब्दी. ही घटना म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीची नांदी. या क्रांतीला 'फ्रेंच' म्हणून भौगोलिक सीमा लावणे आणि बंदिस्त करणे खरे म्हणजे चुकीचे आहे, कारण ही क्रांती फ्रान्सपुरती राहिली नाही... युरोपपुरतीही राहिली नाही अगर राजकारणापुरतीही सीमित राहिली नाही. राजकीय, सामाजिक, औद्योगिक, आर्थिक, धार्मिक, नैतिक सर्वच क्षेत्रांत तिने हलकल्लोळ माजविला. ह्या क्रांतीपायी विषारी फळेही आली आणि चांगल्या बाबींची गोमटी फळेही मिळाली. राजमुकुट गडगडले आणि धर्मपीठही हादरलं... सरदार-उमरावांची मस्तके धडावेगळी झाली आणि निरपराधांच्या रक्ताचे पाटही वाहिले. पुढे कितीतरी वर्षे ही क्रांती खंडे ओलांडून इतर देशांना स्फूर्ती देत राहिली आणि जरब बसवीत गेली. श्रमिक-शेतकरी, मजूर हे घटक वेळीच ध्यानात घेतले नाहीत तर काय होऊ शकेल ह्याचा वस्तुपाठ ही क्रांती ठरली... भूक आणि दारिद्र्य ही भयानक शस्त्रे ठरू शकतात, हे ह्याच क्रांतीने प्रथम सिद्ध केले नि ह्याच सूत्रांना उचलून हिचाच कित्ता भविष्यात रशियाने, चीनने उचलला... हिच्याच मंथनामुळे मानवी हक्क ही कल्पना जन्माला आली. अमेरिकेची मानवी हक्क सनद, आजची ॲम्नेस्टी ह्याच क्रांतीचे परिपाक आहेत. स्वातंत्र्य-समता-बंधुत्व या त्रिसूत्रांची देणगी ह्याच क्रांतीची आणि युरोपीय साहित्याने जे उत्तमोत्तम वाङ्मयीन नजराणे जगाला दिले त्यामागेही प्रेरणा हिचीच! ह्या जगड्व्याळ क्रांतीतून

हिंसाचाराची भुतावळही उठली आणि ती शमताशमता जगाचा थरकाप उठविणारा चक्रवर्ती नेपोलियनही निघाला. त्यातून साम्राज्यवाद आणि वसाहतवादाला नवे वळण लागले. ह्या विषयावर आणखी किती तरी वर्षे लेखण्या झिजतील. आज ह्या क्रांतीच्या द्विशताब्दीच्या निमित्ताने त्यातल्या एका 'शाही बळी'चा विचार करू या!

'ह्या लोकांना पाव मिळत नाही तर मग ते केक का नाही खात?' असा प्रश्न विचारल्याबद्दल अजरामर झालेली ही शाही व्यक्ती म्हणजे राणी मारी अँटोनेट (मारिया आन्त्वाने) तिचे हे उद्‌गार फक्त तिच्या मागे उरले अन् त्यात तिच्यासंबंधीच्या बाकीच्या बाबी वाहून गेल्या. ह्या मूर्ख उद्‌गारांची धनीण वास्तवात एक दुर्दैवी स्त्री होती.

इ. स. १७६४ मधली एक सकाळ. ऑस्ट्रियाचे सम्राट फ्रान्सिस पहिले आणि सम्राज्ञी मारिया ट्रीझा ह्यांची जेमतेम ९ वर्षे वयाची मुलगी राजकन्या मारिया अँटोनेट न्याहारीसाठी दालनात आली. सम्राज्ञी मारिया ट्रीझा ही अत्यंत कडक शिस्तीची स्त्री होती. मुलांच्या उठण्या-बसण्यापासून त्यांच्या दिनक्रमाच्या आखणीपर्यंत सर्व बाबींवर तिची करडी नजर असे. न्याहारीपूर्वी सर्वांनी आई-वडिलांना अभिवादन करण्याचा शिरस्ता होता. तो पाळायला ही मुलगी समोर येताच सम्राज्ञी गंभीरपणे म्हणाली- 'मारी, तुझा विवाह ठरविण्यात आला आहे. फ्रान्सच्या युवराजाची तू पत्नी होणार आहेस. प्रत्यक्ष सोहळा तू पंधरा वर्षांची झाल्यावर होईल पण आजपासून तुला फ्रान्सच्या दरबारी रीतिरिवाजांची शिकवण दिली जाईल.' २ नोव्हेंबर १७५५ रोजी जन्मलेल्या ह्या मुलीला नवव्या वर्षी विवाह म्हणजे काय ते कसे कळावे? पण मारीला फ्रेंच भाषेचे, फ्रान्सच्या इतिहासाचे धडे सुरू झाले. भावंडांमधली ही नववी. उठताबसता भाऊही तिला जाणीव करून देऊ लागला की, तू ऑस्ट्रियाची नाहीस... तू फ्रान्ससाठी जन्मली आहेस. प्रत्यक्षात हा विवाह फ्रान्स आणि ऑस्ट्रिया ह्यांच्या राजकीय सोयीसाठी, करारासाठी होत होता. १७७० च्या मे महिन्यात बरोबर फक्त फ्रान्समधील ऑस्ट्रियाचा राजदूत काऊंट द मर्सी अर्जेन्वा आणि एक दासी देऊन मारीची फ्रान्सला पाठवणी झाली. विवाहात माहेरचे कोणी नव्हतेच. १५ वर्षांची ही वधू फ्रान्सच्या राजघराण्यात शिरली तेव्हापासूनच खुद्द राजघराण्यानेही तिला शत्रू मानले होते. पतीचे प्रेम मिळूनही मारी अँटोनेट एकाकी पडली. आधार फक्त काऊंट डी मर्सीचा होता. या मर्सीला मारीच्या आईने सांगून ठेवले होते की, त्याने मारीच्या सुरक्षिततेसाठी हमी घ्यावी व फ्रेंच राजकारणातील प्रत्येक हकीगत ऑस्ट्रियाला कळवावी. मारीचा विवाह ते तिचा मृत्यू ह्या काळातील सर्व घटना काऊंट डी मर्सीमुळेच नमूद झाल्या. ह्या राजदूताने पहिल्या दिवसापासून ऑस्ट्रियाला सम्राज्ञीकडे सर्व इत्थंभूत माहिती कळविण्यास, तीही गुप्तपणे, सुरुवात केली. हा गुप्त पत्रव्यवहार पुढे उघडकीस आला नि मारी अॅन्टोनेटच्या विरोधात आधीच जमलेल्या वादळात भर पडली. मादाम ड्यु बॅरीशी मारीने जमवून घ्यावे असे आईचे सारखे खलिते येत पण मारीला ते कधीच शक्य झाले

नाही. १५ व्या लुईच्या निधनानंतर मारी व तिचा पती १६ वा लुई सिंहासनावर आले खरे पण फ्रान्समधील ऑस्ट्रियाविरोधी गटाशी शत्रुत्व करून मारीने प्रथमग्रासे मक्षिकापात करवून घेतला. १६वा लुई मारीशी प्रेमाने वागे पण वैवाहिक संबंधाबाबत दुरावा राखी. परिणामी फ्रान्सच्या गादीला वारस देण्यासाठी मारीला सात वर्षे वाट पाहावी लागली. सदैव शत्रू म्हणून गणली गेलेली, एकाकी पडलेली, वैभवाची सवय रक्तात भिनलेली ही राणी मग मित्र-मैत्रिणींत रमू लागली. १७७८ मध्ये तिनं मुलीला जन्म दिला आणि १७८० मध्ये मारीची आई, ऑस्ट्रियाची सम्राज्ञी निधन पावली. मारीचा एक बळकट आधार तुटला. भाऊ जोसेफ दुसरा आता ऑस्ट्रियाच्या गादीवर आला होता. उधळपट्टी, मैत्रिणींवरील उपहारांची खैरात, ढवळाढवळ ह्याबाबत तो वेळोवेळी मारीला समज देई पण त्याचा फारसा उपयोग होत नसे. १७८१ मध्ये मारीने पुत्रास जन्म दिला. आता फ्रान्सला वारस मिळाला. ही त्यातल्या त्यात जमेची बाजू पण मारीची वाटचाल सर्वनाशाकडे होत होती. आणखी एक पुत्र (१७८५) व आणखी एक कन्या (१७८६) तिला झाली नि ह्याच १७८५-८६ च्या सुमारास कुप्रसिद्ध 'हिऱ्याच्या कंठ्या'चे प्रकरण उद्‌भवले. मारीची घरातील प्रतिष्ठाही नष्ट करण्याचा डाव यशस्वी झाला. राणीभोवती कुभांडे रचली जाऊ लागली. धाकटा दीर काऊंट द आर्त्वाज ह्याच्याशी तिचे नाव जोडायलाही दरबाऱ्यांनी कमी केले नाही.

इ.स. १७८९ उजाडले आणि मारीभोवतीची वादळे घोंघावू लागली. मार्चमध्ये भाऊ जोसफ मरण पावला तर जूनमध्ये तिचा थोरला मुलगा मरण पावला. भुकेल्या जनतेचे मोर्चे निघत होतेच आणि फ्रान्स पेटू लागला होता. १७ जूनला नॅशनल असेंब्ली उभी राहिली. श्रमिक वर्ग इरेला पेटला होता. त्याच वर्षाच्या १४ जुलैला संतप्त जनतेने बास्तीलचा तुरुंग फोडला. रक्तपाताला आरंभ झाला. २६ ऑगस्टला मानवी हक्कांचा जाहीरनामा फडकला आणि ५ ऑक्टोबरला फ्रान्सभर शेतकऱ्यांचा उठाव झाला. शेतकरी महिला व्हर्सायच्या राणीच्या प्रासादात घुसल्या. मारी अँटोनेटचे शिर हवे अश्या चेकाळून आरोळ्या मारू लागल्या. पावाच्या तुकड्यासाठी आकांत करणाऱ्या ह्या भुकेकंगालांविषयी 'ते केक का खात नाहीत' अशी विचारणा राणीने केल्याची वार्ता पसरली. (काही इतिहासकारांच्या मते राणीबाबत हा अपप्रचार मुद्दाम केला गेला.) लोकक्षोभाने कमाल पातळी गाठल्यावर अखेर शाही कुटुंबाला व्हर्साय सोडून पॅरिसच्या प्रासादात यावे लागले. येथून क्रांतिकारकांचा नेता मिराबू ह्याच्याशी राजाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. मिराबू ही व्यक्ती अशी होती की, त्याला राणीच्या ठाई अविश्वसनीय असा आदर होता. केवळ ह्या राणीच्याच प्रयत्नांमुळे फ्रान्समध्ये यादवी युद्ध होण्याचे संकट टळले आहे हे मिराबू जीव तोडून सांगत होता. पण राणीला मिराबूबाबत विश्वास वाटेना. ही क्रांती किती तीव्र आहे ह्याची कल्पना न आल्याने आणि वादळी परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याची दूरदृष्टी

नसल्याने मिराबूने सुचविलेला 'पॅरिस सोडून खेड्यातून जनतेला राजाने आवाहन करावे' हा पर्याय राणीने आणि निर्णय घेण्यास अपात्र ठरलेल्या, धीम्या वृत्तीच्या १६ व्या लुईनेही स्वीकारला नाही. १८ एप्रिल १७९१ रोजी मिराबू मरण पावला. मृत्युशय्येवरील त्याचे अखेरचे उद्गार होते- 'माझ्या देहाबरोबरच फ्रान्सच्या राजघराण्यातील उरलीसुरली लक्तरेही जाणार आहेत.' हे उद्गार खरे ठरले. प्रतिकूल परिस्थितीत काऊंट डी मर्सीलाही फ्रान्स सोडावे लागले. फ्रान्सच्या बाहेर राहून राणीसाठी मदत आणण्याची शिकस्त काऊंट मर्सी आणि काऊंट एक्सल डी फर्सेन ह्यांनी केली. त्यानुसार जून १७९१ मध्ये हे शाही कुटुंब गुप्तपणे पॅरिस सोडून निघाले पण क्रांतिकारकांच्या हाती सापडले. त्यांच्यावर थुंकत, त्यांना शिव्या घालीत ह्या कुटुंबाला २१ जून रोजी क्रांतिकारकांनी वरेनाज येथे बंदिस्त केले. एक वर्षभर राणीने काऊंट मर्सी आणि सम्राट लिओपोल्ड दुसरा ह्यांच्याशी गुप्तपणे पत्रव्यवहार ठेवला होता. मदतीचे प्रयत्न स्वीडन, ऑस्ट्रियाकडून होत होते पण त्यांना मर्यादा पडली. लिओपोल्ड दुसरा दुर्दैवाने मरण पावला. मारीला आता माहेरघराचीही खात्री राहिली नाही. ऑस्ट्रिया कदाचित युद्ध टाळायला आपला बळी देणार अशी खात्री होऊन चुकली नि एवढ्यात अघटित घडले.

— ब्रुन्सविकच्या ड्यूकने पॅरिसच्या जनतेस फर्मान पाठविले. — 'शाही कुटुंबाच्या केसालाही धक्का लागला तरी ऑस्ट्रिया व प्रशिया पॅरिसवर चाल करतील.' ह्या फर्मानाचा परिणाम उलटच झाला. रक्तपात चालू होताच. लोकांना आता राजाचे रक्त हवे होते. रॉब्सपीएर ह्या क्रांतिकारकांच्या नेत्याने मग १६ व्या लुईला सजा फर्मावली. आणि २१ जून १७९३ रोजी हा राजा धीरोदात्तपणे वधस्तंभाकडे गेला. त्यानंतरही राणी व तिच्या मुलांना वाचवायचे प्रयत्न झाले. पण मुले व आई ह्यांची ताटातूट केली गेली. मारीचे नष्टचर्य एवढ्यावर संपले नाही. तिच्यावर सार्वजनिक रीत्या खटला भरण्यात आला. लोकन्यायालयात तिच्यावर गलिच्छ आरोप करण्यात आले. मारीला ह्या क्षणी कोठून बळ आले कोण जाणे! पण ही बाई अत्यंत निर्भय बनली... कदाचित मृत्यू ही सुटका वाटली असावी. १४ ऑक्टोबर १७९३ रोजी राणी मारी अँटोनेटला गिलोटिनखाली ठेवले गेले. राणीच्या शिरच्छेदाबरोबर जनतेने आनंदोत्सव साजरा केला. अशा वेळी अंगात क्रांती भिनत नसते तर हिंसा थैमान घालीत असते, डोळ्यांत खून उतरत असतो. ज्या रॉब्सपीएरने राणीला व राजाला मृत्युदंड दिला त्या रॉब्सपीएरलाही गिलोटिनखालीच जावे लागले... वर्षभरातच! मारी अँटोनेटच्या दुर्दैवी जीवनगाथेत कोणाला स्मरणही राहिले नाही तिच्या गुणांचे... तिच्या अप्रतिम सौंदर्याचे... फ्रान्स यादवीच्या तडाख्यात सापडू नये म्हणून तिने घेतलेल्या श्रमांचे! एका मागोमाग एक बळी पडलेल्या तिच्या मुलांचे! एक संपूर्ण कुटुंब क्रांतिपर्वात होरपळून संपले नि तिच्या नावे इतिहासात नमूद झाले ते केक, हिऱ्याचा कंठा आणि ऑस्ट्रियाशी केलेला पत्रव्यवहार!

१०/७/८९

❋❋❋

३४२५
२६३५६
निबंध

१३

# कोलंबसचा मागोवा

आखाती युद्धांच्या स्फोटक वार्तांमध्ये एक मजेदार आणि त्यामुळेच काहीसा प्रसन्नतेचा शिडकावा करणारी बातमी विदेशी वृत्तपत्रांत वाचायला मिळाली. शीर्षक होते – 'आय सॉ थ्री शिप्स कम् सेलिंग बाय....' जुन्या, लोकप्रिय इंग्रजी गीताचा हा खरे तर मुखडा. 'ऑन न्यू इयर्स डे इन् द मॉर्निंग' ही त्याची पुढची ओळ. वार्ता माद्रीद (स्पेन) येथून आली होती. ह्या तीन जहाजांनी दि. ३ ऑगस्ट १९९० रोजी स्पेनमधून नांगर उचलून शिडे फडकावीत वाटचाल सुरू केली. (खरे तर समुद्रचाल). ह्या जहाजांची नावे आहेत. 'नीना', 'पिंटा' आणि 'सांता मारिया'. ही नावे ओळखीची वाटतात ना.? बायबलमधील सुप्रसिद्ध 'नोआह आर्क' नंतर प्रसिद्ध पावलेली ही तीन जहाजे! बरोबर ४९८ वर्षांपूर्वी ह्याच नावाची तीन जहाजे स्पेनच्या पालोज डी ला फ्रॉंटिरा ह्या बंदरातून शिडे फडकावीत निघाली होती. सुवर्णभूमी हिंदुस्थानच्या शोधात, तुर्कांनी कॉन्स्टँटिनोपल जिंकल्याने साऱ्या युरोपच्या तोंडची जणू चवच गेली होती. कारण हिंदुस्थानची मिरी-लवंग-दालचिनी-वेलची मिळेनाशी झाली. कॉन्स्टँटिनोपलमार्गे हिंदुस्थानचा रस्ता पूर्वापार मळलेला होता. तुर्कांनी ती वाट रोखली नि युरोपीयनांचे अन्न बेचव झाले. हिंदुस्थानी सुती आणि रेशमी किनखापी वस्त्रे न मिळाल्याने युरोपमध्ये चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली नि अखेर हिंदुस्थानचा नवा मार्ग शोधण्याचे आव्हान एका निधड्या छातीच्या, साहसी खलाशाने स्वीकारले. ख्रिस्टोफर कोलंबस ४९८ वर्षांपूर्वी ॲटलांटिक महासागरात 'सांता

मरीया' ह्या नौकेला हाकारून निघाला. पुढे सर्व घोटाळा झाला नि कोलंबस हिंदुस्थानऐवजी 'नवी दुनिया' अमेरिकेला पोचला हे सर्वज्ञातच आहे. कोलंबस अमेरिकेला पोहोचल्याच्या घटनेला इ.स. १९९२ मध्ये ५०० वर्षे पूर्ण होणार आहेत आणि ही पंचशताब्दी कोठल्याही विरोधाला न जुमानता स्पेनने साजरी करायचे ठरविले आहे. ह्या उत्सवाचा आरंभ ३ ऑगस्ट १९९० रोजी प्रस्तुत तीन नौकांची शिडे उभारून झालादेखील!

कोलंबसाच्या काफिल्यात 'नीना', 'पिंटा' आणि 'सांता मारिया' ही जहाजे होती. स्वत: कोलंबस 'सांता मारिया'चा कप्तान होता. ह्या नौकेवर ३८ खलाशी होते. तर 'नीना'वर २७ आणि 'पिंटा'वर २८ खलाशी होते. स्पेन सरकार व स्पॅनिश जनतेने विरोधकांच्या नाकावर टिच्चून ह्या पंचशताब्दीसाठी जय्यत तयारी केली. 'सांता मारिया', 'नीना' आणि 'पिंटा' ह्या जहाजांच्या हुबेहूब प्रतिकृती तयार करण्याचा ध्यास स्पॅनिश जनतेने घेतला. स्पेनचे प्रसिद्ध नौदल अभियंते कॅप्टन जोझ लुईस लोपेझ मार्टिनेझ ह्यांनी ह्या ऐतिहासिक नोकांचे संपूर्ण डिझाईन, आराखडे अभ्यासले. स्पेनच्या मदतीला इटलीही आली. कारण कोलंबसाबाबत इटलीही फार हळवी आहे. ११ मिलियन डॉलर्स ह्या समारंभासाठी देणगीरूपाने जमविण्यात आले. ह्या तीन प्रतिकृतींमध्ये कसलीही उणीव राहता कामा नये म्हणून स्पॅनिश नौदल अभियंत्यांचे एक पथक गेली ७ वर्षे कॅप्टन मार्टिनेझच्या नेतृत्वाखाली राबत होते. त्यांच्याबरोबर इतिहासकारांनी दस्तऐवज, पत्रे, चित्रे पारखून नौकांची बाह्य आकृती निर्दोष व्हावी म्हणून खबरदारी घेतली. एक प्रकारे नौदल पुराणवस्तुखातेच उघडले म्हणा ना. डिझाईन निर्दोष उतरले पण मध्ये माशी शिंकली ती जहाजांच्या लाकडावरून! कोलंबसाच्या काळात ज्या अत्युत्कृष्ट प्रतीचे ओक व पाईनचे लाकूड उपलब्ध होते, त्याच दर्जाचे व तेही ओक आणि पाईनच हवे... येथे आधुनिक फायबर ग्लास वगैरे भानगडी चालणार नाहीत, असे ह्या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रधार इग्नेसिओ फर्नांडिझ विएल ह्यांनी निक्षून सांगितले. पंधराव्या शतकातील उच्च दर्जाचे पाईन जपानमधून पारखून आणले गेले, ओकची लाकडेही अशीच प्रयत्नपूर्वक मिळवण्यात आली. आधी माद्रीदच्या हायड्रोडायनॅमिक एक्स्परिमेंटल सेंटरमध्ये नौकांच्या मॉडेल्सची चाचणी घेण्यात आली नि मग सर्वोत्कृष्ट सुतारांचे पथक निवडले गेले आणि ह्या तीन जहाजांचे बांधकाम सुरू झाले.

२६ मीटर लांबीची 'सांता मारिया' २ मिलियन डॉलर्स खर्चून बार्सिलोना येथे घडविली गेली. २१ मीटर लांबीची 'नीना' बांधण्याचे काम कार्ताजेना येथे पार पडले. तिच्यासाठी १.४ मिलियन डॉलर्स खर्ची पडले. 'पिंटा' २२ मीटर लांबीची आहे. ती ऑईल ओ क्रिस्टिना येथे १.४५ मिलियन डॉलर्समधून घडली. तिघीही हुबेहूब त्यांच्या पूर्वसूरींसारख्याच उतरल्या. फक्त खलाशांसाठी अत्यावश्यक सोयी मात्र आधुनिक कालानुरूप करण्यात आल्या. त्यांना रॅडर्स आहेत, रेडिओ यंत्रणा आहे, नौकानयनातील

आवश्यक लाइटस् आहेत, रेफ्रिजरेटर्स आहेत. फक्त ह्या आधुनिकतेचे दर्शन बाहेरून मुळीच होणार नाही, ह्याची खबरदारी घेतली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात त्या पंधराव्या शतकातील जहाजांसारख्याच दिसतात. प्रसाधन व स्वच्छतागृहे ही त्यातील आधुनिक काळातील भर आहे आणि तिन्हीही नौकांवरील रसोई व्यवस्था सांभाळण्यासाठी प्रशिक्षित आचारी नेमले आहेत. थोडा फरक असा की, कोलंबसाच्या काफिल्यात प्रत्येक नौकेवर जेवढे खलाशी होते त्यांत नौकेगणिक दहा घटविण्यात आले आहेत. इतिहासाची पुनरावृत्ती करणाऱ्या ह्या सफरीवर खलाशी (कोलंबसकालीन पोशाख घालूनच) म्हणून स्पेनच्या नौदलातील अधिकारी आणि खासगीरीत्या नौकानयनात प्रावीण्य संपादलेल्या स्पॅनिश व इटालियन नागरिकांची निवड केली आहे. पर्यटक म्हणून जी संख्या राखली होती त्याला जोरदार प्रतिसाद मिळाला. २०० अर्ज आले मग त्यातील आर्किटेक्ट, इतिहाससंशोधक, डॉक्टर्स, रसायनतज्ज्ञ, बुद्धिमंत विद्यार्थी, नाणावलेले साहसी मच्छिमार असे मिश्र व्यावसायिक निवडले गेले. (दुर्दैवाने त्यात महिला नाहीत. कारण कोलंबसाने महिला नेल्या नव्हत्या, तर आम्ही का म्हणून भगिनींना येऊ द्यावे, असा मुद्दा ह्या मंडळींनी उपस्थित केला. वस्तुतः महिलांना त्यात सहभागी व्हायचे होते. कारण कोलंबसकालीन पोशाख घालायची ती एक चांगली संधी होती, असे सांगितले जाते.) आधुनिक सोयी ह्या नौकांतून असल्या तरी आरामदायी प्रवास घडेलच, अशी ह्या सफरीची परिस्थिती नाही. खलाशी वर्गाला डेकवरच झोपावे लागणार आहे. अशा परिस्थितीत महिलांना सहभागी करून घेणे व्यवहार्य वाटले नसावे.

एकट्या 'सांता मारिया'ची शिडे उभारायची तर १८ पुरुषांना खपावे लागते, ह्यावरून कल्पना यावी. 'सांता मारिया'चा नांगर ६४४ किलो वजनाचा आहे. २० खलाशांना त्याकरिता २० मिनिटे लागतात. तेव्हा कोठे तो नांगर उचलला जातो नि 'सांता मारिया' पाणी कापू लागते. (थोडी फार कल्पना वास्को-द-गामाच्या नौकेची संक्षिप्त माहिती वाचल्यास येऊ शकते.) कोलंबसाने बायबलची प्रत आपल्यापाशी ठेवली होती, एक मनस्मरणीही तो बाळगीत होता. तेव्हा नव्या 'सांता मारिया'चा २० व्या शतकातील 'कप्तान कोलंबस' बनलेला कॅप्टन सांतियागो बोलीबर पिन्हेरो हा ह्या बाबी कसा विसरेल? ह्या तिन्ही नौकांवरील प्रत्येक खलाशी-पर्यटक आपल्याबरोबर कमीत कमी व्यक्तिगत सामान नेत आहे. मात्र अभ्यासाची साधने भरपूर घेतली आहेत. काहीजण केवळ रोजनिशी ठेवीत आहेत, तर काही केवळ वैद्यकीय तपशील ठेवणार आहेत. त्यातील आचारी आहारतज्ज्ञ आहेत नि तेही खलाशांवरील पोषणविषयक बाबींचा अभ्यास करीत आहेत.

'सांता मारिया' ला पुढे ठेवून हा काफिला स्पेनमधून निघाला. मेडीटेरॅनियन आणि स्पेनच्या किनाऱ्यावरील सर्व बंदरे करीत अॅटलांटिकमधून हा ताफा अमेरिकेकडे वळेल. अमेरिकेच्या किनाऱ्यावरील ५० बंदरे मजल दरमजल करीत घेतली जातील. तेथे पडाव

पडतील आणि बरोबर १२ ऑक्टोबर १९९२ रोजी कोलंबसाने पाय ठेवलेल्या सान्त दॉमिंगो ह्या बंदरात 'सांता मारिया' इतर दोन सख्यांसह प्रवेश करील. बिचारा कोलंबस पालोत डी ला फ्रॉंटेरामधून निघाल्यावर १० आठवड्यांनी चुकीच्या का होईना मुक्कामावर पोचला होता. ही मंडळी मात्र ३ ऑगस्ट १९९० ते १२ ऑक्टोबर १९९२ एवढा प्रदीर्घ काळ प्रवास करणार आहेत. ह्या अवधीत हा ताफा ३८,००० नॉटिकल मैल एवढे म्हणजे पृथ्वीच्या परिघाच्या जवळजवळ दुप्पट अंतर कापील. कोलंबसाला एवढे अंतर कापणे कधीच शक्य झाले नसते.

आता खरे तर इतिहासाने सिद्ध केले आहे की, कोलंबस हा काही अमेरिकेला पोचलेला पहिला विदेशी नव्हताच. कोलंबसापूर्वी ५०० वर्षे (म्हणजे आता हजार वर्षे म्हणायचे) नॉर्वेचा साहसी वीर व संशोधक लेईफ एरीकसन ह्याने पहिले युरोपीयन पथक उत्तर अमेरिकेवर आणले होते. ही बाब आता जवळजवळ सर्वमान्य झाली आहे. त्यामुळे कोलंबसाच्या ह्या पुनरावृत्ती सफरीत खुद्द अमेरिकेतील उत्साह बेताचाच आहे. जो काही सहभाग आहे तो केवळ अमेरिकावासी स्पॅनिश, पोर्तुगीज व इटालियनांचाच आहे! हीच मंडळी १९९२ च्या स्वागत समारंभात सहभागी होत आहेत. बाकीच्या अमेरिकनांची कोलंबसाबाबतची मते अफाट नि अचाट आहेत. ही ५०० वी जयंती विश्वव्यापी व्हावी म्हणून स्पेन-पोर्तुगल-इटलीने १९८७ मध्ये युनायटेड नेशन्सकडे ठराव पाठविला होता. (त्यासंबंधात 'परिक्रमा' मध्ये कालंबसाची ऐशी तैशी हे प्रकरण लिहिले होते.) ह्या ठरावाची फक्त होळी तेवढी व्हायची राहिली होती. कोलंबस गर्विष्ठ होता... 'ढ' होता... भूगोलात डफ्फर होता... मूर्ख होता... केवळ त्यापाशी साहस तेवढे होते... एरवी डोक्यात नुसता दर्प भरला होता. अशा शेलक्या टीकेने कोलंबसाची संयुक्त राष्ट्रांच्या भर सभेत पूजा झाली होती. हिंदुस्थानला निघालेला हा 'ढ' अमेरिकेत पोचला नि अमेरिकेला हिंदुस्थान समजून तेथील रहिवाशांना त्याने इंडियन ठरविले. मग कोणी त्याच्या लक्षात आणून दिले की, मूर्खा, इंडियन एवंढे गोरे नसतात. मग त्याने अमेरिकेतील रहिवाशांना रेड इंडियन ही संज्ञा दिली. पण हा दुराग्रही 'इंडियन' हा शब्द काही खोडायला तयार होईना. त्यामुळे आज अमेरिकेत रेड तथा अमेरिकन इंडियन आणि अमेरिकेत स्थायिक झालेले भारतीय म्हणजेही अमेरिकन इंडियन किंवा इंडियन अमेरिकन, ओरिजिनल इंडियन, वेस्ट इंडियन, ईस्ट इंडियन्स असा कोणाच्याही पायात कोठलाच पायपोस राहू नये, ह्या प्रकारचा एकच गोंधळ झालाय; त्याला जबाबदार हा मठ्ठ कोलंबस अशी सडकून टीका करायला कोणी कचरत नाही. रेड इंडियन्स (अमेरिकन इंडियन्स) मंडळींच्या मते कोलंबसाने आम्हाला शोधून काढले हा शब्दप्रयोग आधी बदलायला हवा. कारण आम्ही कोठेच हरवलो नव्हतो नि हाच निर्बुद्ध मार्ग चुकून हरवून आमच्याकडे आला. संयुक्त राष्ट्राने अखेर हा ठराव कार्यक्रमपत्रिकेतून हटविला. ह्याची खंत स्पेन-इटली नि पोर्तुगलला लागली होती. आता

ही पंचशताब्दी आपल्याच परीने आपल्याच खर्चाने करावी म्हणून त्यांनी स्वतंत्र योजना आखली नि त्याबरहुकूम 'सांता मारिया', 'नीना' व 'पिंटा' तिघीजणी सागर कापीत अमेरिकेच्या दिशेने कोलंबसाचा मागोवा घेत निघाल्या आहेत...!

२०/८/९०

***

१४

## मतिमंदांचे बुद्धिमंत गाव

'गाव करी ते राव न करी' अशी म्हण आहे. संघटित समूहाची शक्ती किती प्रभावी ठरू शकते, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. वारकरी पंथाची परंपरा असलेल्या महाराष्ट्राला ग्रामशक्तीचा दरवर्षी साक्षात्कार होतच असतो. लक्षावधी वारकऱ्यांची निवासभोजनाची जबाबदारी शिरावर घेऊन ती निभावणाऱ्या मराठी गावांना समूहशक्तीचे महत्त्व ठाऊक आहेत. शिवाय अण्णा हजारेंच्या नेतृत्वाखाली एक राळेगणशिंदी हे गाव काय करू शकते, हे देखील या महाराष्ट्राने पाहिले आहे... त्यामुळे अशाच एका जगावेगळ्या वाटेने जाणाऱ्या आणि त्यामुळे जागतिक पातळीवर बोलबाला कमविणाऱ्या खेड्याचे कौतुक मराठी माणसाला निश्चितच वाटेल.

– ह्या गावाचे नाव आहे हॉएनरॉथ. भौगोलिक नकाशात ते दिसणार नाही. कारण त्याला ऐतिहासिक किंवा भौगोलिक वैशिष्ट्ये नाहीत. मात्र समाजशास्त्र आणि मनोविज्ञान ह्या विषयांत त्या गावाचा गौरवपूर्ण उल्लेख होऊ घातला आहे. जर्मनीतील उत्तर बव्हेरिया प्रांतात स्पेसार्त परगण्यात जेमतेम तीनशे लोकवस्तीचे हे गाव वसले आहे. खरे तर लोकवस्ती पाहता 'खेडे' हा शब्द अधिक योग्य ठरावा. इथं पहाटेच संपूर्ण गाव जागे होते कारण शेती आणि दूधदुभते हाच येथील प्रमुख व्यवसाय आहे. बेकरीचे, डेअरीचे काम तर आधीच सुरू होते. पाव भाजणारा २४ वर्षांचा पीटर, घोड्यांना खुराक घालणारा ३५ वर्षांचा रॉबर्टो, डेअरीतील चीज आणि दही पॅक करून ट्रकमध्ये चढविणारे पंधरा स्त्री-

पुरुष आणि इतर अनेक व्यापात गुंतलेली अन्य मंडळी आपापली कामे पूर्ण एकाग्रतेने करीत असतात. अगदी शिकवल्याप्रमाणे, सांगितल्याबरहुकूम... इथलं तिथे नाही की अस्वच्छतेला थारा नाही. कोणी म्हणेल की, त्यात विशेष ते काय? सर्वत्रच हे चित्र दिसू शकते. हॉएनरॉथची गोष्ट वेगळी आहे. ही सर्व कष्टकरी मंडळी साफ मंदबुद्धी आहेत. हॉएनरॉथमधील तीनशे रहिवाशांतील १३५ माणसे शून्यमनस्क किंवा मतिमंद आहेत. कोठल्याही परिस्थितीत निरोगी समाजापासून ह्या १३५ दुर्बल मनस्कांना वेगळे पाडायचे नाही, समाजात भिंत उभारायची नाही, असा हॉएनरॉथचा ठाम निश्चय आहे. कारण ह्या खेड्याने पूर्वीही कधी प्रॉटेस्टंट, कॅथलिक, बॅप्टिस्ट अशा विविध पंथांच्याही भिंती मान्य केलेल्या नाहीत. १३५ मतिमंदांचे हात कामात राहिले पाहिजेत म्हणजेच सामान्य जनप्रवाहात ते कायम राहतील, हे साधे तत्त्व हॉएनरॉथने पाळायचे ठरविले नि ते कमालीचे यशस्वी झाले.

साधारणतः १८ ते ५४ वर्षे वयाचे हे १३५ मतिमंद आहेत. हॉएनरॉथची बाजारपेठ म्हणजे ५० किलोमीटर अंतरावरील वर्झबर्ग मार्केट. ह्या मार्केटकडे आपल्या गावातील शेतीमाल रवाना करण्याकामी ह्या १३५ जणांचे हात इतर सक्षम नागरिकांच्या बरोबरीने खपतात. पण हॉएनरॉथची आणखी एक खासीयत आहे. येथील बेकरीमधील पाव, बिस्किटे, केक तसेच येथे तयार होणारे फळांचे रस, जॅम, मुरांबे ह्यातून आणि येथील लोणी, चीज, दही ह्यामध्येही कोठलाही कृत्रिम पदार्थ मिसळला जात नाही. सायट्रेटस्, बी. व्ही. ओ. सायक्लॅमेटस्, ॲसीटेटस्, रेनेट ह्यापैकी कोठलेही रसायन न वापरता तयार केलेला हा माल जर्मनीतील 'शंभर टक्के नैसर्गिक' म्हणून ख्यातनाम आहे. येथील रेनेट न वापरता बनविले जाणारे श्वेत चीजचे व दह्याचे सर्व प्रकार वर्षानुवर्षे देशव्यापी स्पर्धेत बक्षिसे जिंकत आले आहेत. दर रविवारी शेकडो माणसे हॉएनरॉथला ह्या जिनसा खरेदी करायला जमतात. मतिमंदांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्याचा उपक्रम हॉएनरॉथच्या ग्रामस्थांनी १९७८ मध्ये सुरू केला आणि कृत्रिम पदार्थांचा वापर पूर्णतः बंद करून शुद्ध नैसर्गिक दूधदुभते, फळे, भाज्या निर्मिण्याचा उपक्रमही त्याच वर्षी सुरू केला. नैसर्गिक शुद्धतेचे व्रत येथे एवढे कटाक्षाने पाळले जाते की, भाजी-फळांच्या पिकासाठी रासायनिक खते, कीटकनाशके ह्यांचा वापर कटाक्षाने टाळला जातो. ह्या उपक्रमाचा दहावा वर्धापनदिन ग्रामस्थांनी १९८८च्या सप्टेंबरमध्ये साजरा केला आणि त्यानिमित्त गटेचे 'फेअरी टेल' सादर करण्यात आले. कलावंत अर्थातच मतिमंद होते.

आता कोणाचा गैरसमज होऊ शकतो की, हॉएनरॉथ ह्या गावाची माती नि पाणी चमत्कारिक असावे आणि तेथे मतिमंद मुले अधिक संख्येने जन्मत असावीत. वस्तुस्थिती तशी नाही. ह्या गावाचे वातावरण एवढे निर्दोष व स्वच्छ आहे की, येथील जमिनीने दिलेले धनधान्य शुद्ध असतेच शिवाय येथील रहिवाशांची मनेदेखील विशुद्ध असतात.मूलतः ह्या

गावातील एकाही घरात कोणी मंदबुद्धी अपत्य कधी जन्मले नाही. मात्र गावकऱ्यांनी १९७६ मध्ये एक सेवाव्रत अंगीकारले... येथील प्रत्येक घर प्रतिज्ञाबद्ध झाले आणि १९७८ पासून येथील प्रत्येक कुटुंबाने मतिमंद मुले दत्तक घेण्यास आरंभ केला. ह्या मूळ रहिवाशांपैकी काहींचा फक्त शेतीचा व्यवसाय आहे तर काहींनी पूरक म्हणून दूधदुभते ठेवले आहे, काही केवळ मजुरीवर गुजराण करतात, तर काही फक्त बेकरी, फळरस ह्याच क्षेत्रात आहेत. त्यांच्यात एक समान सूत्र आहे — आपली स्वतःची मुले कितीही असोत मात्र मतिमंदांना दत्तक घेतलेच पाहिजे. हॉएनरॉथमधील १३५ मतिमंद 'दत्तक' गेले आहेत. एकूण १९ घरकुलांतून हे दत्तकविधान झाले आहे. प्रत्येक विवाहित दांपत्य ६ ते १० मतिमंद स्त्री-पुरुष अगर मुलांना आपलेसे करते. वॉल्टर नॉर्प व त्याची पत्नी ह्यांना स्वतःची सहा अपत्ये आहेत आणि तरीही त्यांनी आठ मतिमंद दत्तक घेतले आहेत. ह्या आठ केसीस मंदबुद्धीच्या कमाल टप्प्याच्या आहेत. नॉर्प दांपत्याला आपल्या 'आठां'बाबत आत्यंतिक जिव्हाळा आहे. आपल्या गावाने हे 'व्रत' स्वीकारले ह्याचाही प्रत्येक हॉएनरॉथवासियांस अभिमान आहे.

हे अद्भुत व्रत येथे आले कसे, ह्या प्रश्नाचे उत्तर थेट अशा जगावेगळ्या कल्पनेचे स्वप्न पाहणाऱ्या एका तत्त्वज्ञापाशी जाते. रुडॉल्फ स्टायनर हा चालू शतकातील एक थोर तत्त्वज्ञानी. जन्माने ऑस्ट्रियन असलेल्या डॉ. स्टायनर ह्यांनी आपल्या देशाच्या सीमा ओलांडून सर्व जगात पोहोचेल अशी एक चळवळ आरंभिली. फिलॉसफी आणि अँथ्रपॉलॉजी ह्या दोन शब्दांचा त्यांनी 'अँथ्रपॉसफी' असा संगम करून मानवतावादास तात्त्विक बैठक दिली. कृत्रिम रसायनांची हकालपट्टी करून पूर्णतः सेंद्रिय, नैसर्गिक शेती करणे आणि मानसिक व शारीरिक पंगुत्व आलेल्या व्यक्तींसाठी विशेष काळजी घेण्याकरिता निरोगी माणसांस जागृत करणे ही डॉ. स्टायनर ह्यांची जीवनध्येये बनली. त्यांची कित्येकांनी 'विक्षिप्त', 'खुळचट म्हातारा' म्हणून संभावनाही केली तथापि आणखी एका ऑस्ट्रियनाने ह्या चळवळीचे महत्त्व जाणले. काळ युद्धाचा होता नि ऑस्ट्रियात नाझींची दडपशाही चालू होती म्हणून वैद्यक व्यवसाय करीत असलेले कार्ल कोनिग इंग्लंडला आले आणि 'कँपहिल कम्युनिटीज' अशी एक समाजव्यवस्था स्थापली. मतिमंद प्रौढांची मायेने काळजी घेणारी विशेष कुटुंबे तयार करण्याची ही व्यवस्था होती. इंग्लंडमध्ये ती यशस्वीरीत्या रुजली... इतरत्र ती कल्पना पोचून जगभर 'अँथ्रपॉसफी कँपहील कम्युनिटीज' ची एकूण ७० खेडी उभी झाली. ह्या ७० खेड्यांतील प्रत्येक घरात आज किमान एक मतिमंद किंवा एक शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्ती असतेच. ह्या चळवळीचे आकर्षण पश्चिम जर्मनीतील युजीन बर्नस आणि नॉर्बर्ट बर्नस ह्या बंधूंना स्वस्थ बसू देईना. म्युनिकमध्ये ह्या बंधूंनी १९७६ मध्ये 'दस हेल्फेंद डॉर्फ' (मदतगार खेडे) ही संस्था स्थापली आणि त्याकरिता निधी जमवायला आरंभ केला. ह्यापूर्वी जगातील अनाथ व उपेक्षित मुलांसाठी एसओएस —

बालग्रामे स्थापण्याची संघटना कार्यरत होतीच. सर्मन मायनर हे जर्मन विद्वान त्याचे प्रमुख होते. बर्नस बंधूंच्या उपक्रमाची माहिती मायनर ह्यांना मिळताच त्यांनी 'दस हेल्फेंद डॉर्फ'साठी सहकार्य दिले. वाजवी भावात मग जमीन मिळवण्यासाठी खटपट सुरू झाली. १९७७च्या जुलै महिन्यात एसओएस बालग्रामाने स्पेसार्त परगण्यात १३० हेक्टर शेतजमीन खरीदली. त्याबरोबर कामाला वेग आला आणि चार मतिमंद प्रौढांना घेऊन ४७ वर्षांचे युजीन बार्नस व त्यांची पत्नी हॉएनरॉथच्या एका लाकडी घरात स्थलांतरित झाली. पाहता पाहता ह्या चळवळीत सहभागी होऊ इच्छिणारी कुटुंबे हॉएनरॉथला डेरेदाखल झाली आणि १९ टुमदार लाकडी घरे उभी राहिली. वर्कशॉप, छोटेखानी हॉटेल, एक छोटे थिएटर अस्तित्वात आले. एक रेखीव खेडे उभे झाले. त्यासाठी एसओएस-बालग्रामाने ४ कोटी ड्युशमार्क खर्चले. युजीन बार्नसने येथे नैसर्गिक शेतीचा आग्रह धरला. त्यामुळे ट्रॅक्टर्स व दूध काढण्याची यंत्रे ह्याखेरीज हॉएनरॉथमध्ये कोठलेही यंत्र प्रवेश करू शकत नाही. मतिमंद व अपंगांच्या हातांना काम देणे महत्त्वाचे असल्याने येथे यंत्रांना मज्जाव आहे. श्रमणाऱ्या हातांवर पूर्ण भिस्त टाकली आहे. आज ह्या खेड्याची कीर्ती सर्वदूर पसरली आहे नि आपल्या मतिमंद मुलांना लांबलांबून आई-वडील हॉएनरॉथला आणू लागले आहेत. १९ यजमान कुटुंबांना – त्यांच्या मुलाबाळांसह सर्वांना – आधी मंदबुद्धी, मनोरुग्णांची देखभाल कशी करावी, ह्याचे मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ ह्यांच्यामार्फत प्रशिक्षण द्यावे लागले, मतिमंदांसाठी सुयोग्य काम कसे निवडावे ह्याबाबत मार्गदर्शन द्यावे लागले. परिणामी यजमान दांपत्यांची १०-१२ वर्षांची स्वतःची मुलेदेखील आपल्या घरातील पन्नाशीच्या वयाच्या दत्तक मतिमंदांची उत्तम देखभाल करू शकतात.

अँथ्रपॉसफीचे हे लोण इतके संसर्गजन्य बनले आहे की, बॉन-म्युनिक-बर्लिनसारख्या मोठ्या शहरांतील ऐषआरामी जीवन, भरभराटीला आलेला व्यवसाय, प्रसिद्धीचे वलय, सुखोपभोग सोडून अनेक दांपत्ये हॉएनरॉथला येत आहेत आणि 'यजमान कुटुंब' बनून मतिमंदांचे आई-बाप होण्यास उत्सुकता दाखवीत आहेत. येथील मतिमंदांना त्यांनी केलेल्या कामाचा वाजवी मोबदला दिला जातो तर यजमान कुटुंबांनाही प्रत्येक मतिमंदामागे विशिष्ट निधी 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर दिला जातो. तसेच मतिमंद वर्षांतून चार आठवडे आपल्या खऱ्या कुटुंबात जाऊन राहू शकतो. हा खर्च हॉएनरॉथमधील शेतीमाल व दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीतून आणि एसओएस-बालग्रामातून भरून निघतो. जर्मनीतील एखाद्या शहरामधील विशेष मतिमंदांच्या कल्याणकारी संस्थेत अगर मनोरुग्णांच्या इस्पितळात अशा पेशंटला दाखल केल्यास जर्मनीतील जीवनमान पाहता प्रत्येक रुग्णामागे दर दिवशी ११० ड्यूशमार्क एवढा खर्च येतो तर मतिमंदांच्यामध्ये अशा रुग्णांसाठी प्रतिदिनी माणशी ८० ड्यूशमार्क पुरेसे ठरतात.

एखाद्या संस्थेत मतिमंदांची जी सोय होते, त्यात माया नसतेच तर सामान्य

माणसासारखे काम करून कमविण्याची गोष्टच सोडा. अशा संस्था 'पिंजरा' बनतात. हॉएनरॉथ हे एक मुक्तांगण बनले आहे. इथे मतिमंदांकडे अंगुलिनिर्देश केला जात नाही नि हिणवलेही जात नाही. त्याच्या कुवतीनुरूप त्याला शिकवून, स्वावलंबी बनण्याचा आनंद त्याला दिला जातो नि माणूस म्हणून त्याला जगू दिले जाते... खऱ्या घरी जाण्यास चार आठवड्यांची सुट्टी घ्यायलाही काही मतिमंद नाराज असतात, ह्यावरून येथील मायेची पाखर किती ऊब देत असावी, ते जाणावे.

२/७/९०

१५

※

# अखेरचे पर्व

'हर इंपीरियल मॅजेस्टी म्हणे! हा! आली मोठी सम्राज्ञी! साम्राज्य तर सोडाच पण साधं कोठल्या देशाचं नागरिकत्वही नसलेली! देशोधडीला लागलेली बाई! तिला माझा निरोप सांगा – मी सांगेन तेव्हा तिला माझ्याबरोबर यावं लागेल...'

हा कोठल्या नाटकातला प्रसंग नाही. एका स्त्रीच्या आयुष्यात प्रत्यक्ष घडलेला हा प्रसंग आहे. इराणची एकेकाळची सम्राज्ञी शाहबानू फराह डिबा पाहलवी हिच्या आयुष्यात ओढवलेला हा प्रसंग आहे. दहा वर्षे म्हणजे काही दीर्घ काळ नव्हे. इराणमध्ये क्रांती घडून, शहेनशाह रेझा पाहलवीची सत्ता मोडून तेथे इस्लामी धर्माधिष्ठित राजवट सुरू होऊन फक्त दहा वर्षेच उलटली. दीड महिन्यापूर्वीच इराणी क्रांतीचा वर्धापनदिनही साजरा झाला. इराणमध्ये कित्येक दशके असलेली शहेनशाहची अनिर्बंध आणि मोकाट सत्ता विध्वंसाच्या मार्गानेच जाणार होती... जगातलं एक राजघराणं नष्ट होण्याची प्रक्रिया शहेनशाहच्या वडिलांनी सिंहासन बळकावले तेव्हाच खरे म्हणजे सुरू झाली होती नि १९७९ मध्ये ती पूर्ण झाली एवढेच! आपलं आसन पोखरलं जात आहे, हे पाहिल्यावर माणूस जिवाचा आटापिटा करून ते धरून ठेवण्याचा प्रयत्न करतो, त्यातलाच एक भाग म्हणून नुसता 'शाह' असलेल्या ह्या राजाने स्वतःला साम्राज्याभिषेक काय करवून घेतला होता नि आपण 'शाह' चा 'शहेनशाह' बनून स्वतःच्या पत्नीला 'शाहबानू' काय बनवून घेतले होते... इराणचं सिंहासन म्हणजे मूळ भारतीय मयूर सिंहासन... त्याची कीर्ती अशी की, ते कोणालाच

शाश्वत लाभू शकत नाही. ते भारतातून बेधडक नेणाऱ्या नादीर शाहलादेखील लाभले नाही.. इराणी क्रांतीच्या वेळी शहेनशाहला हे तख्त-ताज सोडून पळ काढावा लागला. त्या वेळी हा इराणचा शाह राजकीय संकटात तर वेढला गेला होताच परंतु जोडीला कर्करोगाने त्याचे शरीर पोखरायला सुरुवात केली होती. इराणमधून देशोधडीला लागल्यावर परदेशात राजाश्रय मिळवताना त्याला प्रयास पडत होते. कारण ह्या शाही कुटुंबाची नसती बला घ्यायला कोठलाही देश... अगदी अमेरिकाही तयार नव्हती. केवळ सहारा मिळूनही भागण्यासरखे नव्हते. सहारा, सुरक्षितता ह्यांच्याबरोबरच कर्करोगावरील उपचारांची सुविधा मिळणे आवश्यक होते. कोणाला वाटावे... एकेकाळी इराणचा सम्राट असलेल्या माणसाला जगातले सर्वांत आधुनिक व महागडे उपचार मिळण्यात काय अडचण यावी? गरिबाला औषधोपचार मिळाले नाहीत तर काहीच नवल नसते; पण अविश्वसनीय सत्य असे आहे की, बऱ्याच वेळा अत्यंत धनाढ्य आणि सत्तासंपन्न व्यक्तींना वैद्यकीय उपचार धडपणे मिळत नाहीत, त्यांची कमालीची हेळसांड होते नि शहाच्या बाबतीतही तेच घडले. सत्ताधीश दुर्धर आजाराने ग्रासला गेला आहे, हेच मुळात जनतेपासून लपवून ठेवण्यात अधिक लक्ष दिले जाते नि त्यात आजार बळावल्यास आश्चर्य कोणते?

एकेकाळचा सत्ताधीश देशोधडीला लागल्यावर त्याचे संपूर्ण कुटुंब ह्याच दाहक अनुभवांचे वाटेकरी बनते. दुर्दैवाचे दशावतार त्यांच्या वाट्यालाही येतात. त्यातही स्त्री अधिक दुर्दैवी असते... अन् ती सुंदर असेल तर? कोठल्याही देशाच्या कोणत्याही कालखंडाच्या इतिहासात ह्याची उदाहरणे विपुल मिळतील. अगदी आपल्या भारतात फक्त १३२ वर्षांपूर्वी जे घडलं ते वानगीदाखल पुरेसं आहे. १८५७ चे जंग उभारणारे आपले नानासाहेब पेशवे जाणून होते की, संग्राम पेटल्यावर हिंदुस्थानचा एकही भूभाग कुटुंबकबिल्यासाठी सुरक्षित राहणार नाही. नानासाहेबांनी मग आपली पत्नी श्रीमंत काशीबाईसाहेब पेशवे आणि चाळीस कोटी होनांची मराठी दौलत हिंदू राष्ट्र असलेल्या शेजारच्या नेपाळच्या महाराजांपाशी पोचती केली होती. आपला वनवास सुरू झाला आहे. पण किमान पेशव्यांची स्त्री सुरक्षित राहावी ह्यासाठी हिला बहीण मानून सांभाळावे, अशी नानासाहेबांची विनंती होती. नेपाळच्या महाराजांनी काशीबाईंना कसे वागविले हे येथे सांगण्याची आवश्यता नाही. कर्नल मनोहर माळगावकर ह्यांची साहित्यकृती काशीबाईंच्या दुर्दैवावर अधिक प्रकाश पाडून गेली आहेच.

सत्ताहीन पुरुषाच्या स्त्रीचे भोग दहा वर्षांपूर्वी शहाची पत्नी शाहबानू फराह हिच्या वाट्याला इतके कडवटपणे आले. देशादेशांकडे आश्रय मागण्याची वेळ ह्या कुटुंबावर आली. पदरी नकार पडत गेले आणि अखेर पनामा ह्या देशाने ह्या कुटुंबाला आश्रय देण्याची तयारी दर्शवली. शहा, शाहबानू फराह आणि मुले एकदाची पनामामध्ये आली. आंतरराष्ट्रीय राजकारण ज्वालामुखीसारखे खदखदत होतेच. इराणने अमेरिकन नागरिकांस

ओलिस धरले होते. 'शाही कुटुंबाला आमच्या हवाली करा कारण इराणचे गुन्हेगार म्हणून आम्हाला त्यांच्यावर आरोप ठेवायचे आहेत,' अशा इराणकडून मागण्या होत होत्या. अशा परिस्थितीत आसरा देणारे देशही फारसे भरवशाचे नसतात. त्या देशांचाही काही अंतस्थ हेतू असू शकतो. पनामा त्याला अपवाद नव्हता. इराणच्या शहाची अगणित संपत्ती त्याने पनामाच्या उद्योगातून गुंतवावी, अशी पनामाच्या सत्ताधीशांची इच्छा होतीच. त्या वेळचा पनामाचा सर्वेसर्वा होता जनरल ओमर अल्फोन्सो टॉरीजोस. बेधडक, क्रूर, अमानुष. जनरल टॉरीजोस ह्याला ही तीन विशेषणे लावली होती. एक बदनाम हुकूमशहा म्हणूनच त्याची ख्याती होती. पुढे हा हुकूमशहा विमान दुर्घटनेत मरण पावला. वास्तवात तो अपघात नव्हता तर घातपात होता, हेही नंतर उघड झाले. पण जनरल टॉरीजोस गेल्याने पनामाच्या जनतेने मोकळा श्वास घेतला. नंतर पनामाचा सत्ताधीश झालेला मनवेल नोरीगा हा ह्याच जनरल टॉरीजोसचा चेला होता. सुरुवातीलाच उद्धृत केलेले उद्गार ह्याच क्रूरकर्मा जनरल टॉरीजोसच्या तोंडचे आहेत.

– पनामामध्ये काँटडोरा येथे शहा, शाहबानू आणि त्यांची मुलं निवास करीत होती. शहा कर्करोगाने ग्रस्त झाला होता तरीही विलासी रंग चालूच होते. कोंडी झाली होती ती शाहबानूची. जनरल टॉरीजोसची ख्याती शाहबानू जाणून होती. काहीही विश्वासार्हता नसलेला, दारुडा, मादक द्रव्यांचा वापर करणारा, अमानुष क्रौर्यात आनंद उपभोगणारा हा जनरल आपल्याला इराणच्या ताब्यात तर देणाार नाही, ह्या शंकेने शाहबानूची चैन उडाली होतीच, शिवाय शहाच्या कर्करोगाचे सावट मनस्वास्थ्य हिरावून बसले होतेच. अन् अशा वादळी काळात शाहबानूला जनरल टॉरीजोसचा निरोप मिळाला – 'मी सांगेन तेव्हा तिला माझ्याबरोबर यावं लागेल.' शाहबानू हबकली. काहीही मत व्यक्त न करता गप्प राहाणे इष्ट, असे ठरवून ती अधिकच सजग राहिली. एक दिवस शहा जवळपास नसताना शाहबानूचा फोन खणाणला. – 'पनामाच्या परिसरात अनेक सुंदर बेटे आहेत. युवर इंपीरियल मॅजेस्टी, तुम्ही स्वतः वास्तुशिल्पाचे धडे घेत होतात. लग्नापूर्वी... तुम्ही ह्या इमारती पाहायला माझ्याबरोबर आलं पाहिजे...' फोन बंद! आवाज होता जनरल टॉरीजोसचा! 'इंपीरियल मॅजेस्टी' हा शब्द उच्चारताना त्या आवाजात पुरेपूर उपहास भरला होता. शाहबानू घाबरली. तिने माणसांकरवी निरोप पाठविला की, आपले सेवक आणि बॉडीगार्ड घेऊनच ती ह्या इमारती पाहण्यासाठी येऊ शकते. बरोबर मुलांनाही आणण्याची तिची इच्छा आहे.

दुसऱ्या दिवशी परत तोच आवाज फोनवर आला – 'बरोबर कोणीही नको! एकटीनेच आले पाहिजे!' जनरल टॉरीजोसचा हेतू ह्या स्त्रीने ओळखला. त्या क्षणापासून चोवीस तास मुलांना नि सुरक्षाधिकाऱ्यांना जवळ ठेवूनच वावरू लागली. फोन घेईनाशी झाली, आणि संधी मिळताच तिनं जिवाच्या आकांतानं आपल्याशी भावनेचे बंध बांधणाऱ्या

एका स्त्रीला निरोप पाठवून साद घातली. ती स्त्री म्हणजे तेव्हाचे इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अन्वर सादत ह्यांची पत्नी जिहान सादत!

दहा वर्षांपूर्वी घडलेल्या ह्या घटनांची नोंद केली आहे विल्यम शॉक्रॉस ह्या लेखकाने आपल्या 'शाहज् लास्ट राईड' ह्या ग्रंथात... पुढे घटनाक्रम अधिकच अस्वस्थ करणार आहे.

३/४/८९

# १६

# द लास्ट राईड

इराणमधील शहाची कारकीर्द भ्रष्टाचार, विलास आणि अनेकानेक भानगडी ह्यांनी गच्च भरली होती. शहाच्या मर्जीतल्या स्त्रिया हा स्वतंत्र चर्चेचा विषय असे. शहाची जुळी बहीण प्रिन्सेस अशरफ ही सुद्धा अनेक प्रकरणांत सतत गुंतलेली असे. पाहलवी घराण्याच्या इतिहासातील कारस्थानी स्त्री म्हणून हिचं नाव घेतलं जातं. देखणी पण सदैव धुमसणारी अशी ही ड्रॅगन लेडी सत्तेच्या बाबतीत शहाच्या निकट वावरे. शहाना जणू तिने इतके नियंत्रित केले होते की, त्याला पत्नीपेक्षा बहीण अधिक विश्वासार्ह वाटे. ह्या स्त्रीची अनेक प्रेमप्रकरणे झाली. इराणी जनतेने तिला 'ब्लॅक पँथर' असे टोपण नाव दिले होते. दुसऱ्या महायुद्धानंतर इराणच्या अझरबैजान ह्या प्रांतातून माघार घ्यायला रशिया तयारच नव्हता. तर ही बाई स्टॅलीनला इराणच्या वतीने भेटायला गेली होती. पण स्टॅलीन पक्का पडला. त्याने प्रिन्सेस अशरफशी छान गप्पा मारल्या, तिला मौल्यवान भेटवस्तू दिल्या, मात्र अझरबैजानचा ताबा सोडला नाही. मादक पदार्थांच्या व्यापारात ह्या स्त्रीचा भाग असल्याचेही बोलले जाई.. १९७० नंतर तर इराणी राजकारण भ्रष्टाचाराने साफ पोखरून निघाले. लाच, कमिशन बोकाळू लागले. १९६० च्या सुमारास ज्या शहाने इराणमध्ये श्वेतक्रांती घडवली, साक्षरतेच्या मोहिमा काढल्या, इराणी महिलांसाठी कल्याणकारी योजना आखल्या, राहणीमान उंचावले तोच शहा निकटवर्तीयांच्या हातचे बाहुले बनत गेला. तेलातून इराणला मिळणारा पैसा विधायक कार्यासाठी उपलब्ध होईनासा झाला.

'सावक'ह्या गुप्तचर यंत्रणेचा वापर जनता, विरोधक, विचारवंत आणि सत्तेच्या वर्तुळातील मोठ्या व्यक्तींवर पहारा ठेवण्यासाठी, नागरिकात जरब बसविण्यासाठी होऊ लागला. एकदा 'सावक'ने एखाद्यावर आरोप ठेवला की, ती व्यक्ती 'नाहीशीच' होऊ लागली. 'सावक' चे छळ हिटलरला लाजवू लागले. शहबानूशी तर शहा कधीच एकनिष्ठ नव्हता. भ्रष्टाचार आणि जरब ह्यांनी खिळखिळी झालेली शहाची राजवट १९७९ मध्ये कशी लयास गेली हे सर्व जग जाणते. जाणीव नव्हती ती शहाच्या कर्करोगाची!

पनामामध्ये आश्रयास आलेल्या शहाला कॅन्सरची बाधा झाली होती आणि ज्या पद्धतीने ही वार्ता गुप्त ठेवण्याचा आटापिटा चालू होता, तो सर्वच प्रकार अविश्वसनीय वाटावा. वास्तविक १९७४ मध्येच डॉ. बर्नर्ड व डॉ. फ्लँड्रीन ह्या फ्रेंच धन्वंतरींना शहाला झालेल्या कॅन्सरची कल्पना आली. शहाच्या प्लीहेला अधून मधून सूज येई म्हणून या दोन डॉक्टरांकडे तपासणी करण्यात आली. दोघांनीही कॅन्सरचे निदान केल्यावर शहाचे व्यक्तिगत डॉक्टर आयादी ह्यांनी 'कॅन्सर' अगर 'ल्यूकेमिया' हे शब्द शहापासून छपविण्याचा निर्णय घेतला नि शहाला सांगण्यात आलं – 'आपणास वॉल्डनस्ट्रॉम ह्या विकाराची बाधा झाली आहे. काळजीचे कारण नाही.' फ्रेंन्च डॉक्टर खरे तर शहाची क्ष-किरण चिकित्सा करण्याचा आग्रह धरू लागले होते पण अशा सर्वांगीण परीक्षा, शस्त्रक्रिया सुरू झाल्या तर इराणी जनतेला संशय येईल म्हणून त्यांच्या सूचना मोडीत निघाल्या. फ्रेंच डॉक्टर्स निवडण्यातही एक हेतू होता. अमेरिकन डॉक्टर्स निवडले असते तर त्यांच्याकडून अमेरिकन सरकारला हा आजार कळला असता... मग अमेरिकेने मदतीचा हात आखडता घेतला असता... इराणी राजकारणाला वेगळे रूप मिळाले असते. सर्व विचारांती दरवर्षी दर ५-६ आठवड्यांनी डॉ. फ्लँड्रीनने तेहरानला भेट देऊन शहाला तपासावे, असा निर्णय पक्का झाला. ही गोष्ट शहाबानूपासूनही गुप्त ठेवली गेली. १९७७ मध्ये शाहबानूला ह्याच फ्रेंच डॉक्टरांनी जेव्हा विश्वासात घेऊन गेली तीन वर्षे शहाला कॅन्सर झाला आहे, असे सांगितले तेव्हा ती हबकून गेली. आता शहापेक्षा शाहबानूला आपल्या पतीच्या आजाराची अधिक जाणीव झाली. शहाला सत्य सांगावं, असं तिचं मत पडलं. अन् तरीही शहापासून, इराणपासून, अमेरिकेपासून ते दडवण्यात आलं. 'क्लोरब्युसिन' हे एकच औषध तेवढं चालू राहिलं... कारण त्याची मात्रा सोपी आणि दुष्परिणाम कमी म्हणून...

इस्लामिक क्रांतीच्या विजयानंतर इराणमधून निघालेले हे पदच्युत शाही कुटुंब प्रथम बहामाज येथं गेलं तेव्हा शहाच्या मानेवर पहिली गाठ दिसू लागली. आणि डॉ. फ्लँड्रिनने केमोथेरपी सुरू केली. तरीही आजार गुप्त ठेवण्यावरच अधिक भर दिल्याने जास्त क्षमतेची औषधयोजना करताच आली नाही. सप्टेंबर १९७९... बहामाजचा आश्रय सुटल्याने देशोधडीला लागलेले हे कुटुंब मेक्सिकोमध्ये आश्रयार्थ आले होते. शहाची प्रकृती अधिक खालावल्याने अखेर अमेरिकेतील डॉ. बेन कीन ह्या तज्ज्ञाला बोलवण्याचा निर्णय

शहाच्या सेवेतील अमेरिकन अधिकाऱ्यांनी घेतला. डॉ. कीनना मेक्सिकोला आणण्यात आले. कॅन्सरचे दुखणे किती विकोपाला पोचलेय ते डॉ. कीनने ओळखले. आणि जगापासून हा रुग्ण व त्याचा रोग गुप्त ठेवण्याची विनंती मान्य करून डॉ. कीनने शहाला 'पीटर स्मिथ' हे नाव दिले. त्याच नावाने केसपेपर्स बनले आणि मलेरिया व कावीळ ह्या रोगाने 'पीटर स्मिथ' आजारी असल्याचा बहाणा सुरू झाला. एव्हाना शहाची प्रकृती झपाट्याने ढासळू लागली. मुळातच डॉ. कीनचे आगमन डॉ. फ्लँड्रिनला अपमानकारक वाटत होते. त्यातच डॉ. कीनने 'पीटर स्मिथ'ला न्यूयॉर्कला नेण्याचे ठरवले. २२ ऑक्टोबर १९७९ रोजी 'पीटर स्मिथ' न्यूयॉर्कच्या हॉस्पिटलात भरती झाला. तिथे पित्ताशयावरील शस्त्रक्रिया आणि किरणोत्सर्गी औषधयोजना सुरू झाली. ह्या हॉस्पिटलमध्ये शहाची प्लीहा काढून टाकावी अगर नाही ह्यावर डॉक्टरांचे एकमत होईना. वैशिष्ट्य म्हणजे ह्या सर्व डॉक्टरांमध्ये एकच कॅन्सरतज्ज्ञ होता नि त्याच्याशी मतभेद होऊन त्याला ह्या पथकातून हटविण्यात आले.

दि ४ नोव्हेंबर १९७९ – इराणच्या राजधानीत तेहरान येथे क्रांतिकारकांनी अमेरिकन दूतावासावर चाल करून ६६ अमेरिकनांना ओलीस ठेवले. 'गुन्हेगार शहाला इराणच्या ताब्यात द्या तरच ओलिसांची मुक्तता होईल', असा ठाम पवित्रा क्रांतिकारकांनी घेतला नि एका ऐतिहासिक राजनैतिक वादळाला तोंड लागले. आता शहाने अमेरिकेत राहणे व्यवहार्य नव्हते. ६६ ओलिसांच्या सुरक्षेसाठी शहांना अमेरिकेबाहेर काढणे हितावह वाटून कडेकोट बंदोबस्तात २ डिसेंबर १९७९च्या पहाटे शहा, शाहबानू व मुले ह्यांना एका विमानाने सात अँटोनियो विमानतळावर व तेथून अँब्युलन्सने लष्करी रुग्णालयाच्या मनोरुग्ण विभागात नेण्यात आले. तसा शाहबानूचा तोल गेला. तिचा संताप पाहून अखेर ह्या मंडळींना तेथीलच एका निवासस्थानात ठेवले गेले आणि शहाला आश्रय देण्यास कोणी देश तयार आहे काय, ह्याचा शोध सुरू झाला.

फक्त दोन देश पुढे आले. पनामा आणि दक्षिण आफ्रिका. द. आफ्रिकेतच पूर्वी शहाच्या वडिलांना मृत्यू आला होता त्यामुळे शहाने द. आफ्रिकेचा प्रस्ताव धुडकावला आणि १५ डिसेंबर १९७९ रोजी हे दुर्दैवी कुटुंब पनामाच्या आश्रयार्थ रवाना झाले. जनरल टॉरिजोसला शहाच्या आजाराची कल्पना दिली होती त्यामुळे त्याचा व्यक्तिगत डॉक्टर कार्लोस गार्सिया एगीलेश ह्याची शहाच्या उपचारार्थ नेमणूक झाली. पनामाच्या डॉक्टरांनी शहाच्या केसमध्ये आणखी गुंतागुंत करून ठेवली, अखेर डॉ. फ्लँड्रिनला पॅरिसहून पनामाला यावे लागले. एव्हाना इराणने पनामाचा पाठपुरावा सुरू केला. 'शहाला आमच्या ताब्यात द्या.' ह्या पूर्वीच्या लेखांकात सांगितल्याप्रमाणे पनामाच्या सत्ताधीशाने शाहबानूला वश करण्याचा प्रयत्न सुरू केलाच होता. तेथे तिला सुरक्षितता राहिली नव्हती. जनरल टॉरीजोस आपल्याला जिणे नकोसे करील, कदाचित शहाला इराणच्या ताब्यात देईल, कदाचित शहाचा खूनही करील ह्या शंकेने बाईला घेरून टाकले. शहाचा कॅन्सर तेथे भरमसाठ वेगाने

फोफावू लागला. टॉरीजोस प्रत्यक्षात डबल गेम खेळत असल्याची शंका यावी, एवढे रहस्यमय वातारण निर्माण झाले. शाहबानूच्या विनंतीनुसार आलेले डॉ. फ्लँड्रिन, डॉ. कीन ह्यांना पनामाचे सैनिक हॉस्पिटलमध्ये प्रवेश देईनात... शाहबानूला टॉरीजोसची निमंत्रणे येण्याचा परिपाठ चालूच... शाहबानू फराह हादरली आणि इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अन्वर सादत ह्यांची पत्नी मादाम जिहान सादत हिला फोनवर फोन करून हुंदके देऊ लागली. जिहानने पतीला विश्वासात घेतले. आणि अन्वर सादतनी आश्वासन दिले – 'ह्या कुटुंबाला इजिप्त आश्रय देईल... मग भले इजिप्तमध्ये पेच निर्माण झाला तरी बेहत्तर!'

एका रविवारी हे कुटुंब पनामातून निघाले नि दुसऱ्याच दिवशी पनामामध्ये इराणचे दूत शहाला आपल्या ताब्यात घेण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे घेऊन पनामाच्या परराष्ट्र कार्यालयात घुसले. त्याच सुमाराला जनरल टॉरीजोसनं हुकूम सोडला – 'त्या राणीनं मला झिडकारलं. ती मिळाली नाही... ठीक आहे... तिची पांघरुणं धुवायला टाकू नका. आज रात्री मी तीच पांघरुणं वापरणार आहे.'

२६ मार्च १९८० पासून इजिप्तमध्ये शहाच्या कॅन्सरवर शिस्तबद्ध इलाज सुरू झाले. पण एव्हाना हा विकार हाताबाहेर गेला होता. जिहान सादतच्या बाहुपाशात एकेकाळची इराणची सम्राज्ञी धाय मोकलून रडत सुटली. आता डॉ. कीन, फ्लँड्रिन, डी बेकी सर्वच डॉक्टरांना इजिप्तचे दरवाजे खुले होते. संपूर्ण मध्य पूर्वेत इजिप्तविरुद्ध वातावरण तापू लागले. शहाला आश्रय दिल्याबद्दल कर्मठ मुस्लिमांचे गट उघडपणे अन्वर सादतवर टीका करू लागले. इजिप्तमध्ये पाताळयंत्री प्रिन्सेस अशरफ येऊन ठेपली नि शहाच्या उपचाराबाबत, देखभालीबाबत क्षणोक्षणी शाहबानूबरोबर भांडणे करू लागली. नणंद-भावजयीच्या वादात मादाम जिहान सादत मध्यस्थी करताना थकू लागली. शहाचे हाल पाहून शाहबानूने अखेर जुन्या डॉ. फ्लँड्रिनला बोलावून घेतले. कैरोमध्ये फ्रेंच डॉक्टरांनी शहाच्या पोटावर शस्त्रक्रिया करून दीड लिटरभर पू-मिश्रित रक्त काढले. पण तब्येत ढासळतच गेली. अशरफच्या तक्रारी चालूच होत्या. पण आयुष्याच्या ह्या टप्प्यावर शहाने एका शब्दानेही कसली म्हणून तक्रार केली नाही. ना दुखण्याची... ना रोगाची... ना पूर्वी झालेल्या हेळसांडीची!... मृत्यू त्याला आता स्पष्टपणे खुणावू लागला. २७ जुलै १९८० रोजी शहा मरण पावला. मृत्युसमयी आपल्या वहिनीला तेथे राहण्यास मनाई करून प्रिन्सेस अशरफच पहारा देत बसली होती.

शहाच्या मृत्यूनंतर १९८२ पर्यंत शाहबानू आपल्या मुलांसह इजिप्तमध्ये राहिली. पुढे अमेरिकेस गेली. पनामाचा सर्वेसर्वा जनरल टॉरीजोस १९८१ च्या ऑगस्टमध्ये विमान अपघातात मरण पावला. प्रिन्सेस अशरफ न्यूयॉर्क आणि पॅरिस ह्या दोन ठिकाणी वास्तव्य करू लागली. आणि... इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अन्वर सादत?... एका संकटग्रस्त स्त्रीला बहीण मानून तिला व तिच्या जर्जर विकल, सत्ताहीन, मृत्यूच्या दाराशी पोचलेल्या पतीला विशाल

हृदयाने आश्रय देणारे, माणुसकीला प्राधान्य देणारे सादत?... कर्मठ विचारसरणीच्या, अतिरेक्याच्या गोळीची शिकार बनले. माणुसकीबद्दल स्वतःच्या प्राणाचे मोल त्यांना द्यावे लागले.

१०/४/८९

***

# १७

# मे हिज सोल रेस्ट इन पीस!

संस्कृती कोठल्याही देशाची असो अगर धर्म कोठलाही असो, मानवी जीवनातील काही संस्कार केवळ अनिवार्यच असतात. नामकरण-दीक्षा-विवाहादी संस्कारांची व्यर्थता अगर उपयुक्तता हा वादाचा विषय होऊ शकेल. पण अंत्यसंस्कारांचे महत्त्व वादातीत आहे. अंत्यसंस्कारातून त्या मृत व्यक्तीची संस्कृती दिसत नसते तर मागे राहिलेल्या समाजाची संस्कृती स्पष्ट होत असते. समाजात माणसं आहेत की गिधाडं आहेत हे अंत्यसंस्कारातून समजतं. मागे राहिलेल्या माणसांच्या समूहात माणुसकीचा अंश असेल तर शत्रूवरही अंत्यसंस्कार होतात. अंत्येष्टीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हे महत्त्व रामायणातही स्पष्ट होते... महाभारतातही दिसते... सॉफक्लीसच्या 'अँटीगनी' मध्ये कळते... ओल्ड आणि न्यू टेस्टॅमेंटमध्येही दिसते. कारण मुळातच मानवता धर्मात ह्या संस्काराला महत्त्वाचे स्थान आहे. माणसाला बेवारस मृत्यू येणं... कोल्ह्या-कुत्र्याची मौत मिळणं. नि तशा मृत्यूनंतरही त्याच्यावर अंत्येष्टी न घडणं हे त्या व्यक्तीच्या दृष्टीने दुर्दैव असते नि त्याच्या कुटुंबाच्या दृष्टीने कायम सलणारे शल्य असते.

– असेच शल्य एक कुटुंब गेली ३१ वर्षे बाळगीत आले. तब्बल ३१ वर्षांनंतर शुक्रवार दि. १६ जून १९८९ रोजी ह्या कुटुंबाच्या प्रमुखावर अन्त्यसंस्कार घडावेत? ही व्यक्ती केवळ कुटुंबप्रमुखच नव्हती तर राष्ट्रप्रमुखही होती नि त्यांच्यावर सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार व्हावेत म्हणून फक्त त्यांचे कुटुंबच तळमळत होते असे नव्हे तर त्यांचे राष्ट्र,

त्यांच्या विचारांना मान देणारे नागरिक आणि ज्या पिढीने त्यांना कधी पाहिलेच नव्हते ती गेल्या तीन दशकांतील युवक मंडळीही त्यांना न्याय मिळावा म्हणून वेळोवेळी मागणी करीत होती. अखेर तो न्याय पूर्णांशाने जरी नाही तरी काही अंशी का होईना मिळत आहे.

ह्या एकतीस वर्षांच्या अवधीत ह्या राष्ट्रप्रमुखाच्या पत्नीने आरंभीच्या काळात न्यायाची याचना केली होती. किमान आपल्या पतीचे पार्थीव अवशेष कोठे आहेत, हे तरी सांगा म्हणून तिने विनवणी करून पाहिली. पण कम्युनिस्ट राजवटीत विनवणीला किंमत नसते, आणि दहशत हे फार मोठे शस्त्र असते. ती स्त्री हरली. त्यांच्या मुलांनी मग मधून मधून ही मागणी पुढे चालवली. पण मुलेही थकली, हिंमत न हरता कायम लाढा चालू ठेवायला पुढे आली ती त्यांची कन्या! – 'माझ्या पित्याचे अवशेष कोठे आहेत ते सांगा, ते आमच्या ताब्यात द्या, आम्हाला त्यांच्यावर अंत्यसंस्कार करायचे आहेत! माझ्या वडिलांच्या नावावर कलंक लागला आहे नि तो अन्यायकारक आहे. माझ्या वडिलांना न्याय द्या', ही त्यांच्या मुलीची मागणी सातत्याने चालूच राहिली. ह्या मुलीचे नाव आहे एर्झबेट नागी. एर्झबेट हे 'एलीझबेथ' चे हंगेरियन रूप. ज्या पित्यासाठी ती जीवाचे रान करीत आली ते इम्रे नागी! दि. १६ जून १९५८ रोजी इम्रे नागींना कुत्र्याचं मरण मिळालं... त्यांचा निकटचा सहकारी व हंगेरीचा तेव्हाचा संरक्षणमंत्री पॉल माल्तर ह्यालाही नागींच्या बरोबर भयानक मृत्यू दिला गेला नि दोघांचेही मृतदेह गुप्तपणे अज्ञातस्थळी हलविले गेले. ते स्थळ ३१ वर्षे त्यांच्या कुटुंबियांपासून गुप्त राखले गेले नि ३१ वर्षे इम्रे नागी म्हणजे 'देशद्रोही', 'विश्वासघातकी' असाच प्रचार कायम ठेवला. एर्झबेट नागी हिच्या शिकस्तीच्या प्रयत्नामुळे आणि हंगेरीच्या मंत्रिमंडळातील एक नवमतवादी सदस्य तथा पॉलिट ब्युरोमधील जबरदस्त आसामी इम्रे पॉझगे ह्यांच्या धोरणामुळे दि. १६ जून १९८९ रोजी हंगेरीची राजधानी बुडापेस्ट येथील मध्यवर्ती दफनभूमीत खास अंत्येष्टी होत आहे...

इम्रे नागी प्रकरणी १९८८ च्या २१ डिसेंबर रोजी पहिली हालचाल झाली. सरकारी अधिकारी एर्झबेट नागी व तिच्या पतीच्या निवासस्थानी आले. '१९८९ च्या वसंत ऋतूत अगदी खासगी पातळीवर तुम्ही तुमच्या वडिलांवर अंत्यसंस्कार करून त्यांचे पुनश्च दफन करू शकता' असा सरकारी निरोप त्यांनी एझबिटकडे दिला. त्यानंतर १९८९ च्या फेब्रुवारी महिन्यात अघटित प्रकार घडला. हंगेरियन टेलिव्हिजनवर चालू असलेला करमणुकीचा कार्यक्रम थांबवून चक्क प्रेक्षकांसमार एर्झबेटला आणण्यात आले आणि नागरिकांच्या पोटात गोळा उठला, 'ही तर इम्रे नागींची कन्या! हिचं काही बरवाईट तर झालं नाही ना? ही पण वडिलांच्या मार्गाने जाणार की काय!' – मने धास्तावली होती. एर्झबेटने मग टी. व्ही. वरून जनतेस जाहीर केले की, इम्रे नागींवर रीतसर अंत्यविधी करण्याची सरकारने संमती दिली आहे. लोकांचा विश्वास बसेना. एर्झबेटच्या दर्शनानंतर ताबडतोब हंगेरीच्या न्यायखात्याच्या सचिव गुला बे बोरिक्स ह्या टी.व्ही. च्या पडद्यावर आल्या. 'नागींवर

अंत्यसंस्कार करण्यामध्ये कायदेशीर अडथळे होतेच, शिवाय योग्य ती राजकीय परिस्थिती निर्माण होण्याचीही गरज होती', असे त्यांनी सरकारच्या बाजूने सांगितले नि मग टी. व्ही. कॅमेरा बुडापेस्टच्या राकोस्केरेझर दफनभूमीवर स्थिरावला... प्लॉट क्रमांक ३०१! तेथे स्मरणशिला नव्हतीच तर मेणबत्ती अगर फुले कशी असावीत? ह्या ३०१ क्रमांकाच्या तुकड्यावर ३१ वर्षे इम्रे नागींचे अवशेष कसेबसे पुरलेले किंवा दडवलेले आहेत. ह्याच सुमाराला हंगेरीच्या पॉलिट ब्युरोनेही निर्णय घेतला की, कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीची खास सभा भरवून राजकीय सुधारणांवर चर्चा करावी. राजकीय सुधारणांच्या यादीत सर्वांत आधी क्रमांक आहे तो १९५६ मधील उद्रेकाचा – अर्थात इम्रे नागींचा... त्यांच्या पुनर्वसनाचा!

आज हंगेरीत इम्रे नागी हे नाव खुले आम उच्चारण्याची मोकळीक मिळाली आहे. पण अगदी गेल्या वर्षापर्यंत तशी कोणाची हिंमत होत नव्हती. त्यांचे नाव उच्चारायचे ते देशद्रोही म्हणूनच! 'वॉरसा करारा'तून बाहेर पडण्याचा डाव रचणारे विश्वासघातकी इम्रे नागी, 'कुटिल कारस्थानी देशद्रोह्यां'चे नेते इम्रे नागी हीच नव्या पिढीलाही त्यांची ओळख करून देण्याचा शिरस्ता पडला होता. पण आजही त्यांच्या धोरणाला पाठिंबा देणारे, त्यांचा नामोच्चार करताना कंठ रुद्ध होणारे हंगेरियन आहेत... त्यांच्या स्मरणातून १९५६ चा नोव्हेंबर महिना कधीच पुसला जाणार नाही. इम्रे नागींच्या लोकशाहीवादी विचारसरणीस चिरडून टाकण्यासाठी १९५६ च्या नोव्हेंबरमध्ये 'वॉरसा करारा'चे संरक्षक ह्या नात्याने रशियाने हंगेरीत रणगाडे घुसविले होते. रशियाच्या अफाट आकारापुढे हंगेरी म्हणजे एक इवलासा ठिपका! हंगेरी हा बुद्धिमंतांचा देश. जेमतेम एक कोटी लोकसंख्या. ह्या देशातील स्त्रिया सर्व जगात सर्वांत सुंदर त्वचारोग्य लाभलेल्या म्हणून ख्यातकीर्त आहेत. सहस्रावधी वर्षे हंगेरियन महिलांनी केवळ फळांपासून व फुलांपासून त्वचा सौंदर्यरक्षक प्रसाधने बनविण्याची कला जपली आहे. पण हंगेरीच्या नावे एक मोठा अभिमानास्पद विक्रम नोंदला गेला आहे - नोबेल पुरस्कारांचा! नोबेल पारितोषिक विजेत्यांमधे हंगेरियन मूळ असलेल्या शास्त्रज्ञ- विचारवंतांची संख्या सर्वाधिक आहे. अमेरिकेचे जगप्रसिद्ध पत्रकार जोसफ पुलित्झर हे मुळचे हंगेरियनच! इम्रे नागी ह्याच भूमीतील. बुद्धिमान, विचारवंत आणि लोकशाहीच्या ध्यासाशी तडजोड न करणारे! हंगेरीच्या पंतप्रधानपदी असलेले इम्रे नागी 'लोकशाही', 'राजकीय स्वातंत्र्य', 'नवमतवाद' असे शब्द उच्चारू लागताच ते रशियाला सहन होणे शक्यच नव्हते. रशियाने टिंबाएवढ्या हंगेरीवर आक्रमण केल्यावर हा देश प्रतिकार तरी कसा नि काय करणार? रशियन रणगाड्यांनी २००० हंगेरियनांना अक्षरशः चिरडले. वादळ घोंगावू लागताच इम्रे नागी व त्यांचे एकनिष्ठ सहकारी बुडापेस्टमधील युगोस्लाव्हियन राजदूतावासात आश्रयार्थ गेले पण युगोस्लाव्हियाही हतबल होता. इम्रे नागींना रशियाने अटक केली. 'देशद्रोही पंतप्रधान अखेर सापडला' अशा शब्दात हंगेरियन

जनतेला त्यांच्या राष्ट्रप्रमुखाच्या अटकेची वार्ता रशियाने दिली. रशियात तेव्हा कारकीर्द निकिता ख्रुश्चेव्हची होती. तरीही तत्पूर्वीच्या स्टॅलीनशाहीच्या पद्धतीत काही बदल झालेला नव्हता. इम्रे नागी आणि त्यांचे सहकारी ह्यांना 'वॉरसा कराराचे खुनी', 'कपटी कारस्थानी', 'हंगेरीचे विश्वासघातकी' असे आरोप ठेवून १६ जून १९५८ रोजी अत्यंत कपटाने गोळ्या घालून ठार करण्यात आले. त्यांच्या कुटुंबियांपासून हा प्रकार गुप्त ठेवला गेला. नि एक दिवस रशियाने जाहीर केले- 'देशद्रोहाबद्दल इम्रे नागींना देहांताची सजा.'

हंगेरी त्यानंतर बिथरलाच! एकूण २००००० हंगेरियनांनी ह्या घटनेनंतर देशांतर केले. अमेरिका व स्वीडनचे नागरिकत्व स्वीकारले. हंगेरीच्या एकूण लोकसंख्येच्या ५ टक्के नागरिक मायभूमी सोडून गेले. त्यात अधिकाधिक बुद्धिमंत, प्रज्ञावंत होते. नागी कुटुंबाची परवडही सुरू झाली. तथापि इम्रे नागींच्या सत्तेवर आलेल्या जानोस कादार ह्यांनी काही प्रमाणात ह्या कुटुंबाला स्थैर्य व शांतता दिली. मात्र त्यांच्या अंत्यसंस्काराची मागणी वेळोवेळी धुडकावली जाई. कारण उघड होते. रशियाची भीती होती. रशियाच्या टाचेखाली जाणे केवढे दाहक असते ह्याचा अनुभव घेऊन हंगेरी पोळले होते. आज पुलाखालून भरपूर पाणी वाहिले आहे. रशियात मिखाएल गोर्बाचेव्ह ह्यांच्या रूपाने मुक्ततावाद व लोकशाही अवतरली आहे. रशियातील गोर्बाचेव्ह ह्यांच्या 'ग्लास्तनोस्त' मुळे स्फूर्ती घेऊन हंगेरीचे परराष्ट्रमंत्री इम्रे पॉझगे ह्यांनी १९५६ चा उठाव ही जनतेची चळवळ होती असे प्रथम १९८८ च्या डिसेंबरमध्ये उघडपणे जाहीर केले. पॉझगे जणू हंगेरियन जनतेच्या मनातलेच बोलून गेले. पॉझगे अमेरिकेला गेले असता त्यांनी तेथे सरळ इम्रे नागी ह्यांची प्रशंसा केली. मंत्रिमंडळातील अनेक सदस्यही त्यांच्याच मताचे निघाले. तशातच हंगेरीतील नवा पक्ष - 'फेडरेशन ऑफ फ्री डेमॉक्रॅटस्'ने नागींचे पुनर्मूल्यांकन केले जावे, अशी मागणी जोरकसपणे मांडायला सुरुवात केली. इम्रे नागी आजही हंगेरियन जनतेचे श्रद्धास्थान आहेत नि १९५६ चा उद्रेक हे हंगेरीचे 'लोकसमर' होते ह्यातील सत्यता किती काळ नाकारणार? एकतीस वर्षांनंतर ह्या लोकनेत्याचे होत असलेले दफन हा एझबिटचा, जनतेचा व लोकशाहीचा विजय!

१२/६/८९

– बगदाद ही ऐतिहासिक, प्राचीन नगरी... जेव्हा इराक हे 'इराक' नव्हते आणि 'मेसोपोटेमिया' म्हणून इतिहासात नमूद झाले होते त्याच्या किती तरी आधीपासून 'बगदाद' आपल्या जागीच आहे... इतिहास, भूगोल, साहित्य व संस्कृतीत चिरंतन राहिले आहे. हजरत पैगंबरांचे वारस, खलिफांची परंपरा हा इतिहास लाभलेले व एक जगप्रसिद्ध शैक्षणिक-सांस्कृतिक केंद्र म्हणून ख्यातनाम झालेले बगदाद अत्यंत रूपवान नगरही बनले ते 'अब्बासिड' ह्या सुप्रसिद्ध राजवंशामुळे! 'अब्बासिड' घराण्याला वास्तुशिल्पाची जबरदस्त आवड होती आणि आपण बांधविलेल्या पुलांमधील चिरादेखील सहस्र वर्षे हलणार नाही; असे हे 'अब्बासिड' वंशी अभिमानाने सांगत असत. खरोखरच ही बांधकामे आजही तेवढीच मजबूत आहेत. मात्र जागोजागी दिसणाऱ्या इतिहासाच्या खुणांमध्ये सद्दाम हुसेन ह्यांनी एक नवी निशाणी उभी केली आहे. त्याला ते इराणवरील विजयाचे स्मारक म्हणवितात. बगदादच्या एका ऐसपैस मुख्य रस्त्यावर डावी-उजवीकडून दोन ६० फुटी लांब बाहू उभारले आहेत. ह्या दोन्ही हातांच्या मुठी वळलेल्या आहेत नि प्रत्येक मुठीत तलवार आहे... रस्त्यापासून १४० फूट उंचीवर ह्या उपसलेल्या तलवारी एकमेकींना छेद देतात आणि रस्त्यावर प्रचंड कमान करतात. हीच ती विजय कमान! हे खड्गधारी बाहू आपल्याच हातांबरहुकूम बनविले पाहिजेत, असा सद्दाम हुसेन ह्यांचा आग्रह होता. त्यामुळे ब्राँझमधून हे शिल्प साकारताना प्रत्येक स्नायू, धमन्या, बोटांचे आकार सारे सारे सद्दाम हुसेन ह्यांच्याच खऱ्याखुऱ्या हातांवरून बनविले आहेत. एकवेळ तलवारींवर पकड ठेवणे सहजसाध्य असेल, पण एका मोठ्या राष्ट्रावर वर्षानुवर्षे पकड ठेवणे कष्टसाध्य आहे नि सद्दाम हुसेन ह्यांना ते छान जमले आहे. इराकची बरीच मोठी जनसंख्या शियापंथीय आहे. शेजारचे राष्ट्र इराण तर कट्टर शियापंथी आहे आणि अशा स्थितीत सुन्नी पंथी सद्दाम हुसेनने इराकी जनतेवर आपला प्रभाव टिकविला आहे, ही विशेष बाब आहे.

एके काळी इस्लामी जगतावर बगदादचा प्रभाव मोठा होता, कारण ते खलिफांचे केंद्र होते. एखाद्या मुस्लिम योद्ध्याने कोठला देश जिंकून तेथे आपले राज्य स्थापले तर लागलीच तो खलिफांकडे आपला विजय नोंदवीत असे. अशा जेत्याच्या नव्या सल्तनतीला खलिफांकडून आशीर्वाद येत. हिंदुस्थानात सल्तनत स्थापणाऱ्या घोरी-गझनी-ऐबकापैकी गुलाम अल्तमश ह्याला सर्वांत प्रथम बगदादहून खलिफांकडून राजवस्त्रे आली होती. ही पद्धत पुढे थांबली आणि बगदादऐवजी अर्वाचीन काळात ऑटोमन साम्राज्यामुळे तुर्कस्तानकडे इस्लामी जगतातील प्रमुख स्थान आले. दुसऱ्या महायुद्धाच्या पश्चात इस्लामी जगतावर इजिप्तचा अधिक प्रभाव पडू लागला. इजिप्तचे भूतपूर्व अध्यक्ष अब्देल गमाल नासेर ह्यांना मुस्लिम राष्ट्रे मोठा मान देत. शिया-सुन्नी पंथभेद विसरून सर्व इस्लामी जगताने गुण्यागोविंदाने राहावे, प्रत्येक राष्ट्राने आपापली प्रगती साधावी आणि इस्लामी राष्ट्रांनी आपसात लढू नये, असे नासेर ह्यांचे स्वप्न होते. सर्व इस्लामी राष्ट्रांना आपण मार्गदर्शन

# १८

※

# कुवेतवर स्वारी

'आमच्या वेळापत्रकानुसार आम्ही कुवेतमधून आमची फौज काढून घेऊ', हे इराकचे राष्ट्राध्यक्ष सद्दाम हुसेन ह्यांचे आश्वासन ही दि. ५/८/९० ची एक प्रमुख वार्ता होती, पण ज्यांना सद्दाम हुसेननी इराणच्या बाबतीत दिलेले आश्वासन आठवत असेल त्यांना ह्या शब्दावर कितपत विश्वास ठेवावा ते सांगायला नको. शात-अल्-अरब या प्रदेशाच्या मालकीवरून सद्दाम हुसेननी आयातुल्ला खोमेनींच्या कारकीर्दीत इराणवर चढाई केली तेव्हा अरब जगताला असेच आश्वासन दिले होते की, काही दिवसांपुरतीच ही लढाई आहे... प्रत्यक्षात १९८० मध्ये सुरू झालेले इराण-इराक युद्ध १९८८ मध्ये थांबले. या आठ वर्षांच्या कालावधीत ५ लक्ष माणसे कामी आली आणि ५०० बिलियन डॉलर्स ह्या युद्धाने खाल्ले नि इराक व इराण ही दोन्ही राष्ट्रे मनुष्यबळाचा नाश व प्रचंड वित्तहानीचे जबर आघात सोसून सर्वच आघाड्यांवर घायाळ होत गेली. हे एक असे युद्ध होते की, ज्यात जय-पराजय कोणाचाच नव्हता. त्या युद्धाचा अंत कोणालाही निर्णायक विजयश्री न देता शस्त्रसंधी व शांतिकराराच्या पायरीवर घडून आला— पण आजही सद्दाम हुसेन यांचा दावा आहे की, ह्या युद्धात इराक विजयी झाले. सत्य म्हणून एखादे कल्पित जेव्हा पुन: पुन्हा ठासून सांगितले जाते, तेव्हा ते स्वीकारले जाते देखील! सद्दाम हुसेन ह्यांनी आपणच विजयी झाल्याचा आपला विश्वास ऐतिहासिक पुरावा बनवून ठेवण्याचाही प्रयत्न केला आहे.

करावे, असेही नासेर ह्यांना मनापासून वाटे... खैर... नासेर ह्यांचे स्वप्न आणि मनीषा अधुरी राहिली. मात्र सद्दाम हुसेन हे स्वतःला नासेर ह्यांचा वैचारिक वारस मानू लागले आणि अखिल इस्लामी जगताचे नेतृत्व आपणाकडे यावे, अशी महत्त्वाकांक्षा जोपासू लागले. तथापि नासेरचे मार्ग वेगळे होते. सद्दाम हुसेनचे मार्ग वेगळे आहेत.

अरब जगत सद्दाम हुसेन ह्यांना ओळखत नाही, असे नव्हे. त्यांची महत्त्वाकांक्षाही ते जाणून आहेत. जोवर सद्दाम हुसेन खोमेनींच्या इराणशी चार हात करीत होते, तोवर अरब जगताने उलट त्यांना सक्रिय पाठिंबा दिला होता. ह्या अरब राष्ट्रांना खोमेनींचे विचार आपल्या देशांच्या सीमा ओलांडून कधीच येऊ नयेत अशी इच्छा होती आणि खोमेनींच्या कट्टर शियापंथाचे पुनरुज्जीवनही नको होते. त्यामुळे संयुक्त अरब अमीराती, कुवेत, सौदी अरेबिया ह्यांनी इराकला इराणबरोबर युद्धात आर्थिक सहकार्यही केले. कुवेत तसे इटुकले राष्ट्र. आखातातील केवळ २२५ किलोमीटर सागरी किनारा लाभलेल्या ह्या राष्ट्राचे क्षेत्रफळ अवघे १८,००० चौरस किलोमीटर आहे. उत्तरेला इराकशी तर दक्षिणेला सौदी अरेबियाशी त्याच्या सीमा भिडल्या आहेत. कुवेतचे अमीर शेख जबेर अल-अहमद अल-सबाह ह्यांचे हे राजघराणे २४० वर्षांचे आहे. शेख जबेर हे १३वे राजप्रमुख. इ. स. १७७५ मध्ये अल-सबाह घराण्यातील तेव्हाच्या अमीराची व इंग्लंडची स्नेहबंधने दृढ होऊन १८९९ मध्ये अमीर व ब्रिटन ह्यांच्यात करार झाला. त्यानुसार कुवेतचे रक्षण आणि परराष्ट्र खाते इंग्लण्डने सांभाळावे असे मुक्रर झाले. १९६१ मध्ये कुवेत पूर्णपणे स्वतंत्र झाले. अरब जगतातील पहिली निर्वाचित संसद कुवेतमध्ये अस्तित्वात आली. पण नव्याने स्वतंत्र झालेल्या कुवेतवर पहिला आक्रमणाचा धोका इराककडूनच आला. ऑटोमन तुर्की साम्राज्याच्या काळात कुवेत हा इराकचा भाग समजला जाई तेव्हा आजही कुवेत इराकच्याच मालकीचे आहे, असा इराकने १९६२ मध्ये आग्रह धरला होता. इंग्लंड, सौदी अरेबिया व इतर अरब राष्ट्रे कुवेतच्या रक्षणार्थ धावली. त्यामुळे इराकला तेव्हा आवरते घ्यावे लागले. पिटुकले आकारमान आणि जेमतेम १.९ मिलियन लोकसंख्या असलेल्या कुवेतने साहजिकच विदेश नीतीत सातत्याने अलिप्त राहणे पसंत केले, पण अलिप्ततेला मर्यादा असते. अरब राष्ट्रांमध्येच खिंडारे पडू लागल्यावर कुवेतला गल्फ को-ऑपरेशन कौन्सिलमध्ये प्रवेश घेणे हिताचे ठरले. इराक-इराण युद्धात कुवेत कोंडीत पडले. कट्टर शियावाद थोपवायचा तर इराणला विरोध करणे आलेच. इराकने पूर्वीच आक्रमणाची धमकी घातलेली! अशा कोंडीत कुवेतने इराकला चक्क १० बिलियन डॉलर्सचे बिनव्याजी कर्ज दिले. कुवेतची संपूर्ण आर्थिक घडी खनिज तेलावर उभी आहे. कुवेत आज समृद्ध आहे. प्रागतिक आहे. जगात सर्वात अधिक दरडोई उत्पन्न कुवेतमध्ये आहे. १९८५ मध्येच हे दरडोई उत्पन्न १३,१०० डॉलर एवढे होते. या देशाची निव्वळ गंगाजळी ८० बिलियन डॉलर्स एवढी आहे आणि आणखी १७५ वर्षे कुवेतची भूमी तेलाचे दान देत राहील, एवढी

'तेलकट' आहे. कुवेतला अमीर (सत्ताधीश) एकच असला तरी तेथील प्रत्येक नागरिक अमीर (श्रीमंत) आहे, असे कुवेतबाबत थट्टेने बोलले जाते.

—पण इराकची खेळी कुवेतला कळली नाही. युद्धात कर्ज देऊनही इराकला संतुष्ट ठेवणे म्हणजे खरे तर सद्दाम हुसेनला संतुष्ट ठेवणे शक्य नव्हते हे सिद्ध झाले. आता हे कर्ज रद्द करा असे सद्दाम हुसेनने कुवेतला सांगितले (खरे तर फर्मावले). तर आणखी २.४ बिलियन डॉलर्स कुवेतनेच इराकचे चोरलेत असा दावा केला. कसा? तर इराक-कुवेत ह्यांच्या सामायिक तेलक्षेत्रातून इराक युद्धात गुंतलेय हे पाहून म्हणे कुवेतने तेल चोरले! तेलाच्या जागतिक व्यापारात कुवेतमुळे इराकचे म्हणे १४ बिलियन डॉलर्सचे नुकसान झाले तेही कुवेतने भरून द्यावे असाही आग्रह इराकने धरला.

—जुलै महिन्यात जिनिव्हा येथे जगातील पेट्रोलियम निर्यातदार राष्ट्रांच्या संघटनेची (ओपेक) बैठक सुरू झाली नि त्याच बैठकीत कुवेतवर इराकने आरोपांची तोफ डागली. कुवेत व संयुक्त अरब अमिराती ह्यांनी दर दिवशी उपसा केल्या जाणाऱ्या तेलाचे प्रमाण वाढविण्याचा प्रस्ताव ठेवताच इराकला आयती संधी चालून आली. तेलाचे उत्पादन वाढविल्यावर जागतिक पातळीवर तेलाचा भाव उतरणार हे उघड आहे. इराकला हा भाव उलट आणखी वाढवायचा आहे, कारण ८ वर्षांच्या युद्धामुळे लंगडणाऱ्या आर्थिक गाड्याला आता सावरायला हवे ना! दरदिवशीचे तेलाचे उत्पादन घटवावे म्हणजे तेलाचे भाव वाढीव मिळतील, ही इराकची भूमिका टीकेचा विषय बनताच इराकने कुवेतला 'ओपेक'च्या बैठकीतच धमक्या द्यायला आरंभ केला होता. दि. १७ जुलै रोजी हे धमकीसत्र सुरू झाले आणि २ ऑगस्टला पहाटे इराकी फौज कुवेतमधे घुसलीदेखील. कुवेत व इराक ह्यांचे बलाबल पाहण्याचीही गरज नाही. ८ लाखांची इराकी फौज तर १६००० ही कुवेती लष्कराची क्षमता. इराकची ५०० लढाऊ विमाने तर कुवेतकडे ७० लढाऊ विमाने... इराकचे ४५०० मुख्य रणगाडे नि कुवेतचे २७५... कुठे इराकच्या ४३ युद्धनौका तर कोठे कुवेतच्या २३ गस्ती बोटी. ही तुलना व्हावी कशी? पण तरीही अमीराशी निष्ठा ठेवणारे कुवेती लढले आणि प्राणास मुकले. त्यातही एक विचित्र घटना घडली. सद्दाम हुसेनने जेव्हा आपल्या संरक्षण दलाला कुवेतवर हल्ला करण्याची आज्ञा दिली तेव्हा इराकच्या संरक्षण दलातील १२० वरिष्ठ अधिकारी उठले नि त्यांनी ह्या कृतीस विरोध केला. त्यांचे म्हणणे होते की, खेळणे चिरडावे तसे कुवेतला चिरडण्यात अर्थ काय? इस्लामी राष्ट्राने अन्य इस्लामी राष्ट्रावर हल्ला करणे उचित आहे काय? इराणबरोबर युद्ध झुंजवून आता कुवेतवर चढाई कशासाठी? ह्या सर्व १२० अधिकाऱ्यांना अल्पावधीतच उत्तर मिळाले.

सद्दाम हुसेन ह्यांनी फर्मान काढून ह्या १२० वरिष्ठ अधिकाऱ्यांना मृत्युदंड दिला.

तेलाच्या निमित्ताने झालेली ही स्वारी. त्याला युद्ध म्हणू नये, कारण युद्ध दोन तुल्यबळांत होते. ही तर एकतर्फी कारवाई. तेल निमित्त मात्र ठरले. अरब जगतावर प्रभुत्व

गाजविण्याची महत्त्वाकांक्षा आणि समृद्ध कुवेतचे खुपणारे स्वतंत्र अस्तित्व ह्या स्वारीमागे वस्तुतः आहे. इराकी पकडीतून कुवेत सुटेल अशी चिन्हे दिसत नाहीत. सद्दाम हुसेनबाबत सांगितले जाते की, ते जेव्हा इराकचे उपराष्ट्राध्यक्ष होते तेव्हा... १९६९ मध्ये कायद्याची पदवी परीक्षा देण्यासाठी परीक्षा केंद्रावर गेले, कमरेला पिस्तुल लटकावून नि चार सशस्त्र अंगरक्षक घेऊन! परीक्षकांनी मग परीक्षा देण्याचा सद्दाम हुसेन ह्यांचा त्रासच वाचविला. (नि स्वतःवरील संकटही परतविले.)

६/८/९०

१९

# सवाई तोफेचे रहस्य

**श**स्त्रसामर्थ्य वाढविण्याची ईर्षा काही नवी नाही. अस्त्रांची स्पर्धा रामायण व महाभारतातही होती. आपापल्या राज्याची सुरक्षितता शस्त्रसंपन्नतेवर अवलंबून असते. आज अण्वस्त्रसंपन्नता ही शस्त्रसामर्थ्याचे शिखर मानले आहे. अण्वस्त्रे, रॉकेट्री ह्यांचे महत्त्व वाढले तरी तोफखान दलाचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. हिंदुस्थानच्या इतिहासात तोफखाना दलाला विशेष प्राधान्य देणारे राज्यकर्ते म्हणजे बाबर, अकबर, छत्रपती शिवराय, कान्होजी आंग्रे, पाटीलबोवा महादजी शिंदे आणि टिपू सुलतान. शिंद्यांनी तर जनरल डी बॉईन ह्या फ्रेंचाला त्यासाठी नेमून टाकले होते. टिपूने तर तोफखानाच काय पण रॉकेटमध्येही प्रगती केली होती. चालू विसाव्या शतकातला सर्वांत लक्षणीय तोफखाना मात्र एकट्या जर्मनीचा ठरला. पहिल्या महायुद्धात कैझरच्या 'पॅरीस तोफे'ने हलकल्लोळ माजविला होता, तर दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या 'बर्था तोफे'ने दोस्तांची झोप उडविली होती. 'पॅरीस' व 'बर्था' हे तोफखाना विज्ञानातील प्रमुख टप्पे. दुसऱ्या महायुद्धातच वयाची विशीही न ओलांडलेल्या एका पोराने जबरदस्त काम केले होते. पुढे हा मुलगा आधुनिक रॉकेट विज्ञानाचा आणि आजच्या गाइडेड मिसाइल्सचा पितामह ठरला. त्याचे नाव डॉ. वर्नर व्हॉन ब्राऊन. बर्लीन ते लंडन अशी प्रचंड झेप असलेली व्ही-२ ही रॉकेटस् ह्या पोराने बनवली. हिटलरच्या त्या महाप्रज्ञाची कीर्ती अमेरिकेने टिपली होती. त्यामुळे युद्ध संपल्यावर वर्नरला युद्धकैदी म्हणून न्यूरेंबर्गच्या न्यायालयात न नेता

त्याच्या केसालाही धक्का न लावता, गरज पडल्यास त्याची कागदपत्रे बदलून त्याला सुखरूप अमेरिकेत आणले जावे, असा अलिखित, गुप्त आदेश अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन ह्यांनी काढला होता. आज अमेरिकेची 'सॅटर्न' रॉकेटस् ही वर्नर व्हॉन ब्राऊनची करामत होय. रॉकेट विज्ञानाची झेप डॉ. वर्नर व्हॉन ब्राऊनमुळे अंतरिक्ष गाठण्यास समर्थ झाली. कारण ट्रुमनसारखा कद्रदार रत्नपारखी सत्तास्थानी होता. तशी एखाद्या महाप्रज्ञाची कदर झाली नाही आणि त्याची वृत्ती विध्वंसाकडे वळणारी असेल तर काय होऊ शकते हे स्पष्ट करणारे प्रकरण आता उघडकीस आले आहे. ह्या प्रकरणाचा नायक आहे वर्नर व्हॉन ब्राऊनसारखा विलक्षण बुद्धिमान जेरल्ड व्हिन्सेंट बुल... आधुनिक जगातला सर्वांत थोर तोफखानाविशारद... त्याचा रहस्यभेद केला आहे केवीन ट्रलीज ह्या पत्रकाराने आणि ह्या बुद्धिमंताची उपेक्षा केल्याचा दृश्य परिणाम म्हणजे तोफखाना दलात आज सर्वांत सामर्थ्यशाली होण्याची संधी इराकच्या सद्दाम हुसेनला लाभली आहे.

— ही एक आपल्याच काळात घडलेली सत्य 'तोफ' कथा —

मार्च १९९० ची एक शांत संध्याकाळ. ब्रुसेल्स (बेल्जम) येथील आपल्या इमारतीच्या आवारातून जेरल्ड बुल प्रवेशद्वाराशी आला. पॅसेज ओलांडून तो आपल्या फ्लॅटपाशी आला. खिशातून घराची किल्ली काढली अन् त्याच क्षणी पाठीमागे दडून बसलेला हल्लेखोर पुढे आला आणि अगदी जवळून त्याने जेरल्ड बुलच्या डोक्यात गोळ्या झाडल्या. मोठ्या सफाईने केलेला हा खून निश्चितच व्यावसायिक मारेकऱ्याचे काम होते. कारण पिस्तुलाला सायलेन्सर बसविलेला होता. ना गोळ्यांचे आवाज आले ना बुलच्या कोलमडणाऱ्या देहाचा आवाज आला. मारेकऱ्याला कोणीही पाहिले नव्हते आणि जेरल्ड बुलच्या खिशातील २० हजार डॉलर्सची रक्कमदेखील जशीच्या तशी राहिली होती.जेरल्ड बुल म्हणजे विद्यमान काळातील सर्वश्रेष्ठ तोफखानाविशारद. ६२ वर्षे वयाच्या जेरल्ड बुलची हत्या झाली आणि त्याच्याच बरोबर त्याच्या आयुष्यभराचे स्वप्नही संपले. हे स्वप्न होते एक अफलातून तोफ घडविण्याचे — सवाई तोफेचे — अंतरिक्षात धडाधड उपग्रह उडवू शकणाऱ्या किंवा हजारो मैलांवरून शत्रूच्या प्रांतात कुलपी गोळे ओकणाऱ्या महाकाय हावित्झरचे! खुनाचा तपास लागणे अशक्यच होते.

आता घटनाक्रम गुंतागुंतीचा होऊ लागला. कोठे बेल्जम नि कोठे इंग्लंड! पण ह्या खुनानंतर दोन आठवड्यांनी इंग्लण्डच्या फारसे महत्त्व कधीच न मिळालेल्या टीसपोर्ट बंदरात ब्रिटिश कस्टम अधिकाऱ्यांनी कुतूहलापोटी आठ प्रचंड पोलादी पाईप्स पकडले. त्यांच्या तोंडाची रुंदी एक मीटर होती आणि एकूण रचना अशी होती की एखाद्या तोफेच्या साठ मीटर लांबीच्या बॅरलमध्ये ते फिट् बसावेत. विशेष म्हणजे ब्रिटनमधीलच शेफिल्ड फोर्जमास्टर्स ह्या पोलाद कारखान्यात ते तयार केल्याचा त्यावर शिक्का होता. नि वर स्वच्छ लिहिले होते — 'पेट्रोलियम पाईप्स.' इराकला जाणाऱ्या मालवाहू नौकेवर चढविण्यासाठी

ते टीस्पोर्ट बंदरात आले होते.

ही पाईप जप्तीची घटना होऊन तीन आठवडे उलटल्यानंतर युरोपमधल्या इंग्लंड वगळून पाच देशांमध्ये वेगवेगळ्या पॅकेजेसमध्ये व्यवस्थित भरलेले काही चित्रविचित्र यांत्रिक भाग सापडले. हे सर्व सुटे भाग एका महाकाय अगडबंब तोफेचे होते नि ते सर्व इराकला रवाना होणार होते. म्हणजे ही सवाई तोफ इराकसाठी होती. ह्या घटनांचे धागेदोरे आंतरराष्ट्रीय पातळीवर जुळून एका महत्त्वाकांक्षी योजनेचे रहस्य उघड झाले. ह्या योजनेचे नाव होते 'प्रॉजेक्ट बॅबीलॉन.' कोट्यवधी डॉलर्स आणि बेकायदा शस्त्र वाहतूक करण्याचे एक प्रचंड जाळे वापरून इराकमध्ये ही तोफ घडविण्याच्या ह्या चोरट्या मोहिमेस 'प्रॉजेक्ट बॅबीलॉन' ही गुप्त संज्ञा दिली होती. ही मोहीम फसली हे खरे पण प्रॉजेक्ट बॅबीलॉनची एकूण कथा स्टीव्हन्सन, पो, ॲगथा ख्रिस्टी, जॉन ल कार, कॉनन डॉयल अशा पट्टीच्या रहस्यभेद्यांस खिळवून टाकणारी आहे. हा खरे तर एखाद्या शोकनाट्याचा विषय व्हावा. एका अत्यंत बुद्धिमान शास्त्रज्ञाची ही भीषण शोकांतिका म्हणावी लागेल. तनमनधन ज्या ध्येयासाठी वेचले, त्या आयुष्यभराच्या ध्यासाला कोठलाही पाठिंबा देण्यास पाश्चात्त्य जगताने नकार दिल्याने मनोमन दुखावलेल्या संशोधकाची ही कहाणी. केवळ निराशेपोटी मग ह्या बुद्धिमंताने स्वतःला विकले... तेही कोणाकडे?... रक्तपिपासू, आसुरी महत्त्वाकांक्षी सत्ताधीशांकडे! जेरल्ड व्हिन्सेंट बुल ह्या देवदत्त बुद्धी लाभलेल्या शास्त्रज्ञाने स्वतःच्या कर्तबगारीची पहिली विक्री केली १९८५ मध्ये! इराकने १९८५ मध्ये प्रथम जेरल्ड बुलकडून तोफखाना दलासाठी काही सामग्री खरीदली. त्या वेळी इराण-इराक युद्ध चालू होते. बुलच्या तोफांनी ह्या युद्धात चांगलाच अनुभव इराकला दिला. आज सौदी अरेबियामध्ये अनेक राष्ट्रांचे सैन्य खडे आहे नि त्यांच्यावर इराककडून ह्याच तोफा रोखल्या गेल्या आहेत. ह्या तोफांव्यतिरिक्त बुलने इराकसाठी वाहनांवर बसवून नेता येण्यासारख्या पण अतिशय अवाढव्य अशा दोन शक्तिशाली तोफा बनवल्या. १९८९ मध्ये बगदादमध्ये शस्त्रास्त्र प्रदर्शनात ह्या दोन तोफांचे अनावरण करण्यात आले होते. बुलच्या स्वप्नातील सवाई तोफेची त्यात यंदा भर पडली असती तर सद्दाम हुसेनच्या अतिविध्वंसक शस्त्रसाठ्याला अधिक समृद्धी लाभली असती.

जेरल्ड बुलची हत्या कोणी केली हे आजही कळलेले नाही. इस्रायलची गुप्तचर संघटना 'मोसाद'वर त्यांच्या कुटुंबियांचा वहीम आहे. इस्रायलने ही जबाबदारी नाकारली आहे. पण इस्रायलवर अनेकांचा संशय आहे. कारण वेळोवेळी इस्रायलने इराकच्या वाढत्या शस्त्रसामर्थ्याला निपटून काढले आहे. इराक आण्विक प्रक्षेपणास्त्रे बनवीत असल्याची चाहूल लागताच १९८१ मध्ये इस्रायलने बगदादजवळील ओसीराक अणुभट्टी साफ बेचिराख केली होती. जेरल्ड बुल खून प्रकरणात 'मोसाद'वर जरी संशय असला तरीही बुल ही व्यक्ती अशी होती की, त्याच्या हत्येचा विचार अनेकांना सुचला असावा. इराकी,

ब्रिटिश, अमेरिकन, दक्षिण आफ्रिकन इतकेच काय पण चिलियन गुप्तचरही त्यात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. काण बुल खतरनाक विश्वात वावरत होता. शस्त्रास्त्रांचे गुप्त व्यवहार आणि गैरसोयीच्या व्यक्तींचा बीनबोभाट काटा काढण्यात तरबेज असलेल्या देशोदेशीच्या गुप्तचरांचे हे विश्व कधीच सुरक्षित नसते. जेथे हत्या घडली त्या बेल्जमच्या यंत्रणेकडूनही 'ह्या खुनाचा तपास अद्यापि लागलेला नाही.' असेच सांगण्यात आले. एवढे मात्र खरे की, जेरल्ड बुलची महत्त्वाकांक्षा धोकादायक होती नि त्याला थोपवण्यासाठी कोणीतरी त्याला खतम केले.

जेरल्ड बुल आणि इराकच्या तोफा ह्यांच्या कहाणीचा प्रारंभ हिचकॉकच्या रहस्याला मागे टाकील एवढा अविश्वसनीय आहे. सरंजामी जर्मनीचा शेवट जेथे झाला ना... पार तेथे ह्या कहाणीचा मुळारंभ मिळतो. सरंजामी जर्मनीची अखेर पहिल्या महायुद्धातील पराभवाने घडली. ही सुरुवात पाहता केवळ नियतीची खेळी पाहून थक्क व्हायला होते. इ. स. १९६५ मध्ये म्हणजे पहिले महायुद्धच काय पण दुसरे महायुद्ध संपूनही वीस वर्षे उलटली होती... तेव्हा एक मध्यमवयीन जर्मन महिला कॅनडामध्ये माँट्रीयाल येथे आली. माँट्रीयालच्या मॅक्‌गिल युनिव्हर्सिटी स्पेस रीसर्च इन्स्टिट्यूट (अंतरिक्ष संशोधन संस्था) मधील एका फारशा प्रसिद्ध नसलेल्या संशोधकाच्या भेटीसाठी ती मुद्दाम जर्मनीहून आली होती. ह्या संशोधकाचे नाव होते जेरल्ड व्हिन्सेंट बुल. त्या वेळी तो ३७ वर्षे वयाचा होता. ह्या जर्मन स्त्रीची व बुलची कधी ओळखही नव्हती. पण ती त्याच्यासाठी थांबली, त्याला भेटलीदेखील! ही महिला कोण? तिचे बुलकडे काय काम होते?

जेरल्ड व्हिन्सेंट बुल ऑटॅरिओ (कॅनडा) येथे १९२८ मध्ये जन्मला. त्याचे वडील ब्रिटिश तर आई फ्रेंच होती. ह्या दांपत्याला झालेल्या १० अपत्यांपैकी जेरल्ड नववा होता. तो तीन वर्षांचा नि धाकटे भावंड तान्हे असतानाच जेरल्डची आई वारली. त्याचे वडील वकील होते नि पत्नीचे निधन झाल्यावर वैतागून त्यांनी मुलांना चक्क टाकूनच दिले. ह्या मुलांना मग एकेकटे काही नातेवाइकांकडे जावे लागले. जेरल्डची भावंडांपासून ताटातूट झाली नि एका मावशीकडे तो कसाबसा वाढला. हे बालपण कठिण होते नि पुढे जेरल्डच्या व्यक्तिमत्त्वावर त्याचा कायमचा ठसा उठला. विक्षिप्त, हट्टी, शीघ्रकोपी जेरल्ड बुल हा असा घडला. मात्र जेरल्डला आश्चर्यकारक बुद्धिमत्ता लाभली होती. विशेषतः 'तोफ' हा त्याचा मनपसंत विषय. वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी टोरंटो विद्यापीठाची डॉक्टरेट त्याने मिळवली. १९५३ मध्ये तर प्रसिद्ध 'मॅक्लीन्स' ह्या मासिकाने 'कॅनडाचा पोरसवदा रॉकेट संशोधक' म्हणून त्याचा गौरवही केला होता. पण म्हणून काही जेरल्ड बुल जगप्रसिद्ध झालेला नव्हता आणि तरीही कॅनडापासून दूर दुसऱ्या खंडातील जर्मनीमधील एका कुटुंबाने ह्या नावाची दखल घेतली होती. हे कुटुंब जगभरच्या लष्करी नियतकालिकांचा चिकाटीने अभ्यास करीत होते. वर्षानुवर्षे जगातल्या नावाजलेल्या शास्त्रज्ञांची जंत्री ठेवीत होते.

विशेषतः 'तोफखाना' ह्या शाखेशी संबंधित असलेल्या, आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव मिळालेल्या शास्त्रज्ञांची एक सूचीच ह्या कुटुंबाने बनवली होती आणि दीर्घ विचाराअंती त्यांनी 'जेरल्ड व्हिन्सेंट बुल' ह्या नावाची निवड केली होती. तशी निवड करूनच ती जर्मन स्त्री कॅनडामध्ये आली होती. कोण होती ती? ते कुटुंब कोठले? त्यांचा मनसुबा काय होता?

२४/९/९०

❋❋❋

२०

※

# रॉझेनबर्गर ते बुल

तरुण जेरल्ड बुलच्या भेटीला जर्मनीहून आलेली ही मध्यमवयीन स्त्री म्हणजे फ्राऊलिन रॉझेनबर्गर. जर्मनीचे ख्यातकीर्त पोलाद कारखानदार आल्फ्रेड क्रप पहिले ह्यांच्या हाताखाली काम करणारा सर्वांत विश्वासू इंजिनियर फ्रित्झ रॉझेनबर्गर ह्याची ती कन्या. पहिल्या महायुद्धातील पॅरीस तोफ ह्याच क्रपने तयार केली होती. ही तोफ जर्मनीच्या दुर्दैवाने फार उशिरा तयार झाली. त्यामुळे युद्धातील पराभव टळू शकला नाही. मात्र २९मार्च१९१८ रोजी प्रथम ही तोफ जर्मनीने डागली तेव्हा थेट पॅरीसमध्ये ह्या तोफेने ९१ बळी घेऊन १०० माणसे घायाळ केली होती. जर्मनी शरण येताच दोस्त राष्ट्रांनी 'पॅरीस तोफा' जप्त करण्याकडे मोर्चा वळवला पण अत्यंत रहस्यमय पद्धतीने या तोफा नाहीशा झाल्या होत्या. आल्फ्रेड क्रपपासून सर्वांनीच कानावर हात ठेवले. ७४ मैलांची झेप आणि तोफगोळ्याला २६ मैलांची उंची देणाऱ्या ह्या तोफा कधीच हाती लागल्या नाहीत... पण... त्यांचा संपूर्ण आराखडा पूर्णतः सुरक्षित होता. कडेकोट बंदोबस्तात तिचे डिझाईन जपले होते. ह्या तोफेचा जनक फ्रित्झ रॉझेनबर्गर ह्याच्या कुटुंबाने सांकेतिक पद्धतीने काही हस्तलिखिते तयार करवून रॉझेनबर्गर परिवाराच्या खासगी खजिन्यात ती बेमालूम ठेवली होती. १९१९ ते १९६५ एवढा प्रदीर्घ काळ रॉझेनबर्गर कुटुंबाने हे रहस्य सांभाळले. त्यांना ते सत्पात्र व्यक्तीला द्यायचे होते. वर्षानुवर्षे जगभरच्या तोफखानाविशारदांची माहिती कष्टाने मिळवून हे कुटुंब 'पात्र' व्यक्ती शोधीत होती. जेरल्ड बुलच्या निवडीवर सर्व कुटुंबाचे

एकमत झाले आणि ज्या अद्‌भुत तोफेचा लहानसा भागही दोस्त राष्ट्रांच्या हाती पडला नव्हता, त्या तोफेचे संपूर्ण डिझाईन फ्राऊलिन रॉझेनबर्गर हिच्या हस्ते ३७ वर्षांच्या जेरल्ड बुलच्या हातात आले! न मागता! ऑस्ट्रिया, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका, स्वीडन (बोफोर्स) ह्या देशातील जगप्रसिद्ध तोफांच्या कारखान्यांनाही रॉझेनबर्गर कुटुंबाने आपल्या अनमोल खजिन्यासाठी पात्र ठरविले नाही. फ्रित्झ रॉझेनबर्गरनंतर फक्त जेरल्ड बुल हाच त्यांना एकमेव अर्हताप्राप्त विशारद वाटला.

जेरल्डला ठेवा गवसला. आता तर संगणकाच्या मदतीने जेरल्ड बुल रॉझेनबर्गरची 'पॅरीस तोफ' अधिक संहारक बनवू शकणार होता. सुरुवातीला बुलने त्याकरिता सरकारलाही विश्वासात घेतले. अमेरिकेचे लष्कर, कॅनडा सरकारचे संरक्षण सामग्री खाते आणि मॅकगिल विद्यापीठ ह्यांच्या संयुक्त सहकार्याने जेरल्ड बुलने बार्बडॉस बेटावर विस्तृत जमीन चाचणीसाठी संपादली आणि हाय अल्टीट्यूड रीसर्च प्रॉजेक्ट (हार्प) ही योजना सुरू केली. अमेरिकेच्या नौदलाने ठेवलेल्या दोन १६ इंची तोफा एकत्र जुळवून त्यातून बुलने ३६ मीटरची भली मोठी तोफ घडवली. तोफगोळ्याची झेप जबर वाढावी म्हणून बुलने आपल्या सहकाऱ्यांसह अनेक प्रयोग सुरू केले. बुलची बुद्धी ह्या शास्त्रात एवढी चालत होती की, ह्या बार्बडॉस तोफेतून रॉकेटच्या मदतीने २०० पौंडाचा गोळा २५०० मैल लांब उडावा अगर हलका गोळा अस्मानात १६० मैल उंच टाकून विमानांचा वेध घेता यावा. रॉझेनबर्गरच्या पायाभूत डिझाईनवर बुलने स्वतःची कुशाग्र बुद्धी वापरून महासंहारक तोफ बनवली होती. पण...

३० जून १९६७ रोजी 'हार्प' योजनेस दिली जाणारी मदत स्थगित करण्यात आली. वास्तविक ह्या टप्प्यावर बुल अशी तोफ तयार करीत होता की, त्यातून रॉकेटच्या सहाय्याने चक्क उपग्रह सोडता यावा. तथापि अमेरिका व कॅनडा ह्या दोन्ही देशांतील संशोधकांचे म्हणणे पडले की, अंतरिक्ष संशोधनासाठी केवळ रॉकेटस्‌चाच विकास व्हावा. त्यासाठी तोफांची गरज नकोच आणि जेरल्ड बुलची उपेक्षा सुरू झाली. रॉझेनबर्गरच्या 'पॅरीस' तोफेच्या नवनिर्माणाचे त्याचे स्वप्न नोकरशाही व विरोधक संशोधकांनी चुरगळून टाकले. बुलने मग सूड घ्यायला कंबर कसली. 'पॅरीस कॅनोनेन' ह्या पुस्तकात त्याने आपल्या स्वप्नातील अगडबंब तोफेचे वर्णन करून ठेवले आहे. ३२ इंची व्यासाच्या प्रक्षेपकावरून १२०० पौंडी वजनाचा गोळा अंतरिक्षात ६०० मैल भिरकावण्याची क्षमता असलेली... आपल्या स्वप्नातल्या तोफेचे जेरल्ड बुलने करून ठेवलेले लेखी वर्णन टीसपोर्ट बंदरात ब्रिटिश कस्टमने पकडलेल्या 'पेट्रोलियम पाईप्स'शी तंतोतंत मिळतेजुळते होते!

सर्वांकडून उपेक्षा झालेल्या जेरल्ड बुलला सहानुभूती द्यायला इराकचा लष्करी उद्योगमंत्री ब्रिगेडियर जनरल हुसेन कमाल पुढे आला. हा केवळ मंत्रीच नव्हे तर सद्दाम हुसेनचा जावईदेखील होता. अर्थात मध्ये खूप वर्षे गेली होती. १९६७ मध्ये 'हार्प' बंद

केल्यापासून वणवण करणाऱ्या जेरल्ड बुलला त्याच्या तोफेसाठी अर्थपुरवठा करण्यास १९८८ च्या जानेवारीत इराक पुढे आले. ह्या वीस वर्षांत ह्या प्रज्ञावंत शास्त्रज्ञाचे रोखठोक व्यवहारी शस्त्रास्त्र विक्रेत्यात रूपांतर झाले होते. 'हार्प' बंद पडल्यावर बुलने आपला सर्व पैसा ओतून स्पेस रीसर्च कॉर्पोरेशन ऑफ क्युबेक ही संस्था स्थापन केली होती आणि 'हार्प'च्या मालकीची सर्व मालमत्ता, बार्बडॉसची जमीन व क्युबेकच्या सीमेवरील २०,००० एकर क्षेत्रही खरीदले होते. आपल्या मनीची तोफ बनवता यावी म्हणून पैसे उभे करण्यासाठी बुल ह्या संस्थेत सरळ शस्त्रे बनवू लागला. २५ मैल पल्ला गाठणारे ५०,००० तोफगोळे जेरल्ड बुलच्या ह्या संस्थेने १९७३ मध्ये इस्रायलला विकले. ९० लक्ष डॉलर्सचे अमेरिकेचे संरक्षणविषयक कंत्राट बुलच्या संस्थेला मिळाले पण तोफेच्या संशोधनासाठी ते पुरेसे नव्हते. १९७६ मध्ये बुलने आपल्या स्पेस रीसर्च कॉर्पोरेशनची एक शाखा युरोपमध्ये बेल्जियममध्ये सुरू केली. स्पेस रीसर्च कॉर्पोरेशन इंटरनॅशनल ह्या प्रस्तुत शाखेची ४५ टक्के मालकी बेल्जियमच्या पॉड्रेरी रुनीज ह्या दारूगोळा उत्पादन कंपनीस देण्यात आली. त्यामुळे पैसा अधिक मिळून बुलने जीसी ४५ ही शक्तिशाली तोफ सहजगत्या बनवली आणि सूड म्हणून सर्वाधिक किंमत देणाऱ्या दक्षिण आफ्रिकेला ती विकलीदेखील! त्या वेळी द. आफ्रिका अँगोला व क्युबाच्या विरोधात लढत होती. संयुक्त राष्ट्रांचा द. आफ्रिकेवर शस्त्रास्त्र निर्बंध होता. त्यामुळे उघडपणे शस्त्र खरेदी शक्य नसल्याने बेकायदा मार्गांनी द. आफ्रिका सरकारने जीसी ४५ चे तंत्र मिळवले. आणि जी-५ ह्या नावाने बेधडक ह्या तोफा वापरू लागले. तथापि हे बिंग फुटून संयुक्त राष्ट्रांचा निर्बंध मोडल्याबद्दल बुलला सहा महिन्यांचा कारावास घडला. उपेक्षेपाठोपाठ ही बेअब्रू वाट्याला आली... क्युबेकची बुलची संस्था दिवाळ्यात निघाली आणि बुलने ब्रुसेल्स (बेल्जियम) ला स्थलांतर केले.

शस्त्रांच्या विक्रेत्याला युद्धखोर राष्ट्रे म्हणजे उत्तम ग्राहक! बेल्जियमला स्थलांतरित झालेल्या बुलला इराक-इराण युद्धाची पर्वणी चालून आली आणि १४ अब्ज डॉलर्सचे संरक्षण अंदाजपत्रक असलेल्या इराकने १९८५ ह्या एका वर्षातच बुलकडून जीसी-४५ ह्या प्रकारच्या २०० तोफा खरीदल्या. हा व्यवहारही सरळ मार्गी नव्हताच! शस्त्रनिर्बंध धुडकावण्यासाठी ऑस्ट्रियाच्या वोस्त-अल्पीन ह्या दारूगोळा उत्पादक कंपनीला आणि इराकचे मित्र राष्ट्र जॉर्डनला मध्ये घालून वळसे घेत ही खरेदी-विक्री झाली. ह्या तोफा जॉर्डनसाठी असल्याचा मस्त बहाणा करण्यात आला नि खरी भानगड माहीत असूनही ऑस्ट्रियन सरकारने आपले डोळे मिटून घेतले. जॉर्डनच्या अकाबा बंदरात ह्या तोफा उतरल्या आणि सरळ इराकमध्ये पोचल्या. अन् ह्या व्यवहारानंतर तीनच वर्षांनी सद्दाम हुसेनचा जावई हुसेन कमाल ह्याने सद्दाम हुसेनकडे प्रस्ताव मांडला- 'जेरल्ड व्हिन्सेंट बुल ह्याला सवाई तोफ निर्माण करण्याकामी इराकने अर्थसहाय्य करावे.' तो मंजूर झाला आणि

१९८८ च्या वसंत ऋतूत कोट्यवधी डॉलर्स खाणारे व सात युरोपियन राष्ट्रांना गुंतवणारे 'प्रॉजेक्ट बॅबीलॉन' हे संहारस्वप्न प्रत्यक्षात उतरू लागले.

सर्व प्रकल्प गुप्त ठेवण्यासाठी फर्मास युक्ती योजली होती. ब्रिटनची ख्यातनाम शेफिल्ड फोर्जमास्टर्स- ही कंपनी तर चांगलीच बकरा बनली. ह्या कंपनीला राजरोसपणे इराकच्या खनिज मंत्रालयासाठी पेट्रोलियम पाईप बनविण्याचे कंत्राट देण्यात आले. आणि आपण खरोखरच पेट्रोलियम पाईप निर्माण करीत आहोत, ह्याच भ्रमात ही बावळट कंपनी राहिली. प्रत्यक्षात इराकमध्ये खनिज मंत्रालय अस्तित्वातच नाही नि कागदपत्रावरील सर्व टेलिफोन नंबर हुसेन कमाल ह्याचेच निघाले आहेत.

इटलीमधील सोसीएटा डेला फ्युसीन, स्वित्झर्लंडमधील व्हॉन रोल स्टील वर्क्स ह्या कंपन्यांनाही शेफिल्ड फोर्जमास्टर्सप्रमाणेच छान 'मामा' बनविण्यात आले. धरणांच्या दारांसाठी, पेट्रोलियमसाठी, उत्खननासाठी अशी वेगवेगळी कारणे वेगवेगळ्या कंपन्यांना दाखवून त्यांच्याकडून हवे ते सुटे भाग बनवून घेण्याचे षड्यंत्र सुरू झाले. फक्त वॉल्टर सॉमर्स (इंग्लंड) ह्या एकाच कंपनीला काही अरिष्टांचा संशय आला. ह्या कंपनीला ३३० मिलिमीटरच्या पोलादी नळ्या बनविण्याचे कंत्राट एका मध्यस्थामार्फत आले. मात्र पेट्रोलियम उद्योगासाठी हव्या असलेल्या ह्या पाईप्सना नेहमीपेक्षा १२ पट अधिक दाब सहन करण्याची क्षमता असावी, ह्या अटीमुळे ही कंपनी बिथरली. ह्या कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरने ब्रिटनची विदेशी गुप्तचर यंत्रणा एम. आय. ६ हिला कळवले. पण ही यंत्रणा निद्रिस्त राहिली. मात्र एक चमत्कारिक योगायोग घडला. बेल्जियममध्ये बुलच्या कंपनीशी ४५ टक्के मालकी बाळगणारी संस्था 'पॉड्रीरी रूनीज' हीच मोडकळीला आल्याने ब्रिटनच्या 'ॲस्ट्रा होल्डिंग्ज' ह्या दारूगोळा उत्पादन कंपनीने ती ताब्यात घेतली आणि... तेथील जॉर्डनचे कंत्राट पाहताच 'ॲस्ट्रा' हबकली. ही खबर मग ब्रिटनच्या संरक्षण खात्याकडे गेली आणि चक्रे फिरू लागली.

–प्रथम बुलचा खून पडला... मग टीसपोर्ट बंदरात आणि युरोपातील विमानतळावर तोफेचे सुटे भाग पकडले गेले. त्याबरोबर जेरल्ड बुलचे दोन पुत्र मायकल व स्टीव्हन ह्यांनी बापाची कंपनी मोडीत काढली व ते नाहीसेच झाले. धरपकड व चौकशी सुरू झाली पण म्हणून जेरल्ड बुलने उभा केलेला धोका संपलेला नाही. त्याच्या सवाई तोफेसाठी एकूण ५२ भाग लागतात. त्यांतील ४४ भाग ह्यापूर्वीच इराकला पोचले आहेत. इराकी तंत्रज्ञांकडे ह्या संकल्पित तोफेचे डिझाईन असण्याची शक्यता आहे. हरवलेले आठ भाग ते बनवू शकतात अगर आडवळणाने मिळवू शकतात. जेरल्ड बुलच्या स्वप्नातील सवाई तोफ प्रत्यक्षात दणदणायला फारसे प्रयास घ्यायला नकोत. आण्विक तसेच रासायनिक गोळेही उडविण्याची ह्या तोफेची क्षमता आहे. ही तोफ तयार झाली तर उपेक्षा आणि अपमान ह्यांचा जेरल्ड बुलने मरणोत्तर घेतलेला तो सूड ठरेल. रॉझेनबर्गरचे दान मात्र अपात्री ठरले!

१/१०/९०

❋❋❋

# २१

※

# लंडनियम आणि रोझ

इंग्लंडमध्ये सध्या पुरातत्त्वखात्याला जेवढे फोन येत असतील, तेवढे स्कॉटलंड यार्डलाही येत नसतील. थट्टेत अलीकडे तेथे असे म्हटले जाते की, एखाद्याने साध्या बागकामासाठी अंगणात कुदळ मारली तरीही काहीना काही भग्नावशेष लागतात नि मग पुरातत्त्वखात्याला फोन जातो नि मग बागेतला तेवढा तो कोपरा घरमालकाचा न राहता इंग्लंडचा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी धडपडणाऱ्या मंडळींच्या हाती जातो. ह्या धडपडणाऱ्या मंडळीत इंग्लंडचा भावी राजा प्रिन्स ऑफ वेल्स चार्ल्सही आहे. इंग्लंडमध्ये इतिहास-संशोधकांची उत्खनने कायम चालू असतातच. प्रत्येक शतकात कोठल्या ना कोठल्या प्राचीन वास्तूंचा, नाण्यांचा, साहित्याचा शोध तेथे नव्याने लागत आला आहे. १९ व्या शतकातील बकलर्सबरी येथील उत्खननाचे प्रकरण तर जगभर प्रसिद्धी पावले होते. ह्या उत्खननात रोमनांच्या अंमलात केलेले एका सभागृहाचे आणि त्यातील नयनरम्य नक्षीकाम केलेल्या फरश्यांचे जवळजवळ २००० वर्षांपूर्वीचे अस्तित्व उघडकीस आले. १९ व्या शतकातील इंग्रज समाज मग वाट वाकडी करून बकलर्सबरीला येत असे आणि आपापल्या कुवतीनुसार त्याबाबत आडाखे बांधीत असे. हा दिवाणखाना की हमामखाना अगर हे सभागृह की अंतःपुर असा वादही घालीत असे. १८६९ मध्ये हे उत्खनन झाल्यावर लोक बाजूला निर्माण झालेल्या मातीच्या ढिगाऱ्यांवर चढून ते बघायला लागले. तेव्हा माणसं घसरून खाली खोदकामात पडू नयेत म्हणून अखेर तेथे पोलिस ठेवावे लागले होते. आजही

अशा उत्खननाच्या ठिकाणी पोलिस लागत आहेत. पण ते लोकांच्या सुरक्षिततेसाठी नव्हेत तर ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी चळवळ करणारी मंडळी मोर्चे काढतात म्हणून!

गेल्या चार वर्षांपासून हा प्रकार सुरू झाला आहे. आजच्या आधुनिक लंडनच्या मुळाशी प्राचीन 'रोम' दडले आहे नि ब्रिटिश पुरातत्त्व विशेषज्ञ ह्या अतिप्राचीन 'रोम'चा शोध घेत आहेत. लंडनमधील काही इमारती फार जुन्या झाल्याने आणि त्यांच्या मालकांना त्यांची देखभाल, दुरुस्ती करणे जिकिरीचे झाल्याने बिल्डर मंडळींना ह्या इमारती विकण्याची साथ मुंबई, दिल्ली, बंगलोरप्रमाणेच लंडनलाही बोकाळली आहे. व्हिक्टोरिया, एडवर्ड, जॉर्ज ह्यांच्या काळांतील ऐतिहासिक दृष्टी खिळवून टाकणारी सुंदर मॅन्शन्स, मॅनॉर्स आणि हॉल्स बिल्डर मंडळी दणादण जमीनदोस्त करून तेथे गगनचुंबी टॉवर्स आणि सेंटर्स उभारीत आहेत. पण ब्रिटिश बिल्डरांपेक्षा भारतातले बिल्डर भाग्यवान खरे! मूळ वास्तू पाडल्यावर, पुढे काहीच कटकटी न उद्‌भवता निर्विघ्नपणे भारतीय बिल्डर्स नवे इमले उभारतात, प्रसंगी 'एफएसआय' चोरतात, पचवतात नि नव्या सोसायटीच्या हवाली हे इमले देऊन टाकले की मोकळे होतात. डोकेदुखी झालीच तर जास्तीत जास्त 'प्रतिभा' सारखी! ब्रिटिश बिल्डर्सच्या वाट्याला असे सुरळीत कामकाज येत नाही. मूळ वास्तू पाडून पायाखोदाई सुरू करावी तर नसतीच आफत समोर येते. जमिनीच्या पोटातून कोठलीतरी प्राचीन वास्तू प्रकट होते नि तत्क्षणी पुढचे काम ठप्प झालेच समजायचे. हा हा म्हणता असे अवशेष सापडल्याची वार्ता चहूकडे पोचते नि लागलीच ऐतिहासिक वारशाचे रखवालदार, पुरातत्त्ववेत्ते तेथे हजर झालेच पाहिजेत.

१९८८ मध्ये असे शोध लागणं हा नित्याचाच प्रकार होऊन बसला होता. १९८८ च्या एकट्या जानेवारी महिन्यात एक चौरस मैलाच्या परिसरात तब्बल १६ ठिकाणी असे प्राचीन अवशेष प्रकट झाले. हा विभाग म्हणजे लंडन शहर. आज हा विभाग म्हणजे लंडनची आर्थिक पेठ म्हणून ओळखला जातो. तर लंडन शहराच्या बाहेर ग्रेटर लंडन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ५९९ चौरस मैलांच्या परिघात पुरातत्त्वखात्याकडे १५ उत्खनने आली. (एकट्या जानेवारीतच) ही आकडेवारी वसंत ऋतूत अधिकच फुगली. हे प्रकार घडताच इतिहासाला उजाळा मिळणे साहजिकच होते. त्यातही ग्रेटर लंडनपेक्षा लंडन शहराबाबत अधिक औत्सुक्य निर्माण झाले. अवशेष सापडल्याचे कळताच जर्मन, रशियन, आणि अमेरिकन पुरातत्त्वज्ञ पदराला खार लावून तेथे येऊन ठेपले. उत्कंठा केवळ ब्रिटनपुरती न राहता इतर राष्ट्रांमध्ये पोहोचली. ख्रिस्तपूर्व ५५ मध्ये रोमन सम्राट ज्युलियस सीझरने इंग्लंडवर आक्रमण केले होते. तेव्हापासून रोमन संस्कृतीची निशाणी येथे रोवली गेली. सीझरच्याबरोबर गेलेल्या रोमनांनी 'लंडन शहर' ह्याच भागात वास्तव्य केले होते. त्यानंतर बरोबर एक शतकाने सम्राट क्लॉडीयसने इंग्लंडवरची पकड घट्ट केली. 'लंडन शहर' भागातील अवशेष साधारण ४ ते ८ मीटर खोदाई केल्यावर लागतात तर ग्रेटर लंडन मधील

अवशेषांसाठी एवढे खणावे लागत नाही. काही अवशेष अगदी भग्न झालेत तर कित्येक रचना अगदी शाबूत आहेत. फक्त त्यावरील इमारतीच्या डोलाऱ्याखाली गाडल्या गेल्या आहेत. काही रचनांमध्ये गुप्त भुयारे नि तळघरेही सापडली आहेत. एका रचनेत तर कोनाड्यात जीवाश्म होण्याच्या मार्गाला लागलेले एक गुलाबाचे फूलही मिळाले. डेम ॲगाथा ख्रिस्टी जिवंत असती तर ह्या प्राचीन खजिन्यावर एखादी रहस्य कादंबरी निश्चित निघाली असती. लंडनच्या डिपार्टमेंट ऑफ अर्बन लंडन आर्किऑलॉजी आणि डिपार्टमेंट ऑफ ग्रेटर लंडन आर्किऑलॉजी ह्या दोन संस्थांच्या बरोबरीने 'इंग्लिश हेरिटेज' ही संस्था ह्या लाखमोलांच्या ठेव्याचे अधिक संशोधन व संरक्षण करण्यास पुढे सरसावली आहे. ही संस्था वर्षाकाठी सुमारे ३०० संशोधन प्रकल्पांवर ७ मिलियन पौंड एवढी रक्कम खर्च करीत असते.

ज्युलियस सीझरनं ह्या शहराचा उल्लेख 'लंडनियम' असा केला. 'लंडनियम' ह्या नावाला २००० वर्षांचा इतिहास आहे, आणि सतत २००० वर्षे 'लंडनियम'मधील मनुष्यवस्ती कायम राहिली आहे. लंडनियमचे लंडन बनले. जर्मन-सॅक्सन तेथे आले. विल्यम, रिचर्ड, चार्ल्स, हेन्री, ट्युडर, स्टुअर्ट अशा वंशावळी सुरू झाल्या नि लंडन वाढतच गेले. पोर्तुगीजांप्रमाणे जुना गोवा ओसाड करून नवा गोवा वसविण्यासारखा उद्योग तेथे कधी झाला नाही. त्यामुळेच लंडनचा ऐतिहासिक अभ्यास हे एक जबरदस्त आव्हान बनले आहे. रोमन अमलातील वास्तुखुणा तर जवळ जवळ सर्वच ब्रिटिश भूमीत आहेत. पण तरीही पुरातत्त्वज्ञांनी सध्या फक्त शहरी भागांकडे लक्ष द्यायचे ठरविले आहे. ह्यात क्लॉडियस, टायबेरियस, ऑक्टेव्हियन अशा विविध सम्राटांच्या सुवर्ण मोहरांपासून अलिशान स्नानगृहांपर्यंत काहीही मिळते. एका ठिकाणी रोमन साम्राज्यातील राजस्त्रियांची अलंकारमंजुषा आणि वस्त्रे मिळाली नि वैशिष्ट्य म्हणजे आजही ही वस्त्रे उत्तम स्थितीत आहेत. एका ठिकाणी शस्त्रागार सापडले. आता त्या शस्त्रांचा काळ निश्चित करण्याची परीक्षा चालू आहे. २००० वर्षांच्या रोमन लंडनियमचे शोध जणू पुरेसे नसावेत. म्हणूनच दुसऱ्या महायुद्धात छिन्नभिन्न झालेले अवशेषही सापडत आहेत नि व्हिक्टोरियाच्या काळातील पडझड झालेल्या वास्तूही मिळत आहेत. १६६६ मध्ये लंडनमधील ऐतिहासिक अग्निप्रलयात भस्म झालेल्या घरांच्या काळ्या ठिक्कर पडलेल्या विटाही हाती लागत आहेत आणि १३ व्या शतकातील दगडी भिंतींचा भागही मिळत आहे. अमुक एका ठिकाणी अर्धवट जळालेल्या वास्तूचा भाग मिळाल्यावर ती रचना इ.स. ६१ मधील असावी आणि त्याच काळात इंग्लंडवर सत्ता गाजविणाऱ्या राणी बोदिसी हिने शहर पेटविण्याचा जो आततायीपणा केला होता, त्यातच ही वास्तू जळली असावी, असा संशोधकांचा निष्कर्ष येतो काय नि चारच आठवड्यांनी त्याच वास्तूच्या पायाखाली आणखी एक रचना सापडते काय व ती इसवी सनाच्या दुसऱ्या शतकातील धान्यकोठार निघते काय!

एवढी भानगड पुरेशी नाही म्हणून की काय 'बार्ड' विल्यम शेक्सपीयरच्या काळातील 'रोझ' ह्या नाट्यगृहाचे भूगर्भात गेलेले अवशेष टेम्सच्या दक्षिण तीरावर आता त्यातील रंगमंचासह अवतीर्ण झाले आहेत. पहिल्या एलीझबेथ राणीच्या अंमलातील हे नाट्यगृह १५८७ मध्ये बांधले होते. म्हणजे रोमन लंडनियमच्या तुलनेत कितीतरी नवे म्हणायचे! पण 'बार्ड' ह्या थिएटरमध्ये वावरला. ह्या कल्पनेनेच इंग्रज माणूस शहारला. जे जे 'बार्ड'चे आहे ते ते इंग्रजास प्राणाहून प्रिय. ते ते सर्व कायम जपायचेच! 'रोझ' जतन केलेच पाहिजे. बिल्डरला 'रोझ'चा नाश करून त्यावर बांधकाम करण्यापासून परावृत्त केलेच पाहिजे. अशा भूमिकेत ब्रिटिश नागरिक गेले नि त्यांनी 'रोझ'च्या जतनासाठी चळवळ उभारली. चळवळीत कोणी यावे? शेक्स्पीयरच्या नाटकांतून ज्यांनी ज्यांनी कामे केली आहेत ते सर्व बुजुर्ग-तरुण तसेच बार्डप्रेमी जातीने हजर! सर लॉरेन्स ऑलीव्हिए, डेम पेगी अॅशक्रॉफ्ट, युवराज चार्ल्स, प्रिन्स एडवर्ड, बार्डचा मर्चंट ऑफ व्हेनिसमधील शायलॉक रंगविणारा डस्टीन हॉफमन सारी मंडळी फलक घेऊन बार्डची एक प्रतिमा अग्रभागी ठेवून रस्त्यावर उतरली. 'रोझ वाचवा'च्या घोषणा देऊ लागली. 'रोझ' वाचवायचे तर बिल्डरला १.६५ मिलियन डॉलर्स केवळ विलंबापोटी व त्यानंतर ४० मिलियन डॉलर्स कंत्राट रद्द करण्यासाठी द्यावे लागतील. योगायोगाने मिळालेले 'रोझ' कर्मदरिद्रीपणामुळे जर परत 'नाहीसे' झाले तर-? तर शेक्स्पीअरच्या शोकांतिकेला साजेशी आणखी एक शोकांतिकाच होईल!

५/६/८९

***

# २२

※

# शंभरी ‘कोडॅक’ची

**इ**.स. १९८८ हे जसं भारताच्या राष्ट्रीय पातळीवरील अनेक श्रेष्ठींचे शताब्दी संवत्सर होते, तसेच भारतीय चित्रपटसृष्टीचे ७५ वे वर्षही होते आणि योगायोग असा की, संपूर्ण जगाच्या चित्रपटसृष्टीसाठी ज्या व्यक्तीचे नकळत योगदान लाभले, त्या व्यक्तीचा १३५वा वर्धापन-दिन (जयंती म्हणा हवं असल्यास) यंदाच सुरू झाला आहे. पण परदेशातून व्यक्तीपेक्षा त्याच्या कार्याला अधिक महत्त्व दिले जात असल्याने ही शतकोत्तर पस्तिशी करण्याऐवजी अमेरिका, युरोप आणि जपानने काय करावे?... चक्क त्याने लावलेल्या अपूर्व शोधाची शताब्दी सुरू केली आहे... अर्थातच ही शताब्दी जशी त्याच्या शोधाची.. कर्तृत्वाची तशीच त्याच्या परिश्रमातून उभ्या राहिलेल्या एका उद्योगाची देखील आहे! हा उद्योग जगप्रसिद्ध कोडॅक कॅमेरा कंपनी आणि १३५ वर्षांचा तिचा जनक म्हणजे ख्रिस्तवासी डॉक्टर जॉर्ज ईस्टमन! (ईस्टमन कलर, ईस्टमन फोटोग्राफी हे झिजलेले शब्द आठवावेत. त्यांचे उगमस्थान म्हणजे हाच ईस्टमन.)

आज कॅमेरा घ्यायला निघाल्यास हा घेऊ की तो घेऊ असा संभ्रम पडतो. फोकस करताना घामटं काढणाऱ्या कॅमेरापासून थेट काहीच डोकं चालवायला वाव नसलेल्या ऑटोफोकस कॅमेरापर्यंत हारीनं सर्व जादू-ई-खोकी आज उपलब्ध आहेत. तसा कॅमेऱ्याचा शोध शंभर वर्षांच्याही आधी लागला. प्रकाश... प्रकाशकिरण... प्रकाशकिरणाचे घटक, सर ऐझॅक न्यूटनचा प्रसिद्ध लोलक. आरशातील भ्रामक प्रतिमा आणि बहिर्गोल भिंग आणि

अंतर्गोल भिंगातील खरी प्रतिमा, फिल्म आणि तिचे रसायन, तिच्यावर मिट्ट काळोखात केलेले रासायनिक संस्कार इत्यादी भौतिकी विज्ञानातले धडे आज अगदीच प्राथमिक वाटतात... हीच कॅमेऱ्याची प्रथमावस्था होती. हे धडे जरी कंटाळवाणे वाटले तरी कधीकाळी आईकडे वारसा हक्कानं आलेली आजी-आजोबा-पणजीची जुनी ट्रंक उघडल्यावर ह्याच 'डबडा' कॅमेऱ्यानं करून ठेवलेली करामत आपल्याला तासन् तास आजही गुंगवते. त्यात धारवाडी परकर-पोलक्यातली, भोकरं कानात मिरवणारी, तोरण्या घातलेली आई दिसते तशीच इरकली-टोपपदरी लुगडं अंगभर नेसलेल्या, मूद, अग्रफूल, ठुशी, चंद्रहारांनी सजलेल्या बाळी-बुगडी (ह्या फॅशनचे आता पुनरुज्जीवन झालेय) सहजपणे पेलवणाऱ्या आणि ह्या साजाला शोभणारा खानदानी शेला पांघरलेल्या आजी-पणजीही दिसतात. आजोबा-पणजोबांच्या चकलीसारख्या पगड्या, भिकबाळी पाहून गंमत वाटते. ही करामत असते तेव्हाच्या काळी छायाचित्रणाची कला त्या प्राथमिक अवस्थेच्या कॅमेरावर हुकमत चालविणाऱ्या कोणा अज्ञात छायाचित्रकाराची, भारताचे प्रसिद्ध छायाचित्रकार लाला दीनदयाळ ह्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन काही वर्षांपूर्वी भरले होते... असेच खिळवून ठेवणारे... सगळी छायाचित्रे सेपिया रंगाची बनून गेली होती, फिकुटली होती. पण त्यांचे मोल मोजता येणार नाही, एवढे होते. चार पिढ्यांचा वारसा चालविणाऱ्या पैठणीची जशी किंमत करायची नसते तशीच ह्या पिंगट सेपिया फोटोंचीही सौदेबाजी करायची नसते.

तेव्हाच्या काळी म्हणजे १८६० ते ७० या कालावधीत नुकत्याच सुरू झालेल्या छायाचित्रणकलेचं माहेरघर इंग्लंड होतं. कॅमेरा हाताळताना मी मी म्हणणारे मेटाकुटीला येत. ओल्या प्लेटस् काय नि चिनी आकाशकंदिलासारखा मागेपुढे ओढून लहान-मोठा होणारा कॅमेरा काय आणि नंतरच्या प्रक्रियेसाठी काळोख केलेला तंबू उभारणे काय... सर्वच प्रकार आजच्या संदर्भात पाहिल्यास तीन पैशाचा तमाशा ठरावा. पण ह्या बोजड यंत्रणेत बरोबर १०० वर्षांपूर्वी जॉर्ज ईस्टमननं क्रांती घडवली. आधुनिक बॉक्स कॅमेऱ्याचा प्राथमिक अवतार डॉ. ईस्टमननं बनविला. ही 'डॉ'पदवी त्याला सन्मानार्थ दिलेली, कारण जॉर्ज ईस्टमन बिचारा जुजबी शिक्षण घेऊन नोकरीच्या मागे धावला होता.

इ. स. १८५४ मध्ये अमेरिकेत न्यूयॉर्क राज्यात वॉटरव्हिले ह्या खेड्यात जॉर्ज ईस्टमन एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मला. वयाच्या सहाव्या वर्षी कुटुंबाबरोबर जॉर्ज ईस्टमन रॉचेस्टरला स्थलांतरित झाला. घरच्या गरिबीमुळे वयाच्या केवळ १४ व्या वर्षी जॉर्ज एका विमा कंपनीत हरकाम्या म्हणून नोकरी करू लागला. पुढे त्याच कंपनीत कारकून बनला. नोकरी... कुटुंब... घर ही चाकोरी अशीच चालली असती. पण मध्येच एक विपरीत घटना घडली. विपरीत अशासाठी की, जॉर्ज ईस्टमननं सुट्टी घेऊन प्रवासाला निघायचं ठरवलं. एरवी त्याला पर्यटन परवडण्यासारखं नव्हतंच. पण बरीच वर्षे त्यानं बचत करून हा पर्यटनाचा बेत आखला होता. त्याला नुसता प्रवास करायचा नव्हता, तर मुलाबाळांसह

कधीकाळी उपभोगलेला पर्यटनाचा आनंद चिरंजीव करायचा होता.

सान्त दोमिंगो हे पर्यटनाचं स्थळ म्हणून मुक्रर झालं आणि त्या स्मृती जपण्यासाठी बचत करूनच ओल्या प्लेटवाल्या कॅमेऱ्याचं सर्व सामान जॉर्जनं खरीदलं, छायाचित्रणावर तेव्हा काही पुस्तकं नव्हती, की कोठे प्रशिक्षण वर्ग नव्हते. जुजबी मार्गदर्शनावर जॉर्ज ती यंत्रणा हाताळू लागला. सान्त दोमिंगला जाईस्तो हे तंत्र शिकून घ्यायचं म्हणून तो खटपटीला लागला खरा पण तो त्यात पाहता पाहता गुरफटला. छायाचित्रणाचा पद्धतशीर अभ्यास, मार्गदर्शन कोठे उपलब्ध नसलं म्हणून काय झालं? जॉर्ज ईस्टमननं स्वतः चुकतमाकत, प्रयोग करीत ही साधना पूर्ण केलीच, शिवाय छायाचित्रणशास्त्र म्हणून छोट्या पुस्तिका बनविण्यासाठी खर्डा बनविला. परिणाम असा झाला की, सान्त दोमिंगोच्या पर्यटनाचा बेत रद्दबातल झाला... जॉर्जच्या कुटुंबात त्यामुळे उठता बसता वादंग झडू लागले. सर्व बचत आणि सुट्टी फोटोग्राफीच्या अध्ययनात कामी आली आणि... सुट्टी संपूनही नोकरीवर रुजू न झाल्याने जॉर्जची विमा कंपनीतली नोकरी सुटली. तसा तो बेकार राहिला नाही. एका बँकेत कसलीशी नोकरी मिळाली पण आता त्याचे कोठेच मन रमेना. उत्कृष्ट छायाचित्रण कसे साध्य होईल, ह्या ध्यासापायी नोकरीव्यतिरिक्तचा सगळा वेळ व्यतीत होऊ लागला.

इ. स. १८८० मध्ये रॉचेस्टरलाच त्यानं स्वतःचे छोटेखानी छायाचित्रण कार्यालय काढले. त्यात तो फोटोग्राफीच्या कोरड्या प्लेटस् बनवू लागला. छायाचित्रण सुलभ कसे होईल, जनतेत कॅमेऱ्याचा प्रसार करायचा तर आधी हे तंत्र सुलभ केले पाहिजे, काही छापील मार्गदर्शन मिळाले पाहिजे, हे त्याने जाणलं. इथं फोटो काढायचा म्हणताच उपलब्ध कॅमेऱ्याचं अवजड लटांबर पाहून लोकांचा उत्साह मावळे. उरलासुरला उत्साह त्यानंतरच्या प्रक्रियेच्या तंत्रात साफच निघून जाई. जॉर्ज रात्रंदिवस ह्या अभ्यासात, प्रयोगात हरवून गेला आणि १८८३ मध्ये एक विजयी क्षण आला. काचेच्या कोरड्या प्लेटस्ऐवजी जॉर्ज ईस्टमननं कॅमेऱ्यामध्ये रोल फिल्म चढवली. जगातला हा पहिला रोल! १८८४ मध्ये मग आपला जिवाभावाचा मित्र हेन्री स्ट्रॉंग ह्याच्या भागीदारीत रॉचेस्टरला 'ईस्टमन ड्राय प्लेट अँड फिल्म कंपनी' ची स्थापना झाली. स्ट्रॉंग त्याचा अध्यक्ष तर जॉर्ज त्याचा खजिनदार बनला. १८८६ मध्ये त्यांनी त्यांच्यासारखाच झपाटलेला एक संशोधक तेथे नेमला, तो फिल्मवरील प्रक्रिया करू लागला.

आता हे शास्त्र जनतेत प्रिय करण्यासाठी जाहिरातीची गरज तर होतीच पण त्याशिवाय वाजवी किंमतीत व सहजगत्या हाताळता येईल असा कॅमेरा बनवण्याची आवश्यकताही होती. आपल्या कंपनीला काहीतरी बरे नाव द्यावे, असेही ईस्टमनला वाटू लागले. जॉर्ज ईस्टमनला बालपणापासून 'के' हे इंग्रजी अक्षर आवडत असे. इंग्रजी 'आठ' सारखे 'के' देखील उलटे केले तरी तसेच राहते. म्हणजे परिस्थिती अनुकूल येवो वा प्रतिकूल... ईस्टमनचा 'के' ठिय्या मारून राहणारच, असा एक त्याचा विचित्र युक्तिवाद

होता. पुनः नावात 'के' किमान दोन वेळा आलेच पाहिजे असाही चमत्कारिक आग्रह! मग शब्दांच्या उलटसुलट कसरती होऊन 'कोडॅक'हे नाव पक्के झाले आणि इ. स. १८८८ च्या उत्तरार्धात 'कोडॅक बॉक्स कॅमेरा' अवघ्या २५ डॉलर्सना अमेरिकेत सामान्य जनतेसाठी उपलब्ध झाला. कॅमेऱ्यासाठी अस्सल चामड्याचे आवरण वापरण्याची जॉर्ज ईस्टमनची पद्धत आजतागायत चालू आहे. त्याचप्रमाणे कॅमेऱ्याबरोबरच मार्गदर्शक पुस्तिका देण्याची सक्तीही ईस्टमनचीच! प्रथमावस्थेत भानगड अशी झाली की, अमेरिकेतल्या कोठल्या कोपऱ्यातल्या बुद्रुक-खुर्द गावात कोणी ह्या 'कोडॅक' नं फोटो काढले तरीही पोस्टात फिल्मसह तो कॅमेरा रॉचेस्टरला पाठवावा लागे... तेथे प्रक्रिया होई व मग तयार छायाचित्रे, मूळ कॅमेरा व त्यात नवी फिल्म असे हे चंबूगबाळे पुनश्च पोस्टाने मूळ गावी रवाना होई. हळूहळू सर्वत्र 'कोडॅक' कार्यालये निघून हा उपद्व्याप बंद झाला. अमेरिकेबाहेर पहिली 'कोडॅक' कंपनी लंडनमध्ये १८९१ मध्ये निघाली.

जॉर्ज ईस्टमन १९३२ मध्ये मरण पावला. 'कोडॅक'ने त्याला धनवंत केले आणि जॉर्जने ही सर्व संपत्ती कला, शिक्षण, विज्ञान व वैद्यकशास्त्र ह्या चार क्षेत्रांसाठी दान केली. आज 'कॅमेरा' म्हटले म्हणजे चित्रपटासाठी स्वीडनचे 'हॅसेल ब्लाद', जर्मनीचे 'रोलीकार्ड' व 'रोलीफ्लेक्स' आणि जपानचे 'असाही पेंटॅक्स' व 'कॅनन'ही मंडळी उपस्थित आहेत पण 'कोडॅक' त्यातही स्थान टिकवून आहे. 'तुम्ही फक्त कळ दाबा – आम्ही पुढची जबाबदारी घेऊ,' हे आश्वासन शंभर वर्षांपूर्वी 'कोडॅक'ने दिले नि ते आजही पाळले जात आहे.

२१/११/८८

❋❋❋

# २३

※

# जगावेगळा चित्रपट

**ती**नशे वर्षांच्या 'तिलोत्तमा' कलकत्ता नगरीत भरलेल्या फिल्मोत्सवाद्वारे कलकत्तावासियांना जगातल्या उत्तमोत्तम चित्रपटांचा आस्वाद घेण्याची पर्वणी चालून आली. ह्या फिल्मोत्सवाने भारतातील महिला चित्रनिर्माति - दिग्दर्शकांची उत्कृष्ट कामगिरी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकट केली आणि भारतीय महिलांच्या ह्या गुणाचे इतर राष्ट्रांनी मनापासून कौतुक केले. पहिली दाद ह्या कलावतींना मिळाली अमेरिकेकडून! अपर्णा सेन, कल्पना लाजमी, विजया मेहता आणि सई परांजपे ह्या चौघींना अमेरिकेने आमंत्रित केले असून चित्रपटासाठी कथा निवडण्यापासून प्रत्येक टप्याबाबत उभय देशांच्या महिला कलावंतांमध्ये महत्त्वाची देवघेव होणार आहे. फिल्मोत्सवात सहभागी झालेल्या जोन सिल्व्हर, टेरी मॅक्लुहान आणि जोन टक्सबरी ह्या तीन अमेरिकन दिग्दर्शिका ह्या देवघेवीत सक्रिय भाग घेतीलच.. आणि अर्थातच देशोदेशी कीर्ती मिळविणारी अमेरिकन दिग्दर्शिका जेनीफर फॉक्सदेखील त्यात असेलच. जेनीफर फॉक्सचा गतवर्षीचा विक्रम अद्याप कोणी मोडू शकलेले नाही. तिशीतल्या ह्या तरुणीने तयार केलेली अपूर्व डॉक्युमेंटरी प्रत्येक देशात आजही लोकप्रियता गाठत आहे.

जेनीफर फॉक्सच्या चित्रपटाचे नाव आहे – 'बेरुट : द लास्ट होम मूव्ही' त्याचा विक्रम असा की, अमेरिकन फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट आणि सर्वोत्कृष्ट छायालेखनाची दोन पारितोषिके, पॅरीसच्या फिल्मोत्सवात ग्रां प्री अशी अनेक बक्षिसे त्याने

जिंकली.

आपला इतिहास, आपल्या घराण्याचा मूलस्रोत, आपल्या परंपरा आणि वास्तू ह्यांच्याबाबत प्रत्येक माणसाला प्रेम असते. तो स्वभावधर्मच आहे, पण ते प्रेम कितपत असावे, इतिहासाची ओढ किती अनावर असावी, हे निश्चित करायला हवे. इतिहास, परंपरा, संस्कृती, वास्तू म्हणजे वटवृक्षाची मुळंच जणू! ह्या मुळांना, पारंब्यांना घट्ट धरताना माणसानं हेही भान ठेवलं पाहिजे की, मुळापाशी कोठे कीड तर लागत नाही? पारंब्यांच्या निबरपणामुळे कोठे हात तर जखमी होत नाही? बदलत्या काळाचे भान न ठेवता अशा मूलाधाराला धरून राहिल्यास एकच वाट शिल्लक राहते - शोकांतिकेची! अशा वास्तूंतली माणसं स्वत:ला उर्वरित जगापासून तोडून घेतात - त्यांचं स्वतंत्र विश्व बनते आणि नंतर...! एकाच वास्तूत राहणारी ती सर्व कुटुंबीय मंडळी नंतर एकमेकांपासून तुटत जातात - तुटक वागतात... मग प्रत्येकजण आपापल्या कोशात बंदिस्त राहती अन् तरीही तो कोश फाडून बाहेर पडण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नसते; कारण वटवृक्षाच्या आधाराशिवाय ते सर्व निराधार असतात. दूरस्थ, परक्या माणसाला ह्या मंडळींबाबत कोडे पडते. आधी ते सर्व वागणे विचित्र वाटते - हळूहळू कुतूहलाची जागा कीव घेते व मग तिऱ्हाइताला ह्या कुटुंबाची कीव येता येताच त्यांची जीवनपद्धती एकाच वेळी विनोदीही नि करुणही वाटत राहते. जेनीफरच्या चित्रपटाचा विषय हाच आहे. तसा नवा नाही, आपण भारतीयही वडिलोपार्जित वास्तु-परंपरा ह्यांच्यात नको एवढे गुंतत असतो. वास्तवाचे भान सोडून वागणाऱ्यांच्या वाट्याला आलेली दु:खे आपणही पाहिली आहेत. उल्हासनगरसारख्या निर्वासित छावण्यांमधील खोपटात तात्पुरत्या चुलीवर जेमतेम मिळालेला डाळभात शिजवताना फाळणीमुळे अनिकेत झालेल्या लाहोरी-पेशावरी हिंदूंना आपल्या मूळ गावाची, हवेल्यांची याद काढताना आपल्यापैकी अनेकांनी पाहिले असेल. फाळणीमुळे घरादारांना मुकण्याचा प्रसंग ह्या लक्षावधी नागरिकांवर आला पण त्यांनी वास्तवाचे भान सोडले नाही. भूतकाळाची आठवण काढीत का होईना, त्यांनी नव्या आयुष्याची सुरुवात केली. पण समजा ह्यातील कोणी तशा प्रतिकूल परिस्थितीतही, बदलत्या काळाशी जमवून न घेता तेथेच राहण्याचा हट धरला असता तर... ? मग मृत्यूशीच गाठ पडली असती हे उघड होते. पुन्हा ते स्थलांतर करीत नाहीत, म्हणून त्यांच्यावर टीकाही झाली असती. जेनीफरच्या 'बेरुट' मध्ये माणसातील ह्या हट्टी वृत्तीचे प्रत्ययकारी चित्रण आहे.

'बेरुट' ही सत्यकथा आहे. ह्या चित्रपटात अभिनेते कोणीही नाहीत. ज्या कुटुंबावर ही कथा साकारली आहे, त्याच कुटुंबाला, ह्या चित्रपटात अभिनेते व अभिनेत्री म्हणून पेश केले आहे. ज्यानं त्यानं आपापली भूमिका करायची म्हणजे आपलंच जीवन जगायचं! फक्त समोर कॅमेरा नि त्या कॅमेऱ्यामागे जेनीफर फॉक्स ही दिग्दर्शिका उभी. असा हा अभिनव प्रयोग होता. नट मिळत नव्हते, पैसे उपलब्ध नव्हते, अशातला भाग नव्हे. फक्त

जेनीफरला हे चमत्कारिक कुटुंब जसेच्या तसे सहजपणे पडद्यावर चितारायचे होते, त्यामुळे जेनीफर सतत सहा वर्षे हा एकच चित्रपट बनवीत होती. 'बेरुट' ह्या नावावरून कोणाला वाटेल की, हा युद्धपट किंवा राजकीय चित्रपट असेल, कारण बेरुट (लेबनन) हे यादवी युद्धाच्या वणव्यात कसे जळत आहे, हे सर्वांनाच ठाऊक आहे. दोन तपे लेबननमध्ये खणाखणीमुळे जनजीवन, नित्याचे व्यवहार साफ विस्कळीत झाले आहेत. तेव्हा 'बेरुट'बद्दल युद्धपटाची अपेक्षा करणे स्वाभाविक आहे; मात्र प्रत्यक्षात हा चित्रपट म्हणजे एका कुटुंबाची सामाजिक आणि वैचारिक ससेहोलपट आहे. लेबननची यादवी ही त्याची फक्त पार्श्वभूमी आहे.

हे कुटुंब म्हणजे बेरुटचा बस्ट्रॉस परिवार. हा परिवार राजेरजवाड्यांपैकी आहे... म्हणजे होता म्हणायचे. मध्ययुगीन लेबननमध्ये बस्ट्रॉस हे कुटुंब स्वकर्तृत्वावर गाजले... पुढे आले. मूळ बस्ट्रॉसला सरदारकी मिळाली... लेबननच्या राजकारणात बस्ट्रॉस हे नाव स्थिरावले. वैशिष्ट्य असे की, ग्रीक ऑर्थडॉक्स खिश्चन असूनही हे कुटुंब लेबननच्या खिश्चन व मुस्लिम जगतात आदरणीय झाले. अधिकार, सन्मान ह्यांच्याबरोबर समृद्धीही आली. फ्रान्समध्ये राज्यक्रांती झालेली नव्हती अगर हिंदुस्थानात इंग्रजांचे साम्राज्य बनले नव्हते अशा काळात सरदार बस्ट्रॉसने बेरुटमध्ये एक अत्यंत सुंदर राजवाडा बांधला. आजही २०० वर्षांहूनही अधिक वय असलेला हा प्रासाद अस्तित्वात आहे आणि युद्धाच्या धुमश्चक्रीत हा राजवाडा हा विचित्र योगायोग बनून गेला आहे. ह्या कुटुंबाचे वैशिष्ट्य म्हणजे आजही सुदैवाने ह्या प्रासादाची निगराणी करण्याएवढी सांपत्तिक स्थिती राहिली आहे. सध्याचे लेबनन, युद्धाचे पडघम, बेरुटमधील गोळागोळी, सातत्याने बेघर होणारी जनता, हवाई हल्ले, खूनखराबा, ड्रूझ, मरोनाईटस्, हेजबोला अशा विविध घटकांमधील लढाई ह्या वातावरणात लेबननची जीवनमूल्ये आणि नीतिमूल्येही बदलून गेली आहेत अन् तरीही बस्ट्रॉस कुटुंब मात्र पूर्वी होते तसेच आहे. जणू ते आजच्या लेबननमध्ये नाहीच... त्यांच्या घरातले कॅलेंडर कधी बदललेच नाही...

जेनीफर फॉक्सला प्रथम हे कुटुंब ज्ञात झाले १९८० मध्ये. न्यूयॉर्क विद्यापीठाच्या चित्रपट विभागात विद्यार्जनासाठी जेनीफर आली तेव्हा तिच्या वर्गात गॅबी बस्ट्रॉस ही मुलगी शिकत होती. गॅबी तिच्यापेक्षा वयाने मोठी होती. ती लेबननची आहे, ती तिच्या पतीबरोबर अमेरिकेला आली, तिने घटस्फोट घेतला, आता ती आपली सहाध्यायी आहे, एवढेच जेनीफरला ठाऊक होते. एकाएकी १९८१ च्या एप्रिलमध्ये गॅबीने जेनीफरला फोन केला, त्या वेळी गॅबी व जेनीफर एकाच कथेवर जोडीने चित्रपट करीत होत्या. बेरुटमधील आपल्या घरावर बॉंबहल्ला झालाय नि आपण लागलीच मायदेशी जात आहोत, असे घाबऱ्या घाबऱ्या तिने जेनीफरला सांगितले. आतां तरी घर आणि लेबनन सोडून आपल्या कुटुंबाने परदेशी जावे म्हणून प्रयत्न करणार असल्याचेही तिने सांगितले. गॅबी बस्ट्रॉसचे एकूण वागणे

चमत्कारिक होते. गॅबी लेबननला गेली आणि ५-६ महिन्यांनी परतली. आपल्या घराची छायाचित्रे तिने जेनीफरला दाखवली आणि धडाधड बोलत राहिली, हे सर्व आविश्वसनीय होते. छायाचित्रात एक अवाढव्य राजवाडा होता, आजूबाजूच्या परिसरातील १०-१२ नागरिक सुरक्षिततेसाठी बस्ट्रॉस प्रासादात आलेले होते. त्या प्रासादाच्या प्रांगणातील प्रचंड जुनी झाडे बाँबमुळे पार आडवी झाली होती. बेरुटमध्ये वीज तोडली गेल्याने ह्या प्रासादात गॅसबत्त्या पेटल्या होत्या. पाणी नसल्यामुळे आणि तणावपूर्ण वातावरणामुळे झोपणे अशक्य असल्याने सर्वांचे खोल गेलेले डोळे, वाढलेल्या दाढ्या छायाचित्रात स्पष्ट दिसत होत्या... अन् अशा पार्श्वभूमीवर तेथे पार्टी रंगत होती. सर्वच अनपेक्षित होते. गॅबी बस्ट्रॉसचे घर म्हणजे प्राचीन राजवाडा असल्याचे सत्य जेनीफरला तेव्हा उमगले. 'मग सोडलं का हे घर तुम्ही?' जेनीफरने विचारले. १८० डिग्रीच्या कोनात मान हालवून गॅबी म्हणाली, 'मुळीच नाही, सोडणारच नाही आता!' युद्धे वेडीच असतात पण त्यातही जुन्यांना चिकटून राहणारी ही माणसे वेडगळ तर नव्हेत? – जेनीफरच्या मनात मग गॅबी बस्ट्रॉस तो प्रासाद आणि त्यातील माणसं रुंजी घालू लागली. अन् पिच्छा पुरविणाऱ्या ह्या कुटुंबावर 'बेरुट' हा चित्रपट काढायच्या विचाराने जेनीफर थरारली.

ह्या चित्रपटाला कथा-पटकथा नाहीच. गॅबी, नायला, मोना ह्या तीन कणखर व्यक्तिमत्त्वाच्या बहिणी, त्यांचा फॅडी हा भाऊ आणि आई मिमी हे खरेखुरे कुटुंब त्यात आपापल्या नेहमीच्याच भूमिका जगते. अत्यंत थंड वृत्तीचे त्यांचे वडील मृत्यू पावल्यानंतरचे चित्रण त्यात आहे. बाहेर बाँब पडत आहेत नि थोरली मोना बागेत जाऊन हट्टाने नवी रोपे लावते... फॅडीचे लग्न सुरक्षित गावी करावे हा आईचा प्रस्ताव मोना फेटाळून लावते अन् भर खणाखणीत, प्रेतांचा खच पडला असताना बेरुटमध्येच हे लग्न इतमामाला साजेसे होते, (येथे नाटक नाही, लग्नही खरे नि युद्धही खरे) मोना ह्या चित्रपटाचा केंद्रबिंदू बनली. मोनाचे आपल्या पतीशी पटेनासे झाले नि ह्या पतीने तिच्यापेक्षा धाकट्या नायलाशी विवाह केला तरीही ही जिद्दी सरदारकन्या तशीच राहिली... आजही हे कुटुंब अस्सेच आहे. जेनीफर फॉक्सने केवळ ह्या विचित्र कुटुंबाचे चित्रण केले नाही तर त्रयस्थ जेनीफर आणि तिच्या कॅमेऱ्याने त्यातल्या प्रत्येक सदस्याला बोलते केले. एकमेकांशी अत्यंत कमी बोलणाऱ्या ह्या माणसांना जेनीफरला समोर पाहून जणू कंठ फुटला... प्रत्येकजण स्वतंत्रपणे तिच्याशी बोलत राहिला. परिणामी जेनीफरने चित्रपटासाठी संवाद तयार केलेच नाहीत. बस्ट्रॉस कुटुंब जसे जगत आहे ते टिपले, जे बोलतील ते मुद्रित केले, जसे वागतील ते छायाचित्रित केले. एवढा सहज स्वाभाविक चित्रपट अन्य नाहीच. 'बेरुट' ह्या चित्रपटाचा मग प्रेक्षक आस्वाद घेऊच शकत नाही तर हा चित्रपट म्हणजे स्वतंत्र अनुभव बनून राहिला आहे.

जानेवारी, १९९०

❊❊❊

# २४

※

# चार्ली चॅप्लीन

**मा**णसाच्या आयुष्यात किती विचित्र योगायोग असू शकतात त्याचं एक उदाहरण म्हणून स्वित्झर्लंडमध्ये वेव्ही ह्या निसर्गरम्य, पहाडी गावात राहणाऱ्या एका विधवा स्त्रीकडे बोट दाखवायला हवं. मन्वार द बान ह्या ऐसपैस बंगल्यात स्थिर, शांत जीवन कंठित असलेल्या ह्या स्त्रीभोवती सध्या प्रसिद्धीची वलये फिरत आहेत. एकेकाळी प्रसिद्धीची सर्व माध्यमे तिच्यामागे हात धुऊन लागली होती. त्यांच्यापासून ती निश्चयानं दूर गेली होती.

तेव्हा ही माध्यमे तिची शिकार टिपायचा मोका पाहात होती, टीकेचं मोहोळ उठवायची संधी हुडकीत होती. आज हीच माध्यमे तिच्या मुलाखतीसाठी जिवाचा आटापिटा करीत आहेत. कारण १९८९हे वर्ष ह्या स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा आहे. हे तिच्या पित्याचं आणि पतीचंही शताब्दी वर्ष आहे. असा योग सामान्यतः कोणाच्या वाट्याला येत नसतो. ह्या स्त्रीचं नाव आहे ऊना चॅप्लीन... शतकाचा श्रेष्ठ नाटककार युजीन ओ' नील ह्याची ही कन्या आणि जागतिक चित्रसृष्टीच्या इतिहासातील एक 'चमत्कार' चार्ली चॅप्लीन ह्याची ही पत्नी. ऑक्टोबर १६, १८८८ रोजी युजीन ओ' नीलचा जन्म झाला तर एप्रिल १६, १८८९ रोजी चार्ली चॅप्लीनचा जन्म झाला. हाही एक योगायोगच म्हणायचा की, ज्या अमानुष महत्त्वाकांक्षी माणसाची खिल्ली उडविण्यासाठी चार्ली चॅप्लीनने 'द ग्रेट डिक्टेटर' हा लोकप्रिय चित्रपट निर्माण केला तो हिटलरदेखील चार्लीच्या मागोमाग चारच दिवसांनी म्हणजे दि. २० एप्रिल १८८९ रोजी जन्मला.

मानवी आयुष्याला झुल्याची उपमा दिली जाते. ती चॅप्लीनच्या बाबतीत चपखल बसावी. दारिद्याचे भयावह चटके असोत अगर उतू जाणारं वैभव असो, चॅप्लीननं दोन्ही टोकं भोगली. लोकप्रियतेचं शिखर जसं गाठलं तशीच असीम बदनामीची दाहक वेदना अनुभवली. सुंदर स्त्रियांचा प्रणय त्याला मिळाला त्याचबरोबर एका पाताळयंत्री स्त्रीच्या कारस्थानामुळे अपार मनस्तापही त्याच्या वाट्याला आला. जणू हे सर्व अनुभव पुरेसे नव्हते म्हणून देशोधडीला लागण्याचं दुर्भाग्यही त्याला स्वीकारावं लागलं आणि त्यानंतर पुनश्च गौरवाची फुलं, सन्मानाच्या पायघड्या मिळणं. हे सर्वच कोणाला अविश्वसनीय वाटावे. पण ते सर्व खरंखुरं जीवन होतं. एवढ्या विविध अनुभूतीतून माणूस जेव्हा तावून सुलाखून निघतो तेव्हा बहुधा अत्यंत स्थिर, तत्त्वचिंतक आणि काहीसा अलिप्त बनतो. उत्तरायुष्यातला चॅप्लीन त्याला अपवाद राहिला नाही. मात्र चार्लीपेक्षाही अधिक अलिप्त बनली ती त्याची पत्नी ऊना चॅप्लीन. १९७७ च्या नाताळच्या दिवशी चार्ली चॅप्लीनचे निधन झाले. तेव्हापासून 'चॅप्लीन' हा विषय ग्रंथकारांना, चित्रपट निर्मात्यांना खुणावीत होता, पण ऊना चॅप्लीन कोणालाच दाद देत नव्हती. 'चार्ली'वर चित्रपट बनविण्याची मुभा आपल्याला मिळावी म्हणून शेकडो निर्माते व दिग्दर्शकांनी थेट स्वित्झर्लंडमध्ये वेव्ही ह्या गावापर्यंत प्रवास करून ऊनाची भेट मिळावी म्हणून धडपड केली, पण ऊनाचा नकार कायम राहिला. आता मात्र चार्लीच्या शताब्दीच्या निमित्ताने ऊनाने आपली भूमिका बदलली. ह्या परिवर्तनामागे शताब्दी हे एक कारण होतेच, पण त्याखेरीज चित्रपटनिर्मितीचे हक्क मागायला येणारी व्यक्ती हेही एक प्रमुख कारण होते. ऐऱ्यागैऱ्याच्या हाती 'चार्ली' जाणे ऊनाला पसंत नव्हते. जेव्हा सर रिचर्ड ॲटेनबरो हा प्रस्ताव घेऊन आले तेव्हा अर्थातच ऊना आणि त्यांची नऊ मुले यांची संमती मिळणे सुकर झाले. सर रिचर्डनी ह्या चरित्रात्मक चित्रपटाची तयारी आता पूर्ण केली आहे.

सर चार्ल्स चॅप्लीन म्हणजे जागतिक चित्रपटक्षेत्रातील अस्सल प्रतिभावंत! चित्रपटाला वाचा लाभली नव्हती तेव्हा १९१६ पर्यंत किमान १०० चित्रपट त्याने निर्माण केले किंवा अभिनयाने नटवले. डोक्यावर बॉवलर हॅट, हातात काठी, पायात कोणाचे चोरून आलेले वाटावेत असे बूट, हिटलरच्या पद्धतीची मिशी आणि ढगळंढाळ विजार, डोळ्यांत सदैव मार खाणाऱ्या कुत्र्याचा दयनीय भाव किंवा कशी सगळ्यांची जिरवली अशा थाटात कधीमधी उमटणारा खोडकरपणा, चालणं कमालीचं बावळट, सर्वच हालचालीत एक प्रकारचा बुजरा संकोच.. भीती, धास्ती, दडपण! बावळटपणा एवढा की, साधं फाटकाचं दार उघडून आत प्रवेश करणे ही क्रियाही धड जमू नये. फाटकाचं दार तो अशा रीतीने उघडे की, जोरात माघारी येऊन चार्लीवर आपटावे नि त्याच्या धक्क्यामुळे चार्लीचा आत प्रवेश व्हावा दंडवत घालण्याच्या पोझमध्ये! ह्या बावळट अवताराला अपार कारुण्याचे अस्तर लावलेले... 'चार्ली द ट्रँप' म्हणजे हे बावळट ध्यान इतके लोकप्रिय ठरले की, आज

एवढ्या वर्षांनीही 'चार्ली चॅप्लीन' रसिकांच्या पाचव्या पिढीलाही तेवढाच भावतो, जेवढा चार्लीच्या समकालीन पिढीला भावला होता. कलेचे यश ह्या कालातीत असण्यात मोजायचे असते. त्याच्या 'ट्रॅम्प'ची मोहिनी एवढी जबरदस्त होती की, भारतात राज कपूरसारख्या कलावंताच्या जणू हाडीमाशी हा ट्रॅम्प भिनून गेला नि त्याची वेगवेगळी रूपे आवारा, श्री ४२०, जोकरमधून प्रकटत राहिली. एकटा राज कपूरच नव्हे तर असंख्य कलावंतांनी अभिनयाच्या आविष्कारासाठी 'ट्रॅम्प'च्या एखाद्या वैशिष्ट्याचा आधार घेतला. एकटी हिंदी चित्रपटसृष्टीच नव्हे तर जगभरच्या विविध भाषांतील चित्रपटांनाही हा ट्रॅम्प म्हणजे गिरवण्याचा कित्ता अगर स्फूर्तिदाता वाटला. आताच्या परिभाषेत बोलायचे तर चार्लीचे शंभर चित्रपट प्राचीन म्हणायला हवेत. मूकपटांच्या जमान्यातील ह्या कलाकृती. माणसाच्या पंचेंद्रियांपैकी 'श्रवण' हे इंद्रिय तेव्हा चित्रपटाच्या बाबतीत अस्तित्वातच नव्हते. विज्ञानाच्या प्रगतीमुळे चित्रपटांचा पडदा बोलू लागला तेव्हा चार्लीने व्यक्त केलेली प्रतिक्रिया धक्कादायक होती...

'पडद्याला वाणीची देणगी मिळाली खरी पण त्यामुळे कलेला भाषेच्या बंधनाची चौकट पडली. मूकपटाचा आस्वाद कोठल्याही भाषेचा रसिक घेऊ शकत होता. आता फक्त त्या त्या माध्यमातील भाषा जाणणारा रसिक तेवढा त्याचा आनंद लुटेल. चित्रपटाला बोलतं करणाऱ्या वैज्ञानिकांनो, तुम्ही कला आणि रसिक ह्यांच्यामध्ये भाषेची भिंत निर्माण केलीत. अभिनयाला वाणीची जोड दिलीत नि अभिनयाचा कस कमी केलात...'

लंडनची दरिद्री वस्ती म्हणजे लँबेथ विभाग. ह्या दरिद्री वस्तीत चार्लीचे बालपण गेले. आई-वडील दोघेही कनिष्ठ दर्जाच्या कलापथकांतील कलावंत होते. चार्लीची आई वयाच्या १८व्या वर्षी एका मध्यमवयीन माणसासह आफ्रिकेला पळून गेली होती. चार्लीचा थोरला भाऊ सिडनी आफ्रिकेतच जन्मला. पण ही स्त्री मुलाला घेऊन लवकरच आफ्रिकेतून परतली. त्यानंतर तिने चार्लीच्या वडिलांशी लग्न केले व १८८९ मध्ये चार्लीचा जन्म झाला. दारिद्र्य आणि उपासमार एवढी दुःखे पुरेशी नव्हती म्हणून आई-वडिलांचा एकमेकांशी बेबनाव, सततची भांडणे, विभक्त होणे हे अनुभव तर घेतलेच पण प्रत्यक्ष रंगमंचावर प्रेक्षकांसमोर भूमिका साकारायला उभ्या राहिलेल्या आईचा कंठच जाणे, गळ्यातून गाणे न उमटता आवाज गोठून जाण्याचे पाहण्याची दुर्दैवी पाळीही सिडनी वं चार्लीवर आली. आधी विमनस्क, मग शून्यमनस्क नि हळूहळू ठार वेडी झालेली आई पाहण्याचे दुर्भाग्य वाट्याला आले. वयाच्या २१ व्या वर्षी चॅप्लीन अमेरिकेला गेला. त्यानंतर सिडनी व चार्लीने आपल्या आईला अमेरिकेला आणण्यासाठी जीवाचे रान केले नि अमेरिकेच्या किनाऱ्यावर उतरताच ह्या माऊलीनं कस्टम अधिकाऱ्याला 'तू येशू ख्रिस्त आहेस ना?' असा प्रश्न करून आपली मानोरुग्णावस्था ठळकपणे दाखवली... चार्लीच्या आयुष्यातील अशा दुर्दैवी घटनांची नोंद भली लांबलचक आहे.

कलेतील उत्तुंग प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्व म्हणून चार्लीचे स्थान उच्च राहिले. मात्र जीवन सदैव वादळी आणि वादग्रस्त बनले. त्याची चार लग्ने चर्चेचा विषय झाली. तीन घटस्फोट टीकेचे लक्ष्य बनले, अनेक प्रेमप्रकरणे वादळी ठरली, युद्धाला विरोध करण्याची त्याची भूमिका वादास्पद ठरली, त्याची डावी विचारसरणी, रशियन नेत्यांशी असलेली त्याची मैत्री, अमेरिकन नागरिकत्व न घेण्याचा त्याचा निर्धार... चार्ली चॅप्लीनच्या बाबतीत सारेच धुमसणारे अंगार ठरले. एखाद्या धूमकेतूसारखी कोठूनशी आलेली जोन बॅरी, तिने चार्लीवर केलेले हीन आरोप आणि चार्लीपासून आपल्याला अनौरस मूल झाल्याचे रचलेले कुभांड, त्यातून उद्‌भवलेला खटला ही प्रकरणे चार्लीला भरपूर मनस्ताप देणारी ठरली. भरीस भर म्हणून चार्लीवर 'कम्युनिस्ट' हा शिक्का मारून अमेरिकन सरकारने घेतलेला सूडाचा पवित्रा डोईजड झाला. ह्या काळात चार्लीस आशावादी ठेवण्यास कारणीभूत झालेली व्यक्ती म्हणजे ऊना ओ' नील. नाटककार युजिन ओ' नीलची ही अठरा वर्षांची मुलगी संकल्पित 'शॅडो अँड सब्स्टन्स' ह्या चित्रपटातील नायिकेच्या भूमिकेसाठी चार्ली चॅप्लीनला भेटायला आली होती. भविष्यातील २५ वर्षांच्या आनंदी काळाची ही जणू नांदीच ठरली. पाहता पाहता ऊना ओ' नील व चार्ली चॅप्लीन एकमेकांच्या प्रेमात पडले. 'शॅडो अँड सब्स्टन्स' पूर्ण होताच विवाह करण्याचे त्यांनी ठरविले पण जोन बॅरी प्रकरणाने नवे वळण घेतल्याने हा विवाह पुढे न ढकलणे व्यवहार्य वाटले आणि सांता बार्बरा येथे हा विवाह गुप्तपणे पार पडला. जोन बॅरी खटला चालूच होता. ह्या खटल्यात चार्ली निर्दोष सुटला. पण एक झंझट मिटते तो दुसरे उभे राहिलेच.

– 'चार्ली चॅप्लीन : रशियाचा हस्तक', 'चार्ली चॅप्लीन कम्युनिस्टांनी पेरलेला' अशा शीर्षकाखाली वृत्तपत्रांचे रकाने चार्लीबद्दल भरू लागले. नाचक्कीची त्यांच्यात स्पर्धा लागली. ह्याचा परिपाक म्हणून चार्ली आणि ऊनाने अमेरिका सोडली. न्यूयॉर्क बंदरात 'क्वीन एलिझबेथ' ह्या नौकेत चार्ली व ऊना गुप्तपणे चढले आणि इंग्लंडचा मार्ग धरला. इंग्लंडमध्ये चार्ली चॅप्लीनचे लोकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. पुढचा टप्पा म्हणून स्वित्झर्लंडची निवड झाली आणि वेव्ही ह्या निसर्गरम्य, शांत गावी जीवनातील चढ-उताराचे विविध आघात अल्पावधीत भोगलेली ऊना चार्लीसह वास्तव्यास गेली. आपल्यामुळे एवढ्या लहान वयात ऊनाला अशा कडवट प्रकारांना तोंड द्यावे लागले अशी टोचणी चार्लीला कायम लागली होती. पुढे अनेक गौरव वाट्याला आले. राणी एलिझबेथने 'सर' बनविले, फ्रान्सने लीजाँ द ऑनर सन्मान दिला आणि ज्या अमेरिकेने त्यांना देशोधडीला लावले होते त्याच अमेरिकेने खास निमंत्रण देऊन चार्ली व ऊनाला पाचारण केले... त्यांचे दैवदुर्लभ स्वागत केले व चार्लीला विशेष ऑस्कर बहाल केले. आयुष्याच्या झुल्याचं एक मोठं आवर्तन इथं पूर्ण झालं. १९७७ मध्ये हा थोर कलावंत निधन पावला तो तृप्ती घेऊन... आयुष्याबाबत समाधान घेऊन... !

दि. १६ एप्रिल १९८९ रोजी वेव्हीमध्ये मोठा समारंभ होत आहे. शांत वेव्ही उत्साहाने भारले आहे, शंभर मुले ढगळंढाळ विजारी घालून डोक्यावर बॉवलर हॅटस् चढविणार आहेत. त्यांच्यासाठी १०० काठ्या आणि 'गोल्ड रश'मध्ये चार्लीने भुकेपोटी जे बूट खाल्ले होते त्या धर्तीचे १०० बूट जोड तयार झाले आहेत. चार्ली चॅप्लीन चित्रपट महोत्सव उद्या तेथे सुरू होत आहे नि वेव्हीच्या प्रमुख चौकास चार्लीचे नाव देण्यात येणार आहे. 'चार्ली-१९५२ ते १९७७' हे प्रदर्शनही तेथे भरत आहे. त्यासाठी चार्लीची आठ मुले व चार्लीच्या चित्रपटात काम केलेले कलावंतही उपस्थित राहणार आहेत. चार्लीचा पूर्णाकृती पुतळाही तेथे उभारण्यात येत आहे. वेव्हीमध्ये जो चॉकलेट कारखाना आहे, त्याने 'चार्ली' ह्या नावाचे नवे चॉकलेट तयार केले असून वेव्हीमध्ये उद्या ते सर्वांस वाटले जाणार आहे. अमेरिकेत चार्लीद्वेषाची १९५१-५२ मध्ये जी लाट आली होती त्यात चार्लीचा चित्रपट 'मॉसिए व्हेरदॉ' ह्याच्यामुळे अधिकच जोर आला होता. शताब्दी सोहळ्याच्या शुभारंभी हाच चित्रपट वेव्हीची जनता मोठ्या अभिमानाने अभ्यागतांस दाखविणार आहे. मानवी जीवन म्हणजे हिंदोळा आहे हेच खरे!

१५/४/८९

❋❋❋

# २५

※

# अखेर पितृभूमीकडे.....

सॉमरसेट मॉमची एक दीर्घकथा आहे– 'फोर्स ऑफ सर्कम्स्टन्सेस' नावाची. मलायातल्या एका आडमार्गी जिल्ह्यात एक ब्रिटिश मुलकी अधिकारी नेमलेला असतो. ७-८ वर्षे नोकरी केल्यावर तो मायदेशी- इंग्लंडला- सुट्टीवर जातो नि एका ब्रिटिश तरुणीशी विवाह करून तिलाही मलायाला घेऊन येतो. सहा महिन्यांच्या कालावधीत तिला काही रहस्ये उलगडू लागतात. आपल्या नवऱ्यानं तेथल्याच एका नेटिव्ह मलाय स्त्रीशी संबंध ठेवला होता नि तिला त्याच्यापासून तीन मुलं झालीत हे तिला कळतं... ती पितृमुखी मुलं तर रोजच पाहात असते. नवरा परोपरीनं विनवणी करतो. देशापासून , भाषेपासून, ब्रिटिश माणसापासून दूर- कोठली मनोरंजनाची साधनं नाहीत- कोठे कोणी मित्रही नाही- आपलेपणाचा अंशही नाही... अशा कठिण परिस्थितीपायी त्याच्या हातून ते घडलेलं असतं हे सर्व ती मान्य करते. नि मग एकच प्रश्न विचारते- 'तरीही तीन मुलं तुला व्हावीत?' एका उषःकाली ही स्वाभिमानी ब्रिटिश स्त्री नवऱ्याला नि मलायालाही सोडून इंग्लंडचा रस्ता धरते. तिची पाठ फिरताच त्याचा सर्वांत थोरला मुलगा त्याला विचारायला येतो- 'आईचा निरोप आहे- तिनं इथं केव्हा यायचं?' अन् तो मुलकी अधिकारी ज्याने गेले सहा महिने त्या नेटिव्ह स्त्रीकडे व त्या मुलांकडे तुसडी वागणूक ठेवून त्यांना झिडकारलं होतं- तो परिस्थितीला शरण जात एकाच शब्दात उत्तर देतो- 'आज रात्री.'

ह्या कथेची आठवण व्हायला एक घटना कारण ठरली. दि. २२ मार्च रोजी हॅनोई (व्हिएतनाम) मध्ये अमेरिकेच्या विमानांचा ताफा उतरणार आहे आणि अंदाजे ३०,००० मुलांना अमेरिकेस कायमचे नेणार आहे. बँकॉकमधील अमेरिकन दूतावासातील वरिष्ठ ब्रुस बर्डस्ली हे त्याकरिता गेले दोन आठवडे हॅनोईमध्येच तळ ठोकून आहेत. ही ३०,००० मुलं कोण? तर अशीच 'फोर्स ऑफ सर्कम्स्टन्सेस'ची फळं! त्यांचे चेहरेच त्यांचं वेगळेपण दाखवितात. मंगोलियन पीतवर्णाऐवजी गौर गुलाबी कांती किंवा एकदम कालीकलूटी त्वचा, निळे, हिरवे किंवा राखी डाळे, सोनेरी किंवा ताम्रवर्णी केस नाहीतर अगदी राठ, कुरळे, काळे केस- गोऱ्या किंवा निग्रो अमेरिकन सैनिकांच्या ह्या निशाण्या आहेत. १९६२ ते १९७२ ह्या दहा वर्षांच्या काळातील व्हिएतनाममधील अमेरिकन लष्करी कारवाई हे इतिहासातील एक वादग्रस्त आणि अमेरिकेच्या इतिहासातील एक अत्यंत नामुष्कीचे प्रकरण ठरले आहे.

राष्ट्राध्यक्ष जॉन केनडींची सर्वांत मोठी चूक म्हणजे व्हिएतनाममधील लष्करी हस्तक्षेप. १९६२ मध्ये केनडींच्या कारकीर्दीत ही कारवाई सुरू झाली. युद्ध म्हटले म्हणजे अस्तित्वाचा झगडा आलाच. युरोपातली स्त्री युद्धात सर्वाधिक होरपळली आहे. युद्धाचे पडघम थांबले, जीवन स्थैर्याकडे झुकू लागले की, मग जाणवते की, ह्या युद्धातून नको असलेल्या संततीची निर्मिती झाली आहे. ह्या मुलांना फक्त आई असते- बाप बहुधा त्यांचे पितृत्व स्वीकारायला मोकळा नसतो.

१९४५ मध्ये जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकीचा विध्वंस करून जपानला शरणागती पत्करायला लावल्यावर जपानमध्ये अमेरिकन लष्कर व मोजके मुलकी प्रशासक तळ देऊन होते. तेथेही वास्तविक जपानी स्त्री व अमेरिकन पुरुष ह्यांच्या मिश्र संततीची समस्या मोठ्या प्रमाणावर उद्‌भवली असती... तशी संतती तेथे निपजलीही, पण तिने उग्र समस्येचे रूप तेथे धारण केले नव्हते. त्याला अनेक कारणे होती. मुळातच जपान्यांच्या मनात अणुबॉम्बमुळे अमेरिकेबद्दल तीव्र तिरस्कार होता. त्यामुळे जपानी स्त्री शक्यतो अमेरिकन पुरुषाशी फटकून वागे. जपानी गैशा व अमेरिकन सैनिक ह्यांची जवळीक कोणाला खटकण्याचा प्रश्नच नव्हता. पण जपान्यांच्या मनात अमेरिकेबद्दल आपुलकीची भावना निर्माण करायला कारणीभूत ठरला एक हाडाचा शिपाईगडी... जो सैनिकाचे मानसशास्त्र कोळून प्याला होता... त्याचं नाव जनरल डग्लस मॅक्आर्थर... आजपर्यंत जगातील सर्वाधिक सन्मान प्राप्त करणारा हा जनरल... अत्यंत स्वाभिमानी, प्रत्येक सैनिकाला जातीनं ओळखणारा आणि त्याचबरोबर सामान्यातल्या सामान्य जपानी नागरिकालाही त्याच्या तक्रारीसाठी आपल्या कार्यालयाची दारे खुली ठेवणारा हा जनरल मॅक्आर्थर मोठा दूरदर्शी निघाला. शक्यतो अविवाहित अमेरिकन सैनिक जपानच्या पोस्टिंगसाठी निवडायचे... अशा सैनिकांसाठी अधूनमधून त्यांच्या अमेरिकन मैत्रिणी-मित्र,

कुटुंबीय जपानला आणविण्याची व्यवस्था करायची, तसेच विशिष्ट मुदतीनंतर प्रत्येक सैनिकाला सक्तीने सुट्टीवर मायदेशी पाठवायचे हे नियम ह्या जनरलने कसोशीने पाळलेच, शिवाय आणखी एक नैतिक बंधन घालून दिले. अविवाहित अमेरिकन सैनिक आणि जपानी युवती ह्यांच्यात 'कश्मकश' जाणवली तर हा जनरल त्यांना विवाह करायला लावी.

– पण सर्वच सेनानी असे असू शकत नाहीत. जपानमध्ये जे जनरल मॅक्आर्थरला जमले ते व्हिएतनाममध्ये जनरल मॅक्सवेल टेलरला जमू शकले नाही. किंबहुना 'अमेरेशियन' ही नवी समस्या उद्‌भवेल हे त्यांच्या गावीही तव्हते. त्यामुळे जवळजवळ अर्धा लाखभर 'अमेरेशियन' मुलं जन्मली. व्हिएतनामींचे मानसशास्त्र आणखीच वेगळे होय. त्यांना एकवेळ गुन्हेगार मोकाट सुटले तरी चालतील पण अमेरिकेची कोणतीही चीज चालत नाही. मुळात व्हिएतनामींना रक्तसंकर मान्य नाहीच. आपल्या ह्या कडवेपणाचा अनुभव व्हिएतनामींनी फ्रेंचांनाही दिला होता. १९४५ ते ५४ ह्या दरम्यानच्या इंडोचायना युद्धाच्या वेळी फ्रेंच सैनिक व व्हिएतनामी स्त्रिया ह्यांच्या जवळिकीतून ३,०००हून अधिक 'युरेशियन' मुलं जन्मली होती. त्यांना नेटिव्ह व्हिएतनामींनी खड्यासारखे वगळून काढले होते. नि अखेर १९७७ मध्ये फ्रेंच सरकारला खास हुकुमान्वये ह्या मुलांना फ्रान्सला नेऊन फ्रेंच नागरिकत्व द्यावे लागले होते. आज व्हिएतनाममध्ये परकीय रक्ताची फक्त 'अमेरेशियन' हीच प्रजा राहिली आहे आणि १९७५च्या एप्रिलमध्ये दक्षिण व्हिएतनामवर उत्तर व्हिएतनामचा कबजा झाल्याच्या क्षणापासून त्यांची होरपळ सुरू झाली आहे. ह्या अर्धा लाख मुलांपैकी काहींना आपल्या बापाचे नाव माहीत नाहीच... काहींना ते माहीत आहे. काहीजण बापाचे नाव लावत होती देखील. पण त्यामुळे अधिक गोंधळ झाला. उदाहरण द्यायचे झाले तर त्रेआन तुऑ रॉबर्टसन किंवा मिस माय थी हुएन पीटर, हुआन वॅन लान ब्राऊन... आधीच ह्या मुलांचे अमेरिकन चेहरे त्यांना वेगळं काढीत आहेत नि भरीस भर म्हणून ही अमेरिकन आडनावं? अशा मुलांच्या मातांना सर्रास 'बाजारबसव्या' म्हणून उपेक्षिलं जाऊ लागलं. वास्तविक ह्यात ना त्या मुलांचा दोष ना त्या महिलांचा दोष... दोष असलाच तर तो त्या युद्धाचा नि युद्ध लादणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा! प्रत्येकीच्या कहाणीचा तपशील वेगळा असेल पण सत्य एकच आहे की, नेहमीप्रमाणेच स्त्रीचे शोषण झाले. ही मुले व्हिएतनामला नकोत... पण मग कोणाला ती हवी आहेत? फक्त त्यांच्या जन्मदात्या मातांना! मातृभूमीने नाकारलेली, समाजाने झिडकारलेली आणि जन्मदात्या पित्यापासून दुरावलेली ही मुले म्हणजे अमेरिकेला अवघड दुखणे झाले. तशात व्हिएतनाम नि अमेरिका ह्यांच्यातून विस्तवही जात नाही तर राजनैतिक संबंध कसले राहणार? फक्त खलित्यामागून खलिते इतर राष्ट्रांना मध्ये घालून अमेरिकेकडे रवाना होत राहिले – 'ह्या तुमच्या प्रजेला न्या. ही मुलं आम्हाला नको.' अखेर अमेरिकन कॉंग्रेसमध्ये साधकबाधक चर्चा झाली नि कॉंग्रेस तथा खुद्द अध्यक्ष रेगन ह्यांनी ह्या दुर्दैवी मुलांना 'पितृभूमी'चे नागरिक बनविण्याचा

निर्णय घेतला. राष्ट्राध्यक्ष रेगन म्हणाले, 'काळी-गोरी कशीही असोत-अमेरिकन सैनिकांची ती मुले आहेत. व्हिएतनाममध्ये प्रसंगी प्राणास मुकलेल्या, रक्त सांडणाऱ्या माझ्या अमेरिकनांची ती निशाणी आहे. अमेरिका त्यांना सन्मान देईल.' ठराव झाल्यापासून तीन महिन्यांच्या अवधीत ह्या मुलांची नोंदणी करण्यात आली. ह्या मुलांना फक्त व्हिएतनामी भाषा येते नि ती सर्वच अत्यंत गरीब आहेत. त्यातील काही मुलीमुलं उन्मार्गाला लागली आहेत. तेव्हा इंग्रजी भाषा, अमेरिकन जीवनपद्धती त्यांना विशिष्ट वय उलटण्यापूर्वीच शिकवावी ह्या उद्देशाने त्यांच्या स्थलांतराचे आदेश त्वरेने काढण्यात आले नि ३०,००० अमेरेशियनांचा एक समूह व्हिएतनाम सोडून पितृभूमीला रवाना होत आहे नि आश्चर्याची बाब म्हणजे ह्या ३०,००० मध्ये त्या पोरांखेरीज त्यांच्या व्हिएतनामी माताही स्थलांतरित होत आहेत. अमेरिकेतील समाज कल्याण संस्था, अमेरिकन समाज कल्याण खाते, फोर्ड, रॉकफेलरसारख्या धनिकांचे निधी, विविध चर्चेस, मदर तेरेसांची अमेरिकेतील मिशन्स आपले दरवाजे उघडे ठेवून त्यांच्या स्वागतार्थ सज्ज आहेत.

२१/३/८८

❋❋❋

# २६

※

## षष्ट्यब्दिपूर्ती

पूर्णतः चाकोरीबाहेरचे, प्रस्थापिताशी संघर्ष करणारे आणि हिंदोळ्यासारखे दोलायमान आयुष्य लाभलेले एक व्यक्तिमत्त्व यंदाच्या वर्षी... अगदी नेमकी तारीख सांगायची तर २८, जुलै १९८९ रोजी साठ वर्षांचे झाले. षष्ट्यब्दी पूर्ण केलेली ही व्यक्ती विलक्षण देखणी आहे – आजही! दोन लोकोत्तर आणि धनंतर पुरुषांशी तिचे विवाह झाले नि साठ वर्षांच्या आयुष्यात दोन वेळा वैधव्याचे आघातही झाले. ही व्यक्ती म्हणजे अमेरिकेतील जॅक आणि जॅनेट बॉव्हिए ह्या धनिक आई-वडिलांची थोरली कन्या व्हर्ना जॅकलीन बॉव्हिए तथा जॅकलीन केनेडी-ओनॅसिस. भरभरून वाहणारे ऐश्वर्य, सौंदर्य, बुद्धिमत्ता, मानमरातब, नावलौकिक, ओसंडून जाणारे सुख आणि वज्रप्रहारासारखे जबर दु:ख, फळलेला-फुललेला संसार आणि दिवसेंदिवस चढत्या भाजणीप्रमाणे वाढणारे वैवाहिक तणाव... एकाच व्यक्तीच्या वाट्याला एवढे चढउतार, एवढे हेलकावे नि इतकं भलंबुरं एकाच जीवनात आल्याची उदाहरणं थोडी आढळतील. ही आंदोलने विवाहोत्तर जॅकलीनच्या वाट्याला आली असावीत, हा अंदाज चुकीचा आहे. अगदी बालपणी कडू आणि गोडाचं मिश्रण जॅकलीन आणि तिची धाकटी बहीण कॅरलीन ली ह्यांच्या नशिबी आलं. एके काळी वाढदिवसाला मुलींना खरे घोडे घेऊन देणारे, नोकरांचा ताफा दिमतीला असलेले बॉव्हिए जोडपे १९४० मध्ये विभक्त झाले, आणि आई-वडिलांच्या घटस्फोटानं जॅकलीन व कॅरलीनच्या वाट्याला चमत्कारिक आयुष्य आलं. तो न्यायालयाचा निवाडा

होता की, ह्या दोन मुलींचं जीवन आई व वडील ह्यांच्यात विभागलं जावं. त्यानुसार वर्षातले सहा महिने ह्या दोघी जॅक बॉव्हिए आणि त्याच्या नव्या संसारात वाटेकरी होत तर उरलेले सहा महिने आईच्या नव्या संसारात सहभागी होत. ह्या घटस्फोटाने आर्थिक वाटणी होऊन हे धनंतर कुटुंब मध्यमवर्गीयांच्या आर्थिक स्तरावर आलं. कदाचित बालपणातील ह्या अनुभवाने नकळत दोघीजणींवर एक विशिष्ट परिणाम झाला. श्रीमंती हे दोघींचंही ध्येय बनलं... ती प्राप्त झाली तरीही तृप्ती न होण्याइतकी संपत्तीची तृष्णा नकळत निर्माण झाली. पैसा म्हणजे सुरक्षितता अशी एक भावना घर करून राहिली. त्याचमुळे असेल, जॅकीच्या धाकट्या बहिणीने कॅरलीन लीने प्रिन्स रॅडझिवीलची जोडीदार म्हणून निवड केली.

जॅकी बॉव्हिएचे उच्च शिक्षण फ्रान्समध्ये व नंतर अमेरिकेतीलच जॉर्जटाऊन विद्यापीठात झाले. जॉर्जटाऊनच्या एका समारंभात एक तरुण सेनेटर जॉन फित्झेरल्ड केनेडी ह्यांच्याशी तिची ओळख झाली पण फक्त ओळखीपुरतीच... प्रेमबीम काही जमलं नव्हतं. १९५१ मध्ये तर अमेरिकेतील एक तरुण, धनाढ्य बँकर जॉन हस्टेड ह्याच्याबरोबर जॅकी बॉव्हिएचा साखरपुडाही झाला आणि त्याच सुमाराला जॅकीने पत्रकार-छायाचित्रकाराची नोकरीही स्वीकारली. इथं सर्व कसं सुरळीत दिसत होतं. आवडीचा व्यवसाय नि आपणच निवडलेल्या श्रीमंत बँकरशी विवाह... पण एक वेगळंच वळण तिच्यासमोर आलं. पत्रकारितेतच पुनः एकदा जॉन केनेडींशी भेट घडली. केनेडींच्या मनात ही सुंदरी पूर्वीच भरली होती. आता नव्याने संधी मिळताच केनेडींनी ती गमवावी कशी? जॉन हस्टेडशी ठरलेला विवाह अर्थातच मोडला नि १२ सप्टेंबर १९५३ रोजी थाटामाटाच्या सोहळ्यात व्हर्ना जॅकलीन बॉव्हिए ही २४ वर्षांची लावण्यवती ३६ वर्षे वयाच्या जॉन फित्झेरल्ड केनेडींची पत्नी बनली.

केनेडी परिवार म्हणजे जणू राजघराणेच होते.. खूप मोठे कुटुंब. मैदानी खेळांचे शौकीन. एवढ्या मोठ्या गोकुळात... विशेषतः जॉन केनेडींची आई रोझ केनेडींशी जमवून घ्यायला जॅकीला थोडे प्रयास पडले. ह्याच काळात जॉन केनेडींना एक अपघात होऊन त्यांच्या मणक्यांना इजा झाली. शस्त्रक्रिया यशस्वी झाली तरीही आयुष्यभर जीवघेण्या पाठदुखीने केनेडींची पाठ सोडली नाही. जॅकी केनेडीच्या आयुष्यातील चढउताराला आरंभ झाला. दोन मिस्कॅरीएजीस आणि जॉन केनेडींच्या विवाहबाह्य प्रेमप्रकरणांच्या अफवा ह्यांनी जॅकीचे वैवाहिक जीवन अस्थिर दिसू लागले पण तेवढ्यात १९५७ मधील कन्या कॅरलीनचा जन्म, १९५९ मध्ये जॉन केनेडींना डेमॉक्रॅटिक पक्षाची मिळालेली उमेदवारी, पाठोपाठ जॉन ज्युनियर ह्या पुत्राचा जन्म... हिंदोळ्याने आनंदाच्या दिशेने झेप घेतली होती... सेनेटर जॉन केनेडी व त्यांची ही सुंदर पत्नी आणि दोन गोजीरवाणी मुलं वॉशिंग्टन येथे १६००, पेन्सिल्व्हानिया ॲव्हेन्यू ह्या प्रासादतुल्य, ऐतिहासिक वास्तूत स्थलांतरित झाली... तेथून पुढचा प्रवास एखाद्या सुंदर स्वप्नासारखा झाला... ४४ वर्षांचा तरुण राष्ट्राध्यक्ष अमेरिकन

जनतेने निवडला आणि हे चौकोनी केनेडी कुटुंब व्हाईट हाऊसचे मानकरी झाले.

श्रीमंती, मानमरातब आणि प्रसिद्धी ह्या तीनही स्वप्नांची पूर्ती जॅकीच्या आयुष्यातील ह्या काळात झाली. जी असुरक्षिततेची भावना नष्ट करण्यासाठी अमिरी दौलतीची आस जपली होती, ती असुरक्षितता कायमची नष्ट झाली, असे जीवनाच्या ह्या टप्प्यावर जॅकी केनेडीला वाटू लागले नि नेमक्या त्याच टप्प्यावर अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष किती असुरक्षित असू शकतो, हे नियतीने भीषण रीत्या तिला दाखवावे, ... केवढे मोठे दुर्दैव! जॅक व जॅकी हे दांपत्य जगाचे आकर्षण बनले होते... जॅकीच्या फॅशन्स, केशरचना, तिचं वागणं, तिची कलाप्रियता... जणू जगाने या दोघांवरही उदंड प्रेम केलं नि नशिबानं दिशा बदलली. तिसऱ्या अपत्याचा जन्म व मृत्यू ह्या आघातातून जॅकी पुरती सावरण्यापूर्वीच एल्म्स स्ट्रीट, डलस (टेक्सस) येथे झालेली जॉन केनेडींची निर्घृण हत्या... ह्या इतिहासाचे सर्व जग साक्षीदार झाले तर जॅकी ह्या शोकांतिकेची नायिका बनली. जबरदस्त आघाताने घायाळ झालेल्या ह्या कुटुंबाला मोलाची मदत करणारा सेनेटर रॉबर्ट केनेडींसारखा दीरही खुन्याची शिकार व्हावा, हेही बघणं ह्या कुटुंबाच्या नशिबी आले.

जागतिक पातळीवरील एवढी महत्त्वपूर्ण स्त्री- तीही विधवा नि सुंदर व तरुण... अशी स्त्री एकटी राहाणे बहुधा कठीण असते. सर्व जगाची सहानुभूती जॅकीला मिळाली पण सहानुभूती पुरेशी नसते. जॅकीने नौकानयन क्षेत्रातील सम्राट ॲरिस्टॉटल सॉक्रेटीस ओनॅसिसशी दुसरा विवाह करताच ही सहानुभूती क्षणात तिखट टीकेत रूपांतरित झाली. जॉन केनेडींसारखा उमदा, देखणा, अत्यंत आकर्षक, सर्व जगाला भुरळ पाडणारे व्यक्तिमत्त्व लाभलेला, बुद्धिमान, खानदानी पुरुष कोठे नि हा कुरूप, बुटका, खानदानीपणाचा अंशही नसलेला ओनॅसिस कोठे, अशी तुलना जनतेने सुरू केली. खास ओनॅसिसच्या पैशावरच ही फिदा झाली असणार, असे निष्कर्षही काढले. विवाहात ओनॅसिसने तिला दिलेला ४० कॅरटचा हिरा आणि तिला बक्षीस देऊन टाकलेले बेट ह्या निष्कर्षाला पूरक होतेच.

जॅकी-ॲरी ओनॅसिस विवाह कधी यशस्वी झाला नाहीच. ओनॅसिसची प्रथम पत्नी टिनापासून झालेली मुले ॲलेक्झँडर व ख्रिस्टिना ह्यांच्याशी जॅकीचे कधीच पटले नाही. जॅकीच्या मनात सातत्याने होणारी जॉन केनेडी-ॲरी ओनॅसिस तुलना, जॅकीचा उधळा स्वभाव, छानछोकीची आवड, तिच्यापायी होणारा भरमसाठ खर्च, जॅकी व सावत्र मुलांमधील बेबनाव ह्या प्रतिकूल परिस्थितीला तोंड देणाऱ्या ॲरिस्टॉटल ओनॅसिसला आणखी एका भयानक शोकनाट्याचा वाटेकरी व्हावे लागले. एकुलता एक पुत्र व ओनॅसिस दौलतीचा खरा मालक अलेक्झँडरचा विमान अपघातात झालेला अंत! ॲरी ओनॅसिस खचत गेला... मायस्थेनिया ग्रॅव्हिस ह्या रोगाची शिकार बनला, प्रकृती ढासळत गेली आणि जॅकी केनेडी-ओनॅसिसला पुनश्च वैधव्याचा आघात पेलावा लागला. ओनॅसिसची मुलगी

ख्रिस्टिनाने ताबडतोब वडिलांच्या वारसा हक्कातून जॅकीचे नाव हटविले. अर्थात जो थोडा हिस्सा जॅकीला मिळाला, तोही काही कमी नव्हता. तो कोट्यवधीच्या घरातलाच होता.

ओनॅसिसच्या मृत्यूनंतर पुन: पुन्हा जॅकीच्या विवाहाच्या वावड्या उठवल्या गेल्या. अभिनेते, गायक, कलावंत, वकील अशा अनेक क्षेत्रांतल्या अनेक नामवंतांची नावे तिच्या संबंधात घेतली गेली पण त्या अफवा ठरल्या. जॅकीने एका प्रकाशन संस्थेने देऊ केलेले वरिष्ठ पातळीवरील पद स्वीकारले आणि संपादन व दोन मुलांची देखभाल ह्यांच्यावर आपले लक्ष केंद्रित केले. आज जॉन केनेडी ज्युनियर एक यशस्वी वकील बनला आहे नि अमेरिकेच्या राजकारणात पुढेमागे तो चमकण्याची चिन्हे दिसत आहेत. मुलगी कॅरलीन संसारात पडलीय नि एका मुलीची आईही झालीय. जॅकी आज आजी बनली आहे. कलासंशोधन, प्रकाशन-संपादन (मायकल जॅक्सनचे 'मूनवॉक' हे आत्मचरित्र जॅकीनेच संपादित केले.) आणि छायाचित्रण ह्या आवडीच्या क्षेत्रात जॅकी पार बुडून गेली आहे. मोगलकालीन कला ह्या विषयावर संशोधन करण्यासाठी जॅकी नुकतीच भारतात येऊन गेली. जयपूरच्या महाराणी गायत्रीदेवी ह्या तिची निकटची मैत्रीण आहेत. त्यांचे आतिथ्य आणि केरळचे निसर्गसौंदर्य ह्यांचा आस्वाद घेऊन जॅकी अगणित छायाचित्रे काढून परत गेली.

आपली षष्ट्यब्दिपूर्ती जॅकीने आपल्या निकटवर्तीयांच्या सहवासात साजरी केली. 'अ वुमन कॉल्ड जॅकी' हे तिचे चरित्र त्याच सुमाराला बाहेर आले. धनलोभी, कंजूष, कारस्थानी अशा दूषणांपासून कलाप्रिय, सहृदय, सुमाता अशा विशेषणांपर्यंत सर्वांची धनी झालेली ही जगप्रसिद्ध स्त्री खरेच कशी आहे? पोळलेली आहे. होरपळलेली आहे. खूप काही सहन करूनही ताठ उभी आहे- अन् एवढे आघात, दु:ख, वेदना ह्यांची वाटेकरी होऊनही एवढे मात्र खरे की, साठ हिवाळे बांधलेली ही लोकोत्तर स्त्री आजही तेवढीच सुंदर आणि सुघड आहे... जेवढी १९५१ मध्ये होती... जेव्हा जॉन केनेडी तिच्यात गुंतले!

९/१०/८९

३४२८
२६३५८
निबंध २२४१८२

# २७

※

# जॉर्ज पहिला ते जॉर्ज दुसरा

**दि.** २० जानेवारी १९८९ रोजी अमेरिकेचे ४१ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाचे जॉर्ज हर्बर्ट वॉकर बुश ह्यांनी शपथ घेतली. तो दिवस ऐतिहासिक महत्त्वाचा होता. बरोबर २०० वर्षांपूर्वी ह्याच दिवशी स्वतंत्र अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष म्हणून जॉर्ज वॉशिंग्टन ह्यांनी शपथ घेतली होती. आणखी एक योगायोग बघा – जॉर्ज वॉशिंग्टन ह्या पहिल्या राष्ट्राध्यक्षापासून जॉर्ज बुश ह्या ४१ व्या राष्ट्राध्यक्षापर्यंत मध्यल्या ३९ अध्यक्षांमध्ये एकही 'जॉर्ज' ह्या नावाचा नव्हताच. जॉर्ज बुश ह्यांच्या निवडणूक प्रचारात माजी राष्ट्राध्यक्ष रेगन तर ह्या योगायोगाचा उल्लेख करून म्हणाले होते – 'पहिल्या जॉर्जने आपल्याला अभिमानास्पद इतिहास दिला नि आता आपण दुसऱ्या जॉर्जला विजयी करू या!'

अर्थात जॉर्ज पहिला ते जॉर्ज दुसरा ह्या दोनशे वर्षांच्या कालौघात जवळजवळ सर्वच गोष्टी बदलल्या आहेत. अमेरिकेचा भूगोल तर साफच बदलला आहे. जॉर्ज वॉशिंग्टन जेव्हा स्वतंत्र अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष झाले तेव्हा अमेरिका हा केवळ १३ चौकड्यांचा देश होता... फक्त १३ संस्थाने नि तीही सर्वच्या सर्व अ‍ॅटलांटिक किनाऱ्यावरची! पूर्वेकडील! नि ह्या १३ राज्यांचा पश्चिमेकडच्या 'रेड इंडियन्स' आणि 'अपाचे' ह्या जमातींशी, टोळ्यांशी सतत संघर्ष होत होता आणि ह्या १३ राज्यांची मिळून लोकसंख्या जेमतेम ३० लक्ष होती. आज अमेरिकेची व्याप्ती ५० राज्ये एवढी झाली आहे. त्यांतली ४८ राज्ये

अॅटलांटिक ते पॅसिफिक अशी ३५०० मैलांचे आडवे अंतर कापणारी, एका सलग भूखंडात आहेत तर उरलेली दोन राज्ये ह्या प्रमुख भू-भागापासून वेगळी जणू गावकुसाबाहेर वसलेली आहेत. त्यातले एक म्हणजे अलास्का - जे रशियाच्या झारकडून विकत घेतले नि आता अमेरिकेची सोने व तेलाची पेठ बनले आहे आणि दुसरे अर्थातच हवाई बेटे.

राष्ट्राध्यक्ष क्रमांक १ ते ४१ हा केवळ राष्ट्राध्यक्षांचा इतिहास पाहिला तर करमणूकच व्हावी. हिंदुस्थानात अफगाणी सुलतानांनी सल्तनत स्थापल्यावर 'बखरकार' हे पद अत्यावश्यक मानले होते. (पुढे मोगलांनीही ते चालू ठेवले.) सुलतानांच्या आयुष्यातील प्रत्येक दिवसाचा कार्यक्रम, चर्चा, पाहुण्यांच्या वार्ता, भेटीला येणाऱ्यांची जंत्री, खर्च अशा बारीकसारीक नोंदी 'तवारीख' आणि 'तबाकती'तून केल्या जात. काहीसा तसाच प्रकार अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या बाबतीत होतो. ह्याच खर्ड्यांत जगातील पहिली कृत्रिम दातांची कवळी अत्यंत टणक जातीच्या लाकडापासून एका जर्मन डॉक्टरकडून करवून घेतली आणि ती राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टनसाठी आणवली गेली, अशी एक गमतीदार नोंद आढळते. ह्या ४१ राष्ट्राध्यक्षांमध्ये १६ राष्ट्राध्यक्षांनी दोन/दोन मुदतींची कारकीर्द उपभोगली. कारकीर्दीचा विक्रम मात्र फँकलीन डेलॉ रूझवेल्ट ह्यांच्या नावे नोंदला गेला. त्यांनी १९३३, १९३७, १९४१ आणि १९४५ अशा चार सलग निवडणुका जिंकल्या. जागतिक मंदी ते दुसरे महायुद्ध एवढा प्रक्षोभक कालखंड ह्याच 'एफडीआर'च्या विश्वासावर आधी अमेरिकेने व नंतर जगानेही पार केला. आजही २०० वर्षांतील सर्वाधिक आदरणीय, सर्वाधिक लोकप्रिय आणि विश्वासार्हतेच्या बाबतीत आदर्श ठरलेले राष्ट्राध्यक्ष म्हणजे जॉर्ज वॉशिंग्टन, अब्राहम लिंकन आणि फ्रँकलीन रूझवेल्ट, चौथा क्रमांक खि. जॉन केनेडींचा लागतो. पण त्यात 'करीश्मा'चा भाग अधिक आहे. ह्या दोनशे वर्षांत राष्ट्राध्यक्षपदाच्या शपथेतील शब्दरचना यत्किंचितही बदललेली नाही. सुप्रीम कोर्टाच्या प्रमुख न्यायमूर्तींनी द्यावयाची ही ३२ शब्दांची शपथ आजही तशीच आहे. शपथविधीच्या वेळची परेड, भाषणांचा क्रम, पार्टीची आखणी ह्यातही बदल झालेला नाही.

२० जानेवारी १७८९ रोजी जॉर्ज वॉशिंग्टनचा शपथविधी वॉशिंग्टन डी. सी. ह्या राजधानीत (तेव्हा ती नव्हतीच) नव्हे तर न्यूयॉर्कच्या फेडरल हॉलमध्ये झाला. घाईघाईने ही वास्तू त्याकरिता सजविण्यात आली. दुसऱ्या खेपेस वॉशिंग्टन राष्ट्राध्यक्ष झाले तेव्हा हाच शपथविधी फिलाल्डेफिया येथे झाला. आताची राजधानी वॉशिंग्टन डी. सी. येथे शपथ घेणारे पहिले राष्ट्राध्यक्ष (क्रमाने तिसरे) म्हणून टॉमस जेफर्सन हे ठरले. १७८९ च्या शपथविधीस राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन ह्यांना नेण्यासाठी वास्तविक एक अप्रतिम घोडागाडी (की रथ?) जनतेने तयार केली होती. पण त्यांनी त्यास नकार दिला. 'अशा गाडीमुळे मी माझ्या जनतेपासून तुटेन' असे सांगून वॉशिंग्टन घोड्यावर स्वार झाले आणि खुले आम जनतेबरोबर रपेट करीत शपथस्थळी आले. 'ही जनतेनं दिलेली सत्ता आहे.

जिंकून घेतलेली अथवा घराणेशाहीनं चालत आलेली सत्ता नव्हे. मी माझ्या लोकांपासून अलिप्त राहणार नाही.' – हे वॉशिंग्टनचे भाष्य लोकशाहीचा पाया ठरले ते उगाच नव्हे.

दुसरे राष्ट्राध्यक्ष जॉन ॲडम्स ह्यांचा शपथविधी तर भावनेने ओथंबला होता. आधी शेतकरी, मग शिक्षक, नंतर वकील आणि त्यानंतर वॉशिंग्टनचे सहकारी असलेले ॲडम्स शपथ घेताना वॉशिंग्टन स्वत: त्यांना आशीर्वाद द्यायला उपस्थित होते. अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहिरनामा शब्दबद्ध करणारे टॉमस जेफर्सन ह्यांना राष्ट्राध्यक्षपदासाठी १८०१ पर्यंत थांबावे लागले. जेफर्सन व त्यांचा विरोधक आरन बर ह्या दोघांनाही समान मते पडली. तेव्हा एकूण ३५ वेळा फेरतपासणी करावी लागली. २० जानेवारी १८०१ हा शपथविधीचा दिवस तर ठरलेला पण राष्ट्राध्यक्ष कोण हे निश्चित होईना... असे विचित्र त्रांगडे होऊन बसले....अखेर १९ जानेवारीस म्हणजे आधल्या दिवशी अगदी अल्प बहुमताने जेफर्सन निवडून आले. त्यातही भानगड अशी झाली की, जेफर्सन आपल्या घरी व्हर्जिनियामध्ये अडकलेले तर शपथविधी वॉशिंग्टनमध्ये मुक्रर झालेला. मध्ये दोनशे मैलांचे अंतर! पण टॉमस जेफर्सन काऊबॉयला मागे टाकील असा निष्णात घोडेस्वार होता. कोठेही न थांबती गडी २०० मैलांचे अंतर चोवीस तासांच्या आत कापून वॉशिंग्टनला येऊन थडकला तेव्हा प्रमुख न्यायमूर्तींसह सर्व श्रेष्ठी त्याचीच वाट पाहात होते. जेफर्सनने घोडा एका झाडाला बांधला नि घाम पुशीत व्यासपीठावर चढला!

राष्ट्राध्यक्षांच्या इतिहासातला एक चमत्कारिक विक्रम म्हणजे जॉन क्विन्सी ॲडम्स! राष्ट्राध्यक्ष क्र. २ जॉन ॲडम्स हे तब्बल ९० वर्षांचे असताना १८२५ मध्ये त्यांचा मुलगा जॉन क्विन्सी ॲडम्स हा राष्ट्राध्यक्ष बनला. प्रत्यक्ष आपल्या मुलाला शपथ घेताना, व्हाईट हाऊसमध्ये वास्तव्यास जाताना एका माजी राष्ट्राध्यक्षाने बघण्याचे हे एकमेव उदाहरण होय. १७८२ मध्ये राष्ट्राध्यक्ष झालेला मार्टीन व्हॉन बरन हा अमेरिकेचा ८ वा राष्ट्राध्यक्ष! हाच खऱ्या अर्थाने पहिला अमेरिकन नागरिक असलेला राष्ट्राध्यक्ष. त्याच्या आधीचे सर्व सात राष्ट्राध्यक्ष हे जन्माच्या वेळी ब्रिटिश नागरिक होते.

आता आपल्याला विनोदी वाटेल असा एक प्रकार १८३९ मध्ये घडला. मात्र त्या वेळी तो विनोद न ठरता अमेरिकेची राष्ट्रीय दुर्घटना ठरली होती. १८३९ मध्ये विल्यम हेन्री हॅरिसन हे ६८ वर्षांचे मुत्सद्दी वाक्‌पटू राष्ट्राध्यक्षपदी निवडून आले. शपथविधीच्या वेळी त्यांनी भाषण सुरू केले. गृहस्थ वाक्‌पटू पडल्याने बोलतच राहिला. थंडी कडाक्याची पडलेली अन् हे वृद्ध राष्ट्राध्यक्ष खुल्या मंचावर भाषण ठोकताहेत... अखेर दीर्घ काळाने हे भाषण संपले. परिणाम?... एका महिन्याच्या आतच राष्ट्राध्यक्ष हॅरिसन न्युमोनिया होऊन निधन पावले आणि अमेरिकेच्या इतिहासात प्रथमच उपराष्ट्राध्यक्षाने राष्ट्राध्यक्ष बनण्याची घटना घडली. त्यानंतर एकूण आठ उपराष्ट्राध्यक्षांवर राष्ट्राध्यक्षांच्या निधनामुळे तथा राजीनाम्यामुळे (निक्सन हे एकमेव राजीनाम्याचे उदाहरण) राष्ट्राध्यक्षपद भूषविण्याची

वेळ आली. दक्षिणी राज्यांतील नागरिकाने राष्ट्राध्यक्ष बनण्याचे पहिले उदाहरण म्हणजे झॅकरी टेलर. त्यांचा शपथविधी १८४९ मध्ये झाला पण प्रत्यक्ष शपथविधीच्या दिवशी रविवार असल्याने झॅकरी टेलर ह्यांनी सोमवारी शपथ घेतली. बखरकारांनी अर्थातच नोंद केली – 'आज प्रथमच अशी घडी आलीय की, एक दिवसभर अमेरिकेला राष्ट्राध्यक्षच नव्हता.'

ज्या राष्ट्राध्यक्षांनी दोन वेळा हे पद उपभोगले त्यांनी सलगपणे दोन वेळा निवडणुका जिंकल्या होत्या. अपवाद ग्रोव्हर क्लीव्हलंड ह्यांचा. डेमॉक्रॅटिक पक्षाचे क्लीव्हलंड १८८५ मध्ये प्रथम राष्ट्राध्यक्ष झाले. १९८८ मध्ये त्यांनी परत निवडणूक लढवली पण त्यात रिपब्लिकन पक्षाचे बेंजमिन हॅरिसन फनी निवडून आले. क्लीव्हलंड पतिपत्नींना अर्थातच व्हाईट हाऊस सोडावे लागले पण एक चमत्कारिक प्रकार घडला. मिसेस क्लीव्हलंडना म्हणे व्हाईट हाऊसच्या प्रवेशद्वारातून आत शिरत आहोत, असे स्वप्न पडले. त्यामुळे बाईंनी मिसेस हॅरिसन फनी ह्यांना व्हाईट हाऊसचा ताबा देताना बजावले – 'फारसा बदल करू नका इथं मी परत आल्यावर मला त्रास पडता कामा नये.' आणि १८९३ मध्ये क्लीव्हलंड परत जिंकले. मिसेस क्लीव्हलंडची वाणी अशी खरी ठरली.

ऐतिहासिक लढत झाली ती रूझवेल्टचे उत्तराधिकारी हॅरी ट्रूमन आणि रिपब्लिकन उमेदवार टॉमस ड्यूरी ह्यांच्यात! ट्रूमन हरणार हे उघड होते, अन् वृत्तपत्रांनी ते हरणार हे गृहित धरून 'ट्रूमनचा धुव्वा' अशी हेडलाईनही टाकली होती. (शिकागो ट्रिब्यून) प्रत्यक्षात ट्रूमनचा दणदणीत विजय झाला नि ट्रूमनचा जो फोटो दुसऱ्या दिवशी छापून आला त्यात ट्रूमनच्या हाती शिकागो ट्रिब्यूनच्या 'त्या हेडलायनी'चाच अंक मुद्दाम धरलेला होता. ३७ वे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन हे एकमेव राष्ट्राध्यक्ष ज्यांना मानहानी होऊन, राजीनामा देऊन जावे लागले. निक्सनना अमेरिकन जनतेने 'ट्रिकी डिक' हे नाव लाडात दिले तर प्रत्यक्षातही ते तसेच वागले व वॉटरगेटचा कलंक माथी घेऊन व्हाईट हाऊसमधून बाहेर पडले. आणि परिणामी जेरल्ड फोर्ड ह्यांना राष्ट्राध्यक्ष व्हावे लागले. जेरल्ड फोर्ड हे नाव अमेरिकन इतिहासात 'चमत्कार' म्हणून नोंदले गेले... फोर्ड ही एकमेव अमेरिकन व्यक्ती जिला लोकांनी राष्ट्राध्यक्षपदी निवडून दिले नव्हते तर अमेरिकन कॉंग्रेसने निवडले होते. (कारण उपाध्यक्ष स्पीरो ॲग्न्यू हेही वॉटरगेटचे बळी ठरले) स्वतःचा उल्लेख ते 'मतांवर नव्हे तर प्रार्थनेवर निवडून आलेला राष्ट्राध्यक्ष' असा नम्रपणे आजही करतात. योगायोग असा की, ही घटना १९७६ मध्ये घडली... म्हणजे अमेरिका आपल्या स्वातंत्र्याची दुसरी शताब्दी साजरी करीत होती पण त्या वेळी अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष मात्र लोकनियुक्त नव्हता तर कॉंग्रेसने निवडलेला होता.

२३/१/८९

# २८

※

# 'जेरीको'चा योद्धा

ओल्ड टेस्टॅमेन्टमध्ये ऐतिहासिक जेरिकोच्या लढाईचे काव्यमय वर्णन आहे. त्यातील मुखड्याच्या दोन पंक्ती अशा आहेत–

Joshua faught the battle of Jericho,
And the walls came tumbling down.

जोशुआ म्हणजे मोझेसचा उजवा हात. निष्ठावंत सहकारी. सावलीसारखा पाठराखण करणारा आणि मोझेसच्या मागे त्याच्या कार्याची धुरा वाहणारा. मोझेस आणि जोशुआचे युग केव्हाच संपले पण ज्यांच्या काळ्या सूर्याला शतकानुशतके प्रकाशमान होताच आले नव्हते त्या कृष्णवर्णीयांनी त्यांना प्रकाशाप्रत नेणाऱ्या चालू शतकातील त्यांच्या झुंजार नेत्याला आदराने मोझेसची उपमा दिली आणि त्याच्या जिवलग मित्राला जोशुआ बनवले. कृष्णवर्णीयांचा हा मोझेस म्हणजे डॉ. मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर आणि त्यांचा जोशुआ म्हणजे रेव्हरंड डॉ. रॅल्फ डेव्हीड ॲबरनॅथी. अमेरिकेतील नीग्रो समाज रेव्ह. ॲबरनॅथींचे वर्णन सातत्याने 'आमचा जोशुआ' असे करीत आला. एप्रिलमध्ये हा जोशुआ निधन पावला. ॲटलांटा (जॉर्जिया) येथे हृदयविकाराच्या झटक्याने रेव्ह. डेव्हिड ॲबरनॅथी ह्यांचे वयाच्या ६४ व्या वर्षी देहावसान झाले.

नागरी हक्क चळवळ हे अमेरिकेच्या इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व आहे. विसाव्या शतकातील ह्या चळवळीचा चालता-बोलता इतिहास म्हणजे रेव्ह. रॅल्फ ॲबरनॅथी.

दि. १ डिसेंबर १९५५ रोजी अलबामा प्रांतात एक ठिणगी पडली. मॉन्टगॉमरी ह्या शहरात रोझा पार्क्स ही कृष्णवर्णीय महिला कामावरून दमून-भागून निघाली... घरी जाण्यासाठी बसमध्ये शिरली... दिवसभर शिणल्याने तिचे पाय दुखत होते... तिनं एक 'घोडचूक' केली. बसमधील सर्व जागा भरल्यावर चढलेल्या गोऱ्या प्रवाशाला नीग्रो प्रवाशाने उठून जागा द्यायची, हा तत्कालीन नियम तिने पाळला नाही... ती पाय दुखतात म्हणून हट्टाने बसून राहिली... ह्या कायदेभंगाबद्दल रोझा पार्क्सला अटक करण्यात आली आणि ह्या साध्या प्रसंगातून पडलेल्या ठिणगीचा शोला भडकला. हक्कांसाठी कृष्णवर्णीयांचा लढा सुरू झाला आणि तो काळ्यांच्या चर्चपाशी येणे साहजिकच होते. मॉन्टगॉमरीच्या फर्स्ट बॅप्टिस्ट चर्चचे प्रमुख ईशसेवक तेव्हा रॅल्फ अॅबरनॅथी होते. वर्णभेदाच्या निषेधात सुरू झालेल्या ह्या मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी अॅबरनॅथींनी डॉ. मार्टिन ल्यूथर किंग ह्यांना निमंत्रण दिले. ह्या दोन सेनानींच्या नेतृत्वाखाली मॉन्टगॉमरीचा जगप्रसिद्ध व ऐतिहासिक 'बस बहिष्कार' लढा सुरू झाला. हा बहिष्कार तब्बल ३८१ दिवस चालू होता. अर्वाचीन इतिहासातील हा नागरी हक्क संघर्ष सर्वदूर कोनाकोपऱ्यात गाजत राहिला. ह्या लढ्याच्या काळात रेव्ह. अॅबरनॅथींच्या घरावर बॉम्ब टाकण्यापर्यंत आणि त्यांचे चर्च सुरुंग पेरून उडविण्याच्या टप्प्यापर्यंत अतिरेकी गोऱ्यांची मजल गेली होती. ह्याच संघर्षातून 'सदर्न ख्रिश्चन लीडरशिप कॉन्फरन्स' ह्या संघटनेची डॉ. किंग व अॅबरनॅथी ह्यांनी स्थापना केली. 'मोझेस' आणि 'जोशुआ' ह्यांची जोडी इथंच जमली. काळ्यांना समानाधिकार आणि सन्मान मिळवून देण्यासाठी सुरू केलेल्या ह्या अहिंसात्मक लढाईत डॉ. किंग ह्यांच्याबरोबर रॅल्फ अॅबरनॅथींनी ४० हून अधिक वेळा तुरुंगवास भोगला. ह्या ध्येयाने किंग-अॅबरनॅथी द्वयीला संपूर्ण दक्षिणेत कृष्णवर्णीयांनी डोक्यावर घेतले. सेल्मा-ऑल्बनी-बर्मिंगहॅम आणि पुढे वॉशिंग्टन, शिकागो हे महत्त्वाचे टप्पे ही चळवळ ओलांडीत गेली. ह्या द्वयीने मिळविलेल्या जय आणि पराजय दोन्हींचा अमेरिकेतील सामाजिक जीवनावर तर परिणाम झालाच; पण अमेरिकेच्या कायदा व न्याय संस्थेत न भूतो न भविष्यति असे बदल घडवून आणण्यासाठी हे जयापजय कारणीभूत झाले. ही जोडी अभेद्य राहिली. इतकी की, दि. ४ एप्रिल १९६८ रोजी मेंफीस (टेनेसी) येथे डॉ. किंगवर गोळ्या झाडल्या तेव्हा रेव्ह. अॅबरनॅथींच्या मांडीवर डॉ. किंगनी अखेरचा श्वास घेतला. त्या क्षणापासून रॅल्फ डेव्हिड अॅबरनॅथी हे त्या चळवळीचे अध्वर्यू बनले ते परवा मृत्यू त्यांच्या निकट येईपर्यंत...

'जोशुआ'चे स्थान मिळवणारे अॅबरनॅथी नेमके होते तरी कोण? हा प्रश्न खुद्द अॅबरनॅथींनी स्वतःला विचारला आणि त्यातून 'अॅण्ड द वॉल्स केम टम्बलिंग डाऊन' हे ६३८ पृष्ठांचे उत्कृष्ट आत्मचरित्र अवतरले. ह्या आत्मचरित्रात आत्माविष्कार प्रधान नाही तर कृष्णवर्णीयांच्या लढ्याचा इतिहास प्रमुख आहे. ह्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर, शतकांच्या गुलामगिरीच्या कॅन्व्हासवर एक गुलाम डोकावतो... त्या गुलामाचा मुलगा

मामुली शेतकरी बनून पुढे येतो... त्याची पत्नी म्हणून लॉवेरी व्हॅलेंतिन बेल ह्या असामान्य धैर्यशील स्त्रीचे दर्शन घडते... ह्या दांपत्याचा संसार वाढत राहतो... त्यांचे दहावे अपत्य म्हणजेच एका गुलामाचा नातू बनून पुढे येतात रेव्हरंड रॅल्फ डेव्हिड ॲबरनॅथी.

रेव्ह. रॅल्फ ॲबरनॅथींना 'वर्णद्वेष' हा अनुभव फार विचित्र परिस्थितीत आला. दुसऱ्या महायुद्धात रॅल्फ ॲबरनॅथी 'जीम क्रो लष्कर' सेवेत भरती झाले नि तेथे त्यांना त्वचेच्या रंगाची जाणीव होत राहिली. ह्या आत्मचरित्रात डॉ. मार्टिन ल्यूथर किंग, रेव्ह. जेस जॅक्सन, अँड्र्यू यंग, सेनेटर रॉबर्ट केनेडी, जॉन केनेडी आणि लिंडन जॉन्सन हे दोन राष्ट्राध्यक्ष ह्या व्यक्तींचे उत्कृष्ट चित्रण दिसते. हे आत्मचरित्र म्हणजे नीग्रोंच्या जय-पराजयाचा इतिहास आहे, जिवलग मित्रांचे यथार्थ दर्शन आहे, माणसांच्या काळ्या-पांढऱ्या रंगाबरोबरच करड्या-राखी छटाही आहेत. जोशुआच्या पंक्तीचेच शीर्षक ह्या आत्मचरित्राला त्यांनी दिले नि ते चपखल ठरले. कारण 'जोशुआ'ची भूमिका ॲबरनॅथींनी समर्थपणे पेलली.

मात्र ह्या आत्मचरित्राने ॲबरनॅथींना मनस्तापही दिला. घायाळ झालेल्या डॉ. किंगना आपल्या बाहूंमध्ये सावरणाऱ्या डॉ. ॲबरनॅथींवर डॉ. किंगचे नको ते चित्रण केल्याचा आरोप काहींनी केला. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग ह्यांची हत्या घडली, त्याच्या आधल्या दिवशीची डॉ. किंगची दिनचर्या आणि रात्रचर्या रेव्ह. ॲबरनॅथींनी ह्या ग्रंथात वर्णन केली नि एका स्त्रीचा रोष ओढवून घेतला. पृष्ठ क्रमांक ४३४ वर रेव्ह. ॲबरनॅथींनी मेंफीस येथे दि. ३ एप्रिल १९६८ च्या रात्री डॉ. किंगच्या मैत्रिणीकडील भोजनाचे वर्णन केले आहे. भोजनानंतर ॲबरनॅथींना आरामखुर्चीवर झोप लागली नि जाग आली तेव्हा डॉ. किंग व त्यांची मैत्रीण शयनगृहातून बाहेर पडत होते, असे त्यात लिहिले आहे. ॲबरनॅथींनी कोठेही ह्या स्त्रीचे नाव प्रकट केले नाही; पण उपद्रव सुरू झालाच –

– ॲडजुवा एबी नांतांबू ही ५३ वर्षे वयाची मेंफीसची कृष्णवर्णीय स्त्री ह्या लिखाणामुळे संतापली. दि. ३ एप्रिल १९६८ रोजी हत्येपूर्वीच्या रात्री डॉ. किंग व त्यांचे सहकारी आपल्या घरी भोजनास आले होते, हे सर्व कृष्णवर्णीय जगतात ठाऊक आहे. नागरी चळवळीतील प्रत्येकास हे माहीत आहे. त्यामुळे आपले नाव प्रकट केले नसले तरीही लोक ते जाणून आहेत नि रेव्ह. ॲबरनॅथींनी केलेल्या वर्णनामुळे समाजातील आपली प्रतिमा डागळली, आपल्याकडे लोक 'वाईट चालीची स्त्री' म्हणून पाहू लागले, असा दावा करून ॲडजुवा नांतांबूने न्यायालयात बदनामीचा खटला भरला. ॲडजुवा नांतांबू आज ५३ व्या वर्षीही चांगली देखणी आहे. मग १९६८ मध्ये कशी असेल, त्याची कल्पना चांगली करता येते. १९६८ मध्ये ती टार्लीज मॅथ्यूज ह्या नावाने ओळखली जाई. मध्यंतरीच्या काळात तिने अभिमानाने कृष्णवर्णीयांची मूळ भूमी जी आफ्रिका – तेथील संस्कृती बाणविण्याचा निश्चय केला आणि ॲडजुवा एबी नांतांबू हे शुद्ध आफ्रिकी नाव घेतले. आज ती

पोषाखसुद्धा अमेरिकन धर्तीचा करीत नाही. अस्सल आफ्रिकी कफ्तान आणि शिरवस्त्र वापरते. मेंफिसमध्ये तिचा ब्युटीशियनचा व्यवसाय चांगलाच स्थिरावला आहे. दरवर्षी आफ्रिकन-अमेरिकन सांस्कृतिक उत्सव मेंफिसमध्ये आयोजण्याचा उपक्रम ती करीत असते. त्यामुळे तिला एक सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. तिला २४ ते ३६ ह्या वयोगटातील तीन मुले आहेत. पतीपासून ती विभक्त झाली आहे. स्वतःच्या मेहनतीवर सामाजिक स्थान मिळवणारी ही स्त्री ॲबरनॅथींवर रुष्ट झाली नि मुकदमा करून बसली. रेव्ह. ॲबरनॅथींनी नुकसान भरपाई म्हणून आपल्याला ५० लक्ष डॉलर्स द्यावेत, ह्या आत्मचरित्राचे प्रकाशन करणाऱ्या हार्पर ॲण्ड रो कंपनीने २५ लक्ष डॉलर्स द्यावेत आणि त्याचे संपादन करणाऱ्या डॅनियल बायल ह्यांनीही २५ लक्ष डॉलर्स द्यावेत, अशी मागणी तिने ह्या दाव्यात केली. (आता केली होती असे म्हणावे लागेल.) एकूण तिला १ कोटी डॉलर्स हवेत. ह्या लिखाणामुळे आपण एवढ्या सैरभैर झालो की, ताबा गेल्यासारखे खात सुटलो नि त्यापायी आपले वजन ३० पौडांनी वाढले... सबब आपल्या व्यक्तिमत्त्वावरही ह्या ग्रंथाने आघात केला, असा अरोपही ॲडजुवा नांतांबूने ठेवला. त्या भोजनाच्या वेळी रेव्ह. ॲबरनॅथीच भरपूर मद्य प्याले नि शयनगृहात डॉ. किंग गेलेच नाहीत तर ॲबरनॅथीच जाऊन झोपले, असा तिचा उलटा दावा आहे.

हा खटला प्राथमिक सुनावणीसाठी मे महिन्यात येणार होता. हार्पर ॲण्ड रो प्रकाशन कंपनीच्या मते त्यात काहीच दम नव्हता. संपादक बायलही त्याला काही महत्त्व देत नव्हते तर रेव्ह. ॲबरनॅथी ह्यांना पत्रकारांनी त्याबाबत प्रश्न विचारले असता त्यांनी ह्या खटल्याचा साधा उल्लेखही केला नाही. अभ्यासू वाचकांच्या मते ॲडजुवा नांतांबूने हा खटला भरूनच उलट स्वतःची बदनामी करून घेतली होती. रेव्ह. ॲबरनॅथींच्या समर्थनार्थ असंख्य वाचक, टीकाकार, अन्य प्रकाशक आणि मुख्यत्वे नागरी हक्क चळवळीतील अनेकानेक कार्यकर्ते उभे राहात होते. रेव्ह. ॲबरनॅथी हे कृष्णवर्णीयांचे श्रद्धास्थान. मोझेसबद्दल जोशुआ खोटेनाटे लिहीलच कसे, हा मुळात त्यांचा ठाम विश्वास असल्याने रेव्ह. ॲबरनॅथींची 'जोशुआ' ही प्रतिमा त्यांच्या मनात अभंग राहणार आहे.

३०/४/९०

२९

※

# पुनश्च मेरीलीन मन्रो

जगात अनेक रहस्ये न उकलता राहिली आहेत. राजकीय, भौगोलिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक सर्व क्षेत्रांत न उलगडलेल्या गूढ गोष्टी आहेतच. ह्या रहस्यांचा गुंता उकलायला अनेकांनी कित्येक वर्षे घालवली आहेत. जणू ह्या रहस्यांनी ही मंडळी झपाटून गेली असावीत. अशी झपाटलेली मंडळी कमी नव्हेत. एखाद्या व्यक्तीमध्ये स्वतःच्या हयातीत सर्वांना झपाटून टाकण्याचं सामर्थ्य असतं, पण अपवादात्मक अशाही काही व्यक्ती असतात – ज्यांची झपाटण्याची कुवत त्यांच्या मृत्यूनंतरही कायम राहते. मेरीलीन मन्रो त्यांतलीच! मेरीलीनच्या वर्णनाला शब्द थिटे पडावेत. शतकातील जणू पहिल्या क्रमांकाची सर्वांगसुंदर, लोभसवाणी, परिपूर्ण स्त्री! तर मेरीलीनच्या जीते जी सर्वच तिच्या दर्शनाने झपाटल्यासारखी वागत पण तिच्या मृत्यूनंतरही अनेक मंडळी तिच्यात गुरफटून राहिली आहेत. मेरीलीनचा मृत्यू दि. ५ ऑगस्ट १९६२ रोजी झाला. कारण दिलं होतं – 'आत्महत्या'... 'झोपेच्या गोळ्या गिळून मृत्यूच्या आधीन झाली.' जगानं हे कारण ग्राह्य मानलं नि संपूर्ण जग हळहळलं. पण काही मंडळींचे त्याने समाधान झाले नाही. त्यांनी आपापल्या परीने संशोधन आरंभले. काहींच्या हाती थोडंफार सत्य गवसण्याची चिन्हे दिसली, काहीजण खोलात शिरू लागले ते भूलभुलैयात गुरफटले... कळत होतं की, पाणी नक्कीच मुरतंय पण चकव्या मागून चकवा ठकवीत होता. त्यामुळे मेरीलीनने आत्महत्या केली नाही, त्याची खात्री पटत होती पण नेमकं मग काय घडलं, हे सांगण्याइतका पुरावाही

हाती नव्हता. आत्महत्या की खून अशी हुज्जत घालून मग ही मंडळी अधूनमधून त्या विषयाला तोंड फोडीत पण एक माणूस असा निघाला की, त्याने ह्या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी तळ गाठायचा निर्धार केला.

– ५१ वर्षे वयाचा मिलो स्पेरीलिओ ह्याने 'मेरीलीन मन्‍रो' हे आपल्या आयुष्याचे ध्येय मानले. मेरीलीनच्या मृत्यूसमयी मिलो फक्त २४ वर्षांचा होता नि 'मेरीलीन' ह्या विषयाने झपाटला होता. पण जीवनातली अनेक कर्तव्ये पार पाडण्यात बराच अवधी गेल्यानंतर बरोबर १६ वर्षांपूर्वी त्याने 'मेरीलीन' ह्या रहस्याकडे आपला मोहरा वळविला. मिलो हा खासगी डिटेक्टिव्ह आहे. सोळा वर्षांच्या अथक परिश्रमातून मिलोच्या हाती एवढे जबरदस्त पुरावे सापडले की, मिलो आता ह्या सर्व प्रकरणावर एक चित्रपट बनवीत आहे. दणदणीत १८ मिलियन डॉलर्स खर्चून मेरीलीनच्या गूढ मृत्यूचे रहस्य मिलो जगापुढे उघड करणार आहे. ह्या चित्रपटात मिलो चक्क मेरीलीनच्या मृत्यूचे दृश्यही दाखवणार आहे नि मिलोच्या मते प्रत्यक्षात मेरीलीनचा मृत्यू जसा घडला तस्साच ह्या दृश्यात चित्रित होईल.

मेरीलीन मन्‍रो म्हणजे मूर्तिमंत रसरशीत जीवनेच्छा. तल्लख बुद्धीची... अन् नको एवढी बडबडी! केनेडी सरकारच्या नको त्या भानगडींची नको तेवढी माहिती तिच्यापाशी होती आणि त्यामुळे मेरीलीन म्हणजे एक धोकादायक टाईमबॉम्ब ठरली होती. सर्वोच्च पातळीवरील व्यक्तींना धोकादायक ठरणारी माणसं हटविण्याचा खात्रीशीर मार्ग एकच असतो... मग देश कोठलाही असो नि राजवट कोणाचीही असो... त्यांना नाहीसे करणे!

मिलो स्पेरीलिओचा दावा आहे की, मेरीलीनचा खूनच झाला नि त्या कामात चार व्यक्ती गुंतल्या होत्या. ह्या चौघांपैकी तिघांचे पुढे खूनच पडले. एकमात्र आजही जिवंत आहे. त्याचा व्यवसाय खून पाडणे हाच आहे. नि माफियांकडून त्याला खुनाची कंत्राटे दिली जातात. ह्या चौथ्या माणसाने मिलोला त्याचा चित्रपट पूर्ण होण्यापूर्वीच खतम् करण्याची धमकी दिली आहे, त्यामळे मिलो आपल्या हालचाली, तपासाची कामे अत्यंत गुप्ततेने करतो, एवढेच नव्हेतर स्वतःपाशी अश्रुधुराची नळकांडीही कायम बाळगतो. मिलो स्पेरीलिओ हा खासगी डिटेक्टिव्ह मेरीलीन मन्‍रोच्या मृत्युप्रकरणावर चित्रपट काढणार अशी कुणकुण लागताच मिलोकडे मातब्बर कंपन्यांच्या मागण्या येऊ लागल्या. त्यामुळे पैशाची कमतरता पडणार नाहीच पण त्यातील एका बड्या चित्रपट कंपनीने तर मिलोने केलेला तपास, त्याला आलेल्या अडचणी, त्याला येणाऱ्या धमक्या नि त्याने केलेली चित्रपटाची तयारी ह्या एवढ्याच विषयावर एक डॉक्युमेंटरी काढण्याचा करार त्याच्याशी केला आहे. आता मेरीलीन मन्‍रोची भूमिका करण्यासाठी योग्य मुलीचा जगभर कसून तपास चालू आहे. मिलोच्या मते मेरीलीनची शवपेटिकाही 'हितसंबंधियां'च्या हितार्थ मूळ जागेवरून हलविली आहे.

अधिकृतरीत्या दि. ५ ऑगस्ट १९६२ रोजी मेरीलीनने आत्महत्या केली तर

मिलोच्या तपासाचा निष्कर्ष चार व्यक्तींकडे खुनी म्हणून बोट दाखवीत आहे. माफियांच्या सूत्रबद्ध खुनाचे हे उदाहरण. त्यातील एक नाव मिलोने चित्रपट सुरू करण्यापूर्वीच उघड केले आहे नि ते आहे शिकागोमधील कुप्रसिद्ध माफियाप्रमुख सॅम मोमो ग्यांकाना ह्याचे! ह्या खुनाची संपूर्ण रचना सॅम ग्यांकाना ह्याची होती. ह्या ग्यांकानाचा पुढे खून पडला. त्याचा दुय्यम सहकारीही खुनाच्या वाटेने गेला तर तिसऱ्याची हत्या दोन वर्षांपूर्वी झाली नि चौथा अद्याप जिवंत आहे, शिकागो व फ्लॉरिडा ही त्याची गुन्ह्याची क्षेत्रे आहेत.

सॅम ग्यांकानाचे नाव ह्या संबंधात पूर्वीही एकदा आले होते. रॉबर्ट स्लेत्झर हा एके काळचा मेरीलीनचा पती. त्याने मिलोला आणि तत्पूर्वी पोलिसांनाही सांगितले होते की, मेरीलीनची लाल रंगाची रोजनिशी होती. (मेरीलीन मन्‌रो न चुकता दैनंदिनी लिहीत असे नि त्यात रूक्ष खर्चाचे आकडे नसत तर एखाद्या श्रेष्ठ साहित्यिकाला प्रेरणा मिळावी अशी उत्कृष्ट कीर्द, मल्लीनाथी असे) ही रोजनिशी तिच्या मृत्यूनंतर गायबच झाली नि रॉबर्ट स्लेत्झरच्या निवेदनानुसार ह्या रोजनिशीत सॅम मोमो ग्यांकाना हे नाव त्याने पाहिले होते. स्लेत्झरने मिलोला सांगितले की, ही रोजनिशी मेरीलीनच्या मृत्यूपूर्वी दोनच आठवडे आधी आपण परत पाहिली होती नि त्यात तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडींचे बंधू ॲटर्नी जनरल रॉबर्ट केनेडी ह्यांच्याविषयी अत्यंत स्फोटक मजकूर होता. मेरीलीन मन्‌रोबरोबर राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी व बंधू रॉबर्ट केनेडी ह्या दोघांचीही नावे घेतली जात. ह्या रोजनिशीत मेरीलीनने काय काय म्हणून लिहावे?– 'सॅम ग्यांकानाबरोबर न्यायखात्याची हातमिळवणी झाली,' 'सरकारकडून आता माफियांना पगार देण्याइतपत उभय पक्षात सूत जमले', 'ह्या हात-मिळवणीचे श्रेय रॉबर्ट केनेडींना दिले पाहिजे', 'क्युबाचे सर्वेसर्वा डॉ. फिडेल कॅस्ट्रो ह्यांचा काटा काढण्यासाठी सीआयएकडून माफियांशी संपर्क'... ह्या बाबी एखाद्या सुंदरतम अभिनेत्रीने आपल्या रोजनिशीत लिहाव्यात काय? मेरीलीन मूर्खच म्हणायची! अभिनेत्री, लावण्यवती, मदनिका ही बिरुदं लाभल्यानंतर 'बखरकार' बनून असं काही खरडायची गरज होती काय? अशी रोजनिशी कशी काय ठिकाणावर राहणार नि अशी लेखिका जिवंत तरी कशी राहणार?

ही रोजनिशी मिळवून देणाऱ्याला १०,००० डॉलर्स देण्याची तयारी मिलोने ठेवली होती. तसे जाहीरही केले. त्याच्या मदतीला जॉन बॉवीन हा धनिक धावून आला नि त्याने हे बक्षीस १००००० डॉलर्सपर्यंत वाढविले पण हा सर्व खटाटोप व्यर्थ ठरला. मिलोच्या मते ही रोजनिशी पूर्णत: जाळून तिची राख झाली असावी. रॉबर्ट स्लेत्झरने निवेदन केले होते की, रॉबर्ट केनेडींनी मेरीलीनची प्रतारणा केल्यावर तिने सरळ त्यांना धमकी दिली होती. 'दि. ६ ऑगस्ट १९६२ रोजी मी पत्रकार परिषद भरवून त्यांच्यापुढे हा सर्व प्रकार उघड करणार आहे नि त्यात सीआयए - क्युबा - ग्यांकाना ह्या गुपितांनाही वाचा फोडणार आहे.' ही मेरीलीनची धमकी अणुबाँबपेक्षाही स्फोटक ठरली असती– पर्याय एकच

राहिला... दि. ४ ऑगस्ट व ५ ऑगस्टच्या मध्यरात्री मेरीलीन मन्‌रो मृतावस्थेत सापडली. पुढे अनेक व्यक्तींच्या तपासाची सूत्रे केनेडी बंधूंच्या नावापर्यंत पोचली होती. मिलोच्या संकल्पित चित्रपटात कदाचित केनेडी बंधूंवरील हा दोषारोप दूर होईल. खुद्द मिलोने 'मेरीलीन'वर तीन पुस्तके लिहिली आहेत. त्यांतील पहिले होते– 'मेरीलीन मन्‌रो : मर्डर कव्हर-अप', ह्या पुस्तकात मिलोने केनेडी बंधूंभोवतीच जाळे पसरले होते पण १६ वर्षांच्या तपासांनी मिलोचा निष्कर्ष निघाला आहे की, हे कृत्य माफियांचेच होते.

ह्या तपासाच्या कार्यात मिलोला एवढी सोंगे आणावी लागली की, झटपट वेषांतराच्या स्पर्धेत तो आता पहिला येऊ शकेल. उच्च श्रेणीतील अभिनेत्यांपासून कनिष्ठ एक्ट्रॉमध्ये त्याला मिसळावे लागले, बोलघेवड्यांपासून मुक्यापर्यंत अनेक प्रकारच्या व्यक्तींशी चर्चा करावी लागली. त्यांना विश्वासात घ्यावे लागले... त्याकरिता मिलोला प्रसंगी डॉक्टर तर कधी विमाएजंटही बनावे लागले. मिलोच्या एका मुद्द्यावर तर बडे विधिज्ञही गप्प बसले. मेरीलीन मन्‌रो मृत झाली तेव्हा तिच्या हातात टेलिफोन होता!... मिलोने प्रश्न केला की, मृत व्यक्तीचा हात सैल पडून उघडतो... मूठ वळलेली राहू शकत नाही... तेव्हा मेरीलीनच्या हातून टेलिफोन गळला कसा नाही?

मिलोचा आणखी एक निष्कर्ष धक्कादायक आहे. मेरीलीन तिच्या घरातच मरण पावली. असे नमूद झाले आहे. वस्तुतः मेरीलीनला कोमामध्ये गेल्याच्या अवस्थेत शेफर अँब्युलन्स सर्व्हिसने रुग्णवाहिकेत घालून सांता मोनिका रुग्णालयात नेले नि रुग्णालयात ती मरण पावली. त्यानंतर तिला परत घरी आणून आत्महत्येचा बनाव रचण्यात आला. प्रत्यक्षात मेरीलीनला नेम्ब्युटॉलच्या ४७ गोळ्यांच्या क्षमतेचे इंजेक्शन देण्यात आले. कारण मेरीलीनच्या शवचिकित्सेत हे द्रव्य तिच्या पोटात आढळले नाही पण रक्तात मात्र सिद्ध झाले. मेरीलीनने नेम्ब्युटॉल गोळ्या खाऊन आत्महत्या केली असती तर हे द्रव्य तिच्या पचनसंस्थेत मिळाले असते... रक्तात नव्हे. आपला युक्तिवाद सिद्ध करण्यासाठी मिलोला मेरीलीनची कबर पुनश्च उकरून तिच्या केसांची एक छोटीशी बट हवी होती, कारण इंजेक्शनद्वारे दिलेले नेम्ब्युटॉल तिच्या केसाच्या मुळाशी आजही असणार नि ते सूक्ष्मदर्शकातून स्पष्ट दिसू शकते. अशा प्रकारचा तपास आजवर कित्येक खून प्रकरणांत केला आहे पण मिलोसाठी त्या वाटा बंद झाल्या. लवकरच मिलोला मेरीलीनच्या भूमिकेसाठी योग्य स्त्री मिळेल नि हा चित्रपट प्रत्यक्षात साकारेल... मेरीलीनचे रसिक असलेले संपूर्ण जग तो पाहील... पुनः हळहळ व्यक्त होईल, कारण मेरीलीन मन्‌रो हे व्यक्तिमत्त्वच झपाटणारे होते... जिवंतपणी तसेच मृत्यूनंतरही!

२३/१०/८९

३०

※

# डेम डॅफ्ने ड्यू मॉरीए

**दि**. २० एप्रिलच्या वृत्तपत्रातून एक बातमी होती – 'डेम डॅफ्ने डेड'. आधल्याच दिवशी दि. १९ एप्रिल १९८९ रोजी डेम डॅफ्ने ड्यू मॉरीए ह्या ज्येष्ठ, सिद्धहस्त आणि जबरदस्त कल्पनाशक्ती लाभलेल्या थोर लेखिकेचं निधन झाल्याची ही वार्ता होती. निधन कसं? तर तिला जसं हवं होतं तस्संच! 'द ड्यू मॉरीएज' ह्या आत्मकथन - कुलवृत्तान्तवजा ग्रंथात डॅफ्नेनं इच्छा व्यक्त केली होती – 'नेहमीप्रमाणे फॉवी नदीकाठी संध्याकाळचा फेरफटका व्हावा, बहीण अँजेलाच्या बरोबर गप्पा आणि जेवण रंगावे, वाचायला घेतलेले पुस्तक भोजनोत्तर पूर्ण व्हावे, लिहायला घेतलेली पत्रं हातावेगळी व्हावीत, दूरवरच्या चर्चची घंटा ऐकत झोपी जावं नि संपून गेलेल्या मेणबत्तीसारखं समाप्त व्हावं... दुसऱ्या दिवशीची पहाट जगासाठी उजाडावी डॅफ्नेसाठी ती नसावी.' डॅफ्नेची ही इच्छा तंतोतंत प्रत्यक्षात उतरली. तिच्या अत्यंत आवडत्या कॉर्नवॉल प्रांतात मेनाबिली परिसरात डॅफ्ने ड्यू मॉरीए वयाच्या ८२ व्या वर्षी झोपेतच मरण पावली.

अॅगथा ख्रिस्टी, बार्बरा कार्टलंड आणि डॅफ्ने ड्यू मॉरीए ह्या समकालीन ब्रिटिश लेखिका. तिघींनीही आयुष्यात नेत्रदीपक यश मिळवलं, कीर्ती आणि संपत्ती मिळवली आणि तिघींनाही 'डेम' हा गौरव राणी एलिझबेथकडून प्राप्त झाला. तथापि तिघींचाही पिंड वेगळा, शैली वेगळी. आणि तशीच जीवनरेखाही वेगळी होती. बार्बरा कार्टलंड ब्रिटिश शाही घराण्याशी नातेसंबंध असलेली आणि अत्यंत सुखासीन जीवन जन्मापासूनच

लाभलेली लेखिका. तिच्या प्रणयकथांचा साचा ठरलेला. त्यामुळे काहीसे वैचित्र्य हरवलेली. मात्र लिहिण्याच्या झपाट्यामध्ये सर्वांना मागे टाकणारी- एकदम गिनेस बुकमध्ये विक्रमवीरांगना म्हणून जाऊन बसलेली. जीवनाचे चढउतार, पोळून टाकणारे अनुभव, गरिबी, वंचना अन् त्याचबरोबर अफाट यश व भरभरून ओसंडणारे वैभव ॲगथा ख्रिस्टीच्या वाट्याला आलं. डॅफ्ने ड्यू मॉरीए ॲगथाच्या मानाने शांत, सरळ, समृद्ध जीवनाची वाटेकरी ठरली. ॲगथा आणि डॅफ्ने ह्या दोघींवरही प्रभाव टाकणारी लेखिका म्हणजे त्यांची पूर्वसूरी मारी कॉरेली. एकोणिसाव्या शतकातल्या मारी कॉरेलीच्या 'थेल्मा','व्हेंडेटा','बॉय' ह्या साहित्यकृतींचा दोघींवर चांगलाच दूरगामी परिणाम झाला होता. अन् तरीही मारी कॉरेलीची शैली दोघींनीही कधी उचलली नाही. दोघींनीही आपापली वैशिष्ट्ये कायम जपली. विवाहित स्त्रीचा व्यभिचार हा एकच विषय जरी निकष म्हणून निवडला तरीही मारी, ॲगथा व डॅफ्ने ह्यांची वैशिष्ट्ये सहज समजून यावीत. मारी कॉरेलीच्या 'व्हेंडेटा'मध्ये हाच विषय तर मारीचा मागोवा घेणाऱ्या डॅफ्नेने 'रिबेका'ला हाच विषय घेऊनही साहित्याचं नवं लेणं उभारलं तर ॲगथानं ह्याच विषयावर खुनांची मालिका घडवून त्या रहस्यांची उकलही केली. तिघीही आपापल्या परीने श्रेष्ठ प्रतिभावंत!

डॅफ्ने ड्यू मॉरीए इ. स. १९०७ मध्ये लंडन येथे जन्मली. त्या काळातील ज्येष्ठ ब्रिटिश अभिनेते सर जेरल्ड ब्युसॉ ड्यू मॉरीए ह्यांची ही कन्या. पहिल्या महायुद्धाच्या वेळी ती अगदीच लहान होती. मात्र ब्रिटिश महिलांची सफ्रजिट चळवळ, महायुद्धात महिलांनी केलेली कामगिरी ह्या सर्वांची ती साक्षीदार बनली. दुसऱ्या महायुद्धात तर तिने स्वयंसेविका म्हणून बरेच कामही केले. लेखनाकडे डॅफ्नेचा आणि तिची धाकटी बहीण अँजेला ड्यू मॉरीएचा बालपणापासूनच कल होता. ह्या लेखनात मग डॅफ्नेला 'अ-विषय' नसेच. सागरी तस्करी, चाचेगिरी अशा साहसी विषयांची डॅफ्नेला फार आवड होती. ह्या विषयांचा आणि त्याला अनुषंगून इतर बाबींचा डॅफ्नेने एवढा खोल अभ्यास केला की, 'जमेका इन' ह्या कादंबरीतील तस्करीचे वर्णन वाचल्यावर मनात प्रश्न येतो- 'ह्या बाईनं हे प्रत्यक्ष पाहिलं तर नसेल?' 'जमेका इन' ह्या कादंबरीनं प्रत्यक्ष 'जमेका इन' ह्या स्थळाला पर्यटन स्थळाचं महत्त्व आणलं. ह्या नावाचा पथिकाश्रम आजतागायत पर्यटकांना आकर्षित करीत आहे. पर्यटकांचं काय सांगायचं?... खुद्द ॲलीस्टर मॅक्लीनसारखा ख्यातनाम लेखक (गन्स ऑफ नॅव्हरोनचा जन्मदाता) ह्या कादंबरीवर एवढा खूष झाला होता की, 'जमेका इन' ही सराई खरीदण्याचा त्याने बेतच आखला. तो डॅफ्नेने हाणून पाडला. 'ही सराई चालवणं तुझं काम नव्हे. त्यापेक्षा एखादी कादंबरी लिही नि पैसा कमव. जमेका इन एवढी मनात भरली असेल तर वर्षाकाठी जमेल तेव्हा तेथे जाऊन राहा,' असा शहाणा सल्ला डॅफ्नेने मॅक्लीनला दिला. प्रत्यक्षात डॅफ्ने मात्र एखाद्या स्थळावर जीव जडला की, वेडीपिशी होई. इंग्लंडचा कॉर्नवॉल प्रांत तिचा सर्वांत प्यारा. ब्रिटनच्या नैर्ऋत्येचा हा प्रांत काहीसा निसर्गाची अवकृपा घेतलेला

आहे. इथं निसर्गाचं रौद्रभीषण रूप अधिक दिसतं. वादळी वारे, लाटांचं तांडव, पाहता पाहता पाय खेचून माणसाला बुडवून टाकणारे फसवे समुद्रकिनारे, जीवघेणी थंडी आणि समोरचा माणूसही दिसू न देणारं इथलं भयानक धुकं... कॉर्नवॉलचा किनारा प्राचीन काळापासून तस्करांचा आणि चाच्यांचा आवडता. तसाच इथला चक्रावून टाकणारा प्रदेश राजकीय उद्रेकातील बंडखोरांना लपून राहण्यास योग्य... डॅफ्नेने कॉर्नवॉलची ही वैशिष्ट्ये आपल्या साहित्यकृतीत बारकाईने टिपली. डॅफ्नेने एकूण २९ पुस्तके लिहिली. त्यांतील सर्वाधिक गाजलेल्या ग्रंथांना प्रादेशिक पार्श्वभूमी कॉर्नवॉलचीच आहे. कॉर्नवॉल आणि डॅफ्ने ह्यांच्यातील ही जवळीक वडिलांनी सुट्टीसाठी आपल्या दोन्ही मुलींना कॉर्नवॉलला बालपणी आणले तेव्हा सुरू झाली. डॅफ्ने हा परिसर पाहून खुळावली. विशेषत: मेनाबिली इस्टेट हा भाग तिच्या मनात भरला. मेनाबिली ही ऐसपैस इस्टेट इंग्लंडच्या ऐतिहासिक रॅशली ह्या कुटुंबाच्या मालकीची आजही आहे. पंधराव्या शतकात एखाद्या भुईकोट किल्ल्यासारख्या बांधलेल्या मेनाबिलीच्या ह्या वास्तूत १६ व्या शतकापासून रॅशली खानदानाचे वास्तव्य आहे. ह्या रॅशली कुटुंबास डॅफ्नेने विनंती केली की, मेनाबिली परिसरात कोठेही फिरण्याची संमती आपल्याला दिली जावी. ह्या कुटुंबाने ती आनंदाने दिली, आणि डॅफ्ने व अँजेला ह्यांनी कुठं इंचभरही जागा न पाहता सोडली नाही. हीच मेनाबिली डॅफ्नेने आपल्या अजरामर 'रिबेका'मध्ये चिरंजीव केली.

– 'मँडर्लीला परत गेलेय् असं काल रात्री मला स्वप्न पडलं–' अशा वाक्यानं 'रिबेका'ची सुरुवात झाली आहे. 'रिबेका'ची मँडर्ली म्हणजेच प्रत्यक्षातली डॅफ्नेची लाडकी मेनाबिली! मेनाबिली ह्या शब्दाचा अर्थ पर्वतराजी. 'रिबेका'ही एक गुंगून टाकणारी विलक्षण रहस्य कादंबरी. ह्यात डॅफ्नेने एक वेगळा प्रयोग केला. ह्या कादंबरीला शीर्षक म्हणून दिलेले नाव हे प्रत्यक्षात तिच्या खलनायिकेचे होते तर नायिकेचे नाव संपूर्ण कादंबरीत कोठेच उघड केले नाही. अत्यंत सुंदर पण साफ बदचलन असलेली रिबेका खरे तर कादंबरीच्या आरंभापासूनच मृत झाली होती मात्र पार्श्वभूमीवर मँडर्ली आणि रिबेका, रिबेकाचे जीवन व मृत्यू ही सूत्रे ह्या अनामिका- नायिकेच्या जीवनातून विणण्याचे चित्तथरारक साहस डॅफ्नेने केलं, कादंबरीचा प्रौढ, बिजवर नायक मॅक्समिलन डी विंटर, त्याचे आप्त, नोकरचाकर फार काय पाळीव कुत्रा जास्पर ही सारी नावानिशी कादंबरीभर वावरली नि नायिका मात्र अखेरपर्यंत अनाम ठेवली. 'रिबेका'वर आल्फ्रेड हिचकॉकने १९४० मध्ये उत्कृष्ट चित्रपट बनविला. मात्र हिचकॉकनंही डॅफ्नेचेच तंत्र कायम ठेवले. संपूर्ण चित्रपटभर नायिका जोन फॉन्तेन हिला नावच नाही. सर लॉरेन्स ऑलिव्हिए व जोन फॉन्तेन ह्यांच्या ह्या सुंदर चित्रपटावरून काही वर्षांपूर्वी हेमंतकुमारने वहिदा रेहमान आणि विश्वजीत ही जोडी घेऊन 'कोहरा' हा चित्रपट काढला होता. अर्थात मूळ 'रिबेका'च्या नखाचीही त्याला सर नव्हती. डॅफ्नेच्या 'फ्रेंचमन्स क्रीक', 'माय कझिन रेचल' आणि 'जमेका

इन' ह्या कादंबऱ्यांवरही चित्रपट निघाले आणि ते गाजले. डॅफ्ने ड्यू मॉरीए मूळची सधन होतीच आणि तिच्या साहित्याने तिला आणखी समृद्धी दिली. १९६० च्या सुमाराला डॅफ्नेच्या लघुकथेलाही इंग्रजी नियतकालिके किमान १०,००० डॉलर्स प्रत्येकी एवढा मोबदला देत असत. वयाच्या २४ व्या वर्षी 'लिव्हिंग स्पिरीट' ह्या कादंबरीद्वारे सुरू केलेला लेखनप्रपंच 'रुल ब्रिटानिया' ह्या २९ व्या कादंबरीत डॅफ्नेने संपविला. त्यानंतर डॅफ्नेने लेखणी फक्त पत्रे लिहिण्यापुरती चालवायची ठरविले. डॅफ्ने ड्यू मॉरीए हे नाव 'लिव्हिंग स्पिरीट' ह्या पहिल्याच कादंबरीत १९३१ मध्ये गाजू लागले नि त्यातूनच डॅफ्नेचा विवाह जुळून आला. साहस आणि भटकंतीची आवड असलेली ही स्त्री चाकोरीतले आयुष्य स्वीकारणारी नव्हतीच. तिने पती म्हणून निवड केली तो फ्रेडरिक ब्राऊनिंग एक जातिवंत शिपाईगडी होता... पण साहित्यावर फिदा झालेला. कर्नल बॉय ब्राऊनिंगने दुसऱ्या महायुद्धात मोठा पराक्रम गाजवला, इजिप्तच्या आघडीवर तो होता, आणि युद्धानंतरही ब्रिटिश सेनेचा प्रमुख म्हणून त्याची अनेक देशांमधून पाठवणी होत राहिली. डॅफ्ने ह्या सर्व देशांतून त्याच्याबरोबर वास्तव्य करीत होती पण तिचा जीव कॉर्नवॉलमध्ये गुंतलाय हे जाणून ब्राऊनिंगने पत्नीसाठी १९४३ मध्ये रॅशली कुटुंबाकडून मेनाबिलीतील घर करारावर घेतलं. ह्या घरात डॅफ्ने, तिचा पती, मुलगा ख्रिश्चन आणि टेस व फ्लॅविया ह्या कन्या राहू लागल्या. १९६७ मध्ये करार संपताच डॅफ्नेला हे घर सोडावे लागले. तथापि मेनाबिलीच्याच इस्टेटीवरील 'किल्मर्थ' ह्या वास्तूत हे कुटुंब राहू लागले. दुर्दैवाने बॉय ब्राऊनिंग हा स्थलांतरापूर्वीच निधन पावला. किल्मर्थला मग डॅफ्नेची धाकटी बहीण अँजेला ड्यू मॉरीए (फ्रेल्टीज ऑफ नेचर ह्या सुंदर कादंबरीची लेखिका) बहिणीच्या सोबतीस येऊन राहिली. शेवटपर्यंत ह्या दोघी एकत्रच होत्या. आपल्या पतीला त्याच्या हयातीतच डॅफ्नेने फार सुंदर शब्दात श्रेय दिले आहे. 'किंग्ज जनरल' ह्या कादंबरीच्या अर्पणपत्रिकेत डॅफ्नेने लिहिले– 'माझ्या पतीस, तोही जनरलच आहे मात्र ह्या कादंबरीच्या नायकापेक्षा अधिक हुशार आहे.' 'किंग्ज जनरल' ह्या कादंबरीची जन्मकथा चित्तथरारक आहे. मेनाबिलीचे जमीनदार रॅशली घराण्याची संपूर्ण कागदपत्रे व दप्तर डॅफ्नेने कुतूहलापोटी अभ्यासले तेव्हा उघडकीस आले की, पंधराव्या शतकात बांधलेल्या ह्या वास्तूत काही फेरफार करायचे, असे १८२४ मध्ये एकोणिसाव्या शतकातल्या रॅशली कुटुंबप्रमुखाने ठरविले. आपल्या मुलांची लग्ने होऊन पुत्रवधू आल्यास स्वयंपाकघर प्रशस्त असावे म्हणून त्याने पाडापाडीस सुरुवात केली. एक बुरुज तसा निरुपयोगी होता. तो पाडण्याचा त्याने आदेश दिला. पाडता पाडता अघटित प्रकार घडला. बुरुजाच्या तळाशी चक्क एक जिना निघाला... त्याच्या दुसऱ्या टोकाला तळघरातील एक भुयारी खोली मिळाली नि त्या खोलीत एका खुर्चीत एक सांगाडा बसलेल्या स्थितीत आढळला. त्या सांगाड्याच्या अंगावरील सरदारी वस्त्रे आणि चिलखतही सुस्थितीत होते नि त्याचा काळ सतराव्या शतकातला होता... १६४८ मध्ये

इंग्लंडमध्ये जे राजकीय उत्पात, यादवी युद्ध घडले त्यातली एक महत्त्वाची व्यक्ती... त्याच व्यक्तीचा तो सांगाडा होता. विल्यम रॅशली ह्यांनी १६४८ मध्ये मृत पावलेल्या त्या वीरावर १८२४ मध्ये इतमामात अंत्यसंस्कार केले. आणि मेनाबिलीमध्ये पुन्हा असा प्रकार घडू नये म्हणून भुयारे बुजवून, चोरदरवाजे काढून त्या जागा विटांनी भरून टाकल्या. सतराव्या शतकातील इंग्लंडचा राजा चार्ल्स दुसरा ह्याच्या काळातील ह्या ऐतिहासिक सत्य घटनेवर 'किंग्ज जनरल' सारखी चित्तथरारक कादंबरी १९४५ मध्ये डॅफ्नेने लिहिली. आजही ही कादंबरी वाचकांच्या अंगावर काटा आणते. १६४८ ते १८२४ ते १९४५ हे टप्पे मंत्रमुग्ध करतात. ते श्रेय डॅफ्नेचे. तिची सिद्धहस्त लेखणी सर फ्रॅन्सिस बेकन ह्यांचे चरित्रही (वाइंडिंग स्टेअर्स) रसाळ शैलीत सांगून गेली नि 'मायसेल्फ व्हेन यंग' सारख्या आत्मचरित्रातही स्वतःबाबत कमीत कमी लिहून वाचकाला गुंतवीत गेली. तिनं स्वतःच ती लेखणी थांबविली नि जीवनानंही हव्या असलेल्या पद्धतीनेच तिला निरोप दिला. गप्पांची बैठक सरली... पुस्तक मिटलं... पत्रे संपली... आयुष्यही संपलं... आवडत्या कॉर्नवॉलमध्येच... दुसऱ्या दिवशीची पहाट वार्ता घेऊनच उगवली– 'डेम डॅफ्ने ड्यू मॉरीए डेड!'

२४/४/८९

# ३१

※

# 'ब्रॅंटेयाना'ची षष्ठ्यब्दी

**दि.** ३१ डिसेंबर १९८८ रोजी इंग्लंडमधील एक अपूर्व महोत्सव समाप्त झाला. हा एका स्मारकाचा हीरकमहोत्सव होता. १९२८ च्या मे महिन्यात हे स्मारक उभं राहिलं आणि त्याची षष्ठ्यब्दी १९८८ च्या मे महिन्यात सुरू झाली व १९८८ च्या अखेरच्या दिवसापर्यंत ती चालली. इंग्लंडला येणारा पर्यटक साहित्याशी निगडित असलेल्या तीन यात्रा केल्याशिवाय ब्रिटन सोडत नाही. पहिली भेट अर्थातच 'बार्ड' शेक्सपीअरचे स्ट्रॅटफर्ड अपॉन एव्हनची, दुसरी भेट ॲगथा ख्रिस्टी ह्यांच्या अविरत चाललेल्या 'माऊस ट्रॅप' ह्या नाटकाच्या प्रयोगाला आणि तिसरा प्रवास असतो पश्चिम यॉर्कशायरकडे! तिथं धर्मोपदेशकाचा एक जुना वाडा आहे. चौथ्या जॉर्ज राजाच्या काळातला. यॉर्कशायर परगण्यातल्या ह्या हावर्थ गावी वास्तव्य करणाऱ्या धर्मोपदेशकांसाठी हे घर बांधले होते, पण नंतर त्या घरात अशा कर्तबगार तीन बहिणी आल्या की, ते घर कायम ह्या तिघींच्या स्मृतीसाठी १९२८ मध्ये म्युझियम म्हणून सुरक्षित ठेवण्यात आले. साहित्यप्रेमी पर्यटक ह्यासाठी गाठलेल्या म्युझियमला भेट दिल्याशिवाय राहात नाही. ह्या म्युझियमचं नाव आहे- 'ब्रॅंटेयाना' ! शार्लट, एमिली आणि ॲन ह्या तीन ब्रॅंटे भगिनींचे हे स्मारक. त्याच्या हीरकमहोत्सवानिमित्त तेथेच मे १९८८ ते डिसेंबर १९८८ ह्या काळात 'वुदरिंग हाईटस्' , 'जेन एयर' आणि 'ॲग्नेस ग्रे' ह्या नाटकांचे प्रयोग चालू होते. ह्या तीन बहिणींच्या काळात ही वास्तू जशी होती, तशीच ती ठेवण्यात आली आहे. त्या वेळी ज्या फॅशनचे फर्निचर असे, तसे फर्निचर

ज्यांच्या ज्यांच्या घरी होते त्यांनी ते प्रस्तुत म्युझियमला दान केले. भिंतीवरील तैलचित्रे, कशिदाकारीच्या फ्रेम्स, पडद्यांचे डिझाईन– फार काय अगदी कोळशाची शेगडी, बैठकीच्या खोलीतील शेकोटी, कोळशाची भट्टी सारं कसं त्याच जमान्यातील राखण्यावर कटाक्ष ठेवण्यात आला आहे. सर्व व्हिक्टोरिया राणीच्या काळातले वातावरण!

इंग्रजी साहित्यात ब्राँटे भगिनींचे स्थान म्हणजे विज्ञानाच्या क्षेत्रातील पोलंडच्या तीन भगिनींसारखे आहे. पोलंडच्या झेनिया, ब्रोनिया आणि मारीया या बहिणी फिजिक्स आणि गणित ह्या विषयांमध्ये प्रज्ञावंत निघाल्या नि अर्धपोटी राहून, शिळ्या पावाच्या तुकड्यांवर गुजराण करून त्यांनी एकमेकींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आणि धाकटी मारीया पुढे नोबेलविजेती (दोन वेळा) मादाम मारी क्युरी झाली. ब्राँटे भगिनींची कहाणी वरीचशी अशीच.

आज ब्राँटे भगिनी एकट्या इंग्लंडमध्येच नव्हे तर युरोप आणि अमेरिकेतील विद्यापीठांतून डॉक्टरेटच्या संशोधनासाठी विषय म्हणून निवडल्या जात आहेत. 'वुदरिंग हाईटस्' ह्या कादंबरीवर निघालेल्या चित्रपटात सर लॉरेन्स ऑलीव्हिएसारख्या नटश्रेष्ठानं भूमिका केली आहे. 'जेन एयर' कादंबरीवरील चित्रपट भारतीय टेलीव्हिजननंदेखील देशभर दाखविला आहे. 'ॲग्नेस ग्रे' चे नाट्यरूपांतर लोकप्रिय झाले आहे. हे जुने चित्रपट नाटके आजही रॉयल्टीद्वारे खोऱ्यानं पैसा कमवीत आहेत. पण दुर्दैव असे की, ज्या लेखिकांनी हे साहित्य निर्मिले त्या तिघीही अखेपर्यंत साथीला दारिद्र्य घेऊनच जगल्या, औषोधोपचारासही दारिद्र्यामुळेच मुकल्या नि कंगाल अवस्थेत त्यांच्या यात्राही संपल्या. त्यांच्या साहित्यकृतींची रॉयल्टी घेण्याकरिता मागे वारसही राहिलेला नाही. ह्या रॉयल्टीतला काही अंश 'ब्राँटेयाना' म्युझियमकडे रवाना होत असतो.

गरिबी हा शाप एकटा नसतोच. त्याच्या जोडीनं मग उपेक्षा, अपमान, हेटाळणी हे दुय्यम शापही आलेच पाहिजेत. पॅट्रीक ब्राँटे मूळचा आयर्लंडचा. चर्च ऑफ इंग्लंडच्या सेवेत तो धर्मोपदेशक म्हणून रुजू झाला आणि १८१२ मध्ये मारीया ब्रॅनवेल ह्या तरुणीशी विवाहबद्ध झाला. पॅट्रीक ब्राँटेची आर्थिक परिस्थिती यथातथाच होती आणि त्यात सहा मुलांच्या जन्मानं अधिकच भर पडली. थोरली मारीया (१८१३), एलीझबेथ (१८१५), शार्लट (१८१६), मुलगा ब्रॅनवेल (१८१७), एमिली (१८१८) आणि ॲन (१८२०) अशा अपत्यांना जन्म देऊन मारीया ब्रॅनवेल–ब्राँटे क्षीण होत गेली. १८२० च्या एप्रिलमध्ये पॅट्रीक ब्राँटे हावर्थ येथे धर्मसेवक म्हणून नियुक्त झाला तेव्हाही ही आजारीच होती. हावर्थच्या घरातच १८२१ च्या सप्टेंबर महिन्यात ती मरण पावली, वय वर्षे ८ ते एक ह्या दरम्यानच्या सहा मुलांसाठी मग त्यांची मावशी एलीझबेथ ब्रॅनवेल ह्या घरात येऊन राहिली. मुलं मोठी होईस्तो राहायचं असं ठरवून आलेली ही मावशी चक्क त्यांच्या बरोबर वीस वर्षे राहिली. ती स्वतः सणकी, तापट होती. पॅट्रीक ब्राँटेने दुसरा विवाह करण्याच्या

हेतूने काही तरुणींना मागणी घालण्याचे केलेले प्रयत्न ह्या मावशीने सपशेल उधळले. एखादी तरुणी विवाहाच्या उद्देशाने पॅट्रीकने चहापाण्यास निमंत्रित केली की, मावशी तिला सर्वांत आधी ही पोटे खपाटीला गेलेली सहा मुले दाखवीत असे... मग दारिद्र्याचे दर्शन घडवीत असे. एव्हापर्यंत चहा पिण्याचा त्या उपवर मुलीचा उत्साह पळून जाई. परिणामी पॅट्रीक ब्राँटे पुनर्विवाहाच्या भानगडीत पडू शकला नाही.

ब्राँटे भावंडांच्या वाट्याला जे शालेय जीवन आले ते एक भीषण अनुभव म्हणून. आयुष्यभर ह्या भावंडांवर परिणाम करून गेले. कावन ब्रिज येथे धर्मोपदेशकांच्या मुलींसाठी एक खास शाळा चालविली जाई. थोरल्या मारीया व व एलीझबेथची तिथं शिकायला रवानगी झाली. पाठोपाठ शार्लट आणि एमिली ह्यांनाही तेथे पाठविण्यात आले. ह्या शाळेपेक्षा अनाथाश्रम बरे असतील. इंग्लंडच्या तीव्र हिवाळ्यात मुलांसाठी बर्फासारखे थंडगार पाणी,... न्याहरीला शिळ्या पावाचे तुकडे... जेवणात दोन्ही वेळेला कुजके बटाटे... तेही अन्न अपुरे. त्यातच काहीना काही अपराधाचा आरोप करून शिक्षेच्या नावाखाली तेही अन्न मुलींच्या तोंडून काढून घेतले जाई. बोलून चालून मुली... त्या मेल्या तरी काय बिघडणार आहे, त्यातही त्या धर्मसेवकाच्या मुली अशी पाशवी प्रवृत्ती ह्या शाळाचालकांनी जोपासली होती. परिणामी मारीया व एलीझबेथ दोघीही मुडदूस आणि क्षयरोगाच्या रुग्ण बनल्या. आजारी अवस्थेतच त्या हॉवर्थला घरी पोचल्या. नि दोघीही १८२५ मध्ये मृत्यूची शिकार झाल्या. ह्या अनुभवानं शहाणं होऊन पॅट्रीक ब्राँटे नि मावशीनं शार्लट आणि एमिलीलाही परत आणले. त्यानंतर पाच वर्षे ही भावंडे घरीच राहिली. घरीच त्यांना वडील व मावशी शिकवीत. अक्षर ओळख झाली होती. हा कागद, ही लेखणी नि ही पुराणी पुस्तकं एवढंच घ्या. असं मावशी सांगे नि मग ही लहानगी मुलं त्या कागदाचा ताबा घेत. ब्रॅनवेल त्याच्यावर चित्रे काढी तर ह्या तीन बहिणी कल्पनांना शब्दरूप देऊन कथा-कविता लिहीत. इतक्या लहान वयात लेखणीशी नि शब्दांशी त्यांची जवळीक झाली की, ह्या मुली अक्षरओळख झाल्यापासून लिहूच लागल्या, असे वाटावे. चार्ल्स डिकन्सनं जसं आपलं दाहक शैशव स्वतःच्या साहित्यकृतीत चितारलं तसेच आपले भयानक शालेय जीवन ह्या बहिणींनीही चितारले. सहेतुक नव्हे पण ते भीषण अनुभव त्यांच्या आयुष्यभर पुरून आपोआप त्यांच्या लेखनातून ते येत राहिले. त्याचा परिणाम एका परीनं बरा झाला. भविष्यात कावन ब्रिज शाळेची चौकशी वरिष्ठ पातळीवर करण्याचं धैर्य ब्रिटिश शिक्षण खात्यानं दाखविलं आणि चर्च ऑफ इंग्लंडलाही ह्या बाबीकडे लक्ष द्यावं लागलं. उपासमार आणि जबर शिक्षा ह्यांच्यामुळे प्राणास मुकलेल्या मुलींची एक अनधिकृत यादीच शिक्षणखात्याला मिळाली.

पुढे शार्लट रो हेड शाळेत शिकू लागली नि तेथेच शिक्षिका म्हणून नियुक्त झाल्यावर एमिली व ॲन तिच्या विद्यार्थिनी बनल्या. ह्या तीन बहिणींनी शिक्षिकेच्या नोकऱ्या,

शिकवण्या, गव्हर्नेसच्या नोकऱ्या अशी जी मिळतील ती कामे स्वीकारली. भाऊ ब्रॅनवेल जणू शोकनायक झाला. उत्तम चित्रकार बनण्याची त्याची स्वप्ने अपुरी राहिली. त्याऐवजी रेल्वेत कारकून, कोठे हरकाम्या, कधी शिक्षक असे अनेक अनुभव त्यानं घेतले अन् दारिद्र्याच्या खाईतच ब्रॅनवेलवर चमत्कारिक आघात झाला. समलैंगिकतेच्या आरोपावरून ब्रॅनवेलची नोकरी सुटली नि ह्या कलंकापायी तो कायम बेकार राहिला... दारूची शिकार बनला, शून्यमनस्क होण्याच्या मार्गाला लागला. तशाही अवस्थेत ह्या भावानं काव्यरचना आणि कथालेखन थोडेफार केले. मात्र ते ओतप्रोत निराशावादी ठरले. मिळतील त्या नोकऱ्या करत घर चालवायचं आणि वेळ मिळाला की लिहायचं, हा तिघींचा परिपाठ चालूच होता. शार्लटनं एकदा स्वतःच्या, एमिली व ॲन ह्यांच्या निवडक कविता घेतल्या आणि खरी नावे उघड न करता ॲक्टन बेल, क्युरर बेल आणि एलीस बेल अशी पुरुषी नावे धारण केली व दिल्या त्या कविता पाठवून! १८४६ च्या मे महिन्यात त्या प्रकाशित झाल्या. एव्हाना तिघीही कादंबरीलेखनाकडे वळल्या होत्या. १८४७, १८४८ ही दोन वर्षे ब्राँटे भगिनींनी साहित्य जगतात गाजवली. शार्लटची 'जेन एयर', एमिलीची 'वुदरिंग हाईटस्' आणि ॲनची 'ॲग्नेस ग्रे' अशा तीन कादंबऱ्या ह्याच कालखंडात प्रकाशात आल्या. ॲक्टन, क्युरर आणि एलीस बेल म्हणजेच शार्लट, एमिली व ॲन ब्राँटे अशी ह्या भगिनींना प्रकाशन संस्थांची परोपरीनं खात्री पटवावी लागली होती. नाव मिळालं तरी गरिबी संपत नव्हती. दैन्याचे चटके काही अंशी कमी झाले असतील एवढेच... पण बालपणी काढलेल्या उपासाचं फलित दमा, क्षय, ॲनीमिया ह्या विकारांच्या रूपानं ब्राँटे कुटुंबाला मिळालं होतंच. ह्याच १८४८ मध्ये प्रथम वैफल्यग्रस्त ब्रॅनवेल ब्राँटे मरण पावला. पाठोपाठ 'वुदरिंग हाईटस्'ची अत्यंत प्रतिभाशाली जन्मदात्री एमिली क्षयाला बळी पडली. १८४८ च्या हिवाळ्यात ॲन ब्राँटे खोकल्यातून रक्त थुंकू लागली आणि २८ मे १८४९ रोजी ॲनही मृत्युमुखी पडली. शार्लट एकटी राहिली. त्या एकाकी अवस्थेत, भावंडांचे मृत्यू पाहात शार्लटनं 'शर्ली' कादंबरी पूर्ण केली. हावर्थच्या घरात आता फक्त शार्लट व वृद्ध अंध पॅट्रीक ब्राँटे राहिले. मग लेखन हाच विरंगुळा उरला नि त्यातूनच 'विलेट' ही कादंबरी जन्मली. शार्लट ब्राँटे 'कादंबरीकार' हे नाव इंग्लंडच्या यशस्वी साहित्यिकांच्या तोंडी येऊ लागत असताना अघटित घडले. २९ जून १८५४ रोजी शार्लटचा आर्थर बेल निकोल्सशी त्यानं अनेक वेळा मागणी घातल्यावर विवाह झाला. तत्पूर्वी आलेले विवाहाचे प्रस्ताव शार्लटने झिडकारले होते. आता खरे म्हणजे जीवनात स्थैर्य यायला हवे होते पण ब्राँटे कुटुंब दुर्दैवी खरे! 'एमा' ही कादंबरी शार्लटनं लिहायला घेतली होती आणि १८५४ च्या हिवाळ्यात खुद्द शार्लटच्या दम्यानं, ॲनिमियानं व क्षयानंही उचल खाल्ली. अन् ३१ मार्च १८५५ रोजी प्रतिभावंत ब्राँटे भावंडातील अखेरची प्रतिभाही जग सोडून गेली. 'वुदरिंग हाईटस्' ची एमिली ही त्यात सर्वाधिक प्रतिभावंत ठरावी, मात्र ह्या तिघींनीही आपापल्या साहित्यात

न कळत आत्मानुभव, आत्माविष्कार प्रकट केले. प्रत्येक साहित्यकृतीत शार्लट, एमिली व ॲन अप्रत्यक्षपणे डोकावल्या. त्यांच्याबद्दल आत्यंतिक प्रेम बाळगणारी, व्हर्जिनिया वूल्फ तर म्हणूनच गेली– 'ब्राँटे भावंडांचे ग्रहच दुष्ट ठरले. प्रतिभेची देणगी नि त्याबरोबर एकाकीपणा व क्षयाचा शाप मिळाल्यावर काय होणार!' ब्राँटे भगिनींच्या दैवात बहुधा मरणोत्तर गौरव लिहिलेली असावा!'

२६/१२/८८

❋❋❋

# ३२

※

# ती हरवली... ती सापडली

ॲगथा ख्रिस्टीची लोकप्रियता तिच्या निधनाला इतकी वर्षे उलटूनही आंतरराष्ट्रीय पातळीवर कायम राहावी, हेही एक रहस्यच! पहिल्या पुस्तकापासून शेवटच्या पुस्तकापर्यंत खपातलं सातत्य, अनुवादांचा विक्रम कायम राहावा ह्याचे रहस्य तिच्या यशस्वी लेखणीत निश्चितच होते, पण त्याखेरीज 'ॲगथा ख्रिस्टी' ह्या व्यक्तीतही होते. ती स्वतःच एक भुलभुलैया होती. तिचं आयुष्य हाही एक ग्रंथच. संपूर्ण जीवनपट पाहायला जाणारा रसिक एखाद्या अनोख्या दुनियेत सैर करायला गेलेल्या पर्यटकांप्रमाणे गुंतून पडेल, असे हे व्यक्तिमत्त्व होते. ॲगथा ख्रिस्टी म्हणजे एका देहातील अनेक व्यक्ती... ती ॲगथा मिलर नावाची बालिका होती. मॅकमिलर होती... मार्टीन वेस्ट होती... मार्टीन ग्रे होती नि नॅथनेल मिलरही होती. ही सगळी पुरुषी नावे साहित्य रचना करताना तिने घेतली होती. पहिल्या महायुद्धापासून पराक्रम गाजविलेल्या पण तिच्याशी एकनिष्ठ नसलेल्या आर्चिबॉल्ड ख्रिस्टीची ती पत्नी होती. आयुष्यातल्या एका जबर आघाताच्या क्षणी ती चक्क स्वतःला विसरली आणि ट्रीसा नील बनली. त्याशिवाय कधी कधी ती मेरी वेस्टमॅकॉट असे . दुसऱ्या विवाहानंतर ती मिसेस मॅलोन अन् नंतर लेडी मॅलोन बनली. आणि आयुष्याच्या उतारावर डेम ॲगथा ख्रिस्टी बनली. तिला हा गौरव बहाल करताना राणी एलिझबेथ विनोदाने म्हणाल्या होत्या 'डेम ॲगथा हे मात्र खरंखुरं संबोधन आहे!'

माणसं वारंवार नावं का बदलतात, हा मानसशास्त्रज्ञांचा विषय आहे. गुन्हेगार

नावं बदलतात कारण त्यांच्या 'धंद्यात' ते आवश्यक असतं. सरकारी नोकरीत असलेली माणसं लेखन करताना वेगळं टोपण नाव घेतात. ती कायद्याच्या कात्रीत न सापडण्यासाठी नि कलाविष्कारांच्या ऊर्मीला वाव देण्यासाठी केलेली तडजोड असते. पण घरगृहस्थीमध्ये रमणाऱ्या, नोकरी-व्यवसायाच्या अटी नसलेल्या एका प्रतिभासंपन्न व सर्वस्वी स्वतंत्र स्त्रीला एवढ्या नावांची गरज का भासावी? ॲगथाच्या मनातील गुंतागुंत ह्यातून प्रकट होते. असुरक्षितपणाची भावना त्यातून दिसते.

ॲगथा मारी क्लॅरीसा ख्रिस्टी हिचे बालपण सुखाचे होते. कुटुंबात जिव्हाळा होता, वडील उमदे होते नि आई प्रेमळ होती. पण ॲगथाच्या मनात कोपऱ्यात कोठेतरी एक समजूत दडली होती की, आपला जन्म म्हणजे एक अपघात असावा कारण थोरली बहीण मॅज अकरा वर्षांची आणि भाऊ मॉन्टी दहा वर्षांचा असताना एवढ्या प्रदीर्घ काळाने ॲगथाचा जन्म झाला. त्या वेळी ॲगथाची आई ३६ वर्षांची होती नि ॲगथाला समवयस्क भावंडे कधीच मिळाली नाहीत. आई क्लारा आणि बहीण मॅज ह्या दोघीही स्वभावाने विक्षिप्त होत्या, असे ॲगथाने आपल्या आत्मचरित्रात पुढे नमूद केले आहे. मॅज नित्य नवी सोंगे घेई, वेषांतर करी. त्याची ॲगथाला बालपणी मौज वाटे. तिच्या आईला थोडी अतींद्रिय शक्ती होती नि ती ॲगथामध्ये काही प्रमाणात उतरल्याचे बोलले जाई. कारण ध्यानीमनी नसताना ॲगथा कोठेही कागदाच्या कपट्यावर कोठली तरी तारीख अगर ठिकाणाचं नाव लिहून जाई अन् अनुभव असे येत की त्या त्या तारखेला त्या त्या ठिकाणी काही तरी महत्त्वपूर्ण घटना घडे. भाऊ मॉन्टी त्या मानाने अलिप्त असे. मॉन्टी पुढे हॅरो येथील शाळेत शिकायला गेला नि शिक्षण पुरे होताच काही गवगवा न करता एक दिवस परदेशी निघून गेला. भावाचं हे निघून जाणे एवढं विचित्र होतं की, जणू ह्या कुटुंबातील आपल्या अस्तित्वाच्या खुणा त्याने पुसून काढल्या. ॲगथाचे वडील फ्रेडरिक मिलर मूळचे अमेरिकन होते. 'ॲशफील्ड' ह्या प्रशस्त वाड्यात हे कुटुंब सुखात राहात असले तरी जीवनातल्या चढ-उतारांना तोंड देण्यासाठी लागणारा खंबीरपणा ह्या कुटुंबप्रमुखापाशी नव्हता.

ॲगथाचे शिक्षण हाही एक चमत्कारिक अध्याय ठरावा. मॅज आणि मॉन्टी ह्या दोघांनाही वेळच्या वेळी शाळेत घातलं होतं पण ॲगथाच्या जन्मानंतर तिच्या विक्षिप्त आईनं आणखी एक विक्षिप्त खूळ घेतलं. मुलांना लवकर अक्षरओळख करून दिल्यास ते घातक ठरते, असा ग्रह क्लॅरिसाने करून घेतला. त्यामुळे ॲगथा आठ वर्षांची होईतो तिला शिकवायचे नाहीच, असा निर्धार आईने केला होता. प्रत्यक्षात भलतंच घडलं होतं. वयाच्या पाचव्या वर्षापासून ॲगथा आपली आपणच वाचायला शिकली होती. मग वडील घरीच तिला गणित शिकवू लागले. ॲगथा ख्रिस्टी गणित या विषयात एकदम तालेवार नि एकपाठी होती, हे एक आश्चर्यकारक सत्य आहे. आकड्यांच्या जगात ती तासंतास

रमे आणि सगळी समीकरणं एखाद्या कवितेप्रमाणे तिच्या स्मरणात राहात. ॲशफील्डचं वास्तव्य हा ॲगथाच्या जीवनातला सर्वांत सुखद काळ होता, सुरक्षा म्हणजे ॲशफील्ड आणि आनंद म्हणजेही ॲशफील्ड अशी सांगड होऊन बसली नि भविष्यात किती तरी काळ ॲगथाला 'ॲशफील्ड' सोडण्याचा विचार शिवू देत नव्हता.

कोठल्याही शाळेत न गेल्याबद्दल आणि औपचारिक शिक्षण जन्मात कधीच न लाभल्याबद्दल ॲगथा स्वतःकडे कमीपणा घेत असे. वास्तवात शाळेच्या अभ्यासक्रमात जे जे विषय असतात, त्यांचे एवढे परिपूर्ण नि व्यापक अध्ययन तिने घरीच केले होते. नि शाळेतील तिच्या वयाच्या मुलांपेक्षा ती कमालीची पुढे गेली होती. निरीक्षण आणि स्मरणशक्ती यांची भरघोस देणगी लाभलेली ही मुलगी आजूबाजूची माणसं, निसर्ग, माणसांच्या लकबी यांचे नकळत सूक्ष्म अवलोकन करीत होती. नि ह्याच अभ्यासाचा उपयोग पुढे तिला साहित्य निर्मितीसाठी करता आला.

ॲगथाचे आत्मचरित्र तिच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाले. वडिलांची आर्थिक घसरण आणि विवंचनेनं खालावलेली प्रकृती हे काही समजायच्या आतच ॲगथा अकरा वर्षांची असताना फ्रेडरिक मिलर कालवश झाले नि ह्या घटनेशी आपले बाल्य पूर्णविराम घेते झाले, असे ॲगथाच्या आत्मचरित्रात आणि चरित्रातही नमूद झाले आहे. आई आणि ॲगथा एकमेकींमध्ये सुरक्षितता शोधीत राहिल्या. एकमेकींना आधार होऊन राहिल्या. आईच्या ठाई ॲगथाचे बंध एवढे अतूट झाले की, पुढे आईच्या मृत्यूला सामोरे जाण्याचे धैर्य ह्या स्त्रीमध्ये राहिले नाही. इतकेच नाही तर आपल्याला आलेल्या विस्मृतीमुळे आपण आईकडे दुर्लक्ष केले, अशी एक अपराधी भावनाही तिने वागवली. ॲगथाचे व्यक्तित्व कमालीचे गुंतागुंतीचे होते.

आर्चिबॉल्ड ख्रिस्टी आणि ॲगथा मिलर हा विवाह अनपेक्षित आणि अविश्वसनीयही होता. बावीस वर्षांची ॲगथा एकलकोंडी नि बुजरी तर २३ वर्षांचा आर्चिबॉल्ड उमदा, धीट, कोणावरही छाप टाकणारा अशी ही स्वभावाने विजोड जोडी होती. खरे तर काही काळ ॲगथावर प्रेम करून मग ते विसरून जाणे आर्चिबॉल्ड ख्रिस्टीला अधिक मानवले असते पण योगायोग असा की, त्याच वेळी पहिले महायुद्ध जाहीर झाले नि १९१४ च्या डिसेंबरमध्ये आर्चिबॉल्ड आघाडीवर निघाला म्हणून ते लग्न घाईघाईत उरकले गेले. संपूर्ण युद्धकाळात आर्चिबॉल्ड मेहिमेवर होता तर ॲगथा फार्मसीच्या परीक्षेच्या अभ्यासात गुंतली होती. ॲगथाचे रसायनशास्त्राचे ज्ञान हा पैलू फारसा प्रकाशात आला नाही. पण ही बाई 'ॲपोथिकरी' अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तम रीत्या परीक्षेत उत्तीर्ण झाली होती. एका फार्मसिस्टच्या हाताखाली सहाय्यक म्हणून काम करीत होती. चमत्कारिक नि गलिच्छ दिसणारा फार्मसिस्ट औषधे तयार करण्यात एवढा निष्काळजी होता की, त्याच्या सांगण्याबरहुकूम तयार केलेल्या औषधाने माणसं मेलीच असती, हे ॲगथाच्या ध्यानात

यायला वेळ लागला नाही. त्याचे प्रमाण धुडकावून ॲगथा स्वतःच काळजीपूर्वक रसायने तयार करू लागली. पण हा 'गलिच्छ' फार्मसिस्ट व त्याचा निष्काळजीपणा ॲगथाच्या स्मरणात उत्तम राहिला आणि अर्थातच रसायनांचे गुणधर्म देखील. म्हणूनच ॲगथा ख्रिस्टीच्या कादंबऱ्यांतून विषप्रयोग करून अनेक खून घडले नि विषाची मात्राही कशी अचूक ठरायची... कणभर कमी जास्त नाही. ह्या युद्धाच्या दणादणीतच बहीण मॅज हिने दिलेल्या आव्हानामुळे ॲगथानं पहिलीवहिली रहस्य कादंबरी लिहिली. 'मिस्टरीयस अफेअर्स ॲट स्टाईल्स' ही कादंबरी सहा प्रकाशकांनी नाकारली, दोन वर्षे धूळ खात पडली नि अखेर बॉडली हेड ह्या प्रकाशन संस्थेच्या जॉन लेन ह्याने ती धूळ झटकली. 'वीकली टाइम्स' मध्ये तिचे क्रमशः प्रकाशन सुरू होताच ती कमालीची यशस्वी ठरली. ह्या युद्धाच्या काळात बेल्जमहून असंख्य निर्वासित इंग्लंडमध्ये आले होते. टॉर्कीला मोठी निर्वासित छावणी होती. ह्या निर्वासितांतूनच ॲगथाला तिचा मानसपुत्र 'हर्क्युल पारो' सापडला. निवृत्त बेल्जम पोलिस अधिकारी म्हणून पारो एखाद्या कलावंताप्रमाणे नि एखाद्या संशोधकाप्रमाणे गुन्हे उकलत जाई. हा मानसपुत्र ॲगथाच्या ८६ पैकी २५ कादंबऱ्यांतून रहस्यांची उकल करीत राहिला. ॲगथाची मानसकन्या म्हणजे मिस जेन मार्पल. हिची व्यक्तिरेखा ॲगथाच्या आजीला प्रतिमान मानून रेखाटली होती.

युद्धानंतर सुरू झालेला संसार, मुलगी रोझलिंडचा जन्म, ह्या घटनांपेक्षा ॲगथाच्या आयुष्यातली सर्वात जबरदस्त घटना घडली १९२६ साली! १९२६ सालचा डिसेंबर महिना... ह्या सुमारास ॲगथा ख्रिस्टी हे नाव अर्ध्या जगात गाजत होते. ॲगथाच्या आईचा मृत्यू ह्या सुमाराचा, तो आघात पुरेसा नव्हता म्हणून की काय, पती आर्चिबॉल्ड ख्रिस्टी एका नव्या पाखराच्या प्रेमात पडला होता. आर्चीबरोबरचा आपला विवाह सुखी असल्याचा विश्वास ॲगथाला होता. तो आभास होता हे आता स्पष्ट झालं, कारण आर्चीनं सरळच ॲगथासमोर घटस्फोटाचा पर्याय ठेवला होता. ॲगथाच्या पहिल्या कादंबरीच्या यशानं कौतुकाने आर्चीने लंडनमधील आपल्या निवासस्थानाला 'स्टाईल्स' हेच नाव ठेवलं होतं. ह्या 'स्टाईल्स' मध्ये तणाव निर्माण झाले. आईचा मृत्यू, मुलीची चिंता, पतीकडून झालेला विश्वासघात, घटस्फोटाची मागणी ह्या काहुरात अघटित घडलं. दि. ३ डिसेंबर १९२६ रोजी रात्री ॲगथा 'स्टाईल्स' मधून स्वतःच मोटार काढून बाहेर पडली आणि नाहीशी झाली. संपूर्ण इंग्लंडभर तपास झाला. फ्रान्सलाही तपासाची विनंती करण्यात आली नि ॲगथा लंडनपासून दूर उत्तर इंग्लंडमध्ये हॅरोगेट येथील हायड्रो हॉटेलमध्ये दहा दिवसांनी सापडली. 'ॲगथा', 'मिसेस ख्रिस्टी' ह्या संबोधनांना ती दाद देत नव्हती. 'कोण ॲगथा?' असा उलट प्रतिप्रश्न तिनं केला. हॉटेलमध्ये ती 'ट्रीसा नील' हे नाव घेऊन राहात होती अन् ज्या स्त्रीशी विवाह करण्यासाठी आर्चिबॉल्ड ख्रिस्टी तिच्याकडे घटस्फोट मागत होता त्या स्त्रीचं नाव होतं 'नॅन्सी ट्रीसा नील.'

किती तरी दिवस ॲगथा स्वतःला ट्रीसा नील समजत राहिली. अखेर ऑक्सफर्डच्या एका विख्यात मानसोपचारतज्ज्ञाने ॲगथावर उपाय सुरू केले. मनोविश्लेषणाची अनेक सत्रे झाली, तेव्हा जणू चित्रपटाप्रमाणे सर्व घटनाक्रम उलगडत गेला– ३ डिसेंबरच्या रात्री ॲगथा 'स्टाईल्स' मधून एका चमत्कारिक अवस्थेत निघाली ती निरुद्देशी वळणं घेत सरे प्रांताच्या दिशेने गेली. कारण? काही नाही! ड्रायव्हिंगचे कौशल्य नसल्याने तिची मोटर डोंगराच्या चढावरील कठड्यावर आदळली. कदाचित त्या वेळी मस्तकाला मुका मार लागला असेल अगर मानसिक धक्का एवढा मोठा असेल की ही बाई आपलं अस्तित्व विसरली. केवळ नॅन्सी ट्रीसा नील ह्या स्त्रीचे (नवऱ्याच्या प्रेयसीचे) नाव तेवढे मनात राहिले, कारण मनात तिचाच विचार चालू असावा. मोटर नि त्यातील स्वतःचा गरम कोट तेथेच टाकून कडाक्याच्या थंडीत ती बाहेर पडली असणार, कारण नंतर तिला एवढेच आठवले की जवळ पर्स होती व त्यातूनच लंडनला येऊन तिने एक कोट घेतला नि ती वॉटर्लू स्टेशनात आली. कदाचित घरी परतण्याच्या इराद्याने ती निघाली असावी, पण चक्क हॅरोगेटच्या गाडीत शिरून ती हायड्रो हॉटेलात दाखल झाली. अन् ट्रीसा नील बनली. ह्याच हॉटेलमधल्या माणसांनी तिला ओळखले नि पोलिसांना कळविले. 'स्मृतिभ्रंश' असे कारण मानसोपचारतज्ज्ञांनी ह्या घटनेमागे दिले असले, तरी त्याने आजही समाधान होत नाही. व्यक्तिगत जीवनातील ह्या जीवघेण्या आघातात ॲगथा ख्रिस्टी हरवून गेली नि दहा दिवसांनी ती सापडली व उपचारानंतर डॉक्टरांनी ॲगथाला परत माणसात आणले हे विधान अपुरे ठरते. ॲगथा हरवली... लौकिकदृष्ट्या सापडली... उपचार झाले हे मान्य. पण ॲगथाला माणसात आणण्याचे श्रेय डॉ. मॅक्स मॅलोवन ह्या ख्यातकीर्त पुरातत्त्वसंशोधकाला द्यायला हवे. ॲगथापेक्षा वयाने तरुण असलेल्या ह्या बुद्धिमंताने तिला अस्सल प्रेम, न तुटणारे वैवाहिक जीवन, पूर्ण विश्वास देऊन पुनः उभं केलं... लिहितं केलं... ट्रीसा नील ह्या स्त्रीमध्ये काल्पनिक रीत्या हरवू पाहणाऱ्या ह्या प्रतिभावंत लेखिकेला पुनश्च आत्मविश्वास देऊन ॲगथा ख्रिस्टी मॅलोवन बनवलं. तिला माणसात आणण्याचं... म्हणजे खरं तर साहित्यात पुनः आणण्याचं, लेखणीद्वारे खून पाडायला नव्याने सिद्ध करण्याचे श्रेय मॅक्स मॅलोवनचेच!

१३/११/८९

❋❋❋

## ३३

※

# सावधान! शताब्दी सुरू होतेय

बर्कशायरचं खच्चून भरलेलं सभागृह... रंगमंचावर काळोख..., कोठूनसा प्रकाशाचा एक झोत सरकत रंगमंचावरील एका बिंदूशी स्थिर झाला नि तेथील मांडणी प्रकाशमान बनली... एक काळेशार शिसवी टेबल त्या प्रकाशात उजळले. त्यावर चौकडीच्या डिझाईनचा टेबल क्लॉथ, फुलदाणीत लालेलाल गुलाब... गुलाबांच्या फुलांच्या आधाराने उभा केलेला धारदार खंजीर... टेबलावर पडलेलं एक पिस्तुल नि एक मोठ्ठी थोरली लेखणी... विंगेतूनच पिस्तुलाचा शॉट... धुराचं वलय... नक्कीच कोणाचा तरी खून पडला... एक किंचाळीही सभागृहात घुमली... पाहता पाहता रंगमंचावर एक मखमली पडदा सुऱ्यानं उभा चिरला गेला... एवढा वेळ तो पडदा तेथे असल्याची कोणाला पुसट शंकाही आली नव्हती... व त्याच वेळी घोषणाही झाली– 'शताब्दी सुरू होत आहे. खुन्यांच्या राणीची सर्वाधिक रक्तपिपासू स्त्रीची... डेम ॲगथा ख्रिस्टीची!'

दि. १५ सप्टेंबर १८९० हा ॲगथा ख्रिस्टीचा जन्मदिन. त्यामुळे सप्टेंबर १९८९ ते १५ सप्टेंबर १९९० असा पूर्ण वर्षभर हा शताब्दी सोहळा साजरा होणार आहे. ब्रिटिश जनता मुळातच साहित्यप्रेमी. डेम ॲगथा तर साहित्यक्षेत्रात जागतिक विक्रमांची मानकरीण. १९ व्या शतकास लंडनमध्ये धडाधड खून पाडणाऱ्या 'जॅक द रीपर' ह्या कुप्रसिद्ध व्यक्तीचीही गतवर्षी इंग्रजांनी शताब्दी साजरी केली होती. अशी मंडळी ॲगथाची शताब्दी परमावधीच्या उत्साहाने साजरी करणारच. खरे तर ह्या शताब्दी सोहळ्यात सर्व

जगाचा सहभाग हवा. कोठलाही देश घ्या– त्यातील आंतरराष्ट्रीय विमानतळापासून एखाद्या खुर्द-बुद्रुक गावातलं टपरीवजा पुस्तकाचं दुकान पाहा... ॲगथा ख्रिस्टी तेथे नाही असं कधी होणारच नाही. किमान अनुवादित तथा रूपांतरित अवतारात तरी ही 'खुनी' बाई तेथे हजर आहेच. माणूस प्रवासाला निघाला की, जे वाहन मुक्रर असेल त्याला साजेसं सामान बांधलं जातं. देखण्या सुटकेसीस विमानाला नि खासगी मोटारींनाच बऱ्या... गाडी नि एस. टी. ला त्या विसंगत ठरतात. मात्र वाहन नि सामान कोठलंही असो... प्रवासात ॲगथा ख्रिस्टीची सोबत हवीच. ग्रँट ट्रंक एक्सप्रेस किंवा के-के एक्सप्रेस नाही तर जम्मूतावी एक्सप्रेसमधून लांबलचक पल्ल्याचा प्रवास सुरू करायचा नि मिट्ट काळोख पडताच ॲगथा ख्रिस्टीचे पुस्तक काढायचं– 'मर्डर ऑन दी ओरिएन्ट एक्सप्रेस.'

ॲगथा ख्रिस्टी ही स्त्री स्वतःच्या हयातीत जणू एक संस्था बनून गेली. एकपात्री. एकखांबी संस्था. एक सदस्यीय उद्योगधंदा आणि विशेष म्हणजे मृत्यूनंतरही हे संस्था रूप कायम राहिले आहे. ८४ कादंबऱ्या, १९ नाटके, एक जाडजूड आत्मचरित्र आणि तीन वैचारिक ग्रंथ एवढी भक्कम साहित्य-संपदा देणाऱ्या ह्या लेखिकेचे जगावर केवढे मोठे ऋण आहे. साध्या भारताचे उदाहरण घेतले तरी सहज दिसते की, भारतातील सर्व प्रादेशिक भाषांतून ॲगथाच्या रहस्य कादंबऱ्यांचे अनुवाद किंवा रूपांतर झाले आहे नि ह्या प्रादेशिक भाषांतील रहस्य नाटकांची पहिली प्रेरणाच मुळात ॲगथा ख्रिस्टीचे 'खुनी' वाङ्मय आहे. वस्तुतः भारतातही ॲगथाची जन्मशताब्दी दणक्यात व्हायला पाहिजे. भारतातील रूपा बुक कंपनीने आपल्या परीने ह्या शताब्दीनिमित्त ॲगथा ख्रिस्टीच्या कादंबऱ्यांचे भारतात पुनर्मुद्रण करून त्या कमी दरात चाहत्यांसाठी उपलब्ध करण्याची योजना हाती घेतली आहे.

इंग्लंडच्या साहित्यप्रेमींनी आरंभीच सांगितल्याप्रमाणे सोहळा सुरू केलाच. पण वर्षभरासाठी भरगच्च कार्यक्रम आखले आहेत. केवळ शताब्दीसाठी लंडनमध्ये एक सुसज्ज कार्यालय थाटले आहे. प्रतिसाद एवढा जबर ठरला की, एक पूर्ण वेळ काम करणारी सचिव नेमावी लागली नि एक संगणकही घ्यावा लागला. ॲगथाला तिच्या मृत्यूनंतरही चाहत्यांची पत्रे येत होती. वैशिष्ट्य म्हणजे 'द ग्रेटेस्ट नॉव्हेलिस्ट, बर्कशायर, इंग्लंड' हा एवढा पत्ताही पुरत असे. ह्या अगणित चाहत्यांना आता उधाण आले आहे. शताब्दीनिमित्ताने खास रायटिंग पॅडस्, लेखण्या विक्रीसाठी तयार करण्यात आल्या आहेत नि त्यावर ॲगथा ख्रिस्टी ह्या नावाचा त्यातील रहस्यमयतेसह 'लोगो' बनवून कोरण्यात आला आहे. खास पोस्टर्स, चित्रे जय्यत तयार आहेत. ब्रिटिश टेलिव्हिजनवर वर्षभर ॲगथा ख्रिस्टी शताब्दीसाठी खास मालिका प्रक्षेपित होत आहेत. ॲगथाच्या अनेक रचनांवर आल्फ्रेड हिचकॉकसारख्या मातब्बरांनी काढलेले सुंदर चित्रपट पुनश्च पाहण्याचा योग इंग्रजांना लाभणार आहे, तर सध्याचे जानेमाने ब्रिटिश निर्माते व दिग्दर्शक ॲगथाच्या अन्य रचनांवर चित्रपट निर्मिती करीत आहेत. इंग्लंडमध्ये ग्रामीण भागात जेवढी थिएटर्स आहेत, त्या प्रत्येकात ॲगथाच्या

'स्पायडर्स वेब' ह्या नाटकाचा खास प्रयोग सादर व्हायला आरंभ झाला आहे. ॲगथाचं 'माऊस ट्रॅप' हे नाटक महाविक्रमी. १९८७ साली ह्या नाटकाने प्रयोगांची पस्तिशी साजरी केली. एकाच थिएटरमध्ये सातत्याने ३५ वर्षे हे नाटक चालले (अजूनही चालू आहे). आता 'माऊस ट्रॅप'चे शताब्दीसाठी विशेष खेळ होत आहेत. इंग्लंडमध्ये येणाऱ्या पर्यटकांना प्रवासी कंपन्यांतर्फे 'माऊस ट्रॅप' नेहमीच दाखवले जाते. आता तर पर्यटकांना आवर्जून टॉर्की येथील बार्टन रोडवर नेण्यास सुरुवात झाली आहे. ह्या मार्गावर 'ॲशफिल्ड' नावाचा एक ऐसपैस वाडा आहे... ९९ वर्षांपूर्वी ॲगथा ख्रिस्ती येथे जन्मली. साहित्य, नाट्य, चित्रपट ह्यांच्याबरोबरीने मरणोत्तर चक्क पर्यटन खात्यावरही आक्रमण करणारी ही स्त्री अचाटच म्हणायची.

शताब्दी एवढ्यावर थांबणार नाही. सुप्रसिद्ध मादाम तुसॉने स्वतंत्र ॲगथा ख्रिस्ती दालन निर्माण केले आहे. त्यात खुद्द ॲगथा (अर्थातच मेणाची) दिसेलच, पण तिच्याशिवाय तिची मानसकन्या 'मिस मार्पल' आणि मानसपुत्र 'हर्क्युल पारो' ह्यांच्यासह मिसेस मॅकृगिंटी, प्रिन्सेस दागेमीर अशी महत्त्वाची पात्रेही हजर आहेत. 'ओरिएन्ट एक्सप्रेस'मधील इनग्रीड बर्गमन आणि व्हॅनेसा रेडग्रेवही मोम की गुडियाँच्या रूपात तेथे उभ्या आहेत. ॲगथा ख्रिस्तीला नवेनवे खून सुचण्यासाठी तीन चिजा पुरेशा असत. लालभडक गुलाबाची फुलं, रसरशीत सफरचंदे आणि स्वतःच्या स्नानगृहातील बाथटब... एवढ्या वातावरणात खुनांची उभारणी उत्तम होई. ह्या तिच्या सवयीचे स्मरण म्हणून आंतरराष्ट्रीय रोझ सोसायटीने एक नवा रक्तवर्णी संकरित गुलाब निर्माण केला आहे. चेल्सा येथे होणाऱ्या पुष्पप्रदर्शनात समारंभपूर्वक त्या गुलाबाला 'ॲगथा ख्रिस्ती' हे नाव बहाल केले जाईल. ई.एम.आय. कंपनीने ॲगथाच्या निवडक कादंबऱ्यांच्या कॅसेटस् काढल्या आहेत. संपूर्ण कादंबऱ्या-कथा ह्या कॅसटस्नी स्त्री-पुरुष निवेदकांच्या आवाजात बोलत्या केल्या आहेत. ॲगथाचे प्रकाशक म्हणजे कॉलिन्स आणि पेंग्विन्स! कॉलिन्सतर्फे वेगळ्या शताब्दीस्मृती आवृत्त्या निघणार आहेत. 'ॲगथा ख्रिस्ती' काच सामान तयार होत आहे. कप-बश्या-मग्स-ग्लासेस नि वाडगे ह्यावर ॲगथाचा 'लोगो' विराजमान झालाय. फार काय पण ॲगथाचा मानसपुत्र हर्क्युल पारो ज्या जुन्या पद्धतीची बटने कोटासाठी वापरीत असे, त्या बटनांचे पुनरुज्जीवन होऊन, 'लोगो'सह ती बटने ब्रिटिश कोटांवर विराजमान होत आहेत.(बाई आक्रमक खरी) हर्क्युल पारो हा तर कल्पनेतील नायक; पण त्याला प्रत्यक्ष, खराखुरा मानून त्याचे चरित्र आकार घेत आहे.

ॲगथा १९७६ मध्ये मरण पावली. आपल्या वारसांसाठी 'ॲगथा ख्रिस्ती लिमिटेड' ही संस्था तिने मागे ठेवली. ही संस्था सुप्रसिद्ध बूकर पारितोषिकवाल्यांशी संलग्न असली तरीही स्वायत्त आहे नि संस्थेवर ॲगथाच्या वारसांचेच नियंत्रण आहे. ॲगथाला एकुलती एक मुलगी झाली. तिचं नाव रोझलिंड. टॉर्कीजवळच ग्रीनवे हाऊस ह्या घरात रोझलिंड

राहते. ह्या रोझलिंडचा मुलगा म्हणजे अॅगथाचा नातू मॅथ्यू प्रिकर्ड हा आज 'अॅगथा ख्रिस्टी लिमिटेड'चा मालक आहे. मॅथ्यू जेव्हा ९ वर्षांचा झाला, तेव्हा अॅगथाने त्याला एक भन्नाट उपाहार दिला. 'माऊसट्रॅप' ह्या नाटकाच्या संपूर्ण उत्पन्नाचे अधिकार अॅगथाने मॅथ्यूला बहाल केले.

अॅगथा ख्रिस्टी लिमिटेड ह्या संस्थेचे कॉपीराईट २१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात समाप्त होणार आहेत. तथापि अॅगथाची शताब्दी लक्षात घेऊन हार्पर अॅण्ड रो कंपनीने अॅगथाच्या ३३ कादंबऱ्या अमेरिकेत प्रकाशित करण्याचा अधिकार मोजून ५.६ मिलियन पौंड देऊन प्राप्त केला. आज तिच्या वाङ्मयाचा एजंट म्हणून ब्रायन स्टोन हे काम पाहतात. स्टोनच्या मते अॅगथा ख्रिस्टी हे नाव आजी, मुलगी, नात नि आता पतवंडांच्या पिढीपर्यंत कायम लोकप्रिय राहणे हाही एक विक्रमच म्हणावा लागेल. लंडन टेलिव्हिजनने डेव्हिड सुशे ह्या नटाला हर्क्युल पारोची भूमिका देऊन मालिका सुरू करताच एक कोटी वीस लक्ष प्रेक्षक टी.व्ही.पुढे खिळून बसले. आता जोन हिक्सन ह्या अभिनेत्रीला 'मिस मार्पल' म्हणून निवडून अॅगथाच्या 'मार्पल' मालिकेचे काम सुरू झाले आहे. ह्या मालिकेची सुरुवात नाताळपासून होईल नि तीही लोकप्रियतेचा विक्रम नोंदवीलच...

६/११/८९

❋❋❋

## ३४

※

# जपानी ‘युगान्त’

शनिवार दि. ७ जानेवारी १९८९ रोजी पहाटेच उगवत्या सूर्याच्या देशात जपानमध्ये युगान्त झाला. जपानमध्ये जेव्हा जेव्हा सम्राटाचे निधन होते तेव्हा तेव्हा एकएक युग अस्ताला जाते. सम्राट हिरोहितो ह्यांच्या निधनानं जपानमधील ‘शोवा’ तथा आत्मिक शांतीचे गेली ६४ वर्षे चालू असलेले युग संपुष्टात आले. उर्वरित जगाच्या दृष्टीने इतिहासातील एका काळ्या युगाचा अखेरचा दुवा निखळला. १९३९ ते १९४५ हा कालखंड दुसऱ्या महायुद्धाचा म्हणजेच काळ्या युगाचा. पृथ्वीवरच्या सर्व खंडांना वेढणाऱ्या ह्या युद्धात अनेकानेक व्यक्ती ओढल्या गेल्या. प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीत्या हा विक्राळ गोवर्धन अनेकांच्या खांद्यावर सावरला गेला. ते युगच असं होतं की, अनेक नायक, महानायक, खलनायक, उपनायक, प्रतिनायक ह्या खेळीत ओढले गेले. प्यादी-फर्जी, उंट-हत्ती-घोडे कोटींच्या संख्येने कामी आले. अनेक सेनानी रात्रीचा दिवस करीत डावपेच लढवीत राहिले. रोमेल, हिटलर, चर्चिल, रुझवेल्ट, ट्रुमन, स्टॅलिन, मुसोलिनी, राजे सहावे जॉर्ज, ऑकिनलेक, अलेक्झँडर, वेव्हल, पॅटन, माँटगॉमरी, माऊंटबॅटन, चँग काय शेक, चाऊ, माओ, मोलोतोव्ह, झुकाव्ह, कोनेव, उस्तिनॉव्ह, झानोव, आयसन हावर, चार्ल्स द गॉल, सुभाषबाबू, मॅकआर्थर... एकेक जण जगाच्या पटावरून श्रेय आणि अपश्रेयाचे धनी होऊन निघून गेले. ह्या काळ्या युगाचा एकमात्र दुवा राहिला होता... सम्राट हिरोहितो ह्यांच्या रूपाने! तो परवा तुटला.

जागतिक पातळीवरील निंदा आणि अपयशाचा तथा भयंकर संहाराचा कलंक झेलूनही स्वकीयांकडून आत्यंतिक आदर अखेरपर्यंत लाभणे ह्या दोन्ही परस्परविरोधी बाबी हिरोहितोंच्या बाबतीत घडल्या. चीनच्या अखेरच्या सम्राटाचं जीवन बर्नार्डो बर्टोलुसीसारख्या प्रतिभावंताला चित्रपटाचा विषय म्हणून आकर्षित करणारं ठरलं. सम्राट हिरोहितो ह्याचं जीवनही असंच अविश्वसनीय नी म्हणूनच खिळवणारं होतं. कदाचित भविष्यात एखाद्या प्रतिभावंताला हे जीवन पडद्यावर साकारण्याची स्फूर्ती होईलही. मात्र त्यात यश मिळेल की नाही, ह्याची शाश्वती नाही कारण जपानी जनतेच्या आणि जपानी राजघराण्याच्या भावना सम्राटांशी अत्यंत तीव्रतेने निगडित झालेल्या आहेत. पीतवंशी माणसं म्हणजे एकूण गूढच... त्यात जपानी वर्तन आणखी गूढ वाटावे. जपानी तख्ताला 'शेवंतीचे सिंहासन' अशी संज्ञा आहे आणि हे सिंहासन २००० वर्षांहून अधिक प्राचीन आहे. जपान हा देश जसा सूर्याचा तसेच हे राजघराणे सूर्यवंशी आहे. प्रत्येक सम्राट सूर्यपुत्र मानण्याची प्रथा इथं होती आणि जगातील हे एकमेव राजघराणे जेथे सिंहासनासाठी स्पर्धा, गृहकलह, भाऊबंदकी, युद्धे, खूनखराबा कधीच घडला नाही. ना क्रांती घडली ना रक्तपात! शस्त्राच्या बळावर सिंहासन जिंकणं, सम्राटाला खेचून सत्ता बळकाविणं ह्या सूर्यवंशी मेईजी राजघराण्याला कधीच ठाऊक नाही. नाही म्हणायला सम्राट हिरोहितो ह्याच्याच कारकीर्दीत राजघराणं नकोच म्हणणाऱ्या डाव्या विचारसरणीच्या विद्यार्थ्यांची निदर्शने झाली होती. ह्या राजघराण्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सिंहासनावर १० स्त्रिया बसून गेल्या. पाच-सात पिढ्यांपर्यंतही एक राजघराणं सलगपणे राज्य करू शकत नाही, असा सर्वसाधारण सर्वच देशांच्या इतिहासाचा निष्कर्ष असताना त्या पार्श्वभूमीवर जपानचा इतिहास थक्क करणारा ठरतो. सम्राट हिरोहितो हे ह्या प्राचीन सूर्यवंशातील १२४ वे सम्राट होते. आताचे नवे सम्राट अकिहितो हे १२५ वे म्हणजे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी ठरतील.

तसे हिरोहितो अनेक बाबतीत परंपरा मोडणारे ठरले होते. मधल्या २०० वर्षांच्या काळात जपानने स्वतःभोवती एक विचित्र निर्बंध घालून घेतला होता. जगापासून स्वतःला पूर्णतः तोडून घेतले होते. कोणा जपान्याने देश सोडायचा नाही नि कोणाही विदेशी माणसाला जपानमध्ये प्रवेश द्यायचा नाही असा चमत्कारिक दंडक स्वतःच घालून घेऊन जपानने आपले आपणच बरेच नुकसान करून घेतले होते. ह्या पार्श्वभूमीवर हिरोहितोचे परदेश गमन, परदेशात घेतलेले उच्च शिक्षण ह्या बाबी क्रांतिकारी ठरल्याच पण वैवाहिक जीवनातील त्यांचे वर्तनही जपानी परंपरेच्या दृष्टीने 'विक्षिप्त' ठरले. सूर्यवंशी सम्राटांना सम्राज्ञीखेरीज अनेक अंगवस्त्रे-उपवस्त्रे ठेवण्याची अनुज्ञा असते नव्हे ती प्रथाच होती. सम्राज्ञीला पुत्रसंतती न झाल्यास अंगवस्त्र म्हणून राहिलेल्या स्त्रीला झालेली पुत्रसंतती सिंहासनाचा वारस म्हणून निवडली जाई. सम्राट हिरोहितो ह्यांचा विवाह सम्राज्ञी नागाको ह्यांच्याशी झाल्यानंतर ओळीने ह्या दांपत्यास चार मुली झाल्या तेव्हा जपानी प्रशासन मंडळ,

तथा शिंटो धर्मगुरूंनी हिरोहितोंना 'अंगवस्त्र' निवडण्याचा प्रस्ताव मांडला होता. हिरोहितोंनी तो साफ मोडून काढला. एकपत्नी राहून त्यांनी सगळ्यांनाच बुचकळ्यात टाकले. सम्राज्ञी नागाको ह्यांना पुत्र (युवराज अकिहितो) झाल्यावर बहुधा समस्त जपान्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला असावा. झाला एकदाचा वारसाचा जन्म, असेच बहुधा त्यांना वाटले असावे.

चीन आणि जपानच्या राजघराण्यांच्या आणखी काही चमत्कारिक प्रथांपैकी एक म्हणजे सिंहासनाच्या वारसाला त्याच्या जन्मानंतर केवळ तीन महिन्यांनी जन्मदात्या आईपासून तोडले जाई. ह्या बालवारसाची संपूर्ण घडण अत्यंत विश्वासू गुरू तथा आचार्य करीत. २९ एप्रिल १९०१ रोजी जन्मलेल्या हिरोहितोंनाही त्यांच्या आजोबांनी (तेव्हाचे सम्राट) तीन महिन्याच्या वयातच आपला विश्वासू सेनापती जनरल मारेसुकी नोगी ह्याच्या हाती सोपविले. आईवडिलांपासून दूर हिरोहितोंवर 'सम्राट' बनण्यासाठी संस्कार सुरू झाले. त्यात ज्युडो, कराटे, खड्गयुद्ध, सुमो ह्या प्रकारचे मल्लयुद्ध, बंदुकबाजी, पिस्तोलबाजी, धर्मशास्त्र, शिंटो तत्त्वज्ञान सर्वांचा समावेश होता. १९१२ मध्ये हिरोहितोंच्या आजोबांचा मृत्यू झाला अन् त्यांच्या अत्यसंस्कारापूर्वी अकरा वर्षे वयाच्या ह्या सम्राटाला राजनिष्ठा म्हणजे काय ह्याचे प्रत्यंतर आले. 'सम्राटांच्या सह त्यांच्याशी बांधलेल्या निष्ठा घेऊन मीही त्यांचाच मागोवा घेणार' असे जाहीर करून हिरोहितोंचा आचर्य जनरल मारेसुके नोगी ह्याने समारंभपूर्वक आत्महत्या करून जीवन संपविले. आजोबांच्या ठायी असलेली एका समर्थ सेनापतीची ही निष्ठा पाहून थक्क झालेला हा अल्पवयीन राजपुत्र भवितव्यात स्वतःला लाभलेल्या अतुलनीय स्वामिनिष्ठेच्या दर्शनानं नम्र झाला.

हिटलर आणि हिरोहितो ह्यांना 'माणुसकीचे गुन्हेगार' हे बिरुद मिळाले. नवी साम्राज्ये उभारण्याची स्वप्ने ह्या दोघांनी पाहिली होती. हिटलरला 'न्यू ऑर्डर' हवी होती तर हिरोहितोंनी 'को-प्रॉस्परिटी स्फिअर' हे ध्येय ठरवले होते. जर्मनी आणि जपान दोघेही क्रौर्याच्या बाबतीत महायुद्धात विक्रमी ठरले. नाझी जर्मनीने केलेला यहूदी नरमेध आणि जपानने युद्धकैद्यांच्या केलेल्या नरसंहारास सीमा नव्हती. हिटलरच्या आत्महत्येनंतरही माघार न घेणाऱ्या जपानला अखेर हिरोशिमा आणि नागासाकी ह्या शहरांवर अणुबॉम्ब टाकून नमवावे लागले. दि. १० ऑगस्ट १९४५ रोजी सम्राट हिरोहितो ह्यांनी आकाशवाणीवर जाहीर भाषण करून शरणागती पत्करली (हिरोहितोंचे हे भाषण बर्टोलुसीच्या 'लास्ट एंपरर'मध्ये मूळ स्वरूपात ऐकावयास मिळते.) त्यानंतर जपानमध्ये जनरल डग्लस मॅकआर्थर ह्यांचे सहा वर्षांचे आधिपत्य होते. हे ऐतिहासिक अध्याय चिरस्मरणीय आहेत. जपानच्या शरणागतीनंतर अनेक देशांचे म्हणणे पडले की, सम्राट हिरोहितो ह्यांना मानवतेचे खुनी, युद्धगुन्हेगार म्हणून न्यूरेंबर्ग न्यायालयापुढे खेचले जावे, शिक्षा व्हावी! ह्या सुमारास जपानी राजनिष्ठेचा नव्याने प्रत्यय आला– जनरल हिडेकी

टोजो ह्याच्या रूपाने! (कुप्रसिद्ध पर्ल हार्बर प्रकरणातील गुन्हेगार) जनरल टोजो ह्याने हिरोहितोंवरील सर्व आरोप, लांच्छने स्वतःवर घेतली आणि मृत्युदंड स्वीकारला. जनरल मॅकआर्थरला अनेक श्रेष्ठींनी हिरोहितोंनाही शिक्षा देण्याची सूचना केली होती तथापि जपानवरील आधिपत्याच्या काळात कारभार सुरळीत चालवायचा असेल तर सम्राट हिरोहितो जिवंत राहायला हवेत असे मॅकआर्थरचे प्रामाणिक मत होते. अणुबॉम्ब आणि शरणागती ह्यामुळे सामान्य जपानी पूर्ण खचलेला आहे नि सम्राटाच्या ठायी जबर निष्ठा बाळगणाऱ्या ह्या समाजात त्यांच्या सम्राटास शिक्षा देऊन दुखविले तर अनर्थ होईल, अशी मॅकआर्थरची भावना होती. मात्र जपानी सम्राट म्हणजे देवच अशी जी पूर्वापार श्रद्धा होती ती संपुष्टात आणणे योग्य ठरेल, अशी समज मॅकआर्थरनं हिरोहितोंना दिली. त्याचा चांगला परिणाम होऊन दि. १ जानेवारी १९४६ रोजी सम्राट हिरोहितोंनी जाहीरपणे आपल्यावरील 'देवत्वा'ची झूल फेकून दिली. १९४५ ते १९८८ एवढे उर्वरित आयुष्य हिरोहितोंनी प्रामुख्याने सागरी जीवशास्त्राच्या संशोधनात घालविले. सागरी जीवशास्त्रीय संशोधनशाळा उभारून तेथे त्यांनी एवढा प्रचंड अभ्यास केला की, सम्राट हिरोहितो ह्यांच्या नावे सागरी जीवशास्त्रात अनेक शोध नमूद झाले आहेत. त्यांचे निबंध व प्रबंध जागतिक परिषदांतून स्वीकृत झाले आहेत. नव्या युगाची नांदी ओळखून त्यांनी आपल्या मुलांना व नातवंडांना पारंपरिक आचार्यांच्या हाती न सोपविता सरळ परदेशात पाठवून आधुनिक शिक्षण दिले.

८७ वर्षांच्या आयुष्यात जपानचे तीन टप्पे ह्या सम्राटाने पाहिले. पाश्चिमात्य जगाला आपले दार उघडणारा जपान, लष्करी सामर्थ्यसंपन्न जपान आणि दारुण पराभवानंतरही आर्थिक व औद्योगिक साम्राज्य जगात स्थापणारा समृद्ध जपान हे तीन अविश्वसनीय टप्पे ह्याच सम्राटाच्या कारकीर्दीत घडले. रशियाला युद्धात हरविणारा जपान, चीनवर जबर सत्ता व जरब बसविणारा जपान, चीनमध्ये मांचुकुओ हे साम्राज्य स्थापून चीनच्या सम्राटाला आपल्या हातचे बाहुले बनवून खेळविणारा जपान, दुसऱ्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांना भारी पडलेला जपान, अणुस्फोटात बेचिराख झालेला जपान, शरण गेलेला जपान, अन् त्यानंतर राखेतून जन्मणाऱ्या फिनिक्सप्रमाणे भूकंप व वादळासारख्या नैसर्गिक थैमानांवरही मात करून जागतिक औद्योगिक सम्राट बनलेला जपान ही एवढी ऐतिहासिक स्थित्यंतरे ह्या सम्राटाच्या आयुष्यात घडली. आणखी एक दुर्मिळ चीज सम्राट हिरोहितोंच्या वाट्याला आली. ज्या सम्राटाला युद्ध गुन्हेगार म्हणून न्यायालयापुढे खेचून मृत्युदंड द्यावा अशी मागणी जग करीत होते, त्याच सम्राटाला जागतिक पातळीवर श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्व देशांचे ध्वज अर्ध्यावर उतरले!

९/१/८९

❋❋❋

# ३५

※

# वादग्रस्त अंत्येष्टी

१९८९ हे वर्ष बहुधा वादंगवर्ष, मतभेद संवत्सर म्हणून गाजणार असे दिसते. जी माणसं जग सोडून गेलेली आहेत, त्यांच्या कारणामुळे मतभेदाच्या आणि संतापाच्या वावटळी उठत आहेत हे यंदाचं वैशिष्ट्य ठरावं. हिटलरची जन्मशताब्दी वादाचा विषय ठरली आहे तशीच जपानचे सम्राट हिरोहितो ह्यांची अंत्येष्टीही वादाचा, धिक्काराचा विषय बनली आहे. दि. ७ जानेवारी १९८९ रोजी सम्राट हिरोहितो ह्यांचे निधन झाले आणि दि. २४ फेब्रुवारी रोजी त्यांचा अंत्यविधी होणार आहे. पण ह्या एका व्यक्तीच्या अंत्यविधीशी जगभरच्या देशांचे राग-लोभ इतके एकवटले आहेत की, त्या अंत्यविधीस आपल्या देशप्रमुखाने जाऊ नये, अशी मागणी करणारी शिष्टमंडळे देशोदेशी प्रयत्न करीत आहेत. आपला नेता जपानला त्यासाठी जात आहे, हे कळल्यावर अनेक देशांतून निषेधाचे मोर्चे निघत आहेत. खुद्द जपानमध्येही साम्यवादी विचारसरणीच्या युवक गटाला शाही अंत्यसंस्कार अमान्य आहेत. त्यांचा विरोध 'सम्राट' ह्या पदालाच आहे. अर्थात अशा युवकांची संख्या अल्प आहे. ह्याउलट देश-विदेशातील जनतेचा विरोध राजघराण्याला नाही तर हिरोहितो ह्या व्यक्तीला आहे. माणसांचा एवढा तीव्र संताप एका व्यक्तीच्या वाट्याला येण्याची अन्य उदाहरणे हिटलर- स्टॅलिन- पोल पॉट ह्यांचीच द्यावी लागतील.

भारतातर्फे हिरोहितोंच्या अंत्ययात्रेस राष्ट्रपती श्री. वेंकटरामन उपस्थित राहणार आहेत. भारतातून त्यांच्या उपस्थितीला विरोध होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. पण कडवी

प्रतिक्रिया सुरू झाली आहे ती ब्रिटनमध्ये! महायुद्धातील अतिपूर्वेच्या मोहिमेत लढलेल्या ज्येष्ठ ब्रिटिशांनी जेव्हा हिरोहितोंच्या अंत्ययात्रेस राणी एलिझबेथचे पती प्रिन्स फिलिप जाणार असल्याचे ऐकले तेव्हा त्यांच्या संतापास सीमा राहिली नाही. हॉलंडच्या राजघराण्याने सम्राट हिरोहितोंच्या निधनाचे वृत्त येताच जाहीर करून टाकले– 'हॉलंडच्या सिंहासनातर्फे हिराहितोंच्या अंत्येष्टीस कोणी उपस्थित राहावे अशी डच जनतेची इच्छा नाही.' महायुद्धातले जपानचं क्रौर्य नाझींच्या क्रौयपिक्षा कमी नव्हतं. दोस्त राष्ट्रांचे जे युद्धकैदी जपानच्या तावडीत सापडले, त्यांच्या अनन्वित छळाची हकीकत पाहता हिटलरच्या छळछावण्यांशीच त्यांची तुलना करावी लागेल. 'रासायनिक युद्ध' ही कल्पना जशी हिटलरने 'मस्टर्ड गॅस'च्या रूपाने राबवली तशी जपानने 'रोगजंतू युद्ध' ही कल्पना महायुद्धात अंमलात आणली होती. शिरो ईशी हा मायक्रोबायॉलॉजिस्ट ह्या योजनेमागे होता नि त्याच्याच मार्गदर्शनाखाली जपानी फौजेचे 'युनिट ७३१' हे दल स्थापले गेले. हिटलरचे साथीदार हेड्रिक आणि हिमलर ह्यांनी छाळछावण्यांतील यहुद्यांना फिनॉलची इंजक्शने देऊन अमानुष छळ चालविल्याचे आठवत असेलच. शिरो ईशी आणि ह्या 'युनिट -७३१' ने युद्धकैद्यांना 'गिनीपिग्ज' बनविले. टायफॉइड, टायफस, प्लेग ह्यांचे जंतू ह्या कैद्यांच्या शरीरात इंजक्शनद्वारे सोडले (प्रतिबंधक लस ह्या स्वरूपात नव्हे.) त्यांना त्या रोगाची बाधा झाल्यावर त्यांची उपासमार करून त्या युद्धकैद्यांना यमसदनी धाडले नि मरणोत्तर त्यांच्या देहातील रक्त उंदरांना पाजले. मग रोगाची बाधा झालेले उंदीर शत्रूच्या (म्हणजे दोस्त राष्ट्रांच्या) प्रदेशात सोडायचे आणि तेथे रोगराई माजवून हाहाकार होऊ द्यायचा, हा जपानचा डाव होता. पण तो बुमरँगसारखा उलटला आणि नियतीने सूड उगवावा तसे हजारो जपानी सैनिकच ह्या रोगाला बळी पडले. महायुद्धात जपानने कलकत्त्यावर बॉम्बफेक केली होती. तेथे जपान्यांचा डाव जर यशस्वी ठरला असता तर किती भारतीयांना कोठल्या कुत्र्याची मौत मरावी लागली असती हा केवळ विचारही अस्वस्थ करणारा आहे. शिरो ईशीच्या ह्या प्रयोगात सर्वाधिक बळी पडले ऑस्ट्रेलियाचे युद्धकैदी! ऑस्ट्रेलियाला त्यांचे विस्मरण होणे शक्य नाही. त्यामुळे ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान बॉब हॉक ह्यांनी सम्राट हिरोहितोंच्या अंत्येष्टीस उपस्थित राहण्याचा विचारही मनात आणला नाही.

महायुद्धात अतिपूर्वेच्या मोहिमेचे दोस्त राष्ट्रांचे प्रमुख (सुप्रीम कमांडर इन द फार ईस्ट) म्हणूत भारताचे अखेरचे व्हॉइसरॉय लॉर्ड लुई माऊंटबॅटन होते. ब्रिटनचे ५०,०१६ एवढे सैनिक जपानने कैदी बनवले होते आणि त्यांतील १२,४३३ फौजी उपासमार व रोगराई, मारहाण आणि क्रूर प्रयोग ह्यांची शिकार ठरले. ही बाब माऊंटबॅटन कधीही विसरू शकले नाहीत. जपानच्या शरणागतीनंतर जपानतर्फे पराभवाचे प्रतीक म्हणून सम्राट हिरोहितोंची रत्नजडीत तलवार जनरल डग्लस मॅकआर्थरनी स्वीकारली आणि सुप्रीम कमांडर ह्या नात्याने लॉर्ड माऊंटबॅटन ह्यांच्याकडे ती सुपूर्द केली. तेव्हा संतापाने

माऊंटबॅटननी ती तलवार काडदिशी मोडून फेकून दिली. लॉर्ड माऊंटबॅटन हे अर्ल माऊंटबॅटन ऑफ बर्मा या गौरवाचेही मानकरी होते. पण जपानबाबतचा माऊंटबॅटनचा रोष एवढा तीव्र होता की, पुढे जग बदलल्यावर १९७१ मध्ये सम्राट हिरोहितो सपत्नीक ब्रिटनला पाहुणे म्हणून आले असतानाही राणी एलिझबेथच्या कोठल्याही समारंभात माऊंटबॅटन उपस्थित राहिले नाहीत. हिरोहितोंशी हस्तांदोलन काय पण त्यांचे दर्शनही न घेण्याची जणू त्यांनी प्रतिज्ञा केली होती. हा क्रोध एवढा होता की, माऊंटबॅटननी आपल्या मृत्युपत्रात नमूद केले होते– 'माझ्या मृत्यूनंतर माझ्यावरील अंत्यसंस्कारास एकही जपानी माणूस उपस्थित राहता कामा नये.'

माऊंटबॅटनच्या पश्चात बर्मा स्टार ॲसोसिएशन (अर्ल माऊंटबॅटनच्या मोहिमेत पूर्व आघाडीवर लढलेल्या ब्रिटिश फौजींची संघटना) ह्या लष्कराचा मानबिंदू ठरलेल्या संघटनेचे प्रमुखपद माऊंटबॅटनचे भाचे व राणीचे पती म्हणून प्रिन्स फिलिप ह्यांजकडे आले. अन् आज ह्या पदाचे मुख्य असलेले प्रिन्स फिलिप हिरोहितोंच्या अंत्येष्टीस जपानला जात आहेत, ही कल्पना ह्या संघटनेतील वृद्ध सैनिकांना, अधिकाऱ्यांना कशी रुचावी! ह्या सर्व ज्येष्ठ सैनिकांनी आता ठरवले आहे की, महायुद्धातील पराक्रमाबद्दल राजे सहावे जॉर्ज (राणीचे वडील) ह्यांनी दिलेली सर्व पदके, ताराचिन्हे, मानमरातब आता एकत्रितपणे राणीसाहेबांना परत करावेत. लोकक्षोभाचा हा एक नमुना! जपानचे युद्धकालीन जनरल टोजो ह्यांनी भलेही जाहीर करून ठेवले की, सम्राट युद्धगुन्ह्यांकामी निर्दोष होते नि सर्व अपराधांचा धनी मीच होतो. पण आजही युद्धात पोळलेल्या देशांचा सम्राटांवरील रोष संपलेला नाही.

एकूणच हिरोहितो हे व्यक्तिमत्त्व सदैव रागलोभांचे धनी बनून राहिले. एकेकाळी जपानी नागरिकांच्या दृष्टीने 'देव' असलेल्या ह्या सम्राटाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची संपत्ती जाहीर न करण्याचा राष्ट्रीय प्रघात! एक बिलियन डॉलर्स एवढ्या संपत्तीचे ते मालक होते. मात्र त्यांचे 'देवत्व' संपुष्टात आल्याने आता त्यांचे पुत्र नवे सम्राट अकिहितो ह्यांना डेथ ड्यूटी भरावी लागणार आहे. असा कर भरणारे ते जपानचे पहिलेच सम्राट! मित्सुई, सुमोटोमो आदी उद्योगात हिरोहितोंचे प्रचंड भाग आहेत. बँक ऑफ जपानची ६० टक्के भागीदारी हिरोहितोंची होती. इतकेच नव्हे तर बँक ऑफ कोरिया, बँक ऑफ फोर्मोसा (तैवान) आणि साऊथ मँच्युरियन रेल्वे कंपनी ह्यात हिरोहितोंच्या ठेवी सर्वाधिक आहेत. अधिकृतपणे हिरोहितोंची संपत्ती १२०६०० डॉलर्स एवढी जाहीर झाली आहे. जपानचे राजघराणे बौद्ध धर्मीय नसून 'शिंटो' पंथीय आहे. 'शिंटो' प्रथेनुसार हिरोहितोंसाठी टोकियोमध्ये समाधिस्थळ उभारले जाईल. मृत्यूनंतर सगळ्या वैरभावनांची इतिश्री व्हावी हे व्यासांनी सांगितलं, बुद्धानी सांगितलं, ख्रिस्तानी सांगितलं... साहित्यातही आद्य नाट्यमहर्षी सॉफक्लीसनंही आपल्या 'अँटीगनी'च्या रूपातून तेचं सांगितलं. पण प्रत्यक्षात

वैरभावना प्रखर असू शकतात... प्रखर राहू शकतात. आज जे १५९ राष्ट्रांचे प्रतिनिधी हिरोहितोंच्या अंत्येष्टीस जात आहेत ते वैराची भावना नष्ट झाली म्हणून नव्हे, तर जगातलं जपानचं स्थान आज एकमेवाद्वितीय आहे म्हणून! उद्योगाच्या क्षेत्रात आज जपान सम्राट बनले आहे. मोठमोठ्या देशाची कोंडी करण्याएवढे समर्थ झाले आहे. तेव्हा त्यांच्या सम्राटाच्या अंत्येष्टीस अनुपस्थित राहून जपान्यांना दुखविण्याची हिंमत सहजी कोणा राष्ट्रात नाही. मग भले सैनिक विरोध करोत. आज जपानचा 'येन' बोलविता धनी आहे नि तो सर्वांना हिरोहितोंसाठी अश्रू ढाळायला लावीत आहे. कालाय तस्मै नमः!

२०/२/८९

❋❋❋

# ३६

※

# धक्कादायक ताकाको

**अ**खेर जपानचे पंतप्रधान सोसुके उनो ह्यांची कारकीर्द औटघटकेची ठरली. पंतप्रधान म्हणून शपथ घेतल्यावर केलेली सही वाळण्यापूर्वीच उनोंच्या मागे 'माजी' हे विशेषण लागले देखील! उनो आले काय नि गेले काय! फोटोफाईल्समध्ये सोसुके उनो हा चेहरा पुरता ओळखीचा होण्यापूर्वीच 'एक्झिट' झाली. ही करामत जपानच्या बायकांची. उनोच्या गमनास महिला कारणीभूत झाल्या. आधी एक गैशा उठली नि उनोंचा अंतःपुरीय इतिहास सांगती झाली. पत्रकारांनी तिला अज्ञातवासातून बाहेर आणले. उनोंना छेडण्याचे प्रयत्न झाले पण ते मूग गिळून बसले. तेवढ्यात जपानची सत्ताधारी लिबरल, डेमॉक्रॅटिक पार्टी आणि पर्यायाने उनोदेखील अधिकच खोलात जायला कंझ्युमर टॅक्स कारणीभूत झाला आणि जपानी महिलांच्या हाती आतापर्यंत गैशा प्रकरणाचे एकच कोलीत होते आता त्यात आणखी एका कोलिताची भर पडली. परिणामी दि. २३ जुलै १९८९ रोजी जपानी पार्लमेंटच्या वरिष्ठ सदनाच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्ष पराभूत झाला आणि सोसुके उनो ह्यांचा राजीनामा सादर झाला. जपानी मतदारात पुरुषही आहेत आणि महिलाही आहेत. पुरुषांची संख्या अधिक आहे पण लिबरल डेमॉक्रॅटिक पक्षाच्या पराभवाचे श्रेय जपानी महिलांकडे जाते. पुरुषांची अनैतिकता गृहित धरण्याची, दुर्लक्ष करण्याची आणि मुकाट सोसण्याची आवश्यकता नाहीच, किंबहुना त्याला विरोध करण्याचा तुम्हाला अधिकार आहे तसेच नागरिक म्हणून तुम्हाला आवाज आहे नि तो तुम्ही वाटेल तशा लादलेल्या करांना

पायबंद घालण्यासाठी वापरू शकता ही जाणीव जपानी महिलेला जपान सोशलिस्ट पार्टीने करून दिली. त्यातही ह्या पक्षाची अध्यक्ष मिस ताकाको दोई हिने रान उठवावं तशा महिला उठवल्या आणि जपानी पार्लमेंटचे अपर हाऊस काबीज केले.

जपानच्या राजकारणात गेली किती तरी वर्षे स्त्रियांचा लक्षणीय सहभाग दिसला नव्हता. ही उणीव ताकाको दोई भरून काढणार, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. ह्यापूर्वी मिस फुसेई इचिकावा ही एकमेव स्त्री जपानी महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी धडपडली होती. खऱ्या अर्थानं जपानी महिलेची ही कैवारी ठरली आणि जपानी महिलांच्या चळवळीचीही हीच प्रवर्तक बनली. ह्या बाईचे कार्य एवढे जबरदस्त होते की, मिस इचिकावा हे नाव तथा 'फुसेई द फ्यूरी' हे चेष्टेतले विशेषण मागे पडले आणि 'इचिकावा सॅन' हे संबोधन तिला लाभले. सॅन म्हणजे गुरू. पुरुषप्रधान संस्कृती आणि समाजात स्त्रीला काय आणि किती सोसावे लागते हे इचिकावाने बालपणापासून सर्वत्र पाहिले होते. इचिकावा काहीशी भाग्यवान ठरली म्हणजे तिला शिक्षण मिळाले आणि स्वतःच्या इच्छेनुरूप मार्ग निवडण्याचे स्वातंत्र्य देणारे आई-वडील मिळाले. जपानी स्त्री म्हणजे जगातली सर्वांत आदर्श गृहिणी... तिला आदर्श बनवून आणि आदर्श बनण्यासाठीच जगायला लावून पुरुषप्रधान समाजाने आपली सोय पाहिली होती अन् ह्या व्यवस्थेत ती स्त्री स्वतःचा विचार करण्याचे विसरून गेली होती, 'अधिकार', 'अस्मिता' हे शब्द दूरच राहिले. मुळात जपानी स्त्रीला पहिला व्यवसाय कायद्यानं खुला झाला होता तो फक्त शिक्षिकेचा. १८७४ मध्ये जपानी महिलांसाठी पहिले अध्यापिका प्रशिक्षण विद्यालय सुरू झाले होते. आणि जपानी महिलांच्या मुक्तीचे आंदोलन ही अशक्यप्राय वाटणारी गोष्ट १९११ मध्ये अस्तित्वात आली. महिला मुक्ती हा शब्द १९११ मध्ये कानी पडला तेव्हा फुसेई इचिकावा फारच लहान होती. मात्र थोडी जाण आल्यावर... विशेषतः रशियन राजक्रांतीबाबतचा अभ्यास केल्यावर फुसेईच्या मनात एक नाव घर करून बसलं. ताया झिन्स्किन. रशियन स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने सर्व हक्क व समानाधिकार मिळावेत ह्याकरिता ताया झिन्स्किनने खूप परिश्रम घेतले, लेनीनबरोबर चर्चा केली, वाद घातले, स्त्रियांबाबतचे कायदेकानू-संहिता बनविण्याकामी मदत केली. ही रशियन ताया आणि इंग्लंडच्या ख्रिस्टबेल व एमिलीन पँकहर्स्ट या मायलेकी फुसेईला प्रेरणादायी ठरल्या होत्या. नुसती प्रेरणा घेऊन फुसेई थांबली नाही. आंतरराष्ट्रीय स्त्री-विषयक कार्याचा, सामाजिक चळवळींचा कसून अभ्यास ह्या बाईने केला, स्त्रियांच्या साक्षरतेसाठी झटली, जपानी कायदा व संहितेतील त्रुटी अभ्यासल्या नि ह्याबाबतचे संपूर्ण ज्ञान आणि आवश्यक बाबींचे आराखडे शस्त्रांसारखे परजीत बाई लढायला उतरली. १९४५ मध्ये हिरोशिमा व नागासाकी ह्या शहरांचा अणुबाँबने विध्वंस केल्यावर, जपानकडून शरणागती स्वीकारल्यावर अमेरिकन संरक्षण दलाने जपानमध्ये सहा वर्षे तळ ठोकला होता. ह्या काळात जपानची

संपूर्ण प्रशासकीय जबाबदारी तसेच नव्या जपानच्या उभारणीचे उत्तरदायित्त्व जनरल डग्लस मॅक्‌आर्थर ह्यांच्याकडे होते. जनरल मॅक्‌आर्थरने जपानमध्ये लोकशाही आणण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करताच फुसेई इचिकावा जनरलच्या भेटीला गेली. जपानी स्त्रीची सविस्तर परिस्थिती त्यांच्यापुढे ठेवली, तिच्यासाठी आवश्यक वाटणाऱ्या योजना त्यांच्यासमोर मांडल्या आणि ताया झिन्स्किनच्या पद्धतीने मॅक्‌आर्थरशी बाईने तपशीलवार चर्चा केली आणि जपानी महिलेला अधिकार मिळवून दिले व स्वतःला 'फुसेई द फ्युरी' हे विशेषण जपानी पुरुषांकडून घेतले.

इचिकावा सॅनपासून प्रेरणा घेणाऱ्या मिस ताकाको दोई ह्यांचे नाव आज गाजत आहे. समाजकारणाच्या सीमा ओलांडून जपानी स्त्री राजकारणाच्या आखाड्यात उतरली आहे नि ताकाको दोई पुढेमागे जपानची मार्गरेट थॅचर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गेल्या चाळीस वर्षांत जपान सोशलिस्ट पार्टीला निवडणूक जिंकणे शक्य झाले नव्हते. ते कठिण काम ताकाको दोईने एकाकीपणे तडीस नेले. हा निवडणूक प्रचार फक्त १८ दिवसांचा होता. पार्लमेंटच्या अपर हाऊसच्या या निवडणुकीसाठी दोईने दोन गोष्टींवर प्रचारात भर दिला. पहिली गोष्ट म्हणजे सत्ताधारी लिबरल डेमॉक्रॅटिक पक्षाने लादलेला तीन टक्के कंझम्पशन टॅक्स आणि पंतप्रधान सोसुके उनो यांनी अनीतिपायी गमावलेली विश्वासार्हता. ताकाको दोई साठ वर्षांची आहे. ह्यापूर्वी तिने विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केले आहे. त्यामुळे भाषणबाजी, वादविवाद तिला भयभीत करूच शकत नाहीत.

ताकाको दोई तीन वर्षांपूर्वी सोशलिस्ट पक्षाची अध्यक्ष बनली. अन् तिच्या कार्याचा, कष्टाचा आवाका पाहून हे पद ग्रहण केल्यापासून सहा महिन्यांच्या अवधीत ह्या पक्षाची प्रतिमा उजळ होऊ लागली. ताकाकोने धमाल खेळी खेळली. १९८७ च्या स्थानिक संस्थांच्या निवडणुकीत तिने गृहिणी- तद्दन गृहिणी हाताशी धरल्या नि त्यांना उभे केले. मतदानाचा अधिकार असलेल्या सर्व महिलांमध्ये तुफान प्रचार केला. 'तुमच्यासारख्या गृहिणी उभ्या आहेत, तुमच्यासारख्याच कष्टाळू आणि प्रामाणिक गृहिणींना निवडून द्या' या प्रचाराचा परिणाम एवढा जबर होता की, १७७ गृहिणी चक्क निवडून आल्या आणि तेव्हाचे जपानचे पंतप्रधान यासुहिरो नाकासोने हादरलेच. मग ताकाकोवर आरोप होऊ लागले- 'ताकाकोने सोशलिस्ट पार्टी बायकी बनवली,' 'मिस दोईमुळे सोशलिस्ट पार्टी म्हणजे स्त्रीराज्य बनले.' ह्या टीकेला ताकाकोने झकास उत्तर दिले– 'स्त्रियांच्या राजकारणातील वाढत्या सहभागाला जपानची पुरुषी संस्कृतीच कारण आहे!' तकाकोचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे सोशलिस्ट पक्षावर 'मार्क्सिस्ट' म्हणून होत असलेली टीका बंद करण्याकामी टाकलेली पावले. त्यासाठी बाईने पक्षाची शब्दयोजना बदलायला लावली. 'ध्रुवीकरण', 'वर्गकलह', 'आहेरे-नाहीरे', 'बुझ्वा', 'क्रांती-प्रतिक्रांती -उत्क्रांती', इत्यादी खासे शब्द तकाकोने नाक मुरडून दूर केले (करीत आहे.) लोकांची भाषा बोला,

असा तिचा सातत्याने कार्यकर्त्यांना आग्रह आजही असतो. अन् गृहिणी तर लोकांची घरगुती भाषाच बोलू शकतात ना!

जपानच्या संसदेतील कनिष्ठ सदनात सोशलिस्ट पक्षाची ताकद नगण्य झालेली होती. सत्ताधारी पक्षाकडे ३०४ जागा तर सोशलिस्ट पक्षाला फक्त ८५. जपानला सोशलिस्ट पंतप्रधान १९५५ पासून मिळालेलाच नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारून त्याची प्रतिमा अत्यल्प वेळात बदलून वरिष्ठ सदनाची निवडणूक लढविण्याचा विक्रम ताकाकोने करून दाखविला आहे. तकाको दोई मूळची कोबे शहरातील आहे. तेथे तिचे वडील डॉक्टर होते. क्योटोच्या ख्रिश्चन विद्यापीठात तिने कायद्याची पदवी घेतली आणि गलिच्छ झोपडपट्टीत स्वयंसेवी कार्य सुरू केले. १९६९ मध्ये ती कोबे येथून संसदेत निवडून आली. इचिकावा सॅन ही तर जपानच्या महिलांची प्रेरणाच! पण ताकाको वर अॅब्रहॅम लिंकनच्या चरित्राचा व कार्याचाही मोठा प्रभाव पडला होता. राजकारणात शिरल्यानंतर माणसाचे कलागुण मागे पडतात, असा समज आहे. नुकताच राजीनामा दिलेले उनो हे कवी आहेत नि पियानो वाजवतात तर जपानी राजकारणाच्या क्षितिजावर आपली चुणूक दाखवायला सुरुवात करणारी ताकाको दोई ही जपानी तसेच पाश्चात्त्य संगीत छान गाऊ शकते. साठ वर्षांची ही स्त्री इलेक्ट्रॉनिक वाद्यवृंदाच्या साथीवर बार्स, हॉटेलात स्वतःच्याच आनंदासाठी गायला मुळीच भेदरत नाही. जपानी राजकारणात नि समाजातही हे एक आश्चर्य बनले आहे. अन् ताकाकोची लोकप्रियता वाढतच आहे.

३१/७/८९

❄❄❄

# ३७

※

# एका गैशापायी वादळ

**ज**पानचे तीन पंतप्रधान ज्या वाटेने पदावरून गेले, तीच वाट सध्याचे पंतप्रधान सोसुके उनो ह्यांना धरावी लागेल, असे दिसू लागले आहे. १९७६ मध्ये लॉकहीड विमानांची जबरदस्त भानगड होऊन तेव्हाचे जपानचे पंतप्रधान ककुई तनाका ह्यांच्यावर ठपका आला नि त्यांना पंतप्रधानकीचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर त्या पदावर आलेले पंतप्रधान सुझुकी ह्या खुर्चीत स्थिरावण्याची लक्षणे दिसू लागली होती, पण तेवढ्यात भानगड उपटली. सुझुकींचा दशमग्रह खरोखरच जामाताच्या रूपाने उभा ठाकला. आपल्या लाडक्या जावयाला स्वतःची बिल्डिंग कन्स्ट्रक्शन कंपनी काढता यावी म्हणून सुझुकींनी एका मातब्बर उद्योगसमूहाकडून कचकचीत ५ बिलियन येन एवढी मोठी रक्कम घेतली नि ह्या रकमेने त्यांचे पंतप्रधानपद गिळून टाकले. पंतप्रधान नोबोरू ताकेशिता ह्यांना कुप्रसिद्ध 'रिक्रूट' भ्रष्टाचार प्रकरणी राजीनामा देणे भाग पडले, ही तर ताजी घटना आहे. ताकेशितांच्या आधीचे पंतप्रधान यासुहिरो नाकासोने ह्यांनी मात्र पंतप्रधानकीच्या दोन मुदती पूर्ण केल्या. नामुष्कीची वेळ त्यांच्यावर आली नाही, मात्र आता त्यांचेही नाव 'रिक्रूट' प्रकरणात बदनाम होत आहे. ताकेशितांनी अल्पावधीत राजीनामा दिल्यामुळे पंतप्रधान बनलेले सोसुके उनो हे त्यांच्याच लिबरल डेमॉक्रॅटिक पार्टीचे सदस्य आणि त्यांच्याच मंत्रिमंडळात एके काळी परराष्ट्रमंत्री होते, पण तरीही रिक्रूट, भ्रष्टाचार प्रकरणात सोसुके उनो ह्यांचे नाव कोठेच नसल्याने उनो ह्यांची कारकीर्द सरळपणे पार पडेल, अशी ह्या पक्षाला खात्री वाटत होती...

पण नाही... उनो ह्यांचा भूतकाळ ऐन वेळी बाटलीतल्या राक्षसासारखा गडगडून हसत सामोरा आला आणि उनो नको त्या भानगडीत अडकू लागले.

सोसुके उनो पंतप्रधान झाल्यावर त्यांच्याबाबतीत सुरुवातीला सारे काही छान, गोड होते. जपानला एक कविमनाचा नेता लाभला म्हणून वृत्तपत्रांतून वार्ता येऊ लागल्या. उनो म्हणजे एक परिपूर्ण व्यक्तिमत्त्व असा आभास निर्माण झाला. बऱ्याच अंशी ते खरेही होते. सोसुके उनो खरोखरच उत्तम लेखक आहेत, नामांकित कवी आहेत, चित्रकार आहेत, क्रीडापटू आहेत. आज सत्तेवर असलेल्या सर्व जागतिक नेत्यांशी सोसुके उनो ह्यांची तुलना केली तर एकाच व्यक्तीच्या ठायी एवढे गुण, एवढ्या विविध विषयांतील पारंगतता दिसणे कठीण व्हावे. उनो जपानी संगीतातील तज्ज्ञ आहेतच, पण पाश्चात्त्य अभिजात संगीताचाही त्यांचा व्यासंग दांडगा आहे. शॉपिनच्या संगीतरचना पियानोवर सादर करण्याइतकी त्यांची तयारी आहे, हार्मोनिका ते उत्कृष्ट वाजवू शकतात. जपानी मार्शल आर्टमध्ये त्यांना गती आहेच पण आजवर ज्या क्षेत्रात फक्त युरोपियन पुरुषांनी, त्यातही स्पेन आणि फ्रान्सच्या पुरुषांनी वर्चस्व गाजविले आहे, त्या खड्गयुद्धात सोसुके उनो पटाईत आहेत. ही तलवारबाजी म्हणजे 'फेन्सिंग'. ह्यात अद्याप आशियाई वीर गाजलेले नाहीत. पण सोसुके उनो ह्यांनी त्यात नाव कमावले आहे. तलवार आणि कलम अशी दुहेरी देणगी उनोंना मिळालेली आहे. रशियाचे युद्धकैदी म्हणून सोसुके उनो सैबेरियात शिक्षा भोगत होते तेव्हा त्यांनी एक कादंबरी लिहायला घेतली. थोडासा वेळ जरी मिळला तरी रक्षकांची नजर चुकवून उनो लिखाण करीत. ही कादंबरी पुढे जपानमध्ये चांगलीच लोकप्रिय ठरली. त्यावर एक चित्रपटही निघाला होता. उनोंचा प्रिय प्रांत म्हणजे काव्य. जपानी साहित्यात विक्रमी लोकप्रियता मिळवणारी एक ऐतिहासिक कादंबरी आहे. भली दांडगी, जाडजूड. तर सोसुके उनोंनी जपानी वाचकास आश्चर्याचा धक्काच दिला. सतत दहा वर्षे त्यांनी ह्या कादंबरीवर घालविली आणि ही गद्य कादंबरी पद्यात रूपांतरित केली. कित्येक जपानी साहित्यिक सोसुके उनोंचा उल्लेख 'जपानचे आंद्रे मालरो' असा करतात. चित्रकार, कवी असलेल्या उनोंना आणखी एक आगळा छंद आहे. तो म्हणजे बाहुल्या जमविण्याचा! पूर्वी ते परराष्ट्रमंत्री होते. त्यामुळे जेथे जेथे दौऱ्यावर जाण्याची संधी त्यांना मिळे तेथून ते त्या त्या देशाच्या बाहुल्या आणीत. अशा एकूण ३०,००० बाहुल्या उनोंच्या संग्रही आहेत... शिवाय खुद्द जपानच्या बाहुल्या आहेतच...

– आज सोसुके उनो ह्यांना अडचणीत आणायला एक जपानी बाहुलीच कारणीभूत झाली आहे. अर्थात ही खरीखुरी हाडामांसाची बाहुली आहे. वय वर्षे ४०. पेशाने गैशा. हिच्याच रूपाने उनो ह्यांचा भूतकाळ वाकुल्या दाखवीत उभा राहिला आहे. तीन वर्षांपूर्वी सोसुके उनो आणि नाकानिची ही गैशा ह्यांच्यात मैत्रीसंबंध प्रस्थापित झाला होता. उनोंनी ह्या सुंदरीला एकूण ३ मिलियन येन तीन वर्षांच्या अवधीत दिले होते. तीन वर्षांनंतर

उभयतातील जिव्हाळा आटला आणि उनोंना ह्या प्रकरणाचे विस्मरणही झाले. उनो काहीसे गाफीलही राहिले. कारण 'गैशा' हा प्रकारच असा आहे की, बहुधा आपल्या 'यजमान,' ग्राहकाबाबत गैशा सदैव मौन पाळतात. गैशा हा जपानी संस्कृतीमधला काहीसे कोडे वाटावा असा भाग आहे. नाकानिची रूढ गैशांपेक्षा वेगळी निघाली. 'ह्या माणसानं मला फसवलं,' 'हा जपानचा पंतप्रधान बनलाय पण मला दिलेली सगळी आश्वासने ह्याने धाब्यावर बसवली! तर हा जपानी जनतेला दिलेली आश्वासने काय पाळणार?' अशी ओरड ह्या गैशानं केली. ह्या प्रकणावरून वादळ माजलं. 'गैशानं असं यजमानाबाबत सांगायचं नसतं आणि अशा प्रकारे तोंड उघडून नाकानिचीनं गैशांच्या नीतिसंहितेचा भंग केला आहे,' असे काही प्रमुख गैशांचे मत पडले. त्याबरोबर जपानमधील महिला संघटना पुढे सरसावल्या. 'नाकानिचीनं योग्य तेच केलंय, पंतप्रधानांनी समाधानकारक उत्तर द्यावं– एका गैशाशी संबंध ठेवणारा पंतप्रधान आम्हाला चालणार नाही, साध्या गैशाला फसवणारा पंतप्रधान जपानमधील स्त्रियांचे प्रश्न कसे सोडवणार, महिलांना काय न्याय देणार,' असे प्रश्न करून विविध महिला संघटना आंदोलनास सज्ज झाल्या. दरम्यान पत्रकारांनी नाकानिचीला हुडकून काढून तिची मुलाखत घेण्याचा विक्रम केला. प्रसिद्धीमुळे नाकानिची हैराण झाली. पण उनोंच्या बाबतीत तिने आणखी काही तपशील सांगितला. उनोंनी तिला अत्यंत मौल्यवान असा मिंक कोट देण्याचे आश्वासन दिले होते, दागदागिने देण्याचीही शपथ घेतली होती. गैशाशी व्यवहार तोडताना नीतिसंहितेप्रमाणे 'यजमानाला' तिला भरपूर बिदागी द्यायची असते. त्या अटीला उनोंनी पाने पुसली. उनो आढ्यताखोर आहेत. ते स्वतःबद्दल बोलत राहात नि तिचे कान किटून जात. तीन वर्षे हिने त्यांचा कंटाळवाणा सहवास सहन केला, आदी बाबी नाकानिचीने सांगितल्या नि वर पुस्ती जोडीत म्हटले– 'हा असा माणूस जपानचा पंतप्रधान झाल्याचे समजल्यावर मी थक्क झाले व जपानी जनतेला सावध करणे हे माझे कर्तव्य आहे, असे मला वाटू लागले.'

जपानी पुरुषाची, लिबरल डेमॉक्रॅटिक पक्षातील कार्यकर्त्यांची आणि सोसुके उनो ह्यांच्या मंत्रिमंडळातील पुरुषांची ह्या प्रकरणाबाबतची प्रतिक्रिया वेगळी होती. स्वतःच्या पत्नीला फसवून एका गैशाशी व्यवहार ठेवले ह्यातील गांभीर्यापेक्षा ह्या पुरुष मंडळींना कोठली बाब अधिक विचारार्ह वाटली असावी? – 'बाई ठेवल्याचं कसलं आलंय विशेष? पण तिचं तोंड गप्प ठेवणं जमू नये?' साधारण प्रतिक्रियेचा सूर हा असा होता. नाही तरी जपानी भाषेत एक म्हण आहेच – 'कंजूष पुरुषाने अंगवस्त्र बाळगण्याच्या फंदात पडू नये.' महिला संघटनांच्या मते उनोंनी स्वतःच्या पत्नीला तर बेमालूम फसविले पण ह्या गैशाला आश्वासन देऊन फसविले. तर त्यांचा विश्वास धरावा कसा?

स्त्रीपायी वादळ उठणं काही नवं नव्हे. ग्रीसचे माजी पंतप्रधान आंद्रीयास पापांद्रो ह्यांचा ह्याबाबतचा अनुभव सर्वांत ताजा आहे. दिमित्रा लियानी ह्या आपल्यापेक्षा अर्ध्या

वयाच्या सुंदरीशी प्रेमप्रकरण केल्याने त्यांना निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. आता पत्नी मार्गरिट हिला घटस्फोट देऊन पापांद्रोंनी परवाच दिमित्राशी रीतसर विवाह केला नि भानगड निस्तरण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले हे खरे असले तरी पापांद्रोंच्या राजकीय प्रतिष्ठेला तडा गेला हे नाकारता येणार नाही. उनो सध्या असेच अडकित्त्यात सापडले आहेत.

गैशा ह्या शब्दाचा त्यातल्या त्यात योग्य अर्थ सांगायचा तर 'गणिका' हा प्रतिशब्द जवळपास यावा. गैशा म्हणजे वारांगना नव्हे. नगरवधू, गणिका ह्या शब्दांना थोडी प्रतिष्ठा आहे. गैशाला त्याहून अधिक प्रतिष्ठा आहे. जपानी परंपरा, संस्कृती ह्यांचे अधिक जतन गैशांनी केले आहे. नृत्य, गायन, संभाषण ह्यात कमालीचे चातुर्य संपादिलेल्या ह्या ललनांचा इतिहास १७ व्या शतकात पोचतो. काही इतिहासकारांच्या मते बौद्ध धर्म जेव्हा भारतातून जपानला पोचला तेव्हा 'वैशाली' ह्या हिंदुस्थानातल्या पहिल्या 'रिपब्लिक' राज्यामधील 'नगरवधू' हा संकेतही जपानमध्ये निर्यात झाला. सतराव्या शतकातील गैशांच्या उल्लेखात मनोरंजन करणाऱ्या ह्या ललनांच्या बरोबरीने पुरुष गैशाही आढळतात. स्त्रियांना 'ओना' हे नाव होते तर पुरुषांना 'होकन' ही संज्ञा होती. मनोरंजन करून घेण्याचा अधिकार मात्र फक्त पुरुषांना असे आणि जपानच्या लष्करातील हुद्देदार, उमराव, सरदार, दरकदार 'हेचि पुरुष भाग्याचे' असत कारण गैशा हे ऐऱ्यागैऱ्याला परवडणारे प्रकरण नव्हतेच. हळूहळू ह्यातील पुरुष कलावंतांचे उच्चाटन होऊन गैशा केवळ स्त्रियाच राहिल्या. विशेष म्हणजे नृत्य-गान, चित्रकला, वादनादी कलेत प्रावीण्य मिळविण्याचा दाखला आणि गैशा बनण्याचा परवाना त्यांच्यापाशी असे. १९व्या शतकात तर जपानमधील साहित्य, चित्रकला, संगीत ह्यांच्या उत्थानात गैशांचा सहभाग मोठाच होता. एक तर ही कलानिर्मिती एखाद्या गैशाच्या प्रेरणेने होई अगर कित्येक गैशा कवनेही करीत. १९२० मध्ये गैशांची संख्या ८०,००० होती. आज ती १५,००० एवढी आहे. दुसऱ्या महायुद्धात गैशाकडे जाण्याचा अधिकार क़ायद्याने फक्त सैन्यातील अधिकाऱ्यांना देण्यात आला. त्यामुळे अनेक गैशा निर्वाहासाठी अन्य मार्ग धरू लागल्या. म्हणूनच ही संख्या रोडावली. महायुद्धानंतर ६ वर्षे जपानमध्ये अमेरिकन लष्कर तळ देऊन होते. अमेरिकन सैनिक आणि गैशा ह्यांच्यात प्रेमसंबंध सुरू होणे साहजिकच होते नि त्याचा परिपाक म्हणजे कित्येक गैशांनी ह्या अमेरिकनांशी विवाह करून जपान सोडले. गैशांच्या नीतिसंहितेत विवाह नसतो पण ही संहिता काळाच्या बदलात मोडीत निघणे क्रमप्राप्त होते. गैशा व अमेरिकन लष्करी शिपाईगडी ह्यांच्यातील प्रेमावर आधारित 'सायोनारा' हा चित्रपट आठवत असेल.

गैशांच्या जगतात एक परंपरा मात्र आजही पाळली जाते. गैशाचा मेहनताना आजही 'काड्यां'मध्ये मोजला जातो. ह्या काड्या म्हणजे कांड्या – धुपाच्या कांड्या. ह्या धुपाच्या कांड्या आपल्या भारतातून जपानला जातात. एका तासात साधारण चार कांड्या

संपतात. तर गैशाचा हिशेब ह्या कांड्यांमध्ये केला जातो. तिने मनोरंजनास सुरुवात केल्यापासून किती कांड्या जळल्या ह्यावर मोजमाप केले जाते नि ४-८ कांड्यांमध्ये हजारो येनची बिदागी घेतली जाते. जपानी गैशांच्या उत्पन्नावर आयकर आकारला जातो. ह्या उत्पन्नाखेरीज बक्षीस म्हणून गैशावर यजमान हात सैल ठेवून खर्च करतो. त्यामागे तिने आपले नाव गुप्त राखावे, हाच उद्देश असतो. गैशांची अलिशान निवासस्थाने हे राजकीय डावपेचांचे अड्डे बनणे नवे नाही. सोसुके उनोंनी नाकानिचीला बिदागी देताना हात आखडता घेतला म्हणून त्यांच्या भूतकाळातील तीन वर्षे आज प्रश्नचिन्ह होऊन बसली आहेत. प्रत्यक्षात इतिहास पाहू जाता सत्तारूढ लिबरल डेमॉक्रॅटिक पार्टीचा संस्थापक बुकिची मिकी ह्याच्याविरुद्ध त्याने सात गैशा ठेवल्या म्हणून खूप गदारोळ माजला होता नि मिकीने शांतपणे उभे राहून मोठ्या गर्वाने उत्तर दिले होते – 'खरंय! मी सात गैशा बाळगल्यात, पण त्या सर्वजणींची मी उत्तम काळजी घेतोय.' तेव्हा प्रस्तुत उनोच्या गैशा प्रकरणातून काय निष्पन्न निघेल ते सांगता येत नाही. कदाचित नामशेष होऊ घातलेली 'गैशा संस्कृती' नव्याने ऊर्जितावस्थेसही आणण्याची कामगिरी सत्तारूढ पक्ष करील. कारण राजकारणात गैशांचा भाग मोठा आहे.

ऑगस्ट, ८९

❋❋❋

# ३८

※

# राष्ट्रपित्याची कन्या

सख्ख्या शेजाऱ्यानं काहीतरी मोठा उत्पात करावा नि त्याची चाहूलही लागू नये, तसे काहीसे ब्रह्मदेशाबाबत घडत गेले आहे. देशाभोवती पंचवीस वर्षे कुंपण घालून घेणारे हुकुमशहा ह्या राष्ट्राच्या नशिबी आले आणि त्यानंतर १९८८ मध्ये अनपेक्षित रीत्या ब्रह्मदेश हेडलाईनचा विषय बनला. पुढील अनेक महिने तेथील दणादणीमुळे गाजत राहिला. विदेशी पत्रकारांना ब्रह्मदेशात प्रवेशास बंदी घालण्यात आल्यानेच ब्रह्मदेशमधील बातम्यांचा ओघ थंडावला. मात्र तेथे घटना घडतच राहिल्या नि पत्रकारही शेजारच्या थायलंडमधून 'बँकॉक' डेटलाईनवर वृत्त देत राहिले. ह्याच बँकॉकवरून काही महिन्यांपूर्वी एक वार्ता आली होती. 'ब्रह्मदेशाचे नाव बदलल्याची' ब्रह्मदेशातील सत्ताधारी जनरल सॉ मॉंग ह्यांच्या कंपूने 'ब्रह्मदेश' तथा 'बर्मा' हे प्राचीन नाव बदलून 'मायन्मार' हे नाव देशाला दिले तर 'रंगून' हे राजधानीचे नाव बदलून 'यँगोन' हे नामकरण केले. मायन्मार आणि यँगोन ही नावे अजून जागतिक पातळीवर रूढ झालेली नाहीत. नावे बदलून देश बदलता येत नसतो. रंगूनच्या नव्या बारशात 'इरावती' नदीचे नाव बदलले नाही, हे सुदैव म्हणायचे! गेल्या वर्षभरात इरावतीतून भरपूर पाणी वाहून गेलंय आणि ह्या वाहत्या पाण्याबरोबर आलेल्या वार्ता अस्वस्थ करणाऱ्या आहेत.

अगदी अलीकडची वार्ता म्हणजे ब्रह्मदेशच्या लष्करी सरकारने विभागीय पातळीवर लष्करी न्यायालये स्थापून सैन्यातील कनिष्ठ अधिकाऱ्यांना दिलेल्या लष्करी

अधिकारांची व्याप्ती वाढविली आहे. ह्या कनिष्ठ कमांडरना कोर्ट मार्शल भरवून अपराध्यांना शासन करण्याची मंजुरी दिली आहे. अपराध कसले? तर लष्करी कायद्याचा भंग केल्याचे! हा अपराध कोणावरही, कसाही शाबीत केला जाऊ शकतो नि कोर्ट मार्शलपुढे सामान्य नागरिक स्वतःचा बचाव तो काय करणार! ह्या कनिष्ठ अधिकाऱ्यांना कोर्ट मार्शलबावत एवढे हक्क दिलेत की, तीन वर्षांच्या श्रमछावणीतील वास्तव्यापासून देहान्तापर्यंत काहीही शिक्षा ते स्थानिक लष्करी कोर्टात फर्मावू शकतात. त्यापुढे ना उच्च न्यायालय... ना सर्वोच्च न्यायालय... ना राष्ट्रप्रमुख जनरल मॉंगकडे दयेचा अर्ज! रंगूनमध्ये ही न्यायालये भरायला सुरुवातही झाली आहे. हे आदेश आणि लष्कराची ही वाढती व्याप्ती ह्या भीषण घटना आहेत. पण त्याचबरोबर आणखी एक अस्वस्थ करणारी वार्ता म्हणजे आँग सॅन स्यू ची हिचे उपोषण. ४४ वर्षांच्या ह्या स्त्रीने लोकशाहीच्या पुनःस्थापनेसाठी उपोषण सुरू केले आहे नि दिवसेंदिवस ती क्षीण होत आहे. वास्तविक उपोषणादी प्रकार... जे अहिंसक आहेत... ते अशा लष्करशाहीत व्यवहार्य नसतात. कारण जेथे बंदुकीच्या गोळीवरच, दहशतीचा आधार घेऊन सत्ता गाजवली जाते, तेथे सत्याग्रह आणि उपोषणे पाल्यापाचोळ्यासारखी धिक्कारली जात असतात.

आँग सॅन स्यू ची हिची गाथा १९८८ मध्ये सुरू झाली. ही ४४ वर्षांची स्त्री कोण? ब्रह्मदेशचा राष्ट्रपिता हा सन्मान यथार्थपणे ज्याला शोभून दिसावा, ज्याने ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य मिळवून दिले त्या रणशूर वीराची जनरल आँग सॅन ह्यांची ही कन्या. इ. स. १८६६ ते १९३७ पर्यंत ब्रह्मदेश भारताचे उपांग म्हणून ब्रिटिशांचा अंमल तेथे राहिला आणि दुसऱ्या महायुद्धात जपानने पाहता पाहता ब्रह्मदेशवर कब्जा केला. ब्रह्मी जनतेला ब्रिटिशांचे जोखड नको होते. पण ब्रिटिश पत्करतील, मात्र हे जपानी नकोत, असे म्हणण्याची वेळ त्यांच्यावर आली. इतके जपानी सत्ताधीश निरंकुश आणि माजलेले निघाले. जपान्यांचा अन्याय हटविण्यासाठी जनरल आँग सॅनने 'ॲण्टी फॅसिस्ट पीपल्स फ्रीडम लीग' स्थापली आणि ब्रह्मी जनतेचा लढा उभारला. १९४५ मध्ये युद्ध संपल्यावर ह्याच जनरल आँग सॅनने ब्रह्मदेशात लोकशाहीची स्थापना करण्याच्या दृष्टीने पावले टाकायला आरंभ केला. पण विपरीत घडले. विरोधकांनी जनरल आँग सॅनची १९४७ मध्ये ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याची प्रक्रिया पूर्ण होत आली असतानाच निर्घृण हत्या केली. तेव्हा ब्रह्मदेशच्या नेतृत्वाची धुरा ऊ नू ह्यांजकडे आली. ४ जानेवारी १९४८ रोजी ब्रह्मदेश स्वतंत्र झाला आणि ऊ नू पंतप्रधान बनले. ऊ नू ह्यांच्या सत्ताकाळात १९५८ मध्ये ब्रह्मदेशात सर्वत्र दंगे माजले असताना खुद्द ऊ नूंनीच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जनरल ने विन ह्या लष्करप्रमुखास निमंत्रण दिले आणि जणू अस्तनीत साप आणला. १९६२ मध्ये ह्याच जनरल ने विनने ऊ नूंचे लोकशाही सरकार बरखास्त करून ब्रह्मदेशात लष्करी अंमल आणला... तो आजतागायत चालू आहे.

वडिलांची हत्या झाली तेव्हा स्यू ची केवळ दोन वर्षांची होती. हुद्द्याने जनरल असूनही लोकतंत्र हीच राज्यकारभाराची उत्तम पद्धती असा विश्वास बाळगणाऱ्या शिपायाची ही कन्या. तिची आई मादाम डॉ खिन की हीं एक विद्वान स्त्री होती. पतीच्या हत्येनंतर ही विधवा आपली दोन मुले वाढवीत सरकारनियुक्त कार्य सांभाळीत राहिली. जनरल आँग सॅन जेव्हा स्वातंत्र्याचा लढा उभारीत होते तेव्हा त्यांच्या पत्नीने प्रशासकीय कामात त्यांना जबरदस्त मदत केली होती. पक्षाची बैठक चालू असताना मादाम डॉ खिन की हिला घरून फोन आला की, तिचा ९ वर्षे वयाचा मुलगा बुडून मरण पावला. बाई किंचित हादरली. पण दुसऱ्याच क्षणी बैठकीचे कामकाज तिने सुरू केले, ते पूर्ण केले नि मगच घरी गेली. भावनांचे बांध तोवर घट्ट ठेवणारी आई नि आँग सॅनसारखा पिता लाभलेली स्यू ची कणखर असलीच पाहिजे. स्यू चीच्या आईच्या विद्वत्तेचा उपयोग ऊ नूंनी योग्य तऱ्हेने करून घेतला. १९६० मध्ये ऊ नूंनी तिची भारतात राजदूत म्हणून नेमणूक केली आणि मादाम डॉ खिन की आपल्या दोन मुलांसह दिल्लीस आल्या. स्यू ची तेव्हा १५ वर्षांची होती नि अल्पकाळ दिल्लीत शिकत होती. भारतातूनच ती पुढे ऑक्सफर्डला गेली व तेथेच राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान व अर्थशास्त्रात तिने पदवी मिळवली. १९६९ मध्ये स्यू ची न्यूयॉर्कला गेली नि संयुक्त राष्ट्रांच्या प्रशासकीय तथा अर्थशास्त्रीय सल्लागार समितीवर १९७२ पर्यंत काम करू लागली. तेथेच तिची ओळख मायकल एरीस ह्या बुद्धिमंताशी झाली. डॉ. एरीस हे तिबेटॉलॉजिस्ट आहेत. आँग सॅन स्यू ची आणि मायकल एरीस विवाहबद्ध झाले नि मायकलबरोबर स्यू ची भूतान येथे गेली. भूतानच्या शाही कुटुंबास शिकवण्याची जबाबदारी डॉ. एरीसने स्वीकारली होती. स्वस्थ बसणे स्यू चीच्या स्वभावातच नसल्याने भूतानमध्ये ही भूतानी भाषा शिकून संयुक्त राष्ट्रांच्या संशोधन विभागात भूतानी विभाग सांभाळू लागली. जपानी भाषा आत्मसात करून स्यू ची जपानच्या क्योटो विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणूनही काम करीत होती. १९७४ मध्ये हे दांपत्य ब्रिटनला परतले. जनरल आँग सॅनची ही कन्या खरे तर ह्या घटकेला ब्रह्मदेशाशी असलेले नाते तोडू शकत होती पण मायभूमीशी बांधलेले रज्जू भलतेच मजबूत निघाले.

दि. ८ ऑगस्ट १९८८ – ब्रह्मदेशाच्या ४१ वर्षांच्या स्वातंत्र्याच्या काळात एवढा हिंसक दिवस प्रथमच आला. हिंसा त्या दिवसापासून अधिकच चेकाळली. शिरच्छेद काय नि खूनखराबा काय... लष्करशाहीने केलेली नागरिकांची कत्तल भयानक होती. ही कत्तल चीनमधील अलीकडच्या हत्याकांडाशी बरोबरी करू शकेल. ब्रह्मदेशमधील गेल्या वर्षीचा रक्तपात आणि नरमेध अविश्वसनीय होता. आईच्या शुश्रूषेसाठी स्यू की इंग्लंडहून रंगूनला येऊन ठेपली आणि काय होत आहे, हे कळण्यापूर्वी राजकारणात ओढली गेली.

दिनांक २७ डिसेंबर १९८८ रोजी स्यू चीच्या मातेचे – मादाम आँग सॅनचे निधन झाले. दि. २ जानेवारी १९८९ रोजी तिच्यावर अंत्यसंस्कार झाले. ह्या ६-७ दिवसांत

•

रंगून विद्यापीठाजवळील जुन्या सरोवराकाठच्या तिच्या निवासस्थानी ब्रह्मी जनतेची अक्षरशः रीघ लागली. राष्ट्रपित्याच्या विधवेला श्रद्धांजली वाहण्यासाठी हजारो नागरिक येत राहिले. अन् ह्या जनतेने आपली निष्ठा राष्ट्रपित्याच्या कन्येला बहाल केली. लष्करशाहीविरुद्धचा आपला लढा आता ऑंग सॅनच्या कन्येने सांभाळावा, नेतृत्व द्यावे असा आग्रह जनतेने केला, आणि एकेकाळी ज्या जनरलने लोकशाहीसाठी प्राण गमावले त्या जनरलची ही उच्चविद्याविभूषित कन्या लोकनायिका बनली. अलेक्झँडर आणि किम ह्या दोन मुलांना आणि पतीला ब्रिटनमध्येच सुरक्षिततेसाठी तिने ठेवले नि स्वतः पीडित ब्रह्मी जनतेसाठी उभी राहिली. 'लीग फॉर डेमॉक्रसी' ची स्थापना करून स्यू ची झुंजू लागली. स्यू ची व ब्रह्मी जनतेने ८ ऑगस्ट १९८९ रोजी ब्रह्मी उठावाचा पहिला वर्धापनदिन पाळण्याचे ठरविताच दि. २० जुलैपासून स्यू चीच्या घराभोवती सशस्त्र सैनिक बसविले आहेत. रंगूनमध्ये १०,००० सैनिकांची अतिरिक्त तैनात केली आहे. नजरकैद सुरू होताच स्यू चीने उपोषणाचा मार्ग अवलंबिला आहे. ब्रह्मदेशच्या लष्करशाहीने केवळ वर्षभरात ६,००० नागरिक ठार केल्याचा अंदाज आहे. त्या ६,००० बळींचे प्राण लोकशाहीसाठी गेले नि आता राष्ट्रपित्याची मुलगी आपले प्राण पणाला लावून उपवास करीत आहे. ब्रह्मी जनतेचे लोकशाहीचे स्वप्न पुरे करण्याचे एकमेव आशास्थान आज ही ऑंग सॅन स्यू ची आहे.

१४/८/८९

❊❊❊

# ३९

※

# न्यायाच्या प्रतीक्षेत

निवडणूक पार पडली की, विजेत्या पक्षाच्या हाती देशाची सत्तासूत्रे येऊन जनतेचा कौल प्रमाण मानला जातोच असे नाही, हे नवे तंत्र भारताच्या पूर्वेच्या बगलेतला शेजारी ब्रह्मदेश... चुकलंच... मायनमार रिपब्लिक ह्याने अतिशय खेदजनक परिस्थितीत दाखवून दिले आहे.मायनमारचे भवितव्य एखाद्या लंबकाप्रमाणे दोलायमान राहिले आहे. एका टोकाला जनरल ने विनची कठपुतळी असलेला जनरल सॉ माँग आणि दुसऱ्या टोकाला जनतेने जिला विश्वसनीय मानून निवडून दिले ती आँग सॅन स्यू की (बर्मीज भाषेत आँग सॅन शो ची)ही ४४ वर्षे वयाची कर्तबगार आणि देखणी स्त्री आहे. सॉ माँग म्हणजे पर्यायाने ने विनच्या हाती सत्ता आहे आणि २७ मे १९९० रोजी मायनमारमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ही ने विनची लष्करी सत्ता सपशेल हरली आहे. मात्र विरोधाभास असा की, दोन तृतीयांशाहून अधिक बहुमताने विजयी झालेली आँग सॅन स्यू की सत्तांतराची न्याय्य मागणी करीत नजरकैदेत खितपत आहे. ने विन सत्ता सोडायला तयार नाही आणि ब्रह्मी जनता बिचारी सत्तांतर व लोकशाहीच्या पुनःस्थापनेची प्रतीक्षा करीत आहे... सारेच अनिश्चित! जनरल सॉ माँगच्या मुखातून ने विन जनतेला जरब बसवीत आहे – 'आंदोलन छेडून १९८८ सालच्या उठावाची पुनरावृत्ती कराल, तर गय केली जाणार नाही.' 'मायनमारची घटना बदलण्याचे क्लिष्ट व दीर्घकालीन काम चालू आहे, तोवर सत्तांतर होणार नाही,' असेही सॉ माँग विजेत्या नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी ह्या स्यू की च्या

पक्षातील मंडळींना सांगत आहे.

– आज मायनमारची परिस्थिती अशी आहे की, जनरल सॉ मॉंग ह्या लष्करप्रमुखाच्या नावाने द्वाही फिरली असली तरी खरा बोलविता धनी जनरल ने विनच आहे आणि हा सध्या अनेक संख्याशास्त्री व ज्योतिष्यांशी सल्लामसलत करण्यात गढला आहे. ने विनने १९६२ मध्ये मायनमारची सत्ता बळकावली आणि एका प्रगतिशील, सुफलाम् देशाचे साफ 'तुसड्या' देशात रूपांतर करून टाकले नि देशाचा खजिना पार धुऊन काढला. जनतेवर अनन्वित अत्याचार केले व जगाला तेथील घटनांचा सुगावाही लागू दिला नाही. सध्या मायनमारचे अर्थकारण थोडक्यात वर्णन करायचे असेल तर जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा, प्रत्येक वस्तूवर निर्बंध आणि पराकोटीला पोचलेला काळाबाजार असेच करावे लागेल. लष्कराला हे सर्व फायदेशीर ठरत आहे. त्यामुळे ऑंग सॅन स्यू की हिने मुक्त औद्योगिक धोरण व मायनमारच्या अर्थकारणाला संजीवन देण्यासाठी परदेशांना गुंतवणूक करण्याकरिता निमंत्रित करावयाची आर्थिक योजना तसेच दक्षिण कोरियाच्या धर्तीवर आर्थिक सुधारणा करण्याचे जाहीर करताच लष्करशहा अधिक संतापणे अपेक्षितच होते. त्यामुळे निवडणुकीच्या वेळी ऑंग सॅन स्यू की ची चित्रे लावून त्याखाली 'परदेशी हस्तक', 'देशद्रोही' अशी विशेषणे लिहून चारित्र्यहननाचा मार्गदेखील लष्करी राजवटीने चोखाळला पण सर्वांवर मात करून स्यू की निवडून आली नि तिच्या नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसीने संसदेतील ४८५ जागांपैकी ३९६ जागा जिंकण्याचा पराक्रम केला. स्यू की चा विक्रम असा की, ती स्वतः २० जुलै १९८९ पासून आपल्याच घरात नजरकैदेत आहे आणि तिचे निष्ठावंत सहकारी व तिच्या पक्षाचे अध्यक्ष निवृत्त जनरल तिन ऊ हे तीन वर्षांची सक्तमजुरी भोगत आहेत. ह्या पक्षाचे उच्च स्तरीय २०० कार्यकर्तेही जनरल सॉ मॉंगने बिनदिक्कत गजाआड केलेले आहेत.

इ. स. १९६२ ते १९९० ह्या २८ वर्षांत लष्करी राजवटीने मायनमारमध्ये जणू विक्रम प्रस्थापित केला आहे. – हा विक्रम आहे चलन फुगवट्याचा. २६ टक्के फुगवटा ने विन – सॉ मॉंग जोडीने गाठला. सुपीक आणि धनधान्याने समृद्ध असलेल्या ह्या देशात आज तांदळाच्या दाण्याचीही टंचाई झाली आहे. १९८२ मध्ये जागतिक बँकेने मायनमारला आर्थिक गोंधळाबाबत इशारा दिला होता, पण जनरल ने विनने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. खरे तर ह्या देशात वर्षाकाठी १ कोटी ९० लक्ष टन तांदूळ पिकतो आणि उत्तर मायनमारमध्ये भरपूर खनिज तेल साठा आहे. त्यातून दिवसाकाठी ३२,००० पिंपे तेल काढले जाते. ह्या जमेच्या बाजू लक्षात घेता ब्रह्मदेश आर्थिकदृष्ट्या आशियाई राष्ट्रांत सुदृढ ठरावा पण चुकीच्या धोरणाने भलतेच घडले. देशातील छोट्या-मोठ्या उद्योगांचेही राष्ट्रीयीकरण केल्याने २८ वर्षांत आर्थिक गाडा दलदलीत फसत गेला. घूसखोरांची समस्या तर ह्या देशाला स्वातंत्र्यापासून म्हणजे १९४८ पासूनच संत्रस्त करीत आहे. आग्नेय

आशियाचा कुप्रसिद्ध गोल्डन ट्रँगल ह्या देशाच्या सीमेवर आहे. चीन, लाओस आणि थायलंड ह्यांच्या सरहद्दीवर ह्या गोल्डन ट्रँगलमधून चीनच्या मदतीवर पोसलेले ब्रह्मदेशी कम्युनिस्ट गनीम, शान युनायटेड आर्मीसारख्या सशस्त्र संघटना आणि जुन्या कोमिंटांगच्या पाचव्या आणि आठव्या लष्करातील उरले सुरले सैनिक ह्या भागातून सातत्याने मायनमारमध्ये अफू आणि मादक पदार्थांची, शस्त्रांची वाहतूक करतात. त्यामुळे मायनमारच्या लष्कराच्या पाच डिव्हिजन्स संपूर्ण वर्षभर केवळ ह्या एका सीमेवर ताजीम देत ठेवाव्या लागतात. दुर्दैवाने लष्करशहांचे ह्या तस्करांशी जवळचे लागेबांधे आहेत. सर्वांचा परिपाक होऊन १९८८ मध्ये जनतेचा प्रक्षोभ कळसाला पोचून लोक रस्त्यावर आले तेव्हा काही लष्करी अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन 'स्टेट लॉ अँड ऑर्डर रेस्टोरेशन कौन्सिल' स्थापले आणि चक्क जगाच्या डोळ्यात धूळफेक करणारी एक लुटूपुटूची क्रांती केली नि जनरल ने विन सत्ताभ्रष्ट झाल्याचे नाटक केले. जनरल सॉ माँग ह्याच्या हाती सत्तासूत्रे दिली गेली. प्रत्यक्षात मात्र सॉ माँग हा केवळ नामधारी आहे आणि आजही पडद्यामागून ने विनच सूत्रे हलवीत आहे.

आँग सॅन स्यू की ही मायनमारच्या स्वातंत्र्याचे शिल्पकार जनरल आँग सॅन ह्यांची कन्या. १९४८ मध्ये भर संसदेत जनरल आँग सॅन ह्यांचा त्यांच्या सहा सहकाऱ्यांसह निर्घृण खून करण्यात आला. स्यू की वयाच्या १५ व्या वर्षी ब्रह्मदेशातून बाहेर पडली. वडील गेले तेव्हा ती फक्त दोन वर्षांची होती. १९६० मध्ये तेव्हाचे पंतप्रधान उ नू ह्यांनी स्यू की ची आई खिन की हिची भारतात राजदूत म्हणून नमणूक केली होती. आईबरोबर ही मुलगीही भारतात आली आणि दिल्लीतील एका शाळेत शिकू लागली; पुढे इंग्लंडला जाऊन ऑक्सफर्ड विद्यापीठाची पदवीधर झाली. मायकल एरीस ह्या संशोधकाशी विवाहबद्ध झाली. मायकल एरीस ख्यातनाम तिबेटॉलॉजिस्ट आहे. दोन मुलांची आई असलेली ही सुविद्य आणि सुसंस्कृत महिला कदाचित ब्रह्मदेशाबाहेरच कायम राहिली असती पण १९८८ मध्ये तिची वृद्ध आई आजारी पडली. आई ब्रह्मदेश सोडायला तयार नव्हती आणि तिचा आजार तर विकोपाला जात होता. अखेर १९८८ च्या एप्रिल महिन्यात इंग्लंडमधील आपले संशोधन सोडून आईच्या परिचर्येसाठी स्यू की रंगूनमध्ये (आता यँगोन) येऊन दाखल झाली. १९८८ हे वर्ष ब्रह्मदेशाच्या दृष्टीने आणि स्यू की च्या दृष्टीनेही क्रांतिकारी ठरले. ऑगस्ट महिन्यात लोकशाहीची मागणी करीत जनता रस्त्यावर आली. जनतेच्या हाती ब्रह्मदेशचा सर्वांत लाडका नेता जनरल आँग सॅनच्या चित्रांचे फलक झळकत होते. चाळीस वर्षांनंतरही आपल्या वडिलांवरील ब्रह्मी जनतेचे प्रेम अबाधित असल्याचे पाहून स्यू की थक्क झाली. रंगूनमधील इन्या सरोवराच्या काठावरील आँग सॅन ह्यांच्या वडिलोपार्जित वाड्यातच कदाचित स्यू की काही दिवस केवळ अतिथी म्हणून राहून परत इंग्लंडला गेली असती पण दैवात वेगळे लिहिले होते. ब्रह्मी जनतेने आपल्या दिवंगत लाडक्या नेत्याच्या कन्येला

मोठ्या आशेने नेतृत्वाची हाक घातली... तिला आपल्यात ओढले. तिची इच्छा आहे किंवा नाही ह्याची पर्वा न करता तिच्या खांद्यावर नेतृत्वाची धुरा दिली. लष्करशहांनी स्वातंत्र्यवादी जनतेची रंगूनच्या रस्त्यारस्त्यावर अमानुष कत्तल सुरू केली तेव्हा नाइलाजाने दि. २४ सप्टेंबर १९८८ रोजी ऑंग सॅन स्यू की ने नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी ह्या पक्षाची स्थापना केली... नेतेपद स्वीकारून ही बाई खुल्या व्यासपीठावर बोलायला आली. ने विनवर अशी खुलेआम टीका ह्यापूर्वी कधीच कोणी केली नव्हती. जगापासून तोडलेल्या ब्रह्मी जनतेला जग किती पुढे गेले आहे ह्याची कल्पना स्यू की ने दिली. गोळ्या घालण्याची धमकी देणाऱ्या सैनिकांसमोरून निर्भयपणे जाणाऱ्या स्यू की ला पाहून ब्रह्मी जनतेला तिच्यातील नेतृत्वाच्या गुणाचा नवाच साक्षात्कार झाला. स्यू की चा छळ तेथे सुरू झाला. विचारपूर्वक तिने आपली मुले आणि पती ह्यांना इंग्लंडला पाठवून दिले आणि परिणाम भोगायला ती एकटी मायदेशात राहिली. छळ वाढत जाऊन अखेर दि. २० जुलै १९८९ रोजी अधिकृतरीत्या स्यू की वर लष्करशहांनी संचारबंदीचा, भाषणबंदीचा आणि स्थानबद्धतेचा आदेश बजावला.

दि. २० जुलै १९९० ला ह्या नजरकैदेला एक वर्ष पूर्ण होईल. एका नि:शस्त्र स्त्रीवर पहारा करण्याकामी मायनमारचे ३०० सैनिक दिवसरात्र तिच्या घराभोवती खडे आहेत. तिच्या घराभोवती पिलबॉक्सेस उभारून त्यावर पोलिसही तैनात आहेत. जनतेसमोर न येता, एकही प्रचारसभा न घेता, कारावासातून ऑंग सॅन स्यू की ने निवडणूक लढविली आणि ती जिंकली देखील! तिला मुक्त करून तिच्या हाती देशाची सत्तासूत्रे सोपवावीत ही केवळ ब्रह्मी जनतेचीच नव्हे तर जगाची रास्त मागणी आहे. ने विन आणि त्याचा 'दिखाऊ मुखवटा' जनरल सॉ मॉंग ही मागणी धुडकावून न्यायाची, लोकशाहीची आणि स्वातंत्र्याची पायमल्ली करीत आहेत. ने विन तर ज्योतिषांना विचारीत आहे– 'स्यू की ची अचूक पत्रिका मांडा,' 'स्यू की ब्रह्मदेशात परतली त्या दिवसाचा ग्रहयोग पाहा,' 'आम्ही निवडणूक जाहीर केली त्या दिवसाचे पंचांग मांडा...' ने विनचा थयथयाट चालूच आहे आणि ब्रह्मदेशची नव्हे मायनमारची जनता एका विश्वासाच्या आधाराने आशावादी आहे. फिलिपिन्समध्ये कॉरझन अकीनो आल्या..., भारताने सत्तांतर केलं... श्रीलंकेनेही सत्तांतर केले... नेपाळमध्येही नवे अध्याय घडले... ब्रह्मदेशातही सत्तांतर नक्कीच घडेल. जनमताचा कौल प्रभावी ठरेल व आपला दिवंगत नायक जनरल ऑंग सॅनची कर्तबगार कन्या ह्या देशाची घडी नव्याने बसवील ह्या विश्वासाने आजही ही जनता वाट पाहात आहे...

१६/७/९०

❋❋❋

४०

# ऑलिम्पिकचा एकांडा शिलेदार

दक्षिण कोरियाच्या राजधानीत सोल येथील ऑलिम्पिकच्या शुभारंभाचा नेत्रदीपक सोहळा आपण सर्वांनीच दूरदर्शनवर पाहिला असणार. काटेकोरपणे पाळलेल्या प्रथा पाहिल्या असणार आणि ऑलिम्पिक ज्योतीचे सोलच्या स्टेडियमवर केलेले प्रज्वलनही पाहिले असणार. ह्या प्रत्येक प्रथेमागे आणि ज्योतीमागे हजारो वर्षांच्या परंपरा आहेत. ग्रीक पुराणातील देवेंद्र झ्यूस ह्यांची पत्नी म्हणजे 'हेरा'. मानवी संस्कृतीतील स्त्रीची 'हेरा' ही रक्षणकर्त्री म्हणजे जणू आपली गौरीच! संसार सफल आणि सुफल करणारी ही देवता. ऑलिंपस पर्वतावर 'हेरा'चे मंदिर आजही आहे आणि ऑलिम्पिक क्रीडा-महोत्सव ह्या 'हेरा'च्या कृपाप्रसादाने सुरू झाल्याचे म्हटले जाते. 'हेरा'च्या मंदिरात पुरुष पुजारी नसतो. सर्व स्त्रियांचा कारभार! ऑलिम्पिक ज्योत ह्याच मंदिरात प्रथम प्रज्वलित केली जाते नि त्याची अट म्हणजे त्याकरिता काडेपेटी, मेणबत्ती अगर कोठलेही आधुनिक तंत्र ह्या मंदिरात वापरता येत नाही. तसेच ती ज्योत लावण्याचं कामही स्त्रीच्या हातांनीच झाले पाहिजे. अथेन्स, स्पार्टा ही ग्रीक राज्ये म्हणजे जगातील सर्वांत प्राचीन लोकशाही देश होते. ही सर्व राज्ये 'हेरा' देवतेच्या ऑलिम्पिक उत्सवात सहभागी होत. होमर, युक्लीड, आर्किमिडीज, थुसिडायडिस, हिरोडॉटस, पेरीकल्स, सॉक्रेटीस, सॉफक्लीस, युरीपीडिस, अलेक्झांडर, सेल्युकस निकेटर यांच्या देशातील ही निरोगी आणि निकोप परंपरा ख्रिस्तपूर्व ७७६ पासून अखंड चालत आली होती. पण त्यानंतर १००० वर्षांनी रोमन सम्राटांनी

ग्रीस जिंकले आणि ह्या उत्सवात खंड पडला. रोमन सम्राटही क्रीडाप्रेमी होते. मैदानी खेळांचे चाहते होते. पण काही सम्राटांचा सन्माननीय अपवाद वगळता त्यांच्या क्रीडाप्रेमाला क्रौर्याची धार होती. क्रूर खेळामध्ये हे सम्राट परमावधीचा आनंद उपभोगीत. त्यांच्या ह्या वैशिष्ट्याची झलक पाहायची असेल तर प्रदीर्घ ऐतिहासिक संशोधनाअंती विल्यम वायलर ह्यांनी निर्मिलेला 'बेनहर' हा जुना चित्रपट आवर्जून पाहावा. एकदा ग्रीसवर परकीय अंमल सुरू झाल्यावर 'ऑलिम्पिक'ची परंपरा खंडित न होती तरच नवल!

हजाराहून अधिक वर्षे बंद पडलेला हा उत्सव अर्वाचीन रूपात सुरू करण्याचे श्रेय एका फ्रेंच सरदाराकडे जाते. त्याचं नाव पीएर द कोबर्तीन. पीएरला बालपणापासून ग्रीसच्या इतिहासाचे वेड लागले होते. ग्रीक संस्कृती, ग्रीक भाषा, ग्रीक कला व साहित्य, ग्रीक गणिती व वैज्ञानिक ह्यांच्या अभ्यासात पीएर तासन्तास रमत असे. 'जिम्नॅशियम' ह्या शब्दाचा उगम हा मुलगा शब्दकोषात पाहायला गेला आणि 'ऑलिम्पिक'च्या दिशेने वळला. त्याचा समग्र इतिहास कोळून प्याला नि मग एकच ध्यास घेऊन बसला. 'ऑलिम्पिक' उत्सवाचे पुनरुज्जीवन करायचे.' बस्स! पीएर त्या वेळी (गद्धे) पंचविशीतील तरुण होता. काळ होता १९ व्या शतकाचा म्हणजे 'ऑलिम्पिक' हा शब्द केवळ कोष व इतिहास ह्यातच सीमित राहून हजाराहून अधिक वर्षे लोटली होती. पीएरच्या कुटुंबियांनी त्याची थट्टा केली नि मित्रमंडळीही त्याचा ध्यास पाहून हबकली. पण हे वेड हटायची चिन्हे दिसेनात. द कोबर्तीन हे घराणे फ्रान्सच्या इतिहासात शूर उमरावांचे म्हणून गाजलेले. त्यातला एकूण एक पुरुष लढवय्या. तर ह्या लढाऊ घराण्यात चुकूनमाकून आल्याप्रमाणे वाटावा असा पीएर वागू लागला. लष्करी ॲकेडमीत जायच्याऐवजी तो शिक्षणतज्ज्ञ बनला. प्रत्येक नागरिकाच्या बौद्धिक आणि शारीरिक विकासाखेरीज राष्ट्राची क्षमता वाढू शकणार नाही असे अचाट विचार तो छोटेमोठे लेख लिहून प्रकट करू लागला. तो कालखंड युरोपभर अशांत ठरला होता. फ्रान्स आणि प्रशिया (जर्मनी) एकमेकांशी तणतणत होते, ऑस्ट्रिया, इंग्लंड आणि इटलीच्या मारामाऱ्या चालूच होत्या. अशा अशांत परिस्थितीत. प्राचीन ग्रीसचा ऑलिम्पिक क्रीडोत्सव किती आवश्यक आहे, ते हा एकटा पीएर संधी मिळेल तेथे सांगत सुटला नि लोक त्याला वेड्यात काढीत राहिले.

पण पीएरला लवकरच एक जोडीदार भेटला. असाच लोकांच्या दृष्टीने वेडा! अर्न्स्ट कर्टीयस ह्या जर्मन अभ्यासकाने १८७५ ते १८८१ हा काळ अक्षरश: वणवण करीत ऑलिम्पियाच्या अवशेषांना पिंजत काढला. त्याच्या संशोधनाची वार्ता कळताच पीएरला आकाश ठेंगणं झालं.

अस्वस्थ पीएरने मग आपल्याशी सहमत होणाऱ्यांना हाताशी धरून एक 'काँग्रेस' स्थापायचा उद्योग आरंभला नि पीएर व कर्टीयस ह्यांच्या ध्येयाचे रूपांतर एका चळवळीत झाले.

इ. स. १८९४ मध्ये 'इंटरनॅशनल काँग्रेस ऑफ पॅरीस'मध्ये पीएरने ऑलिम्पिकच्या पुनर्निर्माणार्थ भावनाप्रधान भाषण केले. त्यानं फ्रेंचावर काय परिणाम झाला ते माहीत नाही. परंतु ग्रीसचा प्रतिनिधी दिमित्रॉस विकीलाज आणि न्यूयॉर्कचे प्राध्यापक स्लोन हे दोघे पीएरच्या बाजूने उठले. त्यांनी ह्याच काँग्रेसमध्ये मतदान घेतले आणि आश्चर्य म्हणजे एकमताने कौल मिळाला– 'ऑलिम्पिकची प्रथा परत सुरू व्हावी.' इ. स. १९०० मध्ये पहिला ऑलिम्पिक उत्सव आखावा असे ठरले. सर्वांना गप्प करून कोबर्तीनने जाहिर केले– 'इ. स. १९०० पर्यंत वेळ काढायची गरजच काय? नि अर्वाचीन जगातला पहिला ऑलिम्पिक उत्सव कोठल्याही परिस्थितीत ऑलिम्पियामध्येच झाला पाहिजे', अर्थात ऑलिम्पिया हे तसे दुर्गम ठिकाण असल्याने त्याऐवजी 'अथेन्स'ची निवड करण्यात आली. १८९४ मध्येच १२ राष्ट्रांच्या १४ प्रतिनिधींची पहिली आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती अस्तित्वात आली.

ऑलिम्पिकची चौकट तर तयार झाली, पण राजकीय समस्यांचं सावट ह्या खेळांवर पडण्याची चिन्हे दिसू लागली. फ्रान्सचा जर्मनीच्या समावेशालाच विरोध होता. पण पीएरने चातुर्याने हे अडसर दूर केले. ऑलिम्पिकमध्ये 'हेरा'च्या मंदिरात ऑलिम्पिक ज्योत लावायची व ती उत्सवाच्या ठिकाणी न्यायची, अशी प्रथा घालून राष्ट्रा-राष्ट्रांच्या सीमा पीएरने पुसून टाकल्या. ज्योत प्रज्वलनाची प्रथा प्राचीन काळी होतीच. पण आता ही ज्योत यजमान राष्ट्राकडे नेण्याची कल्पना पीएरची! पहिला उत्सव ग्रीसमध्ये घ्यायचं ठरलं खरं; पण ग्रीक सरकारकडे पुरेसा निधी नव्हता. तर तेथे ग्रीसचे प्रिन्स कॉन्स्टंटीन धावून आले. जगभरची ग्रीक मंडळी गोवर्धनाच्या थाटावर माऊंट ऑलिम्पस उचलायला आली. जॉर्जियास एव्हरॉफ ह्या धनिक ग्रीकाने तर ९,२०,००० सुवर्ण नाणी त्याकरिता दिली. त्यातूनच आजचे पॅंथनियन स्टेडियम उभारले आहे. सर्व अडथळे पार करीत दि. ५ एप्रिल १८९६ रोजी २८५ स्पर्धकांना घेऊन नव्या जगाचे पहिले ऑलिम्पिक अथेन्समध्ये सुरू झाले. ग्रीक कवी कॉस्तीस पलमाज ह्याने रचलेले गीत ऑलिम्पिक गीत म्हणून निवडण्यात आले आणि ग्रीसचे राजे पहिले जॉर्ज (इंग्लंडच्या ड्यूक ऑफ एडिंबराचे काका) ह्यांच्या हस्ते उत्सवाचे उद्घाटन झाले.अमेरिकेच्या जेम्स कॉनोलीने ह्या उत्सवात नेत्रदीपक यश मिळविले. पण बिचाऱ्याला रौप्यपदक व ऑलीव्ह डहाळीचा किरीट ह्यावर समाधान मानावे लागले. कारण सुवर्णपदके नव्हतीच. असाच दुसरा सनसनाटी वीर होता खुद्द ग्रीसचाच स्पिरीडॉन लुई. ज्यानं धावण्याच्या शर्यतीत विक्रम केला. ग्रीक मंडळी त्याच्यावर एवढी खूष झाली की, एका ग्रीक हॉटेलने त्याला जन्मभर फुकट जेवू घालण्याची घोषणा केली, तर एका नाभिकाने त्याला आजन्म मोफत केस कापून घेण्याचे आमंत्रण दिले. पण स्पिरीडॉन लुई एक वल्लीच निघाला. आपल्या गावचे विहिरीचे पाणी काढून ते अथेन्सला आणून विकण्यासाठी फक्त एक घोडा व गाडी आपल्याला हवी आहे, एवढेच त्याने पुनः पुन्हा

सांगितले. मोफत जेवण वगैरे काही नकोच म्हणाला आणि राजे जॉर्ज ह्यांनी त्याला तशी गाडी दिली. गडी आनंदित झाला!

बॅरन पीएर दी कोबर्तीन ह्यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले खरे, पण एक नवीच समस्या उभी राहिली. भविष्यातले सर्व ऑलिम्पिक उत्सव कायम ग्रीसमध्येच भरविले जावेत, असा हेका ग्रीसने धरला. पण पीएरने अत्यंत कौशल्याने ही समस्या हाताळली. असे केल्यास विश्वबंधुत्वाची भावना शिल्लक राहणारच नाही, हे परोपरीने पटविले. त्यामुळे इ. स . १९०० चे ऑलिम्पिक फ्रान्समध्ये भरू शकले. आज ऑलिम्पिक कमिटीचे अध्यक्ष जुआ अँटोनिओ समरांच हे आहेत. ह्या पदावर १९०४ मधे पुढील दहा वर्षांसाठी पीएर दी कोबर्तीन ह्यांची निवड करण्यात आली होती. तर पहिलेवहिले अध्यक्ष होण्याचा मान मिळवला होता, तो दिमित्रॉस विकीलाज ह्यांना. ज्यांनी पीएरच्या ध्येयाला पाठिंबा दिला होता.

ऑलिम्पिक ज्योत अतिशय आगळ्या रीतीने पेटवली जाते. पूर्वी गारगोट्या, पोलाद वापरीत. आताची पद्धत यायला कारण झाले ११वे ऑलिम्पिक जे १९३६ मध्ये बर्लीनला भरले नि तेव्हाचा जर्मनीचा चान्सलर अ‍ॅडॉल्फ हिटलर! हिटलरने ह्या ज्योतीसाठी उत्कृष्ट ज्वलनपद्धत काढण्याचे आवाहन केले होते. त्याचा परिपाक म्हणजे डॉ. कार्ल डीएम ह्यांनी शोधलेली पद्धत! 'हेरा'च्या मंदिराच्या प्रांगणात माऊंट ऑलिम्पसवर शक्तिशाली बहिर्गोल भिंगात सूर्य किरण केंद्रित करायचे आणि त्याद्वारे ही ज्योत पेटवायची. १५ ग्रीक कुमारिका प्राचीन वेषात 'हेरा' मंदिरात येतात आणि मग ही ज्योत त्यांच्या साक्षीने 'हेरा'ची प्रमुख पुजारीण पेटवते. चालू उत्सवात कॅट्रीना डिडॅस्कालो हिने ही ज्योत पेटवली. तेथून ती सोल येथे आणली गेली. १९७६ मध्ये तर ह्या ज्योतीबाबत क्रांतीच घडली. सौरशक्तीवर ऑलिम्पिया येथे ज्योत उजळण्यात येताच सॅटेलाईटद्वारा मॉंट्रियल येथे सामन्यांच्या स्थळी ती पेटवण्यात आली.

आता १९९२ मध्ये २५ वा ऑलिम्पिक उत्सव स्पेनमध्ये बार्सीलोना येथे भरणार आहे. जगात युद्धे होऊ नयेत, ह्या उद्देशाने पीएर दी कोबर्तीन ह्याने ह्या उत्सवाच्या पुनरुज्जीवनाचा ध्यास घेतला होता, ह्याचा दरम्यान विसर न पडो!

१९/९/८८

❄❄❄

## ४१

※

# 'द् बॉस्टनियन'

अठराव्या शतकात हिंदुस्थानातील पहिले वर्तमानपत्र ईस्ट इंडिया कंपनीतील जेम्स हिकी ह्या इंग्रजाने कलकत्ता येथे काढले. 'हिकीज् विकली' च्या रूपाने भारतीय पत्रकारितेचा पाया घातला गेला. हिकीच्या ह्या साहसामागे अर्थातच असंतोष होता. ईस्ट इंडिया कंपनीतील आपल्या वरिष्ठांशी हिकीची भांडणे होऊ लागली, आणि ह्या वरिष्ठांचे व्यवहार जगजाहीर करावेत, बिंगे फोडावीत, वचपा काढावा ह्या उद्देशाने जेम्स हिकीने 'हिकीज् विकली' आणि नंतर 'हिकीज् बेंगॉल गॅझेट' काढले. त्यात हिकीला कैद, कर्ज आणि मनस्ताप सगळे ओढवून घ्यावे लागले. तथापि भारतीय पत्रकारितेच्या ह्या प्रपितामहाने हिंदुस्थानात लावलेल्या वृत्तपत्राचे बीज फोफावून वाढले, त्याचा वृक्ष बनला आणि आज वृत्तपत्र ही देशातील एक महाशक्ती बनले आहे हे निर्विवाद! अमेरिकेतील वृत्तपत्राचा जन्म भारताच्या शतकभर आधी झाला आणि त्याचा जन्मदाताही जेम्स हिकीप्रमाणे एक विक्षिप्त इंग्रज होता.

– आपल्याकडे छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन होऊन एक दशक लोटले होते, त्यांचे हिंदवी स्वराज्य औरंगजेबाशी टक्कर घेत होते, कुटुंबकलह माजले होते आणि दिल्लीची दखखनी मोहीम फसत होती, अशा काळात इ. स. १६९० मध्ये अमेरिकेत पहिले वर्तमानपत्र निघाले. नेमका दिवस सांगायचा तर गुरुवार, दिनांक २५ सप्टेंबर १६९० रोजी बॉस्टन मुक्कामी पहिलेवहिले अमेरिकन वृत्तपत्र प्रसिद्ध झाले. दि. २५ सप्टेंबर

१९९० रोजी ह्या घटनेला ३०० वर्षे होत आहेत आणि बॉस्टनमध्ये त्याची यादगार साजरी होणार आहे. त्याचा जन्मदाता होता बेंजमीन हॅरीस, हँडबिलाच्या आकाराची तीन पाने हे ह्या वृत्तपत्राचे रूप होते. आता कोणी शंकेखोर प्रश्न काढील की, तीन पाने असतीलच कशी? कारण कागदाला दोन बाजू असतात. तेव्हा पाठपोट मिळून दोन पाने किंवा चार पाने असेच असू शकते. जे आपल्याला कळते ते बेंजमीन हॅरीसला अधिक चांगले कळत होते. पाठपोट चार पाने असलेल्या आपल्या वृत्तपत्रावर हॅरीसने प्रत्येक पानावर दोन स्तंभांची रचना करून मजकूर छापला होता आणि शेवटचे चौथे पान साफ कोरे ठेवले होते. का? तर हॅरीसला ठाऊक होते की वर्तमानपत्र विकत घेऊन वाचण्याचा जमाना यायला फारच अवकाश होता. तेव्हा एक-एक प्रत अनेकांमध्ये वाचली जाणार हे त्याने गृहीत धरले होते. प्रत्येक वाचकाने आपली प्रत पुढच्या वाचकाला देताना आपल्याला माहीत असलेल्या ताज्या घटना, आपली मते त्या उरलेल्या कोऱ्या पानावर लिहून मग ते वृत्तपत्र पुढच्या वाचकाच्या हाती द्यावे, अशी स्पष्ट सूचना हॅरीसने छापली होती. एका प्रकारे पत्रकारितेचे शिक्षण जणू प्रत्येक नागरिकाला देण्याचे आणि वाचकांचेही व्यासपीठ सुरू करण्याचे हे प्राथमिक धडे म्हणायला हवेत. ह्या चमत्कारिक वृत्तपत्राचे नाव 'पब्लिक अकरन्सेस: बोथ फॉरेन अँड डोमेस्टिक' असे लांबलचक होते. त्याचे स्पेलिंगही 'ओल्दे आंग्लेस' पद्धतीचे होते. 'पब्लिक' या शब्दाच्या शेवटी विनाकारण 'के', 'फॉरेन'मध्ये दुहेरी 'आर' आणि 'डोमेस्टिक'च्या अंताला परत 'के' असे स्पेलिंग आज मजेदार वाटावे. आपल्या पहिल्याच अंकात हॅरीसने स्पष्ट केले होते की, हे वृत्तपत्र महिन्यातून एकदा छापले जाईल, मात्र घडामोडी अधिक घडल्यास ते वारंवार छापले जाईल. आजच्या प्रगत, वैज्ञानिक काळात पहिल्या पानावर वृत्तपत्राच्या अंतरंगाची झलक एखाद्या चौकटीतून देण्याची आधुनिक पद्धत पडली आहे. हिला आधुनिक का म्हणावे? कारण तीनशे वर्षांपूर्वी हॅरीसने पहिल्याच पानावर- मात्र चौकटीऐवजी 'प्रस्तुत अंकात प्लीमथ इंडियन्सचा थँक्सगिव्हिंग कार्यक्रम, तसेच एका आत्महत्येचा वृत्तान्त, दोन बालके बेपत्ता झाल्याची घटना, एक आगीची दुर्घटना, देवी रोगाची साथ आटोक्यात आल्याचे वृत्त आणि इतर घडामोडी ह्यांची दखल घेतली आहे'– असे एका ओळीत आपल्या वृत्तपत्राचे अंतरंग प्रकट केले होते. हे ४ इंच × ९इंच आकारमानाचे वृत्तपत्र हातोहात खपले पण बिचारे अत्यल्पजीवी ठरले. त्याचा दुसरा अंक कधी निघालाच नाही. पहिल्या अंकाचे प्रकाशन होताच हॅरीसचे 'अकरसेन्स' धडाधड खपले आणि अवघ्या चार दिवसांतच त्यावर बंदी आली. गव्हर्नर आणि मॅसच्युसेटस् बे कॉलनीचे कौन्सिल ह्यांनी हे वृत्तपत्र संबंधित अधिकाऱ्यांची पूर्वसंमती न घेता छापले आहे, असे ठरवून टाकले. ह्यापूर्वी असा प्रयोग मुळात अमेरिकेत कोणी केलाच नव्हता तर बापड्या हॅरीसला अशी संमती घेणे कसे सुचावे? ह्या मंडळींनी परस्परच जाहीर केले की, बेंजमीन हॅरीसचे हे कृत्य अनुचित

असल्याने हे पत्रक पुनश्च छापले जाऊ नये. सरकारतर्फे विशिष्ट समिती भविष्यात कधी नेमली गेल्यास अशा समितीकडून कायदेशीर परवाना घेतल्याशिवाय कोणालाही कसलाही छापील मजकूर जनसमूहात वाटता येणार नाही, असा फतवा देखील निघाला. आणि 'पब्लिक अकरसेन्स' जन्माला येताच मृत्यू पावले.

—पण सत्ताधाऱ्यांशी संघर्ष बेंजमीन हॅरीसला नवा नव्हता. किंबहुना बालपणापासून ही विक्षिप्त आसामी त्यात रुळली होती म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. अमेरिकेचा हा पहिला पत्रकार इंग्लंडमध्ये नेमका कधी जन्मला त्याची काही नोंद नाही. पण तरुण वयातच इ. स. १६७३ पासून त्याने आपले पराक्रम सुरू केले. लंडनमधील बेल ॲलीमध्ये त्याच्या वडिलांचे पुस्तकांचे दुकान होते. पुस्तके विकता विकता त्याने 'वॉर विद् द डेव्हिल' हे धार्मिक पुस्तक प्रकाशित केले. त्याचा उठाव बऱ्यापैकी झाल्याने दुकानालाही चांगले दिवस आले नि बेंजमीन हॅरीसने १६७३ ते १६७९ ह्या सहा वर्षांत अनेक धार्मिक ग्रंथ छापले. त्यात कॅथलीक आणि क्वेकर्स ह्या दोन पंथांवर खरपूस टीका करणारे लिखाणही होते. स्वतः हॅरीस ॲनबॅप्टिस्ट पंथीय होता. व्हॅटिकनच्या पोपने चर्च ऑफ इंग्लंडविरुद्ध रचलेल्या कारस्थानास हॅरीसने आपल्या पुस्तकातून वाचा फोडली. हळूहळू त्याच्यातील सुप्त पत्रकार जागा होत होता. दि. ७ जुलै १६७९ रोजी 'डोमेस्टिक इंटलिजन्स : ऑर न्यूज बोथ फ्रॉम सिटी ॲन्ड कंट्री' नावाचे वृत्तपत्र त्याने लंडनमध्ये सुरू केले. त्याच्या मागोमाग 'प्रॉटेस्टंट इंटलिजन्स' हे वृत्तपत्र काढले. अधूनमधून त्याला विरोध होताच ते तात्पुरते बंद पडे. अमुक एका पंथाच्या विरोधात लिहिले की, तो पंथ त्यावर बंदी आणीत असे. हे वृत्तपत्र १६८१ मध्ये कायमचे बंद पाडण्यात आले. हॅरीस त्याचा प्रकाशक पण होता नि संपादक देखील! 'प्रॉटेस्टंट इंटलिजन्स' बंद पडण्यास आणखी एक प्रकरण हॅरीसच्या जीवनात घडले. १६७९ मध्ये त्याने 'अपील फ्रॉम द कंट्री टू द सिटी' अशा शीर्षकाचे पत्रक छापले. त्यात देशविघातक, विद्रोही विचार आहेत, सबब हा राजद्रोहच घडला आहे, असा निष्कर्ष काढून बेंजमीन हॅरीसला अटक करण्यात आली. खटला उभा राहिला आणि हॅरीसला दोषी ठरवून ५०० पौंडांचा दंड किंवा कारावास अशी शिक्षा झाली. ह्या निमित्ताने लंडनच्या जनतेस त्याच्या तऱ्हेवाईकपणाचे दर्शन घडले. त्याच्या एवढीच त्याची पत्नीही मजेदार! हे दांपत्य चौकात उभे राहिले... जाणाऱ्या येणाऱ्या जनतेपुढे आपली कैफियत मांडली आणि 'स्वतंत्र विचारासाठी पैशाच्या रूपात मदत' मागितली. थोडाफार निधी जमला. विशेष म्हणजे मिसेस हॅरीस एखाद्या वकिलाच्या थाटात जमावापुढे आपल्या पतीची बाजू मांडत होती पण ५०० पौंड उभे न राहिल्याने बेंजमीन हॅरीसची किंग्ज बेंच कारागृहात रवानगी झाली. तथापि काही हितचिंतकांनी रदबदली करून त्याची मुदतीपूर्वी सुटका करवली. आता ह्या शहाण्याने खरे तर गप्प राहणे इष्ट होते पण मग तो पत्रकार कसला? 'ट्रायंफ ऑफ जस्टिस ओव्हर अन्जस्ट जजेस्' हे पुस्तक त्याने लिहिले आणि कळस म्हणजे ज्या

न्यायाधीशाने त्याला शिक्षा ठोठावली त्या इंग्लंडच्या सरन्यायाधीश स्क्रॉग्ज ह्यांनाच ते अर्पण केले. सुटका होताच पुनश्च त्याने पोपच्या विरोधात प्रचार केला. एक कॉफी हाऊस काढले आणि त्यात पुस्तके व पत्त्यांचे जोड विक्रीस ठेवले. त्या पत्त्यांच्या जोडावर पोपची व्यंगचित्रे काढण्याचा सपाटा चालविला. एकूण हा सर्व एकपात्री कारभार असे. ही इंग्लंडच्या राजे दुसरे जेम्स ह्यांची कारकीर्द होती. 'प्रॉटेस्टंट इंटलिजन्स' हे वृत्तपत्र बंदच पडले होते. पण आता हॅरीसने अधिक धैर्य दाखवून 'इंग्लिश लिबर्टीजचे' प्रकाशन केले... आणि बाका प्रसंग ओढवला. त्याच्या ५००० प्रती जप्त करण्यात आल्या. ही पिडा असह्य होऊन अखेर ह्या सुधारणावादी संपादकाने इंग्लंड सोडण्याचा विचार केला. एव्हाना त्याचा मुलगा वेव्हसार हॅरीस हा बापाच्या तालमीत तयार झाला होताच. तेव्हा मिसेस हॅरीसने प्रस्ताव मांडला की, बापलेकांनी अमेरिकेला जावे आणि तिने एकटीने इंग्लंडमधील कारभार सांभाळावा.

– १६८६ च्या शरद ऋतूत बेंजमीन हॅरीस व वेव्हसार हॅरीस ही अफलातून जोडी अमेरिकेत बॉस्टन येथे उतरली. बॉस्टनमध्येच दोघांनी एक पुस्तकाचे दुकान खोलले. सर्वप्रथम जॉन टुलीचे १६८७ सालचे पंचांग छापून ह्या पितापुत्रांनी बॉस्टनमध्ये आपले स्थान बळकट केले. नंतर बॉस्टनमध्येच लंडन कॉफी हाऊस सुरू केले आणि त्यावर चक्क एक फलक लटकावून दिला – 'कॉफी, चहा आणि चॉकलेट उपलब्ध. महिलांना अन्यत्र मज्जाव असला तरी येथे मुक्त प्रवेश.' तीनशे वर्षांपूर्वी हे वागणे विपरीतच होते. पण हळूहळू उच्च वर्गातील महिला तेथे येऊ लागल्या. ह्याच सुमाराला म्हणजे १६९० मध्ये २५ सप्टेंबर रोजी हॅरीसने 'पब्लिक अकरन्सेस' हे वृत्तपत्र काढून बॉस्टनियन्सना धक्का दिला. त्याची अर्थातच बालहत्या झाली.

हॅरीस किती उद्योगी होता ह्याची पूर्ण कल्पना त्याच्या इतर पुस्तकांवरून यावी. इंग्लंडमध्ये असताना त्याने बालकांसाठी 'प्रॉटेस्टंट ट्यूटर' हे पुस्तक काढले होते. सगळी स्वरचनाच! त्यात स्पेलिंग आणि प्रॉटेस्टंट धर्माचे शिक्षण ह्याबरोबरच पोप आणि कॅथलिक पंथावरील टीकाही होती, असे पुस्तक बिचाऱ्या मुलांनी कसे आत्मसात करावे? इंग्लंडमध्ये केलेला हा उपद्व्याप व्यर्थ गेला होता. त्यातून धडा घेऊन हॅरीसने बॉस्टनमध्ये 'न्यू इंग्लंड प्रायमर' हे अत्युत्कृष्ट बालसाहित्य लिहून छापले. हे एक निखळ, शुद्ध शालेय पुस्तक केवळ बॉस्टनच नव्हे तर संपूर्ण अमेरिकेत तुफान लोकप्रिय झाले. अमेरिकेत बायबलच्या नंतर दुसरा क्रमांक 'न्यू इंग्लंड प्रायमर'चा लागला. सतत दोन शतके अमेरिकन मुले हाच बालग्रंथ हाती घेऊन शाळेची पायरी चढत राहिली. सोप्या परंतु अर्थपूर्ण काव्यचरणांतून पोरांना बाराखडी, स्पेलिंग आणि शब्दज्ञान देणारा हा ग्रंथ आज विसाव्या शतकातही वाचकाला थक्क करू शकतो.

बॉस्टनमधील आठ वर्षांच्या वास्तव्यानंतर हॅरीसने इंग्लंडला परतण्याचा निर्णय घेतला. ह्या आठ वर्षांत अमेरिकेतील पहिला पत्रकार आणि सतराव्या शतकातील

अमेरिकेतला श्रेष्ठ प्रकाशक म्हणून त्याने लौकिक कमावला. १६९५ मध्ये लंडनला परतल्यावर त्याने काही वृत्तपत्रे काढली, ती धडाधड बंदही पडली. मग १६९९ मध्ये 'लंडन पोस्ट'हे वृत्तपत्र सुरू केले. ते मात्र अखंड सहा वर्षे चालू राहिले. बेंजमीन हॅरीसच्या जन्माप्रमाणेच त्याच्या मृत्यूची तारीखही मिळत नाही.

आज अमेरिकेत एकूण १७५३ वृत्तपत्रे निघत आहेत. ६ कोटीच्या घरात त्यांच्या खपाचे आकडे गेले आहेत. हॅरीसचा मागोवा घेत बॉस्टनमध्येच जॉन कँबल ह्याने १७०४ मध्ये 'न्यूजलेटर'हे साप्ताहिक काढले. हे अमेरिकेचे पहिले स्थिर, अखंडित प्रकाशन लाभलेले वृत्तपत्र ठरले. अठराव्या शतकात वृत्तपत्र स्वातंत्र्याचे तत्त्व अमेरिकेत स्वातंत्र्य संग्रामापूर्वीच बळकट झाले. बॉस्टन नेहमीच स्वातंत्र्य लढ्यात अग्रभागी होते. ह्या सर्वांचा पाया रचण्याचे काम बेंजमीन हॅरीस ह्या चक्रमछाप मूळ इंग्रज पण नंतर बॉस्टनियन बनलेल्या संपादकाने केले, ह्याची स्मृती ठेवायलाच हवी.

१७/९/९०

❋❋❋

# ४२

※

# आफ्रिकेचा सच्चा मित्र

एखादी व्यक्ती सर्वांना सर्व काळ प्रिय बनून राहणे अशक्यप्रायच. त्यातही ती व्यक्ती अधिकारपदावर असेल तर प्रसंगी कोणाचे ना कोणाचे तरी कान टोचण्याचे अप्रिय काम करावेच लागणार. 'न ब्रूयात् सत्यमप्रियम्' हे सूत्र धाब्यावर बसवून प्रसंगी कटू बोल सुनावूनही आपल्याबाबतचा आदर आणि प्रेमभावना कायम ठेवण्यात यशस्वी ठरलेली एक व्यक्ती दि. ३० जून १९९० रोजी जागतिक महत्त्वाच्या पदावरून निवृत्त झाली... त्या व्यक्तीविषयी सर्वांच्याच मनात इतका दाट जिव्हाळा होता की, त्यांना निरोप देताना कित्येकांचे कंठ दाटून आले. किताबती आणि बहुमान स्वीकारून ह्या व्यक्तीच्या कोटाची डावी बाजू पूर्ण भरून गेली. ही लोकप्रिय व्यक्ती म्हणजे राष्ट्रकुलाचे सरचिटणीस सर श्रीदत्त रामफल तथा सनी रॅम्फाल. 'सनी ऑफ द् कॉमनवेल्थ' ह्या नावाने श्रीदत्त रॅम्फाल सतत १५ वर्षे ह्या पदावर होते. खरे तर ते 'रामफल' कुटुंब मूळचे भारतीय तथापि फार पूर्वीच गयाना येथे स्थलांतरित झाल्याने 'रॅम्फाल' बनले.

सनी रॅम्फाल १९७५ मध्ये राष्ट्रकुलाचे सरचिटणीस बनले. शिक्षण आणि व्यवसायाने ते एक नामांकित बॅरिस्टर होते. काही काळ गयानाचे न्यायमंत्री आणि परराष्ट्रमंत्रीही होते. कायदेविषयक पार्श्वभूमी लाभल्याने त्यांनी साहजिकच राष्ट्रकुलाच्या कामकाजातही विधिज्ञ आणि मुत्सद्दी ह्या भूमिका कायम राखल्या आणि अनेक बाबींना कायद्याची सुसूत्रता आणली. सनी रॅम्फालपूर्वी राष्ट्रकुलाचे सरचिटणीसपद कॅनडाचे अर्नोल्ड

स्मिथ ह्यांनी सांभाळले होते. त्या वेळी ह्या संघटनेत ३४ देश होते आणि ह्या संघटनेचा कार्यक्रम पूर्णतः निश्चित झालेला नव्हता. कामकाजाला नुकतीच सुरुवात झाली होती. संघटनेचा दबदबा होता. पण प्रभाव पडायला आरंभ झालेला नव्हता. दहा वर्षे अर्नोल्ड स्मिथ ह्यांनी हे पद सांभाळले आणि हे ३४ देश १९७५ मध्ये श्रीदत्त रॅम्फाल ह्यांच्या हवाली केले. आज राष्ट्रकुल ही आंतरराष्ट्रीय आदरास पात्र झालेली संघटना बनली आहे नि ५० राष्ट्रांचे एक कुटुंब बनले आहे. समानता आणि परस्पर सहकार्य ह्या भावना राष्ट्रकुलात अधिक दृढ झाल्या आहेत. आर्थिक, शेतीविषयक, शिक्षण, आरोग्य, विज्ञान, महिला आणि युवकांचे विश्व अशा विविध क्षेत्रांमध्ये परस्परांशी सहयोग करण्याच्या योजना आखल्या जात आहेत. काळाच्या गरजेनुरूप राष्ट्रकुलाची भूमिका राखली जात आहे. हे यश पाहण्याचे भाग्य सनी रॅम्फाल ह्यांना मिळाले.

लंडनच्या मार्लबरो हाऊसमध्ये राष्ट्रकुलाचे मुख्य कार्यालय असते. श्रीदत्त रॅम्फाल १५ वर्षांपूर्वी जेव्हा सरचिटणीस म्हणून ह्या कार्यालयात आले तेव्हा एखादा साथीचा रोग फैलावा तसा वर्णद्वेष फोफावला होता. ऱ्होडेशियाची समस्या विक्राळ रूप धारण करून उभी राहिली होती. ऱ्होडेशियाचे सत्ताधीश आयन स्मिथ आपल्या वंशभेदी, वर्णभेदी भूमिकेपासून तसूभरही माघार घ्यायला तयार नव्हते. ऱ्होडेशिया राष्ट्रकुलाचे सदस्य राष्ट्र होते नि उघडपणे वर्णद्वेषी धोरणाचा पुरस्कार करीत होते, त्यामुळे संघटनेच्या 'समानता' ह्या मूळ तत्त्वालाच सुरुंग लागला होता. रॅम्फालने वर्णद्वेषाविरुद्ध कणखर भूमिका आरंभापासूनच घेतली. बेधडक वर्णद्वेषाला ठोकायला त्यांनी आपल्या आगमनाच्या पहिल्याच दिवशी सुरुवात केली. परिणामी वंशवाद्यांनी, वर्णभेद पाळणाऱ्या घटकांनी रॅम्फालशी वैर धरले. काही प्रसिद्धी माध्यमे वर्णद्वेष पाळणारी होती, त्यांनी रॅम्फालवर टीकेची झोड उठवायला आरंभ केला. रॅम्फालच्या धोरणाचा अर्थातच आणखी एक परिणाम झालाच– जगभरच्या प्रमुख राष्ट्रांनी रॅम्फाल ह्यांच्या 'वंश-वर्णभेदातीत समानते'च्या तत्त्वाला पाठिंबा दिला. जगाचा दबाव, जनमताचा रेटा प्रभावी ठरला आणि वर्णद्वेषी ऱ्होडेशियाचा अस्त होऊन 'झिंबाब्वे' ह्या नव्या राष्ट्राचा उदय झाला. आपल्या कारकीर्दीत श्रीदत्त रॅम्फालनी आणखी एक 'बालराष्ट्र' पाहिले आणि त्याच्या स्वतंत्र अस्तित्वासाठी ते स्वतः कसून झटतही होते. हे राष्ट्र म्हणजे 'नामीबिया'. नामीबियाच्या स्वातंत्र्याकरिता संयुक्त राष्ट्रांचे झेविअर पेरे द क्युलर, डायगो कार्डोवेझ ह्यांच्यासह राष्ट्रकुलाचे रॅम्फाल प्रयत्न करीत होते, ते कारणी लागले... आणि आता ३० जून १९९० रोजी ह्या पदावरून निवृत्त होताना रॅम्फाल ह्यांना आणखी एका शुभ घटनेची किमान नांदी ऐकायला मिळाली आहे– वर्णद्वेषाला तिलांजली देऊन काळ्या-गोऱ्यांच्या समानतेवर दक्षिण आफ्रिकेचा पुनर्जन्म होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, हे समाधान निवृत्तीच्या क्षणी राष्ट्रकुलाच्या सरचिटणिसांना लाभले. राष्ट्रकुलाच्या बैठकीत दक्षिण आफ्रिकेवरून (बोथा ह्यांची

राझवट) रण माजले होते आणि इतर सदस्य राष्ट्रांनी सुचविलेला आर्थिक निर्बंधांचा प्रस्ताव राष्ट्रकुलप्रमुख राणी एलीझबेथ व सरचिटणीस रॅम्फाल ह्यांनी उचलून धरला नि इंग्लंडच्या पंतप्रधान मार्गरेट थॅचर त्यांनी त्यास उघड विरोध केला होता, तो प्रसंग सर्वांच्याच स्मरणात असेल.

रॅम्फाल ह्यांचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे राष्ट्रकुलातील अनेक बुद्धिमंतांना एकत्र आणवून त्यांच्या बौद्धिक शक्तीचा आंतरराष्ट्रीय स्तरावर सदुपयोग करून घेण्याची योजना त्यांनीच कार्यवाहीत आणली. शेती, शिक्षण, आरोग्य, युवकविश्व ह्या विषयांतील देशोदेशीच्या विद्वानांना एकमेकांच्या सहवासात आणून त्यांचे तज्ज्ञ गट रॅम्फालनी स्थापले आणि त्यांचेकडून सूचन मागवल्या. 'कॉमन वेल्थ ऑफ लर्निंग' आणि 'कॉमनवेल्थ इक्विटी फंड' ह्या शाखांची स्थापना हे अशा विद्वज्जनांच्या संमेलनाचे फलित होय. 'कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग' मुळे राष्ट्रकुलातील विद्यार्थ्यांना दूरवर राहूनही शिक्षणाचा लाभ घेता येईल. तर विकसनशील देशांतून गुंतवणूक करण्याच्या उद्देशाने खासगी भांडवलास प्रोत्साहन देण्याचे कार्य 'कॉमनवेल्थ इक्विटी फंड' साध्य करील.

श्रीदत्त रॅम्फाल हे उत्कृष्ट वक्ते आहेत, आपल्याला पटणारे मत निर्भयपणे मांडायला हे वक्तृत्व त्यांना मोलाचे ठरले. त्याचबरोबर त्यांच्यातील आणखी एक गुण म्हणजे मित्रत्वाची भावना, विरोधकांचे मतही शांतपणे ऐकून घेण्याची क्षमता आणि दुसऱ्याला हिंमत देण्याची हातोटी – मूळ भारतीय असलेला हा माणूस ह्या तीन गुणांचे श्रेय मात्र गयानाच्या कॅरिबियन मातीला देतो, हे लक्षात घेण्यासारखे आहे. ह्या तीन गुणांमुळे सनी रॅम्फाल राष्ट्रकुलात कार्य करू शकले आणि लोकप्रियही होऊ शकले. गेल्या वर्षी क्वालालंपूर येथे राष्ट्रकुलाचे अंतिम सत्र भरले होते, त्यात प्रत्येक सदस्य राष्ट्राने रॅम्फाल ह्यांचा भरभरून गौरव केला. कॅनडाचे पंतप्रधान ब्रायन मलरॉनी ह्यांनी त्यांच्या विनोदबुद्धीचे दाखले दिले नि वर्णद्वेषासारख्या आत्यंतिक गंभीर समस्येतही सनीने आपल्या विनोदबुद्धीमुळे सभागृहावर कसे नियंत्रण ठेवले त्याचे वर्णन केले. ते पूर्वी गयानाचे नागरिक होते नि राष्ट्रकुलाचे सरचिटणीस बनताच ते आंतरराष्ट्रीय नागरिक कसे बनले, त्याचे किस्से अनेकांनी सांगितले.

जसजशी रॅम्फालच्या निवृत्तीची वेळ जवळ आली तसे अनेक राष्ट्रप्रमुख रॅम्फाल ह्यांना सन्मानित करण्यासाठी पुढे येऊ लागले. राणी एलीझबेथनी त्यांना 'ग्रँड कमांडर ऑफ दी ऑर्डर ऑफ सेंट मायकल अँड सेंट जॉर्ज' (जीसीएमजी) बनविले तर ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान बॉब हॉक ह्यांनी आपण सनीला कोठलाच सन्मान देऊ शकत नसल्याबद्दल अगतिकता व्यक्त केली. कारण काय?... ऑस्ट्रेलियाचा सर्वोच्च सन्मान म्हणजे 'कंपॅनियन ऑफ दी ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया' नि हा बहुमान ऑस्ट्रेलियाने रॅम्फालना पूर्वीच बहाल केला आहे व तो दोन वेळा एका व्यक्तीला देता येत नाही. राष्ट्रकुलातील सर्वांत छोटे राष्ट्र

म्हणजे मालदीव... तर ह्या इटुकल्या राष्ट्रानेही निशान-ए-आयझद्दीन हा सन्मान रॅम्फालना दिला. झिंबाब्वे आणि नामीबिया व दक्षिण आफ्रिका ह्याबाबतचे रॅम्फालचे कार्य ऐतिहासिकच आहे तेव्हा आफ्रिकी राष्ट्रांना त्यांच्याविषयी सर्वाधिक प्रेम वाटल्यास नवल नव्हे. 'आफ्रिकेचा सच्चा मित्र' म्हणून रॅम्फालना 'ऑर्डर ऑफ द नायगर' ही किताबत मिळणे अपेक्षितच होते. हा बहुमान आजतागायत डॉ. मार्टीन ल्यूथर किंग, राणी एलीझबेथ आणि नेल्सन मँडेला एवढ्यांनाच मिळालेला आहे. न्यूझीलंडने तर विक्रमच केला. 'ऑर्डर ऑफ न्यूझीलंड' हा त्यांचा सर्वोच्च बहुमान. तो खिरापतीसारखा कोणालाही वाटायला न्यूझीलंडचे नागरिक मुळीच तयार नसतात. शक्यतो न्यूझीलंडच्या बाहेरचा नागरिक यांच्या दृष्टीने 'उपरा' ठरतो नि उपऱ्यांना हा मान मिळू द्यायचाच नाही, असा जणू त्यांनी चंगच बांधलेला आहे. हा बहुमान प्राप्त झालेले फक्त २० नागरिक आज हयात आहेत. त्यांतील १८ न्यूझीलंडचेच आहेत. १९ वी व्यक्ती म्हणजे राणी एलीझबेथची आई राजमाता एलीझबेथ... आणि विसावी व्यक्ती म्हणजे सनी रॅम्फाल! न्यूझीलंड व रॅम्फाल ह्यांच्यातील जिव्हाळा औरच आहे. 'रेनबो वॉरियर' ह्या सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय समस्येनंतर न्यूझीलंडची आर्थिक कोंडी करण्याचे डावपेच आखले गेले होते आणि ज्या वस्तूंवर न्यूझीलंडचे अर्थकारण उभे आहे त्याच लोणी व चीज ह्या पदार्थांवर आंतरराष्ट्रीय बहिष्कार टाकण्याची खेळी खेळली गेली तेव्हा श्रीदत्त रॅम्फाल ह्यांनी पडद्याआड राहून न्यूझीलंडसाठी आपले शब्द-श्रम-वजन खर्ची घातले होते. तेव्हा न्यूझीलंड त्यांच्यावर सन्मानांची खैरात करणे साहजिकच आहे. राष्ट्रकुलातून बाहेर पडण्याचे पाऊल उचलणाऱ्या पाकिस्ताननेही रॅम्फालना 'निशान-ए-कायदे-आझम' हा गौरव बहाल केला. ह्यावरून रॅम्फालची लोकप्रियता समजून यावी.

रॅम्फालचे मोठेपण खरे तर ह्या गौरवांवरून कोणीही आजमावू नये. राष्ट्रकुलाचा सरचिटणीस असलेला माणूस इतरत्र फारसा गुंतत नसतो पण सनी रॅम्फाल त्याला अपवाद ठरले. हा एकमेव विक्रमी माणूस जो १९८० च्या सुमारास स्थापलेल्या प्रत्येक कमिशनवर काम करीत आला – 'विली ब्रँड निःशस्त्रीकरण व सुरक्षा कमिशन', 'आंतरराष्ट्रीय विकास स्वायत्त कमिशन', 'आंतरराष्ट्रीय मानवतावादी ओलाफ पाम कमिशन', 'ग्रो ब्रंटलँड पर्यावरण कमिशन'... ह्यांतील कित्येकांचा राष्ट्रकुलाशी संबंध नव्हता. केवळ रॅम्फाल ह्यांच्या कर्तबगारीमुळे त्यांना आमंत्रित केले होते, हे लक्षणीय आहे. संयुक्त राष्ट्रांच्या विकास, नियोजन समितीचेही ते अध्यक्ष होते. निवृत्त होताना रॅम्फाल ह्यांनी केलेले राष्ट्रकुलातील अखेरचे भाषण हा वाङ्मयातील एक सुंदर नमुना ठरावा – 'राष्ट्रकुलासाठी मी सद्भावना ठेवीत आहे नि आपले प्रेम घेऊन जात आहे. ज्यांच्यामुळे पूर्वी राष्ट्रकुलात समर प्रसंग येत गेले त्याच झिंबाब्वे, नामीबिया व दक्षिण आफ्रिका ह्या देशांचे नवे जन्म पाहायला मी साक्षीदार होतो ह्याबाबतचा अभिमान हृदयात बाळगून जात आहे... '

२३/७/९०

***

## ४३

※

# हरपले श्रेय....

साधारणपणे राजकारणातील आणि ऐतिहासिक व्यक्ती मरणोत्तरही वादाचा विषय होत राहतात. वैज्ञानिक क्षेत्र ह्याबाबतीत इतिहास आणि राजकारणाच्या क्षेत्रापेक्षा खूपच मवाळ होते. वाद निघालाच तर तो बराच मर्यादित राहतो, म्हणजे कॅल्क्युलस हे न्यूटनचे अपत्य की वैदिक गणिताचे? डॉ. सी. व्ही. रामन ह्यांच्या रामन इफेक्टमधील अर्धे श्रेय त्यांच्या बंगाली सहकाऱ्यास का देऊ नये? ऑर्व्हिल आणि विल्बर राईट हे बंधू विमानाचे जनक की तळपदे बंधू हे विमानाचे पिता? असे काही वादाचे मुद्दे अधूनमधून त्यांच्या जनकांच्या शताब्दीच्या वेळी अगर त्या त्या शोधाच्या शताब्दीच्या वेळी उगाळले जातात. वैज्ञानिक क्षेत्रातील नीतिमत्ता ह्या विषयांतर्गत गेल्या दोन दशकांत गाजलेले प्रकरण म्हणजे जगप्रसिद्ध गुरु-शिष्याचे! ही जोडी म्हणजे सर हंफ्रे डेव्ही आणि मायकल फॅरडे ह्यांची. 'शिष्यात् इच्छेत पराजयम्' हे सुभाषित बोलायला चांगले वाटले तरी प्रत्यक्षात कडवट अनुभव देणारे ठरते. 'विद्युत्शक्ती'च्या विषयातील हे दोन महाप्रतापी आचार्य पण सर हंफ्रे श्रीमंत, प्रतिष्ठाप्राप्त, सरळ उमराव सभेत ऊठबस करणारे तर फॅरडे गरीब घरातला, त्याच्या घराण्याला प्रतिष्ठा त्याच्यामुळेच मिळाली... तोवर फॅरडे घराणे कोठे गाजले नव्हतेच. त्यात सर हंफ्रेच्या पत्नीने त्याचा कसाही व कोठेही पाणउतारा करावा... ह्या गुरु-शिष्य जोडीवर सुंदर वाङ्मयनिर्मिती देशी भाषांतून करता येईल.

पण आता डेव्ही-फॅरडे प्रकरणालाही मागे टाकील असा एक वाद झुंजू लागला आहे.

आणि ह्या वादाचे वैशिष्ट्य म्हणजे वैज्ञानिक नीतिमत्ता ही मर्यादा ओलांडून तो आता स्त्री-पुरुष संबंधातील स्त्रीचे शोषण, पुरुषकेंद्री समाजरचना, स्त्री-पुरुष असमानता ह्या कक्षेत आला आहे. हे प्रकरण आहे दोन आईनस्टाइनचे. विज्ञानक्षेत्रातील इतिहास संशोधकांच्या बरोबरीने ह्या प्रकरणात आता फेमिनिस्ट चळवळीतील कार्यकर्त्याही उतरत आहेत.

वैज्ञानिक इतिहासकारांनी जुनी-पुराणी कागदपत्रे काढून, पडताळून असा निष्कर्ष काढला की, जगप्रसिद्ध 'सापेक्षता सिद्धान्त' आईनस्टाइनचा होता हे खरे पण डॉ. अल्बर्टचा नव्हता तर मिलेवा मारीक आईनस्टाइनचा होता. मिलेवा मारीक ही अल्बर्ट आईनस्टाइनची सहाध्यायिनी, मैत्रीण व पहिली पत्नी. सापेक्षता सिद्धान्ताच्या श्रेयाचा खरा मानकरी कोण, हा वाद निकराने झुंजू लागल्यावर अखेर १९९० च्या फेब्रुवारी महिन्यात 'अमेरिकन ॲसोसिएशन फॉर दी ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स' ह्या संस्थेने एक समिती नेमली. विज्ञान हा तसा रूक्ष विषय. समीकरणे, घातगणनांक, वर्गमूळ अशा गणिती पसाऱ्यात भिरभिरणारी अल्फा-बीटा-गॅमा-सिग्मा ही मंडळी आणि पानोपानी तळटीपांची तळघरं'... पण दोन आईनस्टाइनच्या ह्या निधनोत्तर लढ्याला आरंभ होताच पत्रे, प्रतिपत्रे आणि प्रति-प्रतिपत्रे ह्यांचे कागदी बाण बेफाट सुटू लागले. लोक आपणहूनच जणू उभयतांचे वकीलपत्र घेतल्याप्रमाणे भांडायला उठले. अर्धी जनता 'अल्बर्ट'च्या बाजूने तर अर्धी 'मिलेवा'च्या पक्षात उठली.

मिलेवाच्या बाजूने युक्तिवाद करीत आहेत इव्हान हॅरीस वॉकर आणि सेंटा ट्रोमेल प्लोत्झ. डॉ. वॉकर हे प्रसिद्ध फिजिसिस्ट (ह्याला प्रतिशब्द पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ की भौतिकशास्त्रज्ञ ह्या विषयावर आपण एक नवा वाद घालू शकतो) आहेत. डॉ. वॉकर ह्यांच्या मते सापेक्षतावादाची मूलभूत कल्पना मिलेवा मारीक हिचीच होती. डॉ. सेंटा ट्रोमेल प्लोत्झ हे जर्मन भाषाविशारद आहेत. त्यांच्या मते सापेक्षता सिद्धान्त डॉ. अल्बर्टच्या मनात स्फुरला असण्याची शक्यता आहे, मात्र त्याची सर्व आकडेमोड आणि गणिती उभारणी एकट्या मिलेवाचीच होती. ह्या दोन विद्वानांचे मत प्रसिद्ध होताच जॉन स्टेशल हे विद्वान गृहस्थ खवळून उठले. जॉन स्टेशल हे अल्बर्ट आईनस्टाइन ह्या व्यक्तीचे जाणकार मानले जातात. आईनस्टाइनचा संपूर्ण पत्रसंग्रह त्यांनी सांभाळला होता. त्यांचे मत असे पडले की, मिलेवा बुद्धिमान होती खरी, पण डॉ. अल्बर्ट हेच सापेक्षतावादाचे जनक होते आणि मिलेवाचे मत ते नेहमीच विचारात घेत. सापेक्षतावादाबद्दलही त्यांनी मिलेवाचे मत आजमाविले होते. अशा परीने ते तिच्या बुद्धीची कदर करीत.

अल्बर्ट व मिलेवा प्रेमप्रकरणास आता इतिहासात स्थान प्राप्त झाले आहे. १९२९ मध्ये ख्यातनाम लेखिका व्हर्जिनिया वूल्फ हिने 'अ रूम ऑफ हर ओन' ह्या साहित्यकृतीद्वारे तमाम जगातील पुरुषांना सवाल टाकला – 'सद्‌गृहस्थहो, शेक्सपीयरला जर बहीण असती तर ती सर्वोत्कृष्ट नाटककार बनण्याचा काही संभव होता का?' व्हर्जिनियाच्या ह्या

प्रश्नानंतर लोकोत्तर पुरुषांच्या पत्नींच्या चरित्राचा अभ्यास करण्याची प्रथा रूढ झाली. त्यातून मग इंग्लंडचा राजा आठव्या हेन्रीची दुसरी पत्नी ॲन बोलीनपासून टॉलस्टॉयची पत्नी सोनिया बर्स ते थेट स्कॉट फित्झेरल्डची पत्नी झेल्डापर्यंत सर्व प्रसिद्ध पुरुषांच्या पत्नींचे जीवन अभ्यासाचा विषय बनू लागले. ए - फॉर ॲन, झेड् फॉर झेल्डा साऱ्यांची हजेरी लागली. स्कॉट फित्झेरल्ड म्हणजे 'ग्रेट गॅट्स्बी' वाला थोरला साहित्यिक. आता नवे संशोधन सिद्ध करीत आहे की, फित्झेरल्डच्या श्रेष्ठ रचनांमधील सर्वोत्तम लेखन त्याची पत्नी झेल्डा फित्झेरल्ड हिचे आहे. बिचारी झेल्डा. अतिशय तरल प्रतिभा आणि संवेदना लाभलेली ही बुद्धिमान स्त्री आधी नैराश्याच्या झटक्यांनी विमनस्क झाली, मग वेडी बनली नि वेडाच्या भरात आत्महत्या करून गेली. काही वर्षांपूर्वी मुंबई-दिल्ली येथे फ्रान्सचा गेल्या दशकातील श्रेष्ठ शिल्पकार ऑगस्ते रोदिन ह्याच्या कलाकृतींचे अप्रतिम प्रदर्शन भरले होते. एकाहून एक सरस कलाकृती... सर्व रोदिनच्या नावे पण प्रत्यक्षात अभ्यासान्ती कळले की, रोदिनची प्रेयसी कमील क्लॉडेल ही रोदिनपेक्षा श्रेष्ठ कलावंत होती नि ह्या सुंदर कलाकृती वास्तविक तिच्या होत्या. रोदिनने ह्या प्रेयसीची प्रतारणा केली. तिची कला ओरबाडून घेतली नि अन्य धनाढ्य स्त्री दिसताच कमीलला फसवून तिच्याशी लग्न केले. उद्ध्वस्त कमील मनोरुग्ण संस्थेत आयुष्याच्या अंतापर्यंत राहिली. फेमीनिस्ट चळवळीने आता कमील क्लॉडेलला तिचे न्याय्य श्रेय दिले जावे म्हणून मागणी केली आहे. मिलेवा मारीक आईनस्टाइनच्या वाट्यालाही असाच भोग आला. डॉ. अल्बर्ट आईनस्टाइनच्या चरित्रात मिलेवाचे वर्णन अल्बर्टची पहिली पत्नी, सर्बिया प्रांतातील रांगड्या शेतकरी कुटुंबातील, काहीशी अबोल, आतल्या गाठीची, घुमी, मोजकं बोलणारी आणि विश्वासात घेऊ नये अशातली स्त्री असे केले आहे. प्रत्यक्षात मिलेवा मारीक अत्यंत बुद्धिमान मुलगी होती. केवळ बुद्धिमान हे विशेषण अपुरे पडून तिला 'प्रज्ञावंत' म्हणावे एवढी तिची कुवत होती. इ. स. १८९६ मध्ये स्वित्झर्लंडच्या पॉलीटेक्निकल इन्स्टिट्यूट (झुरीक) मध्ये एका स्त्रीला प्रवेश मिळवणे दुरापास्त होते. तो विक्रम मिलेवाने केला होता.

दोन आईनस्टाइनच्या प्रस्तुत वादात मिलेवाची बाजू मांडणाऱ्यांनी डॉ. अल्बर्टच्या पत्रांचा आधार आपल्या भूमिकेच्या पुष्ट्यर्थ घेतला आहे. ह्या पत्रांतून डॉ. अल्बर्टनी 'आपला' सिद्धान्त, 'आपले' संशोधन असे शब्दप्रयोग केले आहेत. आणखी एक आधार ह्या मंडळींनी घेतला आहे, तो डॉ. अल्बर्टच्या गणितातील गतीबाबतचा. डॉ. अल्बर्ट गणितात कच्चे होते, असे बोलले जाते. उलट मिलेवा गणिताच्या बाबतीत भास्कराचार्यांच्या लीलावतीची बहीण शोभावी एवढी तल्लख होती. त्यामुळे $E=MC^2$ हे जगप्रसिद्ध समीकरण अल्बर्टचे असणे शक्य नाही, ते मिलवाचेच असणे अधिक संभवनीय आहे. मिलेवाची बाजू बळकट करण्यासाठी ह्या दोघांतील घटस्फोटांचे कागदपत्रही ह्या मंडळींनी सादर केले आहेत. आपल्याला मिळालेल्या नोबेल पारितोषिकाची रक्कम मिलेवाला देण्याचे आश्वासन

डॉ. अल्बर्टनी ह्या करारनाम्यात दिले होते. प्रत्यक्षात हे आश्वासन त्यांनी पाळले अगर नाही, ह्याबाबतही संशोधन चालू आहे. त्याऐवजी डॉ. अल्बर्टच्या समर्थकांनी हे आधार फुसके आहेत, असा आरोप केला आहे.

तेज व्यक्तिमत्त्वाचे, स्वतंत्र बुद्धीचे दोन प्रज्ञावंत स्त्री-पुरुष एकमेकांचे जोडीदार झाले. ही खरे तर सुयोगाची बाब पण मिलेवाची शोकांतिका झाली आणि फेमिनिस्ट चळवळीच्या मते त्याला जबाबदार अल्बर्ट आईनस्टाइन होते. पति-पत्नी आणि संशोधक ह्या तीन कोनात बेबनाव निर्माण झाला. डॉ. अल्बर्टच्या प्रेमात पडलेल्या मिलेवाला विवाहापूर्वीच दिवस गेले आणि ती विज्ञानाच्या शेवटच्या परीक्षेला बसूच शकली नाही. (फेमिनिस्ट स्टडीच्या मते ह्याला जबाबदार खुद्द अल्बर्ट आईनस्टाइन होते.) अविवाहित माता बनल्यामुळे मिलेवापुढे हे अपत्य कोणा सहृदय दांपत्याला दत्तक द्यावे लागले. पुढे मिलेवा-डॉ. अल्बर्ट विवाह झाल्यावर आणखी दोन मुलांचा जन्म झाला पण एव्हाना पत्नी, माता आणि गृहिणीच नव्हे तर प्रसंगी सर्व कुटुंबाची पोशिंदी अशा भूमिका तिच्याकडे आल्या. इथं तिची प्रज्ञा, तिच्यातील वैज्ञानिक थिजला आणि डॉ. अल्बर्ट मात्र वाढत गेले. एवढेच नव्हे तर डॉ. अल्बर्ट दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमात पडले, मिलेवाचा त्यांनी त्याग केला. स्वतः जन्माला घातलेली मुले ही मिलेवाचीच जबाबदारी म्हणून संसार झटकून मोकळे झाले. दुसरा विवाह करून राहू लागले आणि झिडकारलेली मिलेवा मुलांना व स्वतःला जगवण्यासाठी काबाडकष्ट करीत झिजत राहिली. एक मुलगा मनोरुग्ण होता नि एवढी मोठी जबाबदारी ती एकटीने निभावू लागली. वास्तवात डॉ. अल्बर्ट म्हणजे श्रेष्ठ वैज्ञानिक, तसेच थोर मानवतावादी व शांतिदूत होते पण पुरुषी वृत्तीचा कधी त्याग करू शकले नाहीत किंबहुना आपले काही चुकल्याचीही जाणीव त्यांना झाली नसावी. कारण स्त्री... मग ती कितीही बुद्धिमान असो अगर कलावंत असो... चुलखंडालाच बांधील होती ना! विवाहोत्तर तिचे आडनाव जसे पुसून जाते तसेच तिचे व्यक्तित्व, बुद्धी सर्व काही हटविले जाते अगर कुजविले जाते. पतीच्या थोरवीच्या सावटात झाकोळून गेलेल्या बुद्धिमान स्त्रियांची उदाहरणे शेकड्यांनी देता येतील. दोन आईनस्टाइनबाबतचा त्यांच्या निधनोत्तर एवढ्या वर्षांनी सुरू झालेला वाद अद्यापि संपलेला नाही. पण निदान एवढे तरी त्यातून प्रकट झाले की, अल्बर्ट आईनस्टाइन महात्मासदृश्य नव्हते नि मिलेवा रांगडी दगड नव्हती. अल्बर्ट श्रेष्ठ वैज्ञानिक होते हे जग कधीच नाकारणार नाही पण मात्र मिलेवाला निदान 'हुतात्मा' म्हणून तरी स्थान लाभेल. अल्बर्ट आईनस्टाइन ह्यांच्या निधनानंतर त्यांच्या बुद्धितेजाने दिपलेल्या शास्त्रज्ञांनी त्यांचा मेंदू संशोधनासाठी राखला. 'आईनस्टाइन ब्रेन' हा शब्दप्रयोग अस्तित्वात आला. आता मिलेवाच्या जीवनकहाणीमुळे 'आईनस्टाइन ब्रेन' लाभलेले अल्बर्ट व्यक्तिगत जीवनात 'आईनस्टाइन' नव्हते, असे म्हणावे लागेल.

१६/४/९०

## ४४

※

# गद्दार ते देशप्रेमी

**मा**णसाला मृत्यू कधी आणि कसा यावा ह्या निवडीचे स्वातंत्र्य नाही पण चटका लावून जाणारा मृत्यू कोणालाही निवडावासा वाटेल. जणू हे निवडीचे स्वातंत्र्य मिळाल्यासारखा पंचेन लामांचा मृत्यू घडला आणि उभं आयुष्य अगदी तिरस्करणीय व्यक्ती म्हणून दूषणं मिळवलेला हा माणूस आयुष्याच्या अंताला ज्या जनतेपासून दुरावला होता, त्या जनतेचे अश्रू आणि प्रार्थना घेऊन गेला. इतका प्रिय झाला की, त्याच्यासाठी श्रद्धांजली अर्पिणाऱ्या सभा तर झाल्याच शिवाय त्याची स्मृती उभारण्याची योजनाही आखली गेली. एका घटकाने तर पंचेन लामांच्या मृत्यूत काहीतरी काळेबेरे असलेच पाहिजे असे आरोप चीनवर करायला सुरुवात केली आहे, त्यांच्या मृत्यूची चौकशी व्हावी म्हणून निदर्शनेही केली.

तिबेट आणि चीन ह्यांच्या इतिहासातील पंचेन लामा हे प्रकरण इंग्लंडच्या इतिहासातल्या आठव्या हेन्री आणि टॉमस कार्डीनल वूल्फ व क्रॉमवेल ह्या पात्रांची पुसट आठवण करून देते. अर्थात सहीसही तुलना करता येणार नाही. पूर्णतः व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी राजसत्तेने धर्मसत्तेचा घेतलेला बळी हे हेन्री-टॉमस वूल्फ नात्याचे सूत्र आहे. त्या तुलनेने पंचेन लामा हे इतिहासाच्या अधिक व्यापक खंडातले 'प्यादे' ठरले. तिबेटचे भौगोलिक स्थान 'जगाचे छप्पर' असे आहे तर ऐतिहासिक स्थान 'धर्मराज्य' म्हणजे जगात एकमेवाद्वितीय असे होते. काही अंशी तिबेटशी तुलना फक्त व्हॅटिकनशी करता यावी

– तीही काही अंशीच! बौद्ध धर्माचे सर्वोच्च पीठ मानलेल्या तिबेटचा 'धर्मराज्या'चा नि पूर्णतः स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा एकेकाळच्या जगाचा कर्दनकाळ चंगीझखान ह्याने अबाधित राखला होता. चंगीझखान स्वतः बौद्ध (शामाधर्मी) होता आणि तिबेटला जाताना तो सम्राटाची भूमिका सोडून बुद्धाचा सेवेकरी ह्या भूमिकेतून जात असे. चंगीझचा मुलगा कुब्लाखान ह्यानेही पित्याचाच नेम राखला. जग जिंकू पण तिबेटवर ईश्वरी अधिराज्य ठेवू असा जणू अलिखित नियम त्यांनी पाळला. चंगीझखानाचा नातू हलाकूखान ह्याने बौद्ध धर्माचा त्याग करून इस्लामची दीक्षा घेतली. तरीही तिबेटच्या केसालाही धक्का लावू दिला नाही. इस्लामचे अनुयायी बनलेल्या मंगोलांनी, खानांनी आणि तार्तरांनीदेखील ज्या 'धर्मराज्या'चा सतत आदर केला, त्या तिबेटच्या स्वातंत्र्याचा गळा घोटण्याचा डाव खुद्द बौद्ध धर्मीय चीनने आखला, हे दुर्दैवच! चाऊ आणि माओ ह्यांनी तिबेटचा घास घेण्याची खेळी करताना एक चालबाजी केली, तिबेट म्हणजे धर्माचं अधिराज्य, तेथील जनता साधी! पापभीरू, भाबडी, अशिक्षित आणि धर्माच्या पगड्याखाली जीवन घालविणे हे कर्तव्य मानणारी पहाडी माणसं. त्यांचा घास घ्यायचा तर धर्म हेच शस्त्र बनविले पाहिजे हे चिनी राजनीतीने जाणले होतेच. कपटासाठी धर्माचा एवढा धूर्त वापर अन्यत्र घडला नसेल. तिबेटी धर्मपीठाची दोन पदे सर्वोच्च मानली गेली आहेत. सर्वांत श्रेष्ठ म्हणजे अवलोकितेश्वर बुद्ध अर्थात कृपादृष्टीचे छत्र देणारे दलाई लामा आणि ह्या पदाच्या खालोखाल दुय्यम स्थान म्हणजे अमिताभ बुद्ध अर्थात सूर्यासारखा अनंत प्रकाश देणारे म्हणजे पंचेन लामा. सध्याचे दलाई लामा हे १४वे होत. पंचेन लामा हे पद पाचव्या दलाई लामांनी १७व्या शतकात अस्तित्वात आणले. अलीकडेच ज्यांचे निधन झाले ते पंचेन लामा हे ह्या पदावरील ७वे. चीनने डाव टाकला तेव्हा पंचेन लामा पोरवयाचे होते. त्यांना चीनने हाताशी धरले, शेवटचा चिनी सम्राट प्यू यी ह्याचे ब्रेनवॉशिंग जसे केले तसेच ह्या पंचेन लामांचे ब्रेनवॉशिंग केले. त्यांना कळसूत्री बाहुले बनविले आणि दलाई लामांविरुद्ध उठवले. तिबेटी जनतेचा धार्मिक गोंधळ उडविला... पंचेन लामा हेच अधिकृत मानून त्यांच्यातर्फे 'आज्ञा' करण्याचा कट केला... दलाई लामा बधत नाहीत हे पाहून दलाईंच्या अटकेचा हुकूम काढला... तत्त्वनिष्ठ दलाई लामा तिबेटचा सौदा करण्याचा मार्ग झिडकारून भारतात विजनवासी झाले आणि तिबेटचे अधिराज्य चिनी ड्रॅगनने गिळून टाकले. पंचेन लामाच्या मदतीने, पंचेन लामाचे बाहुले करून त्याला चक्क प्याद्यासारखे नाचवून! माओ बोलविता धनी बनला नि पंचेन लामा त्याचा प्रवक्ता बनला. अशा माणसाला शब्दकोशात एकच विशेषण असते, तेच पंचेन लामाला मिळाले– 'गद्दार'!

पंचेन लामाचा जन्म सुनहुआ प्रांतात १९३८ मध्ये झाला. तत्पूर्वी वर्षभर आधी १९३७ मध्ये ६ वे पंचेन लामा कालवश झाले. तेव्हापासून त्या पदाकरिता मृत सहाव्या पंचेन लामांचा आत्मा कोणाच्या शरीरात प्रविष्ट झालेला असावा, ह्याचा तपास चालू

होताच, आणि मृत लामांचा नवा आवतार म्हणून ह्या बालकाची निवड झाली. १९४१ मध्ये त्यांना 'पीतपंथ' लामाची दीक्षा देण्यात आली. रूढीप्रमाणे लामांचे शिक्षण वरिष्ठ दलाई लामांच्या देखरेखीखाली मठात होत असते पण इथं एक चमत्कारिक प्रकार घडला. छोट्या पंचेन लामाला शिक्षण देण्याच्या उद्देशाने दलाई लामांच्या तिबेटी सरकारच्या विरोधाला न जुमानता तिबेटमधून सरळ चीनमध्ये 'फर्बिडन् सिटी' बीजिंग येथे नेण्यात आले. माओ-त्से तुंगच्या कम्युनिस्ट पक्षाने हे पोरगं पाहिलं-हेरलं नि माओनं बहुधा त्याच क्षणी भविष्यातला डाव ठरवला. त्यानंतर चीनमध्ये कम्युनिस्ट सरकार सत्तेवर आल्यावर ह्या डावातले पहिले पाऊल टाकले गेले. बीजिंग आकाशवाणीवर वृत्त आले 'पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाची' स्थापना केल्याबद्दल चेअरमन माओ ह्याचे पंचेन लामांनी तार पाठवून अभिनंदन केले. 'गोष्ट आहे १९५० सालची. त्याच वर्षी २४ नोव्हेंबर रोजी बीजिंग रेडिओवर पंचेन लामांचे भाषण झाले नि त्यात त्याने चेअरमन माओला विनंती केली की, आता त्यांनी तिबेटलाही मुक्त करावे'. हे भाषण करणारा पंचेन लामा तेव्हा १२ वर्षे वयाचा मुलगा होता नि तोंडात तिबेटच्या मुक्तीची भाषा होती. तिबेटला कोणापासून मुक्त करायचे होते? तिबेट मुक्त नव्हते? आवाज पंचेन लामाचाच होता. पण बोलविता धनी माओ होता, हे उघड होते. भाषण ऐकून तिबेटची जनता गोंधळली. तिबेट म्हणजे बुद्धाचे ईश्वरी राज्य. जे ईश्वराच्या नावे दलाई लामांनी व्रत म्हणून सांभाळायचे ते 'मुक्त' करण्याची मागणी एक लामा करीत होता.

ह्या ठिणगीचा पुढे आगडोंब कसा झाला नि १९५९ मध्ये दलाई लामा आणि त्यांचे लक्षावधी अनुयायी विजनवासी बनून भारतात आले हा इतिहास सर्वांनाच ठाऊक आहे. तिबेटमध्ये चीनचे 'मुक्तिसैन्य' (?) घुसले आणि त्यांनी पंचेन लामाचे प्यादे परत वापरले. पंचेन लामाला त्याने केलेल्या कामाचे बक्षीस द्यायचे होतेच. बीजिंगहून पंचेन लामाला माओने तिबेटचा सर्वांत महत्त्वाचा मठ शिगात्से येथील ताशी ल्हुन्पो ह्या मठात आणले. पण तिबेटी जनता त्यांना मानीना. तेव्हा 'तिबेटन ऑटोनॉमस रीजन ऑफ चायना' असा हुद्दा तिबेटला देऊन माओने पंचेन लामाला त्याचा उपाध्यक्ष बनविले व स्वतंत्र 'पंचेन खानपो लेजा' म्हणजे 'पंचेन लामाचे सचिवालय' स्थापले. धर्मसत्तेला राजसत्तेचा आसूड वापरून माओने निष्प्रभ ठरविले. दलाई लामा विजनवासी होताच पंचेन लामा ह्या 'स्वायत्त तिबेट'चा ॲक्टिंग चेअरमन बनला. दि. २० एप्रिल १९५९ रोजी पंचेन लामाचे हे नवे पदग्रहण झाले नि तिबेटच्या मानेला अधिकृतपणे चीनचा फास लागला.

कळसूत्री बाहुल्याने नेहमी दोरीच्या बंधनात राहायचे असते. कक्षेतून बाहेर पडणे हा कठपुतळीचा अपराध असतो. पंचेन लामांचे बालपणापासूनचे धडे पाहता ते तसेच 'नाच्चे' राहतील अशीच अपेक्षा होती पण घडले विपरीत. तिबेटी जनता पंचेन लामाच्या गद्दारीविरुद्ध उठाव करीत राहिली. चीनच्या वर्चस्वाविरुद्ध बंड करीत राहिली नि माओ

ते उठाव चिरडीत राहिला. १९६१ मध्ये एक विलक्षण घटना घडली. पंचेन लामांनी चक्क चेअरमन माओच्या हाती एक मागणीपत्रक दिले. ७०,००० शब्दांचे हे मागणीपत्र होते नि त्यात स्वच्छ लिहिले होते- 'तिबेटमधल्या जनतेचे हाल मला पाहावत नाहीत. त्यांना धार्मिक स्वातंत्र्य द्यावे, त्यांच्यावर चिनी सैनिक व अधिकारी शारीरिक अत्याचार करीत आहेत, ते थांबवावे आणि किमानपक्षी माझ्या तिबेटींना पुरेसे अन्न तरी दिले जावे.' तिबेटमधील कम्युनिस्ट राजवट किती भयानक आहे, हे अशा विलक्षण घटनेने जगाला समजले. माओ आणि पंचेन लामा ह्या संघर्षाला इथं आरंभ झाला. १९६४ च्या ऑक्टोबरमध्ये पंचेन लामांनी कहरच केला. तिबेटची राजधानी ल्हासा येथे तीन मोठ्या धर्मपीठांची परिषद भरवून अधिकृतरीत्या दलाई लामांची (भारतवासी) हकालपट्टी करायची असा डाव चीनने टाकला होता. सेरा, द्रेपुंग व गेडन ह्या तीन पीठांचे प्रमुख जमले. अध्यक्ष पंचेन लामा उठले नि त्यांनी कडेलोट केला, 'आपणा सर्वांचे गुरू दलाई लामा ह्यांना दीर्घायुरारोग्य लाभून ते एक दिवस मुक्त तिबेटमध्ये परत येवोत' अशी प्रार्थना पंचेन लामांनी केली. ह्या प्रमादाबद्दल अटक अटळ होती. त्याच दिवसापासून पंचेन लामांच्या वाट्याला १२ वर्षांचा तुरुंगवास आला, त्यांची खिल्ली उडविणारे खटले, कारागृह, श्रम आणि यातनाच्या छावण्या त्यांच्या वाट्याला आल्या. त्यांच्या घरावर छापे पडले, त्यांच्या ताब्यातील बौद्ध धर्मातील काही महत्त्वाचे ग्रंथ आगीच्या भक्षस्थानी पडले. पंचेन लामांना त्यांनी चीनशी केलेल्या गद्दारीबद्दल मारझोड झाली. तीक्ष्ण हत्याराने त्यांच्या एका कानाचा पडदा फाडण्यात आला. डावा हात असा पिरगळण्यात आला की, तो कायमचा निर्जीव होऊन लोंबत राहिला. हा काळ तर सांस्कृतिक क्रांतीचा म्हणजे माओ पत्नीच्या चांडाळ चौकडीचा होता! पंचेन लामा हाल सोशीत राहिले. अखेर डेंग सियाओ पिंग ह्यांच्या राजवटीत त्यांची १९७७ मध्ये मुक्तता झाली. अर्थात तीही सहेतुकच! पंचेन लामा व दलाई लामा ह्यांच्यात वाटाघाटी करवून तिबेटी जनतेचा उद्रेक थांबविण्याचे नव्या राजवटीने ठरविले होते. १९५९ नंतर प्रथमच उभयतांत निरोप गेले, भेट झाली नाहीच.

तिबेटच्या मुक्तीच्या बाजूने जगाचा कौल पडण्याची चिन्हे दिसू लागली तेव्हा १९८९ च्या जानेवारीत पंचेन लामा शिगात्से येथे पुनश्च मोकळेपणी बोलले. दलाई लामांच्या सत्तेचा मान राखून तिबेट स्वतंत्र झाले पाहिजे असे मनातले बोल बोलले नि योगायोग ठरावा तसे त्यानंतर दोनच दिवसांनी ५१ वर्षे वयाचे पंचेन लामा हृदयविकाराने मृत्यू पावल्याची घोषणा चीनने केली. तिबेटी जनता हा मृत्यू मानण्यास तयार नाही. हा खून आहे, असा तिबेटींचा दावा आहे. एकेकाळच्या गद्दाराला ते आता 'देशप्रेमी' मानतात. लामाने कडक ब्रह्मचर्य पाळायचे असते, पंचेन लामा त्याला अपवाद ठरले. त्यांनी एका चिनी स्त्रीशी विवाह केला होता व त्यांना एक कन्याही आहे. त्यांच्या ह्या पत्नीने व मुलीनेही ह्या मृत्यूबाबत पुसट शंका व्यक्त केली. अर्थात आवाजाची मुस्कटदाबी करणे फार सोपे

असते... ज्यांनी धर्मपीठाच्या नेत्याला कळसूत्री बनविले त्यांना विद्रोहाचा आवाज बंद करणे म्हणजे हाताचा मळ असतो.

६/२/८९

***

## ४५

※

# सारी माणसाची करणी

**पूर्वी** प्लेगची लागण झाली की, उंदीर आणि माणसे ह्यांच्यात जणू मरण्याची स्पर्धा सुरू होई नि मग शहराचे आबोआब बिघडले असे जाणून लोक गावाबाहेर तात्पुरत्या वसाहती करीत. प्लेग, देवी आता इतिहासजमा झाले, त्यांच्यावर पाश्चर-जेन्नरादी उतारे रामबाण ठरले, म्हणजे माणसाने एकपरीने विजय मिळवला. पण माणसाच्याच 'कर्तृत्वा'ने नवा प्लेग आता जग ग्रासू लागला आहे. हा प्लेग आहे प्रदूषणाचा– दूषित पर्यावरणाचा! हा विषय रिचर्ड सेंट बार्ब बेकर ह्यांच्यापासून सुंदरलाल बहुगुणांपर्यंत आणि 'ग्रीनपीस'पासून आपल्या देशी मेनका गांधीपर्यंत अनेक थोरामोठ्यांचा होता आणि आहेही! त्यावर नवे ते काय असणार? भोपाळच्या युनियन कार्बाईडचा प्रताप ज्या देशाने अनुभवला आहे त्यास प्रदूषणाबाबत आणखी काय सांगावे? पण ह्या विषयाबाबत पूर्व युरोपची स्थिती अत्यंत धक्कादायक आहे. सर्वत्र आयुर्मान वाढत असताना एका देशात मात्र आयुर्मान घटण्याचा विक्रम होत आहे– तो देश आहे पोलंड– लेक वॉलेसा व सॉलिडॅरिटीचा पोलंड जगात सर्वाधिक प्रदूषित ठरण्याचा उच्चांक गाठत आहे.

आज सॅटलाईटने पोलंडची जी चित्रे दिली आहेत, ती कोणालाही अंतर्मुख करणारी आहेत. माणसाच्या शरीरात कर्करोगाचा ट्यूमर व्हावा तसा जगाच्या वातावरणात सर्वांत प्रचंड ट्यूमर स्थिरावला आहे– हा कर्करोग कारखान्यातील वायू, धूर आणि त्याज्य पदार्थ ह्यांचा आहे नि तो पोलंडवर सतत छत्र धरून आहे, असे भयावह चित्र सॅटलाईटमधून

आले आहे.. पोलंडची भौगोलिक स्थिती अशी विचित्र आहे की, शेजारच्या पूर्व जर्मनी व झेकोस्लोव्हाकिया ह्या देशांतील सर्व औद्योगिक प्रदूषण बिचाऱ्या पोलंडवर केंद्रित झाले आहे. इतकेच काय पण पोलंडच्या कार्कोनोझ पर्वतराजीवर गिर्यारोहण करणाऱ्यांना आता ह्या कर्करोगाचा वासही येऊ लागला आहे. येथील हिमवृष्टी आम्लयुक्त होऊ लागली आहे. ह्या परिसरातील जलाशयांतील मासे आधी मेले नि आता जलाशये मरू लागली आहेत. अणुस्फोटाचा तडाखा बसल्याप्रमाणे झाडे कोळपली आहेत आणि एकेकाळी हिरव्या वनश्रीबद्दल प्रसिद्ध असलेल्या पोलंडमधील केवळ १७ टक्के वृक्षराजी आज निरोगी अवस्थेत आहे.

पोलंडच्या ह्या अवस्थेला रशिया कारणीभूत झाला. पोलंडमध्ये कोळसा मुबलक आहे, हे कळताच रशियाचा औद्योगिक जुलूमही राजकीय जुलमाबरोबरच सुरू झाला. अधिकाधिक उत्पादनाची हाव, पण तंत्रज्ञान मात्र १९ व्या शतकातील, असे विचित्र धोरण रशियाने पोलंडमध्ये राबविले. परिणामी पोलंडचे कारखाने पश्चिम युरोपीय कारखान्यांपेक्षा तीन पट अधिक ऊर्जा खातात आणि १० ते २० पटीने अधिक प्रदूषण करतात. दर चौरस मैलात ८ कारखाने असे प्रमाण पडले तर प्रदूषण टाळणार कसे? आज परिस्थिती अशी आहे की, अपर सिलेसिया, क्रॅकोव आणि डान्स्क येथे कपडे उघड्यावर वाळविता येत नाहीत, इतकी हवा प्रदूषित झाली आहे. पोलीश जनतेला बागबगिच्यांची हौस दांडगी होती पण ह्या पट्ट्यातील रहिवाश्यांनी लावलेल्या वाफ्यातून आता जी गाजरे, कोबी आणि बीट उगवते ते किलोमागे २०० मिलिग्रॅम एवढा शिशाचा अंश असल्याने निरुपयोगी ठरत आहे. काही लोक ह्या भाज्या अजून विकतात, खातात आणि परिणामी ह्या भागातील मुलांची वाढ अपुरी होत आहे, स्मृती कमी होणे, मतिमंदपणा, रक्तक्षय ह्यांचे वाढते प्रमाण पाहून अखेर गावातील 'हॉट स्पॉट' असलेले सर्वाधिक प्रदूषित टापू दर्शविणारे नकाशे छापण्याची व्यवस्था करावी लागली आहे.

गेल्या ४५ वर्षांत प्रथमच १९८९ च्या सप्टेंबरमध्ये निवडणूक होऊन पोलीश जनतेला त्यांचा देश खऱ्या अर्थी परत मिळाला, पण निरोगी अवस्थेत नव्हे. युरोपातील सर्वांत आजारी देश आज पोलंड आहे. पोलंडची हवा, जमीन, पाणी आणि जनता सारेच रोगग्रस्त झाले आहेत. शिसे, कॅडमियम, झिंक, लोह, मॅग्नेशियम, तांबे, निकल, क्रोमियम, सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड, फ्लोरीन, फिनॉल, फॉर्मल्डीहाईड, अमोनिया... हे सर्व पदार्थ पोलंडच्या जनतेला खावे लागत आहेत, हुंगावे लागत आहेत. पोलंडच्या सल्फर डायऑक्साईडचा उपसर्ग आता स्वीडन व फिनलॅण्डपर्यंत पोचल्याने ह्या दोन्ही देशांनी ह्या घटकावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलंडला अर्थसाहाय्य देऊ केले आहे. कॅन्सरचा मोठा धोका ज्या रसायनापायी होऊ शकतो ते बेंझो-अल्फा-पायरीन तर इथे वातावरणात दाटून राहते.

बेंझो-अल्फा-पायरीन जर १० युनिटपर्यंत असेल तर मानवी शरीर त्यावर मात करू शकते पण पोलंडमधील झाबर्झी ह्या शहराचे नष्टचर्य असे की, तेथे दोन प्रचंड कोक कारखाने, कोळसा खाणी धडधडत आहेत आणि ह्या रसायनाचे वातावरणातील प्रमाण १०० ते २२८ युनिटस् एवढे तीव्र बनले आहे. त्यामुळे आज झाबर्झी येथे एखाद्या स्त्रीला दिवस गेले की, ती धास्तावते. एरवी अपत्याची चाहूल लागताच मातापिता त्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने रंगवू लागतात तर झाबर्झीला साफ वेगळे चित्र आहे. पिता नोकरी बदलण्याची, गाव सोडण्याची खटपट करू लागतो... अर्थात बहुधा तो प्रयत्न असफलच ठरतो कारण अखेर पोटाची लढाई महत्त्वाची ठरते आणि होणारी माता आपल्या मुलाला कोठला कॅन्सर होणार ह्या भीतीने झोप हरवून बसते. झाबर्झीच्या जवळजवळ प्रत्येक बालकाला रक्तकर्करोगाने ग्रासले आहे. गेल्या १३ वर्षांत झाबर्झीची मुले शाळेऐवजी रुग्णालयातच अधिक असतात... अशक्त, पांढरी फटफटीत पडलेली... डोक्यावर केस नाही... १३ वर्षांच्या आतील ही बालके ह्या अशा अवस्थेत हॉस्पिटलमध्ये पाठीच्या कण्यात इंजेक्शन घेण्यासाठी प्रतीक्षा करीत असतात. १९७० पासूनचा पोलंडचा अहवाल पाहता मानवी आयुर्मान १९५० च्या आकड्यापर्यंत घटलेले आढळते.

आपल्या मायभूमीची ही अवस्था पाहून १९८० मध्ये प्राध्यापक गुमिन्स्का ह्यांनी पोलीश इकॉलॉजी ग्रूप स्थापन केला व प्रदूषणाबाबत जनमत जागवायला आरंभ केला पण१९८१ मधील लष्करी कायद्याच्या अंमलामुळे ह्या गटावर अनेक बंधने आली. आज पोलंडमध्ये असे २००० गट स्थापन झाले आहेत आणि ह्याच गटाच्या लढ्यामुळे क्रॅकोव येथील ॲल्युमिनियम कारखाना बंद झाला आहे. ह्या कारखान्यातून एवढे फ्लोरीन बाहेर पडत होते की, गावातील गुरे व घोडे चालता चालता झोकांड्या खात होते.

पोलंडची ओड्रा ही नदी झेकोस्लोव्हाकियामुळे प्रदूषित होऊन मृतप्राय झाली आहे तर सुप्रसिद्ध विस्तुला नदी इतकी प्रदूषित झाली आहे की यंत्रांनाही तिचे पाणी चालत नाही. सुमारे १०,००० कारखान्यांतील कचरा ह्या नदीत सोडला जातो. प्रदूषणाच्या फटक्यापासून काही काही वाचलेले नाही. पोलंडमधील प्राचीन सुंदर पुतळे कुष्ठरोगाने नाक, कान खावे तसे विद्रूप होऊ लागले आहेत. जलचर प्राणी मरणे नित्याचे झाले आहे . नद्या मृत होत आहेत, बाल्टिक समुद्रालाही पोलंडच्या प्रदूषणाचे ग्रहण लागत आहे. मुले अपुऱ्या दिवसाची जन्मत आहेत, त्यामुळे प्रीमेच्युअर बेबीज क्लिनिक्सची संख्या फुगत आहे नि डॉक्टर्स उद्विग्नपणे म्हणत आहेत 'ऑक्सिजनच्या सिलिंडरमध्ये शुद्ध ऑक्सिजन असेलच ह्याची ग्वाही देता येत नाही.'

पोलंडचे प्रदूषण हळूहळू युरोपची समस्या बनणार हे ओळखून जागतिक बँकेने पोलंडचे कारखाने आधुनिक व सुरक्षित बनविण्यासाठी २०० मिलियन डॉलर्सचे कर्ज दिले आहे. अर्थात ही मदत अत्यल्प ठरावी पण त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्याची मुहूर्तमेढ झाली

आहे. १९९० च्या जून अखेरपर्यंत पोलंडच्या सर्व कारखान्यांनी आपले सध्याचे आराखडे काहीही न लपविता सादर केले पाहिजेत, असे जाहीर झाले आहे. जणू प्रदूषणाशी युद्ध सुरू केले आहे. पण नफेखोर कारखानदार बदलू इच्छित नाहीत. त्यांना वठणीवर आणले पाहिजे. सध्या तरी त्रस्त पोलीश जनतेपुढे एकच पर्याय आहे नि तो म्हणजे वायलिङ्का येथील क्षारांच्या खाणीत काही दिवस वास्तव्य करणे– क्रॅकोवजवळील ह्या खाणीत दरवर्षी ११०० नागरिकांची वास्तव्यासाठी निवड होते. भूपृष्ठापासून २०० मीटर खोल अशा ह्या खाणीत ब्रॉंकायटीस व दम्याने पछाडलेले रोगी उतरविले जातात... आत शिरताच दाटलेला कफ मोकळा सुटू लागतो आणि रक्तशुद्धीकरणाची प्रक्रिया नैसर्गिकरीत्या सुरू होते. खाणकामगारांना घेऊन जाणारे गेल्या शतकातील पिंजरे आजही ह्या खाणीत आहेत पण हा धोका पत्करूनही तेथे जायला मिळावे म्हणून अक्षरशः लाखो माणसे प्रतीक्षा यादीवर खोळंबून राहतात. वास्तविक ही १३ व्या शतकातील खाण... पण हा 'खाणोपचार' कामी आला आहे. त्यामुळे दर तीन आठवड्यांसाठी ६० रुग्ण (मुले अधिक) निवडले जातात. तीन आठवड्यांत हे रुग्ण कमालीचे सुधारतात. मात्र बाहेरच्या जगात आल्यावर ह्या उपचारांचा परिणाम फक्त ६ महिने टिकतो.

—पोलंड खरे तर दोन आघाड्यांवर लढत आहे. ४५ वर्षांनंतर प्रथम लोकशाहीची पहाट पाहणारी पोलीश जनता व सरकार स्थैर्यासाठी लढत आहे नि ४५ वर्षांत रशियाच्या दंडेलीपायी स्वतःच्या देशातील शुद्ध हवाही हरवून बसलेले हे राष्ट्र पर्यावरणासाठी झुंजत आहे. कर्करोगग्रस्त, दमेकरी, खोकल्याची उबळ येणारी मुले, अपुऱ्या दिवसावर जन्मलेली मुले... त्वचारोगापासून आनुवंशिक रोगांपर्यंत सर्व प्रकारच्या विकारांनी ग्रासलेले नागरिक आता जागे झाले आहेत.

१४/५/९०

***

# ४६

※

# विव्हा फिडेल

व्यक्तिमत्त्वात 'करीश्मा' फार महत्त्वाचा घटक आहे. तो सर्वांनाच लाभतो असे नाही. तशी ही चीज देवदुर्लभच! काहींना तो इतका भरून मिळतो की, मृत्यूनंतरही करीश्मा कायम राहतो. उदाहरणार्थ जॉन केनेडी, चार्ल्स द गॉल, दाग हॅमरशील्ड असे काही मोजके भाग्यवंत. सध्याच्या जागतिक लौकिकप्राप्त व्यक्तींमधील 'करीश्मा'धारी मंडळींमध्ये मिखाएल गोर्बाचेव्ह, फ्रान्स्वा मितराँ, पोप जॉन पॉल तिसरे, मदर तेरेसा, केनिथ कौंडा आणि डॉ. फिडेल कॅस्ट्रो ह्यांचा समावेश होतो. कॅस्ट्रो ह्यांच्या कामगिरीबाबत दुमत जरूर असू शकते; पण त्यांचा करीश्मा वादातीत आहे आणि १९८९ हे वर्ष फिडेल कॅस्ट्रो ह्यांच्या खेळीने गाजले. पहिली खेळी नामीबिया ह्या आफ्रिकी राष्ट्राच्या स्वातंत्र्याची. अर्थात त्यात कॅस्ट्रो हे एकमेव श्रेयाचे मानकरी नव्हेत. दि. १ एप्रिल १९८९ रोजी स्वतंत्र होत असलेल्या नामीबियाचे खरे तारणहार आहेत ते चेस्टर क्रॉकर – संयुक्त राष्ट्रांच्या आफ्रिकी घडामोडींचे विशेष उपसचिव चेस्टर क्रॉकर हे ह्या स्वातंत्र्याचे शिल्पकार नि त्यात दुय्यम कामगिरी बजावली रशियाच्या मिखाएल गोर्बाचेव्ह ह्यांनी. नामीबियावरील ७५ वर्षांचा वर्णद्वेषी दक्षिण आफ्रिकेचा अंमल संपुष्टात आणायचा, नामीबियात २२ वर्षे चाललेले गनिमी युद्ध संपवायचे आणि गेली १३ वर्षे नामीबियात घुसलेल्या दक्षिण आफ्रिकी व क्युबन सेनांना परत पाठवायचेच असा निश्चय चेस्टर क्रॉकर व गोर्बाचेव्ह ह्यांनी केला होता. क्युबाचे सर्वेसर्वा डॉ. फिडेल कॅस्ट्रो ह्यांनी ह्या निर्णयाला सुरुवातीपासून सहकार्य दिले होते. आता

२७ महिन्यांच्या मुदतीत क्युबाचे ५०,००० सैनिक मायदेशी परततील व दक्षिण आफ्रिकी सैन्यही माघारी जाईल. नामीबियामध्ये तसेच काही वर्षांपूर्वी ग्रानडा ह्या छोटेखानी देशात सैन्य रवाना करण्याची कार्यवाही करून डॉ. फिडेल कॅस्ट्रोंनी जगाला धक्काच दिला होता. एकूणच धक्के देण्यात हा माणूस वाकबगारच म्हणायचा! मोजून तीस वर्षांपूर्वी असाच अविश्वसनीय प्रकार फिडेल कॅस्ट्रोंनी केला होता.

रविवार दि. ८ जानेवारी १९८९ रोजी डॉ. फिडेल कॅस्ट्रो ह्यांच्या क्युबातील सत्ताग्रहणास तीस वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने दि. ४ डिसेंबर १९८८ रोजी डॉ. फिडेलनी मेक्सिकोला भेट देऊन म्युझियमची उभारणी केली. कॅस्ट्रो आणि त्यांची क्रांती ह्या तिसाव्या वर्धापनदिनानिमित्त पुनश्च वृत्तपत्रादी माध्यमांचा विषय झाली आहे. तीस-बत्तीस वर्षांपूर्वी क्युबामध्ये डाव्या-उजव्यांची सुंदोपसुंदी चालूच होती. क्युबाच्या सत्तास्थानी हुकुमशहा फुल्जेन्सिओ बॅटिस्टा होते आणि फिडेल कॅस्ट्रो ह्या बॅटिस्टा राजवटीचे कट्टर विरोधक होते. भूमिगत राहून लढा देत होते. त्यात सरकारी लष्करी तळांवरचे हल्ले होतेच. १९५३ चा मोन्कॅडा बराकींवरील कॅस्ट्रोंनी चढविलेला हल्ला नि त्यातून उद्‌भवलेला खटला हे प्रकरण कॅस्ट्रोंच्या आयुष्यातील एक सनसनाटी अध्याय ठरावा. तर त्याहीपेक्षा साहसी कृती कॅस्ट्रोंनी १९५६ मध्ये केली. कॅस्ट्रोंना क्युबाबाहेर राहून लढा देणे अपरिहार्य ठरले. तेव्हा मेक्सिकोमधून लढाई चालू ठेवण्याचे निश्चित झाले. मेक्सिकोच्या आखातात ते कसेबसे पोहोचले. बरोबर ८२ क्रांतिकारक गनिम होते. ह्या प्रवासात ही सर्व मंडळी एवढी आजारी झाली होती की, क्युबामध्ये आवई उठली – 'फिडेल कॅस्ट्रो आणि त्यांचे ८२ जिवलग सैनिक मरण पावले.' आपला विरोधक संपला ह्या आनंदात बॅटिस्टा सरकार राहिले. पण त्यांचा आनंद फार काळ टिकला नाही. प्रत्यक्षात ही अफवा खुद्द कॅस्ट्रोंनीच उठवली होती, असे म्हटले जाते. दि. २५ नोव्हेंबर १९५६ रोजी कॅस्ट्रो आणि त्यांचे सहकारी 'ग्रॅनमा' ह्या तीन मीटर लांबीच्या शिडाच्या नौकेतून मेक्सिको सोडून क्युबाच्या दिशेने निघाले आणि सात दिवसांच्या सागरी यात्रेनंतर २ डिसेंबर १९५६ रोजी क्युबाच्या पूर्व किनाऱ्यावर पोहोचले. ह्या क्षणापर्यंत कॅस्ट्रोंची गणना 'मृतां'मध्ये झालीच होती. कॅस्ट्रो व त्यांच्या मित्रांनी सिएरा मेस्त्रा ह्या दुर्गम पर्वतराजीत आश्रय घेतला आणि ह्या प्रदेशातून बॅटिस्टा सरकारशी सतत २५ महिन्यांची झुंज चालू ठेवली. मात्र तरीही कॅस्ट्रो जिवंत आहेत, असे सत्ताधाऱ्यांना वाटले नाही.

दि. ८ जानेवारी १९५९ रोजी क्युबाची राजधानी हॅवाना येथे लष्कराच्या जीप आणि मोटारींचा ताफा प्रवेशला. त्यात होते उमदे, हसतमुख डॉ. फिडेल कॅस्ट्रो आणि त्यांचे ८२ जिवाभावाचे क्रांतिकारक! सगळे तस्सेच गणवेषातले! मृत म्हणून घोषित झालेला आपला लाडका क्रांतिवीर प्रत्यक्ष पाहून क्यूबन जनता हर्षाने वेडी झाली. एवढे प्रचंड स्वागत क्वचित कोणाचे झाले असावे. ह्या घटनेला तीस वर्षे होऊनही एकेकाळी ज्यांच्या बाबतीत

मरण पावल्याची अफवा उठली होती ते फिडेल कॅस्ट्रो ह्यांचे आसन बळकट आहे.

कॅस्ट्रो म्हणजे गडगडून हसणारे, धिप्पाड, सिगरेटचा थोरला भाऊ जो 'सिगार' – तीही हॅवनाच्या जगप्रसिद्ध कडक तंबाकूपासून बनवलेली – त्या सिगारचे सतत सान्निध्य. अंगावर लष्करी गणवेष कायम. चालणंदेखील इन्फन्ट्रीतल्या फौजीसारखं कमालीचं वेगवान. एकूणच रगेल आणि रंगेल व्यक्तिमत्त्व. त्यांचे मित्रदेखील त्यांच्यावर मनापासून प्रेम करणारे नि हे दोस्तसुद्धा सबंध जगाच्या कौतुकाचा विषय झालेले. उदाहरणार्थ, विसाव्या शतकाचा आदर्श क्रांतिकारक चे गेव्हरा हा कॅस्ट्रोंचा परममित्र. फिडेल आणि चे गेव्हरा एकेकाळी तरुणांची दैवते होती. तर शतकातला नाटककार टेनसी विल्यम्स कॅस्ट्रोचा मोठा हितचिंतक. टेनसी अमेरिकन तर कॅस्ट्रो अमेरिकेच्या बदनाम यादीतील नंबर एकचा शत्रू पण टेनसी विल्यम्सचं नाटक लिहून झालं की, मूळ लेखनाची एक प्रत फिडेल कॅस्ट्रोंकडे रवाना होई नि कॅस्ट्रो बारकाईने ती अभ्यासत. कॅस्ट्रोंचे साहित्यप्रेम हा एक प्रदीर्घ चर्चेचा विषय व्हावा. आजचा सर्वश्रेष्ठ साहित्यिक म्हणजे गेब्रिएल गार्सिया मार्कीझ (नोबेलविजेते). मार्कीझची प्रत्येक साहित्यकृती आधी कॅस्ट्रोंकडे रवाना झालीच पाहिजे अन् कॅस्ट्रोच्या भाषेत सांगायचं तर 'मार्कीझनं शंभर खून करावेत नि एक कादंबरी लिहावी. सर्व गुन्हे माफ!' आज तीस वर्षांत कॅस्ट्रो बदलले आहेत. दाढी पांढरी झालीय, चालण्याचा वेग मंदावलाय नि तब्येतीच्या कारणास्तव सिगारचे सख्य साफ सुटले आहे. पण सतत तीस वर्षे अमेरिकेशी वैर कायम ठेवून सत्ता राखणे सोपे नव्हे. जॉर्डनचे राजे हुसेन, पॅरग्वेचे स्ट्रोसनर, झांबियाचे केनिथ कौंडा आणि सिंगापूरचे ली कुआ यू अशी मोजकीच मंडळी सत्ता टिकवण्याबाबतीत कॅस्ट्रोची बरोबरी करू शकतील. पण ही बाकीची मंडळी फिडेल कॅस्ट्रोच्या तुलनेत सुरक्षित जीवन जगत आहेत. कॅस्ट्रोंनी आजवर कशाला तोंड दिलेले नाही ते विचारावे? अमेरिकेने पुरस्कृत केलेले एक आक्रमण, अमेरिकेचे अगणित छोटे हल्ले, घातपाती प्रकार, अमेरिकेने आर्थिक कोंडी करण्यासाठी केलेले अथक प्रयत्न आणि सी. आय. ए. मार्फत झालेले कॅस्ट्रोच्या खुनाचे प्रयत्न...! कॅस्ट्रोच्या मते सी. आय. ए. ने त्यांच्या हत्येचे २४ प्रयत्न केले आहेत. तथापि सी. आय. ए. ने असे आपण फक्त नऊ प्रयत्न केले असल्याचे मान्य केले आहे.

हे नऊ प्रयत्न पाहता तद्दन मूर्खपणाचा प्रकार वाटावा. डॉ. कॅस्ट्रो जेथे पोहायला जातात, तेथे एका सुंदर शिंपल्यात बॉम्ब ठेवणे हा त्यातला एक प्रकार होता. कॅस्ट्रो उत्कृष्ट ड्रायव्हर आहेत. ड्रायव्हिंग करताना ते जो पोषाख वापरतात त्याला चक्क छुप्या रीतीने क्षयरोगांच्या जंतूंचा संसर्ग करण्याचा उपद्व्याप सी. आय. ए. ने केला होता. त्यांच्या सिगारमध्ये जहाल विष मिसळण्याचा प्रकार झाला होता. एका जर्मन मैत्रिणीतर्फे त्यांना विषारी कॅप्सूल देण्याचाही बेत होता, पण तो फसला. एक प्रकार तर अचाटच होता. कॅस्ट्रोंची हत्या न करता त्यांची जनमानसातील प्रतिमा काजळून टाकण्याचा घाट घातला

गेला. कॅस्ट्रो-अभ्यासकांचा निष्कर्ष असा होता की, त्यांच्या लोकप्रियतेचे गमक त्यांच्या गणवेषात नि त्यांच्या दाढीत आहे. आता गणवेषाचे त्रांगडे कसे हाताळायचे? तेव्हा गणवेष डोळ्याआड करून बेत असा शिजला की, कॅस्ट्रोंना त्यांचे लष्करी बूट स्वतः झटकण्याची सवय आहे. तेव्हा त्यांच्या बुटावर थॅलियम क्षारांची पावडर पसरायची... कॅस्ट्रो बूट झटकून किंवा ते पायात चढवून जेव्हा स्वतःची दाढी ठाकठीक करतील, तेव्हा थॅलियमच्या प्रक्रियेने दाढी गळूनच जाईल. तथापि हाही बेत असफल झाला असावा. कारण कॅस्ट्रोंची दाढी कायम आहे. कोणाला हे सर्व पोरखेळच वाटतील. तथापि २० नोव्हेंबर १९७५ रोजी अमेरिकेने प्रकाशित केलेल्या गुप्तचर हालचालींबाबतच्या अमेरिकन सेनेटच्या एका अहवालात हा सर्व प्रकार अत्यंत रंजक पद्धतीने नमूद झाला आहे. एकूण ही चित्तरकथा पाहता डॉ. फिडेल कॅस्ट्रो म्हणजे पुरून उरलेले क्रांतिवीर ठरावेत. म्हणूनच ज्या मेक्सिकोतून त्यांनी क्रांतीचा नारा दिला, त्या टक्सपॅन नदीकिनारी मेक्सिकन-क्यूबन मैत्रीदर्शक म्युझियमची त्यांच्या कारकीर्दीच्या तिसाव्या वर्धापनदिनानिमित्त मेक्सिकोचे अध्यक्ष कार्लोस सलीनास दी गोर्तारी ह्यांनी डॉ. कॅस्ट्रो ह्यांच्याच हस्ते पायाभरणी केली.

२/१/८९

***

## ४७

※

# बेटी डेव्हिस

संस्कृत साहित्यात सुंदर स्त्रियांचे आठ प्रकार मानले गेले आहेत– हस्तिनी, नागिणी, चित्रिणी वगैरे...! त्यातील 'नागिणी' ह्या प्रकाराची कल्पना करायची असेल तर डोळ्यांसमोर नुकतीच निधन पावलेली ८१ वर्षे वयाची बुजूर्ग अभिनेत्री बेटी डेव्हिस आणावी... दुसरे योग्य उदाहरण नाहीच. मूर्तिमंत नागिणीच होती ती! वाढत्या वयाबरोबर माणसं निवळू लागतात, अगदी कोपिष्ट दुर्वासही थोडे का होईना मवाळ होतात, असा एक समज आहे, तो बेटी डेव्हिसने पार खोटा ठरविला. आठ दशकं पार करूनही ह्या अभिनेत्रीचा फणका कमी झाली नाही की, उद्धटपणा सौम्य झाला नाही. वयपरत्वे डोळ्यांतले तेज कमी झाले, पण स्वभावातला तेजाब उतरला नाही. तऱ्हेवाईकपणा उलट वाढतच गेला आणि नागिणीचा डंख म्हणून जिचे वर्णन केले जाईल ती बेटीची तिखट जीभ जणू त्यात ऐंशी वर्षांचे जहर मुरले असावे, अशीच स्फोटक राहिली.

बेटी डेव्हिस म्हणजे भांडखोर, अखंड तंणतणणारी, कजाग, बोलभांड नि कधीही कोठल्याही प्रश्नाला सरळ उत्तर न देणारी बाई. ही नटी झालीच कशी, असा ह्या कीर्तीवरून कोणालाही प्रश्न पडावा. किंबहुना हिचा तिखटपणा हॉलिवुडने कसा चालवून घेतला, असेही मनात येते. त्यातही रूपाने प्रतिमदनिका असलेल्या, निर्माते-दिग्दर्शकांपासून प्रेक्षकांपर्यंत सर्वांचीच निंद हराम करणाऱ्या एखाद्या रूपगर्विता अभिनेत्रीच्या बाबतीत असा भांडकुदळपणा सहन करणे एक वेळ समजू शकते पण बटबटीत डोळ्यांच्या, मूषकरंगी

केसांच्या आणि सर्वसाधारण रूपाच्या नटीचे असे वागणे का खपवून घेतले गेले? कारण ती बेटी डेव्हिस होती म्हणून... ती मदनिका नव्हती, रूपवती नव्हती पण अत्यंत बुद्धिमान होती आणि अभिनयासाठी एकदा कॅमेरामनच्या समोर उभी राहिली की, ती बेटी डेव्हिस राहात नसे... तिला फारशा मार्गदर्शनाची गरज पडत नसे, बेटी डेव्हिस जन्मतःच अभिव्यक्तीची देणगी घेऊन आली होती. तिला फक्त तिची भूमिका सांगायची नि हातात संवादांची प्रत द्यायची.. बेटी डेव्हिस पुढचे निभावीत असे. रूपाचे फारसे वरदान नसलेल्या कॅथरीन हेपबर्न आणि ऑड्री हेपबर्न दोघी केवळ अभिनयाच्या भांडवलावर हॉलिवुडच्या चंदेरी दुनियेत नावारूपाला आल्या. कॅथरीन हेपबर्नने तर ऑस्कर पारितोषिकांचा विक्रम केला. त्याच हॉलिवुडने बेटी डेव्हिसच्या अभिनयगुणाला दाद द्यावी, हे सहज होते. बेटी डेव्हिसचा विक्रम म्हणजे ऑस्करसाठी एकूण दहा वेळा तिचे नाव सुचविले गेले. बेटीने दोन ऑस्कर्स जिंकली.

ज्या अभिनेत्रीमुळे चित्रपटांना खचाखच गर्दी होई, त्या नट्यांना हॉलिवुडचे दोन परवलीचे शब्द होते – 'कॅशबॉक्स' आणि 'बॉक्स ऑफिस पॅशन', बेटीच्या पडद्यावरील अभिनयाचे दर्शन घेऊन नि तिच्या तिखटपणाचा अनुभव घेऊन बेटीबाबत एक तिसराच शब्द जन्मला – 'बॉक्स ऑफिस पॉयझन.' 'तुझे डोळे टपोरे आहेत', असे तिला कोणी सहज म्हटले तरी ही ताड्‌दिशी उत्तर देई, – 'म्हणजे बटबटीत आहेत, असंच म्हणायचंय ना?' बोलणारा बिचारा गपगार होई. तिच्यासह काम करणं हा एक तापदायक प्रकार असे; पण तिला वगळूनही चालत नव्हतं कारण बेटी डेव्हिसचं स्वतःचं एक वेगळं अपील होतं.

बेटी डेव्हिसला अभिनेत्री बनविण्याचे श्रेय वॉर्नर ब्रदर्सचे. वॉर्नर ब्रदर्सशी तिने करार केला होता. तिच्या तिखट जिभेमुळे ही कंपनी हैराण झाली. तसा तिने हा करार मोडला. मग कोर्टकज्जे झाले... बेटी परत ह्या कंपनीत आली तेव्हा वॉर्नर ब्रदर्सनी तिचे प्रचंड स्वागत केले. त्यावर 'मूर्ख माणसांचा सहवास माझ्या नशिबी लिहिलाय' अशी बेटीची प्रतिक्रिया आली. ह्याच तिखटपणामुळे बेटीने एक सर्वोत्कृष्ट भूमिका गमावली होती. डेव्हिड सेल्झनिकने एका चित्रपटाची तयारी चालविली आहे नि कृशांगी पण समर्थ अभिनेत्रीच्या शोधात तो आहे, एवढं ऐकल्यावर खरे तर ह्या अभिनेत्रीने काहीही तारे तोडायची गरज नव्हती पण तिने ते तोडले. ह्या भूमिकेशी सेल्झनिककडे अनेकांनी बेटी डेव्हिसची शिफारस केली होती.सेल्झनिकही तिचा विचार करू लागला होता अन् बेटीचे शेरे त्याच्या कानी गेले नि त्याने तिचे नाव यादीतून काढूनच टाकले. ही भूमिका त्याने विव्हियन लीकडे सोपविली, चित्रपट होता 'गॉन विथ द विंड' नि भूमिका होती 'स्कार्लेट ओ हारा'ची! बेटीने जणू हिरा गमावला होता, आणि विव्हियन लीने ही भूमिका अजरामर केली. ती बेटीने कशी केली असती, हा न संपणाऱ्या वादाचा विषय होऊ शकेल. पण बेटी डेव्हिसनेही एक भूमिका अमर केली. त्या भूमिकेसाठी तिला कष्ट घ्यावे लागलेच नाहीत; कारण तिच्या स्वभावातील

नैसर्गिक तुसडेपणा, तऱ्हेवाईकपणा, संताप ह्यांना मिळतीजुळती अशीच ही व्यक्तिरेखा होती. ही भूमिका बेटीने अशी अफलातून वठविली की, आज एवढ्या वर्षांनंतर त्या भूमिकेसाठी एखादी अभिनेत्री उभी राहिली तर तिला बेटी डेव्हिसचा चित्रपट अभ्यास म्हणून पाहावा लागतो. ही व्यक्तिरेखा इंग्लंडची सणकी राणी पहिली एलीझबेथ हिची! भल्या भल्या अभिनेत्रींना आव्हान देणारी... अर्ल ऑफ एसेक्सपासून सर वॉल्टर रॅलेपर्यंत अनेकांशी जिचे नाव जोडले गेले नि तरीही अखेरपर्यंत अविवाहित राहिलेली ही इंग्लण्डची व्हर्जिन क्विन! जिने स्कॉटलंडच्या राणी मेरीला शिरच्छेदाची शिक्षा फर्मावली... क्रौर्य, कलाप्रियता अशा परस्परविरोधी स्वाभाववैशिष्ट्यांबाबत प्रसिद्ध असलेली ही राणी शेक्सपिअरच्या नाटकांची खरी रसिक... सर फ्रान्सिस ड्रेकसारख्या चाच्याचा गौरव करणारी ही राणी... एकूणच गुंतागुंतीचे व्यक्तिमत्त्व! बेटी डेव्हिसने ह्या भूमिकेचे सोने केले. बरोबर अर्ल ऑफ एसेक्सच्या भूमिकेत तेव्हाचा सर्वाधिक लोकप्रिय नट एरॉल फ्लिन होता. फ्लिनची कीर्ती आचाट होती. तो इतका देखणा होता की, त्याने अभिनय केला नाही तरी चालून जाई. त्याच्यात थोडा 'सेडिस्ट' अंश होता. बरोबर काम करणाऱ्या नायिकेचा मानसिक छळ करण्यात, प्रेमाची नाटके करण्यात त्याला आनंद लाभे. पण बेटी डेव्हिसने अभिनयसामर्थ्याने फ्लिनवर मात केली. हा चित्रपट तिचा ठरला. एरॉल फ्लिनने तिला ताप देण्याच्या उद्देशाने आपल्या नेहमीच्या खेळी चालू केल्या पण बेटीच्या स्फोटक जिभेने गडी गळाठून गेला. लंडनच्या रंगभूमीवर अनेक वर्षे 'विव्हा रेजिना' हे पहिल्या एलीझबेथच्या जीवनावरील नाटक लोकप्रिय आहे. त्यात ग्लेंडा जॅक्सन ही प्रथम श्रेणीची अभिनेत्री एलीझबेथचे आणि व्हॅनेसा रेडग्रेव ही तेवढ्यात तोलामोलाची नटी राणी मेरीचे काम करते. ह्या दोघींना आधी बेटी डेव्हिसची एलीझबेथ अभ्यासावी लागली.

बेटी डेव्हिसने एलीझबेथच्या भूमिकेत राणी मेरीची हत्या करविली तर प्रत्यक्ष जीवनात बेटीच्या नावाभोवती एक संशयाचे जाळे विणले गेले. बेटीने चार विवाह केले. त्यातील क्रमांक दोनचा पती म्हणजे आर्थर फ्रार्न्सवर्थ. आजही असा संशय आहे की, बेटीने आर्थरचा खून केला. बेटी व आर्थरचा हा विवाह २ वर्षे ८ महिने टिकला. दोघांमध्ये भयानक बेबनाव निर्माण झाले. बेटी डेव्हिसचे दिग्दर्शक व्हिन्सेंट शेरमनबरोबर प्रेमसंबंध जुळले नि आर्थर तर आपल्या कोठल्याच पत्नीशी एकनिष्ठ राहणारा नव्हता. तो अफाट दारू पीत असे. एका पार्टीत आर्थर चिकार प्यायला आणि बेटी व तो घरी निघाले तेव्हा भांडणाला सुरुवात झाली. बेटीने त्याला ढकलले आणि हा पडलाच. त्यातच तो दोन दिवसांनी मरण पावला. ह्याबाबतची कायदेशीर कृती जॅक वॉर्नरमुळे रोखली गेली. बेटी डेव्हिसने त्याला हेतुतः ढकलले नव्हते पण अतिरिक्त मद्यसेवनामुळे तिच्या थोड्याशा धक्क्यानेही तो पडला असा निष्कर्ष निघाला. आर्थरचा मृत्यू हे अखेरपर्यंत कोडे राहिले.

बेटी डेव्हिसची चित्रपटजगतातील प्रतिस्पर्धी म्हणजे जोन क्रॉफर्ड. जोन व बेटी

ह्यांच्यातून विस्तव जात नसे. जोन सुंदर होती. प्रेक्षक जोनचा चेहरा पाहायला नि बेटीचा अभिनय बघायला गर्दी करीत. जोन क्रॉफर्ड म्हणजे 'पेप्सी कोला'ची एकेकाळची मालकीण. बेटी व जोन ह्यांना एकत्र आणणारा 'व्हॉटेव्हर हॅपन्ड टू बेबी जेन' हा चित्रपट आपल्या मुंबईतही बराच मुक्काम ठोकून होता. ह्या दोघींच्या अभिनयाच्या आतषबाजीने डोळ्याचे पारणे त्याने फेडले. जोन त्या मानाने अल्पायुषी ठरली. जोन क्रॉफर्डच्या उत्तरायुष्यात जोनच्या मुलीने – ख्रिस्तिना क्रॉफर्ड हिने तिला भयंकर यातना दिल्या. आपली आई 'माता' म्हणून किती वाईट होती ह्याचे चित्रण करणारे 'ममी डीयरेस्ट' हे पुस्तक ख्रिस्तिनाने लिहिले नि चित्रसृष्टीत जणू बॉंबच पडला. ह्या पुस्तकाबाबत बेटीची प्रतिक्रिया ख्रिस्तिनाच्या बाजूची होती. 'जोन खरेच लेकीशी धड वागली नाही', असे म्हणून बेटीने वर पुस्ती जोडली की, माझी मुलगी बार्बरा भाग्यवान ठरली. माझ्या रूपाने तिला किती चांगली आई मिळाली वगैरे... वगैरे...

– पण नेमका तसाच दाहक अनुभव बेटी डेव्हिसच्या वाट्याला थोड्याच काळात आला. बार्बरा डेव्हीसने 'माय मदर्स कीपर' हे पुस्तक लिहून बेटी डेव्हिस ह्या 'आई'चा आपल्याला किती त्रास झाला, आपली आई कशी अनावर दारू पिते, आपल्याशीदेखील कशी भयानक भाषेत शिवीगाळ करून बोलते नि त्यापायी आपल्याला बाल्य असे मिळालेच नाही, हे जगाला सांगून टाकले. ह्यातूनच सुप्रसिद्ध बेटी डेव्हिस – बार्बरा डेव्हिस खटला उभा राहिला. त्याला प्रत्युत्तर म्हणून बेटीने 'धिस-न्-दॅट' हे पुस्तक लिहिले पण बेटी डेव्हिसच्या अभिनयाची कदर करूनही तिचा खरा स्वभाव जाणणारे आजही म्हणतात – 'बार्बरा डेव्हिसने रंगवलेली आई बेटी ही तंतोतंत खरी प्रतिमा आहे.' मायलेकीचे येथून कायमचे वितुष्ट आले. ४० वर्षे वयाची बार्बरा आईच्या अंतिम क्षणीही परतली नाही नि बेटीनेही तिला बोलावणे पाठविले नाही. ३५ वर्षे वयाचा दत्तक पुत्र मायकल नि ३६ वर्षे वयाची मार्गो ही मतिमंद दत्तक मुलगी ह्यांनाच बेटीने जवळ केले. तिचा शेवटचा चौथा विवाह गॅरी मेरीलशी झाला होता. त्याचा विस्फोट होऊनही २५ वर्षे उलटली. फणका मारणारी स्फोटक जीभ, तुसडेपणा नि फटकळपणा ही कदाचित बेटी डेव्हिसची चंदेरी दुनियेत टिकाव धरण्यासाठी उपयोगी पडलेली शस्त्रे असतील. प्रत्यक्ष जीवनात ह्या दुधारी शस्त्रांमुळे ती एकाकी पडली.

१६/१०/८९

❄❄❄

# ४८

※

# आरोपीच्या पिंजऱ्यात निकू

**दोन** खटले सध्या गाजत आहेत. एक अर्थातच फिलपिन्सची पदच्युत 'मलिंका' इमेल्डा मार्कोस हिचा! न्यूयॉर्कच्या न्यायालयात हिचे कसे नखरे चालतात हे एव्हाना वाचकांना ठाऊक आहे. जपमाळेचे मणी ओढणे, नाक सुईसुई करत ओढणे, डोळ्यांवर रुमाल पदोपदी नेणे, न्यायालयातील सेवकांना आपल्या स्वतःच्या खाशा मेजवानीतील पदार्थ खाऊ घालणे, सुनावणी आपल्या फारच विरोधात जातेय असे दिसताच बेशुद्ध पडणे वगैरे इमेल्डाची नाटके आता जगभर प्रसिद्ध झाली आहेत. त्यात आता भर पडली ती परवाच्या सुनावणीला... त्यावेळी इमेल्डा एकाएकी खोकू लागली आणि नाकातोंडावाटे रक्त पडू लागले. वैद्यकीय तपासणीत जठराच्या विकाराचे निदान झाले. म्हणजे किमान हे तरी ह्या कसलेल्या अभिनेत्रीचे नाटक नव्हते म्हणायचे. जेव्हा सत्ता होती तेव्हा तिच्या धुंदीत इमेल्डाला भल्याबुऱ्याची शुद्ध नव्हती. मग आता शुद्ध हरपली म्हणून तिला सहानुभूती देण्याची कोणालाही आज आवश्यकता वाटत नाही. सत्तेच्या धुंदीत बेबंद वागायचे नि ती हातून निसटल्यावर, 'जनतेचा गुन्हेगार' हे दूषण घेऊन न्यायालयात हजर केले जाण्याचे दुसरे उदाहरण म्हणजे रोमानियाचा रक्तपिपासू हुकुमशहा निकोले कॉसेस्कू आणि त्याची रत्नजडित पादत्राणे वापरणारी पत्नी एलेना ह्यांचा कुपुत्र निकू कॉसेस्कू.

फक्त सहा महिन्यांपूर्वी निकू कॉसेस्कूची शान एखाद्या शाहजाद्यासारखी होती. खरे तर तो मूर्ख आणि क्रूर शाहजादा होता. फॅशनेबल निकूला बेमुर्वत वागणे आणि कोणाचा

मुलाहिजा न ठेवण्याचा अधिकार वडिलांच्या हुकुमशाहीतून मिळालेला होता. आज निकूची पार रया गेली आहे. अलीकडे निकू कॉसेस्कू कायम उन्हाचा चष्मा लावू लागला आहे. कारण त्याच्याआड डोळे लपविणे आज त्याला आवश्यक झाले आहे. बुखारेस्टच्या सांस्कृतिक केंद्रात तात्पुरती सोय करून एक न्यायालय उभारण्यात आले आहे. त्यात पाच सदस्यांचे एक लष्करी कोर्ट भरविण्यात येत आहे नि गेल्या आठवड्यात ह्या लष्करी न्यायासनापुढे निकू कॉसेस्कूवरील खटल्यास सुरुवात झाली. एके काळी वडिलांची सद्दी होती तेव्हा निकू सिब्यू ह्या शहराच्या कम्युनिस्ट पक्षाचा विभागीय प्रमुख होता. क्रूर आणि विकृत मनोवृत्तीच्या निकूवर जेव्हा लष्करी कोर्टाला सामोरे जायची वेळ आली तेव्हा त्याचा चेहरा एकदम निस्तेज झाला होता. त-त-प-प करीत एखाद्या बुजगावण्यासारखा तो उभा राहिला आणि त्याच्यावरील आरोपपत्र वाचल्याबरोबर त्याचे अवसानच गळून गेले. 'डिसेंबर १९८९ मध्ये रोमानियन जनतेने क्रांती केल्यावर रोमानियाच्या 'सीक्युरीतात' ह्या सुरक्षा दलाला निदर्शकांवर गोळ्या चालविण्याचा आदेश देऊन सिब्यू शहरात भयानक नरमेध घडविला.' असा आरोप त्याच्यावर ठेवला आहे.

२५ डिसेंबर १९८९ रोजी नाताळच्या मुहूर्तावर निकोले व एलेना कॉसेस्कू ह्यांना मृत्युदंड दिल्यावर ह्या परिवारातील एकेका सदस्याची झोप उडत गेली. कॉसेस्कूच्या अनिर्बंध सत्तेचा फायदा संपूर्ण परिवाराने घेतला होता. रोमानियातील सर्व महत्त्वाच्या पदांवर ह्याच परिवारातील व्यक्तीची नेमणूक होई. सर्व मोक्याच्या आणि ज्याला चराऊ कुरण म्हणता येईल, अशा महत्त्वाच्या जागा जणू कॉसेस्कू परिवाराला आंदण दिल्या होत्या. आता ह्या परिवारातील व्यक्ती सावजासारख्या टिपल्या जात आहेत. सर्वांत प्रथम लष्करी कोर्टापुढे आणले गेले निकूच्या काकाला! एप्रिल १९९० मध्ये निकोले. आंद्रुता कॉसेस्कू ह्याला खुनाच्या आरोपावरून न्यायासनासमोर आणण्यात आले. हा कॉसेस्कूचा भाऊ. रोमानिनयाच्या अंतर्गत (गृह) मंत्रालयात हा लेफ्टनंट जनरल होता. त्याच्यावरील खटला सध्या स्थगित झाला आहे. निकू कॉसेस्कूने आपल्यावरील आरोप नाकबूल केले. 'गोळ्या चालविण्याचा आदेश मी दिला पण केवळ अपवादात्मक परिस्थितीतच हा मार्ग पत्करावा, असेही मी सांगितले होते,' असा बचाव निकूने केला. सिब्यूमधील जनतेवर गोळीबार करू नये, असे आपण सांगितल्याचेही त्याने शपथेवर कोर्टास ऐकविले.

त्याच्यावरील आरोपानुसार आणि अहवालानुसार निकू कॉसेस्कूने गोळीबाराचा आदेश दिला होता आणि परिणामी सिब्यूमध्ये ८९ माणसे मरण पावली आणि २०० हून अधिक घायाळ झाली होती. सिब्यू हे औद्योगिक शहर म्हणून प्रसिद्ध आहे. तेथील लोकसंख्या १,७३,००० एवढी आहे. रोमानियाच्या लष्करातील जो जनरल सिब्यू विभागासाठी नेमला होता, त्याने निकूच्या विरुद्ध साक्ष दिली. 'हे तर युद्धच चालू आहे... गोळ्या चालवून संपवून टाकू ते!' असे निकूचे उद्‌गार त्या जनरलने भर कोर्टात सांगितले.

निकूने ह्या सुनावणीत आपल्या बाजूला थोडीफार सहानुभूती मिळविण्याचा बराच प्रयत्न करून पाहिला. बुखारेस्टला आपल्या आईला आपण कसे फोन केले, काकुळतीला येऊन तिच्याशी कसे बोललो, त्याचे सविस्तर वर्णन त्याने केले. लोकांचा उद्रेक पाहून मी सिब्यूहून बुखारेस्टला पळून गेलो नि त्यानंतर सिब्यूमध्ये जनतेवर गोळीबार झाला, असे सांगून निकू आपली बाजू सावरायचा प्रयत्न करीत होता. रोमानियन जनतेच्या मनात निकोले व एलेना कॉसेस्कू ह्यांच्याबाबत भयानक तिरस्कार आजही आहे. मात्र ह्या दांपत्याला देहान्ताची सजा दिल्यानंतर रोमानियातील मृत्युदंडाचा कायदा बदलला आहे. आता सर्वांत कडी सजा म्हणजे आजीव कारावास. जनतेच्या मनात निकूबद्दलही कमालीचा तिरस्कार आहे. रंगेल निकूने अनेक घराण्यांतील सुंदर मुलींची सत्तेच्या जोरावर मागणी करून जनतेच्या मनातील क्षोभ अधिकच वाढविला. त्याच्या आईबापांची अनिर्बंध सत्ता होती म्हणून निकू मागेल ती पोरगी मुकाट्याने देण्यावाचून गत्यंतर नव्हते. अस्तित्व टिकविण्यासाठी ते करणे भाग होते. आज अशा मुली व त्यांचे आईवडील, त्यांची घराणी निकूचे नाव काढून थुंकतात. किमान निकू कॉसेस्कूच्या बाबतीत तरी मृत्युदंडाची शिक्षा पुनश्च प्रस्थापित व्हावी, अशी सर्व पोळलेल्यांची मागणी आहे.

एकूण सर्वच कॉसेस्कू परिवार आता केल्या कृत्यांचा हिशेब चुकता करण्यासाठी लष्करी कोर्टापुढे येत राहील. एलेना कॉसेस्कूची आई क्रांतीच्या वेळी कॉसेस्कू दांपत्यांबरोबरच राहात होती. ती पुढे अल्पकाळातच एका रुग्णालयात मरण पावली. अफवा अशी आहे की, तिची उपासमार झाली. निकोले कॉसेस्कूचा एक भाऊ मारीन हा ऑस्ट्रियात व्हिएन्ना येथे ट्रेड कॉन्सलर होता. त्याने रोमानियातील क्रांतीचा उठाव पाहून धसका घेतला आणि २८ डिसेंबर १९८९ रोजी आत्महत्या केली. आयली कॉसेस्कू हा धाकटा भाऊ संरक्षण खात्याचा उपमंत्री होता. आता तोही कैदेत असून लवकरच त्याच्यावरील खटल्याचीही सुनावणी सुरू होईल. ह्याच परिवरातील फ्लोरी हा भाऊ पत्रकार होता. म्हणजे कॉसेस्कूच्याच पक्षाचे मुखपत्र असलेल्या वृत्तपत्रात तो होता. सध्या तो कोठे आहे ते कळलेले नाही. पण बहुधा तो अटकेतच असावा. आयन ह्या भावाचाही थांगपत्ता लागत नाही. तो नियोजन मंडळाचा उपाध्यक्ष होता. मारीया आणि एलेना ह्या दोन बहिणी अटकेतच आहेत. कॉसेस्कूचा दुसरा मुलगा व्हॅलेंतिन ह्याच्यावरही लवकरच खटला सुरू होईल. कॉसेस्कूची कन्या झोया ही रोमानियाच्या विज्ञानसंस्थेत वरिष्ठ होती. हिनेही आईबापांच्या सत्तेचा पुरेपूर फायदा घेतला. आज हीसुद्धा अटकेत असून भ्रष्टाचाराचा तिच्यावर आरोप करण्यात आला आहे नि लवकरच तोही खटला सुरू होईल.

सत्तेचा कैफ फक्त सत्ताधीशांनाच चढत नसतो, तर त्यांच्या निकटवर्तीयांनाही चढतो. प्रसंगी सत्ताधीशांच्या आशीर्वादाने खुलेआम हे आप्तेष्ट पोळ्या भाजून घेतात तर प्रसंगी त्यांच्या नावाचा वापर करून गैरव्यवहार करतात. त्यास ना मार्कोस कुटुंब अपवाद

ना कॉसेस्कू परिवाराचा अपवाद. रशियाच्या माजी सत्ताधीशांच्या लिओनिद ब्रेझनेवच्या मुलीचे व जावयाचेही किस्से हेच सत्य प्रतिपादतात. वास्तविक हुकुमशहांच्या मागे रडणारे कोणी नसतेच... मागे राहतात ती अशा खटल्या-कज्जांची शुक्लकाष्ठे!

११/६/९०

❋❋❋

# ४९

※

# कुबेराचा देश

**को**ठल्याही, कोणच्याही मोटारींची चोरी न होणारा देश तसेच दरडोई सर्वाधिक उत्पन्न असलेला आणि सर्वाधिक बचत असलेला, एकही भिकारी नसलेला देश असेल ह्यावर विश्वास बसणार नाही. पण तसा देश आहे. तेथे लोकशाही नाही. सुलतानशाही आहे आणि गेली तीन वर्षे सतत ह्या सुलतानाने जगातील सर्वांत श्रीमंत कुबेरांच्या यादीतील आपला पहिला क्रमांक कायम राखला आहे. हा देश म्हणजे ब्रुनेई आणि आशिया खंडातील एकमेव सर्व सत्ताधारी राजा असलेला हा सुलतान म्हणजे सर मुदा हसनल बोल्कीया. १९८९च्या जुलै महिन्यात ह्या सुलतानाच्या कारकीर्दीला २२ वर्षे पूर्ण होत आहेत आणि सुलतानाचे वय अवघे ४३ वर्षे आहे. तेव्हा त्याच्या सुलतानीचा हीरकमहोत्सव सहज होऊ शकेल.

ब्रुनेई म्हणजे ५,७०० चौरस किलोमीटर क्षेत्रफळाचा देश. एका बाजूला द. चिनी समुद्राचा वेढा तर दुसऱ्या बाजूला मलेशियाच्या पूर्वेकडील सारावाक प्रां[illegible]ा सीमेशी ब्रुनेईची सीमा मिळाली आहे. १९६७ मध्ये आताच्या सुलतान हसनलचे वडील सुलतान सर ओमर अली सैफुद्दीन ह्यांनी स्वखुशीने मुलासाठी सिंहासन सोडले आणि सुलतान हसनल सत्तेवर आला. ब्रुनेईचे राजघराणे जपानच्या राजघराण्याइतके प्राचीन नसले तरी त्यास ४०० वर्षांचा इतिहास आहे. हे मुस्लिम राजघराणे असूनही चार शतके कायम राहिले हे आश्चर्यच! सध्याचा सुलतान २९ वा आहे. १९६२ मध्ये म्हणजे सुलतान हसनल

गादीवर येण्यापूर्वी पाच वर्षे ब्रुनेईमध्ये निवडणूक झाली होती. तीच ह्या देशातील पहिली व अखेरची निवडणूक! त्या निवडणुकीत ब्रुनेई पीपल्स पार्टी (बीपीपी) हा डाव्या विचारसरणीचा पक्ष जिंकला, पण ह्या पक्षाला सरकार बनविण्यास सुलतान सर ओमर ह्याने प्रतिबंध केला. देशात बंड माजण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली.तेव्हा ब्रिटिशांच्या गुरखा रेजिमेंटने अल्प काळातच ते बंड थंड केले. त्या प्रसंगानंतर अगदी क्वचितच ब्रुनेईतील शांततेचा भंग झाला असेल. सुलतानाची २,४०,००० प्रजा तेथे सुखसमृद्धीत राहात आहे. ह्या प्रजेत मूळ भूमिपुत्र असलेले मलाय नागरिक आणि पूर्वी चीन सोडून आलेले चिनी नागरिक ह्यांचा समावेश आहे. ब्रुनेईला दार-उल्-सलाम हे विशेषण लावले जाते. नि त्याचा अर्थ आहे 'शांती सदन.' हे नागरिक तेल आणि वायू ह्यांच्या भांडवलावर समृद्ध झालेल्या ब्रुनेईत अतिशय उच्च राहणीमानात सुखी आहेत. आज ब्रुनेईचा सामान्यातला सामान्य नागरिकही म्हणतो– 'आम्हाला लोकशाही नको, लोकशाहीपायी इतर देशांतून काय घडले ते पाहता आम्ही आमच्या न्यायी सुलतानाची सत्ता आदर्श मानतो.'

हा सामान्य नागरिकाचा विचार झाला. पण कधी तरी कोठे तरी नवा विचार उफाळतोच. अर्थात ब्रुनेईत त्याचे प्रमाण कमीच. पण अशा वेळी पोलीस पाहून घेतात. १९८४ मध्ये ब्रुनेई पूर्णपणे स्वतंत्र झाले. तोवर ब्रिटनचे त्यावर नियंत्रण होते. स्वातंत्र्योत्तर ब्रुनेई नॅशनल डेमॉक्रॅटिक पार्टी (बीएनडीपी) हा नवाच पक्ष तेथे स्थापण्यात आला नि अविश्वसनीय बाब अशी की, त्या पक्षास सुलतान हसनलचा आशीर्वाद लाभला होता. हा पक्ष खुद्द सुलतानाच्याच मित्रमंडळींनी आणि नातेवाइकांनी काढला होता. हे बहुतेक सर्वजण उद्योगपती होते. ह्या पक्षामुळे सुलतानाचे हात अधिकच बळकट होऊ लागल्याची लक्षणेही दिसू लागली होती 'बीपीपी'ला पुनरुज्जीवन मिळू नये ह्याच उद्देशाने ह्या नव्या पक्षाची स्थापना वास्तविक करण्यात आली होती. कारण बीपीपीचे म्हणणे होते की, स्वातंत्र्योत्तर ब्रुनेईमध्ये इंग्लंडच्या धर्तीवर लोकशाही आणावी. राणी एलीझबेथसारखे सुलतानाने सिंहासनावर बसावे व ब्रिटिशांच्या पद्धतीनेच लोकनियुक्त पक्षाने सरकार बनवावे. ह्या विचाराला काटशह देण्यासाठी 'बीएनडीपी'ची उभारणी झाली. ह्या पक्षाची कधी सुलतानाला धास्ती नव्हती पण तरीही त्याने फतवा काढला की, प्रशासकीय नोकरांनी कोठल्याही राजकीय पक्षाशी बांधिलकी ठेवायची नाही. ब्रुनेईतील बरेचसे मलाय नागरिक सरकारी नोकरीत आहेत. जवळ जवळ ३०,००० सरकारी नोकर म्हणजे ब्रुनेईच्या श्रमिक घटकापैकी ४० टक्के एवढे भरतात. 'बीएनडीपी'ने बैलाएवढे फुगू पाहणाऱ्या बेडकीच्या थाटात आपल्या पक्षात ४००० सदस्य असल्याची फुशारकी मारली. प्रत्यक्षात २२५ सदस्य होते. पण ही फुशारकी अंगाशी आली. जन्माला येऊन सात महिने झाले नाहीत तोच सुलतानाचा कृपाप्रसाद लाभलेल्या ह्या 'बीएनडीपी' पक्षाने सुलतानावर टीका करायला सुरुवात केली. सार्वत्रिक निवडणूक आणि लोकशाहीची मागणी करणाऱ्या 'बीपीपी'ला

खतम करण्यासाठी 'बीएनडीपी' निर्माण केली आणि हा पक्षही चक्क तीच मागणी करू लागला? १९८६ च्या फेब्रुवारीत सुलतानाच्या समर्थकांनी 'बीएनडीपी' सोडली आणि सरकारला पाठिंबा देणारा ब्रुनेई सॉलिडॅरिटी पार्टी हा नवा पक्ष काढला. त्याच वर्षात सुलतानाने मग कठोर पावले उचलली. 'बीएनडीपी'वर त्याने बंदी घातली. ह्या पक्षाचा अध्यक्ष अब्दुल लतीफ हमीद आणि सरचिटणीस अब्दुल लतीफ चुचू ह्या दोघांना अंतर्गत सुरक्षा कायद्याखाली अटक केली. ब्रुनेईचा हा 'रासुका' तंतोतंत इंग्लंडच्या 'रासुका'वर बेतलेला आहे. ह्या कायद्यान्वये खटल्याशिवाय आरोपीला दोन वर्षे खुशाल डांबून ठेवता येते आणि ती मुदत संपली की, सुलतान आपल्या अखत्यारीत कैद आणखी वाढवू शकतो. १९६२ मध्ये अटक झालेले कैदी आजही ब्रुनेईच्या तुरुंगात बंदी आहेत. तेव्हा हमीद आणि चुचू प्रदीर्घ काळ कारागृहात वास्तव्य करणार हे उघड आहे. अर्थात श्रीमंत ब्रुनेईच्या अमिरीला साजेसे ब्रुनेईचे कारागृह आहे नि तेथील कैद्यांची स्थिती पाहता ही शिक्षा की बडदास्त असा प्रश्न पडावा.

सुलतानाच्या ह्या कृतीवर ब्रुनेईत फारसा विरोध प्रकट झाला नाही. शेजारच्या मलेशिया आणि इंडोनेशियात ब्रुनेईचे काही बंडखोर वास्तव्य करीत असतात. ते आश्चर्यकारकरीत्या ह्या कृतीबाबत मूकच राहिले. जी आशियाई वृत्तपत्रे एरवी ब्रुनेईवर टीका करीत त्यांनी सुलतानावर भाष्य करताना फारच सावधगिरी बाळगली होती. खुद्द ब्रुनेईत ह्या कृतीबाबत काय प्रतिक्रिया व्हावी?... हायसे वाटल्याचा निश्वास जनतेने टाकला. सामान्य ब्रुनेईकरांना सुलतानच हवा आहे... पक्षा-पक्षातील भांडणे आणि निवडणुका... संमिश्र सरकारे... त्यांचे भ्रष्टाचार... सत्तेला चिकटून राहणारे मंत्री... लोकशाहीची ही दुसरी बाजू त्यांना भेडसावणारी वाटल्याने त्यांना सुलतानीच आवडते, ह्याची पुनश्च एकवार खात्री पटली. ब्रुनेईमध्ये इंग्रज, ऑस्ट्रेलियन, डच, अमेरिकन, आग्नेय आशियाई, जपानी आणि दक्षिण कोरियन ही परदेशी मंडळी सुमारे ७०,००० च्या घरात आहेत. ह्या परदेशींनी सुलतानाच्या कारवाईचे स्वागतच केले.

सहसा असे घडत नसते. अलीकडेच सिंगापूर आणि मलेशियात राजकीय कार्यकर्त्यांना (की अतिरेकी?) स्थानबद्ध करण्याची कृती केली तेव्हा जगभर केवढी निषेधाची लाट उसळली होती! मुत्सद्दी, विदेशी राजदूत, परदेशांचे राष्ट्रप्रमुख आदींनी सिंगापूर व मलेशियावर टीकेचा भडिमार केला होता. अमेरिका व ऑस्ट्रेलियाने तर निषेध करून स्थानबद्धांबाबत कळवळा व्यक्त केला होता. मग ब्रुनेईच्या बाबतीत सर्व टीकाकारांच्या जिभा टाळ्यालाच का चिकटून बसल्या असाव्यात? कारण ब्रुनेईची प्रगती... आश्चर्यकारक समृद्धी... तेलाचा शोध आणि अर्थातच सुलतान हसनल ह्याच्या न्यायीपणाबाबत खुद्द त्याच्या प्रजेची असलेली खात्री! आपण असे कठोर पाऊल उचलल्यावर सुलतानाने जाहीरपणे निवेदन केले. त्या निवेदनात एक चित्तथरारक प्रसंग

होता–

–'१९६२ साल... मी अवघा सोळा वर्षांचा होतो आणि ब्रुनेई पीपल्स पार्टीने बंडाचा डाव टाकला. आई-वडील-बहीण-भाऊ नि मी राजवाड्यात राहणे धोकादायक बनले. आम्हाला एका पोलिस स्टेशनात आश्रय घ्यावा लागला होता... तो प्रसंग मी कधीही विसरणार नाही आणि परत ती वेळ माझ्या ब्रुनेईत कदापि येऊ देणार नाही.' आपल्या शेजारच्या राष्ट्रांतून लोकशाहीच्या नावावर काय चालले आहे, ह्याचे वर्णन हा सुलतान नित्य करतो आणि त्याची प्रजाही त्याच विचाराने चालते. ब्रुनेईत लोकशाही आली तर आज ब्रुनेईची नैसर्गिक साधनसंपत्ती- जी सुलतानाची आहे- ती त्याच्या हातून जाईल. ह्या सुलतानाचे वैशिष्ट्य म्हणजे ब्रुनेईची संपत्ती तो प्रजेसह भोगतो. स्वतः उपभोगतो नि प्रजेलाही देत राहतो. त्याचाच परिणाम म्हणून दरडोई १७,००० डॉलर्स हे उत्पन्नाचे प्रमाण ठेवून ब्रुनेईने दुसरा क्रमांक राखला आहे. (पहिला क्रमांक कुवेतचा) तेल व वायूपासून ब्रुनेईचे वार्षिक उत्पन्न २.५ बिलियन डॉलर्स एवढे आहे. त्यातील १ बिलियन डॉलर्स हा राजा जनतेच्या घरांवर, आरोग्य सेवा, शिक्षण, व्यक्तिगत कर्ज योजना, अन्नधान्य पुरवठा ह्यावर खर्चतो. उर्वरित रक्कम ब्रुनेईबाहेर परदेशांतून देशाच्या नावे गुंतवली जाते. कर्ज देणाऱ्या राष्ट्रांत ब्रुनेई आघाडीवर आहे. ह्या गुंतवणुकीतून ब्रुनेई अधिकच श्रीमंत होत आहे. येथे इन्कम टॅक्स नाहीच. इतर राष्ट्रांना दिलेले कर्ज... गुंतवणूक ब्रुनेईला आयकरापेक्षा अधिक नफा देते. येथे मूल जन्मल्यापासून त्याचे पूर्ण शिक्षण व वैद्यकीय सेवा संपूर्णपणे मोफत आहे (गणवेशदेखील). वीज, पेट्रोल व दूरसंचार ह्या बाबी अगदी नाममात्र शुल्क घेऊन पुरविल्या जातात. प्रत्येक ब्रुनेईवाल्याने वर्षाकाठी सुट्टी घ्यायची... साफ फुकट प्रवास करायचा... मौजमजा करायची ही सुलतानी अट आहे. प्रत्येक कुटुंबामागे दोन मोटारी आहेत. सुलतानी आदेश एवढाच आहे– 'मला शांतपणे राज्य करू द्या नि बदल्यात मी तुम्हाला शांती व समृद्धी देईन. लोकशाहीच्या वगैरेच्या भानगडीत पडू नका!'

३/७/८९

❋❋❋

# ५०

※

# कैदी क्र. ६७२९१ - बर्न

होत्याचं नव्हतं करण्याचं सामर्थ्य काळात आहे, अन्यथा ज्या माणसासाठी जगातले देश पायघड्या घालून स्वागताला सज्ज राहात त्या माणसाची आज अशी अवस्था झाली नसती. आपल्या देशात त्यानं यावं, आपल्यावर त्यानं मेहरनजर ठेवावी, आपल्याला त्याच्या कृपेचा लाभ व्हावा, त्याच्या निकट वर्तुळात आपला प्रवेश व्हावा, म्हणून प्रसंगी लांगूलचालनदेखील करण्यात देशेदेशीच्या सरकारांची, नेत्यांची, पुढाऱ्यांची स्पर्धा चाले... तो माणूस आज स्वित्झर्लंडमध्ये 'सरकारी पाहुणा' बनून बर्न्सच्या तुरुंगात सुटकेची वाट पाहात आहे. जसजसे दिवस जात आहेत तसतशी त्याच्यावरील आरोपांची जंत्री वाढू लागली आहे. दुर्मिळ चित्रांची बेकायदा खरेदी-विक्री, वाहतूक ह्या आरोपाखाली त्याला प्रथम अटक केली. वास्तविक त्याच्या इतर अपराधांची यादी पाहता हा गुन्हा अगदीच मामुली ठरावा. पण उंटावरची अखेरची काडी जशी त्याला बसकण मारायला लावते तसे कदाचित दुर्मिळ चित्रांच्या व्यवहाराबाबत घडले असावे.. अथवा इतर अपराधांसाठी त्याला जेरबंद करणे शक्य न झाल्यामुळे अखेर ह्या गुन्ह्यातून अटकेची संधी मिळाली असेल, अशीही शक्यता नाकारता येणार नाही. अमेरिकेतील कुप्रसिद्ध माफिया अल्फोन्सो (ॲल) कॅपोन आठवत असेल. खून, मारामाऱ्या, दहशत, वेश्यांचा व्यापार असे अनेक गुन्हे करणाऱ्या कॅपोनला त्या त्या गन्ह्यांसाठी पकडणे दुरापास्त व्हावे, एवढा तो चतुर होता. अखेर त्याला अटक करण्याची संधी मिळाली ती आयकर चुकविल्याच्या निमित्ताने.

कैदी क्रमांक ६७३९१ ही आजची त्याची ओळख असली तरी त्याचा खरा परिचय जगाला आहे तो अदनन खगोशी, सौदी अरेबियन कुबेर, जगातला पहिल्या क्रमांकाचा शस्त्रास्त्रांचा दलाल, युद्ध चालू करण्याकामी व संपवण्याकामी आवश्यक भासणारा मुत्सद्दी आणि देशोदेशींच्या गनिमांना, दहशतवाद्यांना, तस्करांना अत्यावश्यक असलेला मध्यस्थ! आज बर्नच्या तुरुंगातील खगोशींच्या कोठडीत स्वित्झर्लंडच्या सर्वोत्तम हॉटेलातील उत्कृष्ट जेवण पाठविले जात आहे. ह्या तुरुंगापासून पाच मिनिटांच्या अंतरावर श्वायझरहॉफ येथे अदनन खगोशीची कन्या नबीला आणि श्रेष्ठ दर्जाचे पंधरा वकील त्याच्या सुटकेसाठी कायद्याचा कीस पाडीत रात्रंदिवस बसले आहेत, तर अमेरिकन सरकारकडून सातत्याने निरोप येत आहेत– 'अदनन खगोशीला अमेरिकेच्या ताब्यात द्या,.तो अमेरिकेचा अपराधी आहे!' प्रासादतुल्य आलिशान नौका, सुखोपभोगांनी युक्त तीन विमाने, पृथ्वीच्या गोलावरील प्रमुख ठिकाणी असलेली १२ ऐश्वर्यसंपन्न निवासस्थाने आणि शेकड्यांनी मोटारी बाळगणारा हा माणूस १२ फूट × ६ फूट मापाच्या कोठडीत आज बंदिस्त आहे. टेलिव्हिजन व बाहेरील जेवण आणि दिवसाकाठी एक स्विस फ्रँक घेण्याची सवलत तेवढी त्याला मिळाली आहे. काळ एका रात्रीत बदलतो म्हणतात ते खोटे नव्हे. सगळं सुरळीत चाललं होतं. बदनामी, दुष्कीर्ती आणि स्तुतीही नेहमीसारखीच चालू होती. भानगडींची प्रसिद्धी नित्याचीच होती नि बर्नच्या श्वायझरहॉफ ह्या सर्वोत्तम हॉटेलातील त्याचा मुक्कामही नेहमीसारखाच विलासी होता. फक्त काळ वाट पाहात होता. बर्नच्या हॉटेलमधील त्याच्या दालनावर मध्यरात्री थाप पडली... तीन स्विस पोलिस फक्त होते. बस्स! त्या पोलिसांच्या रूपाने अदनन खगोशी ह्या इसमाभोवती काळाने जाळे टाकले.

एका वैचित्र्यपूर्ण चरित्रातील एक सनसनाटी टप्पा ह्या अटकेपासून सुरू झाला आहे. गेली ३० वर्षे एक अविश्वसनीय व्यवसाय अदनन खगोशी करीत आला. ह्या तीस वर्षांत आंतरराष्ट्रीय खुशालचेंडू प्लेबॉय, अब्जाधीश, सौदी अरेबिया व पाश्चात्त्य जगातील शस्त्रास्त्रांच्या व्यवहारातील दलाल म्हणून आणि विलासोपभोगांची लयलूट करीत जगण्याची त्याची पद्धत ह्यामुळे हे नाव सतत सर्व माध्यमांतून खेळत राहिले. हॅरल्ड रॉबिन्ससारख्या लेखकांना त्याच्या जीवनापासून स्फूर्ती मिळून कादंबऱ्या लिहिण्याची प्रेरणा झाली. त्याला नायक बनविण्याचा उद्योग अनेक कथाकार-कादंबरीकारांनी केला. रॉबिन्सच्या 'पायरेट'ची मध्यवर्ती कल्पना ह्याच अदनन खगोशीवर आधारित आहे.

अविश्वसनीय वाटले तरीही अदनन महंमद खगोशी ही हाडामांसाची खरीखुरी व्यक्ती आहे. जेम्स बाँडसारखा सुंदरीचा घोळका त्याच्या भोवती असतो. तो राजकारणी, मुत्सद्दी, उद्योगपती, राजपुत्र, अभिनेते, सत्ताधीश सर्वांनाच हवाहवासा आहे. २५ जुलै १९३५ रोजी सौदी अरेबियामध्ये डॉक्टर मोहमंद खलील खगोशी ह्यांना झालेला हा मुलगा पुढे असा निघेल, अशी त्यांच्या कुटुंबाची स्वप्नातही अपेक्षा नव्हती. खगोशी कुटुंब मूळ

तुर्कस्तानचे. नंतर काही काळ लेबनॉनमध्ये ह्या परिवाराचे वास्तव्य होते. १७ व्या शतकात खगोशी परिवाराचे मक्केची यात्रा करण्यासाठी सौदी अरेबियामध्ये आगमन झाले. यात्रा पूर्ण झाली तथापि हे कुटुंब सौदी अरेबियातच राहिले व तेथलेच बनले. डॉ. मोहंमद खलीद खगोशींना त्यांच्या वडिलांनी सॉर्बोन (फ्रान्स) व दमास्कस (सीरिया) ह्या विद्यापीठांत शिकविले. वैद्यकीय पदवी मिळवून आणि विद्याभ्यासात प्रावीण्य संपादून डॉक्टर खगोशी सौदी अरेबियाला परतले तेव्हा हा देश नुकताच अल्-सौद राजघराण्याच्या नेतृत्वाखाली नव्या जगात प्रवेश करीत होता. डॉक्टरांनी मक्का आणि मदिना येथे आपला व्यवसाय सुरू केला. आपल्या प्रजाजनांपैकी एक तरुण पाश्चात्त्य वैद्यकीय ज्ञान संपादून आल्याचे राजे अब्दुल अझीझ इब्न सौर ह्यांना समजताच त्यांनी त्या तरुण डॉक्टरला निमंत्रित केले, त्याला सर्व सहकार्य दिले आणि राजे अब्दुल अझीझ ह्यांचा व्यक्तिगत डॉक्टर हे पदही देऊन टाकले. डॉक्टर खगोशी निष्णात वैद्य होतेच, शिवाय इंग्रजी, फ्रेंच, जर्मन भाषांचे उत्तम जाणकार होते. मातृभाषा अरबीचा तर प्रश्नच नव्हता. अदनन हा डॉक्टरांचा सर्वांत मोठा मुलगा. त्यांनी एक दिवस मुलाला धडा दिला— एक नाणं घेतलं नि ते गालिचावर फेकलं. गालिचामुळे त्याचा आवाज झाला नाही. मग तेच नाणं उचलून त्यांनी संगमरवरी फरशीवर टाकलं. अर्थातच त्या नाण्याचा नाद झाला. वडिलांनी मग पोराला सांगितलं, 'पाहिलंस? तू संपत्ती शांतपणे कोणाला न कळविता वापरू शकतोस किंवा असा खणखणाट करीत जगाला दौलतीचा आवाज ऐकवीत वापरू शकतोस!' मुलाने तो धडा छान स्मरणात ठेवला.

अदनन खगोशीचे शिक्षण अलेक्झँड्रियाच्या व्हिक्टोरिया कॉलेजमध्ये झाले. त्याच्यातील व्यापारी सौदेबाजीचा गुण फार लहान वयातच प्रकट झाला नि वाढीस लागला. इजिप्तमधून अदनन खगोशी अमेरिकेला गेला. कॅलिफोर्नियाला पेट्रोलियम इंजिनियरिंग शिकण्यासाठी तो गेला होता पण येथे वेगळेच वळण लागले. ज्यांना खरेदी करायची आहे व ज्यांना विक्री करायची आहे त्यांना एकत्र आणण्याची उत्तम हातोटी अदनन खगोशीमध्ये होती. कॅलिफोर्नियाचे वातावरण मुक्त होते, सुंदर मुलींचा भरणा होता आणि वडिलांकडून मिळणारा पॉकेटमनी एखादा उद्योग स्थापता येईल एवढा भक्कम होता. खगोशीच्या एका काकानं सौदी अरेबियात ट्रक्स हवे असल्याचे सहज उल्लेखिले... झाले! अदनन खगोशीने कॅलिफोर्निया मुक्कामीच धंदा सुरू केला. घाऊक ट्रक्स घ्यायचे व सौदी अरेबियाला पाठवायचे... विकणाराही पैसे देतोय नि खरेदीदारही पैसा देतोय... पुन्हा पॉकेटमनी चालूच! दलाल खगोशी येथे सुरू झाला. कोणालाही कशाचीही गरज पडो... खरेदी करण्याची त्याची तयारी असेल तर, खगोशीला कमिशन देणार असेल तर विक्रेता गाठण्याचे काम खगोशीने केलेच म्हणून समजायचे! पुन: विक्रेत्याकडूनही कमिशन! ही खरेदी-विक्री फक्त ट्रक्सचीच असावी असेही नाही. ट्रॅक्टरपासून टँकरपर्यंत नि दागिन्यांपासून सुंदरीच्या सौख्यापर्यंत

कसल्याही खरेदी-विक्रीला खगोशीने नकार दिला नाही. पुन: सारा विश्वासाचा मामला! खगोशी एवढा विश्वासपात्र बनला की, मध्य पूर्वेत आपल्या उद्योगाच्या शाखा काढू इच्छिणाऱ्या अमेरिकन उद्योगपतींनी अदनन खगोशीला आपला प्रतिनिधी बनवून टाकले. हे व्यवहार वाहनांपुरते मर्यादित न राहता पेट्रोल, डिझेल, पेट्रोलियमचे पदार्थ असे टप्पे गाठीत शस्त्रांच्या खरेदी-विक्रीपर्यंत पोचले. शेजारच्या येमेनमधील राजघराण्यासाठी सौदी अरेबियाकडून गुप्तपणे शस्त्रास्त्रे रवाना होत होती. ही शस्त्रे कशी मिळवायची? अर्थातच तेथे अदनन खगोशी धावून आला. ब्रिटनकडून त्याने जुन्या ली एन्फिल्ड रायफली खरीदल्या नि प्रथम सौदीकडे व नंतर येमेनकडे रवाना केल्या. ब्रिटनकडूनही पैसा मिळाला, सौदी अरेबियानेही कमिशन दिले नि येमेननेही हात ओले केले. हा व्यवहार एवढा किफायतशीर ठरला की, वेस्लंड, नॉर्थरॉप, लॉकहीड अशा प्रसिद्ध फर्म्समधून खगोशीने गुंतवणूक सुरू केली. कोट्यवधी डॉलर्स 'कमिशन'च्या रूपाने ह्या कंपन्यांकडून खगोशीने घेतले. पैशाचा समुद्र हाती आल्यावर मग खगोशीचे विलास सुरू झाले. काही माणसे एकाकी पडल्यावर वाट्टेल तसा पैसा खर्चून वैभवशाली राहणी पत्करतात. खगोशीचे तसे काही नाही. एकटेपणा नाही की, समाजावर सूड घेण्याची वृत्ती नाही. कोठलेही मानसशास्त्र त्याच्या चैन, विलास, ऐश्वर्य ह्यांच्यामागे नाही. खगोशीच्याच शब्दात सांगायचे तर– 'सुंदर मुली, उत्कृष्ट खाद्य, उत्तम मद्य, अलिशान गाड्या, विमाने, सत्ताधीशांचा सहवास मला आवडतो नि मी तो उपभोगतो!' खगोशीच्या पहिल्या पत्नीचा 'अष्टपुत्रा सोराया'चा परिचय पूर्वीच 'परिक्रमा'मध्ये करून दिला होता. ह्या सोरायाला घटस्फोट देऊन खगोशीने लामिया ह्या इटॅलियन सुंदरीशी विवाह केला नि ह्या विवाहानिमित्त ऑस्ट्रियामध्ये जंगी पार्टी दिली. ह्या पार्टीत प्रमुख पाहुणी होती घटस्फोटित पत्नी सोराया! कारण का? तर ती आपल्या मुलांची आई आहे म्हणून! खगोशीचे कसेही वागणे हे बातमीचा नि चर्चेचा विषय होत राहिले.

शस्त्रांचा दलाल खगोशी हळूहळू राजनीतीमध्ये ढवळाढवळ करू लागला. राजे हुसेन, राजे फाहद, राष्ट्राध्यक्ष होस्नी मुबारक ह्यांच्याशी जवळीक करण्याचे प्रयत्न असफल झाले. मात्र 'बेबी डॉक' ड्युवालिए (हैती), ऑलीव्हर नॉर्थ (इराण कॉंट्रागेटवाला), पदच्युत हुकुमशहा फर्डिनंड मार्कोस (फिलीपिन्स) ह्यांनी खगोशीला देवदूत समजून नको ते व्यवहार केले. ब्रुनेईच्या सुलतानांशी (जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती) संधान बांधले, चंद्रास्वामीला आपले गुरू बनविले, पामेला बोर्डस्‌सारख्या अनेक युवतींची लालूच दाखवून लिबियासारख्या राष्ट्रांशी व्यवहार केले. राष्ट्रा-राष्ट्रातील युद्धे, राष्ट्रांतर्गत उठाव, अतिरेकी उपद्व्याप, बंडे चालू ठेवणे हे शस्त्रांची दलाली करणाऱ्यांना हवेच असते. अशा दलालांना जगात शांती नांदणे परवडणारे नसते. कारण त्यांची धनाची आवकच शस्त्रांच्या खरेदी-विक्रीतून होत असते. असे लोक गणशत्रू जागतिक शांतीला धोकाच ठरतात. अदनन

खगोशी आज बंदिवान झाला आहे. पण खगोशीच्या बाबतीत मौज अशी की, तो धरला तर चावतो नि सोडला तर पळतो अशी त्याच्यावर आरोप ठेवणाऱ्या अमेरिकेची अवस्था झाली आहे. इराण-काँट्रागेट प्रकरणी खरे तर अमेरिकेच्या बुश सरकारला तो हवा आहे पण ह्याच प्रकरणी खगोशीकडे एवढी बित्तंबातमी आहे की, तो अमेरिकेची अब्रू उघड करू शकतो.

❋❋❋

# ५१

※

# गोष्ट एका आईची

**न्या**यालयाची बेअदबी केल्याचे खटले हा विषय वृत्तपत्रांच्या अग्रलेखांपासून कायदेतज्ज्ञांनी लिहिलेल्या जाडजूड ग्रंथांपर्यंत चर्चिला गेला आहे. तालुका पातळीवरील न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत प्रत्येक स्तरावर बेअदबीची असंख्य प्रकरणे लढविली जातात. पण अमेरिकेत एका बेअदबी खटल्यानं मानवी संस्कृतीलाच आव्हान दिलेले आहे. माणसाच्या नीचतेला कधी पशूची उपमा देऊ नये, कारण पशू माणसाएवढे अनैतिक कधीच होऊ शकत नाहीत. ह्या खटल्याने माणसाच्या विकृतीचे भयानक दर्शन घडवून सामाजिक नैतिकतेलाच न्यायालयापुढे खेचण्याची पायरी गाठली आहे.

ह्या खटल्यात पात्रे फारशी नाहीत. खटल्याचा मुख्य केंद्रबिंदू आहे एक सात वर्षे वयाची छोटुकली मुलगी आणि ती कोठेच दिसत नाही. म्हणजे ती नाहीशी झालेली आहे. आता कोणाला वाटेल की, बहुधा तिला पळवून नेल असावं. काही जण असेही म्हणतील की, ज्याअर्थी हा प्रकार अमेरिकेत घडला आहे त्याअर्थी भरभक्कम खंडणीसाठी सदर मुलीचे अपहरण करण्यात आलेले असावे. तर हा अंदाज साफ चूक! मादक द्रव्यांच्या व्यवहाराचा हा परिपाक म्हणावा तर तेही चूक! ही मुलगी सुरक्षित आहे पण दृष्टीस पडू शकत नाही. तिला पळवलेलं नाही- तर तिला लपवून ठेवलं आहे नि तेही तिच्या बापापासून! कोर्टाचा आदेश आहे की, ह्या मुलीला तिच्या बापासमोर आणले जावे पण त्या मुलीच्या आईने तो धुडकावून लावलाय नि कोर्टाची बेअदबी केल्याबद्दल ह्या आईने शिक्षा भोगली.

शिक्षा भोगणारी स्त्री काही सामान्य वकुबाची नाही. तिचं नाव आहे एलीझबेथ मॉर्गन. अमेरिकेतील प्रसिद्ध प्लॅस्टिक सर्जन असलेली ही ४२ वर्षे वयाची उच्च विद्याविभूषित स्त्री दोन वर्षे कोलंबिया राज्यातील कारागृहात बंदिवान झाली. तिच्या समर्थकांनी तिला 'धीरोदात्त माता' हे विशेषण लावलं आहे. मूर्तिमंत धैर्य, आदर्श माता अशा शब्दात डॉ. एलीझबेथ मॉर्गनचं वर्णन केलं जात आहे. एलीझबेथनं दिवाणी न्यायालयाची बेअदबी केली. वॉशिंग्टनचे न्यायाधीश हर्बर्ट डिक्सन ज्युनिअर ह्यांनी एलीझबेथला आदेश दिला की, तिने आपली ७ वर्षे वयाची मुलगी हिलरी हिचा ठावठिकाणा न्यायालयापुढे जाहीर करावा आणि हिलरीचा जन्मदाता पिता डॉक्टर एरीक फोर्टीश ह्याला हिलरीची गाठभेट घेण्यास अटकाव करू नये. एलीझबेथ मॉर्गननं हा आदेश धाब्यावर बसवला. 'हिलरीचा ठावठिकाणा सांगणार नाही... अगदी न्यायालयासही पत्ता लागू देणार नाही आणि डॉ. एरीक फोर्टीशला हिलरीची भेट कदापि घेऊ देणार नाही,' असे एलीझबेथने न्यायाधीश डिक्सन ह्यांना स्पष्टच सांगून टाकले. हा प्रकार साहजिकच न्यायालयाचा अवमान ह्याच गुन्ह्यात मोडणारा ठरला. एलीझबेथला काही कायदेतज्ज्ञ मंडळींनी असे सुचवून पाहिले की, एवढं निक्षून सांगण्यापेक्षा 'हिलरीचा पत्ता आपल्याला माहीतच नाही' असे सांगणे हितकर ठरेल. पण एलीझबेथनं हा सल्ला धुडकावला. 'मला हिलरीचा पत्ता चांगला ठाऊक असताना मी खोटे कशाला सांगू?' असा वर सवाल करीत एलीझबेथने आपला हेका कायम ठेवला.

न्यायाधीश डिक्सन खवळले. आपला आदेश मानत नाहीच, वर शहाजोगपणे खोटे बोलणार नाही असेही सांगणारी ही स्त्री बंदिवासाची शिक्षा भोगायला लावल्यावर आपोआप ताळ्यावर येईल अशा खात्रीने न्यायाधीश डिक्सन ह्यांनी बेअदबीच्या गुन्ह्याखाली एलीझबेथची रवानगी तुरुंगात केली पण ही बाई बदलली नाही. आता दोन वर्षे उलटूनही तिची भूमिका कायम आहे.

– हिलरीचा पिता डॉ. एरीक फोर्टीश ह्याच्यात लैंगिक विकृती असल्याने तो हिलरीशी अनैतिक वर्तन करतो तेव्हा हिलरीला त्याच्यापासून दूर ठेवणेच हिताचे आहे, असे स्पष्ट कारण डॉ. एलीझबेथ मॉर्गननं न्यायालयात सादर केलं आहे. पत्नीपेक्षा आईचे कर्तव्य आपणाला अधिक महत्त्वाचे वाटत असल्याने मुलीला बापापासून तोडण्याची ही कृती केलेली आहे, असेही तिने निवेदन केले. न्यायाधीशांनी एका आईची वेदना समजून घ्यावी, एका मातेच्या भूमिकेत शिरून जाणून घ्यावे, असे आवाहनही ह्या बुद्धिमंत स्त्रीने करून पाहिले, पण न्यायाधीश डिक्सन 'बेअदबी', 'बेअदबी' एवढाच आग्रह धरून राहिले. डिक्सन फेरनिवाड्यास तयार नाहीत नि एलीझबेथ हिलरीचा पत्ता सांगायला तयार नाही, अशी ही रस्सीखेच दोन वर्षे चालली.

ह्या खटल्यात रस घेणाऱ्या नागरिकांमध्ये आता दोन तट पडले आहेत.

एलीझबेथच्या समर्थकांची संख्या अर्थातच अधिक आहे. अमेरिकेची राष्ट्रीय महिला संघटनाही आता एलीझबेथच्या बाजूने या कायदेशीर लढ्यात उतरली आहे. एलीझबेथच्या टीकाकारांच्या मते डॉ. एरीक फोर्टिश हे अगदी निष्पाप व निकोप मनाचे आहेत नि प्रत्यक्ष कन्येच्या ठायी विषयवासना बाळगण्याची विकृती त्यांच्यात मुळीच नाही. उलटपक्षी एलीझबेथच मनोरुग्ण आहे. एलीझबेथच्या मनाचे हे सर्व खेळ आहेत. कल्पना आणि वास्तव यातील फरक एलीझबेथ जाणत नाही आणि डॉ. फोर्टिश यांचा ती तिरस्कार करीत असल्याने त्याच्यापोटी ती त्यांच्यावर भलतेसलते आळ घेत असावी, असा त्या टीकाकारांचा दावा आहे.

ह्या खटल्यामुळे अमेरिकेचे नीतिपालक आणि कायदेपटू मात्र चक्रावले आहेत. बेअदबीच्या गुन्ह्यासाठी एखाद्याला कैदेत टाकण्याचा न्यायाधीशाला अधिकार आहे हे मान्य केले तरीही ह्या बंदिवासाला काही कालमर्यादा आहे अथवा नाही? बेअदबीसाठी आजन्म कारावास देण्याचा डिक्सनना काय अधिकार? एखादी आई आपल्या मुलीच्या कल्याणासाठी ही बेअदबी करीत असेल तर अशा तऱ्हेने कोर्टाचा अवमान करणे हा तिचा नैतिक अधिकार नव्हे काय? विधिज्ञांपुढील प्रश्नांचा गुंता वाढत चालला नि अखेर कायदा विरुद्ध नैतिकता आणि कायदापालक न्यायालय विरुद्ध मातेचे कर्तव्य, असा चमत्कारिक तिढा निर्माण झाला आहे.

– ह्या तिढ्याची सुरुवात १९८१ साली झाली. एलीझबेथ मॉर्गन ही अत्यंत प्रसिद्ध प्लॅस्टिक सर्जन वास्तविक आपल्या व्यवसायात बुडालेली होती. १९८१ मध्ये तिची डॉ. एरीक फोर्टिशशी ओळख झाली. फोर्टिशही व्यवसायाने सर्जनच. ओळखीतून प्रेम वगैरे पायऱ्या आल्याच. तत्पूर्वी फोर्टिशची द्वितीय पत्नी आणि डॉ. फोर्टिश ह्यांच्यात बेबनाव झाला होता नि घटस्फोटाची तयारीसुद्धा झाली होती. दरम्यान एलीझबेथला दिवस गेल्याने डॉ. एरीक फोर्टिश व एलीझबेथ हैती येथे गेले. तेथे फोर्टिशला घटस्फोट झटपट मिळाला नि त्याने एलीझबेथशी विवाह केला. पण हा विवाह असफल ठरला. लग्नानंतर फक्त पाचच महिन्यांनी एलीझबेथ व एरीक फोर्टिश विभक्त झाले आणि त्यानंतर आठवड्याभराने एलीझबेथने हिलरी ह्या कन्येला जन्म दिला. रीतसर घटस्फोटानंतर एलीझबेथकडे हिलरीचा कायदेशीर ताबा आला आणि फोर्टिशला नियमितपणे हिलरीला भेटण्याची कोर्टाने मंजुरी दिली. पण तरीही हिलरीच्या ताब्याबाबत वादावादी चालूच राहिली. १९८५ च्या नोव्हेंबर महिन्यात हा खटला न्यायाधीश डिक्सन यांच्या कोर्टात समाविष्ट करण्यात आला. ह्या वर्षी ह्या खटल्याला अनपेक्षित कलाटणी मिळाली. डॉ. एरीकने लहानग्या हिलरीबरोबर- प्रत्यक्ष स्वतःच्या मुलीबरोबर दुर्वर्तन केल्याचा आरोप एलीझबेथने तीन वेळा केला आणि न्यायालयाने एरीक फोर्टिशला आपल्या घरी येण्यास प्रतिबंध करावा, असा अर्ज एलीझबेथने सादर केला. पण तिन्ही वेळा 'एलीझबेथचे पुरावे निःसंदिग्ध नाहीत' ह्या

कारणास्तव डिक्सननी ते अर्ज फेटाळले. एलीझबेथ व तिच्या वकिलाचे म्हणणे असे की, न्यायाधीश डिक्सन ह्यांनी एरीकच्या दुर्वर्तनाचे पुरावे दाखल करून घेण्यासच मुळात नकार दिला.

पण एलीझबेथ ठाम राहिली. आपल्या वडिलांबरोबर राहण्याच्या कल्पनेनेही छोटी हिलरी केवढी धास्तावून गेली आहे, हे तिने पुन्हा पुन्हा सांगितले. शेवटी स्वतःच एरीकला घरात घेण्यास एलीझबेथने प्रतिबंध करायला सुरुवात केली. एरीक भेटायला आला तरी दारच उघडायचे नाही, वगैरे मार्ग तिने अवलंबिले. पण एरीक फोर्टिश ऐकेना. त्याने न्यायाधीश डिक्सन ह्यांच्याकडे 'एलीझबेथ तुमचा आदेश धुडकावून मला हिलरीची भेट घेऊ देत नाही, सबब तिने न्यायालयाचा अवमान केला आहे', असा अर्ज सादर केला. ह्या क्षणी कोर्टात अनपेक्षितरीत्या फोर्टिश ह्याची द्वितीय पत्नी म्हणजे एकेकाळची प्रसिद्ध मॉडेल शॅरन सुलीव्हन धूमकेतूसारखी उगवली. शॅरनने बॉंबगोळाच टाकला. शॅरनला फोर्टिशपासून हेदर ही सुरेख मुलगी झाली होती. ती आज नऊ वर्षांची आहे. शॅरनने कोर्टात सरळच सांगितले की, हेदरशी गैरवर्तन करताना मी स्वतः फोर्टिशला पकडले होते नि त्याच्यापासून घटस्फोट घेण्याचे कारण त्याची ही भयानक विकृतीच होती. पण न्यायाधीश डिक्सन शॅरनच्या साक्षीतील सत्य मानायला तयार होईनात. उलटपक्षी हिलरीला एकटीला आपल्या पित्याकडे पंधरवड्यासाठी पाठवून द्यावे, असा हुकूम त्यांनी काढला. ह्यावर एलीझबेथने सरळ एक मानोविकारतज्ज्ञच कोर्टात साक्षीला आणला. वडिलांशी भेट झाल्यावर हिलरीच्या वर्तनात बदल घडतो व ती आत्मघातकी प्रवृत्ती उफाळल्यासारखे वर्तन करते, अशी साक्ष ह्या तज्ज्ञाने दिली. पण डिक्सन ऐकायला तयार नव्हते. आदेश म्हणजे आदेश!

– अन् एलीझबेथमधील आई संतापून उठली. एक दिवस हिलरी नाहीशी झाली. तिच्याबरोबरच एलीझबेथचे आई-वडीलही दिसेनासे झाले. २८ ऑगस्ट १९८७ रोजी डिक्सननी खवळून फर्मान काढले, 'एलीझबेथ मॉर्गनने हिलरीला कोर्टापुढे सादर करावे, अन्यथा कैदखान्यात सजा काटावी.' अन् एलीझबेथने दोन वर्षे खुनी, मादक द्रव्यांच्या गुन्ह्यात पकडलेल्या, खिसेकापू, वेश्यालये चालविणाऱ्या गुन्हेगार स्त्रियांची गर्दी झालेल्या कोलंबियन कारागृहात न्यायालयाच्या अवमानाबद्दल शिक्षा भोगली. पण तिच्यातील आई अभिमानाने सांगते – 'मध्यमवर्गीय अमेरिकनांना कळू दे की, सुस्थिर समाजात माझ्या मुलीवर तिच्या जन्मदात्या पित्याकडून बलात्कार झाला. कारागृहातून सुटका करायची तर मला ह्या मुलीला तिच्या बलात्कारी पित्याच्या हवाली करायला लागेल. तिचे जीवन माझ्या देखता डोळा मी कुस्करू देणार नाही. त्यापेक्षा मी कैदेत राहीन. हिलरी सुरक्षित आहे, ह्या विश्वासाने मला कारावासही सुसह्य होतो.'

मात्र दोन वर्षांनी एलीझबेथच्या सुटकेची सुचिन्हे दिसू लागली. अमेरिकन सेनेटने

न्यायालयाच्या अवमानाबाबतच्या शिक्षेसंबंधीचे विधेयक सादर केले. दि. २० सप्टेंबर १९८९ रोजी कोलंबिया अपील्स कोर्टात डिक्सनच्या ह्या शिक्षेसंबंधी चर्चा व सुनावणी होणार आहे. दरम्यान अमेरिकन विधिज्ञ प्रा. रॉबर्ट मार्टीनो, टेक्ससचे कुबेर रॉस पेरॉ, प्रा. डेव्हिड चेंबर्स आदी मातब्बर मंडळी एलीझबेथच्या समर्थनार्थ कायद्याचा कीस पाडायला उठली आहेत. एका सामान्य स्त्रीची प्रतिक्रिया तर प्रातिनिधिकच आहे – 'सात वर्षाच्या मुलीशी दुर्वर्तन करणारा पिता मोकाट नि त्या मुलीचे त्याच्यापासून रक्षण करणारी माता कैदेत? वा! कायद्याचा एवढा मोठा पराभव?'

१८/९/८९

❋❋❋

## ५२

## आकाशाशी जडले नाते

लंडनहून 'रॉयटर'चे वृत्त आले होते – 'जगप्रसिद्ध विक्रमी महिला पायलट शीला स्कॉट लंडनच्या एका हॉस्पिटलमध्ये वयाच्या ६१ व्या वर्षी कर्करोगाने कालवश झाली.' महिला पायलट तथा पायलट महिला दोन्हींची आता कोणाला अपूर्वाई राहिली नसावी. दूर्वा बॅनर्जी आणि सौदामिनी देशमुखसारख्या महिला पायलट आज भारतीय हवाई वाहतूक कंपन्यांतून काम करीत आहेत. सौदामिनी देशमुख तर आपल्या पुण्याचीच! त्याहीपूर्वी चंदा सावंत बुधभट्टी, राबिया फतेहअली अशा वैमानिक महिलांची माहिती भारतीयांना होतीच. वजनानं हलक्या नि आकारानं छोट्या असलेल्या विमानातून अलीकडेच श्री. विजयपत सिंघानिया ह्यांनी साहसयात्रा केली नि त्यांचं वीरोचित स्वागतही झालं होतं. त्या पार्श्वभूमीवर 'शिला स्कॉट' हे नाव वाचून, स्मरणातून पुसून टाकण्याइतकं सामान्य नाही... मग भले तिचं जीवन मृत्यूनं पुसलं असलं तरीही!

शीला स्कॉट हे व्यक्तिमत्त्व सर्वगुणसंपन्न होतं. सौंदर्य, लक्ष्मी, बुद्धी, गोडवा, कलाप्रेम, रसिकता सगळ्यांचा वरदहस्त ठेवून जणू एखाद्याला जन्माला घालावं नि कोणीही परिपूर्ण नसतं हे सिद्ध करायला कोठेतरी कमतरता ठेवावी हा नियतीचा खेळ शीला स्कॉटच्याबाबतीतही राहिला. सर्व दिलं मात्र त्याच्या बदल्यात खूप महत्त्वाचं काहीतरी हिरावून घेतलं. असंच शीलाच्या बाबतीत घडत गेलं. अन् जे तिच्यापासून हिरावलं गेलं ते तिला सदैव वाकुल्या दाखवीत राहिलं.

शीला ख्रिस्तीन हॉप्किन्स इंग्लंडमध्ये वूस्टर येथे २९ एप्रिल १९२७ रोजी जन्मली. १९२७ ह्या वर्षाला जागतिक विमानोड्डाण इतिहासात मोठे महत्त्व आहे. एकट्यानं लांब पल्ल्याचं विमानोड्डाण करण्याचं अचाट साहस प्रथम ह्याच वर्षी झालं. विमानाचा शोध लागल्यापासून आकाश आपल्या कवेत घेण्याच्या ओढीनं अनेक साहसवीर पुढे आले नि ही परंपरा कायम चालूच राहणार आहे. ह्या साहसवीरांमध्ये काही नावं दिगंत कीर्ती मिळवून हवाई विक्रमांच्या इतिहासात शाश्वत बनली. त्यातील ठळक नावं म्हणजे मार्सेल दसॉ, चार्ल्स ऑगस्टस् लिंडबर्ग आणि नाझींचा डेप्युटी फ्यूरर तथा हिटलरचा अत्यंत जवळचा साथी हेर रुडॉल्फ हेस. रुडॉल्फ हेसचं वैशिष्ट्य म्हणजे तो जमिनीपासून १०-१२ फुटांपर्यंत खाली विमान आणून थक्क करी. विरोधकांच्या सभा उधळण्याकामी हिटलरला हेसच्या ह्या कौशल्याचा फार छान उपयोग होत असे. चार्ल्स ऑगस्टस् लिंडबर्ग म्हणजे तर हवाई साहसातले भीष्माचार्य! कोठेही मध्ये न थांबता न्यूयॉर्क ते पॅरीस ही झेप लिंडबर्गनं १९२७ मध्ये त्या काळात उपलब्ध असलेल्या एक-आसनी, एकेरी इंजिनाच्या (आता हे विमान अगदीच प्राथमिक वाटेल) विमानानं यशस्वी रीत्या करून मोठा विक्रम नोंदविला. लिंडबर्ग केवळ ह्या विक्रमानंच संस्मरणीय झाला नाही तर त्याच्या वाट्याला एक भीषण शोकांतिका आली नि त्यापायी आंतरराष्ट्रीय गुन्हे, अपहरण, कायदा नि खटले ह्या क्षेत्रातही चार्ल्स ऑगस्टस् लिंडबर्ग हे नाव कायमचं ठसलं... लिंडबर्ग धनंतर होता. कुबेरपुत्रच जणू! पण कुबेराच्या कृपेबरोबरच कर्णाचाही औदार्याचा गुण घेऊन आलेला. हवाई विक्रमातून निधी उभारून तो सेवाभावी संस्थांना तर द्यायचाच पण स्वतःच्या खजिन्याला खार लावूनही अनेकांना मदत करण्यात तत्पर असलेल्या लिंडबर्गचा जीव की प्राण होती त्याची एकुलती एक मुलगी. पैशाच्या लोभानं ह्या वारसाचं अपहरण करण्यात आलं. तिच्या शोधासाठी लिंडबर्गनं जणू जग पिंजून काढलं... तो वेडापिसा झाला... लिंडबर्गची पत्नी मनोरुग्ण बनली... अखेरपर्यंत छडा लागलाच नाही... लिंडबर्ग निःसंतान जग सोडून गेला नि त्याची दौलत ढापायला 'अपहरण झालेली मुलगी' म्हणून अनेक व्यक्ती पुढे आल्या. अमेरिकन उच्च न्यायालयानं त्यांचे दावे खोटे ठरवून लिंडबर्ग दौलतीचा विश्वस्त निधी उभारला. मात्र हे अपहरण कायम गूढ राहिले. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या डिटेक्टिव्हस्चे म्हणणे असे होते की, स्वार्थी नातेवाईक नि गुन्हेगार ह्यांनी हातमिळवणी करून हे अपहरण केले. पण त्या बालिकेचा त्यांनी निर्घृण खून केला! ह्या दुर्दैवी घटनेनं सर्वांत अस्वस्थ झाली एक रहस्यलेखिका... अर्थातच डेम ॲगथा ख्रिस्टी... ॲगथानं लिहिलेली 'मर्डर ऑन दी ओरियंट एक्स्प्रेस' ही कादंबरी लिंडबर्ग प्रकरणाला पाया मानून त्यावर उभी आहे. त्यावर आधारलेल्या त्याच नावाच्या चित्रपटात अल्बर्ट फिनी, जेम्स मेसन, इन्ग्रिड बर्गमन, व्हॅनेसा रेडग्रेव अशी मातब्बर मंडळी होती. तर हा लिंडबर्ग शीला स्कॉटचा स्फूर्तिस्थान बनला. त्यानं ज्या वर्षी न्यूयॉर्क-पॅरीस उड्डाण केले त्याच वर्षी हिचा जन्म हा केवळ योगायोग.

शीला हॉप्किन्सच्या आयुष्यात शोकांतिका घडली, तेव्हा ती फक्त सात वर्षांची होती. आई-वडिलांची एकुलती एक मुलगी. हे त्रिकोणी कुटुंब सुखात होतं नि एकाएकी त्रिकोणाचा चौथा कोन आला. पाहुणा म्हणून एक अभिनेता हॉप्किन्स कुटुंबात आला आणि एके दिवशी संध्याकाळी तो पाहुणा नि शीलाची आई गायब झाली. शीलाचे वडील शहाणे. ते समजून चुकले. पण शीला त्या क्षणापासून आपलं लहानपण हरवून आई शोधत राहिली. योगायोग असा की, ही आई तिला कधीच परत दिसली नाही नि तो अभिनेताही कायम दिसेनासाच झाला! ती जिवंत असल्यास तिनं ह्या लेकीला ना दर्शन दिलं ना पत्र लिहिलं. एकाएकी पूर्णविरामच जणू मायलेकीच्या नात्याला तिनं दिला. शीलाच्या दादा-दादींनी मग तिला वाढवलं. पुढे वडिलांनी दुसरा विवाह केला. पण शीलाच्या मनात कायम असुरक्षितपणाची भावना राहिली. शीला स्कॉटच्या व्यक्तिमत्त्वातले ते चमत्कृतिपूर्ण वैशिष्ट्य म्हणायचे की, असुरक्षिततेच्या भीतीपासून दूर पळण्यासाठी तिने साहसाच्या म्हणजे पर्यायाने अत्यंत असुरक्षित अशा वाटा शोधल्या.१६व्या वर्षी ती रॉयल नेव्हल सेक्शनमध्ये भरती झाली. दुसरं महायुद्ध संपलं तेव्हा शीला हॉप्किन्सचं नाव एक विलक्षण सुंदर मुलगी म्हणून चर्चिलं जाई. सर अलेक्झांडर कॉर्डासारख्या ख्यातनाम चित्रमहर्षीनं (मर्ल ओबरॉनचा एक पती) तिला चित्रपटात भूमिका दिली... शीला स्कॉट हे नाव चित्रपट क्षेत्रानं तिला दिलं. शीला स्कॉट ही प्रसिद्ध अभिनेत्री बनली असती पण नियतीचा डाव वेगळा पडला. वयाच्या १८व्या वर्षी रुपर्ट बेल्मीशी शीलानं विवाह केला आणि जणू दु:ख विकत घेतलं. हा विवाह १९५० मध्ये संपुष्टात आला. त्यानंतर ९ वर्षे शीलानं गरिबी, एकाकीपणा आणि दिशाहीन अवस्थेत काढली. तिला प्रेम देऊ करणारे अनेक स्वार्थी पुरुष ह्याच काळात तिला आढळले. ३२ वर्षांच्या शीलाला एक दिवस विमानोड्डाणाबाबतचा एक विस्तृत लेख मिळाला नि ती अस्वस्थ झाली. मॉडेलिंग करून तिनं थोडी रक्कम उभी केली... थोडी उसनी घेतली नि शीला स्कॉट अँडोव्हरच्या हवाई प्रशिक्षण केंद्रात जाऊन धडकली. एवढेच नव्हे तर विमान शर्यतीत पाचवी आली नि मग शीला स्कॉट व विमानोड्डाण हे समीकरण झाले. जमिनीवरच्या तापदायक अनुभवांनी खचलेली शीला आकाशात विहरणे अधिक पसंत करू लागली.

खरं म्हणजे जमेची बाजू तिच्याकडे नव्हती. ऱ्हस्वदृष्टीचा दोष, असाधारण रक्तदाब, नैराश्याचे येणारे झटके, आर्थिक अडचणी ह्या सर्व बाबी तिचे पाय जमिनीवर खेचू पाहात होत्या. पण ही ऐकेना. शीलाचं कौशल्य पाहून मग सेसना आणि पायपर ह्या विमाननिर्मात्यांनी शीलाचा व्यावसायिक वापर करून ही विमाने लोकप्रिय करण्याची मोहीम आखली. त्यात चांगलंच यश मिळालं. अखेर कान्सस (अमेरिका) येथील सेसना कारखान्यानं तिला अमेरिकेला आमंत्रित केलं. अमेरिकेत शीलानं व्यावसायिक वैमानिकाचा परवाना घेतला नि उड्डाणाचे अनुभव अधिकच व्यापक बनविले. जिनीव्हाच्या पायपर

एअरक्राफ्ट कंपनीनं तर तिला एकेरी इंजिनाचे, हलके पायपर-४०० हे विमान दिले आणि शीला स्कॉटचे विक्रम सुरू झाले.

३६ तासांत युरोपमधल्या १० देशांच्या राजधान्या गाठणे, द हेग, ब्रुसेल्स, पॅरिस, बेलफास्ट आणि डब्लीन हे परतीचे प्रवास सर्वाधिक वेगाने करणे हे विक्रम तिनं सहज खिशात घतले नि मग पृथ्वीप्रदक्षिणेची स्वप्ने शीला पाहू लागली. तोवर हे धाडस दोनच अमेरिकन महिलांनी केले होते. १८ मे १९६६ रोजी पायपर कमांचे-२६० ह्या छोटेखानी विमानात बसून शीला लंडनहून निघाली आणि ३३ दिवस तीन मिनिटे एवढ्या अल्पावधीत एकूण १८९ तासांचे उड्डाण व ३१,००० मैल अंतर कापून शीला लंडनला परतली. ह्या काळात ३२ थांबे तिने घेतले व 'लेडी फिलियस फॉग' हे तिला कौतुकानं ब्रिटिशांनी दिलेले नाव सार्थ केलं. पुढे १९६९ मध्ये २४ तास ४८ मिनिटांत लंडन-न्यूयॉर्क उड्डाण, ४८ तास ४२ मिनिटांत लंडन ते नैरोबी आणि ५६ तास १३ मिनिटांत जोहान्सबर्ग ते लंडन अशी विक्रमी उड्डाणे तिने केली. १९७१ मध्ये तर जून व ऑगस्ट महिन्यात तिने विषुववृत्त ते उत्तर ध्रुव नि परत विषुववृत्त असे क्रांतिकारी उड्डाण केले. उत्तर ध्रुवावर वळसा घालणारी आणि ध्वनीच्या वेगापेक्षाही अधिक गतीनं विमान चालवणारी ही पहिली महिला होय. राणी एलिझबेथनी ह्या विक्रमी वीरांगनेला 'ऑर्डर ऑफ द ब्रिटिश एम्पायर' देऊन तिचा गौरव केला होता. १९७१ चा विषुववृत्तापासून उत्तर ध्रुवाचा भोज्जा शिवून येण्याचा पराक्रम हा शीलाचा अखेरचा विक्रम ठरला. त्यानंतर ह्या एकाकी, नैराश्यानं ग्रासलेल्या स्त्रीनं लीलया लेखणी हाती धरली आणि शीला स्कॉट उत्तम लेखिकाही आहे, हे जगाला नव्यानं कळलं. सतत कशाशी तरी झुंजत राहणे नशिबी आलेली ही स्त्री आयुष्याच्या अखेरीस कॅन्सरशी झुंजली नि विक्रम आणि कीर्ती मागे ठेवून गेली. लिंडबर्गसारखेच कोणीही वारस मागे न राहिलेली!

७/११/८८

❋❋❋

५३

※

# रुझवेल्ट, स्टॅलीन, मन्रो वगैरे

ऑक्टोबर महिन्याचे महत्त्व रशियात जरा जास्तच. ऑक्टोबर हा क्रांतीचा महिना. ७१ वर्षांपूर्वी रशियात पहिली क्रांती झाली ती ऑक्टोबरमध्येच नि आज पुनः दुसरी क्रांतीही ह्याच महिन्यात झाली. मिखाएल गोर्बाचेव्ह रशियाचे अध्यक्ष झाले नि हे अध्यक्षपद त्यांच्यासाठी रिकामे करण्यासाठी अर्थातच त्या पदावरच्या मोहऱ्याला दूर व्हावे लागले. हे असेच होणार होते... हे भाकीत वर्तवायला कोणा ज्योतिषाची गरज नव्हती. विदेशी माध्यमातून हे खूप आधीच छातीठोकपणे सांगितले जात होते. योग्य वेळी रशियाचे अध्यक्षपद गोर्बाचेव्ह ह्यांच्याकरिता रिकामे करण्यासाठीच ज्यांना त्या पदावर बसविले होते ते आंद्रे ग्रोमिको स्वतःदेखील जाणून होते. कारण हे पद त्यांना पुरस्कार म्हणून दिलेलं होतं... जोसेफ स्टॅलीनची सेवा बजावल्याबद्दल.. निकिता ख्रुश्चेव्हला निष्ठा दिल्याबद्दल... ब्रेझनेवशी बांधिलकी राखल्याबद्दल आणि मिखाएल गोर्बाचेव्ह ह्यांच्यासाठी श्रमल्याबद्दल! स्वतः ग्रोमिकोही समजले होते की, पुरस्कार म्हणून मिळालेली ही खुर्ची लवकरच त्यांना सोडावी लागणार आहे. अखेर ग्रोमिको आणि गोर्बाचेव्ह हे नातं किंग अँड द किंगमेकर असं होतं नि जेव्हा जेव्हा किंगमेकर अडचणीचा ठरतो तेव्हा तेव्हा किंगमेकरलाच माघार घ्यावी लागते, हा इतिहास आहे.

– आंद्रे ग्रोमिको म्हणजे राजकारणातला विक्रमवीर, त्यांच्या बरोबर सत्ताहीन झालेले अनातोली डॉब्रिनिन हेही असेच विक्रमवीर. डॉब्रिनिनचा विक्रम म्हणजे सतत २५

वर्षे राजदूत म्हणून बजावलेली कामगिरी तर ग्रोमिकोंचा विक्रम म्हणजे जगात सर्वाधिक काळ एका देशाचा विदेशमंत्री म्हणून काम करणे. ग्रोमिकोच्या नावावर आणखी एक विक्रम नोंदला गेला आहे तो जास्तीत जास्त वेळा नकाराधिकार (व्हेटो) वापरण्याचा. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीच्या बैठकीतून १९५० ते ५५ ह्या काळात ग्रोमिकोंनी मोजून २५ वेळा व्हेटो वापरला. अखेर त्यांना तेथे 'मिस्टर न्येत' (श्री. नकारघंटक) असे टोपण नाव पडले होते. तसे तर त्यांना 'पोकरफेस', 'स्टोनफेस्ड' अशीही टोपण नावं चेष्टेनं दिली जात. कारण रेषाही न हालवता मख्ख चेहरा ठेवून प्रतिस्पर्धी विदेशमंत्र्याला आपल्या मनाचा आणि मतांचा थांगही लागू न देण्यात ग्रोमिको निष्णात होते.

आंद्रे ग्रोमिको म्हणजे गेली ५० वर्षे जुन्या मोरावळ्यासारखा राजकारणात मुरलेला मुरब्बी! रशियन नेते फारच क्वचित आत्मचरित्रे लिहितात. किंबहुना लिहिली असल्यास ती जगासमोर येण्यापूर्वीच नष्ट केली जात असावीत पण आंद्रे ग्रोमिकाचा हाही एका परीनं विक्रम म्हणावा लागेल की, त्यांनी 'द मेम्वार्स' हे आत्मचरित्र लिहिले व ते प्रकाशित झाले. अर्थात ह्या लेखनात रशियन वृत्ती कायम राहिली आहेच... ती म्हणजे फारसे उघड न करणे आणि सनसनाटी न लिहिणे. पण ह्या आत्मचरित्रात चीनबद्दलचा जो मजकूर आहे तो मात्र थक्क करणारा आहे – 'ऑगस्ट १९५८ मध्ये ग्रोमिको गुप्तपणे चीनच्या भेटीला गेलेले असताना माओ झेडाँग ह्यांनी त्यांना रहस्यमयरीत्या आपला विचार ऐकविला. तो असा की, काही तरी करून अमेरिकन लष्कराला चीनच्या भूमीवर आणायचे... चीनने माघार घेण्याचे नाटक करायचे नि हे लष्कर पुरेसे अंतर्भागात आल्यावर, रशियाने आपल्या अण्वस्त्रांनी त्यांचा नि:पात करायचा.' कसा वाटतो हा कट? ग्रोमिकोंना क्षणभर माओ वेडपट असावा अशीच शंका आली. तेथल्या तेथेच ग्रोमिकोंनी हा प्रस्ताव धुडकावून लावला. 'रशियन नेतृत्वाला हे नामंजूर आहे,' अशा शब्दांत त्यांनी नकार दिला नि हळूच नंतर माओला विचारले, 'अशी अण्वस्त्रे वापरल्यास मिस्टर माओ, चीनची किती लोकसंख्या मरणाच्या खाईत जाईल ह्याची कल्पना आहे का तुम्हाला?' त्यावरील माओचे उत्तर काळजाचा ठोका चुकवणारे होते – 'तीनशे मिलियन (३० कोटी) चिनी मरतील पण भांडवलदार खलास होतील त्याचं काय?' ग्रोमिको पुढे लिहून गेले की, रशिया आणि चीन ह्यांच्यातील तणाव तेव्हा वाढीला लागला होता आणि तरीही आपल्याला अणुबाँब बनविण्यासाठी सहाय्य द्यावे म्हणून चीनने रशियाच्या मागे लकडा लावला होता. रशियाने अणुसाहित्य देण्याचे आश्वासनही दिले होते पण १९५९ मध्ये हे आश्वासन रद्द करण्यात आले. रशियाने माओवर पुढे बेजबाबदार म्हणून आरोपही केला. अर्थातच हे आश्वासन रद्द करण्यामागे ग्रोमिको आणि निकिता खुश्चेव्ह ही दुक्कल होती हे उघडच आहे. पण १९५८-५९ मध्ये ग्रोमिकोंनी अंदाज वर्तविला होता की, कधी तरी चीन अण्वस्त्रे बनविणारच नि १९६४ मध्ये चीनने पहिला अणुस्फोट केला. ग्रोमिकोची

मुत्सद्देगिरी ही अशी परिपक्व होती. क्वेमॉय आणि मॉत्सू ह्या वादग्रस्त बेटांच्या निमित्ताने अमेरिकेला युद्धात खेचायचा चीनचा डाव होता. (कदाचित ग्रोमिकोंनी तेव्हा अमेरिकेलाही सावधगिरीचा इशारा दिला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.)

ग्रोमिकोंचे आत्मचरित्र दोन खंडांत आहे. आणि विसाव्या शतकातील पाच दशकांच्या इतिहासाचे दर्शन त्यात घडते. ७८ वर्षे वय असलेले ग्रोमिको आपल्या मुत्सद्देगिरीच्या कालखंडात अमेरिकेच्या नऊ राष्ट्राध्यक्षांच्या संपर्कात आले. फ्रँकलीन डेल्नो रुझवेल्ट, हॅरी ट्रूमन, आयसन हावर, जॉन केनेडी, लिंडन जॉन्सन, रिचर्ड निक्सन, जेरल्ड फोर्ड, जिमी कार्टर आणि रॉनल रेगन हे नऊ अध्यक्ष आणि कॉर्डेल हल ते जॉर्ज शुल्झ हे १४ अमेरिकन परराष्ट्रमंत्री व त्यांना पुरून उरणारा एकटा ग्रोमिको असा हा ५० वर्षांचा काळ होता.

ह्या आत्मचरित्रात दुसऱ्या महायुद्धातील दोस्त राष्ट्रांचे सहकार्य जसे वर्णन केले आहे तसेच मदनिका मॅरीलीन मन्रो हिचेही वर्णन आहे. राष्ट्राध्यक्ष जॉर्ज केनेडींशी झालेली पहिली भेट अविस्मरणीय आहे. संयुक्त राष्ट्रांची स्थापना करण्याच्या संबंधात १९४५ मध्ये सॅन फ्रॅन्सिस्को येथे एक आंतरराष्ट्रीय परिषद झाली. ह्या परिषदेत एक तरुण पत्रकार बरेच प्रश्न विचारीत होता. आंद्रे ग्रोमिको ह्यांची तर त्याने छानशी मुलाखतही घेतली. ह्या पत्रकाराचं नाव होतं जॉन केनेडी. पुढे केनेडी राष्ट्राध्यक्ष झाल्यावर ग्रोमिकोंनी त्यांना स्वच्छ सांगितलं की, पत्रकार म्हणून तुम्ही फार आवडला होतात नि आज राष्ट्राध्यक्ष म्हणूनही तुम्ही अमेरिकेसाठी उत्तम कार्य करीत आहात, मात्र क्युबामधील रशियन क्षेपणास्त्रांबाबत आपल्याला एकमेकांशी वाद घालावा लागत आहे. ग्रोमिकोंच्या मते केनेडी हळूहळू रशियन भूमिका समजून घेऊ लागले होते आणि रशिया-अमेरिका ह्यांतील तणाव केनेडींनी निश्चितच दूर केला असता पण दुर्दैवानं त्यांची हत्या झाली.

आंद्रे ग्रोमिको १९३९ मध्ये सर्वांत प्रथम अमेरिकेस वॉशिंग्टनला रशियन मुत्सद्दी म्हणून आले नि पहिली भेट फ्रँकलीन रूझवेल्ट ह्यांच्याशी झाली. अमेरिकेच्या ह्या राष्ट्राध्यक्षाचे वर्णन ग्रोमिकोंनी जागतिक नेता म्हणून केले आहे. पुढे १९४३ मध्ये ग्रोमिको अमेरिकेतील रशियाचे राजदूत बनले व १९४६ पर्यंत त्या पदावर राहिले. 'रुझवेल्ट म्हणजे खुल्या दिलाचा, प्रत्येक कृतीतूत जगाचे कल्याण झाले पाहिजे अशीच भूमिका ठेवणारा सद्गृहस्थ, त्यांना अमेरिकेपुरते सीमित करू नये तर सर्व जगावरच त्यांनी छाप पाडली. हे गौरवोद्गार रशियन मुत्सुद्द्याकडून मिळणे म्हणजे आश्चर्यच म्हणायचे. स्टॅलिनबद्दल प्रशंसोद्गार काढण्याचाही 'विक्रम' ग्रोमिकोंनी केला. वाटाघाटी कराव्यात तर 'स्टॅलीननेच असे एक विधान त्यांनी 'मेम्वार्स'मध्ये केले नि बहुधा त्यामुळेच पहिली ठिणगी पडली असावी, कारण ग्लासनोस्त व पेरेस्त्रोयका ह्या धोरणात स्टॅलीनला दूषणं देण्याइतका मुक्तपणा आला आहे. स्टॅलीन जेव्हा निरोगी होता तेव्हा त्याची स्मरणशक्ती इतकी तेज

होती की, जणू संगणकच!

एक आश्चर्याची बाब- जी केवळ आजच्या ग्लासनोस्तमध्येच शोभावी अशी- म्हणजे ग्रोमिको आणि जगप्रसिद्ध नोबेल पारितोषिक विजेते बोरीस पास्तरनॅक ह्यांची मैत्री. 'डॉ. झिवागो' ह्या कादंबरीचा हा प्रतिभावंत लेखक आणि थोर कवी! रशियन राजवटीच्या रोषास पात्र झाल्याने सोव्हिएत लेखक संघातून त्यांची १९५८ मध्ये हकालपट्टी करण्यात आली. त्याच वर्षी पास्तरनॅकला 'झिवागो'बद्दल नोबेल पुरस्कार मिळाला तर तोही रशियाने त्यांना स्वीकारू दिला नाही. नोबेल पुरस्कार स्वीकारायचा असेल तर रशिया कायमचा सोडावा लागेल असे सांगितले. बोरीस पास्तरनॅक खरे प्रतिभावंत साहित्यिक होते. प्रतिभा आणि साहित्य ह्यांचे त्या त्या देशाच्या मातीशी ऋणानुबंध असतात नि ते तोडता येत नाहीत. पास्तरनॅकचं तेच झालं. बहिष्कार, शिक्षा, उपेक्षा आणि अवहेलनेत मृत्यू आणि अर्थातच गोर्बाचेव्ह ह्यांच्या नव्या मुक्त धोरणात पास्तरनॅकचा मरणोत्तर गौरव...! पण अविश्वसनीय बाब अशी की, आंद्रे ग्रोमिको पास्तरनॅक ह्यांना त्यांच्या पडत्या काळातही वारंवार भेटत होते.

अमेरिकन संस्कृतीबद्दल ग्रोमिकोच्या मनात खूपसे कुतूहल आणि काहीसा तिटकारा अशी संमिश्र भावना होती. मॅरीलीन मन्रोशी ग्रोमिकोंची भेट १९५९ मध्ये निकिता ख्रुश्चेव्ह ह्यांच्या सन्मानार्थ हॉलीवुडने दिलेल्या मेजवानीत झाली. फ्रँक सिनात्रा व इतर अनेक प्रसिद्ध तारे-तारका तिथंच भेटल्या. पण मन्रोची बाबच वेगळी! ती आपण होऊन ग्रोमिकोंशी बोलायला आली नि कम्युनिझमबाबत काही भाष्य करण्याएवढी ती बुद्धिवान होती. ग्रोमिको म्हणतात की, एवढी सुंदर निसर्गनिर्मिती पुन्हा खचितच होणार नाही. मन्रोचा मृत्यू नैसर्गिक नसावा तथा काही रहस्यमय बाबींसंबंधात तिला ही सजा देण्यात आली असावी, असा त्यांचा कयास होता.

ग्रोमिको आणि कॉन्स्टंटीन चेर्नेन्को हे प्रकरण हृद्य आहे. १९८५ मध्ये चेर्नेन्कोंनी ग्रोमिकोंना बोलवून घेतले नि म्हणाले- 'आंद्रे आंद्रेविच, माझी प्रकृती साफ खलास झालीय. मी राजीनामा देण्याचा विचार करतोय!' ह्या विचारापासून ग्रोमिकोंनीच चेर्नेन्कोंना परावृत्त केलं आणि केवळ तीनच दिवसांत चेर्नेन्को कालवश झाले.

स्टॅलिन, रुझवेल्ट, पास्तरनाक आणि मॅरीलीन असा अफाट आणि बेफाट देखील कालखंड चितारणाऱ्या ह्या आत्मचरित्राची भाषा रसाळ म्हणता येणार नाही, कधी हातचे राखल्याची भावनाही निर्माण होते पण अखेरीस हा एका मुत्सद्द्याचा आलेख आहे. आज तो मुत्सद्दी पदभ्रष्ट झाला असला तरी त्यानं शब्दबद्ध केलेला इतिहास दुर्लक्षिणे योग्य ठरणार नाही. अखेर इतिहास हा शतरंज आहे. पटावरची प्यादी आणि फर्जी बदलत जाणारच! सत्ताहीन झाल्यावर 'वाढतं वृद्धत्व हा घटक लक्षात घेतलाच पाहिजे' ही ग्रोमिकोंची प्रतिक्रियाच सांगून जाते की, हा तर अर्धशतक श्रमलेला मुरब्बी मुत्सद्दी!

३/१०/८८

❋❋❋

# ५४

※

# रहस्य कायमच आहे!

**इ.** स. १९८८ संपत आले तेव्हा साहजिकच हे वर्ष गाजवणाऱ्या व्यक्तींची नामावली एखाद्या चित्रपटातल्या श्रेयनामावलीसारखी नजरेसमोर तरळावी. ह्या वर्षातले सर्वांत मोठे आश्चर्य म्हणजे इराक-इराण युद्धाची समाप्ती तर भयावह शोकांतिका म्हणजे आर्मेनियाचा भूकंप. सर्वाधिक गाजलेली निवडणूक पाकिस्तानची नि सर्वाधिक प्रकाशात आलेली स्त्री अर्थातच बेनझीर भुट्टो ठरली. वर्षभरातला अधिक गाजलेला आजार जपानचे सम्राट हिरोहितो ह्यांचा तर सर्वांत चटका लावणारी आत्महत्या रशियाच्या अणुसंशोधन क्षेत्रातील भीष्माचार्य व्हॅलरी लिगासोव ह्यांची ठरली. नेत्रदीपक सोहळा म्हणजे अर्थातच सोलचे ऑलिम्पिक. बंदिखान्यात राहूनही सतत प्रकाशझोतात राहण्याचा विक्रम अर्थातच नेल्सन मँडेलांचा तर साहित्य जगतात वादळी ठरले गेब्रिएल गार्सिया मार्कीझ आणि सलमन रशदी हे दोघेजण! सर्वांत धक्कादायक वर्तन करण्याचा विक्रम तिघांनी केला. दक्षिण कोरियाचे चुन-डु-हॉन ह्यांनी आपण केलेल्या भ्रष्टाचाराची उघड कबुली दिली नि ते ढसढसा रडले तर दुसरा विक्रम चिलीचे ऑगस्ते पिनोचे ह्यांचा. निवडणूक हरूनही स्वतःचा पराभव त्यांनी अमान्य केला. तिसरा विक्रम वैयक्तिक असला तरी एकूण प्रकारातून जगातील प्रथम क्रमांकाची भानगड इ. स. १९८९ मध्ये त्यामुळे उद्‌भवणार आहे. ग्रीसचे आंद्रीयाज पापांद्रो हे ते विक्रमवीर. वयाच्या ६९ व्या वर्षी ते आपली पस्तिशीची प्रेयसी घेऊन तिच्याबरोबर विवाह करण्याचा नि त्याकरिता पत्नी मार्गरेट पापांद्रो हिला घटस्फोट देण्याचा मनसुबा

जाहीर करून बसले हा त्यांचा विक्रम, तर ग्रीसची जनता सवाई विक्रमवीर ठरली. इंग्लंडच्या आठव्या एडवर्डने आपल्या प्रेयसीसाठी सिंहासन सोडले तसा आधी तुमच्या पंतप्रधानकीचा राजीनामा द्या नि मग पापांद्रो महाशय, खुशाल प्रेयसीशी लग्न करा, असा इशारा ग्रीकांनी दिला. वर्षातला सर्वांत चुटपुट लावणारा मृत्यू कुबेरकन्या ख्रिस्तिना ओनॅसिस हिचा... मुलगी आणि दौलत दोन्हींना पोरकं करून ही दु:खी स्त्री ३७ व्या वर्षी निधन पावली. अशीच एक निवृत्तीही चटका लावणारी ठरली. रशियाचे मुरब्बी राजकारणी आंद्रे ग्रोमिको ह्यांची निवृत्ती आणि त्या क्षणापासून त्यांचे मौन अस्वस्थ करणारे ठरले. यंदाची सर्वांत महत्त्वाची क्रांती म्हणजे रशियातील गोर्बाचेव्ह ह्यांचे रक्तहीन मन्वंतर ठरले. मात्र ग्रोमिको ह्यांच्या निवृत्तीने हुरहूरही वाटली.

आंद्रे ग्रोमिको निवृत्त झाल्यानंतर (अथवा निवृत्त केले गेल्यानंतर) आशा होती की, ते काही बोलतील. तत्पूर्वी यंदाच्या वर्षारंभी त्यांची 'द मेम्वार्स' स्मृतिगाथा प्रसिद्ध होते वेळी काही बाबतीत ते प्रकाश टाकतील असे वाटले होते... विशेषत: स्वीडन आणि हंगेरीला! पण ग्रोमिकोंनी त्याबाबत निराशा केली. निवृत्तीनंतर तरी ग्रोमिको त्या विशिष्ट बाबतीत काही स्पष्टीकरण करतील, अशी खात्री होती. पण ग्रोमिकोंनी जणू तोंडाला कुलूप घातले आणि निवृत्तीच्या शांत जीवनाकडे वळले. न बोलण्याचा दृढ निश्चय करून! त्यांचे मौन कदाचित रशियाच्या व त्यांच्या स्वत:च्या हिताचे असू शकते पण स्वीडन आणि हंगेरी गप्प राहायला तयार नाहीत. ह्या प्रकरणाची फाईल एखाद्या गुन्हेगाराच्या फायलीप्रमाणे बंद करावी, हे त्यांना मान्य नाही, कारण ह्या प्रकरणातील नायक गुन्हेगार नव्हताच उलट देवमाणसाप्रमाणे धावून आला होता...

हे प्रकरण म्हणजे महायुद्धाच्या काळातील रहस्य ठरलेले वॉलनबर्ग प्रकरण. नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांच्या बाबतीत जसा शेवट रहस्यमय राहिला तसेच वॉलनबर्गचे असणे किंवा नसणेही रहस्यमय राहिले आहे. दुसऱ्या महायुद्धात अखेर जपानने शरणागती पत्करल्यावर जपान्यांनी चीनचा अखेरचा सम्राट जसा रशियनांच्या हवाली केला, तसेच नेताजींनाही रशियाच्या ताब्यात जपान्यांनीच दिले असल्याची एक मतप्रणाली आहे. वॉलनबर्गची कहाणी बरीच वेगळी आहे.

– १९४४ च्या जून महिन्यातली घटना. स्टॉकहोम (स्वीडन) येथे अमेरिकेच्या काही प्रतिनिधींनी ३२ वर्षे वयाच्या एका स्वीडिश तरुणाची भेट घेतली. गुप्त चर्चा झाली. समस्या होती हंगेरीमधील यहुदी नागरिकांची. हंगेरियन यहुद्यांची हिटलरचे नाझी आणि खुद्द हंगेरीतील फॅसिस्टांनी ससेहोलपट चालविली होती. यहुद्यांचा मार्ग ठरलेला होता – नाझींच्या छळछावण्या, अत्याचार आणि गॅसचेंबरमध्ये मृत्यू हेच त्यांचं भवितव्य होतं. अन् ही अमेरिकन मंडळी त्या तरुणाला विनंती करू लागली की, तू बुडापेस्ट (हंगेरी) येथे जाऊन यहुद्यांना वाचवावे, ह्या तरुणाचे नाव रॉल वॉलनबर्ग. स्वीडनमधल्या अतिशय सुप्रतिष्ठित

धनाढ्य कुटुंबातील मुलगा, कुशाग्र बुद्धी आणि निधडी छाती लाभलेला हा तरुण अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातून नैपुण्य मिळवून कुटुंबाच्या व्यवसायात नुकताच शिरला होता. प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या जोडीला सहृदय मन त्याला लाभलं होतं. अमेरिकेच्या विनंतीस त्यानं मान्यता दिली.

हंगेरीत त्या वेळी त्याच्याच वयाचे नाझी व फॅसिस्ट धुमाकूळ घालीत होते. त्यांच्यापाशी शस्त्रे होती नि रॅल वॉलनबर्गपाशी एक जमेची बाजू होती. युद्धात तटस्थ राहिलेल्या स्वीडनच्या राजनैतिक खात्यातील दुय्यम प्रवक्ता हे पद एवढेच वॉलनबर्गपाशी होते. वॉलनबर्गच्या धैर्यानं जग थक्क झालं. रात्रीचा दिवस करून रॅल वॉलनबर्गने हंगेरीतील यहुद्यांना स्वीडनच्या नागरिकत्वाची कागदपत्रे दिली. हजारो यहुद्यांना त्याने ह्या कागदपत्रांच्या जोरावर वाचविले. रातोरात हंगेरीतील निवडक मित्रांच्या घरांवर स्वीडनचे ध्वज फडकविले नि ह्या घरांतून यहुद्यांना लपवून ठेवले. अखेर स्वीडन तटस्थ होते. स्वीडिश जनता, स्वीडिश ध्वज आणि स्वीडनचा वॉलनबर्ग ह्यांचा बालही बाका करण्याचा अधिकार हिटलरला अगर फॅसिस्टांना नव्हता. यहुद्यांचे शिरकाण चालू असताना रॅल वॉलनबर्ग हातात शस्त्रही न घेता प्रत्यक्ष त्या नरमेधांपर्यंत जाई अन् 'मी स्वीडनचा वॉलनबर्ग' एवढेच सांगे. जणू ते त्याचं कवचकुंडल होत. बचावलेले ज्यू ह्या माणसाच्या हाती मग सोपवणे नाझींना क्रमप्राप्त होई. कारण त्यांना हा तरुण स्वीडनचे अभय देणारे कागदपत्र बहाल करी. हंगेरीचे हजारो यहुदी नरमेधात बळी गेले. पण जे वाचले ते वॉलनबर्गमुळेच बचावले. विशेषतः हंगेरियन यहुद्यांची बालके त्याने हजारोंच्या संख्येने सुरक्षितपणे स्वीडनला आणली. यहुद्यांच्या प्राचीन इतिहासात मोझेसला जे स्थान आहे, ते स्थान नाझींच्या तावडीतून वाचलेल्या यहुद्यांनी वॉलनबर्गला दिलं. अन् रॅल वॉलनबर्ग प्रॉटेस्टंट ख्रिश्चन होता हे विशेष!

वॉलनबर्गच्या केसाला धक्का लावण्याचं क्रूर काम नाझींनाही जमलं नाही. हंगेरीच्या फॅसिस्टांनाही जमलं नाही. पण ते कर्म केलं स्टॅलीननं आणि रशियानं! १९४५ च्या जानेवारीत हंगेरीत नाझींचा पाडाव झाला आणि रशियन सेनेनं बुडापेस्टमध्ये विजयोत्सव करीत प्रवेश केला. नाझींचं दुःस्वप्न आता संपलंय. आता यहुद्यांना चिंता करण्याचं नि वॉलनबर्गला जिवाचं रान करण्याचं कारण संपलं होतं. रशिया 'दोस्त' राष्ट्रांपैकी महत्त्वाचा देश होता. यहुद्यांकरिताच आणखी काही मदत आता मिळवावी ह्या उद्देशाने रॅल वॉलनबर्ग दि. १७ जानेवारी १९४५ रोजी रशियन सेनेतील अधिकाऱ्यांच्या भेटीस गेला आणि...

...आणि तो नाहीसाच झाला. त्याचा मागमूसही नाही. हंगेरी, स्वीडन, यहुद्यांची आंतरराष्ट्रीय संघटना, वॉलनबर्ग कुटुंब, अमेरिका 'रेडक्रॉस, इंटरपोल, एफबीआय, स्वीडनचे राजघराणे, प्रॉटेस्टंट आणि कॅथलीक चर्चेस, नंतर अस्तित्वात आलेला संयुक्त राष्ट्रसंघ, मानवी हक्क संघटना, ॲम्नेस्टी इंटरनॅशनल, तटस्थ राष्ट्रांचा गुरू असलेले

स्वित्झर्लंड, दोस्तांचे सर्व सेनापती (पॅटन, माँटगॉमरी, मॅक्आर्थर वगैरे), न्यूरेंबर्गचे न्यायालय, हेगचे आंतरराष्ट्रीय न्यायालय अशा अनेक पातळीवर 'वॉलनबर्ग कोठे आहे?', 'वॉलनबर्गचे नक्की काय झाले?' हा प्रश्न सातत्याने रशियाला विचारण्यात आला नि सातत्याने बारा वर्षे रशियाने वॉलनबर्ग आपला कैदी नाही, असेच सांगितले. अन् मग एक दिवस १९५७ मध्ये मॉस्कोतून निवेदन आले. –'होय! रॉल वॉलनबर्गला १७ जानेवारी १९४५ रोजी रशियाने कैद केले. पण अधिकृत माहिती अशी आहे की, १९४७ मध्ये रशियातील तुरुंगात त्यांचे निधन झाले. त्याचा मृतदेह आणि त्याच्याजवळील सर्व कागदपत्रे गहाळ झाली असून त्याची माहिती देऊ शकतील, अशी कोणीही मंडळी हयात नाहीत.' रशियाचे हे निवेदन संतापजनकच होते नि ह्या निवेदनावर सही करणाऱ्या माणसाचा हुद्दा होता रशियाचा उपपरराष्ट्रमंत्री... नाव होतं आंद्रे ग्रोमिको!

ग्रोमिकोंच्या सहीचे हे अधिकृत निवेदन प्रसिद्ध होताच रशियातून गुप्तपणे, आपली नावे उघड न करता अनेक पत्रे, निरोप स्वीडन व अन्य संस्थांकडे आले. अनेक कैद्यांनी वॉलनबर्गला म्हणे १९४७ नंतरही पाहिले होते. काहींनी तर छातीठोकपणे लिहिले होते की, तो अद्यापि जिवंत आहे आणि रशियन श्रमछावणीत (यातना छावणीचे दुसरे रूप) खितपत पडला आहे. ह्या पत्रातील मजकूर खराखोटा पडताळणे शक्य नव्हते पण इतिहासकार आणि महायुद्धाचे बखरकार ह्यांच्या मते ग्रोमिकोंच्या निवेदनानंतरही वॉलनबर्ग निश्चित जिवंत होता. मग रॉल वॉलनबर्गचे झाले तरी काय? आज ४३ वर्षे रशियाने सत्य का दडविले आहे? हा प्रश्न सातत्याने विचारला जात आहे. आंद्रे ग्रोमिकोंनी स्टॅलीन ते गोर्बाचेव्ह अशा नेत्यांच्या कारकीर्दीत सतत ५० वर्षे सातत्याने वाढती, चढती पदे भूषविली. यंदा त्यांची गाजलेली निवृत्ती झाली. तेव्हा पाश्चिमात्य देश व सर्व माध्यमांनी एकच नारा लावला– 'ग्रोमिको, आता तरी रॉल वॉलनबर्गची सत्य कहाणी सांगा.' पण आंद्रे ग्रोमिकोचे ओठ शिवल्याप्रमाणेच राहिले नि एक शब्दही न उच्चारता ग्रोमिको राजकीय शतरंजावरून नाहीसे झाले. मिखाएल गोर्बाचेव्ह ह्यांनी 'ग्लासनोस्त' धोरण अवलंबिले आहे. त्यांचे हे धोरण जाहीर होताच स्वीडनचा पहिला खलिता त्यांना आला– 'रॉल वॉलनबर्ग प्रकरणातील सत्य कथन करावे!' गोर्बाचेव्हही मूग गिळून आहेत.

दरम्यान हंगेरीनं एक अचाट प्रकार केला. हंगेरीतील अमेरिकेचे राजदूत निकलस सॉल्गो ह्यांनी अमेरिकेस परतताना हंगेरीचा प्रसिद्ध शिल्पकार इमे वार्गा ह्याला वॉलनबर्गचा पुतळा घडवायचे काम दिले आणि बुडापेस्टच्या नागरिकांनी चक्क हा पुतळा बुडापेस्टमध्ये उभारला. हे नागरिक आणखीच विक्षिप्त निघाले. त्यांनी हंगेरियन सरकारातील कोणालाही अनावरणास बोलाविले नाही तर खासगी व्यक्ती ह्या नात्याने स्वीडनचे राजे कार्ल गुस्ताव्ह १६ वे ह्यांना प्रतिनिधी पाठविण्यास विनविले. राजे गुस्ताव्ह ह्यांनीही आपला प्रतिनिधी पाठवून भावना व्यक्त केल्याच. पण आता जगभरातून जोरदार मागणी सुरू झाली आहे–

'मिखाएल गोर्बाचेव्ह, किमान तुम्ही तरी हे रहस्य उघडा नि सांगा, वॉलनबर्गचं काय झालं?'

१९/१२/८८

❋❋❋

५५

# मुत्सद्द्यांचा मुत्सद्दी

आंतरराष्ट्रीय राजकारणात सलगपणे पाच-पाच दशके काढणं सोपं नाही. अशी माणसं मग त्या क्षेत्रात इतकी मुरतात की, त्या प्रदीर्घ कालखंडाशी एकरूप होऊन जातात नि हे क्षेत्र जागतिक पातळीवरील असल्याने लांबच लांब काळातल्या इतिहासाचे साक्षीदार बनतात. आंद्रे ग्रोमिको हे असेच गेल्या साठ वर्षांच्या इतिहासाचे डोळस साक्षीदार आणि गेल्या पन्नास वर्षांच्या घडामोडींतील एक घटक! राष्ट्रप्रमुख येतात- कारकीर्द संपल्यावर सत्ताहीन होऊन परततात... नवा राष्ट्रप्रमुख येतो... मग नव्या विटया नि नवे डाव मांडले जातात... त्यात जुन्या खेळाडूंना बहुधा स्थान नसते... किंबहुना त्यांना डच्चू देणे अधिक सोयीस्कर ठरते... मग सगळेच भिडू बदलतात... मंत्री होत्याचे नव्हते बनतात. ही जगरहाटी आहे नि अपवादात्मक एखाद्याच्या बाबतीत ती मोडली जाते. आंद्रे ग्रोमिको हा असा अपवादात्मक मुत्सद्दी, जो जोसफ स्टॅलीन ते मिखाएल गोर्बाचेव्ह अशा लांबलचक काळात राष्ट्रप्रमुख बदलूनही आपल्या स्थानावर कायम राहिला. स्टॅलीनचा माणूस म्हणून शिक्का बसला होता तरीही निकिता ख्रुश्चेव्ह ह्यांच्या नेतृत्वात त्यांचं स्थान ढळलं नाही, ना ब्रेझनेव्हच्या कारकीर्दीत ना युरी आंद्रोपॉव्हच्या काळात... कॉन्स्टंटीन चेर्नेन्को ह्यांना तर ग्रोमिकोंबद्दल विशेष आपुलकी होती. वेगळ्या विचारसरणीच्या प्रत्येक राजप्रमुखानं विश्वास टाकावा असे विशेष गुण ग्रोमिकोंमध्ये होते. नेत्याशी प्रामाणिक राहायचे नि देशाला निष्ठा द्यायची, पक्षाची धोरणे पाळायची, व्यक्तिगत लाभ, लोभ ह्यांच्यापासून अस्पर्श्य

राहायचं ही ग्रोमिकोंची तत्त्वे पाहता त्यांच्या पाच दशकांच्या ध्रुवस्थानाचे इंगित कळून यावे. एवढ्या प्रदीर्घ अनुभवामुळेच जगातील पहिल्या क्रमांकाचा परराष्ट्रनीतिज्ञ म्हणून त्यांची ख्याती झाली... राजकारणातील छक्केपंजे पाहिलेला, स्टॅलीनच्या पठडीत तयार झालेला हा मुत्सद्दी अखेरच्या शतरंजमध्ये मात्र पराभूत झाला. अर्थात त्याच्या परीनं तो शतरंज खेळत नव्हताच कारण स्वार्थ साधायची मनीषा कधी त्यांच्यापाशी नव्हती. चेर्नेन्को ह्यांच्या निधनानंतर रशियाचे नेतृत्व युरी आंद्रोपॉव्ह ह्यांचा माणूस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मिखाएल गोर्बाचेव्ह ह्यांना लाभावे म्हणून आंद्रे ग्रोमिको ह्यांनीच त्यांच्या उमेदवारीस पाठिंबा दिला होता नि ह्याच ग्रोमिकोंचे परराष्ट्रमंत्रिपद गोर्बाचेव्हनी काढून घेऊन ग्रोमिकोंना नामधारी अध्यक्ष बनविले... त्याच क्षणापासून ग्रोमिकोंचा राजकीय अस्त सुरू झाला. जुलै १९८५ ते सप्टेंबर १९८८ ह्या नावापुरत्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत सक्रीय राजकारणातून हटविले गेलेल्या ग्रोमिकोंनी मग काय केले असेल?

—१९८५ ते ८७ एवढ्या काळात ग्रोमिकोंनी आत्मचरित्रात्मक 'स्मृती' लिहिल्या. 'द मेम्वार्स' ह्या नावाने दोन खंडांत असलेल्या ह्या स्मृती म्हणजे विसाव्या शतकातील सहा दशकांमध्ये झडलेल्या घटना, पेच, युद्धे, धोरणातील बदल, राजकीय क्षितिजावरील महत्त्वाच्या व्यक्तींचे वर्तन, त्यांचे आलेले अनुभव ह्यांचा एक खजिनाच आहे. मुळात रशियन नेते स्वतःबद्दल कमी बोलतात, कमी लिहितात. पत्नी-मुले-घरगुती जीवन ह्याबाबत मोजकं सांगतात. ह्या 'मेम्वार्स' मध्ये सनसनाटी काही नाही. २९ वर्षे परराष्ट्रमंत्री असलेल्या नि जास्तीत जास्त काळ अमेरिकेत वास्तव्य केलेल्या ग्रोमिकोंनी त्यांच्या व्यक्तित्वाला साजेशा भारदस्त व साध्या पद्धतीने केलेल्या ह्या लेखनामुळे ना पोटोमॅक नदीत खळबळ माजली ना वोल्गा नदी उसळली... कदाचित काही हातचं राखलं असेल... पण ह्या स्मृती लोलकासारख्या आहेत, अनेक व्यक्तींचे अनोखे दर्शन त्यात घडते.

—सनसनाटी नाही पण धक्कादायक अशी स्मृती ग्रोमिकोंच्या मनात घर करून राहिली होती नि आजच्या ताज्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर कोणालाही ती अविश्वसनीय वाटू नये. ही स्मृतिशलाका चीनचे दिवंगत नेते माओ ह्यांच्या संबंधातली आहे. १९५८ मध्ये माओ झेडाँगनी रशियाकडे एक प्रस्ताव मांडला. कसेही करून अमेरिकन लष्कराला चीनच्या भूमीवर आणायचे आणि मग रशियाने बनविलेल्या अण्वस्त्रांचा वापर करून त्या सैन्याचा खात्मा करायचा. हा प्रस्ताव येताच १९५८ च्या ऑगस्ट महिन्यात ग्रोमिको गुप्तपणे बीजिंगला गेले नि रशियन नेतृत्वाला हे साफ नामंजूर आहे, असे कळविले. माओ ग्रोमिकोंना परोपरीने सांगत राहिला की, अणुयुद्धातही चीनची काही हानी होणार नाही... फार तर ३०० मिलियन लोक मरतील पण भांडवलशाही अमेरिकन मरतील ही केवढी जमेची बाजू... माओचा आततायीपणा एवढा होता की, निकिता ख्रुश्चेव्ह त्याच महिन्यात चीनच्या दौऱ्यावर आले असता त्यांनाही माओने ह्या प्रस्तावाबाबत पुन्हा गळ घातली.

वास्तवात अणुबाँबसंबंधात रशियाने चीनला पूर्वीच सहकार्याची हमी दिली होती पण माओची ही भयानक योजना ऐकताच रशियाने १९५९ मध्ये ही हमी मोडीतच काढली. ग्रोमिकोंनी माओला बेजबाबदार म्हटले होते. माओने पुढे १९६४ मध्ये चीनची पहिली अणुस्फोट चाचणी केलीच. माओच्या मनात क्वेमॉय व मात्सु ह्या दोन बेटांवरून तैवान (तेव्हा फोर्मोसा) व चीन ह्यांच्यात पेटलेल्या संघर्षाचा फायदा घेऊन चिनी फौज माघारीचे नाटक करीत चीनमध्ये आणून अमेरिकेला डिवचायचे होते. म्हणजे मग अमेरिकन सैन्यही चिनी लष्करामागे चीनमध्ये येईल नि त्या सैन्याचा रशियनांनी अण्वस्त्रे वापरून साफ कचरा करावा अशी अमानुष योजना होती.

विसाव्या शतकातील पन्नास वर्षे मुत्सद्देगिरी करणाऱ्या ग्रोमिकोंनी फ्रँकलीन डेल्नो रुझवेल्ट, हॅरी टूर्‌मन, आयसन, हावर, जॉन केनडी, लिंडन जॉन्सन, रिचर्ड निक्सन, जेरल्ड फोर्ड, जिमी कार्टर व रॉनल रेगन हे नऊ अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आणि कॉर्डेल हल ते जॉर्ज शुल्झ हे १४ अमेरिकन परराष्ट्रमंत्री पाहिले. ह्या स्मृतीमध्ये दुसऱ्या महायुद्धातील इंग्लंड- अमेरिका- रशिया ह्या दोस्त राष्ट्रांच्या सहकार्यापासून ह्या राष्ट्रांशी पुढे रशियाच्या शीतयुद्धापर्यंतचा आलेख आहे. त्यात स्टॅलीन आहे तशीच मेरीलीनही आहे. (म्हणजे आपली मन्‌रो) रशियन नेत्यांचा १९५९ मध्ये हॉलीवुडने सत्कार केला होता नेव्हा ग्रोमिकोंनी मेरीलीन मन्‌रोला प्रथम पाहिले मन्‌रो स्वतः येऊन त्यांच्याशी बोलू लागली. कम्युनिझमबद्दल तिला बरेच आकर्षण वाटत असावे, असा संशय तेव्हा ग्रोमिकोंना आला मात्र मन्‌रो स्वतःच कमालीची आकर्षक होती, असेही त्यांनी प्रांजळपणे सांगितले. फ्रँक सिनात्रा हा मोठा गायक-नट असल्याचे त्यांना त्या समारंभात कळले.

आंद्रे आंद्रेविच ग्रोमिको ह्यांचा जन्म दि. १८ जुलै १९०९ रोजी स्तार्ये ग्रोमिकी ह्या गावी एका शेतकऱ्याच्या घरात झाला. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन त्यांनी १९३२ मध्ये अर्थशास्त्रात पदवी संपादली आणि रशियन परराष्ट्र खात्यात शिरले. मार्शल जोसफ स्टॅलीनने ह्या बुद्धिमान तरुणाला हेरले आणि ३० वर्षे वयाच्या आंद्रेला रशियन मुत्सद्दी म्हणून अमेरिकेला पाठवले. त्याची पाठवणी करताना स्टॅलीन म्हणाला-'आंद्रे आंद्रेविच, तुझं इंग्रजी सुधारणं आवश्यक आहे. अमेरिकेला गेल्यावर तू चर्चमध्ये जात जा. कम्युनिस्ट असलास तरीही! चर्चमध्ये धर्मसेवकांची प्रवचनं लक्षपूर्वक ऐक. नक्कीच तुझं इंग्रजी छान होईल!' ग्रोमिकोंनी हा धडा गिरवला. इतका की, त्यांचं इंग्लिश वक्तृत्व अमेरिकन मुत्सद्द्यांनाही मागे टाकणारं ठरलं. अवघ्या ३४ व्या वर्षी १९४३ मध्ये स्टॅलीनने त्यांना अमेरिकेतील रशियन राजदूत बनवून टाकले. रुझवेल्टबाबत ग्रोमिकोंनी 'स्मृती' मध्ये अविश्वसनीय हळुवारपणा प्रकट केला आहे. 'साऱ्या जगाबद्दल आस्था व कल्याणाची भावना बाळगणारा नेता अशी तरुण ग्रोमिकोंच्या मनात त्यांची प्रतिमा तयार झाली होती. रुझवेल्ट पारदर्शी व्यक्तित्वाचे होते, असे स्पष्ट करीत ग्रोमिकोंनी स्टॅलीनबाबत खोटी

वाटावी अशी स्मृती सांगितली आहे–

'स्टॅलीनची स्मरणशक्ती एखाद्या संगणकासारखी होती. ज्याला सदैव भावनाशून्य असे विशेषण लावले जाई तो स्टॅलीन एकदा कमालीचा हळवा बनला होता नि तोही रुझवेल्टच्या बाबतीत! रुझवेल्ट, चर्चिल व स्टॅलीन ह्यांच्यातील प्रसिद्ध याल्टा परिषद झाली तेव्हा रुझवेल्ट गंभीर आजारी होते. त्यांच्या खोलीतून स्टॅलीन बाहेर पडला, पाईपमध्ये तंबाखू भरली नि ग्रोमिको आणि परराष्ट्रमंत्री वॅचेस्लाव मोलोतोव्ह ह्यांना म्हणाला, 'एवढ्या चांगल्या माणसाला ही जीवघेण्या आजाराची शिक्षा का?' ग्रोमिकोंच्या मते स्टॅलीनचे डोळे तेव्हा पाणावले होते पण लागलीच नेहमीच्या स्टाईलमध्ये पाईप ओढून स्टॅलीनने धुराचा पडदा तयार केला.

१९४५ मध्ये युद्धसमाप्तीनंतर संयुक्त राष्ट्रांची स्थापना झाली. त्यात ग्रोमिकोंचा मोठा सहभाग होता. त्यासंबंधी सॅन फ्रॅन्सिस्को येथे एक पत्रकार परिषद झाली. त्यात एक तरुण पत्रकार ग्रोमिकोंना खूपच शोधक प्रश्न विचारू लागला. देखण्या चेहऱ्याचा तो पत्रकार आपले म्हणणे आधी सांगे नि मग भुवया वर उचलून, डोळ्यांची मजेदार हालचाल करीत ग्रोमिकोंना प्रश्न करी. हा तरुण 'एक अभ्यासू पत्रकार' म्हणून ग्रोमिकोंच्या मनात ठसला नि त्याच्या सर्व प्रश्नांची त्यांनी आस्थेवाईकपणे उत्तरे दिली. १९४५ मध्ये भेटलेला हा तरुण म्हणजेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनलेले जॉन केनेडी! आपल्याला आवडलेल्या त्या व्यक्तीशी पुढे क्युबामधील रशियन क्षेपणास्त्रांच्या संदर्भात आपले खूप वाद झाले, राजनैतिक तणाव निर्माण झाले पण एकदाही केनेडींनी मला असा प्रश्न केला नाही की, क्युबामध्ये खरेच रशियन क्षेपणास्त्रे आहेत का? त्यामुळे आपल्याला उत्तर द्यावेच लागले नाही. अशी आठवण त्यांनी नमूद केली आहे. केनेडींची हत्या ही अमानुष घटना आजही अस्वस्थ करते, असे सांगून ग्रोमिकोंनी म्हटले आहे की, केनेडी जगले असते तर रशिया-अमेरिका सौहार्द तेव्हाच सुरू झाले असते.

क्रेमलीनमधील राजकारणाबाबत लिहिताना ग्रोमिकोंची लेखणी अधिकच संयत बनली. स्टॅलीन-मॅलेन्कॉव-ख्रुश्चेव्ह-ब्रेझनेव्ह-आंद्रोपॉव्ह-चेर्नेन्को-गोर्बाचेव्ह ह्यांच्याविषयी काळजीपूर्वक लिहिल्याची जाणीव होते. स्टॅलीनची प्रशंसा त्यांनी केली आहे तर युनोमध्ये पायताण हाती घेणारे ख्रुश्चेव्ह जसे त्यात आहेत तसेच झुल्फिकार अली भुट्टोंना फाशी देण्याचा निर्णय घेणाऱ्या जनरल झियांचे मन वळवू पाहणारे ब्रेझनेव्हही आहेत. 'राजवटी बदलतात, जुन्या नेत्यांवर खूनखराब्याचे आरोप ठेवणे सोपे असते पण म्हणून फाशी देणे योग्य नव्हे.' असे सांगून भुट्टोंची मुक्तता करण्यासाठी ब्रेझनेव्ह ह्यांनी झियांकडे विनंती केली. ती न मानल्याची सल ब्रेझनेव्हच्या मनात राहिली होती. क्रेमलीनमधील राजकारणात चेर्नेन्कोंचे निधन हा प्रसंग चटका लावणारा आहे. मृत्युशय्येवरील चेर्नेन्कोंनी ग्रोमिकोंना बोलावणे पाठविले. 'आंद्रे आंद्रेविच, मी आता जगत नाही हे निश्चित. मी राजीनामा देणं

इष्ट!' चेर्नेन्कोंना राजीनाम्यापासून ग्रोमिकोंनी परावृत्त केले. रशियात सरकारच्या रोषाची शिकार बनलेले डॉ. बोरीस पास्तरनॅक ह्यांच्याशी ग्रोमिकोंची चांगली मैत्री होती. 'डॉक्टर झिवागो' वरील बंदी उठविण्यासाठी ग्रोमिकोंनी प्रयत्नही केला पण तो असफल झाला. ग्रोपिश जेव्हा जेव्हा मॉस्कोला जात तेव्हा पास्तरनॅकला भेटतच. ग्रोमिकोंची पत्नी लीडीया हिच्यासाठी एकदा पास्तरनॅकनी मुद्दाम कविता रचून दिली होती.

भारताबाबतचा अतूट जिव्हाळा ग्रोमिकोंच्या 'मेम्वार्स' मध्ये ठिकठिकाणी आहे. नेहरूंना त्यांनी विद्वान तत्त्वचिंतक आणि विचारी नेता अशा विशेषणांनी गौरविले आहे तर इंदिरा गांधींविषयी परमावधीचा आदर व्यक्त केला आहे. जबर इच्छाशक्तीचे निधान हा शब्दप्रयोग त्यांनी इंदिराजींविषयी केला आहे. कृष्ण मेनन ह्यांच्या संबंधात ग्रोमिकोंची आठवण धमालच आहे. मेनन ज्या ज्या हॉटेलात उतरत तेथील सेवकवर्ग चिडत असे, कारण खोलीतील गाद्या-गिरद्या उलट्यापालट्या करण्याची मेननला सवय होती. अखेर ग्रोमिकोंनी सरळच असे का करता म्हणून विचारले... मेननना पाठदुखीचा विकार होता. नरम गाद्या चालत नसत. 'हार्डबेड' मिळणे दुरापास्त म्हणून मेनन पलंगावरील गाद्या काढून फेकीत, ग्रोमिकोंनी त्यांना सुचविले की, त्यांनी बरोबर काही व्यवस्था ठेवावी. मेननने गादी-उशीशिवाय झोपणे हा पाश्चात्त्य पत्रकारांच्या लेखणीचा विषय बनला होता.

कै. शास्त्रीजींच्या बाबतीतील ग्रोमिकोंची आठवण अविस्मरणीय आहे. ताश्कंदचा भारत-पाक करार होताच आनंदोत्सव झाला नि त्याच मध्यरात्री ग्रोमिकोंना शास्त्रीजींच्या दुर्घटनेबाबत पळभरात खबर गेली. वेळ न दवडता ग्रोमिको शास्त्रीजींच्या खोलीत हजर झाले. कोसिजीन तेथे डोके धरून बसलेले... रशियन डॉक्टर कृत्रिम श्वासोच्छ्वासाचा प्रयत्न करताहेत असे वर्णन केले आहे. ग्रोमिको आणि कोसिजीननी हातांना ब्रॅन्डी लावून शास्त्रीजींच्या तळव्यांना मसाज करायला आरंभ केला पण सर्व विफल झाले.

रशियन मुत्सद्दी, अमेरिकेतील रशियन राजदूत, संयुक्त राष्ट्रातील रशियाचे राजदूत व सुरक्षा मंडळाचे प्रमुख, विशेष नकाराधिकारांचा कमाल वापर करून 'मिस्टर न्येत', (व्हेटो) हे विशेषण घेणारे राजनीतिज्ञ, रशियाचे परराष्ट्रमंत्री ह्या पदांवरून ग्रोमिकोंनी १९३९ ते १९८५ हा काळ गाजविला. राजनीतिशास्त्रात वॅचेस्लाव्ह मोलोतेव्ह आणि आंद्रे ग्रोमिको ह्यांची दखल भावी विद्यार्थ्यास घ्यावीच लागेल, कारण दोघेही इतिहासाचे घटक बनले होते. एक प्रलयंकारी काळात तर दुसरा तुलनात्मक शांततेच्या काळात!

९/७/८९

❋❋❋

# ५६

※

# पुनरुत्थान...

'**मा**झ्यापाशी ईश्वरासाठी जागा नाही. पण जगात फारशी जागा तो व्यापणार नसेल आणि दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाला विधायक कार्याकडे वळवणार असेल तर राहू दे त्या ईश्वराला'- व्हॉल्टेअर- 'धर्म ही अफूची गोळी आहे.' -कार्ल मार्क्स- 'प्रतिगामी धर्मगुरूंशी आपल्याला निर्णायक युद्ध करावेच लागेल. त्यांचा विरोध मोडून काढायला आपण पराकोटीचे क्रौर्य अवलंबायला हवे, मग पुढील कित्येक दशके त्यांना विसर पडणार नाही'– लेनिन.

व्हॉल्टेअर आणि मार्क्सची विधाने खूपच मवाळ वाटावीत, इतके लेनिनचे विधान धारदार आहे. किंबहुना विधान अथवा विचार ह्या स्वरूपाचे ते बोल नव्हते तर सरळ सरळ हुकूमच होता. रशियातील राज्यक्रांतीनंतर इ. स. १९२२ मध्ये लिहिलेला लेनिनचा हा आदेश कार्यवाहीत निर्घृणरीत्या उतरला होता. रशियातील लक्षावधी धर्मगुरूंना लेनिन आणि स्टॅलीन ह्यांनी मृत्यूच्या वाटेने लोटले. त्यातील काही थोडे सुदैवी निघाले. कारण त्यांना सरळ गोळ्या घालण्यात आल्या. काहींचा भोगवटा अधिक खडतर होता. सैबेरियाच्या छळछावणीत यातना सहन करीत कणाकणाने मरण्याचे दुर्दैव त्यांच्या वाट्याला आले. यहुद्यांचा राजा येशूच्या हत्येपासून ख्रिस्ती धर्मेतिहासात अधूनमधून रक्तकांडे होत राहिली. येशूच्या वेळी सनातनी यहुदी धर्माचार्य आणि रोमन सम्राट ह्यांनी असा अध्याय घडविला, इस्लामी आक्रमणामुळे ख्रिस्ती व यहुदी ह्या उभय धर्मियांना छळाला तोंड द्यावे

लागले. कॅथलिक इन्क्विझिशनमुळे तर ख्रिस्ती धर्मांतरगत रक्तपाताची कमाल झाली, त्यात सामान्य ख्रिस्ती माणूस अतिरेकी पीठाधिपतींकडून भरडून निघाला आणि जणू नियतीने ह्या छळांचा वचपा काढवा, अशा न्यायाने विसाव्या शतकात सर्वांत प्रचंड ख्रिश्चन साम्राज्य असलेल्या रशियामध्ये कम्युनिझमच्या रणगाड्यांच्या रेट्यात लक्षावधी ख्रिस्ती धर्मगुरू, पीठपती आणि धर्माबाबत बदलत्या संदर्भात भाष्य करणारे विचारवंत ह्यांच्या कत्तली झाल्या. कम्युनिझमचे हे धार्मिक अत्याचार सत्तर वर्षे गुलदस्तात राहिले. लाल राजवटीत अनेक काळे अध्याय अंधारात राहिले तसेच हेही प्रकरण दडपले असते पण राष्ट्राध्यक्ष मिखाएल गोर्बाचेव्ह ह्यांच्या ग्लासनोस्तचा परिपाक म्हणून लेनिन-स्टॅलीन ह्यांची क्रूर कृत्ये उघडकीला येऊ लागली. उच्चार-आचार-विचार-लेखन ह्या स्वातंत्र्यांपाठोपाठ धर्मस्वातंत्र्य गेल्या ७० वर्षांत प्रथमच रशियनांना मिळाले नि त्याचे जे अभूतपूर्व स्वागत झाले, ते पाहून लेनिनच्या कट्टर अनुयायांनी आणि स्टॅलीनवाद्यांनी धर्मविरोधातील आपली प्रदीर्घ लढाई अखेर मागे घतली. हिरण्यकश्यपू आणि प्रल्हादाच्या कथेचा हा चालू शतकातील व्यापक आविष्कार म्हणायला हवा. ईश्वर आणि धर्म ह्यांच्या अविनाशित्वाचा संयुक्त साक्षात्कार रशियाच्या रूपाने घडावा, हा नियतीचा खेळ नव्हे तर काय! रशियन ऑर्थडॉक्स चर्चला १९८९ मध्ये १००० वर्षे पूर्ण झाली. त्याचा सोहळा मोठ्या उत्साहाने दणक्यात साजरा झाला आणि आता तर ईश्वर व धर्म ह्यांच्या रशियातील पुनरागमनावर शिक्कामोर्तब झाले ते क्रेमलिनमधील समारंभाने!

इ.स. १९१८ नंतर म्हणजे ७२ वर्षांनी क्रेमलिनच्या कॅथीड्रल ऑफ ॲसेन्शनमध्ये युकॅरिस्ट समारंभ झाला. सुप्रीम सोव्हिएतचे अध्यक्ष अनातोली लुकॅनोव आणि रशियन रिपब्लिकचे पंतप्रधान आयव्हन सिलायेव तथा कम्युनिस्ट पक्षातील अनेक श्रेष्ठींच्या उपस्थितीत अखिल रशियन चर्चचे पेत्रार्क अलेक्सी दुसरे ह्यांनी धार्मिक विधी प्राचीन पद्धतीने पार पाडले. सात दशकांनंतर क्रेमलिनमधून क्रॉसची विधिवत मिरवणूक निघून ती मॉस्कोच्या मध्यवर्ती भागातील चर्च ऑफ द ग्रेट ॲसेन्शनमध्ये विसर्जित झाली. ह्या ॲसेन्शन चर्चचे वैशिष्ट्य म्हणजे क्रांतीनंतर कम्युनिस्टांनी त्याचे धर्मस्थळातून वर्कशॉपमध्ये रूपांतर केले होते आणि तसे हे चर्च ऐसपैस असल्याने त्याच्या एका भागाचे बटाट्याच्या गोदामात रूपांतर केले होते. ७० वर्षे त्याविरुद्ध ब्र काढण्याची कोणाची टाप नव्हती. कारण देव आणि धमपिक्षा बटाटे अधिक महत्त्वपूर्ण ठरविले गेले होते. ग्लासनोस्तमुळे स्वातंत्र्य मिळताच मॉस्कोवासियांनी आधी बटाटे हटवून तेथे पुनश्च चर्च खुले करण्याची जोराची मागणी केली व ती मान्य झाली.

ऑक्टोबर ९० मध्ये रशियातील धर्मस्वातंत्र्य पूर्णत: अधिकृत बनले. गेली दोन वर्षे त्या दृष्टीने प्रक्रिया चालू होती. 'फ्रीडम ऑफ कॉन्शन्स ह्या शीर्षकाखाली आठवड्यापूर्वी सोव्हिएत पार्लमेंटमध्ये ३४१ विरुद्ध २ एवढ्या मताधिक्याने हा कायदा अस्तित्वात आला.

ह्या कायद्याचे स्वागत फक्त आस्तिक नागरिकच करतील, असे कट्टर कम्युनिस्टांचे मत होते. अर्थातच आस्तिकांनीच त्याबद्दल आनंद व्यक्त केला; पण ह्या आस्तिकांची संख्या किती असावी? तब्बल १३ कोटी १० लक्ष सज्ञान नागरिक आस्तिक निघाले. हा मार्क्सचाही पराभव ठरावा. लेनिन आणि त्याच्यानंतरचे सत्ताधीश ह्यांना ताकास तूर न लागू देता एवढ्या प्रचंड संख्येने रशियन नागरिक हृदयातील देवावरील श्रद्धा अढळ राखून होते. क्रांतीने देवाची घरे नि मंदिरे एका कागदी आदेशात फटकारून काढली म्हणून हे श्रद्धावान हताश झाले नव्हते. त्यांनी आपापल्या मनांत देवाला बंदिस्त केले... पाठ झालेल्या प्रार्थना ओठातून बाहेर पडणार नाहीत ह्याची खबरदारी घेत जिवंत ठेवल्या. काही वृद्ध नागरिकांनी तर सांगितले की, आपले कुटुंबीयही पाहात नसल्याची खात्री करून आपण एकांतात हात जोडीत होतो, क्रॉसची खूण करीत होतो, गुडघ टेकीत होतो. आता हे सर्व मुक्तपणे होईल. आठवड्याभरातच चर्चमध्ये विधिपूर्वक विवाह करणाऱ्या दांपत्यांची संख्या वाढली आहे.

पण प्रत्येक कृतीचा थोडासा का होईना, समस्याप्रधान परिणामही असतोच. देव मुक्त झाला, धर्मस्थळांची दारे उघडून त्यांना पूर्वीचा दर्जा प्राप्त झाला पण आता अडचण अशी आली आहे की, रशियातील चर्चेसकडे पुरेसा पैसा राहिलेला नाही. दुसरी समस्या म्हणजे प्रशिक्षित धर्मगुरूही फार थोडे– हाताच्या बोटावर मोजण्या एवढे आहेत. चर्चच्या इमारतींची देखभाल करण्याएवढाही निधी आजमितीला नाही. एकेकाळी रशियाच्या झारनी ऑर्थडॉक्स चर्चला राजाश्रय दिला होता. वर्षासने, वतने, देणग्या, विशेषाधिकार ह्यातून झारच्या प्राचीन घराण्याने चर्च व धर्म ह्यांना आपल्या बाहुबलाचे व ऐश्वर्याचे ही छत्र दिले होते. आज चर्चेस ढासळली आहेत. त्यातही ख्रिस्ती धर्मातील अनेक पंथांमधील वाद आहेतच.

रशियातील चर्चेस आणि मशिदींची मालमत्ता क्रांतीनंतर सरकारजमा झाली होती. आता देवस्थानाची मालमत्ता ठेवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. दुसरी समस्या अशी की, शाळांमधून कोठल्याही धर्माबाबतचे शिक्षण देण्यास गेली ७० वर्षे बंदी होती. त्यामुळे तिसऱ्या व चवथ्या पिढीला नव्याने 'ईश्वर व संकल्पना' ह्याचा ओंकार गिरवावा लागणार आहे. अजूनही सरकारी शाळांतून स्वेच्छेने धर्मविषयक शिक्षण देण्यास पार्लमेंटची मंजुरी नाही. पण ही परिस्थिती निश्चितच बदलेल. ७० वर्षांचा गंज चढलेली कुलुपे नि दरवाजे करकरत उघडल्यावर तेलपाणी करणे हे ओघाने आलेच. आजपर्यंत रशियन सरकारने १००० चर्चेस त्या त्या संस्थांना परत केली आहेत. धर्मगुरूंची जेथे टंचाई आहे तेथे धर्मविषयक पुस्तके कोठून मिळावीत! त्यामुळे बायबलची प्रत चक्क काळ्या बाजारात २०० रुबल्सपर्यंत विकली जाते.

दुसरा चमत्कारिक परिणाम म्हणजे खुद्द रशियन ऑर्थडॉक्स चर्चमधील काही प्रमुख व्यक्ती 'आता धर्म सुधारणा करू या' असे म्हणत कम्युनिस्ट पक्षाशी हातमिळवणी करू

पाहात आहेत. त्यातच यहुद्यांबद्दलचा द्वेषही आहेच. रशियातील एक अत्यंत उदारमतवादी, आदरणीय धर्मगुरू फादर अलेक्झँडर मेन ह्यांची महिन्याभरापूर्वी हत्या करण्यात आली. ह्या हत्येमागे कट्टर उजव्यांची चळवळ असावी आणि फादर मेन ह्यांचे पूर्वज यहुदी होते. त्यामुळे ह्या हत्येसाठी उजव्यांनी यहुदीद्वेष्ट्या ख्रिश्चनांना प्रोत्साहन दिले असावे, असा कयास आहे. प्रत्यक्ष ऑर्थडॉक्स चर्चमध्येही युक्रेनचे चर्च आणि मॉस्कोपीठ असा वादही उभा झाला आहे. युक्रेनवाल्यांनी युक्रेनियन ऑटोसेफॅलस ऑर्थडॉक्स चर्च अशी वेगळी पंगत धरण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्याचबरोबर ईस्टर्न राइट कॅथलीक पंथही डोके वर काढीत आहे. कॅथलिक पंथावर स्टॅलीनचा विशेष रोष होता. पण ७० वर्षे श्रद्धा जशी टिकली तसाच कॅथलीक पंथही टिकला. स्टॅलीनने काही कॅथलीक चर्चेसची मालमत्ता आपल्याला सहकार्य करण्यास तयार असलेल्या काही मोजक्या ऑर्थडॉक्स चर्चेसना बहाल केली होती. धार्मिक स्वातंत्र्य मिळताच रशियाच्या कोर्टांतून असंख्य दावे दाखल करून ह्या पीडित कॅथलीक चर्चेसनी ती परत मागितली आहे. कोठलाही वाद न घालता शांतपणे आपल्या पंथाचे पुनरुज्जीवन मात्र प्रॉटेस्टंटस् करीत आहेत. त्यांची संख्या कमी आहे आणि धर्मस्थळांची वानवा असल्याने त्यांनी सरळ मॉस्को आणि लेनिनग्राड येथील स्टेडियम भाड्याने घेऊन तेथे धार्मिक मेळावे भरवण्याची तयारी चालविली आहे. तर यहुद्यांनी हिब्रू शिक्षणाचे वर्ग सुरू केले आहेत. त्यांची बंद केलेली सिनेगॉग्ज सरकारने त्यांना परत केली आहेत. धार्मिक घोळाचे उत्तम उदाहरण सध्या तरी रशिया ठरावे. ७० वर्षांनी तेथे देव आले आहेत ना! त्यांना कोठे ठेवू, असे होणे साहजिकच आहे.

१५/१०/९०

❋❋❋

# ५७

※

# रैसा गोर्बाचेव्ह

जागतिक पातळीवर विद्यमान नेत्यामध्ये सर्वाधिक विश्वासार्ह कोण, ह्या प्रश्नाचे उत्तर अर्थातच रशियाचे मिखाएल गोर्बाचेव्ह असेच येणार. गोर्बाचेव्हनी कम्युनिस्ट जगतालाही बुचकळ्यात टाकले आहे आणि पाश्चात्त्य जगालाही चकित केले आहे १९८९ सालाचे पाच महिने संपायच्या आत त्यांनी क्युबा, इंग्लंड आणि चीन हे दिग्विजय केले. गेली ३० वर्षे रशिया आणि चीन ह्यांमध्ये वैरभावना वाढत चालली होती. स्टॅलीनच्या काळात कम्युनिझमचा आदर्श म्हणून चीन रशियाकडे पाहात आला, तेव्हा रशिया-चीन सख्य इतर राष्ट्रांना आदर्श वाटावे एवढे स्पष्ट होते. मात्र ही मैत्रीची भावना निकिता क्रुश्चेव्ह ह्यांच्या कारकीर्दीत लोप पावू लागली. रशियात स्टॅलीनचे देव्हारे सजले तसे चीनमध्ये माओचे सजत होते. क्रुश्चेव्हनी 'स्टॅलीनवाद हटाव' ही मोहीम प्रथम सुरू करताच चीनला हा सैद्धांतिक धक्का बसला. जे रशियात स्टॅलीनबाबत होऊ शकते ते चीनमध्ये माओ-चाऊबाबत झाले तर? दुरावा इथं सुरू झाला नि त्यात रशिया-चीन सीमावाद, व्हिएतनाम, कंबोडिया, मंगोलिया असे अनेक वादग्रस्त घटक भर घालीत राहिले. परिणामी उभय राष्ट्रांनी आपापले राजदूत परत बोलविले नि संबंध साफच तोडले. मोजून तीस वर्षांनी रशिया व चीनचे नेते आमनेसामने बसण्याचा योग १९८९ च्या मे महिन्यात आला नि त्याचे श्रेय मिखाएल गोर्बाचेव्ह ह्या निरहंकारी, प्रामाणिक आणि दूरदृष्टी लाभलेल्या रशियन राष्ट्रप्रमुखाकडे जाते.

अपयश न घेणारा हा रशियन नेता अपवादात्मक वाटावा इतका वेगळा आहे. त्यांचे वेगळेपण केवळ त्यांच्या वागण्या-बोलण्यात, विचारधारेत अथवा कार्यपद्धतीतच आहे, असे नव्हे तर त्याच्या खासगी आणि सार्वजनिक जीवनातही आहे. पत्नीला बरोबर घेऊन फिरणारा हा पहिला रशियन नेता! गोर्बाचेव्ह ह्यांच्या यशात लोकप्रियतेत त्यांच्या पत्नीचा हिस्सा आहे, हे सत्य नाकारून चालणार नाही. जागतिक पातळीवरील राष्ट्रप्रमुख आणि त्यांच्या पत्नी हा नेहमीच सार्वत्रिक कुतूहलाचा विषय राहिला आहे. तथापि हे कुतूहल बहुधा अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या वाट्यालाच आजवर अधिक आले. आजवर झालेले विविध अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आणि त्यांच्या पत्नी हा चर्चा-वाद-निबंध-पुस्तके-कादंबऱ्या ह्यांचा विषय बनला आहे. 'लिंकनची पत्नी भांडखोर होती', 'मिसेस रुझवेल्ट म्हणजे तडफदार कार्यकर्त्री'. 'मिसेस आयसनहावर अगदी आदर्श पत्नी', 'जॅकी केनेडी किती सुंदर', 'रोझलीन कार्टर एकदम गृहिणी', 'मिसेस निक्सन चांगलीच संभाषणचतुर', 'नॅन्सी रेगन स्वतःच्या कपडे-रूपाबाबत फारच जागरूक' अशी शेरेबाजी अमेरिकन फर्स्ट लेडीबाबत होत राहिली. पण रशियाचे काय? रशियाच्या बाबत जगाला एक सवय लागून गेली होती की, रशियाला फक्त नेता असतो पण फर्स्ट लेडी नसतेच. त्यांना बायका असतात पण त्या फक्त घरे-मुले सांभाळतात. पतीच्या राजकीय, सार्वजनिक जीवनात त्यांना स्थानच नसते. कोठल्याही शिखर परिषदांना त्या पतीबरोबर जात नाहीत... ना कोठल्या दौऱ्यात सामील होत! क्रुश्चेव्ह ह्यांच्या पत्नीचे 'नीना' हे नाव तरी निदान जगाला ठाऊक झाले होते पण नीना क्रुश्चेव्ह तशा पडद्यामागेच राहिल्या. ब्रेझनेव्ह ह्यांची पत्नी 'व्हिक्टोरिया' ही तर कधीच प्रकाशात आली नाही. ब्रेझनेव्हच्या कारकीर्दीत अमेरिकेचे तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन ह्यांनी रशियाला भेट दिली तेव्हा अर्थातच सौ. पॅट निक्सन त्यांच्या बरोबर होत्या. तेव्हा शिष्टाचार म्हणून व्हिक्टोरिया ब्रेझनेव्हना काही अंशी समारंभात यावे लागले पण त्या एवढ्या अवघडून गेल्या की, अखेर पॅट निक्सनवरच त्यांना धीर देण्याची वेळ आली. युरी आंद्रोपॉव्ह ह्यांना पत्नी होती ही गोष्ट मुळात रशियनांनाही ठाऊक नव्हती. आंद्रोपॉव्हच्या अंत्यसंस्कारप्रसंगी पहिली आणि शेवटचीच असे म्हणावे एवढ्यापुरती त्यांची पत्नी दिसली. कॉन्स्टंटीट चेर्नेन्को ह्यांच्या पत्नीबाबतही हाच प्रकार! अंत्यसंस्काराच्या विधीतच तिचे दर्शन घडले. रशियन नेत्यांच्या पत्नी कशा असतात ते कळतच नाही नि बहुधा त्या आडमाप अंगापिंडाच्या, स्थूल, स्वतःच्या रूपाबाबत कधीच विचार न करणाऱ्या असतात, असा एक समज रूढ होऊन बसला असताना मिखाएल गोर्बाचेव्ह ह्यांनी जगाला एक सुखद धक्का दिला. गोर्बाचेव्ह ह्यांच्याबरोबर त्यांची पत्नी रैसा सार्वजनिक जीवनात प्रवेश करती झाली. ही स्त्री कोण? वयाने तरुण नाही निश्चित पण किती आकर्षक! पुनः स्टायलिशदेखील! नि हाडपेरही रशियन स्त्रियांसारखे मजबूत नसलेली! चक्क नजाकत जाणवेल एवढी लहानखुऱ्या चणीची!

रैसा गोर्बाचेव्ह हे जसे जगाच्या दृष्टीने आश्चर्य ठरले तसे रशियनांच्याही नजरेतून विलक्षण ठरले आहे. मिखाएल गोर्बाचेव्हना कृषी व औद्योगिक प्रकल्पांवर आकस्मिक भेटी द्यायला आवडतात. एकदा असेच ते एका अभियांत्रिकी उद्योगाची पहाणी करण्यास पूर्वसूचना न देता गेले. तेथील अधिकाऱ्यानं म्हणे त्यांना ओळखलेच नाही. स्वतःच पुढे होत ते आपण होऊन म्हणाले- 'मी मिखाएल गोर्बाचेव्ह!' त्याबरोबर तो अधिकारी खुर्चीत उडालाच! काहीसे ओशाळत तो म्हणाला- 'अरे वा! मी ओळखलं नाही तुम्हाला. तुमची पत्नी तुमच्याबरोबर नसल्यानं मला कळलंच नाही!'

इ. स. १८९४ मध्ये झार निकलस दुसरा आणि जर्मन राजकन्या अलेक्झँड्रा ह्यांचा विवाह झाल्यानंतर राष्ट्रप्रमुख आणि त्यांची पत्नी ह्यांना सार्वजनिक जीवनात एकत्रितपणे पाहण्याचा योग रशियनांना १९८५ पर्यंत आला नव्हता. झार व झरीना हे शेवटचे उदाहरण होते. त्यामुळे १९८५ पासून गोर्बाचेव्ह दांपत्याला सार्वजनिक क्षेत्रात एकत्रित पाहिल्यावर रशियनांच्या भुवया उंचावल्या गेल्या. काहींनी तर रैसाला कुचेष्टेने 'झरीना' हे विशेषण दिले. अमेरिकेचे रेगन आणि नॅन्सी जसे वावरतात तसे मिखाएल व रैसा वावरतात पाहून अनुकूल आणि प्रतिकूल दोन्ही प्रकारचे शेरे ऐकू येऊ लागले. त्यात पुनः रैसा बुद्धिमान असल्याने आणि फॅशनच्या बाबतीत अत्यंत चोखंदळ असल्याने चर्चा अधिकच खमंग होऊ लागल्या. आंतरराष्ट्रीय राजकीय अभ्यासकांना 'रैसा गोर्बाचेव्ह' हा एक उत्तम विषय मिळाला. आईसलंडमधील रेगन-गोर्बाचेव्ह शिखर परिषदेला येऊन रैसाने सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला... जिनीव्हातील परिषदेत मग तिने नॅन्सी रेगनला आणखीच हादरा दिला. 'आईसलंडच्या सफरीत तुम्ही का आला नाहीत', असे तिने नॅन्सीला विचारले नि नॅन्सी खोचकपणे उत्तरली- 'बायकांना कोठे आमंत्रण होते?' अमेरिकेच्या भेटीत व्हाईट हाऊसमध्ये आमंत्रित केले असता तेथील ऐतिहासिक व सांस्कृतिक बाबीसंबंधी रैसाने नॅन्सीला एवढे प्रश्न विचारले की, नॅन्सी हैराण झाली. मग रशियाला भेट देताना नॅन्सीने म्हणे सुचविले की, रशियात आपल्याला एस्कॉर्ट म्हणून रैसा नकोच. त्यानुसार आंद्रे ग्रोमिकोंची पत्नी मादाम लिडिया ही नॅन्सीची एस्कॉर्ट बनली... वगैरे वगैरे! एकूण रैसा गोर्बाचेव्हने राजकीय निरीक्षकांना कामाला जुंपले हे खरे!

रैसा गोर्बाचेव्हबाबत खुद्द रशियनांनाही फारशी माहिती नाही. सर्वानुमते ५ जानेवारी १९३२ ही तिची जन्मतारीख आहे. सैबेरियातील रूबसॉवस्क ह्या गावी ती जन्मली. तिच्या वडिलांचे नाव मॅक्सीम टिटरिंको. ते पेशाने रेल्वे इंजिनियर होते, ही एवढी माहिती अधिकृत मानली जाते. त्यानंतर त्यांत तर्कवितर्कांची बरीच भर पडत गेली. एक तर्क असा की, ती आंद्रे ग्रोमिको ह्यांची भाची लागते. (साफ खोटे). रैसा स्वतःला शुद्ध रशियन म्हणवत असली तरी काहींच्या मते तिचे कूळ तार्तर टोळ्यांकडून उगम पावले. आणखी एक तर्क असा की, तिचे वडील उच्च पदावर होते पण स्टॅलीनने त्यांच्यावर नाराज

होऊन त्यांना सैबेरियात पाठविले. (हिही खोटेच) रैसा शालेय जीवनातही बुद्धिमान विद्यार्थिनी होती. शालान्त परीक्षेत तिला सुवर्णपदक मिळाले होते. मिखाएल गोर्बाचेव्ह ह्या परीक्षेत रौप्य पदक विजेते ठरले होते. मिखाएल व रैसा ह्यांचा परिचय प्रथम मॉस्को विद्यापीठात झाला. ते कायद्याचा अभ्यास करीत होते तर ही मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत होती. मिखाएल काहीसे शांत आणि गंभीर प्रवृत्तीचे विद्यार्थी तर रैसा बडबडी नि अवखळ! एका सामुदायिक नृत्यप्रसंगी ह्या दोघांची ओळख झाली. तिच्याभोवतीचा चाहत्यांचा घोळका पाहून मिखाएल गोर्बाचेव्हनी तडक एक निर्णय घेऊन टाकला- सरळ लग्नाची मागणी घातली व १९५४ मध्ये हा विवाह झाला. १९५५ मध्ये पदवी संपादून रैसा मिखाएल गोर्बाचेव्हच्या स्तावरोपोल ह्या गावी स्थायिक झाली. गोर्बाचेव्ह तेथे पक्षाचे काम करू लागले तर रैसा तेथील शाळेत शिकवू लागली. १९६७ मध्ये तिने समाजशास्त्रात डॉक्टरेटही मिळवली. ह्या दांपत्याला आयरिना ही कन्या आहे. रैसाचे पोषाख हा चर्चेचा विषय झाला कारण अत्यंत मौल्यवान असे सेबल कोट खरीदण्याचा, दागिने घेण्याचा तिला शौक आहे. टॅमरा मोकेयेवा ही रैसाची व्यक्तिगत डिझायनर. रशियन स्त्रीला ही चैन परवडणारी नाही, शोभा देणारी नाही, अशी टीका रशियातील काही महिला करतात. लेनिनची पत्नी नादेझदा क्रुपस्काया हिचे त्या वानगीदाखल उदाहरण देतात. नादेझदा उच्चशिक्षित होती. रैसाप्रमाणेच सांस्कृतिक व ऐतिहासिक खात्याचा भार सांभाळीत हाती; किंबहुना त्याहून अधिक महत्त्वाचे कार्य करीत होती पण बाई लेनिनबरोबर कधी मिरवायला गेली नाही की महागडे पोषाख चुकून हाती धरले नाहीत.

नादेझदाचा काळ वेगळा होता. ती स्वतः क्रांतिकारक होती. पतीबरोबर मिरवण्याची सूचना जरी केली असती तरी खुद्द नादेझदा व लेनिननेही ती हसण्यावारी नेली असती. जग आता बदललं आहे. जागतिक शांतीसाठी निष्ठेने काम करणाऱ्या मिखाएल गोर्बाचेव्हना रशियावरील 'पोलादी' हा शिक्का पुसण्यासाठी रैसा गोर्बाचेव्हची आवश्यकता आहे. तिच्या उपस्थितीने वातावरण प्रसन्न होत असेल, तिच्यामुळे ग्लासनोस्तची प्रेरणा मिळत असेल तर त्यात वावगं काय? फर्स्ट लेडी काय फक्त अमेरिकेलाच असावी?

२२/५/८९

❋❋❋

५८

※

# विकणे आहे– स्टॅलीन,लेनिन इत्यादी

**को**णी काय विकावं आणि कोणी काय खरीदावं हा व्यक्तिगत गरजांचा प्रश्न आहे. पण अशा काही चिजा जगात आहेत ज्या विकाऊ समजल्या जात नाहीत आणि सहसा त्यांना ग्राहकही मिळत नाही. उदाहरण द्यायचं तर सध्या विक्री चालली आहे ती स्टॅलीन, लेनिन आणि मार्क्सची! म्हणजे त्यांच्या तत्त्वांची अगर त्यांनी दिलेल्या 'वादा' (इझम)ची नव्हे किंवा त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांचीही नव्हे तर चक्क त्यांचीच! लिलावही नव्हे तर उघड उघड विक्रीच. लिलाव कोणाचा करावा, ह्याचे काही संकेत आहेत. निझामच्या जडजवाहिराचा लिलाव होऊ शकतो, झारच्या व्यक्तिगत वस्तूंचा लिलाव होऊ शकतो, मेरीलीन मन्रोच्या वस्त्रांचा लिलाव होऊ शकतो, कारण त्यांना मागणी आहे. त्यांच्यासाठी ग्राहकांची गर्दी जमते. स्टॅलीन, लेनिन आणि मार्क्ससाठी कोण गर्दी करणार? लिलाव जाहीर केला तर पहिली बोली बोलायला तरी कोणी हवा ना! त्यामुळे लिलाव अशक्य म्हणून सरळ विक्री, जाहिरात देऊन विक्री. स्वतःच्या देशाच्या वृत्तपत्रांत जाहिरात दिल्यास प्रतिसाद मिळण्याची सुतराम शक्यता नाही. त्यामुळे जागतिक खपाच्या इंग्रजी वृत्तपत्रांत जाहिरात देण्याची शक्कल विक्रेत्यांनी काढली. झेकोस्लोव्हाकियाच्या नागरिकांनी साधारण तीन आठवड्यांपूर्वी लंडन टाईम्समध्ये जाहिरात दिली– 'विकणे आहे- स्टॅलीन, हवा तर लेनिन किंवा मार्क्सही मिळू शकेल'- ह्या जाहिरातीतच स्टॅलीनच्या पुतळ्याचे छायाचित्रही होते. वाजवी किंमतीत स्टॅलीन विकण्याच्या ह्या जाहिरातीला बहुधा कोठले तरी म्युझियम

प्रतिसाद देईल, असा झेक जनतेचा अंदाज होता पण स्टॅलीन विकायला काढल्यामुळे जेवढा धक्का बसला असेल, त्याच्या कितीतरी पटींनी अधिक मोठा धक्का स्टॅलीनच्या खरेदीसाठी जाहिरातीला आलेल्या एका उत्तराने झेकोस्लोव्हाकियाला बसला. कारण हे उत्तर आले होते अमेरिकेतून!

झेकोस्लोव्हाकियाची राजधानी प्रागपासून २०० मैलांवर झाब्रे हे एक औद्योगिक शहर आहे. तेथील हायस्कूलच्या समोरील चौकात १२ फूट उंचीचा आणि ४ टन वजनाचा मार्शल जोसफ स्टॅलीनचा पुतळा वर्षानुवर्षे उभा होता. झेक जनतेला तो पुतळा हवा अथवा नको असे विचारण्याची, त्यांचे मत घेण्याची गरज कधी रशियाला वाटली नाही आणि रशियाचीच कळसूत्री बाहुली बनून झेकोस्लोव्हाकियाचा कारभार पाहणाऱ्या प्रशासनाला भासली नाही. रशियाच्या टाचेखाली आपला देश चेंगरत आहे आणि स्टॅलीनचा पुतळा हे रशियाच्या दडपशाहीचे प्रतीक आहे, हे झेक जनतेला जाणवत होते पण इलाज नव्हता. १९८९ मध्ये जणू अभूत 'पूर्व' क्रांती झाली आणि हंगेरी, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, रोमानिया ह्यांनी लाल रंगाची कात काढून फेकून दिली. कित्येक वर्षांची दडपशाही झुगारण्याचा मोका मिळताच जनतेने आपल्या मनातल्या खदखदणाऱ्या संतापास वाट करून दिली नि तो संताप १२ फुटी ४ टनी स्टॅलीनवर निघाला. त्याची मनसोक्त 'शोभा' केली. त्यानंतर डोळ्यासमोरही हा पुतळा राहता कामा नये अशी जनतेची भूमिका बनली. मग कोणी तरी सुचविले की, पुतळा मोडीत काढून वितळवणे खर्चाचेच ठरेल, त्यापेक्षा विकून पैसा मिळवला तर...? नि अशा तऱ्हेने जोसफ स्टॅलीनला झाब्रेच्या लोकांनी विकायला काढले. स्टॅलीन खरीदण्यासाठी अमेरिकेतून उत्तर येताच लोक चक्रावले. हे कोणीच अपेक्षिले नव्हते. हा खरेदीदार मूळचा झेकोस्लोव्हाकियन आहे पण कम्युनिस्ट राजवटीचा प्रखर विरोधक असल्याने २५ वर्षांपूर्वी त्याने मायदेश सोडला आणि तो अमेरिकेत मायामी येथे स्थायिक झाला. त्याचे नाव जान बोहुस्लाव नि व्यवसायाने तो टेनिसचा प्रशिक्षक आहे. ५०,००० डॉलर्स एवढी किंमत तो मोडीत निघलेल्या स्टॅलीनसाठी मोजायला तयार आहे, कारण ह्या रकमेतून झाब्रे येथील हॉस्पिटलसाठी काही अत्यावश्यक यंत्रे खरीदता येतील. 'स्टॅलीनने आपल्या आयुष्यात जनतेसाठी कोठलेही सत्कार्य केले नाही, निदान त्याचा पुतळा काही भले करून जात असेल तर तसे होवो,' अशा शब्दात जान बोहुस्लाव ह्याने प्रतिक्रिया व्यक्त केली. आता झाब्रेच्या स्टॅलीनची साफसूफ आणि डागडुजी सुरू आहे, कारण लवकरच त्याची अमेरिकेला पाठवणी होत आहे.

झुगारलेल्या राजवटीची चिन्हे विकण्याची ही कल्पना पूर्व आणि पश्चिम जर्मनीला चिरणाऱ्या कुप्रसिद्ध बर्लिन भिंतीवरून पूर्व युरोपातील जनतेला मिळाली. इतिहासातील नको असलेला अध्याय नष्ट करायचाच पण त्यातून थोडाफार फायदाही मिळवायचा असे दुहेरी हेतू साध्य झाल्याने आता हा विक्रीव्यवहार चांगलाच तेजीत येत आहे. बर्लिनच्या

भिंताडाचे तुकडे स्मृतिचिन्हे म्हणून विकले जात आहेत आणि वॉरसॉ कराराच्या निशाण्याही विकल्या जात आहेत. वॉरसॉ कराराच्या कागदपत्रांच्या आता फक्त पत्रावळी होणे बाकी राहिले आहे. ह्या करारातील लष्कराच्या हॅटस् ऐतिहासिक खुणा म्हणून विकल्या जात आहेत. पर्यटकांनाही ह्या चिन्हांची आवड दिसते. मोठी किंमत देऊन ते ह्या वॉरसॉ हॅटस् नि हंगेरीचे लाल तारे विकत घेत आहेत.

स्टॅलीनची विक्री झाली, आता बाजारात उभे राहण्याची पाळी कार्ल मार्क्सवर आली आहे. पूर्व जर्मनीच्या कार्ल मार्क्सस्टाड येथील कम्युनिस्ट पक्षाच्या मुख्यालयात कार्ल मार्क्सचा २४ फुटांचा ब्रॉंझचा अर्धपुतळा आहे. हा रशियात बनविलेला आहे आणि त्याची कलात्मक बाजू थोडी उजवी आहे, त्यामुळे मार्क्सचा हा पुतळा बरीच मोठी रक्कम मिळवून देईल. कार्ल मार्क्सचा जन्म पश्चिम जर्मनीत ट्रायर येथे झाला आणि पश्चिम जर्मन सरकारला हा पुतळा ट्रायरच्या त्याच्या जन्मस्थळी उभारायचा आहे पण त्याच्या खरेदीत नवा स्पर्धक उभा राहिला आहे– जपानमधून काही ग्राहक कोरे चेक्स घेऊन मार्क्सच्या पुतळ्यासाठी पुढे आले आहेत. जपान्यांना स्टॅलीन नकोय– लेनिनबाबतही ते फारसे उत्सुक नाहीत पण मार्क्स मात्र त्यांना हवा आहे.

इतिहास विकण्याच्या ह्या नव्या व्यवसायाच्या एकेक सुरस कथा ऐकाव्या तेवढ्या थोड्याच आहेत. पूर्व जर्मनीत काही डोकेबाजांनी एकत्र येऊन बर्लिन भिंत स्मृतिसंघटना स्थापन केली. ही पूर्णतः खासगी संघटना आहे. ह्या संघटनेने अलिकडेच बर्लिन भिंतीचा साडेनऊ फूट लांबीचा, तीन टन वजनाचा एक भाग अमेरिकेला नेला, माजी राष्ट्राध्यक्ष रॉनल रेगन ह्यांनी तो मागितला होता. रेगन ह्यांनी त्याकरिता किती रक्कम मोजली ते कळले नाही. सत्ताधारी स्वतःला युगायुगांचे नेते समजतात हा केव्हाही मूर्खपणाच! पण सर्वच सत्ताधीश अशा भ्रमात असतात की, आपण म्हणजे आपल्या राष्ट्राचे तारणहारच! मग 'अ' ते 'ज्ञ'पर्यंत सर्व क्षेत्रात आपण कसे पारंगत आहोत ते सिद्ध करण्याचा आटपिटा करतात. तो प्रयत्न केविलवाणाच असतो पण तसे बोलायची कोणाची प्राज्ञा नसते. असाच प्रकार बल्गेरियावर ३५ वर्षे निरंकुश सत्ता गाजविणाऱ्या कट्टर कम्युनिस्ट टोडोर झिवकोव ह्या सत्ताधीशाबाबत घडला आहे. आपल्या अंगी लेखनगुण आहेत, ह्या आत्मविश्वासातून त्याने जे जे लिहिले, ते ते पुस्तक रूपाने प्रसिद्ध करणे भाग पडले. ते किती असावे? चक्क ३२ जाडजूड खंड– म्हणजे इंग्रजी ज्ञानकोशानेही मागे सरावे! झिवकोव हा नेता असल्याने त्याची पत्रे, विवेचने, भाषणे, कथा, चर्चा... अगदी फालतू मतेही ह्या ३२ खंडांत समाविष्ट झाली. पुन्हा ह्या ३२ खंडांच्या हजारो प्रती छापणे भागच पडले . आता त्या खपाव्यात कशा? प्रकाशक बुडीत निघालेच पण सरतेशेवटी एक सुवर्णमध्य निघाला. तो असा की, ह्या ३२ खंडांच्या हजारो प्रतींना ग्राहक नसेना का... आता किमान रद्दीतून नव्याने कागद बनविणाऱ्या कंपनीला ही बाडे विकली जावीत म्हणजे थोडी फार तरी रक्कम मिळेल

व त्या रद्दीचा सदुपयोग होईल. हे जाहीर होताच धमाल परिणाम झाला. पुस्तकांची दुकाने, ग्रंथालये आणि सरकारी कार्यालये ह्यांनी आपल्यावर लादलेल्या आणि धूळ खात पडलेल्या सर्व प्रती परस्परच कागद कारखान्याकडे पाठवून दिल्या.

भिंती-भिंतीवर लावलेली पूर्व युरोपीय 'नेत्यांची' पोस्टर्स आता वेगाने टरकवली जात आहेत. इतकेच नव्हे तर राजकीय सत्तेच्या कार्यालयातील कम्युनिस्ट नेत्यांची तैलचित्रेही खाली खेचली जात आहेत. (त्यांना गिऱ्हाईक नाही) ज्या ज्या नावात, स्थानांत कम्युनिस्ट राजवटीच्या स्मृती एकवटल्या आहेत, त्या त्या स्थळांचे नव्याने बारसे केले जात आहे. रस्त्यांची नावे बदलणे रोजचे झाले आहे व त्यामुळे पूर्व युरोपीय राष्ट्रांतील पोस्टमन मंडळींना खूपच त्रास होत आहे. डान्स्क हे पोलंडचे आता ऐतिहासिक बंदर म्हटले पाहिजे, कारण क्रांतिकारी सॉलिडॅरिटीचा जन्म येथेच झाला. येथील गोदीला व बंदराला लेनिनचे नाव दिले होते. आज काहीही गाजावाजा न करता 'लेनिन' हटविला आहे आणि 'डान्स्क शिपयार्ड' हा फलक तेथे लागला आहे. रोमानियातील लेनिन ॲव्हेन्यू ही पाटी उखडली आहे नि तेथे 'दि. १७ डिसेंबर मार्ग' अशी पाटी लागली आहे. लेनिनची कोठलीही यादगार रोमानियाला नको आहे. हंगेरीतील 'कार्ल मार्क्स विद्यापीठ' हे ख्यातनाम आहे. लवकरच त्याचे नामकरण 'बुडपेस्ट विद्यापीठ' असे होत आहे.

प्रागची अडचण थोडी वेगळी होती. तेथील कम्युनिझमचे लाल तारे गगनचुंबी इमारतींवर एवढे उंच बसविले होते की, गिर्यारोहकांना विनंती करवून ते सारे उचकटावे लागले. बुखारेस्टमधील काँक्रीटमध्ये पक्का बसविलेला लेनिनचा २६ फुटी ब्रॉंझ पुतळा उखडण्यासाठी मजुरांची फौज तैनात करावी लागली. जिवंतपणी ह्या मंडळींनी त्रास दिलाच, आणि आता आम्ही त्यांना हटवू पाहतो तरीही ही मंडळी त्रास देतात, अशी एक सहज प्रतिक्रिया उमटल्यास नवल नव्हे. सत्तेचा मद चढतो, नशा चढते... आपणच भाग्यविधाता अशी नशा डोक्यात चढली की, नेत्यांचे पुतळे नि नावे ह्यांचा सुळसुळाट होतो. गल्लीपासून राजधानीपर्यंत ही नावे वावरतात– इतिहासाच्या लेखी ती कधीच शाश्वत नसतात. पण हे पुढाऱ्यांना कळेल तेव्हा!

२३/४/९०

## ५९

# आत्मचरित्राची जन्मकथा

**तीन** वर्षांपूर्वी म्हणजे पोलंडमधील कम्युनिस्ट राजवट शाबूत होती आणि लेक वॉलेसाचा संग्राम ऐन भरात होता, तेव्हा फ्रान्समधील 'फेयार्द' ह्या प्रकाशन संस्थेने 'अ पाथ ऑफ होप' हे लेक वॉलेसाचे आत्मचरित्र सर्वप्रथम फ्रेंच भाषेत प्रकाशित करून प्रचंड खळबळ माजविली होती. हे आत्मचरित्र जेवढे रोचक तेवढीच त्याच्या प्रकाशनाची कहाणीही चित्तथरारक होती. पोलादी पडदा भेदून वॉलेसाचे लिखाण फ्रान्समध्ये कसे आणले, त्याचे गुप्तपणे पोलीश भाषेतून फ्रेंच भाषेत भाषांतर कसे झाले, हा सर्व किस्सा म्हणजे एक रहस्यकथा होती. ज्या ज्या देशांपायी जगात वादळे उठली, झंझावात उद्भवले किंवा जगड्व्याळ समस्यांचे निराकरण झाले, त्या त्या देशांच्या नायकांची आत्मचरित्रे वाचण्याची संधी रसिकाने कधी सोडू नये. कधी हे नायक हिटलरसारखे संहारक असतात तर कधी चर्चिलसारखे 'तारणहार' असतात, निक्सनसारखे अवघ्या आयुष्यावर बदनामीचे पाणी पडून गेलेले असतात तर कधी साखरॉव्हसारखे प्रचंड शक्तीशी टक्करणारे एकांडे शिलेदार असतात. ह्या सर्वांच्यात एक साधर्म्य असते... ते म्हणजे अखंड संग्रामाचे- म्हणूनच त्यात 'आत्म' कमी असते, आणि 'चरित्र' प्रकट होते ते सर्वव्यापी इतिहासाच्या पार्श्वभूमीवर... एक तर ते घडलेल्या इतिहासातले घटक असतात किंवा स्वतःच इतिहास बनतात.

असेच एक खळबळजनक आत्मचरित्र दोन दशकांपूर्वी गाजून गेले होते. एकेकाळी

रशियाचे राजप्रमुख असलेले निकिता सर्गेविच क्रुश्चेव्ह ह्यांचे 'क्रुश्चेव्ह रिमेंबर्स' हे आत्मचरित्र १९७० मध्ये लिटल, ब्राऊन अँड कंपनी ह्या पाश्चिमात्य प्रकाशन संस्थेने प्रसिद्ध केले, तेव्हा आंतरराष्ट्रीय स्तरावर केवढा गदारोळ माजला होता. एकेकाळी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत पायातला जोडा काढणारे क्रुश्चेव्ह रशियातील उच्चस्तरीय नेतृत्ववर्तुळाला पुढे नकोसे झाले होते. त्यांना सुगावाही लागू न देता अत्यंत शिताफीने ब्रेझनेव्ह ह्यांनी सत्तांतराचा कट घडवून आणला आणि क्रुश्चेव्ह राजकारणातून फेकले गेले. मॉस्कोच्या उपनगरात एका सरकारी कुटिरात क्रुश्चेव्हना ब्रेझनेव्ह सरकारने स्थानबद्ध केले आणि क्रुश्चेव्हचा राजकीय अस्त झाला. सुदैव एवढेच की, रशियन पद्धतीप्रमाणे क्रुश्चेव्हना 'नाहीसे' करण्यात आले नाही. आज 'ग्लासनोस्त'च्या संदर्भात क्रुश्चेव्हचे पुनर्मूल्यांकन होत आहे पण ह्या सक्तीच्या निवृत्तीत क्रुश्चेव्ह खूपच व्यथित झाले होते. स्थानबद्ध क्रुश्चेव्हच्या आत्मचरित्राचा पहिला खंड प्रकाशित होताच ब्रेझनेव्ह सरकारने 'हा तर अमेरिकेच्या सीआयएचा डाव' असे जाहीर करून प्रकरण झटकण्याचा कम्युनिस्टी प्रयत्न केला पण जगाने आपले आडाखे बांधलेच! क्रुश्चेव्हच्या मृत्यूनंतर १९७४ साली 'क्रुश्चेव्ह रिमेंबर्स'चा दुसरा खंड प्रकाशित झाला. त्या वेळी क्रुश्चेव्हबद्दलची आस्था तेवढी राहिली नव्हती, वादही निवळला होता. मात्र जाणकारांची खात्री पटली होती की, आत्मचरित्राचे हे दोन्ही खंड अस्सल क्रुश्चेव्हनीच लिहिले होते, लिहिलेले सर्व सत्य कथन होते आणि क्रुश्चेव्हच्या ह्या लिखाणाने पाश्चिमात्य प्रकाशकापर्यंत जो प्रवास केला होता तो निश्चितच धाडसी होता.

ह्या प्रकाशनाबाबतचे कुतूहल जाणून क्रुश्चेव्ह ह्यांचा ५५ वर्षे वयाचा इंजिनियर पुत्र सर्गी क्रुश्चेव्ह ह्याने आपल्या पित्याच्या आत्मचरित्राच्या जन्माची रहस्यकथा सांगणारे 'क्रुश्चेव्ह ऑन क्रुश्चेव्ह' हे पुस्तक लिहिले असून त्याचे लिटल्, ब्राऊन अँड कंपनीतर्फे चालू जून महिन्यात प्रकाशन होत आहे. 'ग्लासनोस्त' ही कल्पना प्राथमिक रूपात आधी क्रुश्चेव्हनी मांडली होती. मुक्त वातावरणाच्या दिशेने पावले टाकणाऱ्या काही सुधारणाही त्यांनी केल्या होत्या... त्या ब्रेझनेव्ह व कट्टर कम्युनिस्टांनी पुढे रद्द केल्या... ते पाहून क्रुश्चेव्हना खेद होई. क्रुश्चेव्हचा संपूर्ण जीवनपट त्यांच्या आत्मचरित्रात आलाच. पण मुळात ब्रेझनेव्ह वर्तुळाच्या आणि केजीबीच्या पहाऱ्यात हे आत्मचरित्र लिहिणे आणि हस्तलिखिते परदेशी रवाना करणे ही क्रुश्चेव्हची कामगिरीदेखील 'ग्लासनोस्त'च्या दिशेने जाणारी नव्हे काय?

'क्रुश्चेव्ह ऑन क्रुश्चेव्ह'मध्ये पुत्र सर्गी ह्याने आपल्या सत्ताहीन वडिलांचे चित्रण हृदयंगम शैलीत केले आहे. कालपर्यंत जो माणूस संयुक्त राष्ट्रांपुढे मांडावयाच्या ठरावांसंबंधी, सैन्यकपात आणि जलविद्युत प्रकल्पांसंबंधी निर्णय घेत होता, त्याच्यावर कसली वेळ यावी? तर आपण टी. व्ही. पाहावा की फिरायला जावे याचा निर्णय घेण्याची! कोणाला आपली गरज नाही, आपल्याला आता काही काम नाही ह्या जाणिवेने निकिता

आलेल्या अहवालात तिचा दर्जा सुमार असल्याचे, न पटणारी आणि रशियाशी नाते नसणारी कथावस्तू धरणारी ही कादंबरी असल्याचे नमूद झाले होते. प्रत्यक्षात आजही मला असे वाटते की, सुस्लॉवखेरीज कोणीही ही कादंबरी वाचली नव्हती... अन् खरे सांगायचे तर सुस्लॉवने तरी ती पूर्ण वाचली असेल ह्याबाबत शंकाच वाटते. त्याच्या हाताखालच्या कुणा मदतनिसानेच बहुधा सुस्लॉवला ह्या कादंबरीविषयी एक तयार मत दिले असावे. अन् ह्या मदतनिसालाही कोणी अतिशहाण्याने कादंबरीची जेमतेम पहिली तीन पाने वाचून संपूर्ण कादंबरीचा सारांश म्हणून काहीबाही खरडून दिले असणार. एखाद्या कलाकृतीबाबतचा निवाडा करण्याची, तिचे मूल्यांकन करण्याची ही पद्धती मला तेव्हाही पटत नव्हती आणि आजही पटत नाही. आज आयुष्याच्या अंतिम पर्वामध्ये मी उभा आहे नि आत्मचरित्रात नायकाने स्वतःच्या चुकादेखील एखाद्या निष्पक्षपाती लेखाकाराच्या हिशेबाप्रमाणे मांडल्या पाहिजेत, असा माझा विश्वास आहे. तेव्हा कोठलेही समर्थन करण्याचा प्रयत्न न करता मी वाचकांपुढे प्रांजळ कबुली देऊ इच्छितो की, पास्तरनाकला मी पाठिंबा दिला नाही, ही माझी घोडचूक होती. 'डॉक्टर झिवागो'सारखी उत्कृष्ट कलाकृती निषिद्ध ठरविण्यात माझाही वाटा पडला, ह्याचा मला खेद होतो. मी सुस्लॉववर विसंबलो, हे चुकलेच! वस्तुतः 'झिवागो' बद्दलचा निवाडा वाचकांवर सोपवायला हवा होता. पास्तरनाकशी माझे झालेले वर्तन आता आठवले की, मला पश्चात्ताप होतो. ही कादंबरी मी स्वतःच वाचून निर्णय का घेतला नाही, ह्या प्रश्नाला माझ्याकडे उत्तर नाही. एका उत्कट आणि रशियाला भूषणावह बनलेल्या प्रतिभेची मुस्कटदाबी करण्यात माझेही हात सहभागी झाले, हे सत्य मी नाकारत नाही. सुस्लॉव आणि त्याचे खाते ह्यांच्या शिफारशीनुसार आम्ही 'झिवागो'वर बंदी आणली पण त्यामुळे जगात रशियाची भरपूर नाचक्की झाली. ही देशाची हानीच! जगभरचे बुद्धिमंत आणि बुद्धिप्रामाण्यवादी रशियाच्या विरोधात खवळून उठले. ज्यांचा समाजवादाला कधीच विरोध नव्हता, असे बुद्धिमंतही संतप्त झाले. माणसाच्या सर्जनशीलतेला कोठल्याही राजवटीने बंधन घालता कामा नये, अशा विचारांच्या बुद्धिमंतांनी जागतिक पातळीवर आमच्या विरोधात आवाज उठवला.'

'आजही माझे मत आहे की, कलेच्या क्षेत्रात कोठल्याही सरकारने ढवळाढवळ करू नये. आज लिओनिद ब्रेझनेवच्या (क्रुश्चेव्ह ह्यांच्या आत्मचरित्र कथनाच्या काळात ब्रेझनेव रशियाचे सर्वेसर्वा होते. हे कृपया ध्यानात घ्यावे.) कारकीर्दीत साहित्यक्षेत्रात सेन्सॉरशिप नाही, असे सांगितले जाते पण ते निखालस खोटे आहे. रशियात अद्याप अत्यंत क्रूर सेन्सॉर (ब्रेझनेवची कारकीर्द) कार्यरत आहे. रशियाने टीकेचे रूपांतर सेन्सॉरशिपमध्ये केले आहे. टीकाकार आणि दार्शनिक ह्यांनी पोलिसी दहशतवाद अवलंबिल्यावर वाङ्मय कसे जगावे?'

निकिता क्रुश्चेव्ह ह्यांची ही खंत हृदयाच्या तळातून आली आहे हे निश्चितच!

पास्तरनाकच्या प्रमादाबाबत पश्चात्ताप व्यक्त करणारे क्रुश्चेव्ह आपला एक साहित्यिक विजय रसभरीत रंगवून सांगताना वाचकालाही गुंगवतात.

– 'अलेक्झांडर सॉल्झेनित्सिन ह्याच्या 'अ डे इन द लाईफ ऑफ आयव्हन डेनिसोविच' ह्या कादंबरीबाबत आम्ही जे निर्णय घेतले, त्याचा मला आजही अभिमान वाटतो. ज्या प्रकारे आम्ही ह्या कादंबरीचे प्रकरण हाताळले, त्याची आठवण आज म्हातारपणीही मला आनंददायी वाटते. हे सर्व कॉम्रेड तार्दोवस्कीचे काम होय! मध्यवर्ती समितीच्या सहाव्या मजल्यावर तार्दोवस्कीने बैठक भरवली. मोठा उत्साही तरुण. सॉल्झेनित्सिनची ही कादंबरी बैठकीला घेऊनच आला. स्वतः जागून त्याने ती वाचली होती. मला त्याचा प्रकरणनिहाय सारसंक्षेप त्याने आधी ऐकवला आणि म्हणाला – 'कॉम्रेड क्रुश्चेव्ह, ही कादंबरी झकासच आहे. हा लेखक महान ठरणार.' उत्साहाच्या भरात बिचाऱ्या तार्दोवस्कीचा गैरसमज असा झाला होता की, आयव्हन डेनिसोविच ही सॉल्झेनित्सिनची पहिलीच कादंबरी असावी. आपल्या स्वतःच्या मासिकात ही कादंबरी क्रमशः छापण्याची घोषणाही तार्दोवस्कीने केली आणि मी व्यक्तिशः ती कादंबरी वाचून स्वतः मत द्यावे, असा आग्रह धरला.'

'मला त्या वेळी अलेक्झांडर सॉल्झेनित्सिन ह्या व्यक्तीची जीवनकहाणी ठाऊक नव्हती. मात्र माझ्याकडे जी माहिती आली होती व त्याचे जे लिखाण मी वाचले होते, त्यावरून ह्या लेखकाने श्रमछावणीत बराच काळ व्यतीत केला होता, हे कळले होते. मी माहिती काढली अन् माझा आडाखा खरा ठरला. ह्या प्रतिभावंत लेखकाला जोसफ स्टॅलीनच्या कारकीर्दीत १९४५ मध्ये अटक करण्यात आली आणि त्याची कसून उलट तपासणी केल्यावर त्याला मॉस्कोच्या परिसराबाहेरील मार्फिनो स्पेशल कारागृह क्रमांक १६ मध्ये डांबण्यात आले होते. येथील आपल्या वास्तव्याचे वर्णन सॉल्झेनित्सिनने 'फर्स्ट सर्कल' मध्ये केले आहे. १९५० च्या ऑगस्टपासून १९५३ च्या फेब्रुवारीपर्यंत बिचाऱ्याला कझाकस्तानच्या एकीबास्तुझ ह्या प्रचंड श्रमछावणीत पाठविण्यात आले होते. त्यानंतर कझाकस्तानातच अंतर्गत हद्दपारीची शिक्षा त्याच्या वाट्याला आली आणि अखेर १९५७ मध्ये तो रायझान येथील त्याच्या घरी परतू शकला. ही सर्व माहिती घेऊन मी त्याची कादंबरी संपूर्ण वाचली. छानच होती. त्यातील आयव्हन डेनिसोविचच्या जीवनाच्या वर्णनाने मी अस्वस्थ झालो. वाचकाला अस्वस्थ करणे ही कलाकृतीची खरी कसोटी! ज्या श्रमछावणीत नायक आयव्हन व त्याच्या मित्रांनी काळ कंठला त्या श्रमछावणीविषयी, तेथील यंत्रणेविषयी आणि अशी व्यवस्था राबविणाऱ्या राज्यपद्धतीविषयी कोणाच्याही मनात तिरस्कार निर्माण व्हावा अशीच ही गाथा होती. मी ह्या कादंबरीचे स्वागत केले. निर्णय दिला – तिचे मुक्त प्रकाशन होण्याकरिता! आज मला समाधान वाटते की, वाचकांनी अधाशासारखे ह्या कादंबरीचे वाचन केले. तिचा खप तडाखेबंद झाला. आयव्हन

डेनिसोविचसारख्या प्रामाणिक माणसावर आमच्या समाजवादी थंडीत ही वेळ का आली, ह्या प्रश्नाचे उत्तर आता वाचकांना हवे आहे, हे मी जाणले होते. सॉल्झेनित्सिनमुळे रशियन जनतेला समजले की, अशा श्रमछावण्यांतून किती खितपत पडले होते.

स्टॅलीनच्या मृयुनंतर श्रमछावण्यांतून मृत्यू पावलेल्या माणसांच्या प्रकरणांची बरीच चौकशी करण्यात आली होती, ते अहवाल मी वाचले होते म्हणूनच 'आयव्हन डेनिसोविच' बाबत हस्तक्षेप करायचा नाही, हे मी ठरवले. मी एक पाऊल पुढे गेलो व सॉल्झेनित्सिनची सर्व पुस्तके प्रकाशित करावीत, असे मत मांडले. माझे सर्व सहकारी त्याला राजी झाले. सुस्लॉव एकटाच विरोधात होता. त्याच्या मते लोकांना फक्त चांगले तेवढे वाचायला द्यावे. मी त्याचे म्हणणे खोडून काढताना म्हटले – 'सुस्लॉव, लोक शहाणे असतात. चांगले-वाईट निवडण्याची कुवत लोकांपाशी असते. माझ्या उत्तराचा परिणाम चांगला झाला.'

'सॉल्झेनित्सिन आजही लिहीत आहे. आजही चांगले लिहितो पण रशियात त्याचे लेखन आज छापले जात नाही. (ब्रेझनेवची कारकीर्द) फक्त परदेशातच त्याची पुस्तके प्रकाशित होतात. सॉल्झेनित्सिनने अखेर रशिया सोडून अमेरिकेची वाट धरली. त्याने काहीही गुन्हा केला नव्हता. श्रमछावणीचे जीवन त्याच्या वाट्याला आले नि त्याचे, तेथील लोकांचे त्याने वर्णन केले. त्यात काय चुकले? ह्या श्रमछावण्यांची यंत्रणा स्टॅलीनची. सॉल्झेनित्सिनच्या वनवासाला स्टॅलीन कारण होता. खरा गुन्हेगार स्टॅलीनच नि गुन्हेगारावर खटला व्हायलाच पाहिजे. मला विचाराल तर स्टॅलीनवर न्यायालयात खटला चालवून भागणार नाही, तर मरणोत्तर समाजात त्याच्यावर फिर्याद चालायला हवी. स्टॅलीनला साहित्य– वाङ्मयात गुन्हेगार म्हणून नमूद करणे, हा एकच मार्ग आहे. समाजवादात लेनिनने वाचनस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्याचा पुरस्कार केला होता. कोठे गेले ते लेनिनचे स्वातंत्र्य? आधी स्टॅलीन व आता त्याच मार्गाने जाणारा ब्रेझनेव दोघांनीही हे स्वातंत्र्य रज्जूंनी आवळले. त्यांचा संकोच केला आणि सॉल्झेनित्सिनसारख्या प्रतिभावंतांच्या सर्जनशीलतेचा ह्याच रज्जूंनी जखडून खून करायचा प्रयत्न केला. माझ्या आंतरिक समाधानाची बाब म्हणजे पास्तरनाकवर घडलेल्या अन्यायाचे परिमार्जन मी सॉल्झेनित्सिनचा आयव्हन डेनिसोविच मुक्त करून केले.' (पूर्ण)

१२/११/९०

❋❋❋

## ६४

※

# ख्रिस्तपूर्व २५९ ते १९९०

**दोन** हजार वर्षांपूर्वी इजिप्तच्या अलेक्झँड्रिया बंदरातून एक आदेश प्रसृत झाला – 'मुसाफिरी करणाऱ्यांनी शक्य तेवढ्या दूरच्या सफरी कराव्यात आणि जेथे जेथे जातील तेथून उत्तमोत्तम ग्रंथ आणावेत. जगातले सर्वोत्तम ग्रंथ अलेक्झँड्रियाला आले पाहिजेत.' ही राजाज्ञा असल्याने पाळली गेली आणि इतिहासातले सर्वांत महान ग्रंथालय जन्माला आले. जोमाने वाढले आणि आदिम कालापासून अस्तित्वात असलेल्या मानवांतील संघर्षात त्याची अपरिमित हानीही झाली आणि आज इतक्या वर्षांनंतर १९९० मध्ये ह्या अवाढव्य ग्रंथालयाच्या पुनर्बांधणीचा प्रकल्प जागतिक पातळीवर 'युनेस्को'च्या सहकार्याने सुरू झाला आहे. १९९५ मध्ये हे ऐतिहासिक ग्रंथालय पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा आहे.

हे सर्व प्रकरण अजबच आहे. आज मध्य पूर्वेत संघर्ष हा स्थायिभाव बनला आहे. इराक आणि कुवेत प्रकरणात तर जवळजवळ सर्वच जग ओढले गेले आहे. इराक-इराण (जुना संघर्ष), इराण-सौदी अरेबिया, लिबिया-चॅड, इजिप्त-इराक, लेबनन, सीरिया, सुदान अशी अनेक विळ्या-भोपळ्यांची नाती मध्य पूर्व-उत्तर आफ्रिका एवढ्या टापूस हादरे देतात. पण परस्परांमधून विस्तव न जाणारी राष्ट्रे अलेक्झँड्रियाच्या ग्रंथालयाच्या संदर्भात चक्क एकत्र आली. ह्या संदर्भात फेब्रुवारी १९९० मध्ये घडलेला प्रकार तर अविश्वसनीयच म्हणावा लागेल. नेमके सांगायचे तर फेब्रुवारीत इजिप्तमध्ये आस्वान शहरी प्रस्तुत ग्रंथालयासंबंधी 'युनेस्को'तर्फे एक बैठक झाली आणि लिलावाप्रमाणे मदतीची बोली झाली.

ही मदत अर्थातच ह्या ग्रंथालयासाठी. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मितराँ, इजिप्तचे होस्नी मुबारक, जॉर्डनची राणी नूर, स्पेनची राणी सोफिया, मोनॅकोची राजकन्या कॅरलीन अशी मंडळी हजर होती. सौदी अरेबियाच्या प्रिन्स तुर्कीने पहिला आकडा टाकला– ३० लक्ष डॉलर्स! अमीरातींच्या शेख झईदने पुढची बोली बोलली– २ कोटी डॉलर्स! एवढ्यात फोन घणघणू लागला. तो कोणाचा असावा? अविश्वसनीय वाटले तरी सत्य आहे – तो फोन इराकच्या सद्दाम हुसेनचा होता आणि फोनवरच पठ्ठ्याने २१ कोटी डॉलर्स जाहीर केले. त्या वेळचे वातावरण गळ्यात गळे घालण्याचे होते. सद्दामची २१ कोटी डॉलर्सची बोली ऐकताच प्रिन्स तुर्कीने आपला आकडा वाढविला आणि २३ कोटी डॉलर्सचे अनुदान घोषित केले. एका बैठकीत ६४ कोटी डॉलर्सची आश्वासने मिळाली. 'युनेस्को'ला आणि इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष होस्नी मुबारक ह्यांना ही आश्वासने पाळली जातील ह्याची खात्री नव्हती. पण ती सर्व पाळली गेली. खरे तर पैशाची तंगी सर्वाधिक प्रमाणात इराकलाच सतावीत होती. पण सद्दामने आपला शब्द पाळला. त्याने जाहीर केल्याप्रमाणे २१ कोटी डॉलर्स जुलैच्या मध्यास पाठवून दिले आणि बरोबर तीन आठवड्यांनी कुवेतवर स्वारी केली. योगायोग असा झाला की, सद्दामला रोखण्यासाठी सौदी अरेबियाने सैन्य खडे केले, तेव्हा धाहरानकडील आघाडीचा कमांडर म्हणून प्रिन्स तुर्कीचीच नेमणूक झाली. बिचाऱ्या तुर्कीच्या मनात आघाडी सांभाळताना एक भीती डोकावत राहिली – 'आता सद्दाम २१ कोटी डॉलर्स परत मागणार', ह्या भीतीपोटी प्रिन्स तुर्कीने होस्नी मुबारकना सबुरीचा सल्ला दिला. प्रकल्पाचे काम एवढ्यात सुरू करू नये, असे सुचविलेदेखील! पण सद्दाम तसा दिलदार माणूस निघाला. एकदा दान दिले ते दिले! परत मागितले नाही आणि अर्थातच अलेक्झँड्रियाच्या महत्तम ग्रंथालयाचे पुनर्बांधणीचे काम मार्गी लागले –

अलेक्झँड्रियाचे ग्रंथालय म्हणजे केवळ इस्लामी जगतापुरते, संस्कृतीपुरते असेल, असा गैरसमज करून घेऊ नये, हे प्राचीन ग्रंथालय अखिल जगताचे ज्ञानलेणे होते. आज त्यात नव्याने ग्रंथभार घेण्यासाठी आणखी वेगळी ४० कोटी डॉलर्सची रक्कम उभारली जात आहे. पण विद्वानांनी जो प्रश्न उभा केला आहे, त्याला उत्तर नाही. पश्चिमेच्या विद्वानांनी असे मत व्यक्त केले आहे की, आधुनिक जगातले कोठलेही ग्रंथ तेथील मूळ संचिताच्या पासंगालाही पुरणारे ठरणार नाहीत. हे विद्वान एकमुखाने असे का बोलत असावेत, हे समजून घ्यायचे, तर प्रस्तुत ग्रंथभांडाराची पार्श्वभूमी जाणणे आवश्यक आहे.

अलेक्झँड्रिया ही नगरी स्वतःच मुळात जगातील आश्चर्यांपैकी एक आहे. इजिप्तच्या फॅराहोंच्या काळात बांधलेले ४४० फूट उंचीचे प्राचीन दीपगृह पाहून अलेक्झँडर द ग्रेटने आपला दिग्विजय चिरंजीव करण्यासाठी समुद्रकाठी अलेक्झँड्रिया नगरी उभारली. त्या काळातील सर्वांत आधुनिक पद्धतीची. अलेक्झँडरचा वारस पूर्वजापेक्षा सवाई निघाला. युरोपियन इतिहासात ज्याचे वर्णन 'राजीयांचा राजा' असे केले आहे, तोच हा किंग टॉलेमी

द्वितीय ऑझीमँडायस! ख्रिस्तपूर्व २५९ मध्ये हे अजब ग्रंथालय ह्याच राजाने स्थापले. टॉलेमी दुसरा आपला पूर्वज सिंकंदराप्रमाणेच अतिबलाढ्य होता. आक्रमक व अफाट साम्राज्याचा धनी होता. पण ज्ञानयोगीही होता. तो सैनिक पाठवताना यात्रिकही पाठवायचा आणि जगभरचे ग्रंथ आणण्याची त्यांना सक्त ताकीद असे. प्रसिद्ध इंग्रज कवी पर्सी शेली ह्याने ह्याच राजावर 'लुक ऑन माय वर्क्स, यू मायटी ॲण्ड डिस्पेअर!' अशी पंक्ती लिहून ठेवली आहे. टॉलेमी दुसरा ह्याने आपल्या ह्या लाडक्या ग्रंथालयात जगभरची ५ लक्ष हस्तलिखितभेंडोळी, ५४,००० ग्रंथ, विविध अक्षर-लिपींचे नमुने, लेखनाची व शिक्षणाची साधने संचित केली. 'ज्ञाना'ची किंमत न जाणणारे, किंबहुना ते नष्ट करण्यात पुरुषार्थ मानणारे प्रत्येक कालखंडात असतातच. टॉलेमी जेथे सर्वाधिक काल व्यतीत करण्यात धन्यता मानी, त्या वास्तूची हानी करताना आक्रमकांचे चेहरे अभिमानाने फुलत गेले, अपवाद फक्त सम्राट ज्युलियस सीझरचा. ख्रिस्तपूर्व ४८ मध्ये ह्या वास्तूची हानी होण्यास अप्रत्यक्षरीत्या केवळ अपघाताने सीझर कारणीभूत झाला नि आपल्या आदेशामुळे काय घडले, हे कळल्यावर सीझर रडला. कारण तो स्वत: वाचक होता. ज्ञानाची कदर करणारा होता. ग्रंथालयाची आणि अलेक्झँड्रिया नगरीचीही जबर हानी पुढे इ. स. ३९१ मध्ये ख्रिश्चन रोमन सम्राट थिओडोसियस ह्याने काढलेल्या चमत्कारिक फर्मानामुळे झाली. उरलीसुरली हानी करण्याचे श्रेय इस्लामच्या उदयानंतर इ. स. ६४१ मध्ये अरब सेनापतीकडे गेले. ह्या ग्रंथालयात 'ज्ञान' आहे. म्हणजे साकल्याचे विचार आहेत आणि 'विचार' हा 'सत्ते'ला अडचणीत आणणारा ठरू शकतो. जनतेच्या हाती ते एक शस्त्र ठरू शकते. ही जाणीव आक्रमकांना होती. अलेक्झँड्रियावर कबजा करताच हेतुत: ह्या वास्तूवर प्रहार होत गेले. ग्रंथांच्या होळ्या होत राहिल्या. कापडांवर नैसर्गिक रंग वापरून पिसांनी लिहिलेल्या पत्रांचेही कोळसे झाले आणि रेशमी वस्त्रावर सुईने कशिदा केलेल्या लेखनाचेही भस्म झाले.

अलेक्झँड्रिया ग्रंथालयात नेमके काय होते, ह्याबाबत अनेक तर्कवितर्क होत राहिले. कुवेत विद्यापीठाचे विद्वान डॉ. मुस्तफा अल-आबादी हे ह्यातील अधिकारी व्यक्ती आहेत. सध्या त्यांचा मुक्काम अलेक्झँड्रियालाच असतो. त्यांनी ह्या ग्रंथालयातील संपदेची जी यादी सादर केली, ती थक्क करणारी आहे. इसवी सनापूर्वी ९ व्या शतकातील, महाकवी होमर ह्यांच्या सर्व काव्यरचना. कष्टाने त्याची हस्तलिखिते मिळवून येथे त्या संपादित व प्रमाणित करण्यात आल्या. भूमितीत क्रांती घडविणाऱ्या युक्लीडची मूळ हस्तलिखिते, 'एश्चीलस, सॉफक्लीस आणि युरीपाइडस् ह्यांच्या नाटकांची हस्तलिखिते, ग्रीक भाषेचे पहिले लिखित व्याकरण, ओल्ड टेस्टमेंटचे (जुना करार) पहिले ग्रीक भाषांतर, गॅलेनचे वैद्यकशास्त्रावरील लिखाण, इरॅटोस्थिनीस ह्याने केलेल्या गणिताचे पुरावे. पृथ्वीचा व्यास मोजण्याचे पहिले धाडस इरॅटोस्थिनीसने केले होते. मानवी शरीरातील रक्ताभिसरणाची केवळ कल्पना

मांडणाऱ्या एरीस्ट्रेटसचे अभ्यास व रेखाटने, पृथ्वी हे विश्वाचे केंद्र नसून ती गतिशील आहे. स्वत:भोवती फिरते. हा सिद्धान्त कॉपर्निकसच्या १८ शतके अगोदर मांडणाऱ्या ॲरीस्टार्कस ह्या खगोलशास्त्रज्ञाची टिपणे, –प्राचीन इजिप्शियनांची (मिसर संस्कृती) गुप्त धर्मविषयक टिपणे, –ख्रिस्तपूर्व ६ व्या शतकातील झोरास्ट्रियन धर्माचे अहवाल, –थीओक्रीटस्चे काव्य, प्लॉटिनसचे तत्त्वज्ञान, हिपोक्रेट आणि हिटोफिलस यांचा रोगवर्णन, वैद्यकीसंबंधीचा अभ्यास, मानवी बुद्धिमत्तेचे केंद्र मेंदू असल्याचे प्रथम सांगणारा हिरोफिल्सचा सिद्धांत... ही यादी न संपणारी आहे अशी एक सूची. आज ह्या संचितातले काही शिल्लक नाही नि आश्चर्य म्हणजे एक विचित्र नोंद मागे राहिली आहे. ती म्हणजे येथे ॲरिस्टॉटलचे सर्व लेखनधन ठेवले होते. आज तेही नष्ट झाले असणार. ॲरिस्टॉटलचा शिष्य डिमिट्रीऑस ह्याला राजा टॉलेमीने ग्रंथपाल म्हणून आणले होते. पुस्तके खरीदण्यासाठी त्याला अमर्याद निधी दिला होता.

ह्याच ग्रंथालयाच्या संदर्भात एक विचित्र घटना नमूद झाली आहे. सिकंदर मरण पावल्यानंतर तेव्हाची इजिप्तची राजधानी 'मेंफिस' येथे त्याची अंत्येष्टी करून तेथेच कबर उभारण्याचे सूचित झाले. तेव्हा मेंफिसचा वयोवृद्ध, धर्मगुरू बोलून गेला– "त्याची कबर येथे नको, त्यानेच स्थापलेल्या नगरीत त्याला चिरनिद्रा घेऊ द्या. कारण त्याचा देह जेथे विसावेल तो भाग सतत अशांत, उद्रेकी राहणार आहे, युद्धांत सतत पोळून निघणार आहे.'

केवढा विलक्षण योगायोग! अलेक्झँड्रिया सातत्याने शस्त्रांच्या खणखणाटात हादरतं राहिले, वारंवार स्मशानवत् झाले अन् तरीही पुन: उठत राहिले. कदाचित त्या धर्मगुरूच्या भाकितापुढे उत्तरार्ध असावा– 'हे शहर अशांत होईल. पण नव्याने जिद्द धरील.' आज इतक्या शतकांनंतर सर्व जगाच्या योगदानातून हे प्राचीन ग्रंथालय पुन: उभारण्याची महत्त्वाकांक्षी योजना सुरू झाली आहे.

***

## ६५

※

# अलौकिक! लोकोत्तर!

'फ्रान्स जर बलाढ्य नसेल तर ते फ्रान्स नव्हेच' – हा विचार सर्वप्रथम नेपोलियन बोनापार्टने मांडला. नेपोलियननंतरच्या एका महान फ्रेंच सुपुत्राने विसाव्या शतकात हाच विचार आचरणात आणला आणि आपल्या अलौकिक आयुष्याची चित्तथरारक गाथा जेव्हा त्याने शब्दबद्ध केली तेव्हा त्या ग्रंथाचा उपोद्घातच त्याने ह्याच वाक्यानिशी केला. 'द वॉर मेम्वार्स ऑफ चार्ल्स द गॉल- द कॉल टू ऑनर १९४०-४२' ही त्याची जीवनगाथा. जनरल चार्ल्स आंद्रे मारी द गॉल ह्यांचे वर्णन अत्यंत सार्थपणे 'नेपोलियननंतरची फ्रान्सची चेतना' असे केले जाते. तर कित्येक फ्रेंच इतिहासकारांच्या मते '१९ व्या शतकातील ही शेवटची थोर व्यक्ती आणि उद्या उगवणाऱ्या २१ व्या शतकाचाही तो पहिला थोर पुरुष ठरेल.' कारण केवळ त्याच्याच प्रेरणेमुळे आज फ्रान्स हे राष्ट्र स्वतंत्र, समृद्ध आणि अभंग आहे. दि. २२ नोव्हेंबरपासून फ्रान्समध्ये आणि युरोपातही लष्करी प्रशाला, इतिहास संशोधन संस्था आणि वॉर म्युझियममधून जनरल चार्ल्स द गॉल ह्यांची शताब्दी सुरू झाली आहे. त्यांच्या धोरणांवर कडाडून टीका करणारी मंडळीही ह्या समारंभात सहभागी झाली आहेत. फ्रान्सचे अस्तित्व द गॉलमुळेच अबाधित राहिले, हे सत्य टीकाकारही नाकारीत नाहीत. चार उत्कृष्ट ग्रंथ लिहून वाङ्मयातही भर टाकणारा हा अलौकिक सेनापती होता.

फ्रान्समधील लिली ह्या गावी दि. २२ नोव्हेंबर १८९० रोजी जन्मलेल्या चार्ल्स

आंद्रे मारी द गॉल ह्याचे बालपण धार्मिक आणि लष्करी वातावरणात गेले. त्यांचे वडील पुरेपूर कॅथलिक होते आणि १८७०-७१ मध्ये फ्रान्स-प्रशिया युद्धात लढताना जखमी झाले होते. तर आई जीन मेलॉ हिच्या माहेरी लष्करी परंपरा होतीच. वडिलांकडून त्यांनी युद्धाच्या धोरणात्मक डावपेचांचे बाळकडू घेतले तर आईकडून आश्चर्यकारक प्रतिकारशक्ती, चिकाटी आणि ताडमाड उंची व भलेमोठे नाक घेतले. सुरुवातीला चार्ल्स द गॉल मिशनरी बनण्याची स्वप्ने पाहात होते. द गॉलच्या बाबतीतील एक धक्कादायक बाब म्हणजे ते शाळेत जाऊ लागण्याआधीच भले जाडजूड ग्रंथ वाचू लागले होते आणि कदाचित विश्वास बसणार नाही पण वयाला पाच वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच फ्रान्सचा संपूर्ण इतिहास त्यांना मुखोद्गत झाला होता हा पाठांतराचा प्रकार असेल म्हणून त्यांची चाचणी घेता ह्या बालकाने प्रत्येक घटनेचा तपशील, तो नमूद केलेल्या ग्रंथाचे नाव, त्याचे नेमके पृष्ठ क्रमांक सांगायला प्रारंभ केला. आई-वडील सर्वच अखंड वाचीत नि मग सर्व कुटुंबाची एकत्रित चर्चा चाले. ह्याचा परिणाम म्हणजे चार्ल्स द गॉल अगदी लहान वयातच वाङ्मय व तत्त्वज्ञानावर लेखन करू लागले नि ते छापलेही जाऊ लागले.

शालेय शिक्षण संपताच सेंट-सिर लष्करी कॉलेजमध्ये ते दाखल झाले. ह्या कॉलेजमध्ये स्वत: विद्यार्थी असूनही त्यांच्यावर इतिहासावर व्याख्याने देण्याची जबाबदारी टाकण्यात आली. १ ऑक्टोबर १९१२ रोजी शिक्षण संपवून द गॉल फ्रान्सच्या ३३ व्या रेजिमेंटमध्ये नियुक्त झाले. येथेही नित्याच्या जबाबदारीखेरीज इतिहास व लष्करी डावपेच ह्या विषयांमधील त्यांची विलक्षण गती पाहून त्यांना रेजिमेंटचा व्याख्याता म्हणूनही नेमले गेले. तेज बुद्धी, स्मरणशक्ती, वाहून घेण्याची वृत्ती, अभ्यासाची आवड आणि उत्कृष्ट वक्तृत्व हे द गॉलमधले गुण रेजिमेंटच्या कमांडिंग ऑफिसरने नेमके हेरले होते. हा कमांडिंग ऑफिसर म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून फिलिप पेताँ होता. दुर्दैवाचे दशावतार ज्याला पुढे पाहावे लागले तोच हा फ्रान्सचा भविष्यातील कमांडर–इन-चीफ आणि कुप्रसिद्ध, कळसूत्री विशी सरकारचा मार्शल पेताँ तो हाच!

पहिल्या महायुद्धात द गॉल लढले, जखमीही झाले आणि फ्रान्सचा क्रॉस ऑफ शेव्हालिए ऑफ लीजाँ द ऑनर हा बहुमानही त्यांनी पटकावला. ह्या युद्धात द गॉल जर्मनांचे कैदी झाले होते आणि गमतीदार प्रकार असा की, अनेक वेळा त्यांनी कैद्यांच्या छावणीतून पहारा चुकवून पळून जाण्याचा प्रयत्न केला आणि प्रत्येक वेळी त्यांच्या आडमाप उंचीमुळे ते पुन:पुन्हा पकडले गेले. युद्धसमाप्तीनंतर काही काळ पोलंडमध्ये लष्करी प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम केले. ह्याच दरम्यान एका उद्योगपतीची इव्हॉन वेन्द्रो ही सुंदर आणि अतिशय बुद्धिमान मुलगी त्यांच्या आयुष्यात आली. चार्ल्स द गॉल ह्या अत्यंत कणखर जनरलची तेवढीच धीरोदात्त, निर्भय पत्नी म्हणून पुढे गाजलेली हीच मादाम द गॉल! विशेष म्हणजे द गॉलना साजेशी सहा फुटांहून अधिक उंची ह्या स्त्रीलाही लाभली होती.

पुढील काही वर्षांत द गॉल लष्करात अधिकाधिक उच्च पदे मिळवीत गेले. व्याख्याने आणि संरक्षणाशी संबंधित लेखनही चालू होतेच. त्यांचे गुण हेरणाऱ्या मार्शल पेताँशी द गॉल ह्यांचे फ्रान्सच्या धोरणावरून कित्येक वेळा खटके उडाले. मध्य पूर्वेतील फ्रान्सचे धोरण, मॅजिनो तटबंदी द गॉलना कधीच पटली नाही. जर्मनी शस्त्रसंपन्न होत असल्याने फ्रान्सने सावध राहावे, ह्या त्यांच्या इशाऱ्याकडे पेताँ व अन्य राजप्रमुखांनी लक्षही दिले नाही. फ्रान्सच्या सुरक्षेच्या दृष्टीने आपण सांगू त्या फळ्यांवर दोन सुसज्ज चिलखती डिव्हिजन्स आवश्यक आहेत, ही द गॉलची मागणी फ्रान्सच्या वॉर कौन्सिलमध्ये १९३८ मध्ये मान्य झाली. तोवर खूपच उशीर झाला होता कारण तोपर्यंत जर्मनांची पँझर्स डझनवारी डिव्हिजन्सनी सुसज्ज झाली होती. दुसऱ्याच वर्षी द गॉलची भीती खरी ठरली. पोलंडचा धुव्वा उडवून फ्रान्सच्या सीमेवर जर्मन डिव्हिजन्स आल्यावर फ्रेंच राज्यकर्त्यांचे डोळे उघडले. जर्मन फौजा आता अमूक आघाड्या, तमूक फळ्या उघडून फ्रान्समध्ये ह्या मार्गाने मुसंडी मारतील एवढ्या सविस्तर सूचना द गॉलने देऊनही तिची उपेक्षा झाली होती. फ्रान्सचे भवितव्य स्वच्छ दिसू लागले होते. मार्शल पेताँ शरणागती पत्करणार आणि फ्रान्स जर्मनीच्या पकडीत जाणार हे उघड होते. नेपोलियनचा फ्रान्स स्वतंत्र करण्यासाठीच आता जगायचे हे ध्येय ठरवून द गॉलने मनाशी खूणगाठ बांधली. आपली पत्नी, एक पुत्र आणि दोन कन्या हा कुटुंबकबिला एका नौकेतून इंग्लंडला पाठवून दिला. एका गुप्त निधीतून १ लक्ष फ्रँकची रक्कम घेतली आणि बोर्डो येथे इंग्लंडचे सर एडवर्ड स्पीअर ज्या विमानात चढले त्याच विमानात फ्रान्सचा हा लोकोत्तर नेता चढला... इंग्लंडला विजनवासात जाण्यासाठी! तो १९४० चा जून महिना होता... फ्रान्सच्या सपशेल शरणागतीचा!

लंडनला आलेल्या विजनवासी फ्रेंच सेनानीची ना कोणी पुरती कुवत ओळखली. ना कोणी त्याचे यथार्थ मूल्यांकन करू शकला. अगदी इंग्लंडमधील फ्रेंच राजदूतानेही त्याला काही महत्त्व दिले नाही. तो काळही असा होता की, इंग्लंडमध्ये त्या वेळी देशोदेशींची विजनवासी सरकारे स्थापन झाली होती... मुकुट आणि सिंहासन हरवलेले युरोपमधील कित्येक राजे-राण्या इंग्लंडमध्ये आश्रयाला आले होते. ब्रिटनला स्वतःच्या समस्या होत्याच. त्यात ही 'व्याह्यांनी धाडलेली घोडी' भर घालीत होतीच. पण एक क्षण आला... जो केवळ द गॉलचाच होता. साफ कोलमडलेल्या फ्रान्सला चेतना देण्यासाठी खुद्द सर विन्स्टन चर्चिलनी द गॉलना लंडनमधून बीबीसीवरून खास फ्रेंच जनतेसाठी भाषण करण्यास पाचारण केले. दि. १८ जून १९४० रोजी द गॉलनी केलेले भाषण ऐतिहासिक ठरले. त्यांची लेखणी आणि वाणी इथे पणास लागली.

—'मी, सेनापती द गॉल, जगभरच्या फ्रेंचांना आवाहन करीत आहे— फ्रान्स केवळ लढाईत हरलेले आहे, निर्णायक युद्ध अजून व्हायचेच आहे...' द गॉलच्या भाषणाचा अपेक्षित परिणाम झाला आणि 'फ्री फ्रेंच फोर्सेसचा जन्म झाला.' फ्रान्सबाहेरून फ्रान्सच्या

स्वातंत्र्यासाठी द गॉलच्या नेतृत्वाखाली लढा सुरू झाला. सात हजार फ्रेंच तरुणांची फौज द गॉलनी इंग्लंडमध्ये खडी केली. फ्रान्सच्या जेथे जेथे वसाहती होत्या, तेथून द गॉलनी सहकार्य घेतले. जर्मनव्याप्त फ्रान्समध्ये जाऊन गुप्त खबरी काढण्यासाठी फ्रेंच गुप्त हेरांची संघटना ह्या विजनवासी सेनानीने बांधली. तरीही द गॉलची खरी किंमत चर्चिल-रुझवेल्ट दोघांनीही ओळखली नव्हती. रुझवेल्टनी तर गॉलला बाजूला सारून डर्लन व गिरॉ ह्या दोघांच्या नावांना अनुमोदन दिले होते. विजनवासातील द गॉल म्हणजे स्वतंत्र फ्रान्सचे प्रतीक होते, हे रुझवेल्टना कळले नाही. नॉर्मंडीच्या सनसनाटी विजयानंतर आठ दिवसांनी द गॉलचा विजनवास सरला. २५ ऑगस्ट १९४४ रोजी द गॉल पॅरीसमध्ये प्रवेशले आणि देवदुर्लभ स्वागताचे मानकरी बनले.

स्वतंत्र फ्रान्सचे स्वप्न साकारणाऱ्या द गॉलनी १९४६ पर्यंत फ्रान्स सरकारची सूत्रे सांभाळली, लोकशाहीची पुन: प्रतिष्ठापना केली, स्त्रियांना मताधिकार दिला, सामाजिक सुरक्षा राबवली मात्र फ्रान्सची राजकीय घडी दुर्लक्षित राहून उद्रेक उसळू लागले तेव्हा जानेवारी १९४६ मध्ये द गॉल राजीनामा देऊन निवृत्त झाले.

येथे खरे तर त्यांची सक्रिय जीवनगाथा संथ व्हावी पण कम्युनिस्ट – सोशलिस्टांनी फ्रान्सला पोखरून काढले. खिळखिळलेल्या फ्रान्सला एकसंध राखायचे तर जनरल चार्ल्स द गॉलखेरीज पर्याय सापडेना म्हणून राजकीय निवृत्ती पत्करलेल्या द गॉलना पुनश्च सन्मानाने पाचारण करण्यात आले. १९५८ मध्ये ह्या वृद्ध पण पोलादी सेनानीने मग आपल्या अटी घातल्या... त्या मान्य झाल्या... आपल्या सोयीने फ्रान्सचे संविधान बदलून घेतले – ते एवढे परिपूर्ण ठरले की, आजही तेच संविधान चालू आहे आणि १९५८ मध्ये जनरल चार्ल्स द गॉल आजारी फ्रान्सला आत्मसन्मान देण्यासाठी राष्ट्राध्यक्ष बनले. द गॉलच्या ह्या कृतीमुळे तेव्हा पं. नेहरूंनी 'बोनापार्टीझमचा नवा अवतार' म्हणून खरपूस टीका केली होती. हिंदुस्थानच्या सीमांचेही ज्यांना धड रक्षण करता आले नाही, त्या सीमा ज्यांच्या कारकीर्दीत आकुंचन पावल्या त्या नेहरूंनी ह्या लोकोत्तर पुरुषावर केलेली ही टीका हा एक केविलवाणा विनोद म्हणावा लागेल.

आजचा फ्रान्स हा जिवाच्या कराराने लढणाऱ्या जनरल द गॉलची देणगी आहे. 'डे ऑफ द जॅकॉल' हा चित्रपट आठवत असेल. द गॉलच्या हत्येचे सर्वाधिक प्रयत्न झाले... नि असफल ठरले. दि. ९ नोव्हेंबर १९७० रोजी द गॉल नैसर्गिकरीत्या मृत्यू पावले. कोठलाही सरकारी इतमाम मृत्यूनंतर दिला जाऊ नये, असे बजावून ठेवणाऱ्या द गॉलना फ्रेंच जनतेने उत्स्फूर्तपणे संपूर्ण फ्रान्सची सलामी दिली.

३/१२/९०

❋❋❋

## ६६

※

# जबर महत्त्वाकांक्षा

धूमकेतू, उल्कापात, झंझावात, ऑक्टोपस, हिटलरचा नवा अवतार, राक्षसी महत्त्वाकांक्षेने पछाडलेला, सर्वांना गुलाम बनविण्यात आसुरी आनंद मानणारा अशी विविध विशेषणे सध्या इराकचे राष्ट्राध्यक्ष सद्दाम हुसेन ह्यांना लावली जात आहेत. शेजारच्या पिटुकल्या देशाला – कुवेतला गिळंकृत करणारा माणूस कसा असेल? एका पंतप्रधानाचा खून करण्याचा प्रयत्न करणारा इसम कसा असेल? शेजारच्या राष्ट्रावर आक्रमण करण्यास विरोध दर्शविणाऱ्या आपल्याच १२० सेनाधिकाऱ्यांना देहांताची सजा देणारा राष्ट्रप्रमुख कसा असेल? जरब बसविण्यासाठी कुर्द भागावर विषारी वायू सोडून सर्वच्या सर्व रहिवाशांना ठार मारून हिटलरच्या गॅस चेंबरला मागे टाकणारा माणूस कसा असेल? इस्त्रायलने आमच्या विरुद्ध ब्र काढू नये, अन्यथा रासायनिक अस्त्रे वापरून आम्ही इस्त्रायलची राख करू, अशी दहशत घालणारा इराकचा सर्वेसर्वा कसा असेल आणि सरळ सौदी अरेबियाच्या सीमेलगत फौजफाटा जय्यत तयार ठेवून राजे फाहद बिन अब्दुल अझीझ ह्यांना आव्हान देऊन संपूर्ण इस्लामी जगताच्या तोंडचे पाणी पळवणारा, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष मिखाएल गोर्बाचेव्ह ह्याच्यासह जगभरच्या नेत्यांची झोप उडविणारा सद्दाम हुसेन कसा आहे, ह्याची सर्वत्र चर्चा चालू आहे.

– विदेशी पत्रकारांनी ह्या प्रश्नाचे उत्तर फार समर्पक दिले आहे. सद्दाम हुसेन कसा आहे? तर त्यांच्या पूर्वसूरींसारखा. हे पूर्वसूरी कोण? तर इराक जेव्हा 'मेसॉपोटेमिया'

होता तेव्हाचे तेथील सत्ताधीश आणि त्याआधी दोन सहस्राहून अधिक वर्षांपूर्वी हाच इराक 'बॅबिलोन' होता, तेव्हाचा इतिहासप्रसिद्ध सम्राट नेबुकडनेझार होत. ह्याच नेबुकडनेझारने खिस्तपूर्व ५८७ मध्ये जेरूसलेमचा विध्वंस केला होता... आणि तेथील यहुदी समाजाला विस्थापित करून गुलाम बनविले आणि पुढे तब्बल ७० वर्षे सहस्रावधी यहुदी बॅबिलोनियन सम्राटांनी केलेल्या ससेहोलपटीत होरपळत राहिले. यहुद्यांचा त्राता डॅनिएलला भुकेल्या सिंहाच्या पिंजऱ्यात सोडण्याचा नि सिंहांनी उलट याच्यावरच माया करण्याचा अद्‌भुत प्रकार ह्याच सम्राटांच्या कारकीर्दीत घडला नि बॅबिलोनच्या विध्वंसाचे भाष्य कथन करणारी भविष्यवाणी भिंतीवर उमटली (रायटिंग ऑन द वॉल) ती ह्याच सम्राटांच्या पुढ्यात! 'बुक ऑफ डॅनिएल' मध्ये नेबुकडनेझारचे वर्णन करताना त्याला अधूनमधून विक्षिप्तपणाचे झटके येत, असा उल्लेख आहे. बॅबिलोनच्या सम्राटांनी मध्य पूर्व, पश्चिम आशिया साफ दडपून टाकला होता. मात्र किंचित्‌काल त्यांची पकड थोडी ढिली होण्याचा अवकाश... बऱ्याच जुलमी सम्राटांचा अंत भीषण पद्धतीने होत गेला.

सद्दाम हुसेनला बॅबिलोनच्या सम्राटांच्या पंक्तीत पश्चिम पत्रकारांनी बसविले असले तरी ती पकड ढिली करण्याची जी चूक ह्या सम्राटांनी केली, ती सद्दाम हुसेन कधी करणार नाही. युद्धासाठी नेबुकडनेझार जो रथ वापरीत असे, त्या रथाची प्रतिकृती बनवून सद्दाम हुसेननी एकदा त्यावर आरूढ होऊन आपली छायाचित्रे काढून घेतली होती. त्यामुळे इस्राएलच्या गुप्तचरांनी एक उपद्‌व्याप केला. त्यांनी सद्दाम हुसेनच्या हस्ताक्षराचा अस्सल नमुना कोठूनसा पैदा केला आणि एका प्रख्यात ग्रॅफॉलॉजिस्टकडे (हस्ताक्षरतज्ज्ञ) तो पाठवला. अक्षर कोणाचे आहे, ह्याबाबत त्यात अवाक्षरही काढले नाही. ह्या तज्ज्ञाने त्याचे विश्लेषण करून अनुमान काढले की, ह्या अक्षराच्या स्वामीस अहंगंड आहे. स्वतःबद्दल त्याच्या काही अवास्तव कल्पना आहेत. हस्ताक्षरावरून काढलेल्या अनुमानाला किती किंमत द्यावी, ही दुय्यम बाब आहे. सत्य मात्र एवढे आहे की, स्वतःची ताकद जोखताना सद्दाम हुसेननी आपल्या देशाची लष्करी ताकद विलक्षण वाढवलेली आहे. नेबुकडनेझार अंशतः विक्षिप्त होता. मात्र सद्दाम हुसेन तशा साम्राज्याची स्वप्ने पाहात असला तरी ह्या सम्राटासारखा विक्षिप्त नाही... चांगला जागरूक, विचारी व डोळस आहे. आपल्याला हवे असलेले ईप्सित साध्य करण्यासाठी तो काहीही करण्यास सिद्ध आहे. अन्‌ त्याचे ईप्सित आहे की, मध्य पूर्वेवर त्याचेच वर्चस्व प्रस्थापित व्हावे. सैद्धांतिक वाद, तत्त्वे वगैरे भानगडी न करता संधी मिळताच कृती करण्यावर त्याचा विश्वास आहे. त्याची प्रत्येक कृती पूर्वनियोजित असते, अत्यंत थंडपणे क्रूर, कठोर निर्णय हा माणूस घेऊ शकतो, असे त्याच्याबद्दलचे मत, त्याला प्रत्यक्ष भेटलेल्या डॅन गुडगेम ह्या पत्रकाराने (टाइमचा विशेष प्रतिनिधी) व्यक्त केले होते.

सद्दाम हुसेन ह्यांचा जन्म १९३७ मध्ये बगदादपासून १६० किलोमीटर उत्तरेला

तिक्रीत ह्या गावी एका शेतकऱ्याच्या घरात झाला. म्हणजे परंपरेने वडिलांचा शेती व्यवसाय खरे तर त्यांनी चालविणे ही रहाटी झाली, पण तसे व्हायचे नव्हते. आई-वडिलांच्या प्रेमास अवघे ९ महिन्यांचे वय असताना सद्दाम हुसेन मुकले. ९ महिन्यांच्या ह्या पोरक्या मुलाला त्याच्या मामाने – खैरल्लाह ताल्फाह ह्याने वाढविले. त्या वेळी इराकमध्ये राजेशाही होती नि ह्या राजावर प्रत्यक्ष सत्ता ब्रिटिशांची होती. ब्रिटिशांच्या हातचे बाहुले बनून राहिलेल्या राजाबद्दल खैरल्लाह ताल्फाहच्या मनात निव्वळ तिरस्कार होता. ताल्फाह इराकी सैन्यात अधिकारी होता. त्यांच्या मांडीवर खेळत सद्दाम हुसेनने जीवनात आणि लष्करात उपयोगी ठरणारी कारस्थाने, डावपेच आत्मसात केले. १९४१ मध्ये ब्रिटिशांच्या विरुद्ध इराकी सैन्याने असफल क्रांती केली, त्यात ताल्फाह पकडला गेला व कारागृहात बंदिस्त झाला. वयाच्या ९ व्या वर्षापर्यंत सद्दाम हुसेन शाळेत गेलाच नाही. नंतर अतिशय प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या बगदाद मिलिटरी ॲकेडमीमध्ये त्याने प्रवेशासाठी अर्ज केला, पण गुणवत्तेच्या कसोटीवर तो नाकारण्यात आला. ह्या नकाराचा जबर आघात सद्दाम हुसेनवर होऊन लष्करी बळाचा वापर करण्याची एक जणू वृत्तीच त्याच्या व्यक्तिमत्त्वात मुरली, असे इस्राएली विश्लेषकांचे म्हणणे आहे. स्वतः डिझाईन केलेल्या लष्करी गणवेषात फिरण्याची सद्दाम हुसेनला फार आवड आहे, मात्र सत्तेवर आल्यावरच ते स्वतःला सरसेनानी बनवू शकले.

मध्य पूर्वेत पश्चिमेच्या विरोधात अरब जगतामधील समाजवादी चळवळ उभारणारी संघटना म्हणजे 'बाथ पार्टी'. हा पक्ष अर्थातच भूमिगत राहून काम करीत असे. विद्यार्थिदशेतच सद्दाम ह्या पक्षात गेले. बाथ पार्टीने सद्दामवर एक कामगिरी सोपवली. इराकचा तेव्हाचा लष्करशहा अब्दुल करीम कासम ह्याचा खून करण्याची ही कामगिरी होती. सद्दाम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कासमची स्टेशनवॅगन बगदादच्या रस्त्यावरून जात असताना मशीनगनने तिची अक्षरशः चाळण बनवली. पण कासम बचावले. कासमच्या अंगरक्षकांनी अनेक हल्लेखोरांना ठार केले. मात्र डाव्या पायात गोळी घुसलेल्या जखमी अवस्थेत सद्दाम निसटले. सद्दाम हुसेन त्यानंतर अटक होऊन तुरुंगात रवाना झाले, तथापि, ही घटना इजिप्तचे तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष अब्देल गमाल नासेर ह्यांना कळली. सद्दामचा निधडेपणा त्यांना आवडला आणि त्यांनी इराककडे रदबदली करून सद्दामला इजिप्तमध्ये कैरो येथे आणविले. त्यामुळे नासेरही हीरो बनले. ह्या प्रसंगाचे सद्दाम हुसेनकृत वर्णन थोडे अतिरंजित आहे. ते सांगतात की, आयडीनमध्ये ब्लेड बुडवून त्यांनी स्वतःच आपल्या पायातील गोळी कोरून काढली, बेदविन टोळ्यांतील खेडुताचा वेष धारण केला... टायग्रिस नदी पोहून पार केली... एक गाढव चोरले नि त्यावर स्वार होऊन वाळवंटातून सीरियाकडे कूच केले. वयाच्या २५ व्या वर्षी सद्दाम हुसेननी कायद्याचा अभ्यास सुरू केला. कैरोमधील आपल्या वर्गबंधूंबरोबर छोट्या हॉटेलातून गप्पा मारतानाच्या आठवणी काही वेळा त्यांनी

सांगितल्या आहेत. एखाद्या राज्यकर्त्यावर हे वर्गबंधू सडकून टीका करीत, तेव्हा सद्दाम हुसेन ह्यांचे ठरलेले विधान असे – 'वाद कसला घालता? बंदूक घ्या नि सरळ मारून टाका तुम्हाला न आवडणाऱ्याला राज्यकर्त्याला!' सद्दाम हुसेन १९६३ मध्ये परत इराकला परतले आणि बाथ पार्टीच्या कामास लागले. १९६८ मध्ये ही पार्टी इराकमध्ये अखेर सत्तेवर आली. सत्तास्थानी जरी बाथ पार्टीचाच जनरल अहमद हसन अल-बकर हा होता तरी खरा सूत्रधार सद्दाम हुसेनच होते. सद्दाम व अहमद हसन अल-बकर हे नातेवाईक होते. ह्याच सुमाराला आपल्याला वाढविणाऱ्या खैरल्लाह ताल्फाह ह्याची कन्या साजीदा ताल्फाह हिच्याशी सद्दाम हुसेनचा विवाह झाला. १९७९ मध्ये अल-बकर निवृत्त झाला नि सद्दाम हुसेन पूर्णपणे इराकचा सत्ताधीश बनला. आपले सत्ताग्रहण साजरे करताना त्यांनी मंत्रिमंडळातील २१ सदस्यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली यमसदनी धाडले. त्यात त्यांचा एक निकटचा मित्रही होता. राजबंद्याना मृत्युदंड देताना सद्दाम हुसेन आपल्या सर्व मंत्र्यांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांना घेऊन प्रत्यक्ष शिक्षेच्या ठिकाणी हजर राही. म्हणजे सगळ्या मंत्र्यांना जरब बसते, असे त्याचे म्हणणे! ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या मते इराकमध्ये दरवर्षी किमान १०० राजकैदी फाशी दिले जातात व गुप्त पोलिसांचा सर्वत्र सुळसुळाट आहे, अनन्वित छळ सर्रास चालू आहेत, पोलिसांच्या मंजुरीखेरीज कोणाला टाइपरायटरही बाळगता येत नाही... कोणीही सुरक्षित नाही, ह्याची प्रत्येकाला जाणीव आहे आणि पितृतुल्य नेता सद्दाम हुसेन ह्याच्या विरोधात बोलणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देणे हेही चांगले ठाऊक आहे.

सद्दाम हुसेन ह्यांच्या आयुष्यातील एक चमत्कारिक प्रकरण म्हणजे इराणचे दिवंगत नेते आयातुल्ला खोमेनी. खोमेनींचा इराणच्या शहेनशाहविरुद्ध लढा सुरू झाला तेव्हा सद्दाम हुसेननी खोमेनींना इराकमध्ये आश्रय दिला होता, हे आज खरेही वाटत नाही. तथापि शहेनशहाच्या दडपणामुळे त्यांनी खोमेनींना इराक सोडायला लावले. पुढे तर इराणवर इराकने चढाई केली आणि आठ वर्षे युद्ध केले. हा इतिहास अगदी ताजाच आहे. पहिल्या महायुद्धानंतर बंदी घातलेल्या विषारी वायूचा ह्या युद्धात सद्दाम हुसेननी वापर केला आणि जागतिक पातळीवर टीका सुरू झाली.

वस्तुतः आठ वर्षे चाललेले आणि उभय देशांचे लक्षावधी मनुष्यबळी घेऊन अब्जावधी डॉलर्स खर्ची पाडून संपलेले इराक-इराण युद्ध हा इस्लामी जगतावरील आधुनिक काळातील आघात होता. ते संपले म्हणून अरब विश्व सुटकेचा निश्वास टाकते, तेवढ्यात कुवेतला चिरडण्याचे कृत्य इराकने केले नि आता अरब जगताची मनःशांती सद्दाम हुसेननी उडविली आहे. इराकचे राष्ट्राध्यक्ष राहण्यात समाधान नसलेले सद्दाम हुसेन अरब देशांचे प्रमुख होण्याचे स्वप्न पाहात आहेत. मात्र त्यांचे मार्ग निराळे आहेत. रणगाडे, बंदुका, बॉंब, रसायने, विषारी वायू ही त्या मार्गातील साधने आहेत, ही दुःखाची बाब आहे.

१३/८/९०

❋❋❋

३४२८
२६३५८
२५६१७

REFBK-0026377

परिप्र
२




श्रीविद्या प्रकाशन